न्या.प्र.बा.गजेन्द्रगडकर यांची भाषणे व ले



तात्पुरते

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. २६७
९२६

समाजप्रबोधन

न्यायमूर्ति प्र. बा. गजेन्द्रगडकर यांची भाषणे व लेख

REFBK-0015148

विचार प्रकाशन

૪૦૬૦૮૮

ગિંબાદ્ય———

૭૭૧૮૧૬૬———

स मा ज प्र बो ध न



न्या. प्रह्लाद बाळाचार्य गजेन्द्रगडकर

भारताचे सरन्यायाधीश झाल्यानंतर
घेतलेले छायाचित्र, फेब्रुवारी १९६४

न्यायमूर्ति प्र. बा. गजेन्द्रगडकर यांची भाषणे व लेख

समाजप्रबोधन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ..... वि: .....
आणि ..... वी: वि: .....

संपादक :

श्यामकान्त श्रीनिवास बनहट्टी



न्या. गजेन्द्रगडकर यांच्या
विस्तृत

REFBK-0015148

सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर आणि पुणे

प्रथमावृत्ती मार्च १९६६

© सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर

मूल्य वीस रुपये

प्रकाशक :
श्यामकान्त बनहट्टी,
सुविचार प्रकाशन मंडळ,
धनतोली, नागपूर १ :
४६१।४, सदाशिव, पुणे २

मुद्रक :
विष्णु पुरुषोत्तम भागवत,
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबई ४

अनुक्रमणिका

संपादकीय निवेदन — सात ते बारा

न्यायमूर्ति प्र० बा० गजेन्द्रगडकर
: व्यक्ति, कृति आणि उक्ति — तेरा ते अठ्ठेचाळीस

समाजप्रबोधन

खण्ड पहिला : धारणा आणि सुधारणा — १ ते १३९

१ पुरोगामी बुद्धिवादाची प्रतिज्ञा — ३
२ सामाजिक क्रांतीचे स्वरूप — ४८
३ हिन्दू कायदा विधेयक — ८७
४ हिन्दू कायद्याची ऐतिहासिक पृष्ठभूमी आणि तात्त्विक बैठक — ९६
५ सामाजिक सुधारणेचे एक शतक — १२२
६ नवमहाराष्ट्रापुढील काही प्रश्न — १३२

खण्ड दुसरा : लोकसत्ताक भारताची वाटचाल — १४१ ते १८९

७ मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये — १४३
८ कल्याणकारी राज्यातील न्यायव्यवस्था — १४६
९ कल्याणकारी राज्यात सामाजिक प्रशासकाची भूमिका — १५३
१० भारतीय लोकशाहीच्या आधारभूत संकल्पना — १५९
११ ऐहिकतावाद व भारतीय समाज — १७०
१२ भारतीय संविधान आणि ऐहिकतावाद (धर्मनिरपेक्षता) — १७७

खण्ड तिसरा : न्यायतत्त्वाचे अधिराज्य — १९१ ते २४८

१३ कायदा, कायदेपंडित आणि न्यायाधीश — १९३
१४ जनतेचा विश्वास आणि न्यायालयांचे कर्तव्य — २११

१५ लोकशाहीतील न्यायाची दृष्टी २१४
१६ न्यायव्यवस्था आणि शासनव्यवस्था यांचे विलगीकरण २२८
१७ भारतीय संविधानाच्या छत्राखाली कायदा व न्याय २३६
१८ न्यायतत्त्वाचे अधिराज्य २४४

खण्ड चवथा : साहित्य आणि कला २४९ ते २९१
१९ भारतीय कलेचे पुनरुज्जीवन २५१
२० मराठी ग्रंथालयांपुढील कार्य २६०
२१ काल, आज आणि उद्या २७६

खण्ड पाचवा : व्यक्तिदर्शन २९३ ते ३५०
२२ सर नारायण चंदावरकर २९५
२३ महात्मा बसवेश्वर आणि त्यांचे कार्य ३०१
२४ गोपाळ गणेश आगरकर ३०७
२५ महर्षी धोंडो केशव कर्वे ३१४
२६ डॉ. पांडुरंग वामन काणे ३२४
२७ डॉ. भीमराव रामजी आंबेडकर ३३०
२८ कर्मवीर भाऊराव पाटील ३४१
२९ जवाहरलाल नेहरू ३४४
३० लालबहादूर शास्त्री ३४८

खण्ड सहावा : संकीर्ण ३५१ ते ३६४
३१ विद्यार्थिदशेतील संपादकीय लेखन ३५३
३२ शिक्षणाचे माध्यम ३५७
३३ न्यायाधीशाची भूमिका ३६०

सूची ३६५ ते ३८८

संपादकीय निवेदन

न्या. प्र. बा. गजेन्द्रगडकर यांच्या निवडक भाषणांचा व लेखांचा हा संग्रह आज मराठी वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे.

हा संग्रह काढण्यातील हेतू

१६ मार्च १९६६ रोजी न्या. गजेन्द्रगडकर हे भारताच्या सरन्यायाधीशपदावरून निवृत्त होणार यासंबंधी काही महिन्यांपूर्वी मित्रमंडळीशी बोलत असता न्यायमूर्तींचे एकंदर विचार आणि त्यांचा संदेश हे संकलित रूपाने अद्याप कुठेही उपलब्ध झालेले नाहीत, ही गोष्ट विशेषत्वाने लक्षात आली. हे काम ताबडतोब कोणी तरी हाती घ्यायला पाहिजे याची त्याच वेळी जाणीव झाली आणि बऱ्याच हितचिंतकांचा अभिप्राय पडला की ते आम्हीच हाती घ्यावे. सुमारे १९५० सालापासून, म्हणजे गेली सोळा वर्षे न्या. गजेन्द्रगडकर यांनी भारतात आणि भारताबाहेर अनेक महत्त्वपूर्ण भाषणे दिली आणि काही विचारप्रवर्तक लेखही लिहिले. या लेखनभाषणांतून प्रकट झालेला त्यांचा विविध विषयांचा दृढ व्यासंग, त्यावर आधारलेले मूलगामी सिद्धान्त व मते आणि त्यांतील स्वाभाविक कळकळ यामुळे महाराष्ट्रातील व भारतातील विचारवंतांचे आणि सुबुद्ध नागरिकांचे लक्ष त्यांच्या लेखनभाषणांकडे सहजच आकृष्ट झाले. अर्वाचीन काळातील एक श्रेष्ठ न्यायाधीश, एक पुरोगामी, जीवननिष्ठ, प्रतिभाशाली तत्त्वमीमांसक म्हणून न्या. गजेन्द्रगडकरांचे स्थान किती मोठे आहे हे आता कोणालाही नव्याने सांगावयास नको. अशा व्यक्तीचे विचार, विविध लेख-भाषणांतून विखुरलेले पडून राहाणे ही निश्चितच एक सामाजिक हानी झाली असती. योग्य रीतीने संपादित केलेल्या ग्रंथाच्या रूपाने हे विचार सध्याच्या व भावी पिढ्यांसाठी एकत्रित उपलब्ध करून देणे, समाजहिताच्या व सांस्कृतिक

प्रगतीच्या दृष्टीने अवश्य होय असे पुष्कळांना वाटत होते. असे हे अभिमानास्पद वाङ्मयस्वरूपी समाजकार्य करण्यास आम्ही निमित्तमात्र व्हावे असा विधिसंकेत होता, त्याबद्दल वाटणारी धन्यता प्रथमच प्रकट करतो.

हा संग्रह काढावयाचा ठरल्यानंतर प्रथमतः त्यासाठी न्या. गजेंद्रगडकर यांच्याकडे आम्ही परवानगी मागितली. स्वतःच्या लेखनभाषणाविषयी त्यांना ममत्व बेताचेच असल्यामुळे आमच्या बेताला ते प्रारंभी प्रतिकूलच होते. तथापि हा संग्रह काढण्यातील आमचा दृष्टिकोन आम्ही त्यांना सांगितला तो पटल्यामुळे म्हणा किंवा आमच्यावरील ममत्वाला जागून म्हणा त्यांनी या संग्रहाचे संपादन, प्रकाशन व मजकुराचा अनुवाद करण्यासाठी आम्हाला अनुमती आणि सर्वाधिकार दिले याबद्दल आम्ही त्यांचे फार ऋणी आहोत.

या संग्रहासाठी सामग्रीची जुळवाजुळव करीत असताना असे दिसून आले की न्यायमूर्तींच्या लिखित वा मुद्रित उपलब्ध साहित्यापैकी फक्त चारच भाषणे काय ती मूळ मराठीत आहेत. व्यवसायपरत्वे व वास्तव्यानुसार न्यायमूर्तींची बहुतेक भाषणे इंग्रजीतून झालेली आहेत. त्यांच्यासारख्या थोर महाराष्ट्रीयाच्या लेखभाषणांतून प्रकट झालेले मूलगामी महत्त्वाचे विचार मराठी वाचकांना तर प्रथम आणि अवश्य उपलब्ध करून दिले पाहिजेत असे आम्हांला वाटले; आणि अनेक सल्लागारांचाही तोच अभिप्राय पडला. म्हणून असे योजिले की मूळ मराठी भाषणे आणि बहुतेक इंग्रजी लेख–भाषणांचा मराठी अनुवाद या संग्रहात एकत्रित प्रसिद्ध करावा. याप्रमाणे हे अनुवादाचे साक्षेपाचे व जिकिरीचे कार्य तडीस जाऊन हा ग्रंथ आज प्रकाशित होत आहे.

मजकुराच्या वर्गीकरणाचा तपशील

१९२२ पासून १९६६ पर्यंतच्या चव्वेचाळीस वर्षांच्या कालावधीत आणि मास्को येथील सोविएट सर्वोच्च न्यायालयाच्या नेत्रदीपक भव्य सभागृहापासून तो साताऱ्याच्या रयत शिक्षण संस्थेच्या चंद्रमौळी सभागृहापर्यंत विविध स्थळी प्रकट झालेल्या या ग्रंथातील मजकुरात एकंदर **सत्तावीस भाषणे** आणि **सहा लेख** असे तेहतीस निबंध असून ते विषयानुसार सहा खंडांमध्ये वर्गित केले आहेत. लेखांपैकी **खंड ६–संकीर्ण** यातील क्र. १ चा लेख—*दक्षिण महाविद्यालय त्रैमासिकातील लेखन*–हा सोडून बाकी पाच मूळ इंग्रजीतून अनुवादित आहेत. भाषणांपैकी—खंड १ मधील क्र. १ व क्र. २; खंड ४ मधील क्र. २ व ३; खंड ५ मधील क्र. ३ व ७ आणि खंड ६ मधील क्र. २—ही सात भाषणे खेरीज करून बाकीच्या **वीस भाषणांचा** मूळ इंग्रजीतून अनुवाद केला आहे. म्हणजे **वीस भाषणे** व **पाच लेख** असे एकूण **पंचवीस निबंध** इंग्रजीतून मराठीत आणले आहेत. बहुतेक लेख–भाषणांच्या मुद्रित किंवा टंकित प्रती आम्हांला मिळाल्या त्यांचा उपयोग अर्थातच आम्ही केला आहे. फक्त **खण्ड ५ मधील क्र. ३**—*गोपाळ गणेश आगरकर*, व क्र.७—*माऊराव पायगौडा पाटील*; आणि **खण्ड ६ मधील क्र. २**–*शिक्षणाचे माध्यम*, व क्र. ३–*न्यायाधीशाची*

भूमिका या चार भाषणांचा मजकूर त्या त्या वेळी वृत्तपत्रांत आलेल्या वृत्तांतांवरून तयार केला आहे. प्रत्येक खंडाला सुरवातीस वेगवेगळी अनुक्रमणिका दिली असून तीत त्या त्या भाषणाचे किंवा लेखाचे स्थळ, काळ, प्रसंग व मूळ भाषा यांचा तपशीलवार निर्देश केला आहे. प्रत्येक खंडातील मजकूर बहुतेक कालानुक्रमे दिला आहे.

संपादकीय कामगिरी व धोरण

न्या. गजेंद्रगडकर हे समाजकारणात कोणत्या तत्त्वांचा किंवा संप्रदायाचा पुरस्कार करतात हे सुशिक्षित वाचकांस सांगावयास नकोच. तर्कनिष्ठ पुरोगामी बुद्धिवाद, लोकशाहीवरील दृढ निष्ठा, सामाजिक-आर्थिक न्यायाची प्रस्थापना आणि शाश्वत नैतिक मूल्यांची जोपासना या चतुःसूत्रीवर त्यांचे सर्व लेखन-भाषण आधारित आहे--किंबहुना या तत्त्वचतुष्टयाचा त्यांनी एकप्रकारे ध्यास घेतला आहे, याचा प्रत्यय या संग्रहावरून येईलच. त्यामुळे या संग्रहातील बहुतेक लेख-भाषणांची वैचारिक बैठक समान असून प्रतिपादित आशय, मते व सिद्धान्त यांतही सारखेपणा पुष्कळच आहे. वक्त्याला काही काही विचार आपल्या देशबांधवांना पुनः पुनः सांगावयाचे आहेत हे त्यावरून उघड दिसते. संग्रहात बहुसंख्य भाषणे असल्यामुळे व भाषणांच्या वेळी प्रत्येक ठिकाणी श्रोतृवर्ग वेगवेगळा असल्यामुळे त्यात कमीअधिक प्रमाणात विचार, दृष्टान्त, उद्धरणे यांची उजळणी होणे अगदी साहजिक असते. तशी ती निवडलेल्या भाषणांतूनही झालेली आहे असे दिसले. तथापि, आता सर्व मजकूर एका ग्रंथात एकत्र प्रकाशित होत असताना तो जसाच्या तसा छापून टाकणे हा ग्रंथवाचकांवर अन्याय झाला असता. मूळ लेखकाच्या आशयाला धक्का न लावता सर्व मजकुराचे—विशेषतः भाषणांचे—तारतम्याने संपादन करणे हे संपादकाचे कर्तव्य होते व ते शक्य तितक्या कसोशीने येथे पार पाडले आहे. त्यासंबंधीचा थोडक्यात तपशील असाः–(अ) काही भाषणांच्या व लेखांच्या प्रारंभीचा, आता बहुतांशी गतार्थ वाटणारा प्रास्ताविक व प्रासंगिक स्वरूपाचा मजकूर कुठे पूर्णपणे गाळला आहे तर कुठे संक्षेपाने दिला आहे. **खण्ड ५—व्यक्तिदर्शन** मधील तीन चरित्रांच्या प्रस्तावनापर लेखांना (क्र. १, ४ व ५) हे विशेष लागू आहे. (आ) स्थळकाळाच्या भिन्नतेमुळे भाषणांमध्ये आलेली पुनरुक्ती बहुतेक सर्व वगळली आहे; तसेच विषयाच्या सारखेपणामुळे एकाच तऱ्हेचा विचार किंवा आशय अनेक ठिकाणी पुनरुक्त होत असेल तर तो एका मुख्य ठिकाणी ठेवून इतरत्र आवश्यकतेनुसार कधी पूर्ण गाळला आहे किंवा त्याचा संक्षेप केला आहे. उदाहरणादाखल **खण्ड २—लोकसत्ताक भारताची वाटचाल** यातील क्र. ५ चे *'ऐहिकतावाद व भारतीय समाज'* आणि क्र. ६ चे *'भारतीय संविधान आणि ऐहिकतावाद'* या दोन्ही भाषणांचा विषय सारखा असल्यामुळे प्रतिपादनाचा आशयही पुष्कळसा एकच आहे. त्यांचे संपादन अशा तऱ्हेने केले आहे की वाचकांना दोन्ही भाषणांतून विषयाच्या परस्परभिन्न पैलूंचे दर्शन व्हावे. तीच गोष्ट **खण्ड ३ — न्यायतत्त्वाचे अधिराज्य**

यातील क्र. ५–'*भारतीय संविधानाच्या छत्राखाली कायदा व न्याय*' हे मास्को येथील भाषण आणि क्र. ६–'*न्यायतत्त्वाचे अधिराज्य*' हे जिनिवा येथील भाषण यांच्या बाबतीत सांगता येईल. (इ) मजकुराचे संपादन व विशेषतः अनुवाद करताना आणखी एक दृष्टी ठेवली आहे; ती म्हणजे हा ग्रंथ सर्वसामान्य मराठी वाचकांसाठी असून तो त्यांना बोजड व रुक्ष वाटू नये ही होय. ग्रंथातील विषय विविध सामाजिक शास्त्रांशी संबद्ध असे गहन–गंभीर स्वरूपाचे आहेत. पारंपरिक तयार परिभाषेमुळे व भाषेच्या समृद्धतेमुळे इंग्रजीतून या विषयांचे विवेचन जे मोठे सुबोध, विशद व आकर्षक रीतीने होते तेच मराठीतून करू गेल्यास रुक्ष जड व अनाकर्षक होईल असे वाटण्याचा संभव असतो. या ग्रंथाच्या बाबतीत तसे होऊ नये याची जास्तीत जास्त खबरदारी घेतली आहे. त्यासाठी मराठी अनुवाद करताना केवळ काटेकोर शब्दनिष्ठ दृष्टी न स्वीकारता, मुळातील महत्त्वाचा सर्व आशय अनुवादात आणण्यावर जास्त भर दिला आहे. तसेच सर्वसाधारण मराठी वाचकांना ज्यात रस वाटणे कठीण होईल असा अत्यंत तांत्रिक तपशिलाचा काही मजकूर गाळला आहे. विशेषतः **खण्ड १—धारणा आणि सुधारणा** यातील क्र. ३ च्या '*हिन्दू कायदा विधेयक*' या दोन भाषणांचे या दृष्टीने संपादन केले आहे. काही ठिकाणी गाळलेल्या मजकुराबद्दल तेथेच संपादकीय खुलासा दिला आहे (पृष्ठ ८९ व १६७ पाहा). सर्वच ठिकाणी असे केलेले नाही. त्याची आवश्यकता नव्हती.

खण्ड ६–संकीर्ण यांतील क्र. १ चा लेख हा न्या. गजेन्द्रगडकरांनी विद्यार्थी-दशेत केलेल्या लेखनावरून तयार केला आहे; तो या संग्रहाचे एक आगळे वैशिष्ट्य ठरेल. न्यायमूर्तींसारख्या एका श्रेष्ठ विचारकाच्या व्यक्तिमत्त्वाचे पूर्वस्वरूप ह्यावरून वाचकांना कळेल, आणि त्यांच्या मनावर काही निराळाच प्रकाश पडेल. त्याचप्रमाणे या ग्रंथासाठी मुद्दाम लिहिलेला, न्या. गजेन्द्रगडकरांचे जीवन आणि व्यक्तिमत्त्व यांचे साक्षात माहितीच्या आधारे तथ्यपूर्ण निरूपण करणारा **चरित्रलेख** ग्रंथाच्या प्रारंभी दिला आहे. तोही वाचकांचे एक आकर्षण ठरेल यात शंका नाही.

पारिभाषिक शब्दांबद्दल खुलासा

या ग्रंथातील मजकुराचा अनुवाद वेगवेगळ्या व्यक्तींनी केला असल्यामुळे पारिभाषिक संज्ञांच्या बाबतीत या ग्रंथात काहीसा अनियम झालेला आहे. काही उदाहरणांनी हे म्हणणे अधिक स्पष्ट होईल. *कोर्ट, हायकोर्ट, सुप्रीम कोर्ट, हिंदू कोड (बिल)* हे या ग्रंथात नेहमी येणारे शब्द—ते काही ठिकाणी वरीलप्रमाणेच छापलेले आढळतील तर काही ठिकाणी *न्यायालय, उच्च न्यायालय, सर्वोच्च* किंवा *उच्चतम न्यायालय, हिंदू कायदा विधेयक* किंवा *हिंदू कायदा संहिता* असे भाषांतरित रूपात आढळतील. '*Rule of Law*' ही अनेकवार आलेली संज्ञा—हिचा अनुवाद '*कायद्याचे राज्य*', '*न्यायतत्त्वाचे अधिराज्य*', '*विधिनियमांची*

आधिसत्ता' अशा भिन्नभिन्न संज्ञांनी वेगवेगळ्या ठिकाणी केलेला दिसेल. तसेच--- *Judiciary—न्यायदान मंडळ, न्यायमंडळ* किंवा *न्यायव्यवस्था*; *Executive—कार्यकारी मंडळ, कारभार यंत्रणा, अंमलबजावणी खाते* किंवा *शासनव्यवस्था*; *Legislature—कायदेमंडळ* किंवा *विधानमंडळ*, *Law—विधी* किंवा *कायदा*, *Constitution—संविधान* किंवा *घटना*, *Doctrine of laissez-faire—अहस्तक्षेपाचा सिद्धान्त, मुक्त बाजाराचा सिद्धान्त* किंवा *अनिर्बंध बाजाराचा नियम* —अशा तऱ्हेने एकाच इंग्रजी संज्ञेसाठी भिन्न भिन्न मराठी प्रतिसंज्ञा वापरण्यात आल्या आहेत. तथापि या भिन्नत्वामुळे उद्दिष्ट अर्थ कळण्याच्या बाबतीत काही अडचण येईल असे वाटत नाही. *Secularism* या शब्दाला योजिलेल्या प्रतिशब्दांबद्दल खण्ड २—क्र. ५ या भाषणाच्या प्रारंभी पृ. १७० वर खुलासा केलाच आहे. याशिवाय '*Ombudsman*', *Appellate*, *Original* (न्यायालयातील वाजू) या शब्दांचे इंग्रजी उच्चारच नागरी लिपीत लिहिले आहेत.

आ भा र

श्रेष्ठ दर्जाच्या शास्त्रीय तात्त्विक विचारांनी आणि मूलगामी सिद्धान्तांनी संपन्न असा हा आधुनिक भारतातील एका महान् मीमांसकाच्या लिखाणाचा बृहद्ग्रंथ, विशिष्ट कालावधीत, भाषांतरित स्वरूपात संपादून सिद्ध करणे हे काम मूलतःच बहुजनसाध्य स्वरूपाचे होते; एकट्याच्या बळावर पार पडणारी ही गोष्ट नव्हती. त्यातही प्रस्तुत संपादकाची, अशा तऱ्हेचा सामाजिक प्रबोधनाचा ग्रंथ संपादन करण्याची मुळीच पात्रता नाही, हे इतर कोणी सुचविण्याच्या अगोदरच त्याला पूर्णपणे ठाऊक आहे. अनेक श्रेष्ठ व्यक्तींचे सहकार्य या ग्रंथासाठी लाभलेले असूनही, प्रस्तुत संपादकाचे नाव या ग्रंथावर संपादक म्हणून टाकण्यात आले याचे एकमेव कारण ग्रंथातील उणिवा व त्रुटी यांची जबाबदारी घेणारा कोणीतरी एक धनी पाहिजे, हेच होय.

या ग्रंथातील एकंदर सर्व लेख-भाषणांची सामग्री जमविण्यात न्या. गजेंद्रगडकर यांचे मुख्य खाजगी चिटणीस श्री. **आर. डी. थिटे** आणि मुंबईचे सुप्रसिद्ध विद्वान व सामाजिक कार्यकर्ते प्राचार्य **त्र्यंबक कृष्ण टोपे** यांनी अत्यंत आपुलकीने फार महत्त्वाचे साहाय्य केले याबद्दल आम्ही त्यांचे अतिशय आभारी आहो. मूळ इंग्रजीतील लेख-भाषणांचा त्वरेने मराठी अनुवाद करणे आणि एकंदर सर्व मजकुराची सूक्ष्म तपासणी करून त्याचे पूर्वोक्त धोरणानुसार संपादन करणे या कामी अनेकांची मदत झाली आहे. प्रा. **दि. के. बेडेकर** यांनी हरएक बाबतीत प्रांजळ सल्ला दिला आणि काही सुयोग्य भाषांतरकारांचा निर्देश केला. पुण्याचे व्यवहार न्यायाधीश व न्या. गजेंद्रगडकरांचे एक भक्त श्री. **राजाभाऊ गवांदे** यांच्या सल्लामसलतीचा अतिशय उपयोग झाला. घरची अत्यंत अडचण असूनही आम्ही त्यांच्यावर टाकलेले अनुवादाचे काम त्यांनी तत्परतेने पार पाडले. त्यांचे ऋण शब्दांनी व्यक्त करण्याजोगे नाही. याशिवाय

अनुवादाचे काम पुढील मंडळींनी अतिशय समरसतेने केले आहे : पुण्याचे प्रसिद्ध संस्कृतज्ञ संशोधक श्री. **वि. म. बेडेकर**, गांधीसाहित्याचे मराठी अनुवादक व सर्वोदय कार्यकर्ते श्री. **भाऊ धर्माधिकारी**, फर्गुसन महाविद्यालयाचे उपप्राचार्य व ख्यातनाम मराठी साहित्यिक **पां. ल. उर्फ बाळ गाडगीळ**, प्रा. डॉ. **जी. एन. जोशी** श्री. **बी. डी. केळकर** आणि श्री. **पन्नालाल सुराणा**, म. गांधींचे चरित्रकार मुंबईचे श्री. **ना. रा. अभ्यंकर**, नागपूरचे श्री. **केशव एकनाथ पोतदार** व श्री. **पां. ब. गाडगीळ**—या सर्व मंडळींनी, आपापल्या नित्याच्या व्यवसायात आणि महत्त्वाच्या कामांत मग्न असतानाही जी मदत केली तिचे मोल आभाराने करता येण्यासारखे नाही. हे सगळे सल्लागार, साहाय्यकार आणि भाषांतरकार यांच्या सहकार्याशिवाय हा ग्रंथ सिद्ध होऊ शकला नसता, एवढेच नमूद करणे बस होईल. मुंबईच्या सुप्रसिद्ध मौज प्रिंटिंग ब्यूरोचे चालक श्री. **वि. पु. भागवत** यांनी अत्यंत आस्थेवाईकपणे या ग्रंथाची छपाई करून दिली याबद्दल त्यांचा कृतज्ञतापूर्वक निर्देश करणे अवश्य आहे.

न्यून ते पुरते करूनि घ्यावे

न्या. गजेन्द्रगडकर हे आजही निरनिराळ्या सामाजिक व सांस्कृतिक कार्यांत गुंतलेले असून तन्निमित्त त्यांचे लेखन–भाषण चालू आहे; कदाचित यानंतर त्याला अधिक बहर येईल अशीही शक्यता आहे. या संग्रहातही त्यांचे आजवरचे यच्चयावत् सर्व लिखाण आले आहे असे नाही. त्यांच्या समयस्फूर्त केलेल्या काही उत्तम भाषणांच्या नुसत्या नोंदी मिळाल्या पण त्यांचा विश्वसनीय वृत्तान्त हाती येऊ शकला नाही, तर काही मजकूर उपलब्ध झाला असूनही पृष्ठमर्यादा प्रमाणाबाहेर जाऊ नये म्हणून बाजूला ठेवावा लागला. तथापि, *न्या. गजेन्द्रगडकर यांच्या आजवरच्या एकंदर विचारांचे व संदेशाचे, आजच्या परिस्थितीत, एकमेव आणि अधिकृत संकलन म्हणजे हा ग्रंथ होय*, असे म्हणण्यास प्रत्यवाय असू नये.

या ग्रंथात संपादकीय उणिवा बऱ्याच असतील—आहेतही. तथापि, परिश्रमपूर्वक सिद्ध केलेला हा ग्रंथ मराठी वाचकांच्या पसंतीला उतरेल आणि त्यातील संदेश त्यांच्या मनावर ठसेल अशी आशा प्रकट करून सरतेशेवटी ज्ञानदेवांच्या शब्दात एवढेच म्हणतो—

तऱ्हीं न्यून तें पुरतें । अधिकही सरतें
करूनि घेयावें हें तुमतें । विनविलें मियां ॥

—ज्ञानदेवी, अ. १–८० (भीमातोषणी प्रत)

हुताशनी पौर्णिमा
३ मार्च १९६६

—संपादक

ग्रंथालय ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम..... क्रि: .....
आवि ..... दि. दि. .....

न्यायमूर्ति प्र. बा. गजेन्द्रगडकर

व्यक्ति, कृति आणि उक्ति

लेखक : श्री. ना. बनहट्टी

एक आठवण

पुण्याच्या दक्षिण महाविद्यालयाच्या विद्यार्थिसभेमध्ये राजकीय परिस्थितीवर एक ठराव चर्चिला जात होता. १९२१–२२ सालातले तीव्र राजकीय चळवळीचे वातावरण होते. ब्रिटिश सरकारकडून तावडतोब स्वराज्य न मिळाल्यास सर्व प्रकारच्या साधनांनी ते मिळविण्याचा हिंदी जनतेचा हक्क आहे, अशा तऱ्हेचा तो ठराव असावा. चव्वेचाळीस वर्षांपूर्वीची ती गोष्ट विस्मृतीच्या गभीर गव्हरात लुप्त झाली आहे, इतकेच नव्हे, तर ती विद्यार्थिसभा आणि तिचे अधिष्ठान असणारे ते दक्षिण महाविद्यालय देखील काळाच्या उदरात गडप झाले आहे. आज दक्षिण महाविद्यालय (डेक्कन कॉलेज) म्हणून एक संस्था चालू आहे. पण त्या वेळचे डेक्कन कॉलेज हे नव्हे. ते काही 'आगळे' होते.

बाकीच्या गोष्टी काळाच्या उदरात गडप झाल्या, पण त्या सभेत हजर असलेल्यांपैकी काही (त्या वेळचे) विद्यार्थी आज हयात आहेत आणि त्या सभेतल्या भाषणांपैकी दोन भाषणांचे स्वर त्यांच्या कानांत अद्यापि घुमत आहेत. ही दोन भाषणे करणारे विद्यार्थी प्र. बा. गजेंद्रगडकर आणि द. प. करमरकर हे होत. त्यांच्या भाषणांनी श्रोत्यांची मने थरारून गेली, उत्कट भावनांच्या वातावरणात त्यांनी त्या सभेला उचलून नेले.

त्या दोन वक्त्यांपैकी एक प्र. बा. गजेन्द्रगडकर आज भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश पद भूषवीत आहेत. त्यांचे जे वक्तृत्व त्या विद्यार्थिसभेत पंचेचाळीस वर्षांपूर्वी प्रकट झाले तेच आज दृष्टीस पडते. त्यात या दीर्घ कालवधीतील अनुभव, विचार व व्यासंग यांची भर पडली आहेच. पण तो आवेश, ती कळकळ आजही कायम आहे. ते वक्तृत्व पंचेचाळीस वर्षांपूर्वी जितके तरुण होते तितकेच आजही तरुण आहे.

ध्येयवादी मन आणि प्रभावशाली वक्तृत्व

गजेंद्रगडकरांच्या चेहेऱ्यात वयोमानानुसार काही बदल झाला आहे. पण विशाल मनाचा सूचक विस्तीर्ण भालप्रदेश, दुसऱ्याच्या अंतःकरणाचा ठाव घेणारी भेदक नजर, दृढतेचे निदर्शक ठसठशीत नाक व तसाच अधरोष्ठ आणि सभागृहावर प्रभुत्व गाजविणारा पहाडी आवाज हे त्यांचे जन्मजात शारीरिक गुण पूर्वीप्रमाणे आजही आहेत. या बाह्य गुणांबरोबरच वाणी वश असण्याचा जो वक्तृत्वाचा मुख्य गुण तो त्यांच्यात प्रकर्षाने आहे. न्यायाधीश असल्यामुळे प्रचलित राजकारण वर्ज्य. त्यामुळे जनसंमर्दासमोर भाषणे करण्याचा त्यांना प्रसंग येत नाही. त्यामुळे सामान्य जनतेत वक्तृत्वाबद्दल त्यांची विशेष प्रसिद्धी नाही. पण त्यांचे वक्तृत्व हुकुमी आणि अत्यंत प्रभावशाली आहे. अडखळणे नाही, कचरणे नाही, आडवळणे घेणे नाही; उत्कर्षबिंदूपर्यंत चढत जाणारे ठाशीव अस्खलित प्रतिपादन. त्याच्याही आतला गाभा म्हणजे त्यांचे ध्येयवादी मन. देशाच्या प्रगतीविषयी, जनतेच्या उद्धाराविषयी त्यांचे विचार निश्चित ठरलेले आहेत. त्यांचे मन देशभक्ताचे आहे. त्यांची कळकळ त्यांना स्वस्थ बसू देत नाही. भाषण करण्याचा प्रसंग आला की त्यांचे विचार त्यांच्या अंतःकरणाच्या तळापासून प्रेरित होऊन बाहेर पडतात. साहजिकच ते श्रोत्यांच्या अंतःकरणाचा ठाव घेतात. त्यांचे वक्तृत्व प्रभावशाली ठरण्याचे मुख्य कारण हे आहे. जसा प्रसंग असेल त्याप्रमाणे वेळ साजरी करण्यासाठी विचाराचा घोळ घालून वळणावळणांनी वक्तृत्वाची दुडकी चाल वळवीत राहायचे, किंवा हशा-टाळ्यांच्या लोभात गुंतून आचरटपणाने काहीतरी बोलत सुटायचे, असा प्रकार बहुधा आपल्याकडे अलीकडे दृष्टीस पडतो. गजेंद्रगडकरांचे वक्तृत्व तशापैकी नाही. टिळकांसारख्या वक्त्यांप्रमाणे ते रोखठोक, अंतःकरणाच्या तळमळीतून निघालेले असते; असे असूनही ते तर्कशक्तीला आवाहन करणारे, सैद्धान्तिक विचारांनी युक्त असते. मराठीप्रमाणे इंग्रजीतही ते प्रभावशाली ठरते. अखिल भारतात आज त्यांच्यासारखे वक्ते थोडेच असतील असे त्यांच्या इंग्रजी वक्तृत्वाला अनुलक्षून अनेकांनी म्हटले आहे.

अटकळ निराळी, घडले निराळे

गजेंद्रगडकरांचे बुद्धिमत्ता, तेजस्विता, विचारशीलता इत्यादि गुण विद्यार्थिदशेमध्येच परिस्फुट होऊ लागले होते. ते लक्षात घेता हा पुढे कोणीतरी फार मोठा माणूस होणार असे भाकीत वर्तवावयाला काही मोठ्या भविष्यवाद्याची जरूर नव्हती. त्या वेळी असे वाटे की हे पुढे राजकारणात पडणार. विद्यार्थिसभांमधली त्यांची भाषणे, मित्रांबरोबर होणाऱ्या गप्पागोष्टी, इत्यादिकांवरून राजकारणाकडे त्यांचा ओढा आहे असे वाटे. लोकमान्य टिळकांविषयी त्यांना निःसीम आदर होता. ध्येयवादी तरुणांचे राजकारण हेच त्या वेळी सर्वंकष आकर्षण होते. "सार्वजनिक कार्याला

वाहून घेणाऱ्याने आपल्या कुटुंबाच्या निर्वाहाची तरतूद अगोदर करून ठेवली पाहिजे. त्याकरिता लोकांच्या दातृत्वावर अवलंबून राहाण्याची त्याच्यावर पाळी येऊ नये.'' असे मात्र ते म्हणत. आरंभी काही वर्षे वकिली करून मग ते राजकारणात पडतील, अशी त्या वेळी साधारणपणे परिचितांची कल्पना होती.

पण घडले ते अगदी निराळे. त्यात काही दैवयोग होता, आणि पुष्कळ अंशी त्यांचे स्वविषयक योजकतेचे चातुर्य होते. त्यांनी वकिलीला सुरवात केल्यानंतर जनसमाजाच्या अंतरंगाचे जे अवलोकन त्यांना घडले त्यावरून त्यांना हे दिसून आले की महाराष्ट्रात सामाजिक समतेचे कार्य हाती घेण्याची अधिक निकड आहे. राजकारणात शेकडो लोक पडले आहेत, आपण त्यात पडण्याने काही फार मोठा कार्यभाग होणार आहे असे नाही. शिवाय राजकारण म्हणजे राष्ट्राचा स्वातंत्र्याप्रीत्यर्थ लढा त्या काळात जो चालू होता त्याचे रंगरूप सगळेच काही त्यांना पसंत नसावे. दैवयोग असा की वकिलीला सुरवात केल्यानंतर थोड्याच काळात त्यांच्या जिवावरचे एक दुखणे गेले. मोठ्या शस्त्रक्रियेच्या दिव्यातून त्यांना जावे लागले. त्यातून बाहेर पडल्यानंतर प्रकृतीची जपणूक त्यांच्या मागे लागली. तेव्हा त्यांच्या कार्याकार्यव्यवस्थितीत—योग्य कोणते व अयोग्य कोणते याविषयीच्या निर्णयात—साहजिकपणेच फरक झाला. त्यानंतरच्या १९३० च्या राजकारणाच्या संग्रामात ते उतरले असते तर शरीरप्रकृतीच्या दृष्टीने तो वेडेपणा झाला असता. तेव्हा मनाला लगाम घालून त्या धकाधकीत उडी न घेण्याचा त्यांनी निर्णय घेतला असल्यास तो सर्वथैव योग्य होता हे कोणासही मान्य होईल. लोकप्रियतेच्या, पुढारीपणाच्या किंबहुना त्यागभावनेच्याही मोहात न पडता यथायोग्य निर्णय घेण्याचे धैर्य व चातुर्य त्यांनी स्वतःच्या बाबतीत दाखविले. स्वतःच्या बाबतीत न्यायाधीशाप्रमाणे वस्तुनिष्ठ बनणे अत्यंत दुर्घट असते. न्यायाधीश बनण्याच्या आधीच स्वतःच्या बाबतीत न्यायाधीशाची ती वस्तुनिष्ठता त्यांनी दाखविली.

पूर्वज : अखंड पांडित्याची परंपरा

मोठी झालेल्या आठ भावंडांपैकी प्रधान न्यायमूर्ति प्रह्लाद बाळाचार्य गजेन्द्रगडकर हे शेवटून दुसरे. आठांपैकी खुद्द न्यायमूर्ति आणि त्यांच्या खालची बहीण अशी फक्त दोन भावंडे आज हयात आहेत. न्यायमूर्तींचा जन्म सातारा येथे फाल्गुन वद्य एकादशी शके १८२२ शनिवार ता. १६ मार्च सन १९०१ या दिवशी दुपारी स्थानिक वेळ ४ वाजून १७ मिनिटे या समयी झाला.

यांचे घराणे मूळचे धारवाड जिल्ह्यातील रोण तालुक्यातील गजेंद्रगड येथील. तेथून बाहेर पडल्यावर गजेंद्रगडकर नावाने प्रसिद्धीस आले. न्यायमूर्तींची पूर्वपीठिका पाचवे पूर्वज **राघवेंद्राचार्य** यांच्यापासून सांगितली जाते. हे महाविद्वान होते. त्या काळी व्याकरणशास्त्रात यांचा हात धरणारा कोणी नव्हता. परिभाषेन्दुशेखरावरची यांची 'त्रिपथगा' टीका सुप्रसिद्ध आहे. इतरही अनेक ग्रंथ यांनी लिहिले आहेत. इतर

शास्त्रांत विशेषेकरून वेदांतात यांची अकुंठित गति होती. हे पुण्यास नीलकंठशास्त्री थत्ते यांच्याकडे अध्ययनास होते. पेशवाई बुडाल्यावर साताऱ्यास प्रतापसिंह महाराजांच्या आश्रयास आले. महाराजांनी यांना राहायला घर दिले व यांनी वंशपरंपरा अध्ययन अध्यापन करीत राहावे म्हणून जमिनी इनाम दिल्या. इतर संस्थानिकांकडून अशीच इनामे मिळाली. राघवेन्द्राचार्यांपाशी शेकडो विद्यार्थ्यांनी शास्त्राध्ययन केले.

यांचे पुत्र **नारायणाचार्य.** यांनी आपल्या वडिलांपाशी सर्व शास्त्रांचे अध्ययन केले; घरी येतील त्या विद्यार्थ्यांना पढविण्याची वडिलांची परंपरा यांनी चालू ठेवली. यांचे नाव पुनर्विवाहावरील वादामुळे अतिविख्यात झाले. हा गाजलेला वाद पुण्यात २० मार्च १८७० पासून सतत नऊ दिवस चालला. पुनर्विवाहपक्षाचे मुख्य प्रतिपादक साताऱ्यास राघवेंद्राचार्यांपाशीच अध्ययन केलेले सुप्रसिद्ध सुधारक विष्णुशास्त्री पंडित होते व माधवराव रानडे, रामकृष्णपंत भांडारकर त्यांना मदत करीत होते. प्रतिवादींचे प्रमुख नारायणाचार्य होते व विठोबा अण्णा दप्तरदार त्यांना मदत करीत होते. अखेर ६ विरुद्ध ४ मतांनी पुनर्विवाह पक्षाचा पराजय झाला.

नारायणाचार्यांचे पुत्र **अनंताचार्य.** आजे व वडील यांच्यापाशी अध्ययन करून यांनी अनेक शास्त्रांत पांडित्य मिळविले व अध्यापनाचे परंपरागत कार्य चालविले. अनेक धर्मशास्त्रविषयक वादांमध्ये यांनीही भाग घेऊन आपले पांडित्य गाजविले होते. यांचे पुत्र **राघवेंद्राचार्य उर्फ बाळाचार्य** हे न्यायमूर्तींचे वडील. यांचा जन्म शके १७८४ मध्ये झाला. हेही अनेक-शास्त्रपारंगत होते आणि सर्व शास्त्रांच्या विद्यार्थ्यांना पढवीत असत. पुणे, बडोदे, जयपूर, म्हैसूर वगैरे अनेक ठिकाणच्या परीक्षांचे हे परीक्षक असत व अनेक ठिकाणांहून यांचा सम्मान होत असे. हे साधुवृत्तीचे पुरुष होते. भगवन्नामस्मरण आणि शास्त्रचिंतन यात यांचा काळ जात असे. विष्णुसहस्रनामाची चार आवर्तने रोज करण्याचा यांचा नेम असे. प्रपंचात, गृहव्यवस्थेत यांचे मुळीच लक्ष नसे. एकदा घरात दुसरे कोणी नव्हते म्हणून सूनबाईंनी यांना दुकानातून साखर आणायला सांगितली. हे पावशेर साखर घेऊन आले. सूनबाई हसल्या व म्हणाल्या, 'ही साखर आपल्याकडे एका वेळेच्या चहाला जेमतेम होईल. एकदम कमीत कमी पासरीभर तरी आणायची असते!' यांना मधुमेह होता आणि पायाला क्षत झाले होते. ते धुताना रोज मरणप्राय वेदना होत. रोज हूं की चूं न करिता ते सहन करीत. वेदनांची पराकाष्ठा झाली तेव्हा मात्र एक दिवस म्हणाले, 'नरसिंह, आता हे सहन होत नाही रे! मला भूल द्या किंवा दुसरे काही औषध द्या.' अशी यांची तितिक्षा होती. एकादशीच्या दिवशी कडक उपोषण; केवळ तीर्थावर राहात असत. हा व्रतस्थपणा स्वतःसाठी. इतरांसाठी यांचा धर्म स्नेह, दया, दाक्षिण्य यांवर आधारलेला होता. सोवळ्यात असताना लहान मूल कपड्यांसह शिवले तरी रागावत नसत; म्हणत 'लहान मूल परमेश्वराची मूर्ति आहे.' शास्त्रवचनांचा उदार अर्थ करून अडलेल्यांना, चुकलेल्यांना सवलतीचा शास्त्रार्थ सांगून सन्मार्गावर आणीत असत. भव्य गोरीपान

देहयष्टि, सौम्य कोमल दृष्टि, ग्रीकांच्या सौंदर्यकल्पनेप्रमाणे नाक व जिवणी, अशी यांची आकृति पाहणाऱ्यांच्या मनात तात्काळ स्नेहादर उत्पन्न करीत असे. चालत्या आगगाडीत वाठार स्टेशनजवळ एकाएकी हृदयक्रिया बंद पडून ता. ३१-७-१९२२ रोजी यांना मृत्यु आला.

बंधुपंचक

राघवेंद्राचार्य तथा बाळाचार्य यांना पाच मुलगे : नरसिंहाचार्य, सेतुमाधवाचार्य, अश्वत्थामाचार्य, केशवाचार्य आणि प्रह्लादाचार्य. माध्व वैष्णवांमध्ये पुरोहितत्व करणारी जी घराणी असतात त्यांतील पुरुषांच्या नावापुढे आदरार्थ 'आचार्य' हे उपपद जोडण्यात येते. जुनी शास्त्राध्ययनाची परंपरा चालू होती तोपर्यंत हे ठीक होते. अश्वत्थामांपासून पुढची मंडळी इंग्रजी शिकून आधुनिक पद्धतीने तयार झाली, तेव्हा पूर्वांची परंपरा सुटली व त्यावरोवर या पुढच्या लोकांनी 'आचार्य' उपपद सोडून दिले. हे पाचही बंधु नामांकित झाले. सर्वांत थोरले **नरसिंहाचार्य** उर्फ **दादा** यांचे संस्कृत अध्ययन वडिलांपाशी झाले. जुन्या पद्धतीच्या पांडित्याचा उपयोग होईनासा झाल्यामुळे, त्यांनी नंतर वैद्यकीचे ज्ञान संपादन केले. गोरगरिबांना ते विनामूल्य औषधोपचार करीत असत. ते फार प्रेमळ व परोपकारी होते. आसपास कोणाचीही काहीही अडचण निघो, दादा तिथे धावून गेल्याखेरीज राहायचे नाहीत. यांनी द्वैतमत-प्रस्थापक श्रीमध्वाचार्य यांचे चरित्र मराठीत लिहिले आहे. यांना २७-१-१९३५ रोजी सातारा येथे मृत्यु आला. दुसरे **सेतुमाधवाचार्य** उर्फ **बापू.** यांनी वडिलांपाशी शास्त्राध्ययन केले असून व्याकरण, अलंकार व वेदान्त या शास्त्रांत यांचा अधिकार मोठा होता. यांना 'व्याकरणनिष्णात' आणि 'विद्यावाचस्पति' या पदव्या मिळाल्या होत्या. पूर्वांच्या संस्थानिकांनी अध्ययन-अध्यापनाकरिता दिलेले उत्पन्न कालमानानुसार नीट येईनासे झाले व पुरेनासे झाले, जुनी विद्या शिकण्याकरिता विद्यार्थीही येईनासे झाले. तेव्हा सेतुमाधवाचार्यांनी सरकारी हायस्कुलामध्ये संस्कृत शिकविणारे शास्त्री म्हणून नोकरी पतकरली. नाशिक, सातारा, सोलापूर, मुंबई इत्यादि ठिकाणी कामे केल्यानंतर धारवाडच्या कर्नाटक कॉलेजात संस्कृत पंडित म्हणून त्यांची नेमणूक झाली. तिथे अध्यापन करून शिवाय प्रौढ जिज्ञासु लोकांकरिता हे पाठप्रवचन करीत असत. मुंबईस यांची प्रवचने मराठी लोकांप्रमाणे गुजराती लोकांनाही आवडत. अंगच्या गोड व्यवहारकुशलतेमुळे हे सर्वत्र फार लोकप्रिय असत. धारवाडास असताना दोन दिवसांच्या मेंदूच्या तीव्र आजारानंतर २८ जुलै १९३८ रोजी यांना अचानक मृत्यु आला.

तिसरे **अश्वत्थामा** उर्फ **अप्पासाहेब.** गजेंद्रगडकर घराण्यात यांनी प्रथम इंग्रजी शिकण्यास सुरवात केली. प्रतिकूल परिस्थितीत कष्टाने अभ्यास करून यांनी उत्कृष्ट यश मिळविले. विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये यांचा ऐच्छिक विषय अर्थात संस्कृत हाच होता. बी. ए. मध्ये पहिला वर्ग मिळवून संस्कृतात पहिला येणाऱ्यास मिळणारे भाऊ

दाजी पारितोषिक यांनी मिळविले. एम. ए. मध्ये हे संस्कृतात दुसरे आले. विद्यापीठीय कारकीर्दीप्रमाणेच पुढील आयुष्यात यांनी उज्ज्वल यश संपादन केले. प्रथम अहमदाबादचे सरकारी कॉलेज, नंतर धारवाडचे कर्नाटक कॉलेज आणि त्यानंतर मुंबईचे एलफिन्स्टन कॉलेज या तीन कॉलेजांत संस्कृताचे प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले आणि अस्खलित, अध्यापनकुशल प्राध्यापक म्हणून मोठा लौकिक मिळविला. विद्यार्थ्यांना सर्व प्रकारे मार्गदर्शन करण्यात हे अग्रेसर असत, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये यांची लोकप्रियता दांडगी होती. या लोकप्रियतेचा उपयोग विद्यार्थ्यांमध्ये चोखपणा, व्यवस्थितपणा, शिस्त हे गुण वाढविण्याकडे त्यांनी केला. विद्यालयीन जीवनामध्ये काय किंवा सार्वजनिक जीवनामध्ये काय, सवंग लोकप्रियतेच्या मागे ते कधी लागले नाहीत. मुंबईस अप्पासाहेबांचे वास्तव्य २७ वर्षे झाले. तेथील सार्वजनिक व सांस्कृतिक जीवनावर त्यांनी आपला खोल छाप उमटविला. नागरिकांमध्ये व्यायाम, शिस्त आणि सेवा या गुणांचे संवर्धन करण्याकरिता काढलेल्या स्वस्तिक लीगच्या स्थापनेत व संचालनात त्यांचा पुढाकार होता. मुंबईच्या ब्राह्मणसभेमध्ये त्यांनी पुष्कळ वर्षे कार्य केले. तिला उदारमतवादी आणि प्रागतिक वनविण्यास ज्या शक्ती कारणीभूत झाल्या त्यात अप्पासाहेब गजेंद्रगडकर ही फार मोठी शक्ती होती. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय आणि मुंबई मराठी साहित्य संघ या दोन साहित्यविषयक संस्थांचे ते अनेक वर्षे कार्याध्यक्ष होते. या संस्थांची त्यांनी केलेली सेवा चिरकाल अविस्मरणीय राहील. लष्करी शिक्षणाचे ते भोक्ते होते. 'होमगार्ड्स'चे ते सुरवातीपासून अधिकारी असून त्या संघटनेत त्यांनी जीव ओतून काम केले. त्यांचे काम इतके वाखाणण्याजोगे झाले की त्या संघटनेचे मुंबई राज्यात सर्वत्र संवर्धन व दृढीकरण करण्याचा सरकारचा उद्देश ठरला तेव्हा त्यावेळचे मुख्य मंत्री बाळासाहेब खेर यांनी त्यांना आग्रह करून तिचे मुख्य अधिपति नेमले. डॉ. आंबेडकरांनी मुंबईत आपले कॉलेज काढण्याचे ठरविले तेव्हा त्यांनी अप्पासाहेबांची विद्वत्ता, चतुरस्रता, संघटनकुशलता आणि उदारमतवादिता लक्षात घेऊन त्यांना प्राचार्य होण्यासाठी पाचारण केले. त्यांच्या आग्रहास्तव निवृत्तीचे पूर्ण वय भरण्यापूर्वी सरकारी नोकरी सोडून अप्पासाहेब सिद्धार्थ कालेजचे पहिले प्राचार्य झाले. अविश्रान्त परिश्रम करून त्यांनी त्या कालेजची उभारणी केली. अशा रीतीने कर्तृत्वाचे शिखर मोठ्या उत्साहाने गाठीत असता ते ता. ८ नोवेंबर १९४७ रोजी कालवश झाले. काहीही पूर्वसूचना न देता एकदम काळाने त्यांच्यावर झडप घातली.

पं. सेतुमाधवाचार्य आणि प्रा. अश्वत्थामाचार्य यांनी ग्रंथलेखन पुष्कळ केले. ते विद्यापीठीय विद्यार्थ्यांना अतिशय उपयुक्त आहे. विद्यापीठाच्या परीक्षांना नेमलेल्या सर्वमान्य संस्कृत ग्रंथांवर सेतुमाधवांनी टीका लिहावयाची आणि अश्वत्थामांनी इंग्रजी उपोद्घात टिप्पणी वगैरेंनी सुसज्जित करून तो ग्रंथ प्रसिद्ध करायचा, असे जोडगणीचे लेखन यांनी पुष्कळ केले. ऋतुसंहार, अभिज्ञानशाकुन्तल, कुमारसंभव, दशकुमार-

चरित, हर्षचरित या ग्रंथांच्या अशा पद्धतीने संपादिलेल्या आवृत्त्या यांनी प्रसिद्ध केल्या. याखेरीज अश्वत्थामांनी विद्यापीठीय विद्यार्थ्यांकरिता काव्यप्रकाश (१,२ व १० उल्लास), वेणीसंहार, तर्कसंग्रह, अर्थसंग्रह यांच्या इंग्रजी टिप्पण्यादिसहित आवृत्त्या काढल्या आहेत.

आपण स्वतः इंग्रजी शिक्षण घेऊन पुढे आलो, तीच संधि धाकट्या भावांना मिळावी या इच्छेने खालच्या दोघांची कॉलेजशिक्षणे आप्पासाहेबांनी केली. त्यांच्या खालचे बंधु केशवराव उर्फ **भाऊसाहेब.** एल्.एल्. बी. होऊन त्यांनी सातारा येथे वकिलीचा व्यवसाय सुरू केला. वकिली संभाळून त्यांनी मराठीत कायदेविषयक लेखन पुष्कळ केले. कायद्याचे सोप्या भाषेत ज्ञान करून देणारे 'सुबोध कायदा' नावाचे पुस्तक त्यांनी लिहिले. स्त्रियांच्या प्रश्नाविषयी त्यांना विशेष आस्था होती. हिंदु कायद्यात स्त्रियांचे जे स्थान होते, आहे व असावयास पाहिजे त्याविषयी त्यांनी मासिकातून आणि पुस्तकरूपाने बरेच लेख लिहिले. त्यांचे देहावसान थोडक्याशा आजारानंतर सातारा येथे ११ डिसेंबर १९४८ रोजी झाले.

केशवरावांच्या खालचे **प्रह्लादराव** ऊर्फ **भय्यासाहेब.** हे सर्वात अधिक भाग्यशाली ठरले आणि आज सर्वांच्या सुदैवाने भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीशपद भूषवीत आहेत.

पाचांचे पाच स्वभावविशेष

ही सर्व बंधु मंडळी जशी शरीराने दांडगी तशीच मनाने थोर, आनंदी व प्रेमळ. जीवनाच्या सर्व अंगांमध्ये जोमाने व निर्भरतेने रस घेणारी; स्वतःबरोबर दुसऱ्यालाही आनंदाच्या प्रवाहात ओढणारी; स्वतः सरळ, पण दुसऱ्याचा वाकडेपणा व छक्केपंजे चटकन ओळखणारी. सर्वांत मोठे दादा प्रेमळ आणि सर्वांचे काळजीवाहू. बापू महा विनोदी आणि थट्टेखोर, पण अतिशय व्यवहारकुशल. मुंबईसारखे अफाट शहर, पण त्यात कोणती वस्तु कुठे मिळते, सर्वात चांगली व सर्वांत स्वस्त कुठे मिळते, याची त्यांना खडान्खडा माहिती. कुणाशीही गोड बोलून आपले कार्य साधून घेतील; पण आपले कार्य साधण्याकरिता दुसऱ्याला तोशीस लावणार नाहीत. पांडित्य मोठे असूनही अभिमानाचा लवलेश नाही; सुभाषिते, संस्कृत वचने जिभेवर नाचत असायची. अप्पासाहेबांच्या ठिकाणी सर्व गुणांचा समन्वय झालेला. थट्टाविनोद भरपूर, तसेच प्रसंगाला अनुसरून गांभीर्यही मोठे. कार्यकुशलता दांडगी, पण ती चिल्लर व्यवहारात खर्च न करिता मोठ्या संस्था चालविण्यात उपयोगात आणलेली. चांगल्या कामाला भरपूर साहाय्य करायचे, पण उगीच काही तरी कोंग करणाऱ्याची डाळ त्यांच्यापुढे शिजायची नाही. केशवराव जरासे भडभडे पण अति प्रेमळ, हळव्या मनाचे. भावाला बहिणीला निरोप द्यायचा झाला तरी मिठी मारून ढळढळा रडू लागायचे. लांडीलबाडी किंवा दुसरा कसलाही अनाचार, याची त्यांना भयंकर चीड. लाल होऊन, 'अशा

माणसांना पैजारांनी बडवले पाहिजे' असे ते म्हणायचे. अखेरचे भय्यासाहेब. भव्य देहाची देणगी इतर भावांप्रमाणे त्यांना लाभलेली नाही; पण पूर्ववयात त्यांचे शरीर बऱ्यापैकी मांसल व गुटगुटीत होते. त्या मानाने आता कृश झाले आहे. मेंदूचे सक्त परिश्रम आयुष्यभर सतत केल्याचा परिणाम शरिरावर काहीतरी होत असला पाहिजे. गजेंद्रगडकरांच्या सातारच्या घरात पुढच्या वाजूला तालीम होती. बुद्धीप्रमाणे शरीर कमावण्याची ही सोय पूर्वाचार्यांनी करून ठेवली होती. पण भय्यासाहेबांनी या सोयीचा कधी फायदा घेतला असेल असे वाटत नाही. कॉलेजात ते आपल्या खोलीत जोर वगैरेचा माफक व्यायाम घेत. त्यांच्या खोलीत डम्बेल्स असत, त्यांचाही व्यायाम ते घेत. डेक्कन कालेजात नौचालनाची (बोटिंगची) सोय होती. त्या कालेजाचे ते वैशिष्ट्य होते. भय्यासाहेब आवडीने बोटिंगला जात; पण त्याचाही त्यांनी नाद लावून घेतला नाही. शाळेत असताना ते क्रिकेट खेळत, त्यांची एक चमू असे. पण कालेजात गेल्यावर ते क्रिकेट, टेनिस इ० खेळ खेळत असल्याचे कधी दिसले नाही. मुंबईस न्यायाधीश झाल्यानंतर काही काळ ते गोल्फ खेळायला जात असत. बौद्धिक परिश्रम करणाऱ्या विचारवंत पुरुषांना सर्वात अधिक उपयोगी असा चालण्याचा व्यायाम मात्र त्यांनी सतत चालू ठेवला आहे.

असे हे पाच बन्धु. सगळे कल्याणप्रकृति. सगळे बुद्धिमान. सगळे परस्परांवर जिवाभावाचे प्रेम करणारे. सुटीच्या किंवा कार्यप्रसंगाच्या निमित्ताने सगळे एकत्र जमले म्हणजे गप्पागोष्टी, थट्टाविनोद यांचे कल्लोळ उठायचे. सगळ्यांच्या जिव्हा वेगवान. म्हणजे खरोखरीच बोलण्याचा वेग दांडगा. वडील बाळाचार्य यांचे बोलणे अत्यंत जलद व काहीसे अस्पष्ट असे. तीच त्वरा कमजास्त प्रमाणात मुलांच्या बोलण्यात उतरलेली. इतरांशी बोलताना तिला थोडा तरी पायबंद बसे. पण हे आपापसात बोलू लागले म्हणजे इतरांनी त्यांच्या तोंडाकडे पाहात बसावे. तथापि त्यांच्या या आनंदमय परिसंवादाचे स्वरूपच इतके विलोभनीय असे की अर्धे ऐकणे आणि अर्धा तर्क यांच्या जोरावर आजूबाजूची मंडळीही त्या हास्यविनोदाच्या गदारोळात सामील व्हायची. खरोखरी दृष्ट लागण्यासारखे हे भातृमंडळ होते.

न्यायमूर्तींचे व्यक्तिमत्त्व

समजू लागल्यापासून सर्व वयांत, सर्व अवस्थांमध्ये संयम हा भय्यासाहेबांचा स्थायी भाव दिसतो. सर्व बाबतीत योजकता आणि व्यवस्थितपणा. आयुष्यात आपल्याला बौद्धिक कामच करायचे आहे, तेव्हा प्रमाणाबाहेर व्यायाम, शारीरिक श्रम, खेळ या गोष्टी उपयोगी नाहीत, ही खूणगाठ बांधून, शरीर कार्यक्षम तरतरीत राहाण्यासाठी प्रमाणशीर व्यायाम तेवढा नियमितपणे घेत राहाण्याचा क्रम त्यांनी ठेवला.

जे शरीराच्या तेच मनाच्या बाबतीत. संस्कारक्षम वयात अप्पासाहेबांचा सहवास त्यांना विशेष लाभल्याकारणाने त्यांची वृत्ति आणि वागणे आरंभी अप्पासाहेबांच्या

वळणावर गेले. पण भय्यासाहेबांचे व्यक्तित्व फार निराळे आहे. त्यांचा स्वभाव मोकळा पण खोल आहे, अवलोकन सूक्ष्म आहे, आकलन अत्यंत वेगवान आहे, आणि निर्णय त्वरित आहे. त्यांची संवेदनाशक्ति सूक्ष्म, हळुवार आहे. इतरांच्या वागण्याबोलण्यातले गैर प्रकार त्यांच्या लक्षातून कधी सुटत नाहीत. पण कोणाचे वागणे बोलणे खुपले तरी ते आपली नाराजी कधी बोलून दाखवीत नाहीत. आपल्या बोलण्याचालण्याने कधीही कोणाला ते दुखवीत नाहीत. आनंदाचे, कृतज्ञतेचे पाल्हाळिक भरघोस प्रदर्शन करण्याचाही त्यांचा स्वभाव नाही. मोजक्या शब्दात आपली भावना व्यक्त करतील व सर्वांना सुखवितील.

तसा त्यांचा स्वभाव बोलका आहे. विनोद, गप्पाटप्पा त्यांना आवडतात, पण प्रमाणात. बोलणे मार्मिक, मूद्देसूद, हजरजबाबी. पाल्हाळ लावणे, घोळ घालणे, आडवळणाने सांगणे, हे त्यांच्या स्वभावात नाही. विद्यार्थिदशेत जिवलग मित्रांशी गप्पागोष्टी पुष्कळ चालायच्या; जगाचे राजकारण, मित्रांची चेष्टा, प्रोफेसरांवर टीका-टिप्पणी वगैरे गोष्टींमध्ये काळ कसा जातो, कळायचे नाही. पण त्यातही वेळेचे व औचित्याचे भान कुणाला जास्त असेल तर ते भय्यासाहेबांना.

संयमरूपी अधीक्षक त्यांनी आपल्या मनाच्या प्रत्येक दालनात तेव्हापासून ठेवलेला आहे. कुटुंबीयांच्या, इष्टमित्रांच्या सहवासात ते रमतात व रंगतात. तथापि एकांतही त्यांना प्रिय आहे. डेक्कन कॉलेजात बी. ए. च्या वर्गात असताना त्यांच्या खोलीत भिंतीवर गीतेतील पुढील श्लोकार्ध ठळक अक्षरात लिहिलेले होते.

योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थितः । ६-१०

भय्यासाहेबांच्या वर्तनाचे सार यात आले आहे. गीतेने आत्मसंयम हे योगाचे स्वरूप म्हणून वर्णिले आहे (४·२७) आणि 'समत्वं योग उच्यते' (२·४८) असेही म्हटले आहे. संयम आणि समत्व या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. संयम हा मनोधर्म आहे आणि समत्व हे त्याचे वर्तनातले रूप आहे. ते भय्यासाहेबांच्या ठायी वसत आहे.

शिक्षण आणि संस्कार

"माझा जन्म विद्याशीलसंपन्न घराण्यात झाला हे दैवायत्त होय" असे त्यांनी आपल्या अनेक भाषणांत म्हटले आहे. हे दैव कशा प्रकारचे होते याची कल्पना वरील वर्णनावरून येईल. असा जन्म फार थोड्यांच्या भाग्यात असतो. सर्व भावांमध्ये हे लहान म्हणून लहानपणी यांचे लाड व कोडकौतुक बरेच झाले. घरी ज्यांचे विशेष कोडकौतुक होते ती मुले पुष्कळदा आग्रही, स्वतःविषयी भलत्याच कल्पना बाळगणारी अशी निघतात. पण भय्यासाहेबांनी त्याचा अगदी निराळा उपयोग करून घेतला. वडील माणसांनी केलेल्या कौतुकाला साजेसे आपण बनले पाहिजे अशी महत्त्वाकांक्षा त्यांनी बाळगिली.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम..... दिः .....

घरात इंग्रजी शिकण्याचा पायंडा पडलाच होता. तेव्हा प्रचलित शिक्षण-पद्धतीनुसार भय्यासाहेबांचे शिक्षण चालू झाले. १९१८ साली ते साताऱ्याच्या सरकारी हायस्कुलातून मॅट्रिक झाले. त्यांचे बंधु अप्पासाहेब हे आदल्या वर्षी धारवाडास नवीन निघालेल्या कर्नाटक कॉलेजात संस्कृताचे प्राध्यापक म्हणून गेले होते. साहजिकच भय्यासाहेब आपल्या वंधूंकडे धारवाडास गेले व कर्नाटक कॉलेजात दाखल झाले. इथे त्यांची श्री. दत्तात्रेय परशुराम करमरकर यांच्याशी मैत्री जमली. या मैत्रीचे आंतरिक सूत्र देशभक्ति आणि देशसेवेची प्रबळ इच्छा हे होते. त्या काळातले वातावरण देशभक्तीच्या भावनेने भारलेले होते. टिळकांची होमरूलची चळवळ गर्जत होती. देशाच्या दास्यमुक्तीकरिता काहीतरी केले पाहिजे या प्रेरणेने निर्मळ, संस्कारक्षम तरुणांची मने उत्तेजित होत होती. या प्रेरणेने दोघांची मने एकत्रित केली आणि दोघांच्या जिव्हाळ्याच्या मैत्रीने ती प्रेरणा दृढ केली. करमरकर पुढे भय्यासाहेवांबरोबर डेक्कन कॉलेजात आले, त्यांच्याबरोबरच एम्. ए., एल्एल्. बी. झाले आणि पुढे त्यांनी धारवाडास वकिली सुरू केली. लवकरच त्यांनी कांग्रेसमध्ये प्रवेश केला आणि राष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्यात बिनीचे वीर म्हणून काम केले. १९३० सालच्या कायदेभंगात जंगल सत्याग्रह करून आणि १९४२ च्या 'चले जाव' संग्रामात भूमिगत होऊन यांनी मोठे कार्य केले. स्वातंत्र्यसंपादनानंतर केंद्रीय मंत्रिमंडळात कित्येक वर्षे मंत्री म्हणून त्यांनी काम केले हे प्रसिद्धच आहे. सध्या ते राज्यसभेचे सदस्य आहेत. ते राहाणारे धारवाडचे. कानडी उत्कृष्ट बोलतात व लिहितात. १९५६ मध्ये टिळकजन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांनी इंग्रजीत लोकमान्य टिळकांचे आटोपशीर पण सुंदर चरित्र लिहिले आहे.

इंटरमीजिएट परीक्षा १९२० साली उत्तीर्ण झाल्यानंतर गजेंद्रगडकर करमरकर ही मित्रांची जोडी बी. ए. च्या अभ्यासाकरिता पुण्यास डेक्कन कॉलेजात येऊन दाखल झाली. दोघेही अतिशय हुशार व अभ्यासू. दोघांचाही ऐच्छिक विषय संस्कृत. दोघेही तेजस्वी, दोघेही प्रभावशाली अस्खलित वक्ते. तेव्हा एकंदर कॉलेजावर दोघांचीही छाप तात्काळ बसली असल्यास नवल नाही. त्या वेळी डेक्कन कालेजच्या जिमखान्यासाठी होणाऱ्या निवडणुकीत कानडी मराठी असे दोन तट असत. त्यामुळे भांडण माजून दोन्ही भाषिकांमध्ये विनाकारण विद्वेषाचे वातावरण पसरत असे. या मित्रांच्या जोडीने दोन्ही पक्षांमध्ये समेट घडवून आणण्यात पुढाकार घेतला. पुढे निवडणुकी विनाकलह पार पडल्या.

या मित्रद्वयाला डेक्कन कालेजात आल्यावर आणखी एक मित्र मिळून त्यांचे त्रिकूट बनले. तिघांची दाट मैत्री हा सर्वांच्या कुतूहलाचा विषय होता. कुड्या तीन पण आत्मा एक असे सर्वांस वाटायचे. हे तिसरे मित्र श्री. गोविंद श्रीनिवास दिवाण. अत्यंत बुद्धिमान, सात्त्विक व प्रेमळ. साधे व सौम्य, पण तत्त्वाला पक्के. यांचा विषय गणित. सर्व परीक्षांत यांचा पहिला वर्ग ठरलेला. पुढे एम्. ए. झाल्यावर

हे गणिताचे प्राध्यापक झाले व विमाशास्त्रात प्रावीण्य संपादन करून शेवटी मुंबई सरकारचे विमाशास्त्राचे सल्लागार झाले. सध्या हे सेवानिवृत्त होऊन मुंबईस असतात.

कॉलेज जीवन

अशा मित्रांच्या सहवासात पुढील ध्येयवादी पराक्रमी जीवनाची स्वप्ने रंगवीत भय्यासाहेबांचा डेक्कन कालेजातला चार वर्षांचा काळ गेला. विशुद्ध, साधी राहणी आणि व्यासंगी निरामय जीवन. डेक्कन कालेजचा परिसर अशा जीवनास पोषक होता. सगळेच लोक त्याचा असा सदुपयोग करीत असे मात्र नाही. पण या मित्रमंडळापासून कालेज विद्यार्थ्यांना सामान्यतः जडणाऱ्या खोडी अगर व्यसने चार कोस दूरच राहिली. व्यसन वाचनाचे आणि खोड गप्पांची. भय्यासाहेब संस्कृत (ऑनर्स) व मराठी हे ऐच्छिक विषय घेऊन १९२२ साली बी. ए. झाले. या परीक्षेत त्यांनी पहिला वर्ग मिळविला. त्यांचे मित्र करमरकर व दिवाण हेही पहिल्या वर्गात आले. तिघांचीही दक्षिणा फेलो म्हणून नेमणूक झाली. एम्. ए. ला त्यांनी इंग्लिश व संस्कृत या भाषा घेतल्या होत्या. त्यावेळी एम्. ए. च्या ८ प्रश्नपत्रिकांपैकी ४ एका भाषेच्या व ४ दुसऱ्या भाषेच्या अशी निमेनीम वाटणी असे. संस्कृत आणि इंग्रजी घेऊन पहिला वर्ग मिळविणे फार बिकट. पण भय्यासाहेबांनी तो मिळविला (१९२४). संस्कृतामध्ये पहिला येणाऱ्यास मिळणारी भगवानदास पुरुषोत्तमदास शिष्यवृत्ति आणि वेदान्ताची स्वतंत्र प्रश्नपत्रिका संस्कृतामध्ये लिहिणाऱ्यांमध्ये पहिला येणारास मिळणारे सुज्ञ गोकुळजी झाला वेदान्त पारितोषिकही त्यांनी मिळविले.

कालेज विद्यार्थ्यांच्या इतर हालचालींमध्ये भय्यासाहेब आवडीने भाग घेत. जीवनाच्या बहुविध अंगांचा अनुभव घ्यायचा आणि आपल्या कुशल कर्तृत्वाने प्रत्येक अंग समृद्ध करायचे, पण असे करताना आपल्या मुख्य कर्तव्यावरील भर किंचिन्मात्रही कमी होऊ द्यायचा नाही, हे चतुर सावधपण त्यांच्या आयुष्यात सर्वत्र दिसून येते. विद्यार्थ्यांच्या चळवळीत त्यांनी आपले नेतृत्व आणि वक्तृत्व दोन्ही गुण प्रकट केले. त्यांनी एकदा नाटकात काम केल्याचाही दाखला मिळतो. कर्नाटक कालेजात असताना त्यांनी 'एकच प्याला' नाटकात रामलालचे काम केले होते. डेक्कन कालेजातली डिबेटिंग यूनियन त्यांनी आपल्या वक्तृत्वाने गाजविली. त्याचे किंचित दिग्दर्शन या लेखाच्या सुरवातीस केले आहे. १९२१–२२ साली ते कालेज त्रैमासिकाच्या (Deccan College Quarterly) मराठी विभागाचे संपादक होते. कॉलेजात टिळकांचे स्मारक करण्याच्या प्रयत्नातही यांचा भाग होता. डेक्कन कालेजात त्या काळी तीन सीनिअर आणि तीन ज्यूनिअर दक्षिणा फेलो असत. सीनिअर लोकांना अभ्यासाला वेळ मिळावा म्हणून काही काम दिलेले नसे. ज्यूनिअरांपैकी एकजण कॉलेज त्रैमासिकाच्या इंग्रजी विभागाचे संपादकत्व करीत असे; दुसरा जिमखान्याचा सर चिटणीस म्हणून काम करी आणि तिसरा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्याध्यक्ष

होत असे. गजेंद्रगडकरांकडे वार्षिक स्नेहसंमेलन पार पाडण्याची कामगिरी आली ती त्यांनी उत्कृष्ट रीतीने पार पाडली. समारंभाचे मुख्य वक्ते म्हणून महंमहअल्ली जिना यांना आणले होते. त्यांचे भाषण निराशाजनक झाले. त्यांची मिजास व ऐट डेक्कन कॉलेजाला रुचणारी नव्हती. रात्री गायनासाठी बालगंधर्व आले होते. त्या दिवशी ते फार खुशीत होते. सौभद्र, मानापमान, स्वयंवर या नाटकांतील पदे आणि काही त्रस्तादी चिजा तन्मयतेने गाऊन दाखवून त्यांनी बहार केली.

१९२४ साली एम्. ए. झाल्यानंतर भय्यासाहेब पुण्याच्या लॉ कॉलेजात प्रविष्ट झाले. हे कॉलेज मुंबईचे सुप्रसिद्ध ॲडव्होकेट व हिंदु कायद्याचे तज्ज्ञ ज. र. घारपुरे यांनी त्याच साली सुरू केले होते. त्यामुळे देशावरील विद्यार्थ्यांची अतोनात सोय झाली होती. हे कॉलेज त्या वेळी फर्ग्युसन कॉलेजचे ॲम्फीथिएटर व त्याच्या बाजूच्या खोल्या यांमध्ये सकाळसंध्याकाळ भरत असे. या काळात गजेंद्रगडकर करमरकर हे मित्रद्वय गणेशखिंड रस्त्यावर त्या वेळी नवीन असलेल्या रानडे क्वार्टर्समध्ये राहात असे. बरेच विद्यार्थी तिथे राहावयास आल्यामुळे मागच्या बाजूस जेवणाचा क्लबही काढलेला होता. १९२५ साली पहिली एल्एल. बी. व १९२६ साली दुसरी एल्एल्. बी. परीक्षा देऊन भय्यासाहेब विधिस्नातक (एल्एल. बी.) झाले. हायकोर्टाची सनद काढून १९२६ च्या ऑगस्टमध्ये मुंबई येथे अपेलेट बाजूकडे त्यांनी वकिली सुरू केली.

नाट्यमय प्रसंग

विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये, विशेषतः एम्. ए. मध्ये उत्कृष्ट यश मिळविणारी मंडळी त्या काळात बहुतकरून कॉलेजात प्राध्यापक होत असत. त्यांच्या बंधूचेच उदाहरण त्यांच्यासमोर होते. पण भय्यासाहेबांनी त्या मार्गाकडे न बघता एल्एल्. बी. व वकिली—त्यातून मुंबई हायकोर्टात वकिली—हा धाडसाचा मार्ग पतकरला. यात त्यांची योजकता व ठरलेल्या धोरणाप्रमाणे वागण्याचा निर्धार दिसून येतो. प्राध्यापक म्हणूनही त्यांनी उत्कृष्ट यश मिळविले असते यात काहीच शंका नाही. पण त्यांनी स्वतःसाठी आखलेला मार्ग तो नव्हता.

हा निर्धार डळमळविण्याचा आणि हलवून खुंटा बळकट केल्याप्रमाणे तो पक्का करण्याचा नाट्यमय प्रसंगही यदृच्छेने घडवून आणला. एल्एल्. बी. झाल्यानंतर मुंबई हायकोर्टात अपेलेट बाजूकडे वकिली करण्याच्या उद्देशाने ते १९२६ च्या उन्हाळ्याच्या सुटीनंतर सपत्नीक मुंबईस आपले बंधु प्रा. अ. वा. गजेंद्रगडकर यांच्याकडे आले. मुंबई हायकोर्ट कायदेपंडितांचे आगर. वकिली पेशातल्या एकापेक्षा एक अतिरथी महारथींनी भरलेले. तिथे एका नुकताच एल्एल्. बी. झालेल्या तरुणाचा—मग तो कितीही बुद्धिमान, तरतरीत, वाक्प्रभु असो—काय पाड लागणार? एकदोन महिने अगदी कोरे गेले. घराण्याची परंपरा केवळ अध्ययन-अध्यापनाची, स्वतःची प्रवृत्ति

अधिकांश तशीच, मुंबईच्या वंधूच्या बिऱ्हाडाची जागा मर्यादित ! केवढाही निश्चयाचा महामेरु असला तरी परिस्थिति त्याला सकंप करते. आपले हे धाडस अनाठायी तर होत नाहीना अशी शंका भय्यासाहेबांच्या मनात डोकावू लागली. त्याच वेळी ते जिथे शिकले त्या कर्नाटक कॉलेजच्या प्राचार्याने इंग्रजीच्या प्राध्यापकाची जागा तुम्हांला देतो, पतकरता काय, अशी विचारणा केली. भय्यासाहेबांनी अनुकूल उत्तरही लिहिले. इतक्यात चमत्कार घडला. पुण्याच्या राजगुरु वकिलांनी एका दाव्याचे अपील त्यांच्याकडे पाठविले. सोबत वकील फी म्हणून रकमही पाठविली. रक्कम तशी थोडीच होती, पण त्या क्षणाला ती लाख मोलाची होती. तिने भय्यासाहेवांच्या मुंबईनिवासाला सार्थता प्राप्त करून दिली. एका 'ब्रीफ'सह त्यांनी हायकोर्टात प्रवेश केला. या पहिल्या 'केस'च्या वेळी आपली कशी स्थिति झाली याचे सुंदर वर्णन त्यांनी आपल्या 'कायदा, कायदेपंडित आणि न्यायाधीश' (खंड ३, क्र.१) या व्याख्यानात केले आहे.

वकिली आणि संसार

न्यायदेवतेच्या मंदिरात एकदा प्रवेश मिळाल्यानंतर भय्यासाहेबांनी आपल्या बुद्धिमत्तेने, व्यासंगाने आणि निष्ठावंतपणाने तिची कृपादृष्टि पूर्णांशाने आपल्याकडे खेचून घेतली. प्राचार्यमहाशयांना लिहिलेले उत्तर त्यांनी रद्द केले. ठिकठिकाणच्या जिल्हावकिलांशी त्यांचे स्नेहसंवंध जुळत गेले. गजेंद्रगडकर घराण्याविषयी सगळीकडे असलेला आदर आणि त्यांच्या प्राध्यापक बंधूंनी मिळविलेली कीर्ति यांचा या वाबतीत त्यांना उपयोग झाला. भय्यासाहेबांच्या आयुष्यात असे दिसून येते की पुष्कळशा गोष्टी त्यांना भाग्याने प्राप्त झाल्या. पण भाग्याने दार किलकिले केल्याबरोबर त्याला आपल्याकडे खेचून आपल्यापाशी डांबून ठेवण्याचे चातुर्य आणि सामर्थ्य प्रत्येक वेळी त्यांनी दाखविले, म्हणूनच त्यांची वाटचाल सदोदित उत्कर्षाच्या दिशेने होत राहिली.

भय्यासाहेबांचा विवाह साताऱ्याचे कृष्णराव शाळिग्राम यांची कन्या, त्यांची मामेवहीण, वत्सला हिच्याशी ता. ३१ मे १९२५ या दिवशी सातारा येथे झाला. आर्यसंस्कृतीच्या परंपरेनुसार सौ. शालिनीबाई आपल्या पतीचे भाग्य उपभोगीत आहेत, तसेच पतीशी एकरूप होऊन पतीचे टापटीप, नीटनेटकेपणा, योजकता, पूर्वकल्पना हे गुण त्यांनी आत्मसात् केले आहेत. हिंदू पत्नीच्या पतिभक्तीविषयी सांगायलाच नको. पण नुसत्या पतिभक्तीने संसार पूर्ण सुखी होत नाही. आपल्या कर्तबगारीने व कर्तव्य-दक्षतेने भय्यासाहेवांचा संसार त्यांनी निरामय, आनंदमय केला आहे. भय्यासाहेबां-सारख्या पतीला त्या पूर्ण शोभल्या आहेत असे म्हटले म्हणजे त्यात सर्व आले.

भय्यासाहेब आणि सौ. शालिनीबाई यांना दोन कन्या आहेत. थोरली डॉ. सौ. शरत्कुमारी जहागिरदार या मुंबई विद्यापीठाच्या एम्. डी. असून मुंबईत डॉक्टरीचा व्यवसाय करतात आणि बॉम्बे हॉस्पिटलमध्ये काम करतात. यशस्वी स्त्रीडॉक्टर म्हणून त्यांनी उत्तम नाव कमावले आहे. दुसरी कु. आशा १८ वर्षांची

असून दिल्ली विद्यापीठाच्या महिलामहाविद्यालयात शिकते आहे. वाद्यवादनादि कलांमध्ये ती निपुण आहे.

ऑगस्ट १९२६ पासून मार्च १९४५ मध्ये मुंबईच्या उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नेमणूक होईपर्यंत जवळजवळ १९ वर्षे भय्यासाहेबांनी वकिली केली. ह्या व्यवसायात ते झपाट्याने वरवर चढतच गेले. वादातील मुख्य मुद्दा चटकन हेरणारी तीव्र बुद्धी, कायद्याच्या तत्त्वांचे गाढ ज्ञान आणि शीघ्र उपस्थिति, युक्तिवादाचे कौशल्य आणि प्रभावी वक्तृत्व, या सर्व गुणांचा समुच्चय त्यांच्या ठायी असल्यामुळे त्यांचे नाव लवकरच सर्वतोमुखी झाले आणि चोहोंबाजूंनी त्यांच्याकडे कामे चालून येऊ लागली. हायकोर्टातील अपिलीय बाजूच्या वकिलांमध्ये ते अग्रेसर झाले. त्यांची १९ वर्षांची वकिलीची कारकीर्द, त्यांनी चालविलेली महत्त्वाची अपिले आणि त्यांतील त्यांचे कौशल्य, कायद्याच्या अनेक मुद्द्यांवर त्यांनी पाडलेला प्रकाश आणि त्याचे सामाजिक महत्त्व, या सर्व गोष्टींवर एक स्वतंत्र प्रबंध लिहिता येण्याजोगा आहे. आपल्या देशातील वकील मंडळींना आणि न्यायाधीशांना तो उत्कृष्ट मार्गदर्शक ठरेल.

हायकोर्ट वकिलांची जी एक वजनदार संघटना (बार असोसिएशन) मुंबई हायकोर्टात आहे तिच्या कामकाजात ते आपुलकीने व आस्थेवाईकपणाने भाग घेत असत. तिचे ते कधी पदाधिकारी नव्हते, तथापि हरएक गोष्टीच्या सल्लामसलीत ते भाग घेत असत आणि आपुलकीने मार्गदर्शन करीत असत. या वकिलांच्या संघटनेचे आता Advocates' Association of Western India असे नामकरण झालेले असून तिने १९६३ मध्ये आपला शतसांवत्सरिक उत्सव साजरा केला. उत्सवाचे उद्घाटक म्हणून न्या. गजेंद्रगडकरांना बोलावले होते. असोसिएशनचे अध्यक्ष श्री. आदिक उत्सवाच्या स्वागतपर भाषणात म्हणाले:–

"नामदार न्यायमूर्ति गजेंद्रगडकर ह्या असोसिएशनचे सर्वात अधिक विख्यात सभासद होते; अर्थात ह्या महोत्सवाचे उद्घाटन त्यांनीच करावे ही अत्यंत समुचित गोष्ट होय. .....भारताचे प्रधान न्यायमूर्ति म्हणून ते लवकरच न्यायासनाला भूषवितील; त्या एका गोष्टीने ह्या असोसिएशनच्या शंभर वर्षांच्या अस्तित्वाचे सार्थक होईल. न्या. गजेंद्रगडकर मुंबईच्या वकीलमंडळातील सर्वश्रेष्ठ आणि अग्रेसर वकील होते; न्यायालयीन वादकौशल्य, योग्यता आणि कायद्याचे सूक्ष्म ज्ञान या आपल्या गुणांमुळे त्यांनी थोर कीर्ति संपादन केली होती. अपिलीय वकीलमंडळाचे ते अनभिषिक्त पुढारी होते. वकीलमंडळ आणि न्यायाधीशमंडळ या दोघांनाही त्यांच्या विषयी अतिशय प्रेमादर वाटत होता."

न्यायाधीशपदाचा स्वीकार

मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून भय्यासाहेबांची मार्च १९४५ मध्ये नेमणूक झाली. जवळजवळ १२ वर्षे तिथे काम केल्यावर १७ जानेवारी १९५७

रोजी त्याच्या वरची पायरी ते चढले, म्हणजे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले. आपली आवडती मुंबापुरी सोडून त्यांना दिल्ली येथे जावे लागले.

त्यांनी वकिली सोडून न्यायाधीश पद स्वीकारले तिथेच त्यांच्या आयुष्याचे एक पर्व संपून दुसरे अधिक उज्ज्वल पर्व सुरू झाले. त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयातून सर्वोच्च न्यायालयात जी बढती झाली ती क्रमप्राप्त होती. तीव्र बुद्धिमत्ता, कठोर शीलवत्ता, उदार दृष्टि आणि प्रगाढ विधिपांडित्य, या गोष्टी लक्षात घेता सर्वोच्च न्यायालयात जर त्यांची नेमणूक झाली नसती तर सरकारच्या खाती तो एक अन्याय –व्यक्तिशः त्यांना नव्हे, तर राष्ट्राला अन्याय–म्हणून मांडावा लागला असता. वस्तुतः ही गोष्ट झाली पाहिजे असे त्यापूर्वीच पुष्कळांना वाटत होते.

पण मुळात वकिली सोडून १९४५ साली न्यायाधीश पद जे त्यांनी स्वीकारले त्याची गोष्ट निराळी होती. ते अवस्थांतर क्रमप्राप्त नव्हते. आपल्या आयुष्याची दिशा त्यांनी जाणीवपूर्वक बदलली. कित्येक यशस्वी वकील व अधिवक्ते (ॲडव्होकेट) हायकोर्टाचे न्यायाधीश पद देऊ केले असता पतकरीत नाहीत; वकिलीतली त्यांची प्राप्ति एवढी दांडगी असते की न्यायाधीश म्हणून मिळणारे ठराविक वेतन त्या मानाने फार कमी पडते. गजेंद्रगडकरांची गोष्ट अशीच होती. त्यांच्या कामाचा पसारा फार वाढला होता. दरवर्षी प्राप्तीचा नवा उच्चांक गाठला जात होता. पण नेमकी हीच गोष्ट त्यांनी न्यायाधीश पद स्वीकारण्यास कारणीभूत झाली असावी. जी वस्तुस्थिति इतरांना परावृत्त करण्यास कारणीभूत होते ती यांना प्रवृत्त करण्यास कारणीभूत झाली. कामाचा पसारा अनावर होऊ लागला. कामे स्वीकारण्याबद्दल सगळीकडून अत्याग्रह होऊ लागला. त्यांना स्वस्थता मिळेनाशी झाली. या रेट्यात यांच्या शरीराचे स्वास्थ्य टिकवायचे कसे ही विवंचना सौ. शालिनीबाईंच्या मागे लागली. शस्त्रक्रियेनंतर त्यांना आपल्या प्रकृतीला फार जपून राहावे लागत असे. या जपणुकीचा भार कालांतराने कमी झाला तरी तो अगदी नाहीसा कधीच झाला नाही. त्यांच्यासारखा संयमी पुरुष, म्हणूनच तो कामाच्या एवढ्या दगदगीत टिकाव धरू शकला; तेव्हा तारतम्याने अधिक स्वस्थतेचे व काहीसे आरामाचे न्यायाधीश पद आपल्या पायांनी चालून येताच त्यांनी त्याचे स्वागत केले.

शारीरिक अस्वस्थतेप्रमाणे मानसिक अस्वस्थता देखील त्यांना मधूनमधून बेचैन करीत असावी. आपण वकिलीच्या व्यवसायात उत्कर्षाचे शिखर गाठले; काही पैसा आला, बरेच नाव मिळाले, हे सर्व खरे. पण जी देशसेवेची, समाजहितार्थ झटण्याची ध्येये आपण विद्यार्थिदशेत, तारुण्यावस्थेत उराशी बाळगिली त्यांचे काय? पुष्कळ पक्षकारांना आपण न्याय मिळवून दिला असेल. हे इतर वकील करीतच असतात. कदाचित् इतर वकिलांच्या हातून झाल्या नसत्या अशाही काही गोष्टी आपण केल्या असतील; इतरांना असाध्य असलेले खटले आपण जिंकले असतील; त्यांच्यातले जे सच्च्या व धनहीन अशिलांचे असतील तिथे आपल्या हातून परोपकारही घडला

असेल. पण या किती झाले तरी वैयक्तिक बाबी झाल्या. सबंध देशाच्या उद्धारार्थ आपण कितपत झटलो ? समाजातील विषमतेने पीडित अशा वर्गांची वकिली आपण कितीशी केली ? आपणाला कोणी वाली, कोणी निरपेक्ष हितकर्ता भेटेल काय, म्हणून चातकाप्रमाणे चोच वासून बसलेल्या संस्थांना आपण कितीसा हात दिला ? हे प्रश्न त्यांच्या अंतर्मनात उठत असले पाहिजेत.

वकिलीच्या सुरवातीस, जेव्हा कामे फारशी नव्हती तेव्हा, काही अवांतर उद्योगांमध्ये त्यांनी लक्ष घातले होते. पूर्वी हायकोर्ट वकिलीची परीक्षा असे तिला मॅट्रिक झालेल्यांना बसता येत असे. अशा लोकांच्याकरिता कित्येक विधिज्ञ विधिशिक्षणाचे वर्ग (Law Class) चालवीत असत. भय्यासाहेबांनी १९२८ पासून पुढे पाच सहा वर्षे काही सहकाऱ्यांच्या मदतीने असा विधिशिक्षणाचा वर्ग चालविला होता. 'हिंदु कायदा सुधारणा मंडळ' (Hindu Law Reforms Association) या नावाची संस्था त्यावेळी काही काम करीत असे. त्यांनी या असोसिएशनच्या कार्यात लक्ष घातले. तिचे ते अनेक वर्षे कार्यवाह होते. हिंदु कायद्याच्या सुधारणेचा प्रचार करण्यासाठी या संस्थेने 'हिंदु कायदा त्रैमासिक' (Hindu Law Quarterly) काही वर्षे चालविले, तिचे संपादकत्व त्यांच्याकडेच होते. नंदपंडिताचा 'दत्तक-मीमांसा' हा ग्रंथ त्यांनी भाषांतरासह या त्रैमासिकातून प्रसिद्ध केला. ही सार्वजनिक कामे छोटीशीच आणि त्यांच्या व्यवसायाला धरून होती; तरी देखील त्यांनी त्यांच्या जीवनातून लवकरच पळ काढला. त्यांचे वकिलीचे काम इतके वाढले की इतर गोष्टींना त्यांना वेळ मिळेनासा झाला. 'Law is a jealous mistress' (कायदा ही मत्सरी प्रियकरीण आहे) असे इंग्रजीत वचन आहे. ते त्यांच्या बाबतीत प्रत्ययाला आले.

न्यायमूर्ति या नात्याने थोर कार्य

मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाचे काम त्यांनी बारा वर्षे केले. हे काम अत्यंत मोलाचे ठरले आणि सर्वांच्या प्रशंसेस पात्र झाले. सर्वोच्च न्यायालयात त्यांची नियुक्ती जाहीर झाली तेव्हा मुंबईच्या वकिलांनी त्यांच्या निरोपाचा व शुभचिंतनाचा समारंभ साजरा केला (११ जानेवारी १९५७). त्या प्रसंगी बोलताना महाधिवक्ते (Advocate General) श्री. अमीन म्हणाले,

"न्यायमूर्ति महोदय, अकरा वर्षांपेक्षा अधिक काळ आपण न्यायाधीशाचे काम काम करीत आहा; आणि आपल्यासमोर ज्याने ज्याने वकिली केली आहे त्या प्रत्येकाला याची पूर्ण जाणीव आहे की सर्व संबंधितांचा संतोष होईल असा न्याय आपण देत आला आहात. घटनांचे आकलन आपणाला फार जलद होते; खटल्याचा न्यायनिर्णय ज्या मुद्द्यांवर अवलंबून असतो ते मुद्दे आपण चटकन हेरता; त्या विशिष्ट बाबतींमध्ये जो अत्यंत महत्त्वाचा प्रश्न अंतर्भूत असेल त्याचे विवरण शांतपणे ऐकून घेण्याची आपली नेहमी तयारी असते."

यानंतर सरकारी वकील श्री. चोकसी यांनी केलेल्या भाषणात न्या. गजेंद्रगडकरांच्या न्यायदानपद्धतीचे थोडक्यात पण फार मार्मिकपणे वर्णन केले,

"न्यायमूर्ति महोदय, आपल्या न्यायालयात प्रत्येकाला अगदी मोकळे, निरामय वाटे; प्रत्येकाला भरवसा वाटे की विलंब न लागता, लांबलचक युक्तिवाद करावे न लागता, इथे योग्य तोच निकाल दिला जाईल. घाईगर्दीने आपणाला वाटेला लावले असे कोणालाही वाटले नाही; आपले म्हणणे आपण पूर्णपणे मांडले नाही अशी कोणाचीही तक्रार उद्भवली नाही, आणि तरी देखील आपल्या बाजूला न्याय केला जाईल, असा पूर्ण विश्वास वाद खेळणाऱ्या जनतेला, तसेच वकीलवर्गाला वाटत असे."

अधिवक्ता संस्थेच्या महोत्सवात श्री. आदिक यांनी केलेल्या भाषणातून एक उतारा मागे दिला आहे. त्या भाषणात त्यांनीही न्यायाधीश या नात्याने गजेंद्रगडकरांच्या थोर योग्यतेचे सुंदर वर्णन केले. ते म्हणाले,

"न्यायमूर्ति गजेंद्रगडकर बाह्यांगाला महत्त्व देत नाहीत, तथ्यांशाला महत्त्व देतात. त्यांच्या कोर्टात बाह्यांग आणि तांत्रिक बाबती यांना तथ्यांशावर केव्हाही कुरघोडी करू दिली जात नाही; बाह्यांगापेक्षा तथ्यांशावरच भिस्त ठेवली जाते. यासंबंधात त्यांनी दिलेल्या एका सुप्रसिद्ध निर्णयाचा मी निर्देश करू इच्छितो. त्यात त्यांनी अशी समजावणी दिली आहे की नोकराला जीवनावश्यक वेतन आणि चांगले वेतन देणे हे मालकाचे कर्तव्य आहे; नोकराला जर तो जीवनवेतन देऊ शकत नसेल तर त्याला आपला धंदा चालविण्याचा काही हक्क नाही; त्याने तो बंद करावा हेच अधिक चांगले. इतिहासचक्राची गती रोखू पाहणाऱ्या प्रतिगामी लोकांना या त्यांच्या निर्णयाने असा स्पष्ट इशारा मिळाला आहे की या देशात आता मालकांची सत्ता संपुष्टात आली असून सामान्य माणसाची सत्ता चालू झाली आहे, तेव्हा तुम्ही शहाणे होऊन प्रगतीत सहभागी व्हा; नाही तर तुम्ही नष्ट व्हाल.

"न्या० गजेंद्रगडकरांच्या अंगी आणखी एक लक्षणीय गुण आहे त्याचा इथे आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. वकीलवर्गातील नवथर मंडळींना ते सदोदित अतिशय कनवाळूपणाने व सहानुभूतीने वागवितात व त्यांना प्रोत्साहन देतात. पुष्कळसे तरुण वकील, जे आता व्यवसायामध्ये चांगले सरसावले आहेत, ते, न्या. गजेंद्रगडकरांनी त्यांच्या पहिल्यापहिल्या दिवसात त्यांना जे प्रोत्साहन दिले त्याबद्दल ऋणी आहेत. गजेंगद्रडकरांना प्रभावशाली व्यक्तित्व लाभले आहे. त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येक मनुष्याचे प्रेम त्यांनी संपादन केले आहे. त्यांच्या कोर्टात प्रत्येकाला घरच्याप्रमाणे मोकळे व सुखावह वाटते. बुद्धीच्या आणि हृदयाच्या अत्युत्तम गुणांमुळे उच्च न्यायालयाच्या आणि देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या थोर व उदात्त परंपरांमध्ये त्यांनी स्वतःची भर घातली आहे. खटला जिंकणारा असो, किंवा हरलेला असो, प्रत्येक जण त्यांच्या कोर्टातून अशा प्रचीतीच्या संतोषाने बाहेर पडतो की इथे खरा न्याय, तथ्यांशानुसारी न्याय, करण्यात आला आहे."

न्यायालयाची प्रतिष्ठा : वज्रकठोर नीतिमत्ता

त्यांच्या कनवाळूपणाचे, बाह्यांगावर भर न देण्याच्या वृत्तीचे वर्णन अनेकांनी केले आहे व ते यथार्थ आहे. याचा अर्थ असा मात्र नव्हे की ते गैर गोष्टींकडे दुर्लक्ष करतात. ते शिस्तीचे, औचित्याचे भोक्ते आहेत, कडक प्रशासक आहेत. न्यायालयाची प्रतिष्ठा राखण्याबद्दल ते अतिशय जागरूक असतात. न्यायालयातील वर्तननियमांना दुर्लक्षून कोणी अप्रशस्त सलगी किंवा ढिलेपणा दाखवू लागला तर त्याचा मुलाहिजा न ठेवता त्याला योग्य ती समज दिल्याखेरीज ते कधीही राहात नाहीत. जो न्यायालयीन परिपाटीचे स्वतः कठोर शिस्तीने परिपालन करतो तो न्यायालयाच्या प्रतिष्ठेसाठी इतरांकडूनही तीच शिस्त अपेक्षील.

न्यायालयाची प्रतिष्ठा ! या दोन साध्या शब्दांत फार खोल अर्थ भरला आहे. न्यायाधीशाने उच्चासनावर बसणे आणि वकील अशिलांनी उभे राहाणे, येताना व जाताना न्यायाधीशांना अभिवादन करणे, एकदा निकाल दिल्यावर त्याविरुद्ध कोर्टात ब्रही न उच्चारणे, इत्यादि परिपाटीमध्येच ही प्रतिष्ठा सामावली आहे असे नव्हे. हे टरफल आहे, कवच आहे. आतील गाभ्याचे रक्षण करणारे म्हणून याचे महत्त्व आहेच; पण न्यायाधीशाचे न्यायित्व हा या प्रतिष्ठेचा गाभा आहे. वर वर्णिलेला सम्मान न्यायित्वाचा, न्यायदेवतेचा आहे. न्यायासनावर बसलेल्या व्यक्तीचा नव्हे. न्यायाधीश सदय असूनही निःपक्षपाती, विधिपंडित असूनही सारासारविचारी असा असला पाहिजे. निरपेक्ष नीतिमत्ता त्याच्या अंगी असली पाहिजे. ती असेल तरच वरील चारी गुण त्याच्या ठायी अवतरतील. हे सर्व गुण म्हणजेच न्यायित्व; आणि न्यायित्व म्हणजेच न्यायालयाची प्रतिष्ठा. ते नसेल तर निवळ बाह्य आचारांनी ती प्रतिष्ठा मिळणार नाही व टिकणार नाही.

न्यायमूर्ति गजेंद्रगडकर वज्रकठोर नीतिमत्तेचा आदर्श आहेत हे सांगणे म्हणजे सूर्य तेजस्वी आहे असे सांगण्याप्रमाणे आहे. स्वतः निष्कलंक असल्यामुळे आपल्यासमोर येणारांची थोडीशी लटपट देखील त्यांच्या तात्काळ लक्षात येते व तिला करडेपणाने पायबंद घालण्यास ते चुकत नाहीत. मुंबईच्या उच्च न्यायालयात ते पुष्कळ वर्षे प्रशासक न्यायाधीश होते. राज्यातल्या न्यायखात्याचा कारभार पाहण्याचे, ठिकठिकाणच्या खालच्या सर्व दर्जाच्या न्यायाधीशांचे काम रास्त आणि पद्धतशीर चालले आहे की नाही हे पाहण्याचे, गैरवाका प्रकार असेल तिथे योग्य उपाय योजण्याचे वगैरे काम प्रशासक न्यायाधीशाचे असते. जनतेच्या गाऱ्हाण्यांची त्वरेने दखल घेऊन ती दूर करणे, खात्यातल्या गैरवर्तनाला कोणाचाही मुलाहिजा न ठेवता आळा घालणे, न्यायदानाला लागणारा विलंब टाळणे, या सर्व गोष्टींसाठी ते खपले आणि आपल्या योजकतेने त्यांनी न्यायखात्याचा दर्जा व न्यायदानाचा कस वाढविला. महाराष्ट्र राज्यामध्ये, सरळपणा, निर्मळपणा आणि वाकबगारपणा, यांच्या बाबतीत

न्यायाधीशमंडळाचा जो विशेष दर्जा दिसून येतो त्याला बऱ्याच अंशी कारण प्रशासक न्यायाधीश या नात्याने गजेंद्रगडकरांनी केलेले काम हे होय.

उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नेमणूक झाल्यावेळी ज्या पक्षकारांची कामे गजेंद्रगडकरांच्याकडे अपुऱ्या अवस्थेत होती त्या सर्वांना त्यांनी विसार म्हणून दिलेल्या रकमा गजेंद्रगडकरांनी संपूर्णपणे परत दिल्या. अशी एकंदर ३०,००० वर रकम त्यांनी परत केली! १९४५ सालचे ३०,००० रुपये म्हणजे आजचे किमानपक्ष लाख रुपये! द्रव्यविषयक कमालीची निःस्पृहता हा त्यांचा स्थायी भाव आहे. एखादा माणूस वकिलीच्या धंद्यातून न्यायाधीशपदावर उचलला गेला म्हणजे तो आपल्याकडे असलेल्या अपुऱ्या राहिलेल्या कामांची काही तरी योग्य व्यवस्था लावीतच असतो. न्याय्य आणि कायदेशीर वर्तनात कोणी चुकत असेल हे शक्य नाही. पण आपल्याकडे आलेल्या एकूण एक रकमांचे चेक फाडणे ही गोष्ट निराळी. गजेंद्रगडकरांचे गजेंद्रगडकरपण यातच आहे.

श्रेष्ठ चारित्र्याचा दिल्लीत वचक

दिल्लीस गेल्यानंतर तेथील न्यायमंडळात आणि राजकीय वर्तुळात आपल्या निःस्पृहतेने आणि निर्भयतेने गजेंद्रगडकरांनी एक प्रकारचा दबदबा निर्माण केला आहे. त्यांच्या उदात्त निष्कलंक चारित्र्याची छाप सर्वत्र पडली आहे. मोठमोठ्यांच्या भीडमुरवतीची तमा न बाळगता उच्चपदस्थांना देखील गैरवर्तणुकीबद्दल तडकाफडकी शासन करण्यास त्यांनी मागेपुढे पाहिलेले नाही. न्यायालयीन कारभार आणि न्यायदानाचे कार्य अत्यंत विशुद्ध, भ्रष्टाचारापासून अलिप्त ठेवण्याबद्दल त्यांनी आपल्या भाषणांतून जिथे साधेल तिथे इशारा दिला आहे. दिल्ली बार असोसिएशनच्या सत्कार-प्रसंगी त्यांनी केलेले भाषण या दृष्टीने विशेष लक्षात घेण्याजोगे आहे (खंड ३, क्र. २). शिवाय पार्ट्या, डिनर्स, भोजनसमारंभ इ० औपचारिक प्रकारांबद्दल त्यांना वाटत असलेली अरुची या भाषणात प्रकट झाली आहे. लघळ आणि मतलबी लोक अशा प्रसंगांचा फायदा घेऊन काही संबंध जुळवू पाहतात, मतलबाची हळूच पेरणी करू पाहातात. उच्चस्तरीय समाजाचे कृत्रिम शिष्टाचार, पोकळडौलीपणा व दांभिकपणा यांचा त्यांना मनापासून तिटकारा आहे.

विशालदृष्टि जवाहरलालजी आणि साधुवृत्ति लालबहादुरजी या दोघांनाही न्या० गजेंद्रगडकरांबद्दल फार आदर होता. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ति म्हणून दिल्लीत आल्यानंतर सहा महिनेपर्यंत गजेंद्रगडकर प्रधानमंत्री नेहरूंना भेटायला गेले नाहीत. त्यानंतर वेळ ठरवून भेटायला गेले. पंडितजींना आतून येण्यास पाच मिनिटे उशीर झाला त्याबद्दल त्यांनी क्षमा मागितली. नंतर गजेंद्रगडकरांनी बोलायला प्रारंभ केला.

"पंडितजी, न्यायाधीश म्हणून सर्वोच्च न्यायालयात आल्याला मला सहा महिने झाले. इथे आल्याबरोबर मी आपल्या भेटीला यायला पाहिजे होते. पण लगेच आलो

असतो तर आपल्याला कदाचित असे वाटले असते की याला आपल्यापासून काही मागायचे आहे. म्हणून तशा तऱ्हेची दुरून सुद्धा शंका येणार नाही इतका दीर्घ काळ मी जाऊ दिला आणि आता आपली केवळ आदरार्थी भेट घेण्याकरिता मी आज आलो आहे.''

पंडितजी क्षणभर चकित झाले, हसले आणि उत्तरले, ''न्यायमूर्ति महोदय, आपण म्हणता ते खरे आहे. दुर्दैवाने तशाच लोकांचा गराडा माझ्याभोवती पडलेला असतो. पण तुमच्याविषयी माझी तशी समजूत कधीच झाली नसती. वास्तविक मीच तुमच्या भेटीला यायला पाहिजे होते. पुष्कळ वाटते, की सहज भेटून गप्पा गोष्टी कराव्या. पण मला वेळच मिळत नाही, तुम्ही पाहताच.''

आणखी असेच बोलणे झाले. थोरांची थोर मने जुळली. सुखसंवाद निर्माण झाला. लालबहादुर शास्त्रींनी गृहमंत्री असताना गजेंद्रगडकरांची विद्वत्ता, निःस्पृहता आणि काम करण्याची आदर्श पद्धती जवळून पाहिली होती; आणि त्यांच्या मनात यांच्याविषयी परम आदर उत्पन्न झाला होता. भारताचे प्रधानमंत्री झाल्यावर अनेक महत्त्वाच्या बाबतीत ते न्यायमूर्तींचा सल्ला घेत असत. या अंतरंगातील देवाणघेवाणीची हकीकत स्वतः न्यायमूर्ती जेव्हा उघड करतील तेव्हाच जगाला कळेल.

न्यायमूर्तींच्या सर्वांगस्पर्शी नैतिकतेच्या गोष्टी आणखी सांगत बसण्याचे कारण नाही. इथे या जीवनांगाचे थोडेसे निरूपण केले, ते अशाकरिता की घसरत्या नैतिक मूल्यांच्या सध्याच्या काळात समाजापुढे असा आदर्श ठळकपणे राहावा. 'पुण्यक्षेत्रे कृतं पापम्' या वचनात म्हटल्याप्रमाणे शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रातही अनाचाराचा वज्रलेप होत आहे, सगळा बाजार हाच काळाबाजार होऊ पाहात आहे आणि काळे हेच पांढरे अशी मखलाशी होऊ लागली आहे, अशा या काळात

निर्मानमोहा जितसंगदोषाः । गीता १५-५

'मान आणि मोह यांच्यापासून जे अलिप्त आहेत व आसक्तिदोष ज्यांनी जिंकिला आहे' अशा पुरुषांचा आदर्श ठळकपणे पुढे यावा हे इष्ट आहे. असे आदर्श समाजाला दीपस्तंभाप्रमाणे होत. न्या० गजेंद्रगडकरांच्या रूपाने वज्रकठोर नीतिमत्तेचा एक तेजस्वी दीपस्तंभ आपणाला उपलब्ध आहे. त्याचा सर्वदिग्व्यापी प्रकाश राष्ट्राला नैतिक सामर्थ्य देण्यास सहायभूत होईल.

न्यायदानाला समाजकल्याणकारी वळण

मुंबई उच्च न्यायालयातल्या कामाप्रमाणे त्यांचे सर्वोच्च न्यायालयातले कामही सर्वांच्या प्रशंसेला पात्र ठरले. जे वर्णन इथल्या कामाला लागू तेच तिथल्या कामाला लागू पडते. एवढेच की तिथे नवथर वकिलांशी प्रसंग नसतो आणि कायद्याचे ढोबळ मुद्दे मागे पडलेले असतात; कायद्याच्या निर्वचनाचे (interpretation) सूक्ष्म मुद्दे

आणि कायद्याची तत्त्वे यांचाच तिथे ऊहापोह होतो. कुशाग्र बुद्धी आणि न्यायतत्त्वांचे गाढ ज्ञान यांमुळे त्यांनी दिलेले निर्णय उच्च दर्जाचे ठरतात. संविधानविषयक वाद आणि औद्योगिक कायद्यांसंबंधातले वाद यांवरील निर्णयांसाठी त्यांची विशेष प्रसिद्धी आहे. या दोन्ही विषयांत त्यांचा हातखंडा आहे आणि दोन्ही बाबतीत सामाजिक-आर्थिक न्यायाला अनुकूल अशा कायद्याचा अर्थ लावण्याच्या परंपरा त्यांना घालून द्यावयाच्या आहेत. आपल्या संविधानाने दिलेले व्यक्तिस्वातंत्र्य आणि राष्ट्रापुढे ठेवलेले समाजकल्याणाचे आदर्श यांच्यामध्ये समन्वय साधला पाहिजे, तो साधण्याची दिशा कोणती, हे त्यांनी अनेक सार्वजनिक प्रसंगी केलेल्या आपल्या भाषणांमध्ये सांगितले आहे. या विचारांस अनुसरून संविधानीय विधीला सध्याच्या काळाला उचित असा एक विशिष्ट आकार त्यांच्या न्यायनिर्णयांमुळे प्राप्त होत आहे. औद्योगिक कायद्यांसंबंधाचे त्यांचे निर्णय हे अर्थातच देशातल्या सर्व न्यायालयांना आणि न्यायाधिकरणांना प्रमाणभूत ठरले आहेत. अशा वादांमध्ये निर्णय देताना त्यांचा कल कामगारांकडे, वंचितांकडे, दलितांकडे झुकलेला असतो हे सुप्रसिद्ध आहे. कल्याणकारी लोकशाही राज्यामध्ये कायदा गतिमान (dynamic) असला पाहिजे असे त्यांनी आपल्या भाषणामध्ये वारंवार म्हटले आहे त्याचा न्यायदानाच्या संदर्भात हाच अर्थ होय.

भारताचे प्रधान न्यायमूर्ति

ता. १ फेब्रुवारी १९६४ रोजी गजेंद्रगडकर सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख, भारताचे प्रधान न्यायमूर्ति झाले. ही बढती वयोज्येष्ठत्वाच्या क्रमाने झाली. या नेमणुकीच्या बाबतीत अशी प्रथा पडली आहे की एक प्रधान न्यायमूर्ति निवृत्त झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयात त्याच्या खालोखाल जो ज्येष्ठ असेल त्याच्या अंगावर प्रधान न्यायमूर्तीची वस्त्रे चढायची. इमाम नावाचे न्यायमूर्ती गजेंद्रगडकरांना ज्येष्ठ होते, पण त्यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे त्यांना वगळून हे पद त्यांच्या खालच्या गजेंद्रगडकरांना देण्यात आले. ज्येष्ठत्वाच्या क्रमाने निवड करण्याची ही रूढी कितपत चांगली याबद्दल वाद चालू आहे. पण या पद्धतीचा एक गुण असा आहे की तिच्यामुळे एवढ्या मोठ्या पदावरील नेमणुकीत राजकारण किंवा इतर अवांतर गोष्टी घुसू शकत नाहीत. खालचे न्यायाधीश ज्येष्ठत्वाच्या क्रमानुसार प्रधान न्यायमूर्ति व्हावयाचे आणि भारताच्या प्रांतोप्रांतीच्या उच्च न्यायालयांमध्ये व सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायाधीश म्हणून कोणाला नेमावयाचे याचा निश्चय राष्ट्रपतींनी प्रधान न्यायमूर्तीच्या सल्ल्यानुसार करवयाचा (अर्थात यांच्यापैकीच कोणीतरी एक भविष्यात प्रधान न्यायमूर्ति होणार), असे हे चक्र आहे. भारताच्या न्यायमंडळाचे स्वातंत्र्य आणि विशुद्धत्व त्यामुळे टिकून आहे.

परदेश प्रवास

न्या. गजेंद्रगडकरांना १९६५ साली जो परदेशप्रवास घडला ते त्यांच्या न्यायाधीश पदावरील यशाचे शिखर मानता येईल. आजकाल खूप लोक अमेरिकेला व रशियाला जातात. पण न्यायमूर्तींच्या जाण्यात वैशिष्ट्य होते. भारतातील कायदा आणि न्यायदानपद्धति यांचा अमेरिकेतील कायद्याचे अभ्यासक आणि न्यायाधीश यांना परिचय व्हावा आणि दोन्ही देशांच्या विधिज्ञांमध्ये स्नेहसंबंध निर्माण व्हावे या हेतूने अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचे प्रधान न्यायमूर्ति अर्ल वॉरन यांनी गजेन्द्रगडकरांना अधिकृत रीत्या निमंत्रण दिले होते. भारत सरकारने या निमंत्रणाचा स्वीकार केला; न्यायमूर्तींच्या सुमारे अडीच महिन्यांच्या परदेशप्रवासाची सरकारी रीत्या तयारी करण्यात आली. प्रधान मंत्री लालबहादूर शास्त्री यांना ही कल्पना फार पसंत पडली असे म्हणतात. गजेंद्रगडकरांनी अमेरिकेत व इतरत्र जाऊन तेथील लोकांसमोर भाषणे व चर्चा करण्याने भारताची मान उंचावेल, भारताचा सर्वत्र गौरव होईल, असे त्यांना वाटले. न्यायमूर्ति सौ. शालिनीवाईंसह ता. १ मे १९६५ रोजी मुंबईहून निघाले. अर्थात सर्व प्रवास विमानाने. कायरो, प्राग, फ्रांकफुर्ट, लंडन—एकदिवस विश्रांती—न्यू यॉर्क, वॉशिंग्टन. राजधानी वॉशिंग्टन येथे संयुक्त संस्थानांचे प्रधान न्यायमूर्ति अर्ल वॉरन यांनी भारताच्या प्रधान न्यायमूर्तींचे स्वागत केले. जगातील सर्वात मोठ्या दोन लोकसत्ताक राज्यांच्या न्यायप्रमुखांची भेट! स्वतंत्र भारताच्या इतिहासात हे प्रथमच घडत होते. स्वागतानंतर लगेच न्या. गजेंद्रगडकरांच्या दौऱ्याला सुरवात झाली. मुख्यत्वेकरून निरनिराळ्या विद्यापीठांना भेटी, त्या त्या विद्यापीठाच्या विधिमहाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांच्यासमोर भाषणे आणि त्यांच्याशी प्रश्नोत्तरी अथवा चर्चा असा कार्यक्रम असे. त्या त्या शहरातले वकील आणि न्यायाधीश तेथेच जमत. अशा रीतीने अमेरिकेतील बहुतेक सर्व जुन्या व नामांकित विद्यापीठांमध्ये न्या० गजेंद्रगडकरांची भाषणे व चर्चा झाल्या. सर्वत्र त्यांनी सांगितले नेहमीचेच. भारतीय संविधान आणि संविधानाच्या अमलाखाली कायद्याचे कार्य, लोकशाहीच्या आधुनिक कल्पनेला अनुसरून कायद्याची गतिशीलता, हा भारतातील अनेक व्याख्यानांमध्ये त्यांनी मांडलेला विषयच त्यांनी अमेरिकन लोकांपुढे मांडला. कायद्याचे ध्येय आणि कायद्याची भूमिका यांच्यासंबंधी इतका खोल व तात्त्विक विचार भारतात होतो हे तथ्यच मुळी तेथील लोकांना नवीन होते. आणि हे विचार मांडणारे वक्ते गजेंद्रगडकर! कसल्याही टिपणांचा यत्किंचितही आधार न घेता उत्कृष्ट इंग्रजी शैलीत विषयाचे अस्खलित व मुद्देसूद प्रतिपादन करणाऱ्या त्यांच्या भाषणांनी तिकडील लोक अक्षरशः मोहून गेले. वॉशिंगटनहून न्यायमूर्ति प्रथम येल विद्यापीठात (न्यू हॅव्हन) गेले. नंतर न्यूयॉर्कला येऊन तेथून बॉस्टन येथील हार्वर्ड विद्यापीठात गेले. बहुधा प्रत्येक ठिकाणी व्याख्यान, चर्चा, भोजन हा कार्यक्रम. हार्वर्डनंतर फिलाडेल्फिया

येथील पेनसिल्व्हानिया विद्यापीठात विधिमहाविद्यालयात त्यांचे व्याख्यान झाले. कायद्याचे अध्यापक, अभ्यासक आणि व्यवसायी यांचा खूप मोठा समुदाय जमला होता. गजेंद्रगडकरांच्या अस्खलित वक्तृत्वाने तिथले लोक इतके भारावून गेले की त्यांचे भाषण संपताच सर्व सभा उठून उभी राहिली व टाळ्यांचा गजर जो सुरू झाला तो थांबेचना. न्यायमूर्तींना काय करावे हे समजेना! अखेर ते व्यासपीठावरून खाली आले व हात उंचावून त्यांनी नमस्कार केला, तेव्हा श्रोते शांत झाले. नंतर वॉशिंगटनमध्ये तेथील न्यायमूर्तींच्या पार्ट्या झाल्या. त्यातील स्वागताला उत्तरादाखल भाषणे. वॉशिंगटनमधील मुक्कामानंतर पुन्हा विद्यापीठांचे दौरे. शार्लटव्हिले येथील व्हर्जिनिया विद्यापीठ, न्यूयॉर्क येथील कोलम्बिया आणि न्यूयॉर्क विद्यापीठे. कोलम्बिया विद्यापीठ फार जुने, नामांकित. तेथील विधिविभाग अत्यंत समृद्ध, तो न्यायमूर्तींनी अवलोकिला. तेथून देशाच्या मध्यावरील शिकागो विद्यापीठ आणि अगदी पश्चिमेकडील स्टॅनफोर्ड व बार्कले विद्यापीठे ही घेऊन न्यायमूर्तींनी आपला अमेरिकेचा दौरा संपविला व ते न्यूयॉर्कहून लंडनास आले. या बाबतीत विशेष लक्षात घेण्याजोगी गोष्ट ही की न्यायमूर्ति अमेरिकेत जाण्याच्या काही दिवस अगोदरच अमेरिकेच्या अध्यक्षांनी भारताचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांना, त्यांची नियोजित अमेरिकाभेट पुढे ढकलण्याबद्दल अचानक विनंती केली होती; त्यामुळे साहजिकच भारतातील सुबुद्ध वर्गाचे मन अमेरिकेविरुद्ध बरेच खवळले होते. इकडील वर्तमानपत्रांतून अमेरिकेच्या प्रशासनावर कठोर टीका होत होती आणि या सर्व प्रतिक्रिया तेथील सरकार व नागरिक यांच्यापर्यंत पोचत होत्या. 'न्यूयॉर्क टाईम्स'ने न्या. गजेन्द्रगडकरांच्या या अमेरिका-दौऱ्याविषयी जी वार्तापत्रे प्रसिद्ध केली त्यात म्हटले आहे की वरील घटनांमुळे अमेरिकेतील सुबुद्ध नागरिकवर्ग भारताच्या सरन्यायाधीशांच्या—किंबहुना कोणत्याही महत्त्वपूर्ण भारतीय व्यक्तीच्या—अमेरिकेतील सार्वजनिक वक्तव्याकडे सुरवातीस जरा संशयाच्या व विरोधाच्या भावनेने पाहात होता. भारतीय बुद्धिमंतांच्या मनात अमेरिकेबद्दल, त्यांच्या मते, असलेला कडवटपणा न्यायमूर्तींच्या बोलण्यात कुठे ध्वनित होतो की काय हे पाहण्यासाठी व त्यांना खवचटपणे अडविण्यासाठीही तेथील श्रोते प्रारंभी उत्सुक होते. अशा स्थितीत गजेंद्रगडकरांनी आपला सरकारी दौरा ठरलेल्या कार्यक्रमानुसार यशस्वी रीतीने पार पाडला, एवढेच नव्हे, तर अमेरिकेतील त्यांच्या कार्यामुळे भारत व अमेरिका यांचे संबंध चांगले होण्यास मदत झाली आहे असे वार्तापत्रांवरून दिसते. भारतीय संविधानाचे ध्येय किती उदात्त आहे आणि भारतीय लोकशाहीचा पाया किती दृढ आहे याचे त्यांच्या भाषणांवरून व चर्चांवरून अमेरिकन नागरिकांना प्रभावशाली दर्शन झाले. विषयाच्या सर्व तपशिलावरील असामान्य प्रभुत्व, बोलण्याचालण्यातील स्पष्ट मनमोकळेपणा, अंतःकरणातील सद्भावना आणि विशेषेकरून वर्तनक्रमातील धीरोदात्त गांभीर्य व कळकळ हे त्यांचे गुण अमेरिकनांना जास्त जाणवले असे निरनिराळ्या वृत्तपत्रांमध्ये म्हटले आहे.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... . दिः .....

भारतातील सुबुद्ध वर्ग, एखाद्या राजकीय घटनेचे भांडवल करून, संबंधित देशातील सर्व जनतेवर उगीचच आगपाखड करीत असतो असा जो समज अमेरिकेत बळावू पाहात होता, तो बऱ्याच प्रमाणात चुकीचा आहे याची सरन्यायाधीशांच्या भेटीमुळे अमेरिकन बुद्धिमंतांना आनंददायक प्रचीति आली, असे 'न्यूयॉर्क टाइम्स'ने म्हटले आहे. न्यायमूर्तींनी तेथे निवडक वृत्तपत्रांनाही मुलाखती देऊन भारतातील न्यायाच्या प्रशासनाविषयी आकडेवारीने पूर्ण अशी माहिती दिली. अमेरिकेतील न्यायाच्या प्रशासन-पद्धतीपेक्षा भारतातील पद्धतीत काही गोष्टी अधिक चांगल्या आहेत, तसेच भारतातील न्यायाधीशांना अमेरिकेतील न्यायाधीशांपेक्षा कितीतरी जास्त काम करावे लागते या गोष्टी त्यांनी तपशिलासह सोदाहरण सांगितल्या त्या तिकडील लोकांना मोठ्या उद्‌बोधक वाटल्या. भारतातील न्यायखाते व न्यायव्यवस्था ही शासनव्यवस्थेपासून भिन्न आणि स्वतंत्र असून, न्यायाधीश निःपक्षपातीपणे व निर्भयपणे, कित्येकदा शासनाचे निर्णयही रद्द ठरवितात हे कळून तिकडील न्यायविदांना मोठे कुतूहल वाटले. आज समृद्धीच्या शिखरावर असलेल्या अमेरिकन समाजात कायद्याकडे पाहाण्याचा स्थितिशील दृष्टिकोन प्रभावी असून शांतता व सुव्यवस्था यांचे रक्षण करणे एवढेच कायद्याचे कार्य; यापेक्षा समाज-व्यवहाराचे जास्त नियंत्रण कायद्याने करणे हा व्यक्तिस्वातंत्र्यावर आघात होय अशी समजूत साहजिकच प्रचलित आहे. अशा स्थितीत, न्या. लर्नेडहँड, न्या. होम्स, कार्डोझो या आपल्या आवडत्या न्यायतत्त्वमीमांसकांच्या समर्पक वचनांचा आधार घेऊन, कायद्याच्या गतिशीलतेचा आपला सिद्धान्त गजेन्द्रगडकरांनी तिकडील विद्वानांसमोर मांडला व लोकशाहीप्रधान मागासलेल्या देशात कायदा हा, व्यक्तिस्वातंत्र्य व व्यापक समाजहित यांचा समन्वय साधून, समाजाला प्रगतिपथावर नेण्यास कशी मदत करत असतो, याचे प्रत्यक्ष प्रमाणे देऊन आपल्या उज्ज्वल वाणीने प्रतिपादन केले, त्यामुळे अमेरिकेतील विधिपंडित व अन्य विचारवंत प्रभावित झाले असे प्रमुख वृत्तपत्रांतील उल्लेखांवरून स्पष्टपणे नजरेस येते.

लंडन येथील एका आठवड्याच्या मुक्कामात एका फार महत्त्वाच्या महोत्सवात न्यायमूर्तींना भाग घेता आला. ता. १५ जून १९६५ रोजी *मॅग्नाचार्टा* नावाच्या स्वातंत्र्य सनदेचा ७५० वा वाढदिवस होता त्यानिमित्त वेस्टमिन्स्टरच्या प्राचीन सभागृहात भाषण करण्याचा विशेष मान गजेंद्रगडकरांना देण्यात आला. तिथे समयोचित भाषण करून न्यायमूर्तींनी सर्वांना थक्क केले. 'मॅग्नाचार्टाच्याही पूर्वी १००० वर्षे उपनिषदांमध्ये कायद्याच्या अधिराज्याचे तत्त्व सांगितले असून कायद्याने दुर्बलांना देखील सामाजिक न्याय मिळतो असा त्याचा प्रभाव वर्णिला आहे' असा गौरवास्पद उल्लेख न्यायमूर्तींनी आपल्या व्याख्यानात केला. इंग्लंडच्या सर्वोच्च न्यायमंडळासमोर (प्रिव्ही कौन्सिलरांसमोर) न्यायमूर्तींचे आणखी एक भाषण झाले. लंडनहून आमस्टरडाम व पारिस करून न्यायमूर्ति स्वित्झर्लंडात जिनिव्हा येथे आले. तिथे आंतरराष्ट्रीय न्यायशास्त्रकोविदांच्या आयोगाकडून त्यांचे स्वागत करण्यात आले, त्याप्रसंगी यांनी

छोटेच पण परिणामकारक भाषण केले. तेथून रोम व व्हॅटिकन (पोपचे ठिकाण) करून न्यायमूर्ति रशियांत उतरले. सोव्हिएट युनियनच्या निमंत्रणावरून हिंदी विधिज्ञांचे शिष्टमंडळ रशियाला गेले होते त्याचे नेतृत्व न्यायमूर्तींकडे होते. या शिष्टमंडळाला मॉस्को येथे जाऊन मिळाल्यावर रशियामध्ये काही ठिकाणी न्यायमूर्तींची भाषणेही झाली, ती रशियातील विद्वानांना फार आवडली. सर्वात महत्त्वाचे भाषण ता. ९ जुलै रोजी सोव्हिएट युनियनचे न्यायाधीश, न्यायशास्त्रज्ञ आणि कायदेपंडित यांच्या एकत्रित समुदायासमोर झाले. त्याची तर सर्वांकडून फारच वाहवा झाली. त्या भाषणात भारत आणि सोव्हिएट युनियन यांची मैत्री १९४७ सालापासून अखंड चालू राहिली आहे, आणि या मैत्रीमुळेच सोव्हिएट संघाला न्यायशास्त्रज्ञाचे अधिकृत शिष्टमंडळ नेण्याचा मान परकीय देशांमध्ये भारतालाच पहिल्या प्रथम मिळाला हे उचित व स्वाभाविक आहे, असा गौरवपूर्ण उल्लेख न्यायमूर्तींनी केला. तसेच तेथील प्रेमळ आदरातिथ्याबद्दल अंतःकरणपूर्वक कृतज्ञताही व्यक्त केली. संपूर्ण भाषणाचे लिखित तात्काळ प्रधानमंत्री कोसीजिन यांच्या हाती जाऊन पडले. तेव्हा त्यांनी न्यायमूर्तींच्या या उद्गारांनी संतुष्ट होऊन त्यांचे आभार मानणारा संदेश मुद्दाम धाडला. अशाप्रकारे उत्कृष्ट यश संपादून ता. १४ जुलै रोजी न्या० गजेंद्रगडकर मॉस्कोहून थेट दिल्लीला परत आले.

लगेच ऑगस्टमध्ये ऑस्ट्रेलियात सिडने शहरात ब्रिटिश राष्ट्रकुलाची विधिपरिषद भरली तेथे भारतीय विधिज्ञांच्या प्रतिनिधिमंडळाचे नेतृत्व न्यायमूर्तींनी केले. राष्ट्रकुलातील राष्ट्रांच्याकरिता सर्वोपरि अपील न्यायालय असावे या सूचनेला तेथे त्यांनी विरोध केला; त्यावरून ती कल्पना सोडून देण्यात आली.

न्यायमूर्तींच्या परदेशप्रवासाने भारताच्या न्यायदानमंडळाला विशिष्ट आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झाला यात शंका नाही.

न्या. गजेंद्रगडकर भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सातवे प्रधान न्यायमूर्ती. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींसाठी संविधानाने ६५ ही वयोमर्यादा घालून दिली आहे. ती १५ मार्च १९६६ रोजी पूर्ण होत असल्यामुळे १६ मार्च रोजी ते निवृत्त होत आहेत. त्यानंतर ते बहुधा आपल्या आवडत्या मुंबईस परत येतील. तसे झाल्यास अनेक सार्वजनिक कार्यांची धुरा त्यांना अंगावर घ्यावी लागेल हे उघड आहे. आपली देशसेवेची स्वप्ने साकार करण्यास त्यांना अवसर मिळेल.

न्यायदानाला आधुनिक न्यायमीमांसेची बैठक

वास्तविक न्यायाधीश या नात्याने त्यांनी केलेले कार्य ही मोठी देशसेवाच आहे. आपल्या वाट्याला आलेले काम, आपल्या सर्व शक्ती ओतून सत्याला व नीतीला स्मरून करीत राहाणे म्हणजे देशाची सेवाच आहे. या व्यापक अर्थाने प्रत्येक प्रामाणिक नागरिक देशाचा सेवक असतो. त्यात न्यायाधीशाच्या हातून होणारी

देशसेवा विशेष मोलाची असते. सत्य, न्याय आणि विधी यांना अनुसरून निवाडे देऊन तो समाजाचे व्यवहार सुयन्त्रित चालण्यास मदत करतो. निर्भयपणे, निःपक्षपातीपणाने आपले काम करणारे न्यायाधीश समाजात सत्य, न्याय यांचे संरक्षण केले जाईल असा विश्वास नागरिकांच्या मनात उत्पन्न करतात; त्यांच्यामुळे न्यायालये नीतिमत्तेचा एक आधारस्तंभ बनतात. न्यायाधीशांची ही सामान्य देशसेवा गजेंद्रगडकरांच्या हातून घडली हे सांगण्याचे कारण नाही. गजेंद्रगडकरांची अलौकिकता यापलीकडे जाऊन न्यायदानाच्या कार्याला विशिष्ट प्रगतिकारक तत्त्वज्ञानाची बैठक देण्यात आहे. साम्यवादाच्या उदयानंतर लोकशाही शासनाच्या कल्पनेत परिवर्तन झाले आहे. यापुढे शासनाला तटस्थतेची भूमिका घेऊन चालणार नसून समाजातील दारिद्र्य, बेकारी, अज्ञान, रोगराई, गलिच्छपणा यांचा नष्टांश करण्यासाठी त्याला कल्याणकारी शासनाची भूमिका घेतली पाहिजे. लोकशाहीमध्ये कल्याणकारी योजना कायद्याच्या द्वारेच अमलात येऊ शकतात. म्हणून कायद्याने आपली स्थितिशीलता टाकून देऊन गतिमान बनले पाहिजे. आणि न्यायाधीशांनी कायद्याचे हे गतिमान स्वरूप लक्षात घेऊन समाजकल्याणाच्या ध्येयाकडे वाटचाल करण्याच्या दृष्टीने आपले निवाडे, निर्णय दिले पाहिजेत. या आधुनिक दृष्टिकोणास अनुसरून आपल्या संविधानाने समाजकल्याणासाठी मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली आहेत. त्या तत्त्वांच्या पालनाकरिता नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे नियमन करावे लागले तरी ते केले पाहिजे, हे जाणून आपले निर्णय देणे हे देशातील न्यायाधीशांचे कर्तव्य होय.

कायद्याच्या गतिमानतेचा (dynamism) हा सिद्धान्त पाश्चात्त्य देशातील न्यायतत्त्ववेत्त्यांनी प्रतिपादन केला. त्याचे स्वरूप स्पष्ट करून सांगून त्याचा जोरदार पुरस्कार करणारे आणि प्रत्यक्षात त्याला अनुसरून निर्णय देण्याची परंपरा घालून देणारे गजेंद्रगडकर हेच पहिले न्यायाधीश होत. त्यांचे अलौकिकत्व यात आहे. सामाजिक तत्त्वज्ञानाची ही बाजू मराठी वाचकांना अगदी नवीन आहे. न्यायमूर्तींनी आपल्या अनेक भाषणांमधून ती प्रभावीपणाने मांडली आहे. प्रस्तुत ग्रंथाचे खंड २ व ३ यांत हा नवसिद्धान्त विशद करून सांगणारी भाषणे अंतर्भूत झालेली आढळतील.

सार्वजनिक कार्य, विधिविषयक

उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाल्यापासून भय्यासाहेबांना थोडीबहुत उसंत मिळू लागली. व्यवसायाबाहेरचे सार्वजनिक सेवेचे पुष्कळ काम ह्या पुढच्या काळात त्यांच्या हातून घडले. त्यातल्या बऱ्याचशा गोष्टी कायदा व न्यायदान यांच्याशी संबंधित होत्या, हे साहजिकच होय. त्यांच्या या सार्वजनिक सेवेची जंत्रीवजा हकीकतच फक्त येथे देणे शक्य आहे. मुंबई विद्यापीठाच्या विद्यमाने सर लल्लूभाई शहा व्याख्यानमालेमध्ये १९५० साली त्यांनी दत्तकासंबंधीचा कायदा या विषयावर चार व्याख्याने दिली. १९५० च्या डिसेंबरात कर्नाटक विद्यापीठामध्ये धारवाड येथे

हिंदु कायदा विधेयक या विषयावर यांनी दोन व्याख्याने दिली. त्या वेळेस या विषयाची सर्वत्र जारीने चर्चा चालू होती. सबंध हिंदु कायदा विधेयक संसदेमध्ये पास होऊ शकले नाही. तेव्हा त्यातील निरनिराळ्या विभागांची निरनिराळी विधेयके करण्यात आली व ती संसदेने पास केली. गजेंद्रगडकरांनी आपल्या व्याख्यानांत केलेल्या सूचनांचा ही विधेयके तयार करण्यात बराच उपयोग झाला असे म्हणतात. १९५५ साली त्यांच्याकडे एक फार महत्त्वाचे काम अचानक आले. ते त्यांनी उत्कृष्ट रीतीने पार पाडले. बँकांमधील कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न विकट व गुंतागुंतीचा झाला होता. सरकारने दिलेली वचने पाळली नाहीत अशाही नोकरवर्गाच्या तक्रारी होत्या. या सर्व गोष्टींची शहानिशा करून सर्व श्रेणींच्या नोकरांच्या वेतनासंबंधी निर्णय करण्याकरिता केंद्र सरकारने एकसदस्य आयोग (कमिशन) नेमला होता. न्या० राजाध्यक्षांची त्यात आयुक्त म्हणून नेमणूक झाली होती. पण राजाध्यक्ष अचानक वारले आणि गजेंद्रगडकरांची त्यांच्या जागी नियुक्ती झाली. त्यांनी ५ मार्च १९५५ रोजी हे काम हाती घेतले आणि २५ जुलै रोजी आपला अहवाल सरकारला सादर केला. सर्व देशातील बँक नोकरांच्या वेतनाचा गुंतागुंतीचा बनलेला प्रश्न सोडविण्याचे काम काही सामान्य नव्हे. पण एवढा बिकट प्रश्न गजेंद्रगडकरांनी तडाख्यात आणि सर्वांचे समाधान होईल अशा रीतीने सोडविला. जवाहरलाल नेहरूंनी गजेंद्रगडकरांच्या निवाडयाचे महत्त्व मान्य केले आणि तो सरकारने संपूर्णपणे स्वीकारल्याचे जाहीर केले. कल्याणकारी राज्यामध्ये औद्योगिक कर्मचाऱ्यांची वेतने कोणत्या तत्त्वावर ठरविण्यात यावीत याचे गजेंद्रगडकरांनी आपल्या अहवालात विवेचन केले. ती तत्त्वे औद्योगिक न्यायाधिकरणांना मार्गदर्शक ठरली.

सार्वजनिक कार्य, इतर क्षेत्रातील

दुसरा एक तीव्र वादाचा विषय बनलेला प्रश्न सोडविण्याची पाळी गजेंद्रगडकरांवर १९५८ साली आली. हा प्रश्न शिक्षणाच्या क्षेत्रातला होता. पुणे विद्यापीठाचे कुलगुरु मु. रा. जयकर हे शिक्षणाच्या केंद्रीकरणाचे पुरस्कर्ते होते. स्नातकपूर्व दोन वर्षांचे शिक्षण देखील विद्यापीठाच्या आवारात केंद्रित करावे असा त्यांचा आग्रह व प्रयत्न होता. पुण्यातील काही सुप्रतिष्ठित महाविद्यालयांचा त्याला विरोध होता. अशा स्थितीत जयकर निवृत्त होऊन रँगलर र. पु. परांजपे कुलगुरु झाले तेव्हा त्यांनी या समस्येचा निवाडा करण्यासाठी तिघा बाहेरच्या प्रतिष्ठितांची समिती नेमण्यास अनुमती दिली. श्री. भवानीशंकर नियोगी आणि श्री. डोंगरकेरी समितीचे सदस्य आणि न्या. गजेंद्रगडकर अध्यक्ष होते. या समितीने चौकशी केली, साक्षी घेतल्या, परिस्थिति पाहिली आणि बव्हंशी विकेंद्रीकरणाच्या बाजूने निवाडा दिला. तो विद्यापीठाने मान्य केला. तंट्याचे कारण होऊन वसलेला एक प्रश्न मुख्यतया गजेंद्रगडकरांच्या कुशलत्वाने निकालात निघाला.

शिक्षणक्षेत्रात त्यांचे महत्त्वाचे कार्य मुंबई विद्यापीठात झाले. तेथे ते विधि-विद्यामंडळाचे (Faculty of Law) अध्यक्ष (१९५४–१९५६) आणि कार्यकारिणीचे (सिंडिकेटचे) सभासद (१९५५–५८) होते. त्यांचे कर्तृत्व विद्यापीठाच्या प्रशासकीय बाजूकडेच विशेषेकरून उपयोगात आले. विद्यापीठातल्या कोणत्याही पक्षात किंवा गटात त्यांचा समावेश नसे. कोणत्याही बाबतीत स्वतःचा काही हेतू साधायचा नसल्यामुळे विद्यापीठात काय, किंवा इतर कोणत्याही संस्थेत काय, पक्षाच्या किंवा गटाच्या कोंडाळ्यात गुंतून पडायचे त्यांना कारणच पडले नाही. त्यांची दृष्टि सदोदित संस्थेच्या व समाजाच्या हिताची राहिली. त्यातल्या त्यात विद्यापीठामध्ये वि. के. जोग व सर विठ्ठल चंदावरकर यांच्याशी त्यांचे जास्तीत जास्त जमत असे व त्यांचा एक गट अबोधपूर्व रीतीने बनला होता, असे त्यांनी स्वतः म्हटले आहे.

मुंबईत आणखी अनेक संस्थांच्या कार्यात त्यांनी लक्ष घातले. त्यांचे बंधू अप्पासाहेब वारल्यानंतर त्यांना स्वस्तिक लीगचे उपाध्यक्षपद देण्यात आले व आपल्या बंधूंच्या कार्याचा वारसा म्हणून त्यांनी त्या संस्थेची काळजी वाहिली. १९५६ मध्ये त्या संस्थेचे ते अध्यक्ष झाले, ते आतापर्यंत अध्यक्ष आहेत. एशियाटिक सोसायटी, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादरची जनरल एज्युकेशन सोसायटी (हिचे ते पूर्वीपासून आजतागायत अध्यक्ष आहेत) इत्यादि अनेक संस्थांच्या अधीकारिमंडळांमध्ये राहून त्यांनी मार्गदर्शन केले. मुंबईबाहेरची मोठी संस्था जी लक्षात येते ती पुण्याची 'शिक्षणप्रसारक मंडळ' ही होय. स. प. कॉलेज, नूतन मराठी विद्यालय इत्यादि अनेक शिक्षण संस्था चालविणाऱ्या या महासंस्थेचे ते १९५५ पासून अध्यक्ष आहेत. "दिल्लीला १९५७ साली जाण्याचा प्रसंग आला तेव्हा किती संस्थांचा आपल्याला राजीनामा द्यायचा आहे याची मोजदाद करून पाहिली तेव्हा त्या संस्था जवळ जवळ ३० आहेत, हे लक्षात येऊन मला आश्चर्य वाटले" असे वृत्तपत्रीय मुलाखतीत त्यांनी म्हटले आहे.

दिल्लीला देखील हाच प्रकार चालू राहिला आहे. कायदेविषयक अनेक संस्थांमध्ये ते कुणाचे अध्यक्ष, तर कुणाचे उपाध्यक्ष, तर कुणाचे उपकर्ते झाले आहेत—त्यांना करण्यात आले आहे. दिल्लीतील महाराष्ट्र समितीचे ते अध्यक्ष आहेत. दिल्लीतील मराठी समाजाचे कोणतेही कार्य निघो, गजेंद्रगडकरांना त्यात प्रमुख पदी गोवल्याखेरीज मंडळी राहात नाही. दिल्लीत महाराष्ट्र नाट्यसंमेलन भरले त्याचे ते स्वागताध्यक्ष होते.

भाषणे आणि व्याख्याने

भाषणे, व्याख्याने किती द्यावी लागतात याची तर गणतीच नाही. राष्ट्राला मार्गदर्शक असे भरीव विचार, प्रभावी दणदणीत वक्तृत्व आणि प्रसन्न तरतरीत व्यक्तित्व या असामान्य त्रिवेणी संगमामुळे जिकडे तिकडे लोक त्यांना बोलावतात

व पुष्कळशी वोलावणी नाकारली तरी जी शिल्लक राहातात त्यांचीही संख्या खूपच असते. मागे मुंबई व कर्नाटक विद्यापीठांमध्ये त्यांनी विधिसंबंधी विशिष्ट विषयांवर व्याख्याने दिली, त्याचप्रमाणे लाला लजपतरायांनी स्थापिलेल्या लोकसेवक संस्थेच्या (Servants of the People Society) विद्यमाने नवी दिल्ली येथे लाला लजपतराय स्मारक व्याख्यानमालेत तीन व्याख्याने ता. २८, २९, ३० जानेवारी १९६४ रोजी त्यांनी दिली. 'कायदा, स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय' हाच त्यांचा नेहमीचा विषय त्यांनी निवडला होता. लोकशाहीतील सामाजिक न्यायाची आधुनिक संकल्पना आणि त्यामुळे कायद्याला प्राप्त होणारी गतिशीलता यांचे पूर्वपीठिकेसह सोपपत्तिक विवेचन त्यांनी या व्याख्यानांमध्ये केले आहे आणि भारतीय संविधानाच्या संदर्भात कायद्याचे व न्यायालयांचे कर्तव्य काय, हे स्पष्ट रूपाने वर्णिले आहे. या भाषणांचे वेगळे पुस्तक इंग्रजीतून प्रसिद्ध झाले आहे. विद्यापीठांच्या दीक्षान्त समारंभाचे मुख्य भाषण करणे हा अलीकडे त्यांचा नित्य विधी झाल्यासारखा झाला आहे. दिल्लीचे सार्वजनिक प्रशासन विद्यालय, कर्नाटक, राजस्थान, लखनौ विद्यापीठे यांच्या दीक्षान्तसमयी त्यांनी भाषणे केली, त्यांपैकी लखनौखेरीज इतर सर्व ठिकाणांची भाषणे प्रस्तुत ग्रंथात वाचकांना आढळतील. "कॉलेजांच्या स्नेहसंमेलनप्रसंगी मी धंदेवाईक मुख्य वक्ता आणि माझी पत्नी धंदेवाईक बक्षिसे वाटणारी, असे झालो आहोत. पुण्याचे व मुंबईचे असे एकही कॉलेज राहिले नसेल की ज्या ठिकाणी आम्ही या नात्याने गेलो नाही" असे पुण्यातील वाडिया कॉलेजाच्या स्नेहसंमेलनाच्या मुख्य भाषणात न्यायमूर्ति विनोदाने म्हणाले होते. दिल्लीस गेल्यापासून अधिक उच्च स्तरावर तोच प्रकार चालला आहे.

न्यायमूर्तींची बहुतेक महत्त्वाची भाषणे या ग्रंथात समाविष्ट करण्याचा कसोशीने प्रयत्न केला आहे. प्रत्येक भाषणात आपण मनन करून ठरविलेले सामाजिक समतेचे आणि सामाजिक न्यायाचे विचार सांगण्याचा हेतू त्यांनी ठेवला असल्याने साहजिकच पुनरुक्ती झाली आहे. त्यांच्या विचारांत कोठेही संदिग्धता, गूढता, हेही खरे तेही खरे असा द्विधाभाव आढळायचा नाही. जे सांगायचे ते ठाम, स्पष्ट, समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचे, श्रोत्यांच्या हृदयात तात्काळ घुसणारे असे असते. आणि ते सांगण्याची शैली तशीच ठसठशीत, वजनदार, ओघवती असते. मतभेद सांगताना प्रतिपक्षाचा अधिक्षेप, थट्टा, कुचेष्टा यांचा वास चुकून सुद्धा त्यांच्या बोलण्याला कधी यावयाचा नाही. सुरवातीस श्रोत्यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी थोडासा विनोद ते करतात, एखादा वैयक्तिक हकीकतीचा चुटका सांगतात. पण व्याख्यानाच्या मुख्य विषयाला त्यांनी हात घातला म्हणजे त्यांना अशा कोणत्याही अवांतर गोष्टींची मदत लागत नाही. आपल्या कळकळीने, गांभीर्याने, ओघवती शैलीने ते श्रोत्यांच्या मनाचा कबजा घेतात, ते आपल्या ठायी खिळवून टाकतात. सध्याच्या परिस्थितीत त्यांच्या वक्तृत्वाचा आदर्श शिक्षित मराठी समाजापुढे राहाण्याची नितान्त आवश्यकता आहे.

सामाजिक परिषद

भय्यासाहेब राजकारणात का पडले नसावेत याची मीमांसा प्रारंभी केली आहे. तथापि त्यांचे देशभक्त अंतःकरण स्वस्थ नव्हते, वाट शोधीत होते. त्यांचे चिकित्सक मन समाजाचे अवलोकन करीत होते. वकिलीच्या धंद्यात त्यांना समाजातील नाना जातींच्या, वर्गांच्या व अवस्थांच्या जनतेचे जवळून अवलोकन घडत होते. समाजातील अन्यायाचा, जातिभेदजनित विषमतेचा साक्षात्कार त्यांना घडू लागला. सामाजिक संस्थांच्या इतिहासाचा अभ्यास होऊ लागला, तसतशी दृष्टी व्यापक बनत गेली. त्यांचे चिंतनशील मन अखेर या निर्णयाप्रत येऊन पोचले की सामाजिक अन्याय, विषमता नाहीशी करून समता स्थापिली पाहिजे; जातिभेदाने उभारलेल्या भिंती पाडल्या पाहिजेत; याची निकड फार आहे.

संधी मिळताच भय्यासाहेबांचे हे विचार उद्गाररूप धारण करू लागले. वाई येथे केवलानंद सरस्वती (पूर्वाश्रमीचे नारायणशास्त्री मराठे) यांनी योजिलेल्या धर्मकोशाच्या संपादकवर्गात गजेंद्रगडकरांना घेतले होते. केवलानन्द स्वामींच्या सत्कारप्रसंगी वाईला गेले असता तेथील भाषणात सामाजिक विषमतेचे स्वतःला निरंतर बोचणारे शल्य त्यांनी उघड केले (ता. २१ नोव्हेंबर १९५२).

"समाजात विषमता फार आहे. समता व बंधुभाव निर्माण करण्यासाठी बुद्धिवादी लोकांनी कार्यप्रवण व्हावयास पाहिजे....स्वातंत्र्ययुगाचे सुवर्णयुगात परिवर्तन व्हावयाचे असेल तर सामाजिक क्रांतीस योग्य वळण लावण्याचे कार्य बुद्धिवादाचा आश्रय करूनच केले पाहिजे."

तिथे हजर असलेल्या श्री. के. वि. गोडबोले प्रभृती सुधारणावादी लोकांनी न्यायमूर्तींचे हे उद्‌गार ऐकले आणि ते सानंदचकित झाले. पूर्वी न्यायमूर्ति रानड्यांनी स्थापिलेली व जोपासिलेली सामाजिक परिषद पुन्हा सुरू करावी असे त्यांच्या मनात घोळत होते. हा एक तेजस्वी आणि उच्चपदस्थ नेता या कार्याला लाभला असे त्यांच्या मनाने घेतले. महर्षि कर्वे आणि रँगलर परांजपे यांच्याकडून आग्रह करण्यात आला आणि न्यायमूर्ति गजेंद्रगडकरांनी पुण्यास १९५३ च्या एप्रिलात भरलेल्या सामाजिक परिषदेचे अध्यक्षस्थान स्वीकारले. पुढच्या वर्षी जळगाव येथे भरलेल्या परिषदेच्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थानही त्यांच्याच गळ्यात पडले. त्यानंतरचे अधिवेशन श्री. बाबुराव जगताप यांच्या अध्यक्षतेखाली भरले. त्यानंतर ही सरस्वती पुन्हा गुप्त झालेली दिसते.

पुरोगामी बुद्धिवाद आणि सामाजिक समता

सामाजिक परिषदेच्या व्यासपीठावरून गजेंद्रगडकरांनी पुरोगामी बुद्धिवादाचा ध्वज उभारला आणि सामाजिक समतेचा उद्‌घोष केला. सामाजिक आचार, रूढी, समजुती यांचा विचार तर्कशक्तीच्या साहाय्याने चिकित्सक पद्धतीने केला पाहिजे;

या संबंधात व्यक्तिप्रामाण्य आणि शब्दप्रामाण्य यांना रजा दिली पाहिजे. पूर्वीच्या इतिहासाचे चिकित्सक आणि तौलनिक पद्धतीने अध्ययन करून, सध्याची परिस्थिती आणि भावी प्रगतीची दिशा यांचा निवळ ऐहिक दृष्ट्या विचार करून जे योग्य दिसेल त्याचा प्रचार केला पाहिजे.

याप्रमाणे पुरोगामी बुद्धिवादाचे स्वरूप स्पष्ट केल्यानंतर जातिभेदनिर्मूलन ही जी आजच्या घटकेस जरूर असलेली अत्यंत महत्त्वाची सुधारणा तिचा न्यायमूर्तींनी जोरदार पुरस्कार केला आहे. जातिसंस्थेचा उगम, विकास आणि जरड निर्बंधांमध्ये तिचे झालेले पर्यवसान यांचे ऐतिहासिक दृष्टीने विवेचन करून सध्याच्या परिस्थितीत समाजातील विषमता घालविण्यासाठी जातिभेदाचे निर्मूलन करणे कसे इष्ट आहे हे त्यांनी पटवून दिले आहे. पुढे कायद्याचा व हिंदु कोडाचा विचार करून समता प्रस्थापित करण्यास कायदा जर अडथळा करीत असेल तर तो कायदा बदलला पाहिजे; या दृष्टीने विचार करता सामाजिक समता स्थापन करण्यास हिंदु कोड विलाची फार मदत होईल, इत्यादि विचार त्यांनी व्यक्त केले आहेत.

पुण्याच्या सामाजिक परिषदेत वरील आशयाचे भाषण जेव्हा त्यांनी केले तेव्हा समाजातील शिक्षित वर्गाच्या मनावर त्याचा फार मोठा प्रभाव पडला. काही तरी केले पाहिजे या विचाराने लोकांची मने अस्वस्थ झाली. पुढच्या वर्षीचे जळगाव येथील अधिवेशनातील भाषण पहिल्या भाषणाला पुष्टी देणारे आहे. त्यात सुधारणेच्या प्रचाराचा प्रत्यक्षाच्या पातळीवरून विचार करून काही सूचना दिल्या आहेत. सामाजिक सुधारणेचा प्रचार करताना क्रोधाचा, द्वेषाचा किंवा उपहासाचा कधीही अवलंब करता कामा नये. लोकांना शिक्षण देऊन, युक्तिवादाने हृदयपालट करण्याच्या मार्गानेच सुधारणा यशस्वी होईल. पुरोगामी बुद्धिवादाला श्रद्धा व निष्ठा यांचीही जरुरी आहे हा आणखी एक महत्त्वाचा विचार या भाषणात मांडला आहे. पुढे पूर्ण बुद्धिस्वातंत्र्य आणि तीव्र ज्ञानलालसा हेच हिंदुसंस्कृतीचे मुख्य वैशिष्ट्य प्राचीन काळापासून राहिलेले आहे हा महनीय सिद्धान्त ऐतिहासिक विवेचनाने सिद्ध करून सामाजिक क्रांतीचे प्राचीन व अर्वाचीन महर्षि बुद्ध, महावीर, बसव, आणि जोतिबा फुले, लोकहितवादी, रानडे, आगरकर व शिंदे यांच्या कार्याचे आदरपूर्वक स्मरण केले आहे. त्यानंतर आपल्या मते सामाजिक क्रांतीचा सप्तसूत्रात्मक कार्यक्रम सादर करून सामाजिक समतेचा अखेरीस जयजयकार करून त्यांनी आपले भाषण संपविले आहे.

न्यायमूर्ति आता न्यायसेवा-निवृत्त होऊन महाराष्ट्रात परत येत आहेत. इकडील पुरोगामी शक्ती त्यांच्याभोवती गोळा होऊन सुधारणाकार्याचा कदाचित उठाव होईल असा संभव आहे. तेव्हा या दोन महत्त्वाच्या भाषणांकडे वाचकांचे विशेष लक्ष वेधावे या हेतूने त्यांचा स्वतंत्र सारांश इथे सादर केला आहे. ही दोन भाषणे मिळून सामाजिक समतेचा व सुधारणाकार्याचा एक आगम-ग्रंथ मानला जाईल अशी त्यांची योग्यता आहे. प्रत्येक सुशिक्षिताने त्यांचे मनन करावे.

कायदा, न्याय यांसंबंधी मूलगामी विचार

त्यांची इतर भाषणे व लेख असेच अतिशय महत्त्वाचे, उद्बोधक व मार्गदर्शक आहेत. 'हिंदू कायद्याची ऐतिहासिक पृष्ठभूमी आणि तात्त्विक बैठक' (खंड १ लेख ४) हा लेख पाश्चात्त्य न्यायतत्त्वमीमांसा आणि भारतीय धर्मशास्त्र या दोहोंमधील गाढ पांडित्याचा निदर्शक आहे. यात त्यांच्या संशोधक बुद्धीचा विलास दृष्टीस पडतो.

खंड २ व ३ यांच्यामधील सर्व भाषणे इंग्रजीतून भाषांतरिलेली आहेत. त्यांच्यापैकी बहुतेक न्यायदानाशी साक्षात संबंध असलेल्या वकील आणि न्यायाधीश यांच्या समुदायासमोर केलेली आहेत. त्यातील विचार कायदा, न्याय आणि न्यायदानव्यवस्था यांच्या संबंधीचे असले तरी ते तात्त्विक आणि व्यापक स्वरूपाचे आहेत. कायद्याच्या तांत्रिक व किचकट बाबी त्यात नाहीत. राष्ट्राच्या प्रगतीच्या व कल्याणाच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व फार असल्यामुळे सामान्य सुशिक्षित वाचकाच्या दृष्टीने देखील ते अतिशय उपयुक्त आहेत. संपूर्ण ग्रंथ वाचकांसमोर आहे; तेव्हा त्यांनी हे मूल्यवान विचार मुळातूनच ग्रहण करावेत.

न्या० गजेंद्रगडकरांनी हे जे विचारधन दिले आहे त्यात दोनतीन सैद्धान्तिक विचार प्रमुख आहेत. पहिला विचार 'आधुनिक लोकशाहीत कायदा व न्याय यांची गतिशील (dynamic) भूमिका,' अशा शब्दांत मांडता येईल. हा विचार मुख्यत्वेकरून खंड २ क्रमांक २,३ आणि खंड ३ क्र. ३ यात सोपपत्तिक रीतीने मांडलेला आढळेल. इतर पुष्कळशा भाषणांमध्ये देखील तो आलेला आहेच, कारण न्यायमूर्तींच्या तत्त्वज्ञानाचा तो अत्यंत व्यापक असा पाया आहे.

ऐहिकतावाद अथवा धर्मनिरपेक्षता

तितक्याच सुंदर रीतीने मांडलेला तितकाच जिव्हाळ्याचा विषय ऐहिकतावाद अथवा धर्मनिरपेक्षता हा होय. सामाजिक आचार, विचार, रूढी इत्यादींचा विचार केवळ ऐहिकतेच्या पातळीवरून केला पाहिजे, धर्माचा त्याच्याशी काही संबंध नाही, हे न्यायमूर्तींनी सामाजिक परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात पूर्वी सांगितलेच होते. ते धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व कायदा, प्रशासन, न्यायदान यांनाही लागू पडणारे आहे. त्याचे स्वरूप खंड २ क्रमांक ४, ५, ६ या भाषणांमध्ये आपल्या मूलगामी आणि मर्मग्राही पद्धतीने न्यायमूर्तींनी स्पष्ट केले आहे. क्र. ४ चे भाषण पाकिस्तानाचे आक्रमण झाल्यानंतर थोड्याच काळात झालेले आहे. त्यात पाकिस्तानाच्या धर्मवेड्या राज्यपद्धती (Theocracy) विरुद्ध भारताची धर्मनिरपेक्ष लोकशाही (Secular democracy) कशी उभी ठाकली आहे याचे ओजस्वी वर्णन केले आहे. पुढील दोन भाषणांमध्ये या विषयाचे सविस्तर युक्तिसिद्ध विवेचन केले आहे. भारताच्या संविधानामध्ये secular किंवा secularism हा शब्द नाही. परंतु धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व संविधानामध्ये

अनुस्यूत असून त्यातील अनेक तरतुदी या तत्त्वाला अनुसरून केल्या आहेत. या सर्व विवेचनात एक फार महत्त्वाचा मुद्दा न्यायमूर्तींनी मांडला आहे. भारतीय संविधान धर्म नाही किंवा नकोच, असे सांगत नाही. भारतीय धर्मनिरपेक्षता धर्माविषयी निःसंशयपणे पूज्यभाव वाळगते. पण धर्माने आपल्या न्याय्य कक्षेतच आपली हालचाल केली पाहिजे असा तिचा कटाक्ष आहे. भारताच्या संविधानाचा हा आशय आहे.

या विषयाशी संबंधित असा अतिशय मोलाचा विचार न्यायमूर्ति अलीकडे आपल्या भाषणातून सांगत असतात, असे वृत्तपत्रांतील वार्तावरून दिसते. तो विचार प्रस्तुत ग्रंथातही दोन ठिकाणी आला आहे (पृ. ४३ व १८५–८६). भारताच्या संविधानात (कलम ४४) भारताच्या सर्व नागरिकांसाठी एकच व्यवहार-विधि-संहिता घडविण्यात येईल असे सांगितले आहे ही गोष्ट अद्यापपर्यंत सिद्धीला गेलेली नाही, इतकेच नव्हे तर त्या बाबतीत काही प्रयत्न केले असल्याचेही दिसत नाही. राष्ट्राने संविधान स्वीकारल्याला सोळा वर्षे होऊन गेली, तरी या बाबतीत काही हालचाल नाही. सर्वधर्मसमानतेचे, परिस्थितीला अनुसरून समाजनियमनात बदल करण्याचे, अशी अनेक उदात्त व उदार तत्त्वे भारतीय संस्कृतीत प्राचीन काळापासून असल्याचे न्यायमूर्तींनी अनेक ठिकाणी उज्ज्वल वर्णन केले आहे. याकरिताच या आपल्या संस्कृतीचा त्यांना दृढ अभिमान आहे. या संस्कृतीला आपली मानून तिच्या वारशाची जपणूक करणाऱ्या समाजाने आधुनिक सुधारणाविचारांस अनुसरून अनेक बंधने कायद्याने आपल्यापुरती लादून घेतली आहेत. हे कायदे चांगले आहेत, म्हणूनच ते भारतातील सर्व धर्मांच्या समाजांना सारखेच लागू करायला पाहिजेत. यात आता विलंब होता उपयोगी नाही. एकतर्फी बंधने लादून या राष्ट्राचा जो कण, जे स्वत्व आहे ते तुलनेने कमजोर बनेल अशी योजना करणे हे किती घातक ठरणार आहे याची नुसती कल्पना करणे देखील भीतिप्रद आहे. न्यायमूर्ति क्रांतदर्शी पुरुष आहेत. ते या गोष्टीचा शांतपणे सर्व बाजूंनी विचार करून भारतातील यच्चयावत् सर्व समाजांच्यासाठी समान विधी, समान बंधने अस्तित्वात आणण्याचे ध्येय सर्व धर्मांच्या बांधवांच्या मदतीने सिद्धीला नेतील तर **संविधानाने अपेक्षिलेली धर्मनिरपेक्षता खरीखुरी अस्तित्वात येईल.** आणि स्वतः न्यायमूर्ति अनंतकाळच्या श्रेयाचे धनी होतील.

अत्यंत महत्त्वाच्या दोनचार तात्त्विक विचारांचा वर विशेष निर्देश केला. वस्तुतः या ग्रंथातील सर्वच लेख-भाषणे विचारपरिप्लुत आहेत. खंड ३ क्र. १, 'कायदा, कायदेपंडित आणि न्यायाधीश' हे एक सर्वोत्कृष्ट भाषण आहे. त्यात न्यायमूर्तींनी आपल्या वकिलीच्या सुरवातीची गोड आठवण हृदयंगम रीतीने सांगितली असून इतर प्रख्यात वकिलांची शब्दचित्रे आपल्या अतिशायी शैलीने वर्णिली आहेत. पुढील तात्त्विक भागही तितकाच हृद्य आहे. त्यातील विचार त्यांचे नेहमीचेच, पण मुंबईतल्या न्यायबांधवांबरोबर बोलत असल्याकारणाने त्यांचे उद्गार आपुलकीच्या भावनेने गोड व लोभस झाल्यासारखे वाटतात. त्यातील प्रांजळपणा अंतःकरणाची पकड

घेतो. खंड ३, क्र. ३ 'लोकशाहीतील न्यायाची दृष्टि' हाही तशाच प्रांजळपणाचा नमुना आहे. न्यायमीमांसा, न्यायदान, विधिविधान याच विषयांवर न्यायमूर्तींचे प्रभुत्व आहे असे नव्हे. खंड ४ मध्ये समाविष्ट केलेली कला, साहित्य, ग्रंथालये या विषयांवरील भाषणे आणि खंड ५ मध्ये दिलेल्या आदरांजली—हे सर्व साहित्य तितकेच भावसंपन्न, मौलिक विचारांनी युक्त आहे.

तेलंग, रानडे, गजेंद्रगडकर

गजेन्द्रगडकरांनी केलेले कार्य आणि दिलेले विचारधन लक्षात घेतले म्हणजे सहजगत्या पूर्वीच्या दोन न्यायमूर्तींचे स्मरण होते : न्या० तेलंग आणि न्या० रानडे. तिघेही देशभक्त, तिघेही सर्वांगीण देशोन्नतीच्या ध्येयाचे उपासक, तिघेही महाबुद्धिमान. पण तिघांच्याही तऱ्हा किती भिन्न ! तुलना करणे असमंजसपणाचे होईल. तसे इथे करायचे नाही.

रानडे-तेलंगांप्रमाणे गजेंद्रगडकरांनीही काळाच्या पुळणीवर आपल्या कर्तबगारीचे खोल ठसे उमटविले आहेत. सामाजिक परिषदेच्या द्वारा सामाजिक सुधारणेचे नेतृत्व त्यांच्याकडे आले होते. पण त्याचा पाठपुरावा झाला नाही. गजेंद्रगडकरांचे कर्तृत्व न्यायाच्या क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात प्रकट झाले आहे. त्यांनी दिलेले निवाडे व निर्णय विधिपांडित्य आणि युक्तिवाद यांच्या बाबतीत आदर्श ठरले असून न्यायदानाच्या कार्याला वळण लावणारे ठरले आहेत. सरकारनेही त्यांच्यापासून प्रेरणा घेतली आहे. आधुनिक लोकशाहीच्या काळात न्यायतत्त्वशास्त्र आणि न्यायदानाचे कार्य गतिशील (dynamic) असले पाहिजे आणि न्यायालयांनी कायद्याला धक्का न लावता सामाजिक–आर्थिक न्यायाच्या दिशेने वाटचाल केली पाहिजे, या त्यांच्या दृष्टिकोणाने कायद्याच्या व न्यायदानाच्या प्रांतात एका नवीन युगाचे प्रवर्तन केले आहे. हे कोणत्याही न्यायाधीशाने केलेले नाही.

'मी धार्मिक माणूस नाही'

'मी धार्मिक माणूस नाही' असे न्यायमूर्ति आपल्या भाषणांमध्ये आवर्जून सांगतात. आपण भजनपूजन, जपजाप्य वगैरे काही करीत नाही या आधारावर धार्मिकतेच्या अपवादातून आपली सुटका करून घ्यावी असा त्यांचा प्रयत्न दिसतो. त्यांचा जन्म श्रेष्ठ ब्राह्मणकुलात, अत्यंत आचारशील घराण्यात झाला. तिथे उपनयन झाल्यानंतर प्रत्येक मुलाला संध्या पूजा वगैरे ब्रह्मकर्म नेमाने करावे लागे. प्रत्येकाची वेगळी संबळी असे, जिच्यात देव ठेवलेले असत. हे नित्यकर्म विद्यार्थिदशेतून बाहेर पडल्यानंतर त्यांनी सोडून दिले आणि मी धर्म पाळीत नाही असे सांगण्यास ते मोकळे झाले. बाह्य आचारातली धार्मिकता त्यांनी टाकली, पण रक्तातली, अंतःकरणातली कुठे जाईल ? धर्म बाह्य आचारात नाही. तो अंतर्यामात आहे. तो जोपासण्यास

मदत व्हावी म्हणून वाह्य आचारांचा उपयोग आहे. त्याचे रक्षण करण्यासाठी ज्याचे मन सदैव जागरूक आहे त्याने बाह्य आचार सोडल्यास काहीच बिघडत नाही. त्यांनी नैतिकतेचा जो आदर्श आचरिला तो धार्मिकतेशिवाय संभवतो काय याचा कोणासही विचार करता येईल. ज्याच्या अंतःकरणात सत्याची ज्योत तेवत आहे आणि मनाच्या दारवंट्यावर संयमाचा पाहरेकरी खडा आहे तो जर धार्मिक नाही तर धार्मिक कोण?

न्यायमूर्ति बुद्धिवादाचे प्रखर पुरस्कर्ते आहेत. पण बुद्धिवादाचा धर्माशी विरोध आहे ही कल्पना चुकीची आहे. प्रखरतम बुद्धिवादाला पचविण्याची शक्ती धर्मात आहे. धर्म शब्दाच्या अर्थाचे स्वतः न्यायमूर्तींनी सविस्तर विवेचन केले आहे (पृ. १६–२५). मोक्षधर्म म्हणजे हिंदूंचे आध्यात्मिक तत्त्वज्ञान फार थोर आहे व त्याच्याविषयी न्यायमूर्तींना आदर आहे. समाजधर्म म्हणजे सामाजिक आचार, नियम, रूढी, इ० परिवर्तनीय आहे; म्हणजे तो बुद्धिवादाचा विषय आहे. प्राचीन स्मृतिकारांनी सुद्धा हे थोड्याशा निराळ्या शब्दात मान्य केले आहे हे न्यायमूर्तींनी दाखवून दिले आहे (पृ.३७, ३८). परमात्मा 'स्थिरचर व्यापुनि दशांगुळे उरला' असा आपला सिद्धान्त आहे. स्थिर आणि चर सृष्टीचा हा जो बुद्धिगम्य पसारा त्यातला बुद्धि हा जो श्रेष्ठ अंश, त्याने सृष्टीच्या पसाऱ्याचे नियमन करावे, त्यातील वर्तननियम ठरवावे हे योग्य आहे, क्रमप्राप्त आहे. बुद्धि हा जर परमात्म्याचा अंश आहे, तर तिने आपले प्राप्त कर्तव्य अधिकतम दक्षतेने करू नये असे खरा धर्म कसे म्हणू शकेल?

पण वरील सिद्धान्तच 'परमात्मा दशांगुळे उरला' असे सांगतो. स्थिरचर, इंद्रियगम्य सृष्टीच्या पलीकडे 'काहीतरी' आहे, ते सत्य आहे, अमृत आहे—ज्याची तृष्णा मानवाला निरंतरची लागली आहे. या 'काहीतरी'ची जाणीव न्यायमूर्तींना आहे; त्याच्या शोधात चिंतनशील प्रतिभेच्या पुरुषाची जी भावनिर्भर अवस्था होते तिचीही पूर्ण कल्पना त्यांना आहे (पृ. १८१–८२). कल्पना आहे इतकेच नव्हे तर त्या भावनिर्भरतेचा अनुभव त्यांना स्वतःला येतो. १९६१ साली गिरीला (तिरुपतीला) जाऊन श्रीवेंकटेशाचे दर्शन त्यांनी घेतले तेव्हा त्या अचिंत्य विश्वात्मक शक्तीचा भास त्यांना झाला व ते भावनम्र झाले. १९६४च्या डिसेंबरात पंढरपुरास त्यांनी श्रीविठ्ठलमूर्तीची सपत्नीक पूजा केली तेव्हा तेथील भावभक्तीच्या सोहळ्यात ते सहजच सद्गदित झाले.

धार्मिकतेचीच वरची पातळी आध्यात्मिकता. आध्यात्मिकतेचे (ज्ञानाचे) पहिलेच लक्षण गीतेत 'अमानित्व' हे सांगितले आहे. अमानित्व म्हणजे मानाची अपेक्षा नसणे एवढेच नव्हे, तर आपल्या लहानपणाची प्रचीती येणे. ज्ञानदेवांनी म्हटले आहे.

तलौटेपण बाणे। आंगीं हीणाओ खेवणें। १३–१९४

'आम्ही न्यायाधीश लहान माणसे आहोत' (पृ. २२५) असे न्यायमूर्ति अनेक भाषणांत आर्जवून सांगत आले. आपला नम्रभाव बहुधा प्रत्येक भाषणातून व्यक्त

केल्याखेरीज त्यांना राहवत नाही. 'न्यायमंदिरात आम्ही पूजा करण्यासाठी जमलो आहोत' (पृ. २२१) असे ते म्हणतात. हे सगळे त्यांचे उद्‌गार काय दर्शवितात? हे उद्‌गार केवळ औपचारिक नाहीत. असे बोलण्याचा शिष्टाचार नाही किंवा भारताच्या प्रधान न्यायमूर्तीने असे विनम्रतेचे उद्‌गार काढावे, अशी अपेक्षाही कुणाची नसते. अर्थात हे उद्‌गार खऱ्या भावनेचे आहेत, अंतःकरणाच्या तळमळीतून निघालेले आहेत. अमानित्व अदंभित्व इत्यादि गुणांनी संपन्न असलेल्या न्यायमूर्तींच्या आध्यात्मिकतेचा मासला पाहायचा असेल तर प्रस्तुत ग्रंथाची २२५ ते २२७ ही पाने पाहावीत. गुरुदेव टागोरांच्या शब्दांत 'पूर्णत्वाला स्पर्शू पाहणारी अविश्रांत साधना', समाजात सत्याची आणि न्यायाची प्रतिष्ठापना व्हावी यासाठी करीत राहणारा हा यात्रिक त्या साधनेचा एक भाग म्हणून मोठ्या घरात गेला होता, तो आता आपल्या घरात परत आला आहे. देशाच्या सध्याच्या अवस्थेत त्याच्या या साधनेची फार आवश्यकता आहे. ही साधना दीर्घकाळ अखंड करीत राहण्याइतके आयुष्य व बळ त्याला लाभो ही ईशचरणी प्रार्थना आहे.

() ()

खंड पहिला

धारणा आणि सुधारणा

अनुक्रम

१ पुरोगामी बुद्धिवादाची प्रतिज्ञा

[महाराष्ट्र सामाजिक परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्षीय भाषण. पुणे, १८ एप्रिल १९५३]

२ सामाजिक क्रांतीचे स्वरूप

[महाराष्ट्र सामाजिक परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्षीय भाषण. जळगाव, ३१ डिसेंबर १९५४]

३ हिंदू कायदा विधेयक

[कर्नाटक विद्यापीठापुढे दिलेली दोन व्याख्याने. धारवाड, डिसेंबर १९५१. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

४ हिंदू कायद्याची ऐतिहासिक पृष्ठभूमी आणि तात्त्विक बैठक

[कलकत्त्याच्या Ramakrishna Mission Institute of Culture या संस्थेने प्रकाशित केलेल्या Cultural Heritage of India या ग्रंथमालेच्या दुसऱ्या खंडात प्रसिद्ध झालेला निबंध. फेब्रुवारी १९६३. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

५ सामाजिक सुधारणेचे एक शतक

[श्री. एस. नटराजन यांच्या A Century of Social Reform in India या पुस्तकाला लिहिलेली प्रस्तावना. २१ मे १९५९. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

६ नव महाराष्ट्रापुढील काही प्रश्न

[सांस्कृतिक स्वातंत्र्य संघाची भारतीय समिती आणि साधना साप्ताहिक यांच्या तर्फे झालेल्या परिसंवादाचे अध्यक्षीय भाषण. मुंबई, १३ मे १९६०. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

ठाणे जिल्हा ग्रंथालय संघ
ठाणे
Cl. No. 9 (1948)

पुरोगामी बुद्धिवादाची प्रतिज्ञा

गुरुवर्य आण्णासाहेब कर्वे, स्वागताध्यक्ष श्री. जगताप व भगिनी-बांधवहो !

स्वातंत्र्याचे युग सुरू झाल्यानंतर केवळ सामाजिक सुधारणांच्या प्रश्नांचा विचार करण्याकरिता महाराष्ट्रात भरलेली ही आजची पहिलीच परिषद आहे. आजच्या सार्वजनिक जीवनात सामाजिक सुधारणेच्या प्रश्नांचे महत्त्व फार मोठे असल्यामुळे या परिषदेला अतिशय जबाबदारीचे कार्य अंगावर घ्यावयाचे आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे आजच्या परिषदेचे अध्यक्षस्थान स्वीकारताना माझे मन साहजिकच फार साशंक झाले आहे. या परिषदेचे अध्यक्षस्थान मी स्वीकारावे अशी मला श्री. गोडबोले यांनी विनंती केल्याबरोबर मी प्रथम नकार दिला होता. कारण या परिषदेच्या ध्येयाशी मी सर्वस्वी सहमत असलो तरी या परिषदेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याची माझी पात्रता नाही याची मला पूर्ण जाणीव होती व आहे. पण गुरुवर्य अण्णासाहेब कर्वे व डॉ. परांजपे यांनी मी अध्यक्षस्थान स्वीकारावेच असा आग्रहाचा आदेश दिल्यामुळे त्यांच्या आदेशाची अवज्ञा होऊ नये म्हणूनच थोडाफार माझ्या इच्छेविरुद्ध मी हा मान स्वीकारला आहे. हा मान स्वीकारताना मला आणखी एका गोष्टीचाही विचार करणे जरूर होते आणि ती गोष्ट म्हणजे मी न्यायाधीश असल्यामुळे माझ्या सार्वजनिक जीवनावर जी नियंत्रणे आपोआप पडतात त्या नियंत्रणांच्या दृष्टीने मी आजच्या परिषदेचे अध्यक्षस्थान स्वीकारणे योग्य होईल की नाही हा प्रश्न होय. आपल्या देशात लोकशाहीचे युग नुकतेच सुरू झाले असल्यामुळे महत्त्वाच्या सार्वजनिक पदावर असलेल्या सर्व व्यक्तींनी आपले सार्वजनिक जीवन लोकशाहीच्या संकेतांशी असंबद्ध होऊ देऊ नये याबद्दल अतिशय काळजी घेतली पाहिजे असे मला वाटते. लोकशाहीच्या राजवटीमध्ये असा एक संकेत असतो की, न्यायाधीशांनी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम..... क्रि: .....

राजकारणातील प्रश्नांवर व जे विषय न्यायालयात निवाड्याकरिता येण्याचा संभव असेल अशा इतर कोणत्याही मतभेदाच्या विषयांवर प्रकट वक्तव्य करू नये. लोकशाहीची प्रगती योग्य रीतीने व्हावी म्हणून अशा तऱ्हेचे सर्व इष्ट संकेत न्यायाधीशांनी अवश्य पाळावेत अशा मताचा मी असल्यामुळे आजच्या आपल्या परिषदेपुढे येणाऱ्या मतभेदाच्या प्रश्नांवर मी मत व्यक्त करणे कितपत योग्य होईल ह्याचा विचार करणे मला जरूर होते. तो विचार करताना मला असे वाटले की, न्यायाधीशांनी शैक्षणिक, वाङ्मयीन, सांस्कृतिक व सामाजिक चळवळींमध्ये भाग घेण्यास कोठलाच प्रत्यवाय असू नये. न्यायाधीशपदावर चढलेले नागरिक हे न्यायाधीश झाल्यानंतरसुद्धा नागरिक म्हणून त्यांची जी कर्तव्ये असतात ती पार पाडण्यास अपात्र होतात असे मला वाटत नाही. ज्या ज्या चळवळींमुळे राष्ट्राचे सांस्कृतिक, शैक्षणिक किंवा सामाजिक जीवन जास्त प्रगतिपर व संपन्न होईल अशा चळवळींमध्ये आपल्या पात्रतेप्रमाणे व आवडीप्रमाणे न्यायाधीशाने अवश्य भाग घ्यावा असे मला वाटते. ब्रिटिशांच्या राजवटीमध्ये सुद्धा सामाजिक व सांस्कृतिक चळवळींमध्ये पुढाकार घेण्याची उज्ज्वल परंपरा तत्कालीन न्यायाधीशांनी सुरू केली होती ही गोष्ट आपणास माहीत आहेच. उदाहरणार्थ, न्यायमूर्ती रानडे व न्यायमूर्ती तेलंग यांनी केलेल्या सर्वांगीण बौद्धिक चळवळींचे विस्मरण महाराष्ट्रात तरी कोणाला होणे शक्य नाही. रानडे आणि तेलंग यांची योग्यता किती असामान्य होती याची प्रत्यक्ष जाणीव न्यायाधीशाचे काम करीत असणाऱ्या माझ्यासारख्या माणसास साहजिकच विशेष रीतीने पटते. त्यामुळे त्यांची योग्यता व त्यांचा दर्जा मिळविणे सर्वस्वी अशक्य आहे हे समजून सुद्धा त्यांनी प्रचलित केलेल्या उज्ज्वल परंपरेचा एक सामान्य अनुयायी म्हणून मी आजच्या सभेच्या कामात भाग घेण्यास प्रवृत्त झालो आहे. माझ्या भाषणात नवीन असे काही असणार नाही; उलट सामाजिक सुधारणेच्या प्रश्नांवर आजपर्यंत जे विचार अनेक विद्वान सुधारकांनी व्यक्त केले आहेत त्यांचाच पुनरुच्चार मी माझ्या भाषणात करीत असेन. त्या बाबतीत 'संतांचीं उच्छिष्टें बोलतों उत्तरें, काय म्यां पामरें जाणावें हें' अशी माझी स्थिती आहे. म्हणून मला महत्त्वाच्या वाटणाऱ्या विषयांवर मी जे माझे विचार व्यक्त करणार आहे ते सर्वस्वी बरोबर आहेत व त्यांचा आपण स्वीकार करावाच असा माझा मुळीच आग्रह नाही. मात्र त्या विचारांवर आपण चिकित्सक बुद्धीने चर्चा करून आपले जे सामुदायिक निर्णय ठरतील त्या निर्णयांमुळे महाराष्ट्राला योग्य ते मार्गदर्शन व्हावे अशी माझी आशा आहे.

सामाजिक सुधारणेच्या चळवळीचा ओझरता आढावा

आजच्या प्रसंगी आजपर्यंत महाराष्ट्रात झालेल्या सामाजिक सुधारणेच्या चळवळींचा ओझरता आढावा घेतल्यास असे दिसून येईल की, दुर्दैवाने सामाजिक

सुधारणेच्या चळवळींला उपहासगर्भ उपेक्षेचा शाप बाधलेला आहे. ब्रिटिशांच्या राजवटीमध्ये सर्व तेजस्वी तरुणांना पारतंत्र्याचे शल्य बोचल्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीकडे महाराष्ट्रीय जनता साहजिकच मोठ्या आदराने पाहू लागली. ज्या वेळेस स्वराज्य हा शब्द तोंडातून काढणे सुद्धा साहसाचे समजले जाई अशा वेळेस राजकीय चळवळीचे आंदोलन उत्पन्न करून सर्व जनतेला स्वराज्याच्या चळवळीकडे ओढण्याची कामगिरी ज्या महान देशभक्तांनी केली त्यांचा यथायोग्य गौरव इतिहास निःसंशय करीलच. राजकीय स्वातंत्र्यावर सर्व लक्ष केंद्रित करणाऱ्या या चळवळीचे मुख्य ब्रीद असे होते की, ब्रिटिश राजवटीविरुद्ध असंतोष निर्माण करून स्वातंत्र्यप्राप्तीकरिता जरूर ते क्लेश सोसण्याची व त्याग करण्याची जनतेची तयारी करावयाची. ही तयारी करताना सामान्य जनतेचा बुद्धिभेद होऊ नये म्हणून समाजसुधारणेचा प्रश्न हाताळण्याचे धोरण या प्रवृत्तीला मानवले नाही. केवळ राजकीय चळवळीवरच जोर देणे तत्कालीन परिस्थितीत कदाचित अपरिहार्य असेल, काहींच्या मते ते इष्ट व आवश्यकही असेल. ही चळवळ करताना ब्रिटिशांच्या राजवटीवर, राजनीतीवर, किंबहुना सामाजिक चालीरीतींवरसुद्धा प्रखर हल्ला करण्याच्या साधनांचा या प्रवृत्तीने साहजिकच भरपूर उपयोग केला. उलट पक्षी आपले स्वराज्य नष्ट होण्याचे कारण आपल्या सामाजिक चालीरीती असाव्यात असे अनुमान करून आपल्या सामाजिक चालीरीतींची सुधारणा करणे प्रथम जरूर आहे अशा प्रवृत्तीचे लोकही त्या सुमारास महाराष्ट्रात निर्माण झाले. या प्रवृत्तीच्या समाजसेवकांनी राजकीय पारतंत्र्यामुळे उत्पन्न होणाऱ्या असंतोषाकडे फारसे लक्ष पुरविले नाही. त्यांनी आपले लक्ष समाजसुधारणेच्या प्रश्नांवर केंद्रीभूत केले. त्यामुळे तत्कालीन महाराष्ट्रीय पुढाऱ्यांच्या दोन भिन्न मतप्रणाली प्रचारात आल्या. राजकीय चळवळीमध्ये जहाल असणारे देशसेवक सामाजिक सुधारणांबद्दल सर्वसामान्यपणे उदासीन किंबहुना प्रसंगविशेषी विरोधी झाले. उलट समाजसुधारणेबद्दल अट्टाहासाने स्वार्थत्यागपूर्वक प्रचार करणारे समाजसेवक राजकीय चळवळीबद्दल तसेच उदासीन किंवहुना विरोधकही झाले. **त्यामुळे राजकारणातील जहाल हे समाजकारणात मवाळ व समाजकारणातील जहाल हे राजकारणातील मवाळ असे दृश्य महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात दिसू लागले.** तत्कालीन सार्वजनिक जीवनात दिसणाऱ्या या विरोधाला एक आगरकरांचाच वंदनीय असा अपवाद दिसून आला. आगरकर राजकीय पारतंत्र्याविरुद्ध जितक्या कठोरपणे व तर्ककर्कश रीतीने झगडले तितक्याच कठोरपणे व तर्ककर्कश रीतीने त्यांची लेखणी सामाजिक अन्यायाविरुद्ध सुद्धा झगडली. परंतु आगरकरांची विचारसरणी त्यांच्या एकट्यापुरतीच मर्यादित राहिली व त्यांची परंपरा त्यांच्या निधनानंतर लुप्त झाली. त्याचा परिणाम साहजिकच असा झाला की, सर्व समाज राजकीय झगड्याकडे आदराने पाहू लागला व सामाजिक चळवळीबद्दल समाजाला अनास्था वाटू लागली. सामाजिक चळवळ

करणारे लोक विशेषसे देशप्रेमी नाहीत व त्यांचे समाज सुधारण्याचे विचार बव्हंशी परकीय राजकर्त्यांचे अंध अनुकरण करण्याच्या प्रवृत्तीतून उत्पन्न झाले आहेत अशी कल्पना समाजात रूढ व प्रबल होऊ लागली. आज आपण या घटनेचा व्यक्तिनिरपेक्ष दृष्टीने विचार करीत असताना कोणत्याच प्रवृत्तीबद्दल अगर परंपरेबद्दल अनुदारपणे बोलण्याचे मुळीच प्रयोजन नाही. दोन्ही प्रवृत्तींची उपपत्ती समजून घेणे फारसे कठीण नाही. दोन्ही परंपरांमध्ये प्रामाणिक, त्यागी व विचारी असे लोक होते. पण या दोन प्रवृत्तींच्या झगड्यामुळे महाराष्ट्रातील सार्वजनिक जीवनात त्या वेळी बराचसा कडवटपणा आला ही गोष्ट नाकारता येणे शक्य नाही व त्या कडवटपणाचे प्रायश्चित्त विशेषतः समाजसुधारकांना भोगावे लागले. त्यांचा अनेक प्रसंगी समाजात उपहास झाला आणि त्यांच्या चळवळीमागे सुद्धा एक ध्येयवादित्व आहे या गोष्टीबद्दल समाजास व्हावे तसे व तितके ज्ञान होऊ शकले नाही. राजकीय चळवळ जसजशी जास्त प्रभावी होऊ लागली तसतशी सामाजिक सुधारणेबद्दलची उपेक्षावृत्ती साहजिकच वाढू लागली. टिळकयुगामध्ये सामाजिक आधी की राजकीय आधी याबद्दल मोठा धडाक्याने वादविवाद झाला. पण टिळकयुगानंतर सुरू झालेल्या गांधीयुगामध्ये समाजसुधारणेचा आवाज जवळजवळ शांतच झाला. त्याचे कारण राजकीय झगड्याला फार तीव्र स्वरूप त्या वेळी आले असल्यामुळे अखिल राष्ट्राचे लक्ष त्या झगड्याकडे लागले व सर्व जनता राजकीय स्वातंत्र्याची मोठ्या उत्सुकतेने वाट पाहू लागली. व्यक्तिशः गांधीजींनी अस्पृश्यतानिवारणाबद्दल मात्र आत्यंतिक आग्रह धरून त्या प्रश्नाला फार मोठ्या प्रमाणात चालना दिली. पण गांधीयुगामध्ये अस्पृश्यतानिवारणाबद्दल जितकी आस्था समाजात निर्माण करण्यात आली तितकी आस्था इतर सामाजिक प्रश्नांबद्दल निर्माण करण्याची जरुरी राजकीय झगड्यामध्ये गुंतलेल्या देशभक्तांना वाटली नाही. त्याबद्दल त्यांना दोष देणे सर्वस्वी असमंजसपणाचे होईल. कारण त्या वेळी राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याकरिता अनेक दिव्ये करण्यास तयार झालेल्या देशभक्तांना साहजिकच इतर प्रश्नांकडे लक्ष देण्यास सवड होणे शक्य नव्हते. राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याकरिता गांधीजींच्या अलौकिक नेतृत्वाखाली जो लढा सर्व देशभक्तांनी प्राणपणाने लढविला त्याबद्दल स्वतंत्र भारत त्या सर्वांचा सदैव ऋणी राहील ही गोष्ट मोठ्या अभिमानाने कबूल करणे जरूर आहे. पण या घटनेचा आनुषंगिक परिणाम असा झाला की, सामाजिक सुधारणा करण्याकरिता ज्या चिकित्सक बुद्धिवादाची प्रगती होणे आवश्यक होते तो बुद्धिवाद फारच पंगू झाला, किंबहुना केवळ सामाजिक सुधारणेच्या प्रश्नांची सर्वांगीण व बौद्धिक चर्चा करण्याची परंपरा जवळजवळ लुप्त झाल्याचे दृश्य दिसू लागले. त्यामुळे समाजसुधारणेचा विचार करण्याकरिता आज आपण येथे जमलो असताना साहजिकच आपणा सर्वांच्या मनात ही कल्पना आली असेल की, सामाजिक सुधारणेच्या चळवळीला कोणत्या का कारणाने असेना पण समाजाच्या उपेक्षेचा शाप बाधलेला आहे.

मला स्वतःला कित्येक वेळा असे वाटते की, महाराष्ट्रातील स्वाभिमान व स्वदेशाभिमान जागृत करण्याचे महनीय कार्य ज्या चिपळूणकरांनी आपल्या तेजस्वी लेखणीने केले त्यांनाच जर दयानंद सरस्वती किंवा ज्योतिबा फुले यांच्या विचारसरणीमागे असलेल्या ध्येयवादित्वाबद्दल थोडीशी सहानुभूती व आस्था वाटली असती किंवा टिळक व आगरकर हे प्रतिस्पर्धी न होता जर सहकारी झाले असते व त्यांच्या संयुक्त पुढारीपणाखाली राजकीय व सामाजिक जागृती व चळवळ सारख्या धडाडीने महाराष्ट्रामध्ये झाली असती तर कदाचित महाराष्ट्राचा किंबहुना अखंड भारताचा इतिहास निराळा झाला असता व राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुद्धा सामाजिक प्रगतीचे गाडे जे आज अडल्यासारखे किंवा रुतल्यासारखे दिसते ते तसे दिसले नसते.

सामाजिक की आर्थिक ?

आज सुद्धा सामाजिक सुधारणेबद्दल समाजातील बुद्धिमान व सुशिक्षित लोकांना विशेष आस्था अगर उत्साह वाटत नाही ही गोष्ट आपण दृष्टीआड करून चालणार नाही. पूर्वीच्या युगात सामाजिक सुधारणेची उपेक्षा करणारे लोक जसे राजकीय चळवळीचे महत्त्व वर्णन करीत असत, तसेच आज सामाजिक सुधारणेविरुद्ध आर्थिक सुधारणेचे महत्त्व वर्णन करण्यात येते. अनेक समाजसेवकांना असे वाटते की, सामाजिक विषमतेचे शल्य दूर करण्याचा एकच मार्ग असून, आर्थिक विषमता नष्ट करणे हाच तो मार्ग होय. आधी सामाजिक की आधी राजकीय, तसेच आधी आर्थिक की आधी सामाजिक, अशांसारख्या विवाद्य प्रश्नांवर विचार किंवा चर्चा करताना सर्व सुधारकांनी प्रतिस्पर्ध्याबद्दल अनादराची भाषा केव्हाही वापरू नये, तसेच प्रतिस्पर्ध्यांच्या प्रामाणिकपणाबद्दलही संशय घेऊ नये असे माझे आग्रहाचे म्हणणे आहे. सार्वजनिक प्रश्नांवर होणाऱ्या मतभेदांबद्दल शास्त्रोक्त चर्चा करण्याचा आदर्श गांधीजींच्या लेखनामध्ये आपल्याला दिसतो. त्याचा आपण अवश्य अवलंब केला पाहिजे. चर्चा व विवेचन ही नेहमी व्यक्तिनिरपेक्ष असली पाहिजेत. चर्चा व विवेचन करताना समतोल बुद्धीने दोन्ही बाजूंबद्दल काय म्हणता येईल याचा अवश्य विचार केला गेला पाहिजे. ही चर्चा करताना व्यक्तिनिष्ठा व शब्दप्रामाण्य यांना मुळीच थारा देता कामा नये. सर्व प्रश्नांबद्दल सांगोपांग रीतीने, शास्त्रीय दृष्टीचा अवलंब करून व सर्वांगीण अभ्यास करून निर्णय घेणे समाजसेवकांचे कर्तव्य आहे. म्हणून समाजसुधारणेकडे कधी उपहासाने व पुष्कळ वेळा उपेक्षेने पाहणाऱ्या आर्थिक सुधारणावाद्यांच्या विचारप्रणालीमध्ये कितपत तथ्य आहे याचाही आपण अवश्य विचार केला पाहिजे. आर्थिक समता जेव्हा स्थापन होईल तेव्हा सामाजिक सुधारणेचा प्रश्न सोडविणे पुष्कळ सोपे जाईल ही गोष्ट नाकारण्यात अर्थ नाही. काही काही सामाजिक प्रश्न आर्थिक समतेशिवाय सोडविणे फार कठीण जाईल ही गोष्टसुद्धा

कबूल केली पाहिजे. आजच्या सुधारणेचा अत्यंत जिव्हाळ्याचा जो अस्पृश्यता-निवारणाचा प्रश्न आहे तो सोडविण्यास हरिजनांची आर्थिक उन्नती केल्यामुळे अमोलिक साहाय्य होईल ही गोष्ट उघड आहे. पण हिंदु समाजामधील जन्मजात सामाजिक विषमतेचे जे स्वरूप अद्यापि दिसते त्या स्वरूपाबद्दल योग्य कल्पना असणाऱ्या सर्व सुधारकांना ही गोष्ट पटणे कठीण जाणार नाही की, केवळ आर्थिक **उन्नतीमुळेच सामाजिक विषमतेचा प्रश्न सुटणार नाही.** स्वराज्य मिळण्यापूर्वी जशी आपणा सर्वांची प्रामाणिक समजूत होती की, स्वराज्य मिळाल्याबरोबर देशाचे सर्व सामाजिक व आर्थिक प्रश्न आपोआप सुटतील तशीच स्वराज्य मिळाल्यानंतर आज आपणांपैकी पुष्कळांची अशी समजूत आहे की, आर्थिक प्रश्न सुटल्याबरोबर सामाजिक प्रश्न आपोआप निकालात निघतील. राजकीय स्वातंत्र्याचे महत्त्व अर्थातच फार मोठे आहे. राजकीय स्वातंत्र्य नसल्यास सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविणे तितके सोपे नसते ही गोष्टही सत्य आहे. पण राजकीय स्वातंत्र्यामुळेच केवळ सर्व प्रश्न सुटतील ही कल्पना भ्रांतिमूलक असल्याचे आता सर्व जनतेला पटून चुकले आहे. राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जे अनेक सामाजिक व आर्थिक प्रश्न आज समाजापुढे उभे आहेत त्यांवरूनच ही गोष्ट सिद्ध झाली आहे की, राजकीय स्वातंत्र्य हे सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविण्याचे महत्त्वाचे साधन असले तरी ते साधनच आहे, त्या अर्थाने साध्य नाही. राजकीय समता प्रस्थापित केल्यामुळे समाज-कल्याणाच्या मार्गातील एक महत्त्वाची पायरी आपण गाठली हे खरे. पण सामाजिक व आर्थिक समतेशिवाय राजकीय समतेचे महत्त्व सामान्य जनतेला पटणे शक्य नाही ही गोष्ट आता आपणा सर्वांना कळून चुकली आहे. जी गोष्ट राजकीय समतेची तीच थोड्याफार अंशाने आर्थिक समतेची आहे असे मला वाटते. आर्थिक विषमतेमुळे उत्पन्न होणारी शल्ये गरीब व दीन जनतेला किती व कशी तीव्रपणे बोचतात याची जाणीव झाल्यामुळेच आर्थिक विषमता नष्ट करण्याबद्दल आज साहजिकच मोठ्या जोराने चळवळ सुरू आहे. आर्थिक विषमता नष्ट करून शक्य तितके आर्थिक समतेचे राज्य समाजजीवनात प्रस्थापित करण्याचे कार्य सर्व समाजसेवक आज करण्यास झटत आहेत. पण हे कार्य करीत असतानाच सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या कार्याचे महत्त्व आपण विसरून चालणार नाही. सामाजिक समता प्रस्थापित केल्यामुळे आर्थिक विषमता दूर करणे थोडे सोपे जाईल व सामाजिक समता प्रस्थापित केल्यामुळे आर्थिक समता जास्त सार्थ व सर्वांगीण होईल असे मला वाटते. म्हणूनच आर्थिक विषमता नष्ट करण्याच्या प्रयत्नांबद्दल निष्ठा व आदर बाळगणाऱ्या सर्व समाजसेवकांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांबद्दल सुद्धा उदासीन राहू नये अशी माझी सर्व समाजसेवकांना आग्रहाची विनंती आहे. उद्याच्या महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक व आर्थिक समतेचे राज्य सुरू होऊन सर्व महाराष्ट्रीय समाज एकजिनसी व खऱ्याखुऱ्या

बंधुभावाच्या सौहार्दाने प्रेरित असा निर्माण व्हावा हे मनोहर व स्फूर्तिदायक चित्र डोळ्यांपुढे वागवणाऱ्या सर्व समाजप्रेमी लोकांनी समाजसुधारणेच्या कार्याला यथाशक्ती हातभार लावावा अशी माझी विनंती आहे. खऱ्या कळकळीच्या समाजसेवकाला आर्थिक व सामाजिक असा कप्पेवजा भेद करणे पुष्कळ वेळेला अशक्य होईल. म्हणून समाजसुधारणेच्या या दोन्ही स्वरूपांचा समन्वय करून आर्थिक व सामाजिक समता स्थापण्याचे ध्येय आपण आपल्यासमोर नेहमी जागृत ठेविले पाहिजे.

ऐहिकतावाद (सेक्युलॅरिझम) व समाजसुधारणा

विशेषेकरून हिंदू समाजाची सुधारणा करण्याकरिता भरलेल्या आजच्या परिषदेवर सेक्युलॅरिझमच्या नावाने आक्षेप घेतला जाण्याचा संभव आहे. पण अशा तऱ्हेचा आक्षेप सर्वस्वी निराधार आहे ही गोष्ट सर्व विचारवंत लोक सहजच मान्य करतील. सेक्युलॅरिझम हे स्वतंत्र भारताने मान्य केलेले व अंगीकारलेले अत्यंत उदात्त असे तत्त्व आहे, पण या तत्त्वाबद्दल कधी कधी अतिव्याप्त व विपरीत अशा कल्पना उच्चारलेल्या आढळतात. राष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात ज्ञाती, धर्म किंवा लिंग यांना मुळीच स्थान न देता सर्व नागरिक सामाजिक, राजकीय व आर्थिक दृष्ट्या समान आहेत ही प्रतिज्ञा आपण सर्वांनी केलेली आहे. आपण सर्व जाणताच की, आपल्या राष्ट्राने ज्ञातिविहीन व वर्गविहीन (casteless and classless) समाज करण्याचे महनीय व उदात्त ध्येय आपल्यापुढे ठेविले आहे. ते ध्येय साधण्याकरिता आपण सेक्युलॅरिझम या महत्त्वाच्या तत्त्वाचा कधीही विसर पडू देता कामा नये. हे तत्त्व आपण सर्वांनी आपल्या वैयक्तिक व सार्वजनिक जीवनात तंतोतंत, प्रामाणिकपणे व निष्ठापूर्वक अमलात आणले पाहिजे. पण हे तत्त्व अमलात आणताना व आताच सांगितलेले महनीय ध्येय साधण्याचा प्रयत्न करीत असताना आजच्या समाजात जे भिन्न भिन्न वर्ग व ज्या भिन्न भिन्न जाती आहेत त्या नष्ट करण्याचा प्रयत्न करणे साहजिकच क्रमप्राप्त आहे. भिन्न वर्ग व भिन्न जाती आस्तित्वात नाहीत अशी नुसती रम्य कल्पना मनाशी बाळगून हा प्रश्न सुटणार नाही. आर्थिक विषमता नष्ट करून भिन्न आर्थिक थरांवर व पातळींवर असलेल्या भिन्न भिन्न वर्गांचे शक्य तोवर एकाच वर्गात रूपांतर करण्याचा प्रयत्न जसा आज केला जात आहे, तसाच भिन्न भिन्न जातींचे एकाच समान जातीमध्ये, समानतेच्या आधारावर अधिष्ठित असलेल्या एकाच जातीमध्ये, रूपांतर करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे व तसा प्रयत्न करण्याच्या बुद्धीनेच आज आपण ही परिषद भरवीत आहोत. म्हणून हिंदू समाजात अस्तित्वात असलेल्या अनेक जातींचे एकीकरण करण्याच्या उद्देशाने भरलेल्या आजच्या या परिषदेवर सेक्युलॅरिझमच्या नावाने कोणी आक्षेप घेतल्यास तो सर्वस्वी अप्रयोजकपणाचा आहे असे मला वाटते.

आज खरोखर सामाजिक परिषदेची आवश्यकता आहे काय ?

आजच्या सामाजिक परिषदेवर आणखी जो एक आक्षेप घेतला जाण्याचा संभव आहे त्याचाही विचार करणे जरूर आहे. पुष्कळ हिंदूंना असे वाटते की, लोकशाहीमध्ये कायद्याच्या सामर्थ्यावर समाजसुधारणेचा प्रश्न बव्हंशी सोडविला गेला असल्यामुळे आता त्याबद्दल परिषदेच्या द्वारा चळवळ करण्याची जरूरी नाही. उदाहरणार्थ, द्विभार्याप्रतिबंध, किंवा विशिष्ट कारणासाठी विवाहविच्छेदनाला कायद्याने दिलेली परवानगी, तसेच अस्पृश्यतानिवारणाबद्दल केलेला कडक कायदा या व इतर कायद्यांवरून सामाजिक सुधारणेचे प्रश्न जवळजवळ सुटले असल्यामुळे ही परिषद भरविण्याची उठाठेव का करता असा आक्षेप काही लोक घेतील. लोकशाहीमध्ये कायद्याला समाजसुधारणेच्या कार्यात महत्त्वाची कामगिरी करावयाची असते ही गोष्ट उघड आहे. ब्रिटिशांच्या राजवटीत सामाजिक सुधारणेच्या बाबतीत कायदा करण्यास तत्कालीन सरकार प्रतिकूल असे. परकीय राजवटीमध्ये प्रजाजनांच्या मनात नेहमी साहजिकच असंतोष धुमसत असतो व त्या असंतोषात भर टाकणारी कोणतीही गोष्ट करण्यास परकीय सरकार स्वार्थबुद्धीने तयार असत नाही. त्यामुळे सामाजिक चालीरीती व वैयक्तिक धार्मिक कल्पना यांमध्ये ढवळाढवळ न करण्याचे व्रत ब्रिटिश सरकारने प्रथमपासून शेवटपर्यंत आचरण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट आपण जाणताच. लोकशाहीचे राज्य सुरू झाल्यानंतर मात्र ही प्रवृत्ती अस्तित्वात असणे अशक्य आहे. ही गोष्ट खरी की, पूर्वीच्या जमान्यात वैयक्तिक आचार व विचार यांना नियंत्रण घालणारे कायदे करण्यास सरकार धजत नसे. पण लोकशाहीने लोककल्याणाचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवल्यानंतर निरनिराळ्या विषयांवर कायदे करणे लोकशाहीला क्रमप्राप्तच आहे. लोककल्याण साधण्याकरिता समाजात जी सामाजिक व आर्थिक विमनता दिसते तिचा बीमोड करून समतेचे राज्य स्थापन करण्याच्या कामी लोकशाहीला कायद्याचा आधार घेणे अपरिहार्य आहे व म्हणून सामाजिक सुधारणेला कायद्याची मदत होईल व होत आहे ही गोष्ट मान्य केली पाहिजे. **पण केवळ कायद्याने समाजसुधारणेचे कार्य संपूर्णपणे यशस्वी होईल हा समज भ्रांतिमूलक आहे.** समाजसुधारणा व कायदा या विषयावर विचार करताना आपल्याला दोन तऱ्हेची चळवळ करावी लागेल. कित्येक वेळा लोकशाहीने केलेले कायदे हे सामाजिक चालीरीती व विश्वास यांच्या फार पुढे धाव घेत असतात. याचे उदाहरण अस्पृश्यतेच्या कायद्यात आपल्याला दिसून येईल. लोकशाहीने अस्पृश्यतानिवारण करण्याकरिता जरी कडक अशा स्वरूपाचा कायदा पास केला आहे, किंबहुना अस्पृश्यतानिवारण हे आपल्या स्वातंत्र्ययुगातील एक महत्त्वाचे ब्रीदच जरी समजले गेले आहे, तरी प्रत्यक्ष सामाजिक जीवनात अस्पृश्यता सर्वस्वी नष्ट झाली आहे असे समजणे स्वप्नाळूपणाचे

होईल. आजही खेड्यात व काही ठिकाणी मोठ्या गावात सुद्धा अस्पृश्यतेचे उच्चाटन न झाल्याचे आपल्या दृष्टोत्पत्तीस येते. तेव्हा लोकशाहीने केलेल्या कायद्याचे तत्त्व समाजाला पटविण्याचे कार्य समाजसुधारकांना करावे लागते. कायदा पुढे धावणारा व सामाजिक प्रवृत्ती मागेच रेंगाळणाऱ्या असल्या तर अशा परिस्थितीत समाज-सुधारकांनी कायदा व लोकसमजुती यांच्यातील अंतर व भेद कमी करण्याकरिता सामाजिक चळवळ करणे आवश्यक असते. समाजातील चुकीच्या समजुती अशा चळवळीने दूर सारल्या गेल्या म्हणजेच कायद्याने योजिलेले समाजसुधारणेचे कार्य यशस्वी होईल. या उलट कधीकधी सामाजिक समजुती व रीतिरिवाज हे पुरोगामी तर कायद्यातील कलमे ही प्रतिगामी असल्याचे दिसते. उदाहरणार्थ, हिंदू कायद्या-तील कित्येक विषयांवर सामाजिक चालीरीती आज पुष्कळ पुढारलेल्या व सुधारलेल्या असून सुद्धा जुन्याच समजुतीवर आधारलेल्या व सर्वस्वी प्रतिगामी स्वरूपाच्या असलेल्या हिंदू कायद्यातील कलमांचा अंमल अद्यापि सुरू आहे. अशा बाबतीत सामाजिक चालीरीती व विश्वास आणि कायद्यातील कलमे यांच्यामध्ये दिसून येणारे अंतर नष्ट करण्याकरिता सामाजिक चालीरीतींना अनुसरून व **आधुनिक समाजाच्या धारणेला पोषक असे** फरक कायद्यात घडवून आणणे जरूर असते. त्या दृष्टीने अशा तऱ्हेचे कायदे पास करण्यास अनुकूल असे वातावरण निर्माण करण्याचे कार्य समाजसुधारकांना करावे लागते. म्हणूनच केवळ कायद्याने सामाजिक सुधारणा होईल असा विश्वास मनाशी बाळगून समाजिक चळवळीला विरोध करणे तर्कशुद्ध नाही असे मला वाटते.

दुसरा एक आक्षेप अशा स्वरूपाचा घेण्यात येईल की, सामाजिक सुधारणेचा प्रश्न आता उरलेला नसल्यामुळे आजच्यासारख्या परिषदेची विशेष जरूर नाही. पूर्वी सामाजिक परिषदा भरत असत तेव्हा प्रामुख्याने ज्या प्रश्नांचा समाजसुधारक विचार करीत त्यांपैकी बरेचसे प्रश्न आता निकाली निघाले आहेत ही गोष्ट खरी आहे. उदाहरणार्थ, विधवाविवाह, समुद्रपर्यटन व स्त्रीशिक्षण या विषयांवर जुन्या काळी झालेल्या चर्चा आज पुनः उकरून काढण्याचे काही प्रयोजन नाही. पण समाजाची धारणा व प्रगती ही गतिमान व पुरोगामी स्वरूपाची असल्यामुळे कालचे सामाजिक प्रश्न जरी सर्व आज विद्यमान नसले तरी नवीन सामाजिक प्रश्न सामाजिक कार्यकर्त्यांपुढे उभे आहेतच आणि त्या सामाजिक प्रश्नांची चर्चा करून समाजाला योग्य ते मार्गदर्शन करण्याची जबाबदारी आजच्यासारख्या परिषदेने निःसंशय अंगावर घेतली पाहिजे. आधुनिक लोकशाहीने लोककल्याणाचे कंकण हातात बांधले असल्यामुळे लोककल्याण साधण्याकरिता लोकशाहीला सतत झगडावे लागते ही गोष्ट सर्वांच्या परिचयाची आहे. लोककल्याणाचे क्षेत्र किती व्यापक व विस्तृत आहे याचे दिग्दर्शन इंग्लंडमध्ये नेमलेल्या बीव्हरिज कमिटीच्या रिपोर्टामध्ये थोडक्यात मोठ्या मार्मिकपणे केले आहे. त्या रिपोर्टात असे म्हटले आहे की, लोकशाहीला निरुद्योग, दारिद्र्य, रोग

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र
अनुक्रम..... दि:

व अज्ञान या भयानक दैत्यांशी सामना द्यावयाचा आहे. या दैत्यांचे निर्मूलन करण्याच्या मंगल कार्यामध्ये जे अनेक प्रश्न उपस्थित होतात त्या प्रश्नांची चर्चा करण्याचे योग्य स्थान म्हणजे आजच्यासारखी सामाजिक परिषद होय असे मला वाटते. या सामाजिक प्रश्नांचे स्वरूप कधी शैक्षणिक तर कधी आर्थिक असेल. तसेच हे प्रश्न प्रसंगविशेषी इतरही स्वरूप धारण करतील. सामाजिक सुधारणा या शब्दप्रयोगाचा जर आपण वाच्यार्थाने उपयोग केला तर समाजाच्या धारणेला जरूर असलेल्या सर्व सुधारणा घडवून आणणे हे सामाजिक सुधारणेच्या कक्षेत पडू शकेल. वाच्यार्थाने बोलल्यास समाजसुधारणेचा कोणताही प्रश्न सामाजिक सुधारणेच्या व्यासपीठावरून टाळता येणार नाही. पण सामाजिक सुधारणेचे कार्य अशा वाच्यार्थाने अंगावर घेण्याचे सामर्थ्य आजच्या परिषदेमध्ये एकदमच येणे शक्य नाही. म्हणून महाराष्ट्रातील समाजधारणेला व समाजाच्या प्रगतीला अत्यंत जिव्हाळ्याचे व महत्त्वाचे असणारे काही विशिष्ट प्रश्न आपण आपल्या चर्चेकरिता घ्यावेत असे मला वाटते.

चिकित्सक व पुरोगामी बुद्धिवादाचे महत्त्व

चिकित्सक विचारपद्धतीवर आधारलेल्या बुद्धिवादाचा प्रचार करणे आज किती महत्त्वाचे व अवश्य आहे याची प्रचीती हिंदू कोड बिलाबद्दल नुकत्याच झालेल्या लढ्यावरून सर्व सुधारकांना आली असेलच. हिंदू कोड बिल लोकसभेपुढे आल्यानंतर त्याविरुद्ध जो जोराचा प्रचार विरोधकांकडून करण्यात आला त्याचा परिणाम काय झाला हे आपण सर्वांनी पाहिलेच आहे. हिंदू कोड बिलावर विचार करताना त्याच्या पूर्वपीठिकेचा इतिहास पाहणे थोडे मनोरंजक होईल. हिंदू कायद्यामध्ये सुधारणा करण्याकरिता १८५० सालापासून अनेक कायदे पास झाले आहेत. या बाबतीत अगदी पहिला कायदा म्हणजे The Castes Disabilities Removal Act (Act XXI of 1850) हा होय. एखाद्या हिंदूने आपला धर्म सोडून दुसऱ्या धर्माचा स्वीकार केला तरी सुद्धा त्याचा धर्मांतरापूर्वी असलेल्या मिळकतीवरील हक्क नष्ट होऊ नये या दृष्टीने हा कायदा करण्यात आला होता. धर्मत्याग केल्यामुळे हिंदू कायद्याप्रमाणे होणारा परिणाम या कायद्याने बाजूला सारला व साहजिकच त्या वेळी उद्धारक हिंदू समाजाला मोठा धक्का बसला. जी गोष्ट या पहिल्या कायद्याची तीच गोष्ट सामान्यतः यानंतर झालेल्या प्रत्येक कायद्याची आहे असे म्हणण्यास मुळीच हरकत नाही. १९४९ सालच्या २१ व्या कायद्याने विजातीय व प्रतिलोम विवाहावर हिंदू कायद्याने घातलेली बंदी उठविली गेली व आता वधू-वर हे निराळ्या जातीचे आहेत या कारणामुळे कोणताही हिंदू विवाह निषिद्ध समजला जाणार नाही. अशा तऱ्हेने १८५० सालच्या २१ व्या कायद्यापासून १९४९ सालच्या २१ व्या कायद्यापर्यंत हिंदू

कायद्यामध्ये बदल करणारे अनेक कायदे लोकसभेने पास केले. त्या प्रत्येक वेळी हिंदू धर्मावर संकट आले असून हिंदू धर्मीयांनी नवीन होणाऱ्या कायद्याला जोराने विरोध करावा अशी घोषणा उद्धारक समाजाने केली होती. पण त्या घोषणेला यश न मिळाल्यामुळे निरनिराळे कायदे पास होत गेले. हे निरनिराळे कायदे केल्यानंतर त्याचा एक असा अनिष्ट परिणाम होऊ लागला की, या नवीन कायद्यांचा हिंदु कायद्यातील इतर तत्त्वांशी समन्वय करणे कठीण जाऊ लागले व ही गोष्ट डॉ. देशमुखांच्या १९३७ साली पास झालेल्या कायद्यामुळे विशेष स्पष्ट रीतीने दिसू लागली. म्हणून ता. २५-१-१९४१ रोजी हिंदुस्थान सरकारने सदर कायद्याची छाननी करून त्याबद्दल योग्य त्या सूचना करण्याकरिता राव कमिटी नेमली. या कमिटीने केलेल्या रिपोर्टानुसार हिंदुस्थान सरकारने दोन बिले तयार करून ती १९४२ मध्ये प्रसिद्ध केली. ही दोन्ही बिले तत्कालीन दोन्ही लोकसभांच्या संयुक्त कमिट्यांकडे सोपविण्यात आली. या दोन्ही कमिट्यांच्या संयुक्त सूचनेवरून हिंदुस्थान सरकारने न्यायमूर्ती राव यांच्या प्रमुखत्वाखाली पुनः एक कमिटी नेमली. या कमिटीने सर्व देशभर प्रवास करून तज्ज्ञ साक्षीदारांच्या साक्षी घेऊन व तिने पाठविलेल्या प्रश्नावलीला आलेल्या उत्तरांचा अभ्यास करून आपला रिपोर्ट ता. २१-२-१९४७ रोजी हिंदुस्थान सरकारकडे पाठविला. या रिपोर्टाबरोबर कमिटीने बिलांचा एक मसुदा तयार करून दिला. हा मसुदा व रिपोर्ट भारतीय लोकसभेच्या सिलेक्ट कमिटीपुढे जाऊन सदर बिल व सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट परत भारतीय लोकसभेपुढे आला. ही घटना ता. १२ ऑगस्ट १९४८ रोजी घडली. त्यानंतर या बिलाचा पुरस्कार करणारे त्या वेळचे मंत्री डॉ. आंबेडकर यांनी विद्वानांची एक परिषद दिल्लीला बोलावली आणि त्या परिषदेत झालेल्या चर्चेनुसार पुनः काही सुधारणा करून हिंदू कोड बिल भारतीय लोकसभेत आणण्याकरिता प्रसिद्ध केले. पुढे ते बिल भारतीय लोकसभेपुढे चर्चेकरिता निघाले. निरनिराळ्या वेळी अवसर मिळेल त्याप्रमाणे चर्चा झाली, पण त्या चर्चेतून शेवटी एकच गोष्ट निष्पन्न झाली ती म्हणजे सदर बिल कायदा होऊ शकले नाही. माझ्या समजुतीने हिंदू कोड बिलाबद्दल ही जी दुर्दैवी घटना घडली त्याची बरीचशी जबाबदारी पुरोगामी विचारसरणीच्या बुद्धिमान लोकांनी या बिलाबद्दल जी अनास्था दाखविली त्या अनास्थेवरच आहे. १८५० पासून जेव्हा जेव्हा हिंदू कायद्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्यात आला तेव्हा तेव्हा हिंदू धर्म संकटात आला आहे असा आक्रोश उद्धारक जनतेकडून करण्यात आला. पण त्या आक्रोशाला कधी मिळाले नव्हते इतके यश हिंदू कोड बिलाच्या प्रकरणी स्वतंत्र हिंदुस्थानच्या लोकसभेत मिळाले. ही घटना निःसंशय विषादास्पद आहे. ब्रिटिशांच्या राजवटीमध्ये हिंदू कायद्यातील एखाद्या मुद्द्यावर सुधारणा करण्याकरिता जेव्हा जेव्हा बिल कायदेमंडळापुढे येई, तेव्हा तेव्हा त्या बिलाच्या समर्थनार्थ

विद्वान व बुद्धिमान अशा समाजसुधारकांनी केलेल्या विद्वत्ताप्रचुर चर्चा व त्यांनी लिहिलेले लेख जर आपण वाचाल तर हिंदू कोड बिलाच्या प्रसंगी सुशिक्षित बुद्धिमान वर्गाने दाखविलेल्या अनास्थेबद्दल मी जो दोष देत आहे त्याचे रहस्य आपल्याला कळेल. हिंदू कोड बिल लोकसभेपुढे असताना त्या बिलातील मूलभूत तत्त्वाबद्दल जनतेला जागृत करण्याचा पुरोगामी विचारसरणीच्या लोकांनी विशेष प्रयत्न केला नाही. धर्मनिर्णय मंडळातर्फे त्याबद्दल जी बौद्धिक कामगिरी करण्यात आली त्याबद्दल धर्मनिर्णय मंडळाचे कोणीही कौतुक करील. पण धर्मनिर्णय मंडळाचा एक अपवाद सोडल्यास सर्व भारतामध्ये हिंदू कोड बिलाला अनुकूल अशी बौद्धिक चर्चा जवळजवळ झालीच नाही असे मला वाटते व त्याचाच परिणाम म्हणजे हिंदू कोड बिल हे नुसते बिल राहिले व त्याचे कायद्यात रूपांतर होऊ शकले नाही. सामाजिक चळवळीबद्दल बुद्धिमान समाजाने जी उपेक्षा वृत्ती आज कित्येक वर्षे दाखविली आहे त्याचाच एक नकळत महत्त्वाचा परिणाम असा झाला आहे की, **सर्व सामाजिक प्रश्नांवर अभ्यासपूर्वक, चिकित्सक व पुरोगामी अशी चर्चा करण्याची परंपराच लुप्तप्राय झाली आहे.** म्हणूनच मला असे वाटते की, जर सामाजिक समतेचे राज्य आपल्या राष्ट्रात निर्माण करावयाचे असेल तर समाजामध्ये पसरलेले व अंधश्रद्धेवर आधारलेले समज नष्ट करून बुद्धिवादाचा प्रचार करण्याची जबाबदारी आपण स्वीकारली पाहिजे.

पुरोगामी बुद्धिवादाचे स्वरूप

समाजसुधारणा लोकशिक्षणद्वारा घडवून आणावयाची म्हटले म्हणजे सुधारकांना पुरोगामी बुद्धिवादाच्या शस्त्राचा उपयोग करावा लागेल. स्वातंत्र्ययुगात राहण्याचे जे महद्भाग्य आजच्या पिढीला मिळालेले आहे त्या भाग्याचा पूर्ण उपयोग करून स्वातंत्र्ययुगाचे सुवर्णयुगात रूपांतर करणे हे आजच्या पिढीचे पवित्र कार्य आहे असे मला वाटते. स्वातंत्र्ययुग हे सुवर्णयुग म्हणून पुढे इतिहासात ओळखले जावे अशी जर आपली महत्त्वाकांक्षा असली तर स्वातंत्र्ययुगाच्या जोडीला बौद्धिक पुनरुत्थानाचा (Renaissance) पाठिंबा अवश्य मिळाला पाहिजे. आज सर्व अभ्यासकांनी आपल्या प्राचीन इतिहासाचे सर्वांगीण अध्ययन करणे जरूर आहे. आपल्या समाजसंस्था, आपले शिक्षणविषयक विचार व आपला इतिहास आणि संस्कृती यांचे चिकित्सक पद्धतीने अध्ययन करून त्या अध्ययनावरून निष्पन्न होणारे सिद्धांत आपण समाजापुढे मांडणे जरूर आहे. पूर्वकालीन इतिहासाचे चिकित्सक पद्धतीने अध्ययन करण्यामध्ये पूर्वकालचे जसेच्या तसे पुनरुत्थान करण्याचा हेतू केव्हाही असणे इष्ट नाही. पण सुधारणा करताना प्राचीन परंपरेच्या इतिहासाचा सखोल अभ्यास केल्यामुळे आपल्याला पुष्कळ मदत होण्याचा संभव आहे ही गोष्ट उघड आहे. म्हणूनच बुद्धिवादी अभ्यासकांनी आज आपल्या प्राचीन

इतिहासाचे चिकित्सक व तौलनिक पद्धतीने अध्ययन करण्यास पुढे आले पाहिजे. ऐतिहासिक दृष्टीचा स्वीकार करून सर्व सामाजिक व आर्थिक प्रश्नांचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न पुरोगामी बुद्धिवादी नेहमी करीत असतो. सत्यान्वेषण हे या संप्रदायाचे मुख्य ध्येय आहे. शब्दप्रामाण्य व व्यक्तिप्रामाण्य यांचे या परंपरेला पूर्ण वावडे आहे. एका अर्थाने न्यायाधीशाची भूमिका स्वीकारून महत्त्वाच्या अशा सर्व प्रश्नांचा सांगोपांग विचार करून जे सत्य उपलब्ध होईल त्या सत्याचा प्रचार करणे हेच या परंपरेचे ब्रीद आहे. अंधश्रद्धा व विश्वास यांचा सर्वस्वी त्याग करून व तर्कबुद्धीचा अवलंब करून अंध रूढीच्या किल्ल्यावर या संप्रदायाला हल्ला करावयाचा असतो. विचारातील श्रद्धाळूपणा किंवा स्वप्नाळूपणा तसेच पूर्वपरंपरेवरील अंधप्रेम या परंपरेला नष्ट करावयाचे असते. रूढीचे सामर्थ्य किती मोठे आहे याची या परंपरेतील अनुयायांना पूर्ण जाणीव आहे. आपल्या समाजात तर रूढीचा पगडा आपल्या समाजबांधवांवर किती मोठा आहे ही गोष्ट पुरोगामी बुद्धिवाद्यांनी केव्हाही विसरता उपयोगी नाही. रूढीचे मुख्य सामर्थ्य अज्ञानावर अधिष्ठित झालेले असते. म्हणून रूढी किंवा रूढिप्रेमी व रूढिवादी जनतेवर उपहासाचे शस्त्र आपण कधीही उगारू नये. उपहास किंवा कटुता अवलंबिल्यामुळे सुधारणेचे कार्य यशस्वी होतेच असे नाही. उलट अशा मार्गाचा अवलंब केल्यामुळे एकंदर समाजजीवनात निरर्थक कडवटपणा उत्पन्न होतो. म्हणून बुद्धिवादी सुधारकांनी समाजातील अज्ञान नष्ट करण्याचा तातडीने व आवेशाने प्रयत्न केल्यास रूढीचे सामर्थ्य आपोआप नष्ट होईल. आणि असे प्रयत्न यशस्वी करण्याचे एक अत्यंत महत्त्वाचे साधन म्हणजे बुद्धिवादाचा स्वीकार करून आपल्या सामाजिक संस्थांच्या प्रगतीचा इतिहास समाजाला समजावून देणे हे होय. म्हणूनच मला असे वाटते की, सामाजिक सुधारणा शक्य तितक्या लवकर यशस्वी करून सामाजिक समतेचे वातावरण महाराष्ट्रात निर्माण करावयाचे असल्यास आज सर्व समाज-सुधारकांनी बुद्धिवादाचा आश्रय करून आपल्या समाजसंस्था या सदैव प्रगतिशील होत्या व त्या तशा असणे प्रगतिशील अशा समाजाच्या धारणेच्या दृष्टीने अत्यंत इष्ट आहे हे तत्त्व आपल्या सर्व बांधवांना पटवून दिले पाहिजे. पुरोगामी बुद्धिवादाचे स्वरूप व त्याचे कार्य माझ्या समजुतीने स्थूल प्रकारे असे आहे. हा बुद्धिवाद स्वीकारताना आपल्याला आवडणारे व प्रिय असणारे सिद्धांत मनाशी बाळगून त्या सिद्धांतांना पुष्टिदायक असे पुरावे पुढे करण्याचे आपण नेहमी टाळले पाहिजे. सत्यशोधन किंवा सत्यान्वेषण हे बुद्धिवादाचे ध्येय असल्यामुळे आपल्या वैयक्तिक पूर्वग्रहांना आपण कधीही महत्त्व देता कामा नये. हिंदूंबद्दल मॅक्समुल्लरनी असे मार्मिक उद्गार काढले आहेत की, सर्व जगात खोट्या अध्यात्मवादाने पछाडलेले असे हे एकटेच लोक असून, आपण पृथ्वीतलावर चार दिवस राहू; पण आपले खरे घर स्वर्गात अशी त्यांची श्रद्धा असते. ह्या श्रद्धेमुळे सर्व ऐहिक प्रश्नांकडे

धर्माळू दृष्टीने पाहण्याची आपल्याला संवय लागलेली आहे ही गोष्ट खरी आहे. ही श्रद्धाळू व धर्माळू दृष्टी सोडून तर्कशुद्ध व बुद्धिवादी दृष्टीने सर्व सामाजिक प्रश्नांचा विचार करण्याची प्रवृत्ती लोकप्रिय करणे हे बुद्धिवादाचे आद्य कर्तव्य आहे.

समाज-धर्म म्हणजे काय ?

बुद्धिवादाचा आश्रय करून सामाजिक सुधारणेच्या प्रश्नाचा विचार करताना प्रथमच एक गोष्ट स्पष्ट करणे जरूर आहे. धर्म शब्दाचा हिंदूंमध्ये अत्यंत व्यापक असा अर्थ केला जातो. हिंदूंचे तत्त्वज्ञान व अध्यात्मविषयक विचार धर्म शब्दा-मध्येच अंतर्भूत होतात. तसेच मानवी जीवनातील केवळ आधिभौतिक स्वरूपाचे आचार व कर्तव्ये यांना सुद्धा धर्म म्हणूनच संबोधिले जाते. त्याशिवाय ज्याला आपण कायदा असे म्हणतो त्या कायद्यांचाही धर्म याच शब्दात अंतर्भाव होतो. आपण आपला कोणताही जुना स्मार्त ग्रंथ सहज चाळून पाहिला तर ही गोष्ट ताबडतोब आपल्या लक्षात येईल की, आपल्या स्मृतिग्रंथात अनेक विषयांचे एकाच धार्मिक वातावरणाखाली निरूपण केले आहे. मनुष्य जन्माला आल्यापासून त्याच्या मृत्यूपर्यंत त्याला जी जी सामाजिक व वैयक्तिक कर्तव्ये देहधारणेकरिता किंवा समाजधारणेकरिता करावी लागतात त्या सर्व कर्तव्यांचा सुद्धा धार्मिक दृष्टीने विचार केलेला आपल्याला दिसून येईल. त्यामुळे सर्व जीवनविषयक प्रश्नांकडे धार्मिक बुद्धीने बघण्याची प्रवृत्ती आपल्या समाजात प्रसृत झाली आहे. या प्रवृत्तीचा एक विपरीत परिणाम असा होतो की, आपल्या चालीरीती व आपले धार्मिक संकेत व सांप्रदाय हे अनादी असून त्यांचे स्वरूप नित्य व न बदलणारे आहे अशी कल्पना समाज बाळगू लागतो. **म्हणूनच अगदी प्रथम समाजसुधारणेची चर्चा करताना आपण आचारधर्माचे स्वरूप हे मोक्षधर्माच्या स्वरूपापासून सर्वस्वी भिन्न आहे ही गोष्ट समाजाला समजावून दिली पाहिजे.** टिळकांनी ज्या धर्माला मोक्षधर्म असे यथार्थतेने म्हटले आहे त्या मोक्षधर्माबद्दल आपल्याला समाजसुधारक या नात्याने चर्चा करण्याचे प्रयोजन नाही. हिंदू तत्त्वज्ञान व हिंदू मोक्षधर्म याला सर्व जगातील तत्त्वज्ञानामध्ये फार मोठे स्थान आहे ही गोष्ट आपण सर्वजण मोठ्या अभिमानाने सांगतो. पण मोक्षधर्म व तत्त्वज्ञान यांबद्दल आपल्या मनात असणारा आदर कितीही यथार्थ असला तरी तशाच तऱ्हेचा आदर व निष्ठा आपण आचारधर्माबद्दल बाळगली पाहिजे ही कल्पना तर्कदुष्ट असल्याचे आपण समाजाला सांगितले पाहिजे. आपल्या तत्त्वज्ञानाबद्दलसुद्धा असे म्हणता येईल की, तत्त्वज्ञानाच्या विचारात आपले पूर्वज पूर्ण मतस्वातंत्र्य देत असत. एरवी परस्परविरोधी असे विचार मानणारे तत्त्वज्ञ आपल्या समाजाने कधीही पूजिले नसते. आपल्या तत्त्वज्ञानामध्ये सुद्धा तर्काला फार मोठे स्थान दिलेले आढळते. जर मोक्षधर्मामध्ये किंवा तत्त्वज्ञानामध्ये सुद्धा आपल्या पूर्वजांनी तर्काचा अवलंब केला तर समाजधारणेचे जे केवळ आधिभौतिक स्वरूपाचे आचारधर्म

आहेत त्यांच्याबद्दल चर्चा करताना तर्कपद्धतीला निषिद्ध मानणे हे सर्वस्वी अनुचित होईल. येथे खुद्द मोक्षशास्त्राबद्दल सुद्धा डॉ० राधाकृष्णन् यांनी काढलेल्या वक्तृत्वपूर्ण उद्‌गारांचा उल्लेख करणे अप्रस्तुत होईल असे मला वाटत नाही.

"The thinkers of India are the inheritors of the great tradition of faith in reason. The ancient seers desire not to copy but to create. They were ever anxious to win fresh fields for truth and answer the riddles of experience, which is ever changing and therefore new. The richness of the inheritance never served to enslave their minds. We cannot simply copy the solutions of the past, for history never repeats itself. What they did in their generation need not be done over again. We have to keep our eyes open, find out our problems and seek the inspiration of the past in solving them. The spirit of truth never clings to its forms but ever renews them. Even the old phrases are used in a new way. The philosophy of the present will be relevant to the present and not to the past. It will be as original in its form and its content as the life which it interprets. As the present is continuous with the past, so there will be no breach of continuity with the past." ("Indian Philosophy" by Dr. Radhakrishnan, Vol. II, page 776.)

म्हणूनच डॉ. राधाकृष्णन् यांच्या वरील स्फूर्तिदायक उद्‌गारांचा आधार घेऊन मला आपल्याला असे सुचवावयाचे आहे की, आपण सामाजिक सुधारणेच्या प्रश्नांचा विचार करताना तर्कबुद्धीचा आधार घेऊन तर्कबुद्धीचेच पूजन करण्याचा संप्रदाय सुरू केला पाहिजे. याच संप्रदायाला मी पुरोगामी बुद्धिवाद असे म्हणतो.

हिंदू समाज-संस्था, वेद व वैदिक वाङ्मय

आपल्या सामाजिक संस्थांच्या इतिहासाबद्दल विचार करताना एका प्रचलित असलेल्या संकेताचा थोडा विचार करणे जरूर आहे. तो संकेत असा आहे की, हिंदू तत्त्वज्ञान, हिंदू समाजसंस्था व हिंदू कायदे या सर्वांचा उगम वेद असून वेद हे अपौरुषेय व अनादी आहेत. परंपरेचा अभिमान वाढविण्याच्या दृष्टीने या संकेताने पूर्वकाली कदाचित महत्त्वाचे कार्य केले असेल; पण या संकेतावर वाच्यार्थाने विश्वास ठेवणे कोणाही बुद्धिवादी माणसाला सध्या शक्य होणार नाही. वेद हे मानवजातीतील वाङ्मयात अत्यंत पुरातन असे आहेत ही गोष्ट आता सर्वमान्य झाली आहे. वेदातील सूक्तांमध्ये कित्येक ठिकाणी निसर्गाचे अनुपम वर्णन केलेले

आढळते. काही ठिकाणी सामाजिक चालीरीतींचा ओझरता उल्लेख दिसतो. तत्कालीन कर्मकांडाचेही वर्णन काही ठिकाणी आढळते. त्या वेळी पूजिल्या गेलेल्या देवतांचे दर्शनही घडते व भक्तिरसाचा उत्कर्षही काही सूक्तांमध्ये झालेला दिसतो. मानव-जातीच्या इतिहासातील अत्यंत पुरातन ग्रंथ या दृष्टीने वेदांचे महत्त्व निःसंशय अपार आहे. पण वेदांना अपौरुषेय मानण्यामध्ये जी वेदग्रंथांबद्दल अंधश्रद्धेची भावना समाजात अद्यापि प्रचलित असलेली दिसते ती मात्र यथार्थ किंवा सयुक्तिक आहे असे मला वाटत नाही. पूर्वमीमांसा, वैशेषिकवाद व वेदांत या सर्वांचा उगम वेदातच झाला आहे असे समजले जाते. द्वैतवाद, अद्वैतवाद व विशिष्टाद्वैतवाद हे सर्व पंथ वेद व वैदिक वाङ्मयाला प्रमाणभूत मानतात. सारांश, परस्परविरोधी असे विचारसंप्रदाय वेद व वैदिक वाङ्मय यातूनच उगम पावले आहेत ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे आपल्याला हे सहज पटेल की, वेद-वाङ्मयातून एकच एक निश्चित तऱ्हेचा सामाजिक किंवा पारमार्थिक संप्रदाय निघू शकतो असे म्हणणे धाष्टर्याचे होईल. हिंदू विचारपद्धतीत समन्वयाची जी पारंपरिक कल्पना प्रबल रीतीने दिसून येते त्या समन्वयाच्या कल्पनेतच या वेदपूजेचे रहस्य आहे. पण वेदांबद्दल कितीही आदर बाळगला तरी वेदांमधूनच सर्व समाजसंस्था निर्माण झाल्या व जसे वेद अपौरुषेय तशाच या संस्थाही अपौरुषेय व म्हणून अपरिवर्तनीय आहेत असे समजणे सर्वस्वी चुकीचे होईल. हिंदू धर्माचे यथार्थपणे वर्णन करणे विद्वानांनाही फार दुष्कर असे वाटले आहे. टिळकांनी हिंदू धर्माचे स्वरूप असे वर्णन केले आहे :

प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ।
उपास्यानामनियमश्चैतद्धर्मस्य लक्षणम् ॥

या व्याख्येमध्ये सुद्धा वेदांवरील प्रामाण्यबुद्धीचा टिळकांनी उल्लेख केला आहे. याचा अर्थ वेदाला प्रमाण न मानणारे जैन व बुद्धधर्मीय हिंदू धर्माच्या कक्षेतून बाहेर पडतात. ही आपत्ती टाळण्याकरिता व हिंदू धर्माची व्याख्या जास्त व्यापक करण्याच्या बुद्धीने सावरकरांनी हिंदू धर्माचे वर्णन केले आहे. सावरकरांच्या मते :

आसिंधुसिंधुपर्यंता, यस्य भारतभूमिका ।
पितृभूः पुण्यभूश्चापि, स वै हिंदुरिति स्मृतः ॥

डॉ. राधाकृष्णन् यांनी तर हिंदू धर्म हा जीवनविषयक एक दृष्टिकोन आहे असे हिंदू धर्माचे मोघम वर्णन करून समाधान मानले आहे. तात्पर्य, हिंदू या नावाने ओळखले जाणारे अनेक पंथ व संप्रदाय या सर्वांचाच उगम वेदांपासून झाला असे समजण्याचा जरी प्रघात असला तरी ऐतिहासिक दृष्टीने या सर्व पंथांचा व परंपरांचा अभ्यास करून ते कसे निर्माण झाले व ते कसे वाढले याबद्दल बुद्धिवादी लोकांनी ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास करणे जरूर आहे. असा अभ्यास करताना

वेद व वैदिक वाङ्मय सध्या निर्माण होणाऱ्या वाङ्मयासारखेच लौकिक वाङ्मय आहे ही दृष्टी कायम ठेवून संशोधनास प्रवृत्त झाले पाहिजे. म्हणून समाजामध्ये रूढ असलेल्या वेदविषयक चुकीच्या कल्पनांचे निराकरण करणे समाजसुधारकांना जरूर आहे. हे म्हणण्यामध्ये वेद व वैदिक वाङ्मय यांचे सांस्कृतिक महत्त्व मी मुळीच कमी लेखू इच्छीत नाही. पण त्यांच्या सांस्कृतिक महत्त्वाचे पूर्ण ज्ञान असूनसुद्धा मी निःसंशय असे म्हणू इच्छितो की, त्या वाङ्मयामध्ये वर्णन केलेली समाजपद्धती व समाजरचना आज सुरू करण्याचा प्रयत्न करणे सर्वस्वी हास्यास्पद होईल. त्या वाङ्मयाचा आस्थेने व आदराने अभ्यास करण्यात माझ्यासारख्या समाजसुधारकांचा एकच हेतू असतो व तो असा की, या वाङ्मयातील निरनिराळ्या उल्लेखांवरून समाजसंस्थांची प्रगती कशी होत गेली याचे अवलोकन करणे हा होय.

चातुर्वर्ण्य व त्यावर आधारलेले व त्यामुळे वाढलेले जातिभेद— अभ्यासकांचे भिन्न अभिप्राय

आजच्या स्वातंत्र्ययुगामध्ये सामाजिक समतेचे अत्यंत महत्त्व असल्यामुळे सामाजिक समतेला सर्वस्वी विरोधी असलेल्या जातिभेदसंस्थांवर समाजसुधारकांनी हल्ला करणे अत्यंत जरूर झालेले आहे. निरनिराळ्या जातिभेदांमुळे हिंदू समाज अत्यंत विस्कळीत झालेला असून त्या समाजामध्ये एकतेचा किंवा एकरूपतेचा अभाव पुष्कळ वेळेला दिसतो. या जातिभेद-संस्थांचे निर्मूलन करण्याकरिता समाजसुधारक जेव्हा प्रयत्न करू लागतील तेव्हा या जातिभेद-संस्थांचे मूळ तरी काय होते याचा बहुजनसमाजाला थोडाफार परिचय करून देणे जरूर होईल. चातुर्वर्ण्य या संस्थेबद्दल अनेक विचार विद्वान लोकांनी व्यक्त केले आहेत. चातुर्वर्ण्य हे जन्मजात असून हिंदूंच्या इतर संस्थांप्रमाणे वेदमान्य व म्हणून अपौरुषेय व अनादी आहे असा संकेत सनातनी लोक अद्यापि आपल्या उराशी बाळगून आहेत. या संकेताचा आधार ऋग्वेदातील दहाव्या मंडळातील पुरुषसूक्त या नावाने उल्लेखलेले ९० वे सूक्त आहे. ते सूक्त असे आहे की :

ब्राह्मणोऽस्य मुखमासीत् बाहू राजन्यः कृतः।
ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत ॥

त्याच स्वरूपाचे सूतसंहितेतील दुसरेही एक वचन दाखविता येईल :

सर्वेषां जन्मना जातिः नान्यथा कर्मकोटिभिः।
पश्वादीनां यथा जातिः जन्मनैव न चान्यथा ॥

या मताप्रमाणे मनुष्यजातीच्या जन्माच्या प्रसंगीच परमेश्वराने चार वर्ण उत्पन्न केले व हे वर्ण अशाच स्वरूपात मनुष्यजातीच्या अंतापर्यंत राहतील. या जन्मजात

चातुर्वर्ण्याच्या कल्पनेमुळे विशेषतः शूद्रांवर किती घोर अन्याय होतो याचे वर्णन करण्याची आज मुळीच जरूर नाही. रामायणकाली आत्मशुद्धीकरिता तीव्र तप करणाऱ्या शंबूकाला जे शासन मिळाले व महाभारतकाली धनुर्विद्येमध्ये पारंगत झाल्याबद्दल एकलव्याला जे प्रायश्चित्त घ्यावे लागले त्यावरून शूद्रांना या जन्मजात वर्णभेदामुळे किती हीन तऱ्हेने वागविण्यात येते याची कल्पना येईल. पुरुषसूक्त हे ऋग्वेदात मागाहून घुसडले गेले असावे असा काही विद्वानांचा तर्क आहे. इतरांच्या मते हे सूक्त ऋग्वेदयुगातील अगदी शेवटच्या कालात रचले असावे. याच सूक्ताचे पडसाद आपल्या अनेक स्मार्त व पौराणिक ग्रंथांत उमटलेले दिसून येतात. सध्याच्या समतेच्या युगात हे पडसाद ऐकल्यानंतर हीन गणल्या गेलेल्या समाजाच्या मनात या ग्रंथांबद्दल व त्या ग्रंथांत व्यक्त केलेल्या अमानुष जन्मजात अस्पृश्यतेच्या विचारांबद्दल विद्वेषाच्या भावना निर्माण झाल्यास आश्चर्य वाटण्याचे मुळीच कारण नाही. समाजसुधारणा करताना आततायीपणाचा मार्ग स्वीकारला जाऊ नये ही गोष्ट मला मान्य आहे. पण अशा तऱ्हेचे विचार पूर्वग्रंथांत व्यक्त झालेले पाहून अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजाचे मन जर असंतोषाने आततायीपणाच्या विचारांकडे धाव घेऊ लागले तर त्याचा कडक शब्दात निषेध करणे मला वाटते पुष्कळांना कठीण जाईल.

जन्मजात पद्धतीचे हे क्रूर स्वरूप कदाचित नेहमीच सारखेच समाजात वावरत असेल असे दिसत नाही, कारण जुन्या वाङ्मयात वर्णभेद हे गुण व कर्म यांवर आधारलेले आहेत अशा तऱ्हेचेही आधार सापडतात. भगवद्गीतेत :

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः।

असा केलेला उल्लेख सर्वांच्या परिचयाचा आहे. तसेच महाभारतात आढळणारे खालील वचनही हीच वृत्ती दाखविते :

न जात्या ब्राह्मणश्चात्र, क्षत्रियो वैश्य एव न।
न शूद्रो नैव म्लेंच्छोऽस्ति भेदिता गुणकर्मभिः॥
न कुलेन न जात्या वा क्रियाभिर्ब्राह्मणो भवेत्।
चांडालोऽपीह वृत्तिस्थो ब्राह्मणः स युधिष्ठिर॥

या मताचा प्रचार चालू असल्याचे उपनिषत्कालीन सत्यकाम जाबालाच्या गोष्टीवरून दिसते. तात्पर्य, चातुर्वर्ण्याची पद्धत एकाच तऱ्हेने समाजात सदैव प्रचलित होती असे या भिन्न व परस्परविरोधी वचनांवरून दिसत नाही. येथे चातुर्वर्ण्य संस्थेचा अभ्यास केलेल्या अभ्यासकांच्या काही मतांचा अनुवाद करणे अप्रस्तुत होणार नाही असे मला वाटते.

Caste and Race in India या १९३२ साली प्रसिद्ध झालेल्या

आपल्या ग्रंथात डॉ. घुर्ये यांनी चातुर्वर्ण्यासारखे व्यवसायावर आधारलेले भेद इंडो-आर्यन वंशाच्या निरनिराळ्या देशांत आढळतात असे दाखविले आहे. उदाहरणार्थ, इराणमध्ये भिक्षुक, लढवय्ये, शेतकरी आणि कारागीर असे भेद असल्याचे दिसते. तसेच चीनमध्ये सभ्य अगर विदग्ध, शेतकरी, कारागीर व व्यापारी असे भेद असल्याचे दिसते. पण निरनिराळ्या देशात दिसणाऱ्या या वर्गभेदांमध्ये व आपल्या चातुर्वर्ण्यामध्ये महत्त्वाचा भेद असा आहे की, आपली चातुर्वर्ण्यसंस्था ही जास्त कडक रीतीने अमलात आली आहे. तिचे स्वरूप जास्तीत जास्त जन्मजात अशा पद्धतीवर केले गेले व तिच्यामध्ये अस्पृश्यतेचा प्रकार अबाधितपणे सुरू झाला. किंबहुना जन्मजात अस्पृश्यतेचा प्रकार हा हिंदू चातुर्वर्ण्यामध्येच केवळ आढळतो, इतरत्र नाही, असे डॉ. घुर्ये यांचे मत दिसते. शिवाय डॉ. घुर्ये असे म्हणतात की, वेदकालामध्ये अस्पृश्यता व तिचा काळिमा लागलेले शूद्र यांच्याबद्दल वर्णन केलेले दिसत नाही. वेदवाङ्मयात आर्य व दास असा झगडा चालू असल्याचे दिसते. शूद्रांचा उल्लेख तितक्या प्रामुख्याने दिसत नाही. डॉ. घुर्योंच्या मताप्रमाणे शूद्र या शब्दाची संस्कृत धात्वर्थाने उपपत्ती अद्यापि लागलेली नाही. याशिवाय डॉ. घुर्योंचे मत थोडक्यात असे आहे की :

"The Indo-Aryans, when they entered India, came with a certain sense of their importance and a spirit of exclusiveness born of such an attitude. They must have had among them at least three well-defined classes, inter-marriage between whom must have been rather rare, though not positively forbidden. Their first regulations in this line began with the task of excluding the Sudras, which class must have been largely formed by the aborigines from their religious worship. We have seen that the Sudra was represented as the lowest clsss in society. Very early in their Indian history the Aryans enjoined that the Sudra shall not practise the religious worship developed by them. Nay, they even forbade his presence in the sacrificial hall.....The various factors that characterize caste-society were the result, in the first instance, of the attempts on the part of the upholders of the Brahmanic civilization to exclude the aborigines and the Sudras from religious and social communion with themselves. That the Sudra class was largely formed by those aborigines who had accepted the overlordship of the Indo-Aryans and had entered into their service

is more than probable.....Thus the Vedic opposition between the Arya and the Dasa is replaced by the Brahmanic classification of the 'dvijati' and the 'eka jati' (the Sudra), suggesting the transmutation of the Dasa into the Sudra in the minds of the writers of the Brahmanic and later periods. As an important constituent of the Brahmanic culture in connection with the sacrificial ritual, there arose very exaggerated notions of ceremonial purity."

Who were the Shudras, How they came to be the Fourth in the Indo-Aryan Society या १९४६ साली प्रसिद्ध झालेल्या आपल्या ग्रंथात डॉ. आंबेडकरांनी असा सिद्धांत मांडला आहे की, शूद्र हे मूळचे आर्यवंशीय होत व त्यांची गणना क्षत्रिय वर्णात होत होती. शूद्र हे प्रथम इतक्या महत्त्वाचे समजले जात असत की, शूद्रांपैकी अनेक राजांची वर्णने पुराणवाङ्मयात आढळतात. डॉ. आंबेडकरांनी महाभारतातील शांतिपर्वात उल्लेख केलेल्या पैजवान राजाचा आधार या सिद्धांताच्या पुष्ट्यर्थ घेतलेला आहे. पैजवान राजाचा मुलगा शूदास याचा पुरोहित वाल्मीकी होता असे निरुक्तातील वचनांवरून डॉ. आंबेडकर यांनी प्रतिपादिलेले आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते वेदकाली प्रथम तीनच वर्ण होते व आज समजल्या जाणाऱ्या अस्पृश्य वर्गांपैकी बरेचसे शूद्र प्रथम क्षत्रियवर्गात मोडत असत. पण पुढे ब्राह्मणांचा व शूद्रांचा मोठा लढा झाला व त्या लढ्याचा परिणाम असा झाला असावा की, द्वेषबुद्धीने ब्राह्मणांनी शूद्रांचे उपनयन करण्याचा संप्रदाय बंद करून त्यांना सामाजिक दृष्टीने हीन स्थितीला पोहोचविले. प्रथम हा लढा ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यात सुरू झाला व क्षत्रियांमध्ये अंतर्भूत असलेले तत्कालीन शूद्र क्षत्रियांच्या बाजूने या लढ्यात उतरले व शेवटी या लढ्याचे पर्यवसान शूद्रांच्या अस्पृश्यतेत झाले. ज्या शूद्र राजांनी या लढ्यात ब्राह्मणांच्या विरुद्ध भाग घेतला ते शूदास, पुरूरवस्, नाहूस व निम्मी असे राजे होते. म्हणून डॉ. आंबेडकरांनी शूद्र हे मूळचे अनार्य असल्याबद्दल जी कल्पना अनेक विद्वानांनी मान्य केली आहे त्या कल्पनेचा तीव्र निषेध केला आहे.

त्यानंतर *The Untouchables, Who Were They and Why They Became Untouchables* या १९४८ साली प्रसिद्ध झालेल्या आपल्या प्रबंधात डॉ. आंबेडकरांनी खालील सिद्धांत मांडलेले आहेत :

(1) There is no racial difference between the Hindus and the Untouchables;

(2) The distinction between the Hindus and Untouchables in its original form, before the advent of Untouchability, was the distinction

between Tribesmen and Broken Men from alien Tribes. It is the Broken Men who subsequently came to be treated as Untouchables;

(3) Just as Untouchability has no racial basis, so also has it no occupational basis;

(4) There are two roots from which Untouchability has sprung :

(a) Contempt and hatred of the Broken Men as of Buddhists by the Brahmins;

(b) Continuation of beef eating by the Broken Men after it had been given up by others;

(5) In searching for the origin of Untouchability care must be taken to distinguish the Untouchables from thé Impure. All orthodox Hindu writers have identified the Impure with the Untouchables. This is an error. Untouchables are distinct from the Impure.

(6) While the Impure as a class came into existence at the time of the Dharma Sutras, the Untouchables came into being much later than 400 A. D.

हे दोन प्रबंध डॉ. आंबेडकरांनी इतिहास-संशोधन करण्याच्या दृष्टीने विचारवंत अभ्यासकांपुढे मांडले आहेत. अर्थात हे प्रबंध लिहिताना डॉ. आंबेडकरांनी आपले विचार जहाल व कठोर अशा शब्दांत व्यक्त केले आहेत व त्याबद्दल मी तरी डॉ. आंबेडकरांना मुळीच दोष देऊ शकणार नाही. जन्मजात चातुर्वर्ण्य पद्धतीमुळे अस्पृश्य समाजाला जो घोर अन्याय आज हजारो वर्षे सहन करावा लागला आहे त्या अन्यायाला वाचा फोडताना जर कोणी जहाल शब्दांचा उपयोग केला तर त्याचा निषेध करण्याचे धैर्य समाजसुधारकांना होईल असे मला वाटत नाही. डॉ. आंबेडकरांनी केलेले विवेचन व त्यावरून त्यांनी काढलेले निष्कर्ष सर्वांना मान्य होतील असे नाही. पण त्यांनी मांडलेल्या सिद्धांतांबद्दल तर्कशुद्ध रीतीने बौद्धिक चर्चा करण्याचे काम सर्व सुधारकांचे आहे असे मला वाटते.

चातुर्वर्ण्य संस्थेबद्दल सांगोपांग विचार करून काही निर्णय सांगण्याचे हे स्थळ नव्हे. तशी माझी पात्रता नाही व त्या दृष्टीने या विषयाचा मी पूर्ण अभ्यासही केलेला नाही. वरील मतांचा उपन्यास करण्यामध्ये माझा एकच हेतू होता व तो असा की, चातुर्वर्ण्य संस्था व जातिभेद केवळ जन्मावरून अनादी कालापासून सुरू झाले आहेत व ते मनुष्यजातीच्या अंतापर्यंत तसेच राहावे असा अट्टाहास धरणारे लोक तर्कशुद्ध व ऐतिहासिक दृष्टीने या प्रश्नाकडे पाहात नाहीत हे दाखविणे.

सामान्यतः चातुर्वर्ण्य संस्था अनेक कारणांमुळे निर्माण झाल्या असे म्हणणे धोक्याचे नाही. इंडो-आर्यन वंशाचे लोक हिंदुस्थानात प्रथम आले तेव्हा व्यवसायावर आधारलेली वर्णव्यवस्था तत्कालीन समाजात प्रचलित असावी. हिंदुस्थानात आल्यानंतर या व्यवस्थेचे थोडेफार रूपांतर राजकीय कारणांमुळे झाले असल्याचा संभव आहे. त्या वेळी वर्णभेदांनीही या रूपांतराला थोडाफार कडवटपणा आणला असेल. वेदोत्तर कालामध्ये कर्मकांडाचा प्रस्ताव व प्रस्थ जास्त वाढल्यामुळे शुचितेच्या कल्पना समाजात जास्त जोराने फैलावू लागल्या व या कर्मकांडविषयक शुचितेच्या कल्पनेमुळे वर्णभेदव्यवस्था कडकपणे अमलात आणली गेली व त्या वर्णभेदव्यवस्थेचेच पुढे कालांतराने व स्थलांतराने अनेक जातीत पर्यवसान झाले असावे. ते कसेही असो, पण ज्या स्वरूपात वर्णभेद व तज्जन्य जातिभेद आज हिंदू समाजात प्रचलित आहेत त्या स्वरूपात ते यापुढे तसेच राहू देणे सर्वस्वी अनिष्ट आहे या गोष्टीवर समाजसुधारकांचे एकमत होईल असा मला विश्वास वाटतो. म्हणूनच या संस्थेचा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास करून ही संस्था कशी बदलत गेली याचे विवेचन समाजापुढे करणे जरूर आहे, एवढ्याच दृष्टीने या प्रश्नाचा मी येथे थोडक्यात विचार केला आहे. जातिभेदाचे हे ऐतिहासिक स्वरूप समाजाच्या लक्षात आले तर जातिभेदनिर्मूलनाला समाजाकडून तीव्र विरोध होणार नाही असे मला वाटते. आता कर्मकांड सर्वस्वी लुप्त झाले असून वेदोक्त संप्रदायांना मुळीच महत्त्व राहिलेले नाही. सर्व समाजातील नागरिकांना सर्व प्रकारचे शिक्षण घेण्याचा अधिकार प्राप्त झाला असून स्त्रियांविरुद्ध उगारलेले पुरातन स्मृतिकारांचे शस्त्रसुद्धा आता सर्वस्वी बोथट व निरुपयोगी झालेले आहे. व्यवसायातील मक्तेदारीसुद्धा आता अशक्य झाली असून सर्व व्यवसायात सर्व प्रकारचे नागरिक व स्त्रिया व पुरुष प्रवेश करू शकतात. त्यामुळे चातुर्वर्ण्य व जातिभेद यांना आधारभूत असलेली समाजव्यवस्था आता सर्वस्वी बदलली असल्यामुळे या व्यवस्थेच्या धारणेकरिता व उत्कर्षाकरिता चातुर्वर्ण्य व जातिभेद ही संस्था टिकविण्याचा अट्टाहास करण्यात काहीच अर्थ नाही ही गोष्ट समाजाला शैक्षणिक दृष्टीने आपण पटवून दिली पाहिजे असे मला वाटते.

सामाजिक समता व जातिभेद

सामाजिक आचारधर्माचे मुख्य प्रयोजन समाजधारणा असते ही गोष्ट कोणीही अमान्य करणार नाही. समाजाचे या स्वरूपाचे वर्णन आपल्या प्राचीन ग्रंथात ठिकठिकाणी केलेले दिसते. उदाहरणार्थ, कर्णपर्वामध्ये असे म्हटले आहे की :

धारणात् धर्ममित्याहुः धर्मो धारयते प्रजाः ।
यत्स्यात् धारणसंयुक्तं स धर्म इति निश्चयः ॥

समाजाची धारणा, त्याचे रक्षण व त्याची प्रगती करण्याकरिता समाजसंस्थांचा

उपयोग झाला पाहिजे. जी जी सामाजिक संस्था समाजाच्या धारणेला विरोध करते किंवा समाजाच्या प्रगतीला आडवी येते त्या त्या समाजसंस्थेचे रूपांतर करणे तत्कालीन समाजधुरीणांचे पवित्र कर्तव्य असते. त्या दृष्टीने विचार करता जातिभेदाचे निर्मूलन करून सर्व हिंदुधर्मीयांचा एकजिनसी समाज बनविणे किती अगत्याचे आहे हे कोणाच्याही लक्षात येईल. स्वातंत्र्य-युगामध्ये समाजसंस्था बदलण्यास धर्माची हरकत आहे ही तक्रार कोणालाही करता येणार नाही. आपल्या घटनेमधील २५ व्या कलमान्वये प्रत्येक नागरिकाला जरी धर्माचे पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे तरी सामाजिक न्याय व सामाजिक कल्याण या विषयांमध्ये लोकशाहीला अनियंत्रित असे अधिकार दिलेले आहेत. समाजकल्याणाचे व समाजप्रगतीचे कार्य यशस्वी करण्याकरिता लोकशाही कोणताही कायदा करू लागली तर त्या कायद्याच्या विरुद्ध धर्माला आक्रोश करण्यास आता मुळींच अवसर नाही. शिवाय धर्माच्या नावाने समाजसुधारणेला विरोध करणारे लोक धर्माचे मूळ स्वरूप काय होते याचा विचार करीत नाहीत. धर्माच्या पारमात्मिक व आध्यात्मिक स्वरूपाशी समाज-सुधारणेचा कधीच कलह असत नाही. धर्माच्या आचारस्वरूपाशी किंवा व्यावहारिक स्वरूपाशी मात्र समाजसुधारणेचा कित्येक वेळा झगडा होण्याचा संभव आहे. किंबहुना अशा स्वरूपाचा झगडा आजच्या हिंदू समाजाच्या परिस्थितीत अपरिहार्य आहे असे मला वाटते. म्हणून सामाजिक संस्था बदलून हिंदू समाजात समतेचे वातावरण निर्माण करण्याच्या धर्मसुधारणेच्या मोहिमेवर सर्व समाजसुधारकांनी एकनिष्ठेने निघाले पाहिजे असे मला वाटते. जातीयता-निर्मूलनाचे प्रयत्न समाज-सुधारक करू लागले म्हणजे कित्येक वेळा त्यांना असे बजावण्यात येते की, या प्रयत्नांचा एकच परिणाम होईल आणि तो म्हणजे समाजसुधारकांची एक निराळी जात होणे हा होय. पूर्वी असे प्रकार घडले नाहीत असे नाही. पण आजचा समाजसुधारक बुद्धिवादाचे हत्यार हातात घेऊन सामाजिक शिक्षणाच्या मोहिमेवर निघाल्यानंतर समाजात सर्वस्वी मिसळून व समाजाचा एक घटक या नात्याने समाजसुधारणा करण्याचा प्रयत्न करणार असल्यामुळे तो अगर त्याचे सहकारी हे समाजापासून अलग राहून त्यांचा एक निराळाच वर्ग उत्पन्न होईल ही भीती बाळगण्याचे कारण नाही. जातिभेद ही संस्था अनेक शतके अस्तित्वात असल्या-मुळे व त्या संस्थेला रूढीचा प्रबल आधार असल्यामुळे त्या संस्थेवर हल्ला करण्याचे काम कठीण आहे ही गोष्ट खरी आहे. जातिभेदाचा पगडा हिंदू मनावर किती जबरदस्त आहे याचे एक उदाहरण असे की, हिंदू लोक ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केल्यानंतरसुद्धा आपापल्या जाती विसरत नाहीत. म्हणजे कित्येक वर्षे ख्रिस्ती झालेली पण मूळची हिंदू असलेली कुटुंबे आपल्या पूर्वीच्या जाती विसरत किंवा टाकीत नाहीत असे दिसते, इतका या जातिभेदाचा विचित्र महिमा आहे. पण समाजसुधारणेला जातिभेद-निर्मूलन हे अवश्य असल्यामुळे निर्मूलनाचे

कार्य कठीण आहे म्हणून समाजसुधारकांनी माघार घेण्याचे मुळीच कारण नाही. अत्यंत खेदाची गोष्ट अशी की, ज्या हिंदूंचे तत्त्वज्ञान सर्वांभूती ब्रह्मतत्त्व ओळखते त्या हिंदूंचे आचार मनुष्यजातीमध्येच ब्रह्मतत्त्व ओळखण्यास विसरतात. पारमार्थिक विचारांची उदात्तता व प्रत्यक्ष आचारांची हीनता यांमधील इतका हृदयविदारक विरोध इतर समाजात क्वचितच आढळेल. म्हणून हा विरोध नष्ट करून हिंदू सामाजिक आचारविचार व हिंदू समाजसंस्था हिंदूंच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानाशी सुसंगत करण्याचे पवित्र कार्य समाजसुधारकांनी अंगावर घेणे आज अगत्याचे व महत्त्वाचे आहे.

चातुर्वर्ण्य व त्यावर आधारलेले इतर जातिभेद यांच्या योगाने हिंदू समाजात श्रेष्ठ-कनिष्ठ अशी चढती भाजणी व उतरती भाजणी यांचे जे प्रकार दिसतात त्यामुळे हिंदू समाजात एकत्वाची भावना निर्माण होणे शक्य नाही. विशेषतः राजकीय व सामाजिक समतेची प्रतिज्ञा घटनेच्या द्वारे सर्व राष्ट्राने केल्यानंतर या श्रेष्ठ-कनिष्ठपणाच्या आधारावर जगणाऱ्या जातिसंस्थांना आता अस्तित्वात राहण्याचा मुळीच अधिकार नाही. जातिभेदामुळे आपपरभावनेची संकुचित अशी प्रवृत्ती हिंदू समाजात प्राबल्याने दिसते. कित्येक वेळा जातिभेदाचे समर्थन करणारे लोक निरनिराळ्या जातींच्या किंबहुना उपजातींच्या नियमानुसार भिन्न संस्कृती आहेत असें सांगत असतात. एका दृष्टीने हेरिडिटीच्या नियमानुसार प्रत्येक कुटुंबाचेसुद्धा काही विशिष्ट स्वभावविशेष असू शकतील. पण म्हणून प्रत्येक कुटुंबाची एक निराळी संस्कृती आहे असे समजून जर प्रत्येक कुटुंब स्वतःपुरत्या आकुंचित दृष्टीने स्वतःचे व्यवहार पाहावयास लागेल तर एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होणे हे अशक्य आहे. प्रत्येक जाति किंवा उपजाति यांची विशिष्ट संस्कृती आहे हे विधान ऐकल्यानंतर सामाजिक संस्थांचा चिकित्सकपणे अभ्यास करणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्याला विस्मय व विषाद वाटल्याशिवाय राहणार नाही. संस्कृती या शब्दाचा योग्य अर्थ न समजल्यामुळे अशा तऱ्हेचे संकेत जातिभेदसंस्थांच्या पुरस्कर्त्यांकडून पुढे येत असतात. या काल्पनिक संस्कृतीच्या भेदामुळे आपल्या देशाच्या इतिहासात किती व कसे अनर्थ झाले आहेत याची जाणीव असलेला प्रत्येक राष्ट्राभिमानी नागरिक या संस्कृतिभिन्नतेच्या तत्त्वाला कधीही मान्यता देणार नाही.

ही गोष्ट खरी की, जातिभेदाचे हे तीव्र स्वरूप शमविण्याऐवजी त्याला थोडे उत्तेजन देण्याचे प्रकार ब्रिटिश राजवटीत करण्यात आले. प्रत्येक ठिकाणी कोणत्याही व्यक्तीचा निर्देश करावयाचा झाल्यास त्याचा धर्म, त्याची जात व उपजात वगैरे गोष्टींचा विस्ताराने उल्लेख करण्याची पद्धत ब्रिटिश राजवटीत सुरू झाली. ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या दृष्टीने एकत्वाची भावना प्रजाजनांच्या मनात उत्पन्न होऊ नये असे त्यांना वाटणे साहजिकच होते, व त्या दृष्टीने आपल्या सामाजिक संस्थांचा विकास पुरोगामी दृष्टीने होण्यास मदत करण्याची त्यांना साहजिकच इच्छा नव्हती.

त्यांनी अवलंबिलेल्या मार्गाचा नकळत आपल्या समाजावर परिणाम होऊन आपण स्वतः एकमेकांकडे भिन्नसंस्कृतीय अशा दृष्टीने पाहू लागलो व ही प्रवृत्ती केवळ हिंदू व मुसलमान या दोन समाजांपुरतीच मर्यादित न राहता हिंदूतील अनेक जाती व त्या जातींपैकी पोटजाती यांच्यामध्ये सुद्धा या प्रवृत्तीचा प्रचार सुरू झाला. म्हणूनच कित्येक वेळा ब्राह्मणांमध्ये सुद्धा कोकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे अशा स्वरूपाचे वाद झाल्याचे ऐकिवात येते व काही प्रसंगी खुद्द देशस्थांमध्ये देखील ऋग्वेदी व यजुर्वेदी असे तट पडल्याचेही दिसते. एखादा गरीब वारकरी वार मागावयास आला तर त्याची जात, पोटजात, गोत्र वगैरे बाबतीत मोठ्या कसोशीने चौकशी करणारे काही महाभाग मला माहीत आहेत. तात्पर्य, संस्कृतिभेदाच्या असल्या विपरीत कल्पनांचे पुरस्कर्ते ही गोष्ट विसरतात की, या कल्पनांचा परिणाम स्वकीयतेच्या अत्यंत मर्यादित स्वरूपाचा, म्हणजे केवळ स्वतःपुरता, दृष्टिकोण स्वीकारण्यात होतो व मग प्रत्येकजण 'माझ्यापुरता मी' अशा वृत्तीने वर्तन करू लागतो. 'मला काय त्याचे,' ह्या समाजघातकी प्रवृत्तीचा उगमही या विपर्यस्त व संकुचित संस्कृतिभेदाच्या कल्पनेपासूनच होतो. म्हणूनच संस्कृतीच्या या तर्कदुष्ट कल्पनांचे यथायोग्य स्वरूप समाजापुढे मांडून निदान हिंदूंची अशी एकच संस्कृती आहे या आधारावर सर्व हिंदूंना एकत्र आणून समताबुद्धी निर्माण करणे आज अत्यंत जरूर आहे.

या सामाजिक विषमतेमुळे स्वतःच्या हक्कांबद्दल जागरूक झालेल्या बहुजन-समाजातील सुशिक्षित लोकांना कशी मानखंडना झाल्याचे वाटते हे पुढारलेल्या वर्गातील लोकांना पुष्कळ वेळा समजत नाही. दैनिक वर्तनातील क्षुल्लक गोष्टींवरून किंवा व्यवहारात अहेतुपूर्वक का असेना पण निष्काळजीपणाने उच्चारलेल्या शब्दांवरून बहुजनसमाजातील व मागासलेल्या वर्गातील सुशिक्षित तरुणांचे मानभंग झाल्याची अनेक उदाहरणे मला माहीत आहेत. असा मानभंग झाल्यानंतर कोणताही स्वाभिमानी मनुष्य साहजिकच असंतुष्ट होतो व त्याच्या मनात कडवे-पणाचे व कटुतेचे विचार येऊ लागतात. म्हणून विशेषतः पुढारलेल्या वर्गातील लोकांनी सामाजिक समतेचे महत्त्व लक्षात घेऊन आपल्या वैयक्तिक व सामुदायिक व्यवहारामध्ये या तत्त्वाचा आचार करण्यास शिकले पाहिजे. **अहंभावाचे किंवा अस्मितेचे प्रदर्शन करणे हे खऱ्या संस्कृतीला कधीच मानवत नाही.** पण एका अर्थाने विद्वानाने आपल्या विद्वत्तेबद्दल, श्रीमंताने आपल्या श्रीमंतीबद्दल व कला-वंताने आपल्या कलेबद्दल दर्पोद्गार किंवा अहंभाव व्यक्त केला तर तो कदाचित क्षम्य मानला जाईल. पण केवळ जन्मावरून श्रेष्ठतेचे प्रदर्शन जर कोणी केले तर त्यामुळे इतर सर्वच्या सर्व जातींमध्ये अशा प्रदर्शन करणाऱ्या व्यक्तीबद्दल व त्या व्यक्तीच्या समाजाबद्दल कडवा असंतोष पसरतो ही गोष्ट पुष्कळ वेळा व्यवहारात लोक विसरतात. दुर्दैवाने आपल्या सामाजिक जीवनात आज सहानुभूतीचा

व सौहार्दाचा अभाव दिसून येतो. त्याचे एक महत्त्वाचे कारण असे आहे की, जन्मजात जातीयतेमुळे पसरलेल्या सामाजिक विषमतेचे शल्य बहुजनसमाजाला सारखे बोचत असते हे पुढारलेल्या समाजाला कळावे तसे कळत नाही. त्याचप्रमाणे अमानुष अस्पृश्यतेच्या शृंखलांमुळे मागासलेल्या वर्गातील नागरिकांना किती वेदना होतात हे इतर सर्व स्पृश्य समाजाच्या लक्षात यावे तितके येत नाही.

सामाजिक समतेच्या तत्त्वाविरुद्ध असा एक आक्षेप सनातनी लोकांकडून घेण्यात येतो की, हे सामाजिक तत्त्व आचरण्यास पुढारलेल्या वर्गांइतकेसुद्धा बहुजनसमाजातील सुशिक्षित लोक तयार नसतात. या लोकांना पुढारलेल्या वर्गांशी समता पाहिजे असते, पण त्यांच्याहून खाली असलेल्या जनतेशी समता प्रस्थापित करण्याची कल्पना त्यांच्या मनात येत नाही असे या आक्षेपकांचे म्हणणे असते. तसेच दलित व अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या वर्गांमध्येसुद्धा भिन्न भिन्न पोटजाती असून त्या पोटजाती एकमेकांशी समतेच्या आधारावर व्यवहार करण्यास तयार नाहीत ही गोष्ट मोठ्या आवेशाने समतेचे प्रतिस्पर्धी सांगत असतात. पण या आक्षेपकांनी एक गोष्ट लक्षात ठेवणे जरूर आहे की, ही विषमतेची कल्पना समाजात बद्धमूल होण्यास पुढारलेले वर्ग व त्या वर्गांच्या पूर्वजांनी या कल्पनेचे विस्ताराने वर्णन केलेले ग्रंथ हेच जबाबदार आहेत. कर्मकांडाचे स्तोम ब्राह्मणकाळात वाढल्यानंतर कर्मकांडविषयक शुचितेच्या कल्पनेमुळे ज्या श्रेष्ठ-कनिष्ठ भेदाचे संवर्धन हिंदू समाजात झाले त्या कर्मकांडाचा सर्वस्वी लोप झाल्यानंतर सुद्धा या श्रेष्ठ-कनिष्ठ कल्पना मात्र जातिभेदाच्या रूपाने अद्यापि जिवंत आहेत. म्हणूनच त्या कल्पना पूर्वकाली निर्माण केल्या तेव्हा त्या सयुक्तिक असोत अगर नसोत, त्यांचे अस्तित्व आज सर्वस्वी समाजद्रोही असल्यामुळे त्या कल्पनांचा संपूर्ण नायनाट करण्यास पुढारलेल्या वर्गातील सुशिक्षित लोकांनीच पुढाकार घेतला पाहिजे. ही गोष्ट खरी की, समाज-सुधारणेचा प्रचार करण्यात महाराष्ट्रात अनेक वेळी पुढारलेल्या वर्गातील नागरिकांनी भाग घेतला आहे. तीच परंपरा पुढे चालवून निरपेक्षबुद्धीने व तर्काच्या जोरावर आपल्या समाजात रूढ असलेल्या विषमतेच्या कल्पनांवर हल्ला करण्यास पुढारलेल्या वर्गातील विद्वान लोकांनी आजही पुढे येणे जरूर आहे. आज या सामाजिक विषमतेमुळे महाराष्ट्रातील बहुजनसमाजात किती असंतोष धुमसत आहे याची आपण योग्य वेळी दखल घेतली पाहिजे. पुण्याबद्दल पूर्वेकडील पुणे व पश्चिमेकडील पुणे असे कित्येक वेळा वर्णन केले जाते. पूर्व व पश्चिम यांची समतेच्या व्यासपीठावर स्नेहभावाने गाठभेट जर झाली नाही तर अखेर महाराष्ट्राचे पूर्व-पश्चिम असे भेद कायम राहण्याची भीती आहे ही गोष्ट आपण विसरता कामा नये. East is East and West is West, And the twain shall never meet ही कुप्रसिद्ध कल्पना आपल्या सामाजिक जीवनात खरी न व्हावी ह्याबद्दल आपण जागरूकतेने प्रयत्न केला पाहिजे. म्हणून सामाजिक समतेची प्रतिज्ञा करून

समतेचा मधुर व उत्साहवर्धक अनुभव पुढारलेल्या वर्गांनी बहुजनसमाजातील वर्गास अवश्य करून दिला पाहिजे. ही गोष्ट करतानाच दोन्ही वर्गांतील लोकांनी दलितवर्गात जाऊन त्यांनाही या समतेचे ज्ञान करून देऊन या समतेचा अनुभव दिला पाहिजे. हेच आजच्या घटकेस समाजसुधारकांचे महत्त्वाचे व पहिले कर्तव्य आहे असे मी समजतो.

सामाजिक समतेची स्थापना करण्यास काय उपाय योजिले पाहिजेत हे सांगणे तितकेसे सोपे नाही. पण सामाजिक समतेचा उच्चार निरनिराळ्या व्यासपीठां-वरून होणे व त्या उच्चारामुळे समाजातील सनातनी प्रवृत्तींना आळा घालणे हे काम सुद्धा कमी महत्त्वाचे आहे असे मला वाटत नाही. म्हणूनच माझी सर्व समाजसुधारकांना अशी सूचना आहे की, त्यांनी अविलंबाने निष्ठापूर्वक सर्व हिंदू समाजाला एका व्यासपीठावर आणून सर्वांकडून व्यक्तिशः व सामुदायिक रीतीने या समतेच्या प्रतिज्ञेचा उच्चार करून घ्यावा. मनःपूर्वक केलेल्या अशा प्रतिज्ञेच्या उच्चारानंतर वैयक्तिक व सामाजिक जीवनातील आचारामध्येही फरक पडण्याचा संभव आहे. या समतेच्या स्थापनेकरिता बहुजनसमाजातील ध्येयवादी व बुद्धिवादी अशा तरुणतरुणींनी पुढे येणे आज जरूर आहे. बहुजनसमाजाला ज्यांचा आवाज जास्त सुलभतेने ओळखता येईल व पटेल असे बहुजनसमाजातीलच ध्येयवादी तरुण या कार्याकरिता पुढे आले तर समतेची सुधारणा लवकर सिद्ध होईल असे मला वाटते. त्या दृष्टीने तरुण मुलांमुलींच्या शिक्षणाकडे सुधारकांनी अवश्य लक्ष दिले पाहिजे. आजची तरुण मुलेमुली ही उद्याचे नागरिक असल्यामुळे त्यांना शिक्षण देताना जर आपल्या संस्कृतीचे यथायोग्य स्वरूप त्यांना समजावून दिले व सामाजिक समतेचे महत्त्व त्यांना पटवून दिले तर उद्याचे नागरिक तरी सामाजिक समतेचा निःसंकोचपणे स्वीकार करूनच राष्ट्रीय जीवनात भाग घेतील असे मला वाटते. या बाबतीत श्री. भाऊराव पाटील व श्री. बाबूराव जगताप यांनी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करणे जरूर आहे. मात्र अशा शिक्षणसंस्थातून अपरिपक्व विद्यार्थी-विद्यार्थिनींना शिक्षण देताना आपण एक खबरदारी घेणे जरूर आहे की, समतेचा प्रचार तर्कशुद्ध पद्धतीने करताना त्या प्रचारात क्रोध, द्वेष किंवा आततायीपणा यांना प्रवेश करू देऊ नये. समतेला विरोध करणारी सनातनी जनता ही रूढिप्राबल्यामुळे सदर विरोध करीत असते व ती जनता एका अर्थाने अज्ञानामुळे रूढीची दास बनलेली असते ही गोष्ट लक्षात ठेवून विषमतेवर तत्त्वदृष्टीने जोराचा हल्ला करताना सुद्धा, कदाचित अज्ञानामुळे जे विषमतेचा पुरस्कार करीत असतील त्यांच्याबद्दल सहानुभूतीची भावना ठेवणे जरूर आहे. त्यांचे अज्ञान नष्ट झाल्यास तेही समतेचा जयघोष करू लागतील ही गोष्ट समाजसुधारकांनी लक्षात ठेवणे अवश्य आहे. समाजसुधारणेचा प्रचार करताना गांधीजींचे ध्येय आपण आपल्या समोर ठेवल्याने समाजाचे कल्याण होईल. तत्त्वाचे कितीही आग्रहाने प्रतिपादन

केले तरी विरोधी व्यक्तीबद्दल मात्र सौम्य शब्दांचाच उपयोग करावा व त्याचेही अंतःकरण बदलण्याची मनीषा बाळगावी हे तत्त्व गांधीजींनी आपल्या अलौकिक जीवनात प्रत्यक्ष आचरून दाखविले. समाजसुधारणा हा समाजाचा कौटुंबिक प्रश्न असल्यामुळे कुटुंबाच्या स्वास्थ्याला विघातक होईल असे काही न करता सर्व कुटुंबाचे मतपरिवर्तन करून सामाजिक समता स्थापन करणे इष्ट आहे ही गोष्ट समाजसुधारकांनी लक्षात ठेवली पाहिजे. म्हणूनच मला असे वाटते की, आपल्या संस्कृतीचा तौलनिक अभ्यास केलेले व सामाजिक सुधारणेचे तत्त्व मनापासून पटलेले बुद्धिवादी शिक्षक तयार करणे आज जरूर आहे. या कामी पुढारलेल्या वर्गातील बुद्धिमान लोकांनी पूर्ण साहाय्य करणे हे त्यांचे कर्तव्य आहे, पण त्यांना बहुजनसमाजातील बुद्धिवादी तरुणांची मदत मिळाल्यास हे कार्य जास्त सुलभतेने यशस्वी होईल असे मला वाटते.

सामाजिक समता व्यवहारात आणण्याकरिता आणखी एका मार्गाचा अवलंब करणे पुढारलेल्या वर्गातील लोकांना सहज शक्य आहे. मार्ग दिसावयास क्षुल्लक दिसेल पण सामाजिक विषमतेची जी मानसिक बोचणी मागासलेल्या व दलित वर्गातील सुशिक्षित लोकांना पुष्कळ वेळा बोचते ती नाहीशी करण्यास या मार्गाचा फार उपयोग होईल असे मला वाटते. निरनिराळ्या विद्वत्ता व्यवसायांत (liberal professions) श्रेष्ठपद मिळविलेल्या पुढारलेल्या वर्गातील नागरिकांनी त्यांच्याच व्यवसायात पदार्पण करणाऱ्या बहुजनसमाजातील व दलितवर्गातील तरुण सुशिक्षितांना जर प्रेमाने, सहानुभूतीने व प्रोत्साहन देण्याच्या बुद्धीने वागविले व त्यांच्याशी व्यवहार करताना मनमोकळेपणे व प्रामाणिकपणे समतेचा अवलंब केला तर मला वाटते बहुजनसमाजातील सुशिक्षितांच्या मनात जाचणारे विषमतेचे शल्य बरेचसे नष्ट होईल. ह्या दृष्टीने डॉक्टर, वकील, शिक्षक व इतर व्यवसायात काम करणाऱ्या सर्व नागरिकांना या बाबतीत महत्त्वाचे साहाय्य करता येईल. प्रसंगविशेषी चहापानासारखे क्षुल्लक दिसणारे समारंभ जर निरनिराळ्या व्यवसायातील सर्व जातींच्या लोकांनी घडवून आणले व अशा प्रसंगी सामाजिक सुधारणेबद्दल प्रेमाने व सौहार्दाने चर्चा केली तर कित्येक वेळा पसरणारे गैरसमज सहज नष्ट होतील असे मला वाटते. सामान्य जनतेला या समतेचे शिक्षण देण्याकरिता प्राज्ञपाठशाळेसारख्या प्रागतिक संस्थांतून शिक्षण घेतलेले ध्येयवादी व चिकित्सक प्रचारक जर आपल्याला मिळाले तर त्यांचा अवश्य उपयोग होईल. आपल्या परमात्मविषयक विचारांची उदात्तता योग्य रीतीने समाजाला पटवून देऊन त्याच विचारांना अनुसरून अशी सामाजिक समता व्यवहारात अवलंबिणे जरूर आहे ही गोष्ट अशा तऱ्हेचे प्रचारक समाजाला सहज पटवून देऊ शकतील. कित्येक वेळा मला असे वाटते की, महाराष्ट्रात सामाजिक सुधारणेचा निरलसपणे व नितांत ध्येयनिष्ठेने प्रचार करणाऱ्या कोकजेशास्त्र्यांना जर बहुजनसमाजातील व दलितसमाजातील ध्येयवादी तरुणांचे

साहाय्य मिळाले तर समाजसुधारणेचा संदेश सर्वसामान्य जनतेला पोहोचविणे सहज सुलभ होईल. मोठ्या शहरात क्षुल्लक वाटणारे किंवहुना नष्टप्राय होत असलेले हळदी-कुंकू व सत्यनारायण यांसारखे प्रसंग लहान लहान गावात व खेडयात या समतेच्या प्रचाराच्या दृष्टीने करण्यात आले तर त्यांचेही महत्त्व कमी आहे असे मी समजत नाही. जातीयता नष्ट करण्याचा आणखी एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन व उत्तेजन देणे हा होय. विवाह ही बाब वैयक्तिक जीवनात अत्यंत महत्त्वाची असून विवाह ठरवितांना वधू-वरांचे शिक्षण, त्यांची सांपत्तिक स्थिती, त्यांच्या चालीरीती, त्यांच्या अपेक्षा व ध्येये, तसेच त्यांची आहारपद्धती या सर्व गोष्टींचा विचार करणे अवश्य असते. शिवाय विवाह ही बाब आता कौटुंबिक जबाबदारीची राहिली नसून तिला सर्वस्वी वैयक्तिक स्वरूप आलेले आहे. म्हणून विवाहाच्या बाबतीत सक्ती करणे अशक्य आहे ही गोष्ट मी मान्य करतो. पण विवाह ठरविताना वधू-वर एकजातीयच असले पाहिजेत ही जी परंपरागत कल्पना आहे त्या कल्पनेला सोडून जर काही ध्येयवादी तरुण व तरुणी आंतरजातीय विवाह करण्यास तयार झाले तर त्यांच्या वाटेत अडथळा निर्माण न करता त्यांना सर्वस्वी साहाय्य द्यावे व त्यांचे कौतुक करावे ही प्रवृत्ती, मला वाटते, सुधारकांनी प्रत्यक्ष आचरणात आणली पाहिजे. सामाजिक विषमतेचे एक चमत्कारिक स्वरूप जे बहुजनसमाजातील लोकांना विशेष बोचते ते असे की, बहुजनसमाजातील नागरिक कितीही सुशिक्षित झाला, तो कसाही संपन्न असला व कोणत्याही थोर पदवीला चढला तरी त्याला पुढारलेल्या वर्गातील लोक समानतेचा अनुभव येऊ देत नाहीत. म्हणून जन्मजात विषमतेचा नायनाट करण्याकरिता केवळ आर्थिक समता स्थापन करण्यानेच कार्यभाग होईल असे मला वाटत नाही. विशेषतः महाराष्ट्रात बहुजन-समाजातील सुशिक्षित वर्गामध्ये जो असंतोष आज पसरलेला आहे त्या असंतोषाचे निराकरण करण्यास आर्थिक समतेपेक्षा सामाजिक समतेची जास्त जरूर आहे अशी माझी कल्पना आहे.

लोकशाहीची राज्यपद्धती आपल्या देशात नुकतीच सुरू झाली असल्यामुळे लोकशाहीविरोधी असलेल्या सर्व संस्था आपण नष्ट केल्या पाहिजेत. आणि मला प्रामाणिकपणे असे वाटते की, हिंदू समाजात पसरलेले निरनिराळे जातिभेद व त्या जातिभेदांवरून अपरिहार्यपणे निर्माण होणाऱ्या श्रेष्ठ-कनिष्ठपणाच्या भावना व आपपरतेच्या कल्पना या लोकशाहीशी सर्वस्वी विरोधी आहेत. म्हणून लोकशाहीवर निष्ठा असणाऱ्या सर्व नागरिकांनी या श्रेष्ठ-कनिष्ठपणावर आधरलेल्या कल्पनांचे निर्मूलन करण्यास साहाय्य करणे हे त्यांचे कर्तव्य आहे.

यज्ञोपवीताचे मूळ स्वरूप

हिंदू समाजात वर्णभेदामुळे जी श्रेष्ठ-कनिष्ठपणाची कल्पना कित्येक शतके

प्रचलित झाली आहे त्या कल्पनेचा एक महत्त्वाचा आधार म्हणजे उपनयन संस्कार होय असे दिसते. द्विज व शूद्र किंवा त्रैवर्णिक व इतर हा जो भेद हिंदुधर्मशास्त्रात प्रामुख्याने केला जातो त्या भेदाचा मूळ आधार म्हणजे उपनयन संस्था होय हे उघड आहे. नैसर्गिक जन्म सर्व जातींना सारखाच लागू आहे. पण उपनयन केल्यामुळे त्रैवर्णिक लोक पुनः जन्म घेतात असे मानण्यात येते व म्हणूनच त्यांना द्विज म्हणण्याची पद्धत पडली आहे. या उपनयनानंतर यज्ञोपवीत येते व यज्ञोपवीताचे महत्त्वही सनातनी हिंदू समाज फार मोठे आहे असे समजतो.

यज्ञोपवीतं परमं पवित्रं प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात् ।

असे यज्ञोपवीताचे केलेले वर्णन सर्वांच्या परिचयाचे आहे. या यज्ञोपवीताबद्दल टिळकांनी आपल्या ओरायन या ग्रंथात केलेले विवेचन मोठे उद्‌बोधक व मनोरंजक आहे. टिळक म्हणतात :

"Orion or Mrigashiras is called Prajapati in the Vedic works, otherwise called *Yajna*. A belt or girdle of cloth round the waist of Orion or *Yajna* will, therefore, be naturally named after him as *Yajnopavita*, the *Upavita* or the cloth of *Yajna*. The term, however, now denotes the sacred thread of the Brahmins and it may naturally be asked whether it owes its character, if not the origin, to the belt of Orion."

हे आपले मत असे का झाले याबद्दल निरनिराळी कारणे सांगून टिळक पुढे असे म्हणतात की, "यज्ञोपवीतं परमं पवित्रं" हा श्लोक Haoma Yestha या धर्मग्रंथातील वचनाशी फार सदृश आहे. पुनः एकदा टिळकांचे मत उद्‌धृत करणे अगत्याचे आहे :

"It says, '*Yajnopavita* is high and sacred; it was born with *Prajapati* of old.' The word *Purastat* corresponds with *paurvanim* in the *Avesta* verse and thus decides the question raised by Dr. Haug, while *sahaja*, born with the limbs of *Parjapati*, conveys the same meaning of *Mainyutastem*. The coincidence between these verses cannot be accidental and it appears to me that the sacred thread must be derived from the belt of Orion. Upavita, from *ve* to weave, literally means a piece of cloth and not a thread. It appears, therefore, that a cloth worn round the waist was the primitive form of *Yajnopavita*, and that the idea of sacredness was introduced by the theory that it was to

be a symbolic representation of *Prajapati's* waist-cloth or belt."

या टिळकांच्या मतावरून यज्ञोपवीताचे ऐतिहासिक स्वरूप आपल्या लक्षात येईल. उपनयन समारंभ पूर्वकाली फार महत्त्वाचे होते ही गोष्ट कोणीही नाकारणार नाही. लहान मुलाला त्याचे अध्ययन सुरू करताना उपनयनाचा संस्कार करून त्याला गुरूच्या ताब्यात देण्याची पद्धत होती. तत्कालीन शिक्षणपद्धतीमध्ये उपनयनाचे स्थान या दृष्टीने फार महत्त्वाचे होते. वेदविद्या ही स्त्रियांना व शूद्रांना देणे निंद्य आहे असा समज पूर्वकाली प्रचारात असल्यामुळे साहजिकच स्त्रियांना व शूद्रांना उपनयनाचे अधिकार नव्हते. आज उपनयन संस्थेचे महत्त्व कितपत उरले आहे हे आपण जाणताच, व वेदविद्या ही इतर अनेक विद्यांसारखीच आज सर्व समाजाला, पुरुष व स्त्रिया यांनासुद्धा, सारखीच उपलब्ध झाली आहे. अशा स्थितीत वेदविद्येच्या ज्ञानदानावर घातलेल्या मर्यादा आज तशाच ठेवाव्यात असे कोणीही समंजस मनुष्य मानणार नाही. अशा स्थितीत उपनयनाचे पूर्वीचे स्वरूप कायम ठेवून उपनयन हे शूद्रांना उपलब्ध असू नये असे म्हणणे सर्वस्वी अविचाराचे होईल. मला वाटते की, आज जर आपण ज्या ज्या हिंदूला उपनयन करण्याची इच्छा असेल त्याने उपनयन करावे असा प्रचार सुरू केला तर अद्यापि धर्मसंस्थांवर विश्वास असणारा बहुजनसमाज व दलितसमाज यापैकी अनेक नागरिकांना मोठे समाधान मिळाल्यासारखे होईल. यापुढे उपनयन संस्कार करताना शुद्ध व स्पष्ट वेदोच्चार करणारे पुरोहित मिळणे मुष्किल होईल हे मी जाणतो. कारण वेदविद्येतील शब्द जिवंत ठेवण्याचे एका अर्थाने महत्त्वाचे कार्य ज्या पुरोहितवर्गाने केले तो पुरोहितवर्ग आज जवळजवळ नष्टप्राय झाला आहे. तरी पण उपनयन संस्था हिंदू समाजात जिवंत राहणार असेल तर त्या उपनयन संस्थेचा फायदा सर्व हिंदू समाजाला मिळावा अशी चळवळ आपण करणे जरूर आहे. तात्पर्य, बहुजनसमाजापुरते बोलायचे झाल्यास त्याच्या मनात विषमतेमुळे उत्पन्न होणारा असंतोष नष्ट करण्याकरिता व खऱ्या बंधुभावाची भावना निर्माण करण्याकरिता सामाजिक समतेचे वातावरण सुरू होणे आज महाराष्ट्रात अत्यंत जरूर आहे.

सामाजिक समता व हरिजन

त्याबरोबरच याच समतेच्या तत्त्वाचा पुरस्कार दलितवर्गांमध्ये सुद्धा करण्याचे काम आपण टाळता उपयोगी नाही. हा दलितवर्ग देखील आपल्या राष्ट्रामध्ये केवढ्या मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात आहे याची आपल्यापैकी पुष्कळांना अंधुक सुद्धा कल्पना नसते. डॉ. आंबेडकरांच्या मते सबंध हिंदुस्थानात क्रिमिनल ट्राइब्स या नावाने ओळखल्या गेलेल्या दलितवर्गातील लोक २ कोटी आहेत. ॲबॉरिजिनल ट्राइब्जची संख्या १॥ कोटी आहे व इतर अस्पृश्य जनतेची संख्या

५ कोटी आहे. एवढा बहुसंख्य हिंदू समजला जाणारा समाज अशा हीन, दीन व अस्पृश्य स्थितीत अद्यापि राहावा ही गोष्ट सर्व हिंदूंना अत्यंत लांछनाची आहे. आदिवासी किंवा वारली या लोकांबद्दल समाज कधी कधी जागा होतो. पण सामान्यतः हे व त्यांच्यासारखेच इतर अस्पृश्य लोक यांना आर्थिक व सामाजिक दृष्टीने किती हीन दर्जाचे जीवन कंठावे लागते याची हिंदू समाजातील सुधारकांनी घ्यावी तशी दखल घेतलेली दिसत नाही. या जनतेचा प्रश्न सोडविताना मात्र आपल्याला केवळ सामाजिक समतेचाच प्रचार करून चालणार नाही. समाजसुधारकांना या गरीब जनतेची सेवा करताना शैक्षणिक व आर्थिक चळवळीचाही अंगीकार करावा लागेल. या बिचाऱ्या लोकांना जीवनविषयक सामान्य शिक्षण देऊन स्वच्छतेच्या कल्पना त्यांना करून देणे जरूर आहे. त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या प्रयत्नांची जबाबदारी आपण अंगावर घेतली पाहिजे. माणुसकीला जवळजवळ पारखा झालेला हा समाज पुनः माणसांमध्ये आणून त्याला समतेच्या व्यासपीठावर योग्य ते स्थान देण्याची चळवळ सर्व दृष्टींनी समाजसुधारकांनी ताबडतोब केली पाहिजे असे मला वाटते. नुसते कायदे पास करून हरिजनांना समतेचा अनुभव मिळेल असे मला वाटत नाही. जोपर्यंत कायद्यातील कलमे व जनतेतील विश्वास व चालीरीती यांमध्ये फार मोठे अंतर आहे तोपर्यंत कायद्यातील कलमांचा व्हावा तसा अंमल समाजात होणार नाही. खेडोखेडी किंबहुना लहान गावात सुद्धा हरिजनांना अन्यायाने वागविल्यानंतर, तसेच त्यांचे नागरिकत्वाचे हक्क नाकारल्यानंतर सुद्धा, त्याबद्दल दाद मागणे त्यांना साहजिकच सोपे अगर सोयीचे असत नाही. म्हणून या कायद्यांचा पूर्ण फायदा हरिजनांना मिळावा अशी आपली जर इच्छा असेल तर आपण या बाबतीत सामाजिक चळवळ फार मोठ्या नेटाने करणे जरूर आहे. ही चळवळ करताना आपण कोणी श्रेष्ठ आहोत व ते हीन आहेत अशा तऱ्हेची वृत्ती आपण स्वीकारू नये. तशा वृत्तीचा नुसता आभास झाला तरी हरिजन समाज रुष्ट व असंतुष्ट होणे अपरिहार्य आहे. देवालये उघडी करून हिंदूंच्या देवतांचे दर्शन घेण्याची संधी त्यांना कायद्याने दिली आहे ही गोष्ट योग्य आहे. कारण हिंदुधर्माच्या आचारस्वरूपाचे निष्ठेने व मनःपूर्वक संरक्षण करणारे जितके नागरिक हरिजन समाजात दिसतात तशा तऱ्हेचे आचरण करणारे नागरिक पुढारलेल्या समाजात दिसतील असे मला वाटत नाही. हिंदू धर्मावर या वर्गाची इतकी आत्यंतिक निष्ठा आहे की, त्यांच्यावर अमानुष स्वरूपाचे अन्याय हिंदू धर्माने शतकानुशतके केलेले असताना सुद्धा ते हिंदू धर्माला चिकटून राहिले आहेत. म्हणून गांधींनी हरिजनोद्धाराची चळवळ आत्यंतिक निष्ठेने स्वीकारली. या चळवळीमध्ये शिथिलता न येऊ देता आपण त्या चळवळीचे स्वरूप जास्त व्यापक करून हरिजनांच्या शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक उन्नतीचा उद्योग निरलसपणे सुरू केला पाहिजे. हरिजन समाजातील काही व्यवसाय सुधारण्याची तजवीज शक्य तितक्या लवकर

केली पाहिजे. उदाहरणार्थ, भंग्याचे काम करणारे हरिजन समजातील लोक जरी तक्रार न करता आपले काम करीत असले तरी त्या कामाचे गलिच्छ स्वरूप लक्षात घेता त्या कामातून त्यांची मुक्तता करण्याचा प्रयत्न जनतेने अवश्य केला पाहिजे. या बाबतीत आजच्या परिषदेने काही विचार करून मार्गदर्शन करावे असे मला वाटते. हरिजनांचा उद्धार करण्याचे व्रत राष्ट्राने घटनेच्या द्वारा अंगीकारिलेले आहे. हरिजनांना अस्पृश्य मानणे हा गुन्हा असून त्यांची आर्थिक उन्नती करण्याकरिता त्यांना विशेष सवलती देण्याचे राष्ट्राने ठरविले आहे. या सर्व सवलती त्यांना देणे अत्यंत अगत्याचे असून त्या सवलतींचा पूर्ण फायदा मिळून त्यांचा लवकर उत्कर्ष व अभ्युदय व्हावा अशीच आपण सर्वजण प्रार्थना करू या. पण नुसत्या या सवलतींवर अवलंबून न राहता समाजशिक्षणाच्या द्वारा त्यांना नागरिक म्हणून मानाचे स्थान इतर समाजात मिळावे याबद्दल खटपट करणे हे समाजसुधारकांचे पवित्र कर्तव्य आहे. म्हणूनच मला असे वाटते की, समाजसुधारणेच्या व्यासपीठावरून हरिजनांना बरोबरीच्या नात्याने नागरिक म्हणून तयार करण्याचे कार्यक्रम जोराने अंगीकारणे जरूर आहे. हरिजनांमध्ये मिसळून त्यांच्याशी समरस होऊन कोणत्याही मोठेपणाचा आविष्कार यत्किंचितही न करता त्यांची सेवा करणे हे आजच्या समाजसुधारकांचे पवित्र कार्यक्षेत्र आहे अशी माझी भावना आहे. म्हणून या विषयावर आजच्या आपल्या परिषदेने सर्व समाजसेवकांना योग्य तो आदेश द्यावा अशी माझी सूचना आहे. या कामामध्ये सुद्धा जर पुढारलेल्या व मागासलेल्या वर्गातील ध्येयवादी पुरोगामी बुद्धीचे तरुण कार्य करण्यास पुढे येतील तर हे कार्य लवकर व जास्त यशस्वी होईल. टिळक-आगरकर यांच्या पिढीमध्ये ब्राह्मणवर्गातील उदात्त ध्येयवादी तरुणांनी स्वार्थत्यागपूर्वक समाज-सेवेचे कंकण बांधून शिक्षणप्रसाराच्या कार्यात स्वतःला जसे वाहून घेतले तसेच आजच्या घटकेस पुढारलेल्या व मागासलेल्या वर्गातील सुशिक्षित तरुणांनी समाज-सेवेला वाहून घेणे फार अगत्याचे आहे असे मला वाटते. या कामी पुढारलेल्या वर्गातील समाजसेवकांनी अवश्य पुढाकार घ्यावा, पण त्यांना इतर वर्गातील विद्वानांचे व सेवकांचे साहाय्य मिळाल्यास समाजसुधारणेचे ध्येय गाठणे जास्त सुलभ होईल.

सामाजिक समता व हिंदू कोड बिल

सामाजिक समता स्थापन करण्याच्या कार्यामध्ये हिंदू कोड बिलाने फार महत्त्वाची मदत होईल अशी माझी समजूत असल्यामुळे हिंदू कोड बिल पास होऊ शकले नाही याबद्दल मला स्वतःला अत्यंत विषाद वाटतो. हिंदू कोड बिलाला सनातनी समाजाकडून जो विरोध यशस्वीपणे करण्यात आला त्या विरोधाच्या विरुद्ध पुरोगामी व बुद्धिवादी लोकांकडून काही मोहीम करण्यात आली नाही ही मोठी असमाधानाची गोष्ट आहे. हिंदू कोड बिल पास झाल्याने हिंदू धर्मावरफार मोठा

आघात होईल या कल्पनेचा या प्रकरणी विजय झाला असे म्हटले पाहिजे. म्हणून हिंदू कायद्याचा इतिहास तर्कदृष्टीने समाजापुढे मांडणे अत्यंत अगत्याचे होऊन बसले आहे. जी अंध दृष्टी इतर सामाजिक संस्थांबद्दल समाजामध्ये आढळते तशाच तऱ्हेची तर्कशून्य वृत्ती या बाबतीत सुद्धा प्रचलित आहे. हिंदू कायद्याचे उगमस्थान वेद असून हिंदू कायदा हा वेदकालापासून आहे तसाच अपरिवर्तित चालत आला आहे अशी एक भ्रामक समजूत समाजात प्रचलित आहे व या भ्रामक समजुतीचे निराकरण करणे प्रथम अवश्य आहे. या दृष्टीने हिंदू कायद्याच्या इतिहासाचे विहंगम दृष्टीने अवलोकन करणे जरूर आहे. वेदकालापासून ब्रिटिश राजवट हिंदुस्थानात सुरू होईपर्यंत साधारण मानाने ६००० वर्षांचा विशाल असा इतिहास हिंदू कायद्याच्या बाबतीत दिसून येतो. आपल्या प्राचीन ग्रंथांचा कालनिर्णय करण्याचा प्रश्न मोठा विकट असून त्याबद्दल अनेक विद्वानांनी परस्परविरोधी अशी अनुमाने काढलेली आहेत. डॉ. काणे यांनी आपल्या हिंदुधर्मशास्त्राच्या इतिहासामध्ये जी कालगणना स्वीकारली आहे तिचा अनुवाद मी येथे करू इच्छितो. वेदकाल हा साधारणपणे ख्रिस्तपूर्व ४००० ते १००० असा असावा. त्यानंतर श्रौतसूत्रांचा काल ख्रिस्तपूर्व ८०० ते ४०० वर्षे असावा. धर्मसूत्रे ख्रिस्तपूर्व ६०० ते ३०० पर्यंत झाली असावी. कौटिल्याचे अर्थशास्त्र ख्रिस्तपूर्व ३०० ते ख्रिस्तोत्तर १०० या कालामध्ये लिहिले असावे. मनुस्मृतीचा काल ख्रिस्तपूर्व २०० ते ख्रिस्तोत्तर १०० असा असून याज्ञवल्क्य स्मृती ख्रिस्तोत्तर १०० ते ३०० पर्यंत लिहिली गेली असावी. इतर सर्व स्मृतिग्रंथ इ. स. ९०० पूर्वीच लिहिले गेले असले पाहिजेत. मेधातिथीची मनुस्मृतीवरील टीका इ. स. ९०० साली लिहिली असावी व मिताक्षरेचा विद्वान ग्रंथकार विज्ञानेश्वर हा इ. स. १००० ते ११०० या दरम्यान झाला असावा. जीमूतवाहन ११०० ते ११५० या दरम्यान व नंद पंडिताचे ग्रंथ १५२० ते १६३० या दरम्यान लिहिले असावे. निर्णयसिंधूचा काल १६१० ते १६४० व व्यवहारमयूखाचा काल १६१५ ते १६४५ असावा. धर्मशास्त्रविषयक ग्रंथातील शेवटचा महत्त्वाचा ग्रंथ धर्मसिंधु हा १७९० साली लिहिला गेला असावा. सारांश, ख्रिस्तपूर्व ४००० वर्षांपासून हिंदुधर्माची सुरवात झाली असे जर समजले तर हिंदू कायद्यावरील ग्रंथलेखकांची परंपरा १७९० पर्यंत चालू होती असे दिसते. प्रथमदर्शनीच ही गोष्ट ऐतिहासिक दृष्टीने कोणत्याही अभ्यासकाच्या सहज लक्षात येईल की, कायद्यासारखी लोकोपयोगी व समाजसेवक संस्था ५००० ते ६००० वर्षे इतक्या मोठ्या कालखंडात अबाधित व अपरिवर्तित अशी राहणे अशक्य आहे. समाज प्रगतिमान व जिवंत राहावयाचा असेल तर सामाजिक संस्था या सुद्धा प्रगतिशील व पुरोगामी अशा असाव्या लागतात आणि हिंदू समाज जो इतकी अनेक शतके जिवंत राहिला आहे त्याचे मुख्य रहस्य असे की, हिंदू सामाजिक संस्था व हिंदूंचे कायदे हे सुद्धा बदलणाऱ्या परिस्थितीत बदलत गेले आहेत. मात्र हे

परिस्थितीनुरूप होणारे बदल करण्याची हिंदूंची पद्धत थोडीशी असामान्य होती. हिंदू कायद्याचे मूळ वेद ही कल्पना हिंदू मनात सदैव जागृत होती. पण हिंदू कायद्याचे इतर आधार स्मृतिकारांनी मानले आहेत. उदाहरणार्थ :

श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः।
सम्यक्संकल्पजः कामः धर्ममूलमिदं स्मृतम् ॥

असे याज्ञवल्क्याने धर्ममूलाचे मोठे सार्थ वर्णन केले आहे. धर्ममूलामध्ये सदाचार या धर्ममूलाचे किती महत्त्वाचे स्थान याज्ञवल्क्याने दर्शविले आहे हे आपल्या सहज लक्षात येईल. सदाचार या शब्दाने तत्कालीन समाजनेत्यांनी मानलेले व समाजात रूढ झालेले आचार असा अर्थ उघडच होतो आणि बदलणाऱ्या आचारांना धर्माच्या मूलामध्ये स्थान देण्यात याज्ञवल्क्याने किती पुरोगामी बुद्धी दाखविली आहे हे विस्ताराने न सांगताच आपल्या लक्षात येईल; आणि मौज अशी की, सदाचाराला अनुरूप असा कायद्यामध्ये बदल करताना वेदाचेच आणि स्मृतिवचनांचेच आधार घेण्याची पद्धत आपल्या टीकाकारांनी अवलंबिलेली आहे. निरनिराळ्या वचनांतून परिस्थित्यनुरूप निरनिराळे अर्थ काढण्यामध्ये आपल्या टीकाकारांनी जे कौशल्य अनेक वेळा व अनेक विषयांवर व्यक्त केले आहे त्या कौशल्याचे एका अर्थाने कौतुक करणे अवश्य आहे. अर्थातच हे कौशल्य व्यक्त करीत असताना कधी कधी शब्दांची ओढाताण होणे अपरिहार्य होते. पण ही ओढाताण करण्यामध्ये टीकाकारांचा उद्देश एकच होता. तो म्हणजे कायदा व लोकरूढी व लोकसमज यांच्यामध्ये अंतर पडू द्यावयाचे नाही. नाही तर त्याच वेद व स्मृतिग्रंथांवर आधारलेले हिंदू कायद्यामधील भिन्न संप्रदाय व त्या संप्रदायातही अनेक उपसंप्रदाय निर्माण कसे झाले या कोड्याची उपपत्ती लागत नाही. मिताक्षराकर्ता व दायभागकर्ता हे दोघेही वेद व स्मृती यांना सारखेच प्रमाण मानतात. पण अनेक महत्त्वाच्या विषयांवर या दोघांच्या मतात जमीनअस्मानाचे अंतर आहे. तसेच मिताक्षरेला पूज्य मानणारे पण मिताक्षरावचनांचा भिन्न भिन्न अर्थ करणारे अनेक उपसंप्रदाय मिताक्षरेच्या परंपरेत निर्माण झाले आहेत. या सर्व परंपरा व उपपरंपरा यांचा चिकित्सापूर्वक अभ्यास केला असता अभ्यासकांना ही गोष्ट सहज पटेल की, प्रमाणभूत ग्रंथांचा समन्वय करण्याची जादूगिरी करून निरनिराळ्या प्रदेशात व निरनिराळ्या वेळी झालेल्या टीकाकारांनी हिंदू कायद्याच्या प्रगतीला अमोलिक असे साहाय्य केले आहे. म्हणूनच हिंदू धर्म हा अपरिवर्तनीय न राहता हिंदू समाज जसजसा निरनिराळ्या ठिकाणी पसरत गेला तसतशा या पसरणाऱ्या समाजाच्या गरजा व आकांक्षा तृप्त करण्याकरिता हिंदू कायद्यात जरूर ते फेरफार साहजिकच करण्यात आले. दुर्दैवाने ही टीकाकारांच्या द्वारा कायद्यामध्ये प्रगती करण्याची परंपरा ब्रिटिशांच्या राजवटीत बंद झाली व हिंदू कायद्याची प्रगती या राजवटीत थांबली.

एक गोष्ट मान्य करणे जरूर आहे की, ज्याला आधुनिक कायदेपंडित पॉझिटिव्ह किंवा सेक्युलर लॉ म्हणतात अशा कायद्याचे वर्णन अत्यंत वक्तृत्वपूर्णपणे केल्याचे स्मृतिग्रंथांतून पुष्कळ वेळा दिसून येते. पण कायद्याचे मूळ उगमस्थान वेद व स्मृतिग्रंथ आहेत ही कल्पना हिंदू मनावर इतकी बिंबित झालेली होती की, कायदा करण्याचे कार्य राजाने करावे असा विचार स्मार्त ग्रंथांमध्ये कोठेच व्यक्त केलेला दिसत नाही. धर्म हा शब्द अती व्यापक अर्थाने स्मृतिकारांनी वापरलेला असल्यामुळे या 'धर्म' शब्दात आचारधर्म, व्यवहारधर्म व इतर सर्व धर्म सुद्धा अंतर्भूत होतात. 'धर्म' शब्दाचा अर्थ आपल्या संस्कृत वाङ्मयात कसकसा बदलत गेला याचा विचार करणे मोठे मनोरंजक होईल. 'धर्म' हा शब्द डॉ. काण्यांचे मते ऋग्वेदामध्ये ५६ ठिकाणी आलेला आहे. बहुधा ऋग्वेदामध्ये या शब्दाचा अर्थ धारण करणे, संरक्षण करणे, वर्धविणे असा दिसतो. ऋग्वेदामध्ये हा शब्द अनेक प्रसंगी नपुंसकलिंगी योजलेला दिसतो. कर्मकांडाचे युग सुरू झाल्यानंतर 'धर्म' या शब्दाचा कर्मकांडविषयक अर्थ प्रचलित व प्रबल झाला. उपनिषत्कालात चातुर्वर्ण्यविषयक धर्माला महत्त्व मिळाले व या चातुर्वर्ण्यविषयक अर्थाचाच उपयोग मनू व याज्ञवल्क्य यांच्या ग्रंथांत प्रामुख्याने केलेला दिसतो. मेधातिथीने तर या धर्माचे पंचविध स्वरूप वर्णिले असून त्यामध्ये वर्णधर्म, आश्रमधर्म, वर्णाश्रमधर्म, नैमित्तिक धर्म व गुणधर्म असे धर्माचे स्वरूप आहे. मीमांसक धर्माला

चोदनालक्षणोऽर्थो धर्मः ।

असे मानतात तर वैशेषिक

यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः ।

असे समजतात. सारांश, 'धर्म' या शब्दाचा एकच सुसंगत असा अर्थ संस्कृत वाङ्मयात दिसत नाही. 'धर्म' या शब्दाच्या बदलणाऱ्या अर्थावरूनच हिंदूंच्या धर्मविषयक व सामाजिक कर्तव्याबद्दलच्या कल्पनांमध्ये कसकशी प्रगती झाली याबद्दल सुद्धा अनुमान काढणे हे एखाद्या चिकित्सक अभ्यासकाला शक्य होईल असे मला वाटते. माझा सांगण्याचा मुद्दा असा की, कायदा या अर्थाने धर्माचे स्मृतिग्रंथांत वर्णन केलेले आढळते व ते वेदवाङ्मयावर व सदाचारावर आधारलेली संस्था अशा स्वरूपाचे दिसते. लोकसभा किंवा राजे यांना व्यवहारधर्म ठरविण्याचा अधिकार होता असे अनुमान काढण्यास फारसा पुरावा स्मार्तग्रंथांत मिळत नाही व त्यामुळेच स्मार्तग्रंथांचाच आधार घेऊन व सदाचाराला धर्माचे एक मूळ समजून टीकाकारांना कायद्याची प्रगती मीमांसेच्या नियमांचा आधार घेऊन व प्रसंगविशेषी शब्दच्छल करून करावी लागली. ब्रिटिशांच्या राजवटीमध्ये प्रजाजनांच्या धर्मविषयक कल्पनांत मुळीच ढवळाढवळ न करण्याचे धोरण स्वार्थबुद्धीने राज्यकर्त्यांनी अवलंबिल्यामुळे

कायदेमंडळात धर्मविषयक कायदे मान्य व्हावेत तसे झाले नाहीत व टीकाकारांचे युग संपल्यामुळे जुन्या परंपरेला धरूनसुद्धा प्रगती होऊ शकली नाही. त्यामुळे जुन्या शब्दांना प्रामाण्य मिळून हिंदू कायद्याची प्रगती ब्रिटिश राज्यात सर्वस्वी कुंठित झाली. पण आता स्वातंत्र्ययुग सुरू झाले असल्यामुळे टीकाकारांचा काल संपला असून लोकशाही प्रतिनिधींचा काल सुरू झालेला आहे व म्हणूनच सामाजिक गरजा व अपेक्षा व सामाजिक ध्येये यांच्याशी सुसंगत असलेला कायदा पास करण्याची जबाबदारी लोकशाहीवर येऊन पडली आहे व त्या दृष्टीने हिंदू कोड बिल राष्ट्रीय लोकसभेपुढे आणण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. पण तो प्रयत्न तूर्त तरी अयशस्वी झाल्यासारखा दिसत आहे.

सध्या प्रचलित असलेल्या हिंदू कायद्यामध्ये सुधारणा करणे अत्यंत अवश्य आहे या गोष्टीबद्दल हिंदू कायद्याचा अभ्यास केलेला कोणताही अभ्यासक विरुद्ध मत देईल असे मला वाटत नाही. सध्याच्या हिंदू कायद्यामधील अत्यंत तर्कदुष्ट असे स्वरूप म्हणजे हिंदू कायद्यामध्ये द्विज व इतर यांच्यामध्ये जो भेद करण्यात येतो तो होय. हिंदू कायद्याच्या बहुतेक महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये द्विज व शूद्र असा भेद केलेला आढळतो व या द्विविध पद्धतीचे मूळ म्हणजे द्विजांना उपलब्ध असलेली उपनयन ही संस्था होय. दत्तक किंवा वारसा किंवा विवाह या बाबतीत द्विजांचा कायदा एक व शूद्रांचा कायदा दुसरा अशी स्थिती आढळते. राजकीय व सामाजिक समतेच्या स्वातंत्र्ययुगामध्ये अशा श्रेष्ठ व कनिष्ठ कल्पनांवर आधारलेले हे भेद टिकू देणे सर्वस्वी अनिष्ट आहे असे मला वाटते, व हे भेद नष्ट करण्याचा एकच मार्ग म्हणजे सर्वसामान्य हिंदू जनतेला लागू असलेला एकच हिंदू कायदा पास करणे हा होय. जोपर्यंत लोकशाहीतील लोकसभा अशा तऱ्हेचा कायदा पास करीत नाही तोपर्यंत न्यायाधीशांना पूर्वीच्याच कायद्याचा अवलंब व अंमल करण्याशिवाय दुसरा मार्ग राहात नाही. याच विषमतेचे आणखी एक तीव्र व विषादकारक स्वरूप म्हणजे महाराष्ट्रामध्ये मराठा समाजाबद्दल जेव्हा जेव्हा न्यायालयात प्रश्न निघतो तेव्हा तेव्हा अनेक प्रसंगी मराठा समाजातील कुटुंबांना शूद्र म्हणण्याचा प्रसंग न्यायाधीशांवर येतो. महाराष्ट्रात वेदोक्त प्रकरणाबद्दल झालेला कडाक्याचा वाद आपल्यापैकी अनेकांच्या लक्षात असेल. मराठा समाजाने वेदोक्त करण्याचा आपला हक्क आहे असा दावा केल्यानंतर त्या हक्काच्या विरुद्ध सनातनी समाजाने मोठा विरोध केला. तशाच तऱ्हेच्या वादामधून सुब्राव वि. राधा ही केस मुंबई हायकोर्टापर्यंत निवाड्याकरिता आली. या कज्जामध्ये पक्षकार मराठा होते व त्यांचा दर्जा शूद्रांचा की क्षत्रियांचा असा प्रश्न उत्पन्न झाला होता. महाराष्ट्रातील ९६ कुळांतील मराठे हे क्षत्रिय आहेत ही गोष्ट निर्विवाद होती. पण ९६ कुळांमध्ये अंतर्भूत न झालेली जी अनेक मराठा कुटुंबे आहेत त्यांचा दर्जा काय असा प्रश्न न्यायालयापुढे निघाला होता व त्या प्रश्नाचा पुरोगामी दृष्टीने विचार करून सुद्धा

न्यायमूर्ती माडगावकर व न्यायमूर्ती पाटकर यांनी असा निकाल दिला की, कोणत्याही मराठा कुटुंबाच्या दर्जाचा निकाल करताना काही विशिष्ट कसोट्या लावून ते कुटुंब क्षत्रिय आहे की शूद्र आहे यासंदर्भात निर्णय द्यावा. त्या कुटुंबाची स्वतःची एतद्विषयक कल्पना काय आहे याचा विचार करावा. त्या कुटुंबातील चालीरीतींचा अभ्यास करावा व त्या कुटुंबाला समाजातील इतर घटक कसे मानतात हेही लक्षात घ्यावे. महत्त्वाच्या चालीरीती म्हणजे त्या कुटुंबात उपनयन झाले की नाही, त्या कुटुंबातील लोक यज्ञोपवीत वापरतात की नाही, त्या कुटुंबात आशौच मानले जाते की नाही, त्या कुटुंबात सगोत्र विवाह केले जातात की काय अशा स्वरूपाच्या आहेत असे उभय न्यायमूर्तींनी ठरविले. १९२८ साली हा निर्णय प्रसिद्ध झाला तेव्हा सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने न्यायमूर्तींनी मोठे साहाय्य केले असे सुधारकांना त्या वेळी वाटले. पण सामाजिक चालीरीती त्यानंतर इतक्या झपाट्याने बदलल्या की, न्यायमूर्तींनी ठरविलेल्या कसोट्या लावून आज कोणत्याही कुटुंबाचा दर्जा ठरविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे दरम्यान झालेल्या सामाजिक क्रांतीची उपेक्षा करणे होय असे अनेक वेळा आजच्या न्यायाधीशांना वाटते. आशौचाचे प्रकार सनातनी ब्राह्मणवर्गातही आता पुष्कळसे लुप्तप्राय झाले असून सगोत्र विवाह तर आता शास्त्रोक्त ठरलेला आहे. श्राद्धपक्षांचे प्रकरणही आता तितकेसे प्रचारात नसून यज्ञोपवीत तर कित्येक ब्राह्मण लोकसुद्धा घालीत नसतील. अशा स्थितीत १९२८ साली मान्य केलेल्या कसोट्या लावल्यामुळे मराठा समाजातील अनेक कुटुंबे शूद्र ठरण्याचा अनवस्था प्रसंग आज न्यायालयात येत असतो व शूद्रतेचा आरोप न्यायालयातील निर्णयामुळे सिद्ध झाल्यानंतर या कुटुंबातील नागरिकांना हिंदू कायद्याबद्दल साहजिकच फार असमाधान वाटते. मराठा समाजाचे महाराष्ट्रातील स्थान लक्षात घेता त्यांना शूद्र मानण्याचे हे प्रकार ताबडतोब बंद होणे अवश्य आहे ही गोष्ट जर सर्व समाजसुधारकांना मान्य असेल तर तशी सुधारणा करण्याचा एकच मार्ग म्हणजे हिंदू कायदा बदलणे ही होय हे सांगणे नकोच. महाराष्ट्रातील मराठ्यांची जी गोष्ट तीच कर्नाटकातील महत्त्वाचा असा जो लिंगायतांचा बहुजनसमाज त्याबद्दल दुर्दैवाने खरी आहे. पुरोहितवर्ग अनवश्यक असून भक्तांना प्रत्यक्ष परमेश्वराची भक्तिपूर्ण अंतःकरणाने सेवा करण्यास कोणताच प्रत्यवाय नाही अशा तत्त्वाचा प्रचार करणाऱ्या बसवाच्या अनुयायांना (लिंगायतांना) न्यायालयात अद्यापपर्यंत तरी निदान शूद्र समजले जाते. या अन्यायाची चीड आल्यामुळेच आम्ही हिंदूच नाही अशा तऱ्हेचे विचार लिंगायत सुशिक्षित लोकांच्या मनात साहजिकच येऊ लागले. सारांश, श्रेष्ठ-कनिष्ठ या भावनांवर आधारलेल्या नियमांना मान्य करणारा सध्याचा हिंदू कायदा समतेच्या युगात बदलला च पाहिजे असे मला वाटते व म्हणूनच हिंदू कोड बिल हे यशस्वी होऊ शकले नाही याबद्दल मला फार विषाद वाटतो. हिंदू कायदा सध्या जो न्यायालयात

मानला जातो त्या कायद्यामधील दुसरा एक तर्कदुष्ट प्रकार म्हणजे स्त्रियांबद्दल आहे. स्त्रियांच्या बाबतीत हिंदू कायद्याची जी प्रतिगामी स्वरूपाची व असहिष्णू वृत्ती आहे त्या वृत्तीला दुसऱ्या कोणत्याही पद्धतीत तोड मिळेल असे मला वाटत नाही व या प्रकरणामध्ये आणखी एक चमत्कारिक घटना अशी आहे की, विज्ञानेश्वराने आपल्या उदार मताला अनुसरून स्त्रियांना दिलेले हक्क सुद्धा ब्रिटिशांच्या राजवटीत काढून घेण्यात आले. या विषयावर सविस्तर चर्चा करण्याचे हे स्थान नव्हे; पण माझा प्रस्तुत मुद्दा एवढाच आहे की, जसा विषमतेच्या आधारावरून हिंदू कायदा बहुजनसमाजावर फार मोठा अन्याय करतो तसाच स्त्रीवर्गालाही हिंदू कायदा सध्याच्या स्वरूपात फार अन्यायकारक असा वाटतो ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. म्हणून स्त्रियांना योग्य ते अधिकार प्राप्त करून द्यावयाचे असल्यास हिंदू कायद्यात बदल करणे जरूर आहे व ते बदल घडवून आणण्याचा एकच मार्ग म्हणजे हिंदू कोड बिल लोकसभेत मान्य करून घेणे हा होय. स्त्रियांच्या अधिकाराबाबत किंवा एकत्र कुटुंबाच्या स्वरूपाबद्दल तसेच दत्तकप्रकरणी उत्पन्न होणाऱ्या निरनिराळ्या प्रश्नांबद्दल स्मृतिकारांच्या विवेचनामध्ये जे परस्परविरोधी अभिप्राय आढळतात त्या सर्वांचे ऐतिहासिक दृष्टीने अध्ययन केल्यास माझ्या समजुतीने एकच निष्कर्ष निघू शकतो आणि तो म्हणजे निरनिराळ्या टीकाकारांनी आपल्या समाजात व आपल्या काळी मान्य असलेल्या रूढींना कायद्यामध्ये स्थान देण्याचा केलेला तो यशस्वी प्रयत्न आहे. पण या ऐतिहासिक घटनांकडे दुर्लक्ष करून हिंदु कायद्यामध्ये कोणतीही सुधारणा केव्हाही सुचविली तरी हिंदू धर्मावर आघात होत आहे असा समज अद्यापि हिंदू समाजात पसरलेला दिसतो. हिंदू कायद्यात जे अनेक तर्कदुष्ट निर्बंध आहेत त्यांचे एक साधे उदाहरण येथे देणे अप्रस्तुत होणार नाही. सगोत्र विवाह हा हिंदू कायद्याप्रमाणे सर्वस्वी निषिद्ध मानला जात असे. याज्ञवल्क्याच्या ज्या श्लोकामध्ये या निषेधाचे मूळ सापडते तो श्लोक असा आहे :

अनन्यपूर्विकां कान्तामसपिण्डां यवीयसीम्।
अरोगिणीं भ्रातृमतीमसमानार्षगोत्रजाम्॥

आपण जर या श्लोकाकडे थोडेसे लक्ष दिले तर आपल्याला असे दिसून येईल की, वधूचे वर्णन करण्याकरिता याज्ञवल्क्याने अनेक विशेषणांचा उपयोग केला आहे. त्या सर्व विशेषणांपैकी 'असमानार्षगोत्रजाम्' या विशेषणाला प्राधान्येकरून कायद्याने विधीचे स्वरूप दिले आहे. याचे कारण मिताक्षराकारांनी असे सांगितले आहे की :

सपिंडासु समानप्रवरासु भार्यात्वमेव नोत्पद्यते। रोगिण्यादिषु तु भार्यात्वे उत्पन्नेऽपि दृष्टविरोध एव।

मिताक्षराकार विज्ञानेश्वर हा महाविद्वान टीकाकार होऊन गेला. याज्ञवल्क्यावरील त्याचे विवेचन विद्वत्ताप्रचुर, सार्थ व सुंदर अशा शब्दात केलेले आढळते. अनेक विषयांवर त्याची मते पुरोगामी व बुद्धिवादी अशी दिसतात. पण अशा पुरोगामी विद्वानाला सुद्धा विवाह विषयावर त्या वेळी समाजात प्रचलित असलेल्या रूढीचा मोह आवरला नाही, नाही तर सगोत्र विवाहाचा इतका कडवा विरोध विज्ञानेश्वराने केला नसता. हा सगोत्र विवाहाचा प्रश्न माधवराव वि. राघवेंद्रराव या कज्जात न्यायमूर्ती कनिया व मी यांच्यासमोर आला होता. त्या वेळी आम्ही दोघांनीही अदृष्ट विरोधावर आधारलेली सगोत्र विवाहाचा निषेध करण्याची वृत्ती आम्हा दोघांस अमान्य आहे हे अगदी स्पष्टपणे सांगितले होते. पण मिताक्षरेच्या शब्दाला मान देण्याची परंपरा आज अनेक वर्षे न्यायालयाने मान्य केली आहे त्या परंपरेला अनुसरून मिताक्षरेचे मत स्वीकारणे आम्हांला भाग होते. त्या कज्जात वधूवरांच्या समाजातील विशिष्ट अशा रिवाजांचा पुरावा भरपूर असल्यामुळे तो विवाह निषिद्ध ठरला नाही ही गोष्ट निराळी. पण जर तशी विशिष्ट रूढी शाबीत झाली नसती तर नाइलाजाने व नाखुषीने का होईना पण आमच्यावर मिताक्षरेचे मत मान्य करून तो विवाह निषिद्ध ठरविण्याचा प्रसंग आला असता. योगायोग असा की, आम्ही तो निर्णय दिल्यानंतर लवकरच १९४६ चा २८ वा कायदा पास झाला व त्याअन्वये सगोत्र विवाहाच्या निषेधाची ही अत्यंत असमंजस व तर्कदुष्ट पद्धत बंद करण्यात आली. म्हणून हिंदू कायद्यात सध्या प्रचलित असलेले अनेक अतार्किक प्रकार जर बदलावयाचे असतील व हिंदू कायद्यात दिसून येणारे विषमतेचे विष जर नष्ट करावयाचे असेल तर हिंदू कोड बिल लोकसभेने मान्य करणे जरूर आहे असे मला वाटते. हिंदू कोड बिलामध्ये समाविष्ट झालेल्या सर्वच कलमांची मी तरफदारी करू इच्छीत नाही. मिताक्षरेने सांगितलेली एकत्र कुटुंबपद्धती इष्ट की अनिष्ट या प्रश्नावर मी चर्चा करू इच्छीत नाही. पण माझे आग्रहाने असे म्हणणे आहे की, हिंदु कायद्यात सुधारणा करणे जरूर आहे हे तत्त्व मान्य केल्यानंतर हिंदू कायद्याचा अभ्यास केलेल्या सर्व अभ्यासकांनी एकत्र येऊन हिंदू कायद्यात कोणकोणते फेरफार केल्याने हिंदू समाजाच्या प्रगतीला मदत होईल या गोष्टीचा निर्णय करून ते फेरफार अंतर्भूत केलेला सर्वांगीण व सर्वग्राही असा हिंदू कायदा पास करणे आज अत्यंत आवश्यक आहे. निरनिराळ्या विषयांवर निरनिराळे कायदे वेळोवेळी पास करण्याने योग्य अशी सर्वांगीण सुधारणा होऊ शकत नाही व म्हणूनच राव कमिटीने या सुधारणांचा पूर्ण विचार करून हिंदू कायदा विषयक बिल लोकसभेपुढे सादर केले होते. तेव्हा आपल्या परिषदेला माझी अशी आग्रहाची सूचना आहे की, तिने हिंदू कोड बिलाला आपला हार्दिक पाठिंबा द्यावा.

हिंदु कोड बिलाविरुद्ध सेक्युलॅरिझमच्या नावाने एक आक्षेप अनेक वेळा

वेतला जातो. हा आक्षेप वेणारे लोक काही प्रामाणिक असतील हे मी कबूल करतो; पण काही लोक हा आक्षेप हिंदू कोड बिल हाणून पाडण्याच्या दृष्टीने घेत असावेत असा कधी कधी संशय येतो. हिंदू कायद्यात सुधारणा करण्याकरिता निरनिराळी विले आणली तर हेच आक्षेपक अशी निरनिराळी बिले आणू नका, या प्रश्नाचा सर्वांगीण दृष्टीने विचार करून एकच बिल आणा, असे प्रतिपादन करतात. बरे, तुम्ही एकच बिल आणले तर हे आक्षेपक म्हणतात, नुसत्या हिंदूपुरतेच एक बिल का? सर्व नागरिकांना लागू होणारा एकच कायदा तुम्ही का करीत नाही? सर्व नागरिकांना सामान्यपणे लागू होणारा एकच वैयक्तिक कायदा मान्य करण्याचे उदात्त ध्येय घटनेने ४४ व्या कलमात घोषित केलेले आहे. पण घटना करणाऱ्या सर्व देशभक्तांना या गोष्टीची जाणीव होती की, हे ध्येय एकसमयावच्छेदेकरून व एकदम गाठता येणे शक्य नाही. आपल्या राष्ट्रात जे निरनिराळ्या धर्मांचे समाज आहेत त्या समाजांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक कल्पना निरनिराळ्या पातळीवर असल्यामुळे एका समाजाला जी सुधारणा पचेल ती दुसऱ्या समाजाला पचेल असे सांगता येत नाही. विशेषतः हिंदू समाजात समाजसुधारकांनी आज अनेक वर्षे प्रचार केला असल्यामुळे समाजसुधारणेला सामान्यतः हिंदू समाज जास्त अनुकूल आहे असे म्हणण्यात अतिशयोक्ती होणार नाही व म्हणूनच हिंदू समाजापुरते का होईना पण सर्व हिंदू समाजाला लागू होणारे एक बिल पास करण्याच्या महत्त्वाकांक्षेने हिंदू कोड बिल जर लोकसभेपुढे आणले तर त्याला सेक्युलॅरिझमच्या नावाने विरोध करणे सर्वस्वी असमंजसपणाचे आहे असे मला वाटते. एकाच कायद्याखाली सर्व हिंदू समाज जर आला तर हिंदू समाजाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहिण्यासारखा तो प्रसंग होईल असे मला वाटते. एकच राजकीय ध्वज सर्व राष्ट्राने मान्य केल्यानंतर जसे आपण त्या महत्त्वाच्या प्रसंगाचे अलौकिक प्रसंग असे वर्णन केले तसेच वर्णन हिंदू कोड बिल पास झाल्यानंतर हिंदू समाजाने करावे इतक्या महत्त्वाचा तो प्रसंग होईल. हिंदू समाजापुरता एक कायदा पास केल्यानंतर, तर्कशुद्ध आधारावर आधारलेला कायदा करून सर्व समाजांना तो लागू करण्याचा प्रयत्न राष्ट्रीय लोकसभेला करणे अशक्य होणार नाही. म्हणून माझी सर्व सुधारकांना अशी कळकळीची विनंती आहे की, सेक्युलॅरिझमच्या नावाने आणलेल्या आक्षेपाला काही महत्त्व नाही हे लक्षात घेऊन त्यांनी हिंदू समाजापुरता का होईना, पण तूर्त पहिली पायरी म्हणून सर्व हिंदूंना लागू होणारा एकच कायदा लवकर पास व्हावा अशा तऱ्हेची जोराची चळवळ सर्व देशभर करणे जरूर आहे. लोकसभेपुढे येणाऱ्या समाजसुधारणेच्या कायद्यांचा अभ्यास करून त्याबद्दल अधिकारयुक्त मार्गदर्शन करण्याकरिता व सुधारणाविषयक कायदे सुचवण्याकरिता आपण एखादी वकील व सुधारणांचा विचार केलेले तज्ज्ञ अशा लोकांची उपसमिती नेमावी असे मला वाटते.

कुटुंबनियोजन व समाजसुधारणा

समाजसुधारणेच्या आणखी एका विषयाचा थोडासा उल्लेख करणे मला जरूर वाटते. कुटुंबनियोजनाबद्दल आज सुशिक्षित समाजात थोडी फार चर्चा झालेली आढळते. पण सामान्यतः या विषयाची मोकळेपणाने चर्चा करण्यास बरेच प्रतिष्ठित लोक अद्यापि तयार झालेले नाहीत. आपल्या समाजातील दारिद्र्याचा विचार करता कुटुंबनियोजनाचे महत्त्व सामान्य जनतेला पटवून देणे अत्यंत महत्त्वाचे आहे अशा मताचा मी आहे. पण कुटुंबनियोजनाचा केवळ मोठ्या शहरात प्रचार करून हे कार्य होणार नाही. कुटुंबनियोजनाच्या मार्गाबद्दल मत देण्याची माझी पात्रता नाही. पण कुटुंबनियोजनाचे तत्त्व सामान्य जनतेला पटवून देण्याचे कार्य त्या विषयाचा अभ्यास केलेल्या व त्या विषयावर ज्ञान देण्याची पात्रता असलेल्या समाजसुधारकांनी अवश्य अंगीकारावे असे मला वाटते. लहानमोठ्या गावात किंवा खेडोपाडी कुटुंबनियोजनाची माहिती नसल्यामुळे ज्या अनेक अर्भकांना गरीब व दरिद्री कुटुंबात जन्म घेण्याचा प्रसंग आज येतो तो टाळण्याकरिता स्त्रियांना या विषयाबद्दल शिक्षण देणे अगत्याचे आहे. कुटुंबनियोजनाला केवळ हिंदू सनातनीच विरोध करतात असे नसून सर्व जगातील सनातनी असाच विरोध करतात ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. धर्माच्या नावाने पुरोगामी सुधारणांना कसा विरोध केला जातो याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. ख्रिस्ती धर्मातील कॅथॉलिक सांप्रदायाचे धर्मगुरु कुटुंबनियोजनाविरुद्ध किती जोराचा प्रचार करतात हे आपण पाहिलेच असेल. तशाच तऱ्हेचा विरोध आपल्यातील सनातनी समाज सुद्धा करतो. पण नको असलेल्या मुलांना जन्म देण्याची सक्ती धर्माच्या नावाने मातापित्यांवर करणे व त्या बिचाऱ्या अर्भकांना दरिद्री परिस्थितीत वाढण्याची शिक्षा देणे हे मानवतेच्या दृष्टीने अत्यंत कठोरपणाचे आहे असे मला वाटते. म्हणून माझ्या समजुतीने कुटुंबनियोजन या प्रश्नाचाही आपण विचार करून तज्ज्ञांच्या साहाय्याने या विषयावर समाजाला मार्गदर्शन करावे.

समारोप

माझे भाषण संपले. आजच्या परिषदेला उपस्थित असलेल्या समाजसुधारकांना मार्गदर्शन करण्यासारखे प्रगल्भ विचार माझ्याजवळ नाहीत ही गोष्ट मी प्रथमच सांगितली आहे. त्यामुळे माझ्या भाषणातील वैगुण्याचा आपल्या चर्चेवर कोणत्याही तऱ्हेचा परिणाम न होऊ देता आपण आपल्याला महत्त्वाच्या, अगत्याच्या व तातडीच्या वाटणाऱ्या सामाजिक सुधारणेच्या सर्व प्रश्नांची सांगोपांग चर्चा करून त्यावर महाराष्ट्रातील जनतेला योग्य ते मार्गदर्शन करावे अशी माझी आपणा सर्वांना प्रार्थना आहे. समाजसुधारणेचे कार्य करताना राजकीय मतभेदांची झळ लागू देऊ

नये असे मला वाटते व त्या दृष्टीने आजच्या परिषदेच्या व्यासपीठावर सर्व राजकीय पक्षांचे व उपपक्षांचे समाजसुधारक हजर आहेत ही गोष्ट मी अतिशय आनंदाची समजतो. राजकीय जीवनात पक्ष व उपपक्ष हे अपरिहार्य असतात; किंबहुना निरनिराळे पक्ष अस्तित्वात असणे हे लोकशाहीच्या यशाला आवश्यक असते. पण समाज-कारणाचा राजकारणाशी संबंध न आणणे हे सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. आपण सामाजिक समतेचे तत्त्व बहुजनसमाज व दलित समाज यांना पटवून देत असताना त्या समाजाची राजकीय मते काय असतील या गोष्टीचा विचार करण्याची आपल्याला मुळीच गरज नाही. म्हणूनच सामाजिक सुधारणेच्या या व्यासपीठावरून मराठी बोलणाऱ्या सर्व राजकीय पक्षांतील सर्व दर्जाच्या लहान-थोर अशा सर्व व्यक्तींनी भाग घ्यावा व समाजसुधारणेचे कार्य यशस्वी करावे अशी माझी सर्व महाराष्ट्रीय जनतेला आग्रहाची विनंती आहे. कालमाहात्म्याने सर्व काही आपोआप सुधारेल अशा अकरणात्मक कुकल्पनेला थारा देणे धोक्याचे आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. स्वातंत्र्ययुगामध्ये आपण लोकशाहीचा उपक्रम सुरू केला आहे व आपल्या राष्ट्रात जन्मलेली लोकशाही यशस्वी व्हावी म्हणून तिच्या रक्षणाकरिता निष्ठापूर्वक प्रयत्न करण्याची प्रतिज्ञा राष्ट्रातील सर्व नागरिकांनी पूर्वीच केली आहे. त्या प्रतिज्ञेला जागून आज लोकशाही जगविण्याकरिता जे अनेक संकल्प करण्यात येत आहेत ते संकल्प सिद्धीस जावे म्हणून आपल्या परिस्थितीत शक्य असेल ती समाजसेवा करण्यास आपण पुढे आले पाहिजे. पंचवार्षिक योजना किंवा इतर सामुदायिक प्रकल्प हे जर यशस्वी व्हावयाचे असतील तर त्यांना जनतेचा स्वयंस्फूर्त व उत्साही असा पाठिंबा मिळणे अवश्य आहे. तो पाठिंबा मिळविण्याचा एकच मार्ग म्हणजे खेडोखेडी लहान लहान घरातून व झोपड्यातून पसरलेल्या अडाणी व दीन अशा देशबांधवांना स्वातंत्र्ययुगाचे महत्त्व पटविणे हा होय. स्वातंत्र्ययुगाचे महत्त्व पटविण्याचा एक अत्यंत जिव्हाळ्याचा मार्ग म्हणजे सामाजिक समतेचा संदेश त्यांना पोहोचविणे हा होय असे मी समजतो. हा संदेश पोहोचविताना समाजसुधारकांना शैक्षणिक, सांस्कृतिक व प्रसंगविशेषी आर्थिक सुद्धा प्रचार करावा लागेल. हा प्रचार करताना समाजसुधारणेच्या कार्याला सर्व पक्षांकडून साहाय्य मिळणे अत्यंत अवश्य आहे व म्हणूनच ज्यांचा आवाज बहुजन व दलित समाजात पोहोचणे शक्य असेल त्या सर्वांनी या समताप्रसाराच्या पवित्र कार्यास मदत करावी असे मला वाटते. लोकशाहीच्या जीवनातील आजचा क्षण हा अत्यंत महत्त्वाचा आहे. स्वातंत्र्ययुगात राहण्याचे भाग्य आपल्याला मिळाले आहे. त्या भाग्याबरोबर जी महत्त्वाची जबाबदारी आपल्या अंगावर पडली आहे तिची जाणीव आपण आपल्या वैयक्तिक व सार्वजनिक जीवनात दर्शविली पाहिजे. प्रत्येक जाणारा क्षण हा बिनमोलाचा आहे असे मला वाटते. लोकशाहीने आपल्या डोळ्यांपुढे ठेवलेले लोककल्याणाचे ध्येय जर लवकर स्थापित

झाले नाही तर कदाचित लोकशाहीचे अस्तित्वसुद्धा संकटात येण्याचा संभव आहे. जागतिक घडामोडींकडे चिकित्सक दृष्टीने आपण जर पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की, लोकशाहीला जगात आपले अस्तित्व टिकविण्याचा एकच मार्ग आज शिल्लक राहिला आहे आणि तो म्हणजे लोककल्याण साधणे हा होय. क्रांतीच्या कल्पना सर्व जगात पसरत आहेत. सामाजिक, राजकीय व आर्थिक क्रांतीचा संदेश सर्व जगभर आज नाचत आहे. क्रांतिकारक कल्पना या गतिमान आहेत. अशा कल्पनांची गती वायूइतकी द्रुत असते. म्हणूनच या क्रांतिकारक कल्पनांमधील घेण्यासारखा जो महत्त्वाचा भाग असेल त्याचा आपण स्वीकार करून त्या कल्पना आत्मसात् करणे व त्या कल्पनांचा प्रत्यक्ष अनुभव दैनिक जीवनात बहुजनसमाजाला आणून देणे हे समाजसुधारकांचे आजचे कर्तव्य आहे. **क्रांती, मग ती सामाजिक असो, आर्थिक असो किंवा राजकीय असो, जर बुद्धिवादी धोरणाने व शांततेच्या मार्गाने आली तर त्यात समाजाचे अंती कल्याण असते.** पण जर तीच क्रांती आंधळेपणाने यशस्वी होऊ लागली तर मात्र समाजाचे त्यात अकल्याण होण्याचा फार संभव असतो. आंधळी क्रांती ही संहार करते, पण ती संघटना किंवा नवीन सृष्टी घडवितेच असे दिसत नाही. द्वेष किंवा क्रोध माणसास आंधळा करतो; **व बौद्धिक आंधळेपणा, मग तो कोठल्याही कारणाने उत्पन्न झालेला असो, नष्ट केल्याशिवाय खरा पुरोगामी बुद्धिवाद यशस्वी होणार नाही.** म्हणून जर आपल्याला आंधळ्या क्रांतीचे भय टाळावयाचे असेल तर आपल्या समाजातील सर्व बुद्धिमान सुशिक्षित व पुरोगामी सुधारकांनी समाजसुधारणेच्या व्यासपीठावर राष्ट्रीय भावनेने एकत्र येऊन समाजक्रांतीला योग्य असे वळण लावून सामाजिक समतेचे राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

महाराष्ट्रातील ध्येयवादी शिक्षक, प्राध्यापक व प्रौढ उत्साही विद्यार्थी, तसेच चिकित्सक व बुद्धिमान वकील व इतर सर्व समाजसेवक यांनी ह्या कार्यात आपला योग्य तो भाग उचलावा असे मी त्यांना विनवितो. सानेगुरुजींनी आपल्या रसाळ शब्दांनी मानवी देहाचे मोठे यथार्थ वर्णन केले आहे. ते अवतरण्याचा मोह मला आवरता येत नाही. गुरुजी म्हणतात :

> "शब्द एकत्र येतात, सारस्वते बनतात. फुले एकत्र येतात, हार गुंफिले जातात. सूर एकत्र येतात, दिव्य संगीत निर्माण होते. शेकडो हाडे एकत्र येतात, हा देह बनतो. या देहात केवढे सहकार्य, किती प्रेम! पायाला काटा बोचला तर वरच्या डोळ्याला पाणी येते! या लहानशा देहात सारा वेदान्त भरलेला आहे. सारी शास्त्रे ओतलेली आहेत, परंतु कोण पाहतो? आंधळे, सारे आंधळे!"

आपल्या सहजसुंदर शब्दांनी गुरुजींनी मानवदेहाचे जे वर्णन केले आहे ते विराट अशा समाजपुरुषाच्या देहालाही तितक्याच यथार्थतेने लागू पडते. आंधळेपणाचा

आरोप आजच्या पिढीवर उद्याच्या पिढीने करू नये अशी जर आपली इच्छा असेल तर आपण सर्वजण या विराट समाजपुरुषाचे घटक आहोत ही जाणीव ठेवून एकमेकांशी समतेच्या दृष्टीने, प्रेमाने, सौहार्दाने व राष्ट्रीय भावनेने शैक्षणिक व सामाजिक व्यवहार करण्यास सुरवात करू या. गत कालात घडलेल्या अनेक अनिष्ट अशा घटनांबद्दल कठोरपणे चर्वितचर्वण करण्यामध्ये जर आपण वर्तमान काळ घालविला तर भविष्य काळातील वैभव आपल्या हातातून कायमचे जाईल. स्वातंत्र्ययुगात जन्मल्यानंतर आपल्या सामाजिक कर्तव्याची आपणास जाणीव झाली नाही तर आपली पुढील पिढी आपल्याकडे निःसंशय अनादराने पाहील. म्हणूनच आजचा जाणारा क्षण भूतकालात विलीन होण्यापूर्वी समाजसुधारणेचे पवित्र कार्य आपण जोराने सुरू करू या. समाजकार्याचे एक स्वरूप ज्योतिबा फुले यांनी आपल्या 'अखंड' या प्रार्थनेमध्ये मोठ्या मार्मिकतेने वर्णिलेले आहे. ज्योतिबांचे शब्द साधेच आहेत, पण त्या शब्दात अर्थ ओतप्रोत भरलेला आहे. सत्यशोधक ज्योतिबा म्हणतात :

प्राणीमात्रा नेत्रें निर्मीकानें दिलीं । पाहूं तीं लागलीं । एकमेकां ॥ ध्रु० ॥ ॥ १ ॥
ज्ञान सर्वां दिलें सत्य शोधण्याला । मार्गीं लागण्याला । अज्ञान्यास ॥ २ ॥
निर्मीकाचा धर्म सत्य आहे एक । भांडणें अनेक । कशासाठीं ॥ ३ ॥
मानवांनो तुम्हीं ईशा नित्य भ्यावें । सर्व सुखी व्हावें । जोती म्हणे ॥ ४ ॥

सर्वांचा निर्मीक आहे एक धनी । त्याचें भय मनीं । धरा सर्व ॥ ध्रु० ॥ ॥१॥
न्यायानें वस्तूंचा उपभोग घ्यावा । आनंद करावा । भांडू नये ॥ २ ॥
धर्म राज्य भेद मानवा नमावें । सत्यानें वर्तावें । ईशासाठीं ॥ ३ ॥
सर्व सुखी व्हावें भिक्षा मी मागतों । मनुजा सांगतों । जोती म्हणे ॥ ४ ॥

म्हणूनच सरतेशेवटी सर्व पुरोगामी व बुद्धिवादी सुधारकांच्या या व्यासपीठावरून समाजसुधारणेच्या तत्त्वावर निष्ठा असणारा एक सामान्य नागरिक म्हणून मी मराठी बोलणाऱ्या सर्व जनतेला अगत्याने, आर्जवाने व कळकळीने अशी विनंती करतो की, समाजसुधारणेच्या आजच्या महत्त्वाच्या कार्यास सर्व जनतेने साहाय्य करावे. समाजसुधारणेचे कार्य यशस्वी होऊन सामाजिक समतेची स्थापना जर आपण आपल्या समाजात करू शकलो तर आपल्या राष्ट्राने लोककल्याणाचे जे उदात्त ध्येय आपल्यासमोर ठेवले आहे ते ध्येय साधण्याच्या कामी आपण अल्प का होईना पण साहाय्य केले असे आपणास अभिमानाने म्हणता येईल. लोककल्याणाचे ध्येय सिद्ध झाले, सर्व समाजातील कृत्रिम वर्ग व जाती नष्ट झाल्या व एकजिनसी असा समाज आपल्या राष्ट्रात निर्माण झाला म्हणजेच वेदांनी उच्चारलेली आशीर्वादवाणी खरी झाली असे म्हणता येईल :

संगच्छध्वं संवदध्वं सं वो मनांसि जानताम् ।
देवा भागं यथा पूर्वे संजानाना उपासते ।

२

सामाजिक क्रांतीचे स्वरूप

आज आपण महाराष्ट्र सामाजिक परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनाकरिता येथे जमलो आहोत. मूळच्या सामाजिक परिषदेचे कार्य अनेक कारणांमुळे मध्यंतरी खंडित झाले होते; ते पुनः सुरू करण्याकरिता व सामाजिक प्रश्नांच्या विचाराला चालना देण्याकरिता महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन पुणे येथे तारीख १८, १९ व २० एप्रिल १९५३ रोजी भरले होते. हे पहिले अधिवेशन भरण्याच्या सुमारास सामाजिक परिषद भरविण्याची जरुरी आता नाही अशा तऱ्हेचा विचार काही थोड्या व्यक्तींनी प्रदर्शित केला होता. त्यामुळे सामाजिक परिषदेच्या पुनरुज्जीवित होणाऱ्या अधिवेशनाला विरोधाचा अडथळा निर्माण होईल की काय अशी भीती काही स्नेह्यांनी प्रदर्शित केली होती. पण कालमहात्म्यामुळे सामाजिक सुधारणेच्या प्रयत्नांना प्रत्यक्ष विरोध होणे अशक्य आहे ही गोष्ट परिषदेचे चालक जाणून होते. उपहास किंवा विरोध याची भीती जरी समाजसुधारणेला आता उरलेली नसली, तरी उपेक्षेचा शाप मात्र समाजसुधारणेच्या कार्याला निरुत्साही करील अशी शंका सर्वांच्याच मनात परिषदेपूर्वी वावरत होती. तरीसुद्धा महाराष्ट्राच्या नवीन जीवनामध्ये सामाजिक सुधारणांचे महत्त्व फार असल्यामुळे समाजसुधारणेच्या विषयाची चर्चा निष्ठेने करणाऱ्या सर्व पुरोगामी बुद्धिवाद्यांनी एकत्रित येऊन ह्या विषयाला चालना द्यावी अशा संकल्पाने ही परिषद् भरविण्यात आली. प्रत्यक्ष परिषद् सुरू झाल्यानंतर समाजसुधारणेवर विश्वास असणाऱ्या सर्व लोकांच्या शंका वितळून गेल्या व परिषदेच्या कार्याला अकल्पित असे साहाय्य सर्व जनतेकडून मिळाले. परिषदेला हजर असलेल्या प्रतिनिधींची संख्या फार मोठी होती असे नव्हे; पण हजर असलेले प्रतिनिधी अखिल महाराष्ट्राच्या पुरोगामी वृत्तीचे, निःसंशय माननीय असे प्रतिनिधी होते. परिषदेच्या कार्यात पुरोगामी अशा सर्व पक्षांनी सहकार्य

केले, व परिषदेच्या व्यासपीठावर सर्व पक्षांतील कार्यकर्ते उपस्थित राहिले, हे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील एक स्फूर्तिदायक व मनोवेधक दृश्य होते असे म्हणावयास हरकत नाही. फर्ग्युसन कॉलेजमधील सभामंडपामध्ये खुद्द आगरकरांच्या छायाचित्राच्या मार्गदर्शनाखाली परिषदेचे कार्य पार पडले व सामाजिक समतेची घोषणा महाराष्ट्रातील बुद्धिवादी लोकांनी ह्या व्यासपीठावरून केली. म्हणून पुण्यास भरलेल्या पहिल्या परिषदेचे कार्य अशा दृष्टीने फार यशस्वी झाले असे म्हटले असता अतिशयोक्ती होईल असे मला वाटत नाही. परिषदेच्या कार्याबद्दल महाराष्ट्रातील सर्व वृत्तपत्रांनी मोठ्या अगत्याने व सहानुभूतीने चर्चा केली. खंडित किंवा त्रुटित झालेली समाजसुधारणेची परंपरा महाराष्ट्रात पुन्हा जिवंत होत आहे याबद्दल सर्वांनी परिषदेचे कोडकौतुक केले व परिषदेचे कार्य यशस्वी व्हावे आणि महाराष्ट्रातील सामाजिक जीवनात स्नेहभावना निर्माण व्हावी, अशी आशा सर्व समाजसेवकांनी मोठ्या कळकळीने व्यक्त केली.

परिषदेचा संदेश ठिकठिकाणी पोहोचविण्याकरिता गेलेल्या परिषदेच्या प्रतिनिधींना सामान्य जनतेमध्येसुद्धा परिषदेच्या कार्याबद्दल फार मोठी निष्ठा वाटत असल्याचा अनुभव आलेला आहे. बहुजनसमाजाच्या सामाजिक समतेबद्दलच्या आकांक्षांना बौद्धिक स्वरूप देण्याचे जे कार्य परिषदेने पुरस्कारले आहे, त्या कार्याबद्दल बहुजनसमाज व हरिजन यांना साहजिकच आकर्षण व निष्ठा वाटावी याचे आश्चर्य वाटण्याचे मुळीच कारण नाही. परिषदेच्या शाखा महाराष्ट्रातील बहुतेक सर्व जिल्ह्यांमध्ये स्थापन झाल्या असून ह्या शाखांमार्फत समाजसुधारणेच्या तत्त्वाचा प्रचार करण्याकरिता निरनिराळ्या प्रसंगी सभा घेण्यात आल्या होत्या. मी स्वतः माझा नित्य व्यवसाय सांभाळून काही ठिकाणी जाऊन परिषदेच्या कार्याचा थोडाफार प्रचार केला; आणि परिषदेच्या कार्याबद्दल सामान्य जनतेच्या मनात आज जो विश्वास वाटत आहे त्याबद्दल व्यक्तिशः मला फार धन्यता वाटली. सामाजिक समतेच्या संदेशाबद्दल सामान्य जनतेच्या मनात आज फार तळमळ आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. ह्या निष्ठेला योग्य ते वळण लावून नवीन समाजरचना करण्याचे कार्य अंगावर घेणे आजच्या समाजसुधारकांना फार अगत्याचे आहे; म्हणूनच परिषदेचे अधिवेशन दरसाल भरवून सामाजिक प्रश्नांच्या विचारांना चालना देण्याचे कार्य महाराष्ट्र सामाजिक परिषदेला करणे जरूर आहे. ह्या दृष्टीने आजचे परिषदेचे अधिवेशन महत्त्वाचे ठरेल व सामाजिक सुधारणेच्या विचारांना ह्या अधिवेशनाने जास्त जोराची चालना मिळेल अशी मला आशा आहे.

आजच्या परिषदेपुढील काही विषयांवर विचार मांडण्यापूर्वी मी एक गोष्ट प्रथमच कबूल करतो की मी नवीन असे काहीच सांगणार नाही. समाजसुधारणेच्या ज्या तत्त्वांचा अधिकारी सुधारकांनी यापूर्वीच अनेकवार प्रचार केलेला आहे, त्यांचाच पुनरुच्चार मी माझ्या अल्प सामर्थ्यानुसार करण्याचा प्रयत्न करणार आहे.

सामाजिक परिषदेच्या कार्याचे ध्येय व स्वरूप

सामाजिक परिषदेच्या ध्येयाच्या व कार्याच्या स्वरूपाबद्दल योग्य ती कल्पना समाजास समजावून देणे फार महत्त्वाचे आहे. आपल्या घटनेने राष्ट्रापुढे ठेवलेल्या उदात्त ध्येयामध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाला अग्रस्थान देण्यात आले आहे हे आपण जाणताच (Justice social, economic and political). सामाजिक न्याय म्हणजेच सामाजिक समता' हे सामाजिक परिषदेचे ध्येय आहे. हे ध्येय साध्य करण्याकरिता सामाजिक परिषदेला लोकशिक्षणाचेच साहाय्य होणार आहे. राजकीय पक्षोपपक्ष आपल्या तत्त्वांचा प्रचार करण्याकरिता अनेक मार्गांचा अवलंब करू शकतात; त्याप्रमाणे आर्थिक समतेचा प्रचार करणारे पक्ष हेसुद्धा चळवळींचे अनेक मार्ग स्वीकारू शकतात. निरनिराळ्या ठिकाणी सभा घेऊन आपल्या मतांचा जहाल, कठोर किंवा उपहासगर्भित अशा भाषेत प्रचार करणे हे राजकीय किंवा आर्थिक चळवळीत अपरिहार्य असते. किंबहुना कधी कधी राजकीय किंवा आर्थिक समतेकरिता सत्याग्रहाचे शस्त्र उगारण्याचासुद्धा प्रयत्न केला जातो. स्वतंत्र युगात लोकशाहीची स्थापना झाल्यानंतर सत्याग्रहाचे शस्त्र उपयोगात आणणे योग्य आहे की नाही याचा विचार करण्याचे हे स्थान नव्हे. पण सत्याग्रहासारखे कठोर शस्त्र राजकीय किंवा आर्थिक पक्षांनी आपल्या तत्त्वांचा प्रचार करण्याकरिता अंमलात आणणे योग्य आहे असे मानले तरी ते शस्त्र सामाजिक सुधारकांनी वापरणे सर्वस्वी अनिष्ट आहे. सामाजिक सुधारकांना लोकशिक्षणाचाच सतत व सदैव उपयोग करावा लागेल. समाजसुधारणेला जो विरोध होतो तो बव्हंशी अज्ञानमूलक असतो. धर्माच्या सनातन स्वरूपाबद्दल समाजामध्ये कुकल्पना प्रचलित असतात. त्यांचा परिहार करण्याचे साधन, माझ्या समजुतीप्रमाणे, एकच आहे आणि ते लोकशिक्षण हे होय. भ्रामक समजुती, आंधळा विश्वास व परंपरेबद्दलचा खोटा अभिमान ह्यामुळेच अज्ञ समाज सामाजिक सुधारणेचे तत्त्व स्वीकारण्यास एकदम तयार होत नाही. समाजसुधारणेच्या तत्त्वाचा प्रचार करताना उपहास किंवा द्वेष यांचा अवलंब करणे सर्वस्वी अनिष्ट आहे. समाजसुधारणेच्या विषयावरील मतभेद हे एका अर्थाने कौटुंबिक स्वरूपाचे असतात. सामाजिक विषयावरील मतभेद हे केवळ समाजाच्या एका वर्गाविरुद्ध दुसरे वर्ग असे नसून समाजाच्या सर्व वर्गांतील व्यक्ती-व्यक्तीमध्ये निर्माण होत असतात. एकाच कुटुंबातील पती-पत्नी, पिता-पुत्र, किंवा बंधु-भगिनी यांच्यामध्येसुद्धा समाजसुधारणेच्या प्रश्नावर तीव्र मतभेद होण्याचा संभव असतो; म्हणून समाजसुधारकांनी बुद्धिवादाचा प्रचार करताना विरोधकांचा हृदयपालट करण्याचा प्रयत्न करणे अवश्य असते. सामाजिक सुधारणा घडवून आणण्यास सुधारक कितीही अधीर असला तरी त्या अधीरपणाच्या भरात लोकशिक्षण करताना उपहासाचा किंवा द्वेषाचा त्याने प्रचार केल्यास सुधारणेच्या

7418

कार्याची हानी होण्याचाच जास्त संभव असतो. समाजसुधारणेला विरोध करणारे सनातनी नागरिक अज्ञानामुळे विरोध करीत असतात ही गोष्ट सदैव लक्षात बाळगून अज्ञानावर हल्ला करणे व बुद्धिवादाचा प्रचार करणे हेच समाजसुधारणेचे महत्त्वाचे कार्य आहे आणि ही गोष्ट समाजसुधारकांनी कधीही विसरता उपयोगी नाही. लोकभ्रम, आणि अतार्किक विषमतेचा स्वीकार करणाऱ्या सामाजिक चालीरीती, ह्या अनेक शतकांच्या अस्तित्वाच्या जोरावर प्रबळ अशा दिसतात; पण लोकशाहीच्या आजच्या युगात सामाजिक विषमतेवर आधारलेल्या ह्या सर्व चालीरीती व सामाजिक संस्था फार दिवस जिवंत राहाणे शक्य नाही ही गोष्ट लक्षात ठेवून, समाजसुधारकांनी कालमहात्म्याचा पूर्णपणे फायदा करून घेतला पाहिजे.

कायदा व लोकशिक्षण

समाजसुधारकांना लोकशिक्षणाच्या दृष्टीने दुहेरी स्वरूपाचे कार्य करावयाचे असते. लोकशाहीमध्ये लोकसभा सामाजिक न्याय करण्याकरिता सुधारणेचे अनेक कायदे करीत असतात. लोकसभेने मान्य केलेले कायदे यथार्थतेने व निष्ठेने प्रचारात येण्याकरिता लोकशिक्षणाची फार जरुरी असते. सामाजिक सुधारणांचा निरनिराळ्या देशांतील इतिहास असे सांगतो की जेव्हा जेव्हा समाजातील समजुती व चालीरीती आणि कायदे यांच्यामधील अंतर फार दुरावते तेव्हा तेव्हा कायद्यातील कलमे कायद्याच्या पुस्तकातच राहातात आणि त्यांचे प्रतिबिंब सामाजिक जीवनात उमटावे तसे उमटत नाही. याउलट कधी कधी सामाजिक चालीरीती झपाट्याने प्रगती करीत असतात व कायदे मात्र तितक्या द्रुतगतीने प्रगती करीत नाहीत. अशा प्रसंगी सामाजिक चालीरीती पुरोगामी आणि कायदे प्रतिगामी असे दृश्य दिसते. या दोन्ही प्रसंगी कायदा व सामाजिक चालीरीती यांच्यामधील अंतर कमी करून सामाजिक जीवनाचे पुरोगामी स्वरूप चिरंतन टिकविण्याचे कार्य समाजसुधारकांना लोकशिक्षणाच्याद्वारे साध्य करावयाचे असते. बाल-विवाहाचा निषेध करणारा कायदा पास होऊन अनेक वर्षे झाली, पण आपल्या समाजात बाल-विवाह खरोखरच नष्ट झाले आहेत असे आपण म्हणू शकाल काय? द्विभार्या प्रतिबंधक बिल कायद्याच्या पुस्तकात समाविष्ट होऊनसुद्धा अनेक वर्षे झाली पण अद्याप द्विभार्या करण्याची चाल जिवंत असल्याचे पुरावे अधूनमधून मिळतातच ना! अस्पृश्यतानिवारण करण्याकरिता अस्पृश्यांना विषमतेने वागविणे हा गुन्हा आहे अशी घोषणा मुंबईच्या कायद्याने करून अनेक वर्षे झाली; पण महाराष्ट्रात अस्पृश्यता अद्यापि अत्यंत उग्र स्वरूपात जिवंत आहे ही गोष्ट अमान्य करण्याइतका आंधळेपणा कोणीही स्वीकारणार नाही. लोकशाहीच्या युगात कायदा हे सामाजिक आणि आर्थिक सुधारणेचे जरी प्रभावी शस्त्र असले तरी केवळ कायद्यानेच सामाजिक व आर्थिक सुधारणा यशस्वी होतात हासुद्धा एक लोकभ्रम आहे. कायदा यशस्वी होतो पण जेव्हा लोकमताचा

त्याला पाठिंबा असेल तेव्हा. म्हणून समाजसुधारणा करण्याच्या उदात्त ध्येयाने प्रेरित झालेल्या लोकसभा जेव्हा समाजसुधारणाविषयक विधेयके पास करतात तेव्हा त्या विधेयकांना जिवंतपणा आणण्याकरिता लोकशिक्षण देण्याची महनीय कामगिरी सामाजिक सुधारकांना करावी लागते. याउलट प्रतिगामी वृत्तीचा न कळत पगडा बसल्यामुळे त्या वृत्तीच्या प्रभावाचा परिणाम म्हणून जेव्हा जेव्हा लोकसभा महत्त्वाच्या सामाजिक विषयावर पुरोगामी विधेयक मान्य करण्यास कचरतात किंवा विलंब करतात तेव्हा तेव्हा लोकांना त्या सुधारणा मान्य करणे अवश्य वाटावे म्हणून लोकांमध्ये जागृती करण्याची कामगिरी समाजसुधारकांना करावी लागते. ह्या कार्याचे महत्त्व किती मोठे असते याचे उदाहरण म्हणजे हिंदु-कोड बिलाचद्दलचा ताजा इतिहास होय. हिंदु-कोड मान्य करण्याने हिंदू समाजातील सामाजिक सुधारणेला फार महत्त्वाचे साहाय्य होणार आहे ही गोष्ट स्पष्ट दिसत असतानासुद्धा हिंदु-कोड या विधेयकाची प्रगती आज जी धिमेधिमे चालली आहे याचा अर्थ एकच की सुधारणेला अनुकूल असलेले लोकमत असावे तितके प्रभावी ठरले नाही. म्हणून सामाजिक समता हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून ते ध्येय साध्य करण्याचे सामाजिक परिषदेचे एकमेव साधन व शस्त्र म्हणजे सतत लोकशिक्षणाचा कार्यक्रम सुरू ठेवणे हे होय. राजकीय पक्षोपक्षांच्या कार्यक्रमाशी सामाजिक परिषदेच्या कार्याची तुलना करणे नेहमीच योग्य किंवा इष्ट होईल असे मला वाटत नाही. सामाजिक परिषदेचे कार्य हे फार बिकट व दीर्घजीवी ठरण्याचा संभव आहे. अनेक शतकांचे रीतिरिवाज, अतार्किक लोकभ्रम व लोकसमजुती यांचा पाडाव करणे कितीही अगत्याचे, इष्ट व तातडीचे असले तरी अज्ञानाचे हे प्रभावी किल्ले सामाजिक परिषदेच्या चळवळीमुळे एकदम नामोहरम झाले नाहीत म्हणून निराश होण्याचे मुळीच कारण नाही. सामाजिक समतेच्या तत्त्वाचा विजय होऊन नवसमाजनिर्मिती करण्याचे कार्य सिद्ध होण्यास थोडा वेळ लागेल. पण लोकशिक्षणाचे साधन जितक्या निष्ठेने समाजसुधारक वापरतील व सामाजिक समतेचा संदेश सर्व जनतेपर्यंत जितक्या आवेशाने पोहोचवितील तितक्या प्रमाणात व त्या मानाने कार्यसिद्धी निःसंशय लौकर होईल. लोकशाहीच्या आजच्या स्वातंत्र्ययुगामध्ये आपल्या देशात कालमाहात्म्य हा सर्व समाजसुधारकांचा मोठा स्नेहसोबती आहे ही गोष्ट आपण लक्षात ठेवणे जरूर आहे.

पुरोगामी बुद्धिवादाचे अधिष्ठान

समाजसुधारणेच्या प्रचाराचे मुख्य अधिष्ठान पुरोगामी बुद्धिवाद हे होय. लोकशिक्षण करताना समाजसुधारकाला बुद्धिवादाचा पुरस्कार करणे जरूर असते. सामाजिक संस्था ह्या सनातन व चिरंतन आहेत ही जी भ्रामक समजूत हिंदू मनाची पकड घेऊन आज अनेक वर्षे बसलेली आहे, त्या समजुतीवर यशस्वी रीतीने हल्ला करावयाचा झाल्यास बुद्धिवादाचे साधन फार महत्त्वाचे ठरणार आहे. हिंदू

संस्कृतीचा इतिहास सुमारे सहा हजार वर्षांइतका जुना आहे. सहा हजार वर्षांइतक्या मोठ्या कालखंडात जो समाज व त्याची संस्कृती जिवंत राहिली त्या समाजाच्या मनामध्ये सनातनीपणाच्या कल्पनांचे साम्राज्य अद्यापि पसरलेले असावे ही घटना निःसंशय विषादकारक आहे. म्हणून हिंदू समाजसंस्था नेहमीच परिस्थितीसापेक्ष होत्या आणि ह्या सर्व समाजसंस्थांमध्ये परिस्थितिनुरूप व कालानुरूप फेरबदल व परिवर्तन होत गेले ही गोष्ट सर्व हिंदू समाजाला पटवून देणे जरूर आहे. जिवंत सामाजिक जीवन हे नदीच्या प्रवाहासारखे असते. नदीचा प्रवाह ज्याप्रमाणे पुरोगामी स्वरूपात उगमस्थानापासून पुढे पुढे जात असतो व ठिकठिकाणी नवीन नवीन झऱ्यांतून निर्माण होणाऱ्या पाण्याचा स्वीकार करीत आपली प्रगती करून घेत असतो, तशाच तऱ्हेचे स्वरूप सामाजिक जीवनाचे असते. याच्या उलट डबक्यातील पाण्यामध्ये विषारी जंतू निर्माण होतात; कारण त्या पाण्याला नवीन झऱ्यांचे साहाय्य मिळत नाही व ते पाणी कुजून जाते व आपले नियोजित कार्य करण्यास अपात्र होते. सामाजिक संस्थांची स्थिती अशाच प्रकारची असते. ज्या समाजाचे आचार व विचार अपरिवर्तनीय व अचल स्वरूप धारण करतात त्या समाजाचे भवितव्य निश्चित निराशाजनक असते. हिंदू समाजाचा गेल्या सहा हजार वर्षांचा इतिहास हेच तत्त्व सिद्ध करतो की हिंदू समाज हा सदैव प्रगतिप्रिय, परिवर्तनीय असा होता आणि म्हणूनच हा समाज अद्याप जिवंत आहे व ह्या पुरोगामी व परिवर्तनशील वैशिष्ट्यामुळेच ह्याचे भवितव्य उज्ज्वल आणि उदात्त आहे.

सामाजिक संस्था नेहमी परिवर्तनीय असल्याच पाहिजेत; त्याशिवाय सामाजिक जीवन प्रगतिपर होणार नाही. ही गोष्ट खरी असली तरी परिवर्तनसुद्धा परंपरेपासून सर्वस्वी अलग असे होऊ शकत नाही. **काल, आज आणि उद्या यांचा जो अन्योन्य संबंध असतो तशाच तऱ्हेचा संबंध, परंपरा आणि सामाजिक परिवर्तने यांचा असतो. आज हे कालचे अपत्य असून त्याच्याकडे उद्याचे पितृत्व असते.** भूत, वर्तमान व भविष्य यांच्यामध्ये जसा एक प्रकारचा कार्यकारण भाव असतो, तशाच तऱ्हेचा कार्यकारण भाव कालच्या सामाजिक संस्था, आजच्या सामाजिक संस्था आणि उद्याचे सामाजिक जीवन यांच्यामध्ये असणे अपरिहार्य आहे. पण परंपरा सर्वस्वी सोडून सामाजिक स्थित्यंतरे घडवून आणणे जरी अनिष्ट व अशक्य असले तरी परंपरेतील ग्राह्य व त्याज्य भागासंबंधी तारतम्याने विवेचन करण्याचे कार्य बुद्धिवादाला करावे लागते. बुद्धिवाद शब्दप्रामाण्य मानीत नाही आणि व्यक्तिमहात्म्य ओळखीत नाही. तर्काचे पूजन करणे एवढेच बुद्धिवादाला माहीत असते. सत्यसंशोधन करण्याकरिता चिकित्सक पद्धतीचा अवलंब करून सामाजिक स्थैर्याला व प्रगतीला अमुक एका तत्त्वाचे साहाय्य होण्याचा संभव आहे असे बुद्धिवादाला पटले म्हणजे त्या तत्त्वांना अनुसरून सामाजिक चालीरीती, सामाजिक संकेत व सामाजिक संस्था बदलण्याचा प्रयत्न बुद्धिवाद करीत असतो. गतिमान व परिवर्तनशील अशी

समाजाची घटना घडवून आणण्याचे ध्येय बुद्धिवादाने आपल्या डोळ्यासमोर ठेविले असल्यामुळे परंपरेचा चिकित्सक बुद्धीने अभ्यास करणे हे बुद्धिवादाला जसे आवश्यक असते तसे कालानुसार महत्त्वाचे सामाजिक तत्त्व स्वीकारून जुन्या परंपरेतील तर्कदुष्ट प्रकारांचा त्याग करून नवीन समाजरचना करण्यास सर्व जनतेला आवाहन करण्याचे उद्दिष्ट बुद्धिवाद आपल्या डोळ्यासमोर सदैव ठेवीत असतो. बुद्धी किंवा तर्क हाच देव अशी बुद्धिवाद्यांची श्रद्धा असते. बुद्धिवादाचा स्वीकार करताना या विषयावरील प्लेटोच्या सुप्रसिद्ध वचनाची कोणासही आठवण झाल्याशिवाय राहणार नाही. "एक प्रार्थना आपण सदैव करू या—" प्लेटो म्हणतो, "की, तर्काचा विद्वेष करण्याचे दौर्भाग्य आपल्या वाट्याला न येवो. तर्काचा द्वेष किंवा तिरस्कार करण्याइतके दूषणीय असे कोठलेही दौर्भाग्य नसेल."[1]

बुद्धिवाद, श्रद्धा व निष्ठा

सामाजिक सुधारणेच्या प्रचारामध्ये बुद्धिवादाचे महत्त्व फार मोठे आहे ही गोष्ट मान्य केल्यानंतर, केवळ बुद्धिवादाच्या सामर्थ्यास ज्या अपरिहार्य मर्यादा आहेत त्यांचाही विसर पडू देणे योग्य होणार नाही. मानवी जीवन हे केवळ बुद्धिवादावर जगत नाही, प्रगती करीत नाही व यशस्वी होत नाही. मानवी जीवनाला केवळ तर्कावर जगणे अशक्य असते. श्रद्धा व निष्ठा यांची साथ मिळाल्याशिवाय बुद्धिवाद किंवा तर्क मानवी जीवनामध्ये समृद्धी करू शकत नाही. मानवी जीवनात गती निर्माण करण्याचे सामर्थ्य केवळ तर्काला किंवा बुद्धीला नसून भावनेला असते ही गोष्ट लक्षात ठेवणे जरूर आहे. हे मानवी जीवनातील सत्य सामाजिक जीवनातही खरे असते. बुद्धिवादाचा स्वीकार करून अज्ञेयवाद, गूढवाद किंवा नास्तिकवाद अवलंबणारे नीतिमान महात्मे प्रत्येक युगात सर्व समाजांमध्ये निर्माण होत असतात. परंतु सामाजिक जीवनात क्रांती करून आणावयाची झाल्यास बुद्धिवादाला भावनेची अगर निष्ठेची साथ मिळविणे अवश्य असते. आधुनिक काळात बुद्धिवादाचा महान पुरस्कर्ता म्हणून ज्याच्याबद्दल सर्व आधुनिक विद्वानांनी व सर्व सुधारकांनी आदरभाव व्यक्त केला आहे त्या बर्ट्रांड रसेलने बुद्धिवादाबद्दल नुकतेच जे उद्‌गार काढले आहेत त्यांचा उल्लेख करण्याचा मोह मला आवरता येत नाही. "मानवी समाजनीती व राजकारण" या आपल्या ग्रंथात बुद्धिवादाच्या मर्यादा व भावना अगर निष्ठांचे महत्त्व रसेलसाहेबांनी आपल्या नेहमीच्या प्रभावी भाषेत फार सुंदर रीतीने वर्णन केले आहे. "विवेक किंवा

1. "Let us above all things take heed that one misfortune does not befall us. Let us not become misologues as some people become misanthropes; for no greater evil can befall men than to become haters of reason."
—PLATO in the *Phaedo*.

तर्क यांना भावनेचे दास्य स्वीकारणे अपरिहार्य व इष्ट आहे" ह्या डेव्हिड ह्यूम यांच्या वचनाचा उल्लेख करून रसेलसाहेब म्हणतात, "इच्छा, वासना आणि निष्ठा यांच्यामुळेच मानव कार्यप्रवण होतो. सर्व क्रियाशील वृत्तीचे व कार्याचे उगमस्थान निष्ठा व भावना ह्याच असतात. भावनामूलक व निष्ठाजन्य अशा कार्याचे नियोजन करण्याची कामगिरी मात्र तर्क अगर विवेक यांना करावी लागते."[1]

समाजसुधारकाला बुद्धिवादाचा स्वीकार करताना सामाजिक जीवनात निष्ठा व भावना यांचे जे महत्त्व आहे त्याबद्दल कधीही विस्मरण होता उपयोगी नाही. शुष्क काथ्याकूट न करता, सामाजिक जीवनामध्ये ज्या चिरंतन तत्त्वाचे महत्त्व समाजसुधारकाला पटलेले असते, त्या तत्त्वाबद्दल निष्ठा निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे, ही गोष्ट बुद्धिवाद्यानी लक्षात ठेवली पाहिजे. परंपरेचे चिकित्सक अध्ययन करताना जी शास्त्रशुद्ध दृष्टी बुद्धिवाद्यांना स्वीकारावी लागते त्याच शास्त्रशुद्ध संशोधक दृष्टीचा अवलंब करून उद्याच्या समाजाची निर्मिती कोणच्या तत्त्वावर आधारली पाहिजे ह्याबद्दलचा प्रचार समाजसुधारकाला करावा लागेल. वेदकाळामध्ये ऋत संशोधन करण्याच्या प्रवृत्तीचे जे वर्णन केलेले आढळते त्या प्रवृत्तीचे पुनरुज्जीवन आज करणे जरूर आहे. "ऋतं मे मा प्रहासीः" म्हणजे सामाजिक सत्याचा व शाश्वत मूल्यांचा मला कधीही विसर न पडो व सामाजिक सत्याच्या संशोधनाचे कार्य माझ्या हातून सदैव घडो ही प्रार्थना प्रत्येक विद्यार्थी विद्यार्जनानंतर गुरुगृह सोडताना वेदकाळी करीत असे. त्या प्रार्थनेचा पुनरुच्चार करण्याचा समय आज आलेला आहे. सामाजिक समतेच्या तत्त्वाचा प्रचार करताना ज्या तत्त्वाबद्दल श्रद्धा आणि निष्ठा निर्माण करणे आज अवश्य झाले आहे अशा तऱ्हची निष्ठा आणि श्रद्धा निर्माण केल्याशिवाय समाजसुधारणेचे कार्य यशस्वी करण्यास तार्किक बुद्धिवाद असमर्थ ठरेल असे मला वाटते. म्हणूनच सामाजिक जीवनातील शाश्वत मूल्यांबद्दल निष्ठा निर्माण करण्याकरिता बुद्धिवादाला आज पराकाष्ठेचा प्रयत्न करणे अवश्य आहे. सामाजिक जीवनात क्रांती घडवून आणून सामाजिक समतेच्या उदात्त भूमिकेवर नवसमाजाची निर्मिती करावयाची झाल्यास अशा श्रद्धेचे व निष्ठेचे साहाय्य मिळविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सामाजिक समतेवरील श्रद्धा आणि निष्ठा व नवसमाजनिर्मितीबद्दल भक्ती ह्या दोहोंचाही समन्वय करून बुद्धिवादाला नवीन समाज निर्माण करिता येईल. एकनाथाने म्हटल्याप्रमाणे "भक्तीचे उदरीं जन्मलें ज्ञान, भक्तीनें ज्ञानाशी दिलें महिमान" हे भक्ती व ज्ञान

---

१. "Reason is and ought only to be the slave of the passions (David Hume). Desires, emotions, passions are the only possible cause of action. Reason is not a cause of action but only a regulator."—*Human Society in Ethics and Politics*—by Bertrand Russel (1954). Page 8

यांच्या साहचर्याचे तत्त्व समाजसुधारणेला विसरून चालणार नाही. सामाजिक सुधारणेची चळवळ अद्यापपर्यंत सर्वस्वी यशस्वी झाली नाही त्याचे एक कारण कदाचित असे असू शकेल की तर्क व बुद्धिवाद यांना श्रद्धा व भक्ती यांची जोड मिळाली नाही व त्यामुळे बहुजनसमाजातून समाजसुधारणेच्या हाकेला साथ निर्माण झाली नाही. आजच्या युगात बहुजनसमाजाच्या मनात सामाजिक व समतेच्या तत्त्वांबद्दल निष्ठा निर्माण करणे अवश्य असल्यामुळे बुद्धिवाद, श्रद्धा व निष्ठा यांचा समन्वय करणे अगत्याचे आहे असे मला वाटते.

बुद्धिवाद व धर्मभावना

समाजसुधारणेच्या तत्त्वाचा प्रचार करताना समाजसुधारकाला आणखी एका प्रश्नाचा विचार करणे आवश्यक असते. बुद्धिवादाच्या जोरावर अज्ञ रूढीवर हल्ला करण्याचे ठरविल्यानंतर, ह्या कार्यक्रमामध्ये धर्म–भावनांची साथ घ्यावी की नाही याबद्दल स्पष्ट कल्पना समाजसुधारकांच्या मनात असणे जरूर आहे. हिंदू धर्माच्या इतिहासाचे वरवर अवलोकन करणाऱ्या कोणाही अभ्यासकाला हिंदू धर्माचे एक वैशिष्ट्य दिसून येईल, ते म्हणजे हिंदू धर्माने मानवी जीवनातील सर्व क्रियांना व कर्मांना धार्मिक स्वरूप दिलेले आहे. माणूस जन्माला आल्यापासून त्याची अंत्यक्रिया होईपर्यंत सर्व क्रिया धार्मिक स्वरूपाच्या आहेत अशी भावना हिंदू समाजाच्या मनात निर्माण करण्यात आलेली आहे. तसेच प्रतिदिनी उठल्यापासून झोपेपर्यंत ज्या क्रिया देह–धारणार्थ व पोषणार्थ माणूस करीत असतो त्या सर्व क्रियांचे स्वरूपही धार्मिक आहे अशी कल्पना प्रचलित आहे. हिंदु–स्मृतिग्रंथांमध्ये अनेक विषयांची चर्चा केलेली आढळते. राजकारण, समाजकारण व वैयक्तिक जीवन तसेच आत्मानात्म विचार हे सर्व तुम्हाला प्रत्येक स्मृति–ग्रंथात चर्चिलेले आढळतील. त्यामुळे कोठल्याही समाज-संस्थेमध्ये फरक करण्याचा विषय निघाला की, जुन्या हिंदु-मनाची प्रतिक्रिया आपाततः अशी होते की, हा धर्मावर हल्ला होत आहे. समाजसुधारणेला अज्ञ समाजाकडून जो विरोध होतो त्याचे मूळ कारण ही धर्मविषयक सर्वग्राही भावना हेच होय. त्यामुळे समाज–संस्था व पारमार्थिक मोक्ष धर्म यामधील भेद स्पष्ट करून दाखविणे हे समाजसुधारकांचे आद्य कर्तव्य आहे. हिंदु-संस्कृतीचे समर्पक अध्ययन केल्यास ही गोष्ट स्पष्ट निदर्शनास येते की, केवळ समाज–संस्थाच काय पण पारमार्थिक वेदांतविषयक कल्पनासुद्धा नित्य व सनातन अशा स्वरूपाच्या नसून त्यांच्यामध्ये क्रांतिकारक असे बदल झालेले आहेत; परंतु सामान्य जनतेला हिंदु-संस्कृतीच्या ह्या परिवर्तनशील स्वरूपाचे मुळीच ज्ञान नसल्यामुळे, हिंदु–धर्म या शब्दाचा जो पारंपारिक अर्थ हिंदु-मनाला ठाऊक असतो तो अर्थ व त्या अर्थामुळे व्यक्त होणाऱ्या संस्था, चालीरीती ही खरोखरच सनातनी म्हणजे अपरिवर्तनीय आहेत अशी दृढ समजूत हिंदू समाजात प्रचलित आहे. ह्या

समजुतीचे निराकरण करावयाचे झाल्यास बुद्धिवादी सुधारकाला समाजसुधारणेसाठी धर्म–भावनांचे साहाय्य घेणे अनिष्ट आहे ही गोष्ट सहजच पटेल. सामान्यतः आज प्रचलित असलेल्या धर्म–भावना प्रतिगामी स्वरूपाच्या असून धर्म–भावनांचा आधार घ्यावयाचा झाल्यास समाजातील प्रतिगामी प्रवृत्तींना उत्तेजन मिळेल, समाज–सुधारणेला होणारा विरोध बळावेल व त्या मानाने बुद्धिवादाचा पराभव होईल ही गोष्ट निःसंशय आहे. किंबहुना **प्रचलित धर्म–भावनांचा आधार घेणे ही गोष्ट बुद्धिवादाच्या मूलभूत तत्त्वाशीच विसंगत आहे.** परंपरेचा चिकित्सक बुद्धीने अभ्यास करणे आवश्यक आहे हे कबूल करूनसुद्धा धर्म–भावनांचा स्वीकार करणे अनिष्ट आहे असे मोठ्या आग्रहाने प्रतिपादन करणे आज जरूर आहे. परंपरेचा अभ्यास करण्याचा हेतू एकच असतो; आणि तो म्हणजे आपल्या सामाजिक संस्था कशा निर्माण झाल्या, कालपरत्वे व देशपरत्वे समाज–धारणेकरिता व समाजाच्या प्रगतीकरिता त्यांच्यामध्ये कसकसे फेरफार होत गेले व आज सामाजिक प्रगती-करिता आणि सामाजिक स्थैर्यकरिता कोणकोणते फेरफार करणे आवश्यक आहे, ह्या गोष्टींचा विचार करण्याकरिता समाजसुधारकाला परंपरेच्या अध्ययनातून ऐतिहासिक सामुग्री उपलब्ध होत असते, हा होय. आज समाज–रचनेला आवश्यक अशी सामाजिक समतेसारखी जी शाश्वत मूल्ये आपण पूजितो त्या मूल्यांच्या आधारावर आपण नव-समाजनिर्मितीचे प्रयत्न करीत असतो. तेव्हा स्मृति-ग्रंथांचा अगर पौराणिक वचनांचा आधार घेणे सर्वस्वी अनिष्ट, असमर्थनीय व निषिद्ध समजले पाहिजे. म्हणूनच बुद्धिवादाचा प्रचार करताना रूढ धर्म–भावनांचे साहाय्य घेणे बुद्धिवाद्यांनी नेहमीच टाळले पाहिजे. **समाजसुधारणा व तद्विषयक सर्व प्रचार केवळ तर्कपद्धतीने आणि शाश्वत सामाजिक मूल्यांच्या निष्ठेच्या आधारावरच समाजसुधारकांनी केला पाहिजे.**

धर्म–भावनांवर आधारलेल्या नीति-कल्पना कालपरत्वे व देशपरत्वे कशा बदलत असतात याचे बर्ट्रांड रसेल याने मोठे उद्‌बोधक वर्णन केले आहे. बर्ट्रांड रसेल म्हणतात, "निरनिराळ्या देशात व निरनिराळ्या काळात सर्वस्वी परस्परविरुद्ध नीति–कल्पनांचे प्राबल्य प्राचीन समाजात आढळते. ॲझटी हे लोक पराभूत झालेल्या शत्रूचे मास खाणे हे प्रमुख कर्तव्य समजत असत; आणि असे मास खाण्याचे जर पराक्रमी वीरांनी टाळले तर सूर्याचा प्रकाश नष्ट होईल अशी दृढ भावना त्या समाजात प्रचलित असे. बोर्नियो येथील प्राचीन रहिवाशांच्यामध्ये अशा नीति–कल्पना प्रचलित होत्या की, शत्रूमधील विशिष्ट संख्या पराभूत करून त्यांची कापलेली डोकी जातीतील प्रमुखापुढे आणल्याशिवाय कोणाही तरुणाला विवाह करण्याचा हक्क नाही. हमूरबीने असा ठराव केला होता की, कोणत्याही गृहस्थाच्या कन्येला गरोदर असताना मारण्यात आले तर खुनी माणसाच्या कन्येचा खून करणे हे त्या गृहस्थाचे कर्तव्य आहे. ज्यू लोकांमध्ये असा प्रमुख समज प्रचलित होता की,

एखाद्या स्त्रीने जर व्यभिचार केला तर तिला दगड मारून ठार मारणे कर्तव्य आहे.''[1]

अज्ञ धर्म-भावनांवर आधारलेल्या नीति-कल्पना, परस्परविरुद्ध स्वरूपाच्या, निरनिराळ्या देशांत व समाजात किंबहुना एकाच समाजात पण निरनिराळ्या काळी कशा वावरत असतात हे आपल्या समाजातील नीति-कल्पनांच्या अध्ययनानेसुद्धा सिद्ध होऊ शकेल. आहाराचाच विषय घेतल्यास काय खाणे योग्य व काय खाणे निषिद्ध याविषयी परस्परविरुद्ध अशा कल्पनांचे साम्राज्य हिंदू समाजातील निरनिराळ्या घटकांमध्ये कसे प्रचलित आहे हे आपण जाणताच. क्षुल्लक कांदा व लसूण खाणे निषिद्ध आहे ही कल्पना अद्यापि सर्वस्वी नष्ट झाली आहे असे म्हणता येणार नाही. ह्याउलट बंगालमधील सनातनी ब्राह्मण लोक मासे खाताना आपण काही अधर्म करीत आहोत असे समजत नाहीत व 'तुम्ही मासे कसे खाता' असे एखाद्या दाक्षिणात्य ब्राह्मणाने त्यांना विचारल्यास ते आवेशाने उलट प्रश्न असा विचारतात की, 'तुम्ही कांदे कसे खाता?'. ब्राह्मणांनी कांदा खाणे व मास खाणे ह्या दोन निषिद्ध कर्मांबद्दल धर्म-ग्रंथात जे प्रायश्चित्त सांगण्यात आले आहे त्याचे अध्ययन करणे हा एक मौजेचा विषय होईल. 'विवाहाच्या मर्यादांचा दुसरा विषय आपण जर पाहिला तर आपणास असे दिसून येईल की स्मृति-ग्रंथांनी विवाहाची काल-मर्यादा काहीही सांगितली असली तरी आधुनिक काळात कालमहात्म्यामुळे, आर्थिक परिस्थितीमुळे विवाहविषयक संकेत आता निराळ्या स्वरूपात प्रचलित असून त्याविषयीचे जुने सर्व निर्बंध जवळ जवळ लुप्तप्राय झालेले आहेत. सारांश, सामाजिक नीति-कल्पना ह्या सदैव परिस्थितिसापेक्ष असून त्यांचे मुख्य उद्दिष्ट समाज-धारणा आणि सामाजिक प्रगती करणे हे असते. म्हणून ह्या नीति-कल्पना व त्यामधून निर्माण होणाऱ्या रूढी व समाज-संस्था ह्या चिरंतन, सनातनी व अपरिवर्तनीय आहेत ही कल्पना सर्वस्वी तर्कदुष्ट व त्याज्य आहे. पण तर्कदुष्ट कल्पनांचेच प्राबल्य अज्ञ हिंदु-मनावर फार मोठे असल्यामुळे सामाजिक सुधारणेच्या तत्त्वाचा प्रचार करताना, ऐतिहासिक दृष्टी स्वीकारून, परंपरेचा अभ्यास करून व त्या परंपरेचे परिवर्तनीय स्वरूप समाजाला पटवून देऊन बुद्धिवादी समाजसुधारकाला आपले ध्येय गाठणे आवश्यक आहे. मात्र सुधारणेच्या तत्त्वांचा प्रचार करीत असताना, धर्मभावनांना आवाहन करणे जितके धोक्याचे आहे तितकेच सामाजिक समतेसारख्या शाश्वत मूल्याबद्दल निष्ठा निर्माण करणे आवश्यक व इष्ट आहे. समाजसुधारणेची चर्चा करताना नेहमी कटाक्षाने पुण्य व पाप किंवा धर्म्य व अधर्म्य ह्या कल्पना टाळून योग्य–अयोग्य, इष्ट–अनिष्ट, समाजोपयोगी–समाज-विघातक ह्या कल्पनांचाच स्वीकार केला पाहिजे.

---

१. Bertrand Russel—*Human Society in Ethics and Politics*, Pages 38-39.

परिवर्तनशील व गतिमान हिंदु-संस्कृती

वेदकाळापासून भगवद्गीतेपर्यंत हिंदु-संस्कृती स्थिर, अचल किंवा अपरिवर्तनशील आहे असे नसून त्या संस्कृतीच्या सामर्थ्याचे मुख्य रहस्य ती संस्कृती परिवर्तनशील होती, हा सिद्धांत प्रस्थापित करणे मुळीच कठीण नाही. किंबहुना हिंदु-संस्कृतीचा चिकित्सक पद्धतीने अभ्यास करणाऱ्या बहुतेक सर्व विद्वानांचे अभिप्राय या सिद्धांताला अनुकूल असेच आहेत. हिंदु-संस्कृतीचा इतिहास सहा हजार वर्षांहून अधिक काळ व्यापून राहिलेला आहे आणि त्या इतिहासाचे अगदी ओझरते असे दर्शन घ्यावयाचे असे म्हटले तरी थोडक्यात त्याची चर्चा करणे हे साहजिकच फार अवघड काम आहे. तरीपण हिंदु-संस्कृती ही परिवर्तनशील होती ही गोष्ट समाजाला यथार्थतेने पटवून देणे आवश्यक असल्यामुळे हिंदु-संस्कृतीमध्ये झालेल्या परिवर्तनाचा व क्रांतीचा अगदी थोडक्यात ओझरता आढावा घेणे अप्रस्तुत होणार नाही असे मला वाटते.

पुरातन काळी झालेल्या सामाजिक क्रांत्यांचे प्रतिबिंब धार्मिक परिवर्तनात अगर क्रांत्यात उमटलेले दिसते हे तत्त्व श्री. एम्. एन्. रॉय यांनी आपल्या 'मटीरिअॅलिझम' नावाच्या उद्बोधक व सुप्रसिद्ध ग्रंथात मोठ्या यथार्थतेने वर्णिलेले आहे. रॉय म्हणतात, "कोठलाही धर्म एक दिवसात जन्माला येत नाही व कोठल्याही धर्माचे उगमस्थान केवळ एखाद्या व्यक्तीची स्फूर्ती असू शकत नाही. प्रत्येक धर्माची तत्त्वे ही इतिहासातील मोठ्या कालखंडात पसरलेल्या विचारप्रणालींची प्रतीके असतात. समाजात होणारी क्रांती ह्या तत्त्वप्रणालीमध्ये प्रतिबिंबित होते व सामाजिक परिस्थिती जसजशी बदलेल तसतसे धार्मिक तत्त्वप्रणालीतही फेरफार होत असतात. सामाजिक ध्येय बदलले व सामाजिक घटना निराळी झाली तर धार्मिक कल्पनाही बदलतात व धार्मिक तत्त्वेही निराळी होतात. किंबहुना तत्कालीन समाजात प्रचलित असणाऱ्या परमेश्वरविषयक कल्पनासुद्धा मानवामध्ये प्रचलित असलेल्या संबंधांवर बव्हंशी आधारलेल्या असतात."[1]

---

1. "No religion is born in a day, revealed to a particular prophet. The doctrines and dogmas of each religion crystalize themselves in a process over a whole period of history. It is a period of social transformation. The change in the conditions of material life brings about a corresponding adjustment of ideal standards, although these are considered to be precedent to and independent of the mundane world. The disruption of old social relations shakes the basis of a particular form of faith. Man's relation to God or Gods as the case may be is determined by the relations among men themselves".—M. N. Roy—"*Materialism.*"

वेदकाळाचा विचार करताना त्याबरोबरच बुद्ध, महावीर आणि बसव यांच्या काळाचाही उल्लेख करणे जरूर आहे. बुद्ध व महावीर हे मुख्यतः खिस्तापूर्वी सहाव्या शतकात जन्माला आले असावेत व बसव हा सुमारे तेराव्या शतकात जन्मला असावा. ह्या तीन महापुरुषांचा उल्लेख करण्याचे प्रयोजन असे की, हिंदु-संस्कृतीच्या इतिहासात सामाजिक क्रांती मोठ्या प्रमाणात घडवून आणण्याचे श्रेय ह्या तीन महात्म्यांना देणे आवश्यक आहे.

प्रथम वेद-काळासंबंधी थोडक्यात विचार करावयाचा झाल्यास वेदवाङ्मयात स्थूलमानाने जे चार विभाग पडतात त्यांचा उल्लेख करणे जरूर आहे. प्रथम विभागाला वेद-काळ असे समजण्यात येते. या काळात आर्य लोक भरतखंडात आले व भरतखंड त्यांनी हळूहळू पादाक्रांत केले. याच काळामध्ये अरण्यात स्थापन झालेल्या विश्वविद्यालयांचा उगम झाला व आर्य संस्कृती व आर्य सुधारणा यांच्या विजयाची पताका भरतखंडातील उत्तरेकडील प्रदेशात झळकू लागली. वेदातील मंत्र व ऋचा तसेच ब्राह्मणे व उपनिषदे ह्यातील वचने अभ्यासल्यास या काळाचे सामान्य स्वरूप निदर्शनास येते. वेदकाळाबद्दल पुरतेसे ज्ञान समाजात प्रचलित नसल्यामुळे वेद हे सर्व हिंदु-संस्कृतीचे, समाज-संस्थांचे किंबहुना कायद्याचेही उगमस्थान आहेत अशा तऱ्हेची कल्पना हिंदू समाजात आज अनेक वर्षे प्रचलित आहे. वास्तविक ही कल्पना तितकीशी शास्त्रशुद्ध नाही. वेदांमध्ये धर्म हा शब्द सुमारे ५६ वेळा उपयोजिला आहे. पण या धर्म शब्दाचा अर्थ आपण आज समजतो तसा ऋग्वेदाला क्वचितच अभिप्रेत दिसतो. एक गोष्ट खरी आहे की, ऋग्वेदातील ऋचांमध्ये सामाजिक चालीरीतींचे प्रतिबिंब कधी कधी आढळते. परंतु ऋग्वेदात आढळणाऱ्या ऋचा ह्या आजच्या समाज-संस्थेला आदर्शभूत होऊ शकतील अशी कल्पना करणे सर्वस्वी हास्यास्पद होईल. गृह्यसूत्र व धर्मसूत्र ह्या ग्रंथांतून धर्म शब्दाचा अर्थ कौटुंबिक जीवनातील दैनिक धर्म-क्रिया अशा तऱ्हेने मुख्यत्वेकरून केलेला दिसतो. चातुर्वर्ण्य व तद्विषयक आचार यांचाही धर्म ह्या शब्दाने उल्लेख केलेला आढळतो. स्मृति-ग्रंथांत तर धर्म या शब्दामध्ये केवळ चातुर्वर्ण्य धर्म हाच एवढा अर्थ अभिप्रेत नसून राज-धर्म, व्यवहार-धर्म ह्यांचाही उल्लेख केलेला दिसून येतो. मीमांसकांच्या मते 'चोदनालक्षणोर्थो धर्मः' असे धर्माचे स्वरूप आहे; तर वैशेषिक म्हणतात 'यतोऽभ्युदय निःश्रेयससिद्धिः स धर्मः'. सारांश, धर्म ह्या शब्दाने अभिप्रेत होणाऱ्या अर्थाचा साकल्येकरून इतिहास रचणे फार मनोरंजक होईल. समाज-संस्था वेळोवेळी बदलल्या, समाज-कल्पना तशाच बदलत गेल्या व त्यामुळे धर्म शब्दाचा इतिहासदेखील बदलत गेला असे, धर्म शब्दाच्या बदलणाऱ्या व जास्त जास्त व्यापक होणाऱ्या अर्थावरून, अनुमान काढल्यास ते अयोग्य होईल असे मला वाटत नाही. वेद-वाङ्मयाचा दुसरा कालखंड हा रामायण व महाभारत ह्या ग्रंथांचा आहे. विद्वान लोक असे मानतात

की, ह्या कालखंडामध्येच धर्माच्या वाङ्मयात अग्रस्थान मिळविणारा भगवद्गीता हा ग्रंथ निर्माण झाला. ह्या कालखंडाचा विचार करताना एक गोष्ट लक्षात ठेवणे अवश्य आहे आणि ती म्हणजे याच कालखंडात बुद्ध व महावीर यांचे तत्त्वज्ञान उदयास आले. ह्यानंतरच्या कालखंडाला सूत्र-कालखंड असे संबोधण्यात येते. निरनिराळ्या तत्त्वांचा सूत्ररूपाने उल्लेख करून प्रतिपाद्य विषयांची चर्चा थोडक्या शब्दांमध्ये करण्याची पद्धत या कालखंडामध्ये सुरू झाली. धर्मसूत्रे, पूर्वमीमांसा, सांख्य, वैशेषिक व योग हे सर्व सांप्रदाय सूत्ररूपाने याच कालखंडात जन्माला आले. ह्यानंतरच्या कालखंडाला टीकाकारांचा कालखंड असे संबोधणे अयोग्य होणार नाही. ह्या कालखंडात कुमारील, शंकर, श्रीधर, रामानुज, माध्व वगैरे टीकाकार निर्माण झाले. बुद्ध व महावीर यांनी निर्माण केलेल्या विचारपरंपरेवर हल्ला करून मूळ हिंदू धर्माचा प्रसार करण्याची कामगिरी ह्याच कालखंडात मुख्यत्वेकरून शंकराचार्यांनी केली असे अभ्यासक समजतात. या चार कालखंडांमध्ये व्यक्त होणाऱ्या सामाजिक स्थित्यंतरांचा विचार करणे आजच्या प्रसंगी शक्य होणार नाही. पण ह्या विषयाची रजा घेण्यापूर्वी, वेद व उपनिषदे यांच्यामध्ये व्यक्त होणारे उदात्त विचार बाजूला राहून हिंदु-संस्कृतीतील कर्मठपणाचे प्रावरण तिला कसे जडले व बुद्ध-पूर्व काळात हिंदु-संस्कृतीचे स्वरूप कसे कर्मठ व हीन स्थितीप्रत आले होते याचे डॉक्टर राधाकृष्णन् यांनी केलेले वर्णन उद्धृत करणे मला आवश्यक वाटते. राधाकृष्णन् म्हणतात—"या काळात असत्याने सत्याला ग्रासले होते आणि ब्राह्मण-धर्मातील निरनिराळ्या परस्परविरोधी सिद्धांतांचा फारच गोंधळ माजलेला होता. ह्या काळात आध्यात्मिक परंपरेचा अस्त झाला असून केवळ शब्दप्रामाण्याचा बडेजाव वाढवून कर्मकांडातच सर्व नीति-कल्पनांचा अंतर्भाव होतो असे मानण्याची प्रवृत्ती बळावली होती. मानवी जीवन म्हणजे केवळ कर्मकांडाचेच आचरण अशी समजूत समाजामध्ये प्रचलित होती आणि धर्मवचने उच्चारणे, यज्ञयाग करणे, उठल्यापासून निजेपर्यंत सर्व क्रिया धर्मस्वरूपाच्या आहेत असे समजणे यातच लोक इतिकर्तव्यता मानू लागले."[१] ह्या स्थितीचा साहजिकच असा परिणाम झाला की कर्मकांडाच्या

---

१. ".....But the true was overwhelmed by the false, and the chaos of the Brahmanical religion, with all its conflicting theories, soon reached a climax in the post-Upanisad or the pre-Buddhist period. This period was one of spiritual dryness, where truth hardened into tradition and morality stiffened into routine. Life became a series of observances. The mind of a man moved within the iron circle of prescribed ceremonialism. One could not wake up or rise from his bed, bathe or shave, wash his face, or eat mouthful without muttering some formula or observing some rite. It was an age when a petty (Continued)

गोंधळलेल्या सामाजिक परिस्थितीतून बुद्ध व महावीर यांचा क्रांतिकारक मार्ग निर्माण झाला. बुद्ध, महावीर व बसव यांच्या कार्याबद्दल चार शब्द मी बोलणार आहे. पण तत्पूर्वी वेदवाङ्मयावरील विचार संपविताना भगवद्गीतेचा पुन्हा एकदा उल्लेख करून मी हा विषय पुरा करू इच्छितो. कर्मकांडाविरुद्ध ज्या क्रांतीची कल्पना बुद्ध व महावीर यांनी प्रचलित केली त्या कल्पनेचा बीमोड करण्याकरिता व आर्य-धर्माचे विचार पुन्हा प्रस्थापित करण्याकरिता, भगवद्गीतेसारखा सर्वमान्य ग्रंथ निर्माण झाला. हिंदु-संस्कृतीमध्ये व हिंदू वेदांतविषयक विचारांमध्ये ज्या भिन्न व प्रसंगविशेषी परस्परविरुद्ध अशा कल्पना प्रचलित होत्या, त्यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न भगवद्गीतेने केला आहे. हिंदु-संस्कृतीच्या इतिहासामध्ये भगवद्गीता या ग्रंथाचे महत्त्व अद्वितीय व अलौकिक आहे. ज्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर ह्या ग्रंथराजाचा जन्म झाला त्या पार्श्वभूमीचा विचार केल्यास व ह्या ग्रंथातील तत्त्वज्ञानाने हिंदु-जगताला किती प्रभावाने आकर्षून घेतले व वैदिक धर्माविरुद्ध होणाऱ्या बंडखोरीचे प्रयत्न कसे पराभूत केले हे लक्षात घेतल्यास, "गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रविस्तरैः" असे ह्या ग्रंथाचे जे अभिमानाने वर्णन केले जाते ते यथार्थ नाही असे कोण म्हणू शकेल? खुद्द भगद्गीतेमध्येसुद्धा भक्तीचे महत्त्व जास्त वर्णिलेले आहे का ज्ञानाचे महत्त्व जास्त वर्णिलेले आहे किंवा कर्माचे महत्त्व जास्त वर्णिले आहे यावर झालेली चर्चा आपणा सर्वांच्या पूर्ण परिचयाची आहे. टिळकांचे गीता-रहस्य प्रसिद्ध झाल्यानंतर सामान्यतः त्यांनी आपल्या अधिकारी वाणीने केलेले भगवद्गीतेचे स्वरूप आधुनिक विद्वान मान्य करतील यात बिलकूल संदेह नाही. भगवद्गीतेने बुद्ध व महावीर यांच्या विचारांच्या प्रसाराला आळा घातला व वेद-धर्माचे प्राबल्य पुन्हा प्रस्थापित केले ही गोष्ट कोणीही नाकबूल करीत नाही. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास बुद्ध व महावीर यांच्या बंडाला आळा घालून आर्य धर्माच्या कल्पनांची पुन्हा स्थापना करण्याचे कार्य भगवद्गीता या ग्रंथाने आणि शंकराचार्य या टीकाकाराने केले असे समजण्यात येते; ते कसेही असो; ऋग्वेदापासून शंकराचार्यांच्या काळापर्यंत निर्माण झालेल्या वाङ्मयाचे अध्ययन केल्यास तत्त्वज्ञानविषयक विचार, समाजस्थितिविषयक कल्पना व दैनंदिन आचरणाबद्दलचे संकेत यात वेळोवेळी फरक पडत गेला ही गोष्ट सिद्ध होते असे म्हटले तर ते चुकीचे होईल असे मला वाटत नाही. म्हणूनच ऋग्वेद काळापासून आजपर्यंत हिंदु-धर्मविषयक कल्पना, हिंदू सामाजिक संस्था व हिंदू आचारविचार

---

and barren creed set too much store by mere trifles and hollow superstitions. An arid and heartless philosophy, backed by a dry and dogmatic religion, full of affection and exaggeration, could not satisfy the thinking few for any time, or the masses for a long time." *Indian Philosophy* by Dr. Radhakrishnan, Volume I page 265.

बदललेले नसून एकाच स्वरूपात प्रचलित आहेत ही कल्पना शास्त्रशुद्ध नसून सर्वस्वी चुकीची आहे असे मला सांगावयाचे आहे.

हिंदु-संस्कृतीचे मुख्य वैशिष्ट्य, पूर्ण बुद्धि-स्वातंत्र्य व तीव्र ज्ञानलालसा

हिंदू कोणास म्हणावे ह्या प्रश्नाचे उत्तर देणे फार कठीण आहे ही गोष्ट आपणा सर्वांच्या परिचयाची आहे. तसेच हिंदू धर्माचे स्वरूप काय ह्या प्रश्नाचे उत्तर देणेसुद्धा मुळीच सोपे नाही. जगातील इतर कोणत्याही धर्माबद्दल अशी अडचण निर्माण होत नाही, मग ती अडचण हिंदू धर्माच्या बाबतीतच का निर्माण होते याचा विचार केल्यास ही गोष्ट आपल्या सहज लक्षात येईल की, हिंदू धर्म हा एक व्यापक जीवनाचा दृष्टिकोन आहे. संकुचित अर्थाने काही विशिष्ट तत्त्वांवर अंधश्रद्धा ठेवणारा व काही विवक्षित व्यक्तीला अगर व्यक्तींना देव मानणारा असा हा संप्रदाय नाही. परस्परविरोधी मतांचा समन्वय करून जीवनविषयक विशाल दृष्टिकोनात त्यांचा अंतर्भाव करण्याचे हिंदु-संस्कृतीचे वैशिष्ट्य अलौकिक व अवर्णनीय आहे. मनुष्यजातीच्या पुरातनतम काळात लिहिलेला ऋग्वेद हा ग्रंथ आहे ही गोष्ट आता सर्व संशोधकांनी मान्य केली आहे. ऋग्वेदात निसर्गाचे वर्णन करणाऱ्या अनेक ऋचा आहेत. समाजस्थितीचे द्योतक असे थोडेफार उल्लेख आहेत व खुद्द परमेश्वरविषयक विचार व्यक्त करणारी अशी वचनेही आहेत. परमेश्वरविषयक तत्कालीन कल्पना पौलिथीइझमच्या (Polytheism) स्वरूपाच्या होत्या हे साहजिकच आहे. वरुण, अग्नी, वायू यांना देव कल्पून त्यांचे वर्णन कवनांमध्ये करून ऋग्वेदकालीन मंत्रद्रष्टे स्वतःला धन्य मानीत असत; पण या काळामध्येसुद्धा परमेश्वराचे अस्तित्व आहे किंवा नाही या विषयावर गंभीरपणे चर्चा करताना 'परमेश्वराचे अस्तित्व असेलच असे म्हणवत नाही,' अशी धीट विचारसरणीसुद्धा व्यक्त केलेली आढळते. नासदीयसूक्त म्हणून ऋग्वेदात एक प्रसिद्ध सूक्त आहे. ह्या सूक्तामध्ये परमेश्वरविषयक विचार मोठ्या प्रगल्भ भाषेत व्यक्त केलेले आढळतात. अनेक विकल्पांचा विचार केल्यानंतर सूक्तकार म्हणतो, "योऽस्याध्यक्षः परमेव्योमन्। सो अंग वेद यदि वा न वेद ॥" आपण लक्षात ठेवा की खिस्तपूर्व चार हजार वर्षांच्या काळामध्ये निर्माण झालेल्या वाङ्मयात परमेश्वरविषयक असे क्रांतिकारक विचार व्यक्त करण्याचे बुद्धि-स्वातंत्र्य कवनकाराने दाखविले ह्यामध्येच वैदिक संस्कृतीचे महत्त्व साठविलेले आहे. वैदिक संस्कृतीच्या महान व विस्तीर्ण अशा कालखंडावर पसरलेल्या इतिहासात उन्नती व अवनतीचे अनेक प्रसंग साहजिकच निर्माण झाले. वैदिक संस्कृतीच्या मूलभूत तत्त्वज्ञानाबद्दल अपसमज प्रचलित होऊन कर्मकांडाचे प्राबल्य वाढले व सामाजिक जीवन अधोगतीला जाऊ लागले ही गोष्ट नाकबूल करणे शक्य नाही. पण, प्रत्येक वेळी नवीन

नवीन विचारांचा उदय होऊन हिंदु-संस्कृतीच्या भागीरथीचा प्रवाह सदैव प्रसन्न व जीवनपोषक अशाच स्वरूपाचा राहिला ही गोष्ट मोठ्या अभिमानाने सांगावयास मुळीच हरकत नाही. निरनिराळ्या काळात व निरनिराळ्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या जिवंत झऱ्यांतून निघणाऱ्या पाण्याचा प्रेमाने स्वीकार करून भागीरथीचा प्रवाह जसा हिमालयातून निघून महासागराला मिळाला त्याप्रमाणे निरनिराळ्या काळी व निरनिराळ्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या विचारांचा संग्रह करीत हिंदु-संस्कृतीचा जीवनप्रवाह सदैव जिवंत राहून पुरोगामी समाजोपयोगी प्रगतिपथावर डौलाने चाललेला आपणाला दिसतो; आणि ह्या प्रगतीचे एक महनीय स्वरूप म्हणजे हिंदु-संस्कृतीमध्ये अनेक परस्परविरोधी अशा विचारांचा संग्रह करण्यात आलेला आहे हे होय. हिंदु-संस्कृतीचे वेदांतविषयक तत्त्वज्ञान कोणते असा प्रश्न केल्यास शंकराचार्यांचे अद्वैत, वल्लभाचार्यांचे विशिष्टाद्वैत व मध्वाचार्यांचे शुद्धाद्वैत या तीनही विचारपरंपरांचा आपल्याला विचार करावा लागेल. हिंदू तत्त्वज्ञानाप्रमाणे मोक्ष भक्तीने साध्य होतो किंवा कर्माने वा ज्ञानाने साध्य होतो याचेसुद्धा एकच निर्णायक उत्तर देणे कठीण जाते याचे कारण तरी काय? याचे कारण एवढेच आहे की, हिंदू तत्त्वज्ञान हे संकुचित नसून फार विशाल आणि व्यापक अशा स्वरूपाचे आहे. सत्याला अनेक स्वरूपे असतात, हे साधे पण अत्यंत महत्त्वाचे तत्त्व हिंदु-संस्कृतीच्या इतिहासात आपणाला अनुस्यूत झालेले दिसेल. एकच देव व त्या देवाप्रत जाण्याचा एकच मार्ग अशी संकुचित दृष्टी हिंदु-संस्कृतीने कधीच मान्य केली नाही. सत्य–संशोधन करण्याचे सतत प्रयत्न केल्याचे हिंदु-संस्कृतीच्या इतिहासात आढळून येते आणि म्हणूनच हिंदू धर्मावर निष्ठा असणाऱ्या पण सत्य–संशोधनाच्या मार्गावर निरनिराळ्या तत्त्वांचा साक्षात्कार झालेल्या विचारवंतांचा व त्यांच्या विचारांचा हिंदु-संस्कृतीने मोठ्या आनंदाने आपल्या दृष्टिकोनात समावेश करून घेतला. सारांश, हिंदु-संस्कृतीचा ऐतिहासिक व चिकित्सक दृष्टीने अभ्यास केल्यानंतर, बुद्धि-स्वातंत्र्य व सत्यशोधनाबद्दल तळमळ ही हिंदु-संस्कृतीची महनीय वैशिष्ट्ये आहेत असे म्हटल्यास ते चुकीचे होईल असे मला वाटत नाही. म्हणूनच सामाजिक सत्यशोधनाचा खंडित झालेला मार्ग पुनरुज्जीवित करून व बुद्धिवादाचा स्वीकार करून, सामाजिक रचनेला अवश्य असणाऱ्या शाश्वत मूल्यांच्या शोधाकरिता निघण्यास आपण तयार झाले पाहिजे. आजच्या घटकेला सर्वसामान्य जनतेला सामाजिक परिषदेचा हाच महत्त्वाचा संदेश आहे.

सामाजिक व धार्मिक क्रांतीचे जनक; प्राचीन महर्षी : बुद्ध, महावीर व बसव

कर्मकांडाचे प्राबल्य वाढून पुरोहितशाहीचे समाजावर वर्चस्व प्रचलित झाल्यानंतर, पुरोहितशाही व कर्मकांड यांच्याविरुद्ध बंड पुकारण्याचा मान निस्तपूर्वक

सहाव्या शतकामध्ये बुद्ध व महावीर यांनी मिळविला. त्या युगामध्ये सर्व ज्ञान संस्कृत भाषेमध्ये साठविलेले होते व साहजिकच ज्ञानाची मक्तेदारी संकुचित अशा ब्राह्मण व काही अंशाने क्षत्रिय वर्गापुरती मर्यादित झालेली होती. सामान्य जनतेला हे वैदिक ज्ञान मिळू शकत नव्हते व स्त्रिया व शूद्र यांना तर ह्या ज्ञानाचा अधिकारच नाही अशा कल्पना फोफावल्या होत्या. ह्या कल्पनांचा परिणाम म्हणून सामाजिक जीवनात विषमतेचे साम्राज्य पसरलेले होते व ह्या विषमतेवरच आघात करण्यासाठीच बुद्ध व महावीर यांचा संप्रदाय जन्माला आला. जी गोष्ट बुद्ध व महावीर यांच्या संप्रदायाबद्दल खरी आहे तीच गोष्ट सुमारे तेराव्या शतकात जन्माला आलेल्या बसवरायाबद्दलही खरी आहे. बसवरायाने सुद्धा सामाजिक विषमतेवर तीव्र प्रहार करून सामाजिक समतेच्या तत्त्वाचा प्रचार करण्याकरिता ज्ञानविषयक मक्तेदारी बंद करण्याचा निकराने प्रयत्न केला. बुद्ध मार्ग, जैन मार्ग व लिंगायत मार्ग या तीनही मार्गांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असे आहे की, या मार्गांतील तत्त्वज्ञान तत्कालीन लोकांना समजणाऱ्या लोकभाषांतून व्यक्त केले गेले. बुद्धाने पालीचा अवलंब केला, महावीराने अर्धमागधीचा स्वीकार केला व बसवाने कानडी भाषेचा अभिनिवेश धरून कानडी भाषेत ग्रंथरचना केली. बुद्ध व महावीर हे क्षत्रियवंशी असून बसव हा अमात्यपदावर होता असे इतिहास सांगतो. म्हणजे कर्मकांडाविरुद्ध आघात करण्याकरिता निघालेले हे तिन्ही क्रांतिकारक क्षत्रिय बाण्याचे होते असे दिसून येते. घटपटाच्या चर्चेला कंटाळलेल्या सामान्य जनतेला ह्या तिन्ही क्रांतिकारकांनी दिलेला संदेश साहजिकच मान्य झाला व त्याचा परिणाम असा झाला की, ह्या तिन्ही संप्रदायांना अनुयायी मिळू लागले. परमेश्वर-प्राप्तीकरिता पुरोहिताची जरूर नाही, प्रत्येक भक्ताला परमेश्वराच्या दरबारी स्वतः प्रवेश मिळविणे शक्य आहे, परमेश्वर प्राप्त करण्याकरिता कर्मकांड–यज्ञ–याग हे अनावश्यक आहेत व परमेश्वराची दृष्टी सर्व समाजावर सम असून स्त्रिया व शूद्र यांनाही ब्राह्मण व क्षत्रिय ह्यांच्या बरोबरीचे स्थान मिळाले पाहिजे अशा तऱ्हेची विचारपरंपरा या तिन्ही सांप्रदायातून प्रचलित करण्यात आली. जातिभेद सर्वस्वी त्याज्य आहेत व मूर्तिपूजा अनिष्ट आहे असा प्रचार मोठ्या आवेशाने हे तिन्ही सांप्रदाय करू लागले. बुद्ध धर्माबद्दल प्रोफेसर दासगुप्त यांनी काढलेले उद्‌गार बुद्ध धर्माचे खरे स्वरूप मार्मिकपणे प्रगट करतात. प्रोफेसर दासगुप्त म्हणतात की, "बुद्ध धर्माच्या प्रथमावस्थेमध्ये बुद्ध व त्याचे अनुयायी ह्यांचा परमेश्वरावर व वेदांवर विश्वास नव्हता. शाश्वत नैतिक मूल्यांचे पोषण करणाऱ्या जीवनचारित्र्यावर बुद्ध धर्म विश्वास ठेवीत असे. नैतिक आयुष्याला कर्मकांडाची मुळीच जरूर नाही असे बुद्धधर्मीय लोक मानीत असत. धर्मशास्त्रातील आदेशांना मुळीच महत्त्व नसून मानवी जीवन शब्दप्रामाण्याने जखडण्याचे मुळीच कारण नाही असा विश्वास बुद्ध धर्माने प्रसृत केला. परंपरेने निर्माण झालेल्या विषमतेविरुद्ध व

निरनिराळ्या जातींच्या अस्तित्वाविरुद्ध बुद्ध धर्माने बंडाचे निशाण उभारले." बुद्ध धर्माचे वैभव डॉक्टर राधाकृष्णन् यांनी खालील शब्दात वर्णिले आहे. "तत्त्वज्ञानाच्या इतिहासामध्ये, मूलभूत विचार करणाऱ्या संप्रदायांमध्ये बुद्ध धर्माचा समावेश मोठ्या आदराने करणे जरूर आहे. बुद्ध धर्माचे तात्त्विक विचार व त्यातील आध्यात्मिक स्वरूप यांचा विचार करता बुद्ध धर्माने प्रसृत केलेल्या कल्पना ह्या एकोणिसाव्या शतकातील शास्त्रोक्त कल्पनांची बरोबरी करतात असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही." जैन धर्माबद्दल प्रोफेसर टेलर यांनी असाच अभिप्राय व्यक्त केला आहे. प्रोफेसर टेलर म्हणतात, "जैन संप्रदाय बुद्ध संप्रदायाप्रमाणेच पुरोहित वर्गाने निर्माण केलेल्या विषमतेविरुद्ध बंडाचा द्योतक होता. ह्या दोन्ही संप्रदायांचे पुरस्कर्ते क्षत्रिय वर्गात निर्माण झाले होते व एका अर्थाने ब्राह्मणशाही-विरुद्ध बंडाचे निशाण त्यांनी उभारले होते." बुद्ध व महावीर ह्यांच्यानंतर अनेक शतकांनी कर्नाटकात समाजक्रांतीचे निशाण उभारणाऱ्या बसवांच्या तत्त्वज्ञानाबद्दल सुद्धा अभ्यासकांनी अशाच स्वरूपाचे अभिप्राय व्यक्त केले आहेत. लिंगायत संप्रदायाचा प्रचार करताना बसवरायांनी केवळ धार्मिक सुधारणा करण्याचा प्रयत्न केला असे नव्हे, तर सामाजिक क्रांती घडवून आणण्याचाही त्या परंपरेचा मुख्य उद्देश होता. गरीब व श्रीमंत, तसेच ब्राह्मण, क्षत्रिय व शूद्र आणि पुरुष व स्त्रिया ह्यांच्यामध्ये प्रचलित असलेली विषमता असह्य झाल्यामुळे सामाजिक समतेचा उपदेश अनेक लिंगायत-ग्रंथांतून मोठ्या कळकळीने केलेला आढळतो. राइस ह्या विद्वानाने बसवरायांच्या कार्याचे एका वाक्यात मोठे मार्मिक असे वर्णन केले आहे. राइसच्या मते बसवरायांनी "आपल्या शिकवणीने धार्मिक सुधारणांबरोबर सामाजिक क्रांतीही घडवून आणली."[1]

सारांश, हिंदु-संस्कृतीच्या इतिहासात कर्मकांडाचे प्राबल्य वाढून संस्कृतीचे मूळचे पुरोगामी व बुद्धिवादी स्वरूप समाज विसरला व सामाजिक जीवनात विषमतेचे साम्राज्य पसरू लागले तेव्हा समाज-कारण व धर्म यात क्रांती करण्याचे महनीय प्रयत्न करणारे तीन क्रांतिकारक प्राचीन काळी निर्माण झाले ही गोष्ट आपण सदैव लक्षात ठेवणे जरूर आहे. ऐतिहासिक दृष्टीने हिंदु-संस्कृतीचा अभ्यास करण्याचा एक मुख्य उद्देश असा आहे की, हिंदु-संस्कृतीमध्ये परिवर्तन होत गेले व ते परिवर्तन घडवून आणण्याकरिता हिंदु-संस्कृतीला धक्के देणारे महात्मे हिंदु-संस्कृतीच्या भाग्याने निरनिराळ्या काळी निर्माण झाले हे आपल्या लक्षात यावे.

महाराष्ट्रीय संतांचे क्रांतिकारक कार्य

श्री बसव ज्या वेळी कर्नाटकात लिंगायत सांप्रदायाचा प्रसार करून हिंदू

१. "..... Basava carried on a social revolution side by side with a Religious Reformation."—Rice.

धर्मांत व हिंदू सामाजिक संस्थांत क्रांती करण्याचा प्रयत्न करीत होते त्या सुमारास महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचा प्रचार चालू झाला होता. वारकरी संप्रदायातील संतांनी महाराष्ट्रीय सामाजिक जीवनात एका अर्थाने मोठी क्रांती घडवून आणली असे मला वाटते. मात्र वारकरी संप्रदायाने घडवून आणलेल्या क्रांतीचे महत्त्वमापन करताना आपण केवळ आज प्रचलित असलेल्या निष्ठांचा व तत्त्वांचा निकष लावणे तितकेसे योग्य होणार नाही. सामाजिक सुधारणांच्या तत्त्वांना नेहमीच परिस्थितिसापेक्ष राहावे लागते आणि म्हणून वारकरी संप्रदायाने केलेली कामगिरी आजच्या पुरोगामी बुद्धिवादाच्या दृष्टीने जरी सर्वस्वी पहिल्या श्रेणीची ठरली नाही, तरी त्या संप्रदायाच्या मागे एक क्रांतिकारक भावना स्फूर्ती देत होती ही गोष्ट विसरून चालणार नाही. पंढरीच्या विठ्ठलाचे पूजन करणे व त्याकरिता पंढरीची वारी करणे हे ह्या संप्रदायाचे मूळ तत्त्व आहे. निवृत्तिनाथापासून सुरवात करून जोगा परमानंदापर्यंत ह्या संप्रदायाने अनेक संत व कवी दिले. सामान्यतः हा संप्रदाय वैष्णव संप्रदाय म्हणून ओळखिला जातो. चातुर्वर्ण्यावर व जातिसंस्थांवर ह्या संप्रदायाने हल्ला केला नाही ही गोष्टही खरी आहे; परंतु संस्कृत भाषेमध्ये साठलेल्या ज्ञानाची मक्तेदारी ह्या परंपरेने हाणून पाडली ही गोष्ट निर्विवाद आहे. हिंदु-संस्कृतीचे मूळ स्वरूप सामान्य जनतेपर्यंत पोहोचवून सामान्य जनतेमध्ये विठ्ठलभक्तीच्याद्वारे एक अनिर्वचनीय असा बंधुभाव निर्माण करण्याचे महनीय कार्य ह्या परंपरेने साध्य केले, ह्या घटनेचे महत्त्व आपण कमी लेखता उपयोगी नाही. ह्या संप्रदायातील संतांनी एकमेकाबद्दल जे जिव्हाळ्याचे व प्रेमाचे उद्गार काढले आहेत ते उद्गार वाचताना पुष्कळ वेळा मला असे वाटते की अशा तऱ्हेचे परस्परांबद्दल प्रेमाचे व स्नेहाचे उद्गार काढणारी बंधु-भावना महाराष्ट्रात जेव्हा निर्माण होईल तेव्हाच महाराष्ट्राचे सामाजिक जीवन खऱ्या प्रगतिपथावर सुरू होईल.

तीरें संस्कृताचीं गहनें ।
तोडोनि मऱ्हाठी केलीं शब्दसोपानें ।
रचिली धर्म निधानें ।
श्री निवृत्ति देवें ॥

अशी मोठ्या आवेशाने प्रतिज्ञा करणारे श्री ज्ञानदेव क्रांतिकारक नव्हते असे म्हणणे शक्य नाही. ज्ञानगंगा अडाणी व गरीब जनतेच्या दारापर्यंत पोहोचविण्याचे व्रत स्वीकारून ज्या संप्रदायाने अलौकिक व असामान्य अशी ग्रंथनिष्पत्ती केली त्या संप्रदायाच्या कार्याचे महत्त्व हिंदू धर्माच्या इतिहासात मोठे आहे असे मी समजतो. "संत कृपा झाली । इमारत फळा आली ।" हे बहिणाबाईंनी केलेले ह्या संप्रदायाचे रसाळ वर्णन वाचून ह्या संप्रदायाने बहुजनसमाज व दलित समाज ह्यांना वारकरी आंदोलनात सामील होण्याचे आवाहन किती यशस्वी रीतीने केले

हे स्पष्ट दिसते. हा संप्रदाय प्रचलित झाल्यानंतर महाराष्ट्रातील स्पृश्य-अस्पृश्य, पुढारलेले–मागासलेले, अशा सर्व जातींनी व जमातींनी ह्या संप्रदायाच्या व्यास-पीठावर येऊन एकमेकांना मोठ्या प्रेमाने आलिंगन देऊन बंधुभावाचे वातावरण निर्माण केले व स्फूर्तिदायक वाङ्मय निर्माण केले हे बहिणाबाईंनी वर्णन केलेल्या इमारतीचे दर्शन घेतल्याने सिद्ध होत नाही काय? जातिभेदावर ह्या संप्रदायाने हल्ला केला नाही व तो हल्ला आज आपण करणे अवश्य आहे. शब्दप्रामाण्य ह्या संप्रदायाने झिडकारले नाही ते आपण आज टाकून देणे जरूर आहे. केवळ बुद्धिवादाच्या जोरावर व तर्कसिद्ध पद्धतीने सामाजिक समतेचा ह्या संप्रदायाने प्रचार केला नाही, तो आपण आज करणे जरूर आहे. पण तत्कालीन समाजस्थितीमध्ये ह्या संप्रदायाने सर्व समाजात बंधुभाव व सौहार्द निर्माण करण्याचे जे कार्य केले त्याचे महत्त्व कमी लेखणे हेसुद्धा ऐतिहासिक दृष्टीशी विसंगत होईल असे मला वाटते. आजसुद्धा वारकरी संप्रदायाच्या अध्वर्यूंनी जर बुद्धिवादाचा स्वीकार करून समाजसुधारणेच्या प्रयत्नांना हातभार लावण्याचे ठरविले तर महाराष्ट्रात सामाजिक क्रांती होण्यास फार महत्त्वाची मदत होईल असा मला विश्वास वाटतो. म्हणून मी समाजसुधारणेच्या व्यासपीठावरून वारकरी संप्रदायातील पुढारी मंडळींना अशी आग्रहाने विनंती करतो की, वारकरी सांप्रदायाचे अपुरे राहिलेले समाज-क्रांतीचे कार्य पूर्ण करण्याकरिता त्यांनी आजच्या काळाला अनुरूप अशा सामाजिक जीवनातील शाश्वत मूल्यांचा प्रसार वारकरी संप्रदायाच्या व्यासपीठावरून करावा व सामाजिक क्रांतीला साहाय्य द्यावे.

महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे आधुनिक महर्षी

सामाजिक व धार्मिक क्रांतीची परंपरा महाराष्ट्राच्या आधुनिक जीवनात चालविणारे जे महर्षी महाराष्ट्राच्या सुदैवाने निर्माण झाले त्यांना मनःपूर्वक अभिवादन करणे आजच्या समाजसुधारकांचे आद्य कर्तव्य आहे असे मी समजतो. हिंदू संस्कृतीच्या इतिहासाचे एक स्फूर्तिदायक व लोभनीय स्वरूप हेच आहे की, वेळोवेळी ह्या संस्कृतीला नवीन नवीन स्वरूप धारण करून देण्याकरिता नवीन विचारांच्या परंपरा निर्माण करणारे सुधारक ह्या संस्कृतीने निर्माण केले. वारकरी संप्रदायानंतर अशाच क्रांतीची लाट महाराष्ट्रात निर्माण करणारे पाच महर्षी झाले असे मी मानतो. ज्योतिबा फुले, लोकहितवादी, रानडे, आगरकर व शिंदे हे ते महर्षी होत. बंगालमध्ये याच सुमारास ब्राह्मो समाज व प्रार्थना समाज यांचा उदय होऊन राजा राममोहन राय, केशवचंद्र सेन व बंगालमधील आधुनिक समतेच्या प्रचाराचे अध्वर्यू स्वामी रामकृष्ण परमहंस व त्यांचे जगद्विख्यात शिष्य स्वामी विवेकानंद यांनी हिंदू धर्म व हिंदू समाजसंस्था यांच्यामध्ये क्रांती घडवून आणण्याचा साहसाने प्रयत्न केला. त्याच सुमारास पंजाबमध्ये वैदिक धर्माचे पुनरुत्थान करण्याचा

श्री दयानंद सरस्वती यांनी बुद्धिवादी भूमिकेवरून प्रयत्न करून आर्य समाजाची स्थापना केली. तशाच स्वरूपाचे कार्य मी उल्लेखिलेल्या महाराष्ट्रातील आधुनिक सुधारक महर्षींच्या पंचायतनाने केले असे मला वाटते. आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात क्रांती करण्याचे जे प्रयत्न झाले त्यांचा योग्य असा इतिहास जेव्हा लिहिला जाईल तेव्हा आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक क्रांतिकारकांमध्ये ज्योतिबा फुले (१८२७ ते २७ नोव्हेंबर १८९०) यांना मानाचे पहिले स्थान देण्यात येईल याबद्दल मला बिलकूल संशय वाटत नाही. ज्योतिबा जन्माला आले त्यावेळी हिंदुस्थानात नुकतीच इंग्रजशाहीला सुरवात झाली होती. ज्योतिबांना उच्च शिक्षणाचा लाभ फारसा मिळालेला नव्हता. तरीपण अज्ञ व दीन जनतेबद्दल वाटणारी अंतःस्फूर्त तळमळ त्यांना स्वस्थ बसू देईना. ज्योतिबांनी लिहिलेल्या 'इशारा', 'गुलामगिरी' व 'सार्वजनिक सत्य–धर्म' ह्या ग्रंथांचे परिशीलन करणे आजही मोठे बोधप्रद ठरणार आहे. सामाजिक समतेबद्दल असामान्य निष्ठा, व्यापक सामाजिक हिताच्या दृष्टीने ऐतिहासिक व विवेचक दृष्टिकोन, सामाजिक प्रगतीला अवश्य असणाऱ्या बौद्धिक तत्त्वाबद्दल एकांतिक निष्ठा व स्वार्थत्यागपूर्वक समाजसेवेचे व्रत स्वीकारण्याची धडाडी ही ज्योतिबांच्या चरित्रातील महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत असे मी समजतो. १९५१ साली अस्पृश्यांकरिता शाळा काढण्याची दिव्य दृष्टी ज्यांनी व्यक्त केली, व त्यानंतर एक दोन वर्षांत स्त्रियांना शिक्षण देण्याकरिता केवळ स्त्रियांकरिता शाळा काढण्याचे ज्यांनी साहस केले, तसेच दीन, पददलित व अडाणी जनतेच्या उद्धाराकरिता ज्यांनी आपल्या लेखांतून सतत टाहो फोडला त्या ज्योतिबांना आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात मोठ्या अभिमानाने व आदराने पहिले स्थान देण्यास कोण नाकबूल होईल? ज्योतिबांच्या चरित्राचे व त्यांनी प्रचलित केलेल्या तत्त्वांचे महत्त्वमापन करताना त्यांच्या जन्मापूर्वी महाराष्ट्रात विद्यमान असलेल्या सामाजिक परिस्थितीचा विचार करणे जरूर आहे. ज्या घटनांच्या पार्श्वभूमीचा ज्योतिबांना पूर्ण परिचय होता त्या घटनांचा योग्य विचार केल्याशिवाय ज्योतिबांच्या शिकवणीचे रहस्य आणि स्वरूप नीटपणे उमगणार नाही. पेशवाईच्या उत्तर काळात मराठेशाहीच्या मूळ तत्त्वाचा विसर पडून राज्यकारभारात व समाजकारभारात ब्राह्मण्याचे स्तोम फार वाढले व त्यामुळे ब्राह्मण व इतर समाज यांच्यामध्ये तेढ कशी निर्माण झाली याचे योग्य वर्णन न्यायमूर्ती रानडे[1] यांनी एका लेखात निःपक्षपाती बुद्धीने व चिकित्सक दृष्टीने केलेले आहे. सामाजिक जीवनात निर्माण झालेल्या या तेढीचा परिणाम साहजिकच पक्षोपपक्षांची बजबजपुरी माजण्यात झाला. कोणी कोणास सहानुभूती दाखवीना,

---

१. "*The miscellaneous writings*"-by M. G. Ranade.—pages 350-352.

एकोपा नष्ट झाला, परस्पर द्वेष वाढला व त्यामुळे साहजिकच इंग्रजांचे राज्य सुरू झाले ही एक दैवी घटना आहे अशा तऱ्हेची भ्रांतिमूलक कल्पना लोकप्रिय होऊ शकली. ह्या सामाजिक घटनेच्या पार्श्वभूमीचा विचार केल्याशिवाय ज्योतिबांच्या जीवनकार्याचे यथार्थ स्वरूप आकलन होणे शक्य नाही. ज्योतिबांच्या चरित्राचे व शिकवणीचे महत्त्वमापन करताना आपण दुसरे एक तत्त्व लक्षात घेणे जरूर आहे. बर्ट्रांड रसेल यांनी एका ठिकाणी असे म्हटले आहे की, "जो समाज भूतकाळात घडलेल्या अनिष्ट घटनांचा योग्य विचार करीत नाही तो समाज भविष्यकाळातील अनिष्ट घटनांचा जनक होण्याचे पातक करीत असतो[१]." 'सत्य असत्याशीं मन केलें ग्वाही। मानियलें नाहीं बहुमता॥' हे संत तुकारामाचे वचन महात्मा ज्योतिबांच्या चरित्राला यथार्थतेने लागू पडते. ज्योतिबांच्या तात्त्विक व वैचारिक शिकवणीचे धडे महाराष्ट्रातील जनतेला देणे आजही अगत्याचे आहे असे मला वाटते. ज्योतिबांच्या चरित्राचा विचार करताना कर्मवीर शिंदे यांनी ज्योतिबांचे काव्यरूपाने केलेले खालील वर्णन फार मार्मिक आहे असे मला वाटते.

> **"सत्याचा पालनवाला। हा धन्य ज्योतिबा झाला। जन्माचा मालाकार।**
> **हा धन्य महात्मा झाला। कर्मावी खडी तलवार। जनतेचा जागा शेर।**
> **त्या समान कोण तो बोला।"**

ज्योतिबा फुल्यांच्यानंतर आदराने स्मरण करण्यासारखे महाराष्ट्रातील समाज-सुधारक म्हणजे लोकहितवादी देशमुख हे होत (१८-२-१८२३ ते ९-१०-१८९२). लोकहितवादींचे अनेक विषयांवरील लेख वाचले असता त्यांची असामान्य बुद्धिमत्ता, महनीय कर्तबगारी व राजकारण आणि समाजकारण या विषयांवरील त्यांचे अचूक निदान हे प्रत्ययाला आल्याशिवाय राहात नाही. शतपत्रांतील त्यांचे काही काही उतारे तर इतके अचूक निदानाचे आहेत की ते विचार १९४७ सालानंतर व्यक्त केले नाहीत ना, असा भास झाल्याशिवाय राहात नाही. इंग्रज सरकारचे राज्य संपून हिंदुस्थानात स्वराज्य सुरू होईल असे भाकीत लोकहितवादींनी केल्याचे आढळते. कोणत्या परिस्थितीत इंग्रज सरकार हिंदुस्थान सोडून जाईल व त्यानंतर हिंदुस्थानात कोणत्या स्वरूपाच्या घटना घडतील ह्याबद्दल लोकहितवादींनी केलेली भाकिते पाहाता त्यांना देशाच्या इतिहासाबद्दल भविष्य-ज्ञान होते की काय असे म्हणावेसे वाटते. स्वाध्याय, जातिभेद, शतपत्रे व इतर अनेक लेख ह्यांच्यामधून लोकहितवादींनी समाजकारणावर, राजकारणावर व इतिहासकारणावर आपली मते स्पष्ट व सडेतोडपणे मांडलेली दिसतात. त्यावेळी त्यांची मते समाजाला तितकीशी

---

१. "Men who ignore the tragedies of the past have themselves to blame if thereby they make tragedies of the future."—Bertrand Russel.

पटली नाहीत व ती मते पचविण्याचे सामर्थ्यही त्या वेळी समाजामध्ये नव्हते. परंतु तर्कशुद्ध मार्गाचा अवलंब करून बुद्धिवादाचा प्रचार करण्यामध्ये लोकहितवादींनी मोठ्या धडाडीने पुढाकार घेतला ही गोष्ट आज तरी कोणीही समंजस माणूस मोठ्या अभिमानाने मान्य करील. लोकहितवादी म्हणतात, "मनूचें वचन असो, याज्ञवल्क्याचें असो, ब्रह्मदेव कां असेना—'बुद्धिरेव बलीयसी' असें आहे. शास्त्रास एकीकडे ठेवा, आपली बुद्धी चालवा, घातुक वचनांवर हरताळ लावा." आपण मला असे सांगा की, सामाजिक सुधारणेच्या आजच्या व्यासपीठावरूनसुद्धा या शब्दांपेक्षा जास्त प्रभावी शब्दांची घोषणा करण्याचे सामर्थ्य कोणामध्ये असणार? म्हणून लोकहितवादींचे स्मरण आधुनिक महाराष्ट्राला करून देणे जरूर आहे असे मला वाटते.

सामाजिक सुधारणेच्या संघटित चळवळीचे पुरस्कर्ते व सामाजिक परिषदेचे आद्य जनक म्हणून रानडे यांचेही स्मरण करणे अवश्य आहे (१८-१-१८४२ ते १६-१-१९०१). रानडे यांच्या चरित्रात त्यांचा सर्वंकष बुद्धिमत्तेचा प्रभाव प्रामुख्याने आढळतो. आधुनिक भरतखंडातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व औद्योगिक चळवळीचे मूळ उगमस्थान त्यांच्या लेखांत अगर व्याख्यानांत सापडते असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती होईल असे मला वाटत नाही. "सर्वज्ञः स हि माधवः" असे जे रानडे यांचे टिळकांनी मोठ्या प्रेमाने वर्णन केले ते जवळजवळ अक्षरशः खरे होते, इतके रानडे यांच्या बुद्धीचे वैभव मोठे आहे. विशेषतः सामाजिक परिषदेची चळवळ सुरू करून व प्रत्येक खेपेस निरनिराळ्या विषयांवर अभ्यासपूर्वक चर्चा करून, तत्कालीन समाजाच्या बुद्धीला धक्का देण्याचे महनीय कार्य रानडे यांनी केले. त्या कार्याची आठवण आधुनिक महाराष्ट्राला करून देऊन तशाच स्वरूपाच्या कार्याची परंपरा आपण सुरू करणे आज अवश्य आहे व म्हणून रानडे यांच्या जीवन-कार्याची माहिती सामाजिक परिषदेने महाराष्ट्रीय जनतेला करून द्यावी असे मला वाटते. रानडे यांचे नवसमाज-निर्मितीबद्दलचे विचार किती प्रगल्भ, व्यापक व स्फूर्तिदायक आहेत हे थोडक्यात पाहावयाचे असल्यास त्यांच्या व्याख्यानातील खालील दोन उतारे पाहा—

"You cannot be liberal by halves. You cannot be liberal in Politics and conservative in Religion. The heart and the head must go together. You cannot cultivate your intellect, enrich your mind, enlarge the sphere of your political rights and privileges and at the same time keep your hearts closed and cramped. It is an idle dream to expect men to remain enchained and enshackled in their own superstition and social evils, while they are struggling hard to win rights and privi-

leges from their rulers. *Before long these vain dreamers will find their dreams lost.*"

"With the liberated manhood, with buoyant hope, with a faith that never shirks duty, with a sense of justice that deals fairly to all, with unclouded intellect and powers fully cultivated, and lastly with a love that overlaps all bounds, renovated India will take her proper rank among the nations of the world, and be the master of the situation and of her own destiny. This is the goal to be reached—this is the promised land. Happy are they who see it in distant vision, happier those who are permitted to work and clear the way on to it, happiest are they who live to see it with their eyes and tread upon the holy soil once more. Famine and pestilence, oppression and sorrow, will then be myths of the past and the Gods will then again descend to the earth and associate with men as they did in times, which we now call mythical."

हे दिव्य स्वप्न साकार करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, ही आठवण सदैव जागृत ठेवण्याकरता रानडे यांचे स्मरण करावयास नको का ?

रानडे यांच्यानंतर आदराने स्मरण करण्यासारख्या आगरकरांचेही विस्मरण होऊ देणे सर्वस्वी अनिष्ट आहे (१८५६ ते १७ जून १८९५). आगरकरांचे चरित्र हे तर महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचे स्फूर्ति-स्थानच आहे यात संशय नाही. राजकारण व समाजकारण ह्या दोनही विषयांवर तर्कशुद्ध पद्धतीने विचार करून ते विचार निर्भीडपणे व निर्भयतेने व्यक्त करण्याचे सामर्थ्य आगरकरांनी जसे व जितके व्यक्त केले तसे व तितके सामर्थ्य तत्कालीन समाजातील इतर दुसऱ्या कोठल्याही पुढाऱ्याने व्यक्त केले नाही असे म्हटल्यास मुळीच अतिशयोक्ती होणार नाही. राजकारणात जहाल व समाजकारणात मवाळ, तसेच समाजकारणात जहाल व राजकारणात मवाळ ही जी अनिष्ट परंपरा महाराष्ट्राच्या आधुनिक जीवनात निर्माण झाली होती त्या परंपरेला अपवादभूत असे एकच दैवी जीवनचरित्र महाराष्ट्रात निर्माण झाले आणि ते म्हणजे आगरकरांचे होय. आदरणीय अशा व्यक्तींचा योग्य तो आदर न करण्याची प्रवृत्ती महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात कधी कधी दृष्टोत्पत्तीस येते; त्या प्रवृत्तीचे अत्यंत विषादकारक उदाहरण म्हणजे आगरकर हे होत असे मला वाटते. महाराष्ट्राने उपेक्षित केलेल्या अशा माननीय मानकऱ्यांमध्ये आगरकरांना पहिले स्थान द्यावे लागेल असे मी समजतो. शुद्ध चारित्र्य, समाजसेवेची असिधारावृत्ती स्वीकारण्याची तयारी, लोकविद्वेषाला

न जुमानता आपल्या कार्यामध्ये रममाण होण्याचा दुर्दम्य आशावाद, व सामाजिक व राजकीय अनवस्थेचे अचूक निदान करण्याची बौद्धिक शक्ती ह्या गुणांमुळे आगरकरांना आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात फार उच्च असे स्थान देणे अवश्य आहे हे आज तरी कोणी नाकबूल करणार नाही. आगरकरांच्या शिकवणीचा बोध न झाल्यामुळे अगर ती न पचविता आल्यामुळे महाराष्ट्राने आगरकरांचा जो छळ केला त्याबद्दल कोणीही बुद्धिवादी माणूस लज्जेने मान खाली घालील. "महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र" हा करुणरसाने ओथंबलेला आगरकरांचा लेख वाचताना ज्याच्या डोळ्याला पाणी येणार नाही असा महाराष्ट्रीय विरळा असे मी समजतो. आगरकरांच्या विचारांचा महाराष्ट्राला परिचय करून देण्यासाठी प्रतिवर्षी त्यांचा उत्सव करणे जरूर आहे असे मला वाटते. 'सुधारक' पत्र काढण्याचा हेतू विशद करण्यासाठी आगरकरांनी जे अनेक विचार व्यक्त केले, त्यांपैकी एक अमोलिक विचार खालील शब्दात व्यक्त केलेला आढळून येतो—

> "भारतीय संस्कृतीचें जठर झाड आंतून अगदीं शुष्क झालेलें व त्याचें खोड व फांद्या डळमळूं लागल्या आहेत. याला आतां असेंच उभें ठेवण्यास व त्यापासून उपयोग होऊन त्यास फिरून नवीन अवस्था आणण्यास एकच उपाय आहे. तो कोणता म्हणाल तर त्याची खच्ची करून त्यास अर्वाचीन कल्पनांचें भरपूर पाणी द्यावयाचें."

मला वाटते आजच्या आपल्या सामाजिक परिषदेच्या कार्याचे व ध्येयाचे वर्णन ह्यापेक्षा जास्त सुटसुटीत व हृदयस्पर्शी भाषेत कोणीही करू शकणार नाही.

सुधारक महर्षीच्या पंचायतनातील शेवटचे महर्षी म्हणजे कर्मवीर शिंदे होत (१८७५ ते २–१–१९४४). कर्मवीर शिंद्यांच्या कामगिरीचे वर्णन करावयाचे झाल्यास एका वाक्यात असे म्हणता येईल की, स्त्री शिक्षणाबद्दल जी तपश्चर्या अण्णासाहेब कर्व्यांनी केली तशाच तऱ्हेची तपश्चर्या कर्मवीर शिंदे यांनी हरिजन उद्धाराकरिता केली. दोघांच्याही चळवळीला महाराष्ट्रीय जनतेकडून फारसे साहाय्य मिळाले नाही; किंबहुना दोघांनाही उपहास व उपेक्षा ह्याच सहन कराव्या लागल्या. पण सुदैवाने स्त्रीशिक्षणाला होणारा विरोध हळूहळू पंगू झाला व गुरुवर्य अण्णासाहेब कर्व्यांचे कार्य बऱ्याच अंशाने यशस्वी झाल्याचे पाहाण्याचे भाग्य त्यांना मिळाले. कर्मवीर शिंदे यांच्या कार्याला मात्र सदैव अडथळे होत गेले. अस्पृश्योद्धाराचे काम करण्याचे ठरवून कर्मवीर शिंद्यांनी जे आपल्या जीविताचे बलिदान त्या कार्याच्या पायी केले त्याची आठवण महाराष्ट्राला करून देणे फार जरूर आहे शिंद्यांचे जीवन हे खरोखरच समाजसुधारकाला आदरणीय असे जीवन आहे. त्यांच्या जीवनात स्वार्थत्याग, धडाडी व निश्चय यांचा उदात्त व मधुर संगम झालेला दिसतो. अगदी तरुणपणीच ब्राह्म–समाज व प्रार्थना समाज ह्यांच्या

तत्त्वज्ञानाने आकर्षिल्यामुळे शिंदे समाजसेवेला प्रवृत्त झाले व त्यानंतर अस्पृश्योद्धाराचे कार्य स्वतःचे जीवनकार्य आहे असे समजून त्यांनी त्या कार्याकरिता सतत निरलसपणे प्रयत्न केले. कौटुंबिक अडचणींची पर्वा न करिता हरिजनांना जवळ घेऊन त्यांच्या आर्थिक प्रगतीचे जे अनेकविध प्रयत्न कर्मवीर शिंद्यांनी केले त्याबद्दलचे वर्णन वाचताना कोणाही सहृदय माणसाला स्फूर्ती मिळाल्यावाचून राहाणार नाही. हरिजन-उद्धाराचे कार्य अद्याप यशस्वी व्हावयाचे आहे ही गोष्ट लक्षात घेता कर्मवीर शिंद्यांनी या कार्याकरिता ज्या हिरीरीने प्रयत्न केले त्या हिरीरीचे महत्त्व आपल्याला पटल्याशिवाय राहाणार नाही. हरिजनोद्धाराच्या चळवळीबद्दल व्यक्त केलेले कर्मवीर शिंद्यांचे विचार आजही मार्गदर्शन केल्याशिवाय राहाणार नाहीत. श्रीयुत शिंदे म्हणतात :[1]

"कोणत्याही एका मोठ्या समाजसुधारणेचे व्यापक कार्य हातीं घेतल्यावर कार्यपद्धतीचे ढोबळ दृष्ट्या दोन भिन्न प्रकार पडतात. विवक्षित आणि मर्यादित क्षेत्र घेऊन पद्धतीचें केंद्रीकरण आणि संघटन ही पहिली पद्धत. अमर्याद लोकसमाजाचें मत आणि वळण बदलणें व त्यासाठी प्रचारकार्य करणें ही दुसरी पद्धत. पहिलीला सुवर्णकार पद्धति आणि दुसरीला मेघवृष्टि पद्धति असें संबोधितात. उदाहरणार्थ, सोनें, मोतीं, हिरे वगैरे अशोधित धातु घेऊन सुवर्णकार आपल्या कलाकुसरीनें त्यांचे अखेरीस उत्तम नग बनवितो तर दुसऱ्या पद्धतींत अमर्याद क्षेत्रांवर मेघानें वर्षाव केल्यामुळें अखेरीस उत्तम पीक येतें."

"अस्पृश्यता निवारण हें मोठें जागतिक कार्य! खंडवजा भारतासारख्या विभूतिवादी देशसमूहावर ह्या कार्याचा प्रयोग करणें हें कांही लहान सहान कृत्य नव्हे. कार्य मोठे पण कार्यवाह लहान. पण विभूतीची वाट पाहात बसण्याला अवसर कोठून आणणार? विभूतीची वाट पाहण्यांत बराच काळ अगोदरच लोटून गेला होता. लोकोत्तर विभूति आणि सामान्य माणसांची घटना ह्या दोहोंचें समाजशास्त्रदृष्ट्या विद्यार्थीदशेंत मी थोडेंबहुत आकलन केलें होतें. म्हणून विभूतिवादावरील माझा विश्वास किंचित् कमी होऊन सामान्य माणसांच्या घटनात्मक प्रयत्नांकडे माझा कल विद्यार्थीदशेंत होऊं लागला होता. थॉमस कार्लाइलचा विभूतिवाद आणि हर्बर्ट स्पेन्सरचा सामान्य माणसांचा घटनात्मक प्रयत्नवाद ह्या दोहोंची तुलनात्मक मीमांसा मी तरुणपणींच केलेली होती. म्हणून अस्पृश्यता निवारणाचे कामीं आधुनिक काळांत कोणी विभूति पुढें येत नाही आणि मीतर स्वतः अत्यंत सामान्य माणूस ही वस्तुस्थिति पाहून मी हताश झालों नाहीं. श्रद्धेनें पर्वत हालतात ह्या ख्रिस्तोक्तीची प्रचिती पाहाण्याची वेळ आली होती. श्रद्धा मग ती एखाद्या विभूतीची असो वा सामान्य माणसाची असो श्रद्धा ती श्रद्धाच.

---

१. "माझ्या आठवणी" ग्रंथ २, पृष्ठ ११४.

तिनें पर्वत हललेच पाहिजेत. मात्र सामान्य माणसांची तशी घटना झाली पाहिजे. अपेक्षेप्रमाणें थोडाबहुत पैशाच्या निधि जमल्यावर कामासाठी योग्य माणसें जमा करूं लागलों. निधि जमवणें हें माणसाचें काम. पण माणसें मिळणें ही ईश्वरी देणगी. ह्या कामाला स्वार्थत्यागपूर्वक वाहून घेऊन काम करणारीं माणसें मिळणे कठीण जाऊं लागलें. वेतनाकडे लक्ष न देतां केवळ कार्यावर श्रद्धा ठेवून काम करणारीं माणसें पाहिजे होतीं." ह्या जिवंत उद्गारातून आपण आंज स्फूर्ती घेणे जरूर आहे.

सामाजिक क्रांतीचा कार्यक्रम :

१. लोकशिक्षण

भारताचे स्वातंत्र्ययुग सुरू झाल्यापासून राजकीय, सामाजिक व आर्थिक समतेच्या आकांक्षा सामान्य जनतेच्या मनात जागृत झाल्या. ह्या आकांक्षांना तोंड पाडून ह्या आकांक्षांवरील निष्ठा डोळस व सक्रिय करण्याचे काम आजच्या समाजसुधारकाला करावयाचे आहे. सामाजिक समतेचा प्रचार करताना आजच्या युगाचे महात्म्य, ज्याला काल-महात्म्य असे संबोधण्यात येते, ते समाजसुधारकांच्या पाठीमागे सज्ज आहे. पण त्या काल-महात्म्याचा पूर्ण फायदा घेऊन सामाजिक समतेच्या तत्त्वाचे सर्वांगीण स्वरूप व त्या तत्त्वांची शाश्वत मूल्ये सामान्य जनतेला पटवून देण्याकरिता जोराच्या व धडाक्याच्या प्रचाराची आज आवश्यकता आहे. वेदांतातील "तत्वमसि" ह्या उदात्त तत्त्वाचा हिंदु-संस्कृतीने स्वीकार केला असला तरी प्रत्यक्ष आचारात ह्या तत्त्वाच्या सर्वस्वी विरुद्ध अशा रूढी आज अनेक शतके हिंदू समाजात प्रचलित आहेत. त्या रूढींमुळे निर्माण होणारा विरोध आज समाजसुधारकाला जिंकावयाचा आहे. सामाजिक क्रांतीची कल्पना ज्या समतेच्या महनीय तत्त्वावर आधारलेली आहे त्या तत्त्वाची जाणीव सुषुप्तावस्थेत सर्व-सामान्य जनतेच्या मनात आधीच असल्यामुळे त्या जाणीवेला जागृत व डोळस स्वरूप प्राप्त करून देणे आज जरूर आहे. कोणत्याही क्रांतिकारक तत्त्वाचा अंतिम विजय व्हावयाचा असल्यास त्या कल्पनांचा पुनः पुनः आवेशाने उच्चार होणे आवश्यक असते; म्हणूनच सामाजिक समतेच्या तत्त्वाचा जयघोष बुद्धिवादी समाजसुधारकांनी अखिल महाराष्ट्रातील व्यासपीठावरून करणे हे त्यांचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. महनीय क्रांतितत्त्वाचा उच्चार पक्षातीत अशा भूमिकेवरून गावोगावी व खेडोखेडी झाला म्हणजे त्या उच्चारांनी व्यक्त होणारे विचार जनतेत पसरू लागतील. केवळ तत्त्वाचा उच्चार करून फायदा होणार नाही, अशा तऱ्हेचे विषण्णपणाचे विचार सुधारकांनी बाजूला ठेवले पाहिजेत. तत्त्वाचा उच्चार, त्यानंतर विचारांचा प्रसार आणि मग तात्त्विक विचारांचे आचरण असाच क्रम लोकशाहीतील सामाजिक अगर आर्थिक क्रांती अनुसरीत असते, असे इतिहास दाखवितो. जेफरसन ह्या

अमेरिकेच्या प्रेसिडेंटने एकदा असे म्हटले होते की, "ज्या राष्ट्राची आपण अडाणी व स्वतंत्र राहू अशी अपेक्षा असते त्या राष्ट्राची अपेक्षा कधीही पूर्ण होऊ शकत नाही." ज्ञान व लोकजागृती हाच स्वातंत्र्याचा प्रमुख पाया होय म्हणून लोक-शिक्षणाचा मार्ग सामाजिक व आर्थिक समतेचा पुरस्कार करणाऱ्या सुधारकांनी अवलंबिणे अवश्य असते. क्रांतिकारक कल्पनांचे प्रतिबिंब प्रत्यक्ष सामाजिक जीवनात दिसण्यापूर्वी त्या कल्पनांचा प्रचार करणे अगत्याचे असते. मॅक्स-लर्नर ह्या ग्रंथकाराने क्रांतिकारक कल्पनांची आधुनिक भौतिक शास्त्रांबरोबर जी तुलना केली आहे ती मोठी मार्मिक अशी आहे. मॅक्स-लर्नर म्हणतो की, "कल्पना म्हणजे अजस्र व प्रभावी शस्त्र आहे. भौतिक शस्त्रास्त्राप्रमाणे क्रांतिकारक कल्पना ह्या विध्वंसक असतातच; पण भौतिक शस्त्रास्त्रांना जे कधीही साधत नाही असे नव-सृष्टि-निर्मितीचे कार्य क्रांतिकारक कल्पना पार पाडीत असतात."

आपल्या सार्वजनिक व सामाजिक जीवनाचे एक विषादकारक स्वरूप असे आहे की, सामान्यतः राजकीय पक्षोपपक्षांमध्ये विखुरलेले कार्यकर्ते पक्षातीत अशा सामाजिक प्रश्नांचा विचार करण्याकरिता एका समान व्यासपीठावर क्वचितच येतात. म्हणून सामाजिक सुधारणेच्या विशाल व्यासपीठावर सर्व प्रागतिक व पुरोगामी पक्षांच्या अनुयायांनी उपस्थित राहून महाराष्ट्रातील सामाजिक जीवनाचे वैभव वृद्धिंगत करणे आज अवश्य आहे, असे मला वाटते. समाजकारण हे राजकीय पक्षोपपक्षांतील विरोध व चुरस ह्यापासून सर्वस्वी अलिप्त आहे. पुरोगामी बुद्धिवादावर विश्वास असणाऱ्या, व सामाजिक समतेच्या तत्त्वानुसार नवसमाज-निर्मिती करण्याची निष्ठा बाळगणाऱ्या, सर्व समाज-सेवकांना सामाजिक सुधारणेचे व्यासपीठ मोठ्या प्रेमाने आवाहन करीत आहे. ह्या व्यासपीठावर एकत्रित येऊन सामाजिक समतेच्या महनीय व शाश्वत मूल्यांच्या तत्त्वाचा प्रचार सामाजिक परिषदेने निष्ठेने, सतत व अविरत करणे हे परिषदेपुढील आजचे कर्तव्य आहे असे मला वाटते.

सामाजिक शिक्षणाचे काही महनीय प्रयत्न महाराष्ट्रात आज चालू आहेत. बहुजनसमाज व हरिजन समाज ह्यांमध्ये आधुनिक शिक्षणाचा प्रसार जितका जास्त होईल तितक्या प्रमाणात समाजसुधारणेचे गाडे जोराने गतिमान होईल यात संशय नाही. पण समाजकार्यासाठी बौद्धिक शिक्षण घेताना केवळ शालेय पुस्तकांचेच परिशीलन करून भागणार नाही. मला असे सुचवावयाचे आहे की, शालेय व विद्यालयीन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना समाजशिक्षण देणे आवश्यक आहे. **त्या दृष्टीने कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजनसमाजाच्या शिक्षणाचे जे प्रयत्न मोठ्या धडाडीने चालविले आहेत त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणे जरूर आहे.** तशाच दृष्टीने, परंतु निराळ्या स्वरूपात प्रयत्न करणाऱ्या आणखी दोन संस्थांचा उल्लेख करणे मला जरूर वाटते. कोल्हापूरशेजारी गारगोटी येथे श्रीयुत गावडे यांच्या प्रत्यक्ष कार्यदर्शनाखाली मौनी विद्यापीठाने लोकशिक्षणाचा जो अभिनव कार्यक्रम

सुरू केला आहे त्या कार्यक्रमाचे नवसमाज-निर्मितीच्या दृष्टीने फार मोठे महत्त्व आहे असे मला वाटते. ह्या विद्यापीठातर्फे अनेक शिक्षण-संस्था चालू झाल्या असून ग्रामीण जनतेमध्ये सहकार तत्त्वाचा प्रचार करून, अस्पृश्योद्धाराची तळमळ निर्माण करून व सामाजिक समतेच्या तत्त्वाचे दैवी दर्शन घडवून आणण्याचे जे कार्य मोठ्या निष्ठेने चालले आहे त्याबद्दल मला ह्या संस्थेच्या चालकांचे मनःपूर्वक अभिनंदन करावेसे वाटते. आधुनिक शिक्षण घेतल्यामुळे ग्रामीण तरुण आपल्या परिस्थितीपासून व ग्रामांपासून सर्वस्वी दुरावतात. तसे न करता ग्रामीण वातावरणातच त्यांचे शिक्षण केल्याने ग्रामसुधारणा व नवसमाज-निर्मिती ही दोन्ही कार्ये सिद्ध होण्यास मदत होईल अशा उदात्त कल्पनेने हे क्रांतिकारक प्रयत्न मौनी विद्यापीठाने सुरू केले आहेत. हे प्रयत्न अद्याप बाल्यावस्थेत आहेत; पण हे प्रयत्न जर यशस्वी झाले तर त्या प्रयत्नांचे अनुकरण सर्व महाराष्ट्रभर किंबहुना सर्व भरतखंडभर सुरू होईल ह्याबद्दल मला संशय वाटत नाही. मौनी विद्यापीठातर्फे होणाऱ्या प्रयत्नापासून नवसमाज-निर्मितीला कसे साहाय्य मिळू शकेल ह्याचे एक स्फूर्तिदायक उदाहरण म्हणून मी वेडीव या छोट्या खेड्यामध्ये विद्यापीठाच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या प्रयोगाचा अवश्य उल्लेख करीन. हे खेडे अगदी छोटे असून ह्या खेड्यामध्ये धनगर लोकांची प्रामुख्याने वस्ती आहे. हे लोक एका ठिकाणी असे राहात नाहीत. त्यांच्यामध्ये अद्याप जीवनाकरिता भटकण्याची प्रवृत्ती (Nomadic Habits) आढळते. विद्यापीठाच्या कार्यकर्त्यांनी सरकारचे साहाय्य मिळवून जवळजवळ १८० एकर जमीन संपादन केली व ती वेडीव धनगर बांधवांमध्ये विभागून देऊन काही जमिनीत गवत उत्पन्न करून व काही जमिनीत भात, नागली व भुईमुग यांची निर्मिती करून विधायक कार्यक्रम सुरू केला आहे. त्यामुळे हा भटकणारा समाज वेडीव गावी स्थिर होऊन त्याच्या शिक्षणाची सोय करणे आता शक्य झाले आहे. वेडीव गावात होणारा हा प्रयोग आज अल्प प्रमाणावर होत आहे ही गोष्ट उघडच आहे. परंतु नवसमाज-निर्मितीच्या दृष्टीने लोकशिक्षणाचे कार्य सुरू केल्यानंतर त्या कार्यातूनच समाजसुधारणा व आर्थिक समता यांचाही उद्भव कसा होऊ शकतो याचे हा प्रयोग म्हणजे एक नमुनेदार उदाहरण आहे असे मला वाटते. मौनी विद्यापीठाच्या स्वरूपावरच पण शहरी वस्तीमध्ये मालेगाव येथे अशाच तऱ्हेचा लोकशिक्षणाचा प्रयत्न श्री. धैर्यशीलराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चालू आहे. गांधी विद्यामंदिर असे ह्या संस्थेचे नाव आहे. १९३४ साली ह्या संस्थेचे कार्य अल्प स्वरूपात सुरू झाले. त्यानंतर प्रतिवर्षी ह्या कार्याचा व्याप वाढत असून लौकरच ह्या कार्याचा परिणाम म्हणून मालेगाव व मालेगावशेजारच्या सर्व खेड्यांमध्ये सहकारी तत्त्व व नवसमाजनिर्मिती तसेच आर्थिक विषमतेचे उच्चाटन वगैरे उद्दिष्ट साध्य होण्याची शक्यता आता कार्यकर्त्यांना वाटू लागली आहे. अशाच तऱ्हेचे लोकशिक्षणाचे प्रयोग ठिकठिकाणी व्यापक स्वरूपात सुरू

होणे अवश्य आहे. हे प्रयोग केवळ सामाजिक समतेचाच प्रचार करतील असे नाही तर सामाजिक समतेबरोबर आर्थिक समतेचाही प्रचार ह्या प्रयोगामुळे निःसंशय होऊ लागेल.

आज आर्थिक व सामाजिक समतेचा प्रचार करण्याकरिता खरे परिणामकारक साहाय्य शिक्षक व प्राध्यापक वर्ग देऊ शकेल असे मला वाटते. आजचे विद्यार्थी हे उद्याचे नागरिक आहेत ह्या तत्त्वाचा उच्चार आपण अनेक वेळी करीत असतो; पण ह्या तत्त्वाप्रमाणे नागरिकांना समाजशिक्षण देऊन नागरिकत्वाची कर्तव्ये पार पाडण्यास समर्थ करण्याची आजच्या पिढीची जबाबदारी मात्र आपण पाळावी तशी पाळीत नाही. क्रांतिकारक कल्पना स्वीकारण्याचे सामर्थ्य बाल व युवक यांच्या मनामध्ये साहजिकच जास्त असते. क्रांतिकारक कल्पनांना प्रतियोगी साथ देणे बालांना व युवकांना जितके सुलभ असते तितके प्रौढ व जरठ यांना शक्य होत नाही हे तत्त्व सर्वमान्य आहे. म्हणून उद्याचा नवसमाज-निर्मितीचा प्रयोग भरतखंडात यशस्वी व्हावयाचा असल्यास सामाजिक व आर्थिक समतांच्या क्रांतिकारक कल्पनांचा प्रचार व फैलाव शिक्षक व प्राध्यापक यांनी आपल्या विद्यार्थ्यांना दैनंदिन शिक्षण देताना केला पाहिजे असे मला वाटते. आधुनिक काळात ज्या ज्या देशांमध्ये सामाजिक व राजकीय क्रांत्या झाल्या आहेत व होत आहेत, त्या त्या देशांमध्ये शिक्षक व प्राध्यापक तसेच त्यांचे विद्यार्थी, बाल व तरुण, यांनी केवढी मोठी कामगिरी केली आहे ह्याचा आपण विचार केला तर लोकशिक्षणाचे साधन यशस्वी रीतीने वापरण्याकरिता शिक्षक व प्राध्यापक फार महत्त्वाचे कार्य करू शकतील हे मान्य होण्यास मुळीच अडचण पडणार नाही.

२. जातिभेदाचे निर्मूलन

कितीही प्रयत्न केले व कसाही कडाडून हल्ला केला तरी जी जात नाही ती जात असे जाति-संस्थांचे वर्णन केल्यास ते वस्तुस्थितीला धरून होईल, इतके जातिभेद-संस्थांचे सामर्थ्य आज हिंदू समाजात प्रचलित दिसते. जातिभेद या संस्थांबद्दल वैतागाने व निराशेने आगरकरांनी जे उद्‌गार काढले आहेत त्यांची आठवण प्रत्येकास आजही झाल्याशिवाय राहाणार नाही. आगरकर लिहितात:—

"सर्व मानवी प्राणी जन्मतः सारख्या योग्यतेचे अधिकारी असून त्यांचे हक्कहि एकसारखे असतात; व ती योग्यता व ते हक्क त्यांच्याकडे राहाणें हें केवळ त्यांच्या कमी अधिक बुद्धिविकासावर व उद्योगशीलतेवर अवलंबून आहे. या श्रेष्ठ तत्वाची या जगांत प्रस्थापना करण्याच्या कामीं सर्वकालीन व सर्वदेशीय सुधारकांनीं आजपर्यंत अनेक दिशांनीं प्रयत्न केले आहेत, व त्या प्रयत्नास उत्तरोत्तर सिद्धीहि मिळत चालली आहे...कालगतीनें जातिभेदकल्पनावृक्षाचा आज येथें इतका कांहीं विलक्षण विस्तार होऊन गेला आहे व त्याचीं मुळें इतकीं कांहीं खोल गेलीं आहेत

कीं त्याचें समूळ छेदन करणें एका सुधारकासच काय तर सुधारक सहस्राच्या कंपनीसही भारी व जोखमीचें वाटलें तर त्यांत नवल नाहीं. तथापि सुधारणेची विजयपताका अव्याहत फडकत राहण्यास वर निर्दिष्ट केलेल्या श्रेष्ठनीतिप्रणीत तत्वाचेंच साम्राज्य झालें पाहिजे अशी ज्यांची बालंबाल खात्री होऊन गेली आहे, त्यांनीं या वृक्षाच्या अफाट विस्ताराने यत्किंचित्ही डगमगून न जातां 'थेंबें थेंबें तळें साचे' या न्यायानें निदान जी फांदी त्यांच्या मार्गाआड येत असेल तिच्यावर तरी आपली कुऱ्हाड चालवून साधेल तेवढी गुंतागुंत कमी करण्यास झटलें पाहिजे. समुद्रांतील यःकश्चित कीटकांच्या सतत प्रयत्नानें मोठमोठ्या जहाजांचींहि शकलें करून टाकणारे प्रचंड खडक जर उत्पन्न होतात, तर सद्सद्विचारकुठारापुढें या अज्ञानमूलक जातिभेद-कल्पनावृक्षाच्या अखंड जाळ्याचा पाड काय ?"

सामाजिक समतेच्या तत्त्वाचा प्रचार व आचार हिंदू समाजामध्ये जर प्रामुख्याने सुरू व्हावयाचा असेल तर जातिभेद ही संस्था नष्ट होणे अवश्य आहे. जातिभेद ह्या संस्थेच्या इतिहासाचे अध्ययन केल्यास ही संस्था सर्वस्वी कृत्रिम अशा शुचितेच्या कल्पनेतून निर्माण झाली हे सिद्ध करणे कठीण जाणार नाही. **जातिभेद ह्या संस्थेमुळे साहजिकच संकुचित अशा जातीय निष्ठा निर्माण होतात, व सामाजिक जीवनात उच्चनीच भावनेचे प्रतिबिंब अहर्निश उमटलेले दिसते.** आर्थिक समता जास्त महत्त्वाची की, सामाजिक समता जास्त महत्त्वाची असा प्रश्न निघाला असता, सामान्यतः आर्थिक समतेलाच कोणीही जास्त महत्त्व देईल; पण हिंदू समाजात प्रचलित असलेल्या जन्मनिष्ठ उच्चनीच भावनांचे कटू अनुभव आलेला बहुजन-समाज व हरिजन समाज मात्र केवळ आर्थिक समतेलाच फार मोठे महत्त्व देईल असे मला वाटत नाही. आर्थिक मोठेपण मिळविल्यानंतरसुद्धा सामाजिक समतेचा अनुभव येत नाही असे हिंदू समाजातील रोजचे व्यवहार दाखवितात. म्हणून आर्थिक समतेला यशस्वी करण्याकरिता सामाजिक समतेचा पाया समाज-जीवनात निर्माण होणे अवश्य आहे. सामाजिक समतेच्या तत्त्वाचा प्रचार यशस्वी झाला किंवा नाही हे पाहाण्याची अंतिम कसोटी माझ्या मते एकच ठरवावी लागेल ती म्हणजे जन्मजात उच्चनीचपणाच्या कल्पना हिंदु-मनातून समूळ नष्ट झाल्या की नाही हे पाहणे; उच्चनीचपणाच्या आधारावर जगणारे जातिभेद नष्ट झाले म्हणजेच सामाजिक समतेचे साम्राज्य सुरू झाले असे खऱ्या अर्थाने म्हणता येईल. जातिभेदावर हल्ला करताना कदाचित पोटजातींच्या एकीकरणाचा विधायक कार्यक्रमसुद्धा हाती घेणे अनुचित होणार नाही. जोपर्यंत जातिभेदावर नुसता शाब्दिक हल्ला करून जातिनिर्मूलनाचे कार्य फारसे यशस्वी होत नाही तोपर्यंत गौण मार्ग म्हणून, नाइलाजाने पोटजातींच्या एकीकरणाच्या विधायक कार्यक्रमाला दुजोर द्यावा असे मला वाटते. अशा दृष्टीने दादर येथील क्षात्रैक्य समाजाने आपल्या पोटजातींमध्ये एकीकरण करण्याचा जो प्रयोग चालविला आहे तो उल्लेखनीय आहे.

अद्याप शाबूत आहेत. अस्पृश्य देवालयात आल्याबरोबर देव विटाळेल अशी अमंगल कल्पना ज्यांना मंगल वाटते त्या लोकांचा द्वेष अगर तिरस्कार न करता त्यांच्या अज्ञानाची कीव करावी तेवढी थोडीच आहे असे मी म्हणेन. अज्ञानामुळे केवढे समाजविदारक अनर्थ घडू शकतात ह्याचे अस्पृश्यतेचा प्रकार हे एक अद्वितीय उदाहरण आहे. माझ्या समजुतीप्रमाणे अस्पृश्यतानिवारणाचे कार्य यशस्वी करण्याकरिता आपल्या परिषदेने काही विधायक कार्यक्रम स्वीकारणे जरूर आहे. मुंबई प्रदेशात अस्पृश्यता निवारण्याकरिता सरकार फार कसोशीने प्रयत्न करीत आहे ही गोष्ट मोठ्या आनंदाने मान्य करणे जरूर आहे. त्या प्रयत्नांना साथ देऊन समाजसुधारकांनी आज अस्पृश्यता निवारण्याच्या मोहिमेवर निघणे जरूर आहे. अस्पृश्यांच्या नागरिक हक्कांवर केव्हाही हल्ला झाला तर त्या अन्यायाची दाद घेण्याकरिता, व त्यांना साहाय्य देण्यास, सुधारणाप्रेमी कायदे-पंडितांनी पुढे यावे असे मी त्यांना या निमित्ताने, आवाहन करतो. त्याचप्रमाणे गरीब अस्पृश्य रुग्णांना विनामूल्य मदत करण्यास सुधारणाप्रेमी डॉक्टरांनीही मदत करावी असे मी सुचवितो. प्रत्येक जिल्ह्याच्या व तालुक्याच्या गावी अस्पृश्यांना मदत करणारे डॉक्टर व वकील जर पुढे आले तर अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायांना तोंड फुटेल व त्यांना योग्य व जरूर ती वैद्यकीय मदत मिळणे सुलभ होईल. ह्या कामी सरकारी प्रयत्न व समाजसेवक यांचे सहकार्य होणे जरूर आहे व तसे सहकार्य करण्याकरिता आपल्या परिषदेच्या निरनिराळ्या शाखांनी पुढे येणे फार महत्त्वाचे आहे. अस्पृश्यतेचा कलंक सर्वस्वी नष्ट होऊन हरिजन बांधवांना समाजा-मध्ये नागरिकत्वाचे सर्व हक्क व समतेच्या तत्त्वाचे सर्व अनुभव मिळाल्याशिवाय आपले लांछन धुतले गेले असे हिंदुधर्माला मानता येणार नाही. म्हणून अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यक्रमाला समाजसुधारकांनी आपल्या कार्यक्रमात अग्रस्थान देणे जरूर आहे आहे असे मी या प्रसंगी सुचवितो.

५. हिंदू कोड

हिंदू कोड ह्या विषेयकाला हार्दिक पाठिंबा देणे हेही समाजसुधारकांचे कर्तव्य आहे असे मला वाटते. हिंदू कोड ह्या विषयावर मी स्वतः कर्नाटक युनिव्हर्सिटीपुढे सशास्त्र अशी चर्चा मोठ्या विस्ताराने केली आहे. शिवाय ह्याच विषयावर पहिल्या समाजपरिषदेपुढेही मी विवेचन केले आहे. म्हणून या विषयावर मी आज जास्त बोलू इच्छित नाही. मात्र मी ह्या विषयावरील माझा विश्वास थोडक्यात सांगू इच्छितो. हिंदू समाजातील विषमतेवर जालीम उपाय योजावयाचा असल्यास हिंदू कोड मान्य झाले पाहिजे असे मला वाटते. आजच्या सामाजिक मूल्यांना योग्य तो अवसर देऊन हिंदू कोड नवीन स्वरूपात अंमलात आणणे हे आजच्या युगात एक महत्त्वाचे कार्य होऊन बसले आहे. ह्या कार्याला आज अनपेक्षित

लोकांकडून विरोध झालेला दिसतो त्याचे मुख्य कारण म्हणजे हिंदु-संस्कृतीच्या परिवर्तनशील स्वरूपाबद्दल पसरलेले अज्ञान हे होय. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आपल्या अत्यंत महनीय अशा पुरोगामी बुद्धिवादाला अनुसरून हिंदू कोडाच्या कल्पनेला जर जोराचा आधार दिला नसता तर सध्या चालू असलेल्या हिंदू कोड कल्पनेची आस्तेकदम प्रगतिसुद्धा झाली नसती. म्हणून सध्या दिसणाऱ्या आस्तेकदम प्रगतीला जोराची चालना देण्याकरिता सर्व पुरोगामी बुद्धिवाद्यांनी हिंदू कोडाच्या कल्पनेचा व त्यामध्ये अंतर्भूत झालेल्या नवीन विचाराचा प्रसार करणे अवश्य आहे असे मला वाटते. हिंदू कोडाचा झालेला पराभव म्हणजे स्वातंत्र्य-युगातील पुरोगामी बुद्धिवादाचा झालेला हृदयविदारक पराभव होय ही माझी भावना मी आजपर्यंत अनेक वेळा व्यक्त केलेली आहे.

६. भंगी-विमोचन

सामाजिक परिषदेने हाती घेण्यासारख्या आणखी एका प्रश्नाचा उल्लेख करणे जरूर आहे तो म्हणजे भंग्यांचा प्रश्न होय. भंग्यांच्या प्रश्नाचा विचार करताच ज्ञानदेशामधील अस्पृश्योद्धाराच्या कार्यातच ज्यांनी आपला देह ठेवला त्या काकासाहेब बर्व्यांची सादर आठवण झाल्याशिवाय राहात नाही. भंग्यांच्या प्रश्नाचा सांगोपांग विचार करून त्या प्रश्नाची सोडवणूक करण्याकरिता नेमलेल्या समितीचे (१९४९-१९५०) काकासाहेब बर्वे हे अध्यक्ष होते. सदर समितीने केलेल्या शिफारशी अंमलात आणणे वस्तुतः कठीण आहे असे नाही; पण ह्या शिफारशी होऊन तीनचार वर्षे लोटली असतानासुद्धा अद्यापि भंग्यांची परिस्थिती आहे तशीच आहे. ज्यांचे काम अत्यंत तिरस्करणीय मानले जाते व जे कष्टाचे, बहिष्कृत व अधःपतित असे जीवन कंठीत आहेत अशा आपल्या भंगी बांधवांच्या प्रश्नाकडे महात्माजींनी ५० वर्षांपूर्वी समाजाचे लक्ष वेधले. त्यानंतर भंग्यांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्याकरिता महात्माजींनी किती हिरिरीने प्रयत्न केले हे आपण जाणताच. तरीसुद्धा आज गावोगावी भंग्यांचे काम करणाऱ्या बांधवांना अद्यापि सामाजिक समतेचा दुरूनसुद्धा, अल्पदेखील अनुभव मिळत नाही हे सांगावयास नकोच. भंग्यांच्या कार्य करण्याच्या पद्धतीमध्ये सुधारणा करणे, शौचकूपांची रचना बदलणे, भंग्यांच्या सामाजिक जीवनात शिक्षणाचा प्रसार करणे व त्यांच्या आर्थिक वेतनाचा सहानुभूतीने विचार करून भंग्यांचे जीवन जास्त सुखकारक करणे हे ठिकठिकाणी असलेल्या म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डे यांचे कर्तव्य आहे असे मला वाटते. हे कर्तव्य त्यांनी पार पाडावे म्हणून सामाजिक परिषदेच्या शाखांनी कसोशीने प्रयत्न करावेत असे मी सुचवितो. ह्या कामी मुंबई प्रदेशातील सरकारचेही साहाय्य मिळविणे फारसे कठीण जाणार नाही. जरूर आहे ती या कार्याला चालना देणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांची. ती जरूर भागवून

कोठल्याही जातीय संस्थेमध्ये कोणत्याही हेतूने सहकार्य करावयास एखादा समाजसुधारक निघाला तर त्याच संस्थेमध्ये तो गुरफटला जाण्याचा संभव आहे, याची अर्थात मला जाणीव आहे; म्हणून त्या विधायक कार्यक्रमास हात घालताना समाजसुधारकाने सदैव जागृत असणे आवश्यक आहे. पोटजातींचे एकीकरण करताना हा कार्यक्रम म्हणजे एका मोठ्या जातिनिर्मूलनाच्या कार्यक्रमाचा पहिला टप्पा आहे ही गोष्ट त्यांनी स्वतः लक्षात ठेवून एकीकरणाच्या चळवळीत सामील होणाऱ्या सर्व जनतेला समजावून देणे जरूर आहे. माझ्या समजुतीप्रमाणे, सामाजिक समतेच्या तत्त्वाचा प्रचार करीत असताना जातिनिर्मूलनाचे ध्येय समाज-सुधारकांनी आज आपल्या डोळ्यासमोर सदैव ठेवले पाहिजे.

३. आंतरजातीय विवाह

जातिनिर्मूलनाच्या कामी आंतरजातीय रोटी व्यवहार व बेटी व्यवहार या साधनांना महत्त्वाचे स्थान देणे अवश्य आहे. निरनिराळ्या निमित्तांनी आंतरजातीय संमेलने घडवून आणून चहापान व भोजनसमारंभ यांची व्यवस्था करावी व मोकळे-पणाने झालेल्या प्रेमळ संभाषणाच्या साहाय्याने आंतरजातीय सौहार्द निर्माण कर-ण्याचे कार्य आपल्या शाखांनी अवश्य अंगावर घ्यावे. मात्र आंतरजातीय विवाहाच्या साधनांचा विचार करताना काही मूलभूत गोष्टी विसरणे योग्य होणार नाही. आधुनिक काळात विवाह ही सर्वस्वी वैयक्तिक बाब झाली आहे. परस्पर आवडीनिवडी, आहारविहार, आर्थिक परिस्थिती, आशा-आकांक्षा व जीवनविषयक दृष्टिकोन या गोष्टींचा विचार करूनच आधुनिक तरुण-तरुणी आपले जीवनाचे भागीदार निवडतात. ही निवड करताना संकुचित जातीय निर्बंधाची बाधा होऊ नये असे वातावरण आपण अवश्य निर्माण केले पाहिजे; व जेव्हा जेव्हा समसमान अशा भिन्न जातीय वधूवरांचे विवाह होतील तेव्हा तेव्हा त्यांचे अभिनंदन करून तशी प्रथा प्रचलित होण्यास मनःपूर्वक साहाय्यही सामाजिक परिषदेने द्यावे; पण केवळ आंतरजातीय विवाहांचाच असा विशिष्ट प्रचार करून हे कार्य यशस्वी होईल असे मला वाटत नाही. या विषयाचा विचार करताना आजच्या समाजात जन्मसिद्ध व कृत्रिम अशा उच्चनीचतेच्या भावनेमुळे पसरलेल्या विषम व विसदृश आचार–विचारांचा, भिन्न राहणीचा व स्त्रीपुरुषांमधील शिक्षणविषयक विषमतेचा सर्वस्वी विसर पडू देणे बुद्धिवादाशी विसंगत होईल. आज पुढारलेल्या वर्गातील तरुण–तरुणींना आंतर-जातीय विवाहाला उत्तेजन देण्याचे तत्त्व तितकेसे क्रांतिकारक वाटणार नाही; पण मला अशी भीती वाटते, की बहुजनसमाज व हरिजन बांधव यांना आज तरी हे तत्त्व पटणार नाही व पचणार नाहीच नाही. म्हणून परवा श्री. जगजीवनराम यांनी आंतरजातीय विवाह प्रसृत करण्याकरिता कायद्याच्या सक्तीची मदत घ्यावी अशी जी सूचना केली आहे ती उपकारक होईल असे मला वाटत नाही. प्रजनन-

शास्त्राच्या दृष्टीने सर्वमान्य झालेले निषिद्ध संबंधाचे काही नियम कायदा अंमलात आणू शकतो हे खरे; पण त्यापलीकडे जाऊन जास्त व्यापक "विधिनिषेध" (Commands and Prohibitions) कायद्याने निर्माण करणे अनिष्ट व अव्यवहार्य आहे. विवाहासारख्या वैयक्तिक विषयावर सक्ती करण्याच्या दृष्टीने कायद्याने अशा तऱ्हेचा हस्तक्षेप करणे तत्त्वतः व व्यवहारतः अशक्य व अनिष्ट आहे असे मी समजतो. या बाबतीत सुधारणा फार मंदगतीने होत आहे हे मी मान्य करतो; पण या सुधारणेला आवश्यक असलेली शैक्षणिक, आर्थिक व सामान्य राहणीविषयक स्वतःची प्रगती घडवून आणण्याची जबाबदारी बहुजनसमाज व हरिजनसमाज यांनी दृष्टीसमोर ठेवणे अगत्याचे आहे. कोणतीही समाजसुधारणा मंद गतीने होत आहे म्हणून अधीर व क्रुद्ध होऊन, वरवर आकर्षक व बाह्यतः परिणामकारक वाटणारे उपाय, सारासार विचार न करिता सुचविणे हे बुद्धिवादाशी सर्वस्वी विसंगत आहे असे मला वाटते. आंधळ्या अधीरतेतून निर्माण होणारा क्रोध व त्या क्रोधाच्या पोटी दडणारा संमोह व बुद्धिनाश समाजसुधारकाने मोठ्या कटाक्षाने टाळला पाहिजे. हिंदू समाजात प्रचलित असलेले, विषमतेवर आधारलेले चढत्या उतरत्या भाजणीचे हे अवघड कोडे समाधानकारक रीतीने सोडविणे अवश्य आहे, तसेच ते लवकर व अविलंबाने सोडविणेही इष्ट आहे; पण ते सोडविताना त्या कोडयातील आर्थिक व शैक्षणिक अशा ज्या समस्या आहेत त्यांचा विचार टाळणे बुद्धिवादाला शक्य नाही. म्हणूनच सर्व समाजसुधारणा करताना प्रचार व साधने यांच्या शास्त्रीयतेचे (Rationality) व शुचितेचे महत्त्व आपण विसरता उपयोगी नाही.

४. *अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीची आवश्यकता*

जातिभेदावर हल्ला करताना, साहजिकच, अत्यंत निर्घृण व दुष्ट अशा अस्पृश्यतेवर निकराचा हल्ला करणे आज समाजसुधारकाला आवश्यक आहे. केवळ मोठ्या तत्त्वाचा उच्चार केल्यामुळे लगेच कार्यसिद्धी होत नाही व उच्चार व आचार यांच्यामधील अंतर घटत नाही ह्या हृदयविदारक सत्याची प्रचीती अस्पृश्यतानिवारणाच्या कार्यात कोणालाही आल्याशिवाय राहाणार नाही. महात्माजींनी अस्पृश्यता निवारण्याचे कार्य स्वराज्यप्राप्तीच्या कार्यक्रमात अंतर्भूत केल्यानंतर सुद्धा, स्वराज्य मिळाल्यानंतर देखील, जमीनजुमला नसलेले, अन्नाला मोताद झालेले, सामान्य माणसाचे अधिकार न मिळालेले असे असंख्य हरिजन आजही अस्पृश्यतानिवारण कधी यशस्वी होईल अशी मोठ्या आतुरतेने वाट पाहात आहेत. विनोबाजींसारख्या सत्पुरुषाला सुद्धा अस्पृश्यांना घेऊन देवालयात प्रवेश करताना जो कटोर अनुभव आला त्यावरून एकच गोष्ट सिद्ध होते ती अशी की, अस्पृश्यतेचा मुख्य व मूळ आधार जे अज्ञान त्या अज्ञानाचे बालेकिल्ले

सुधारणेवर विश्वास असणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी ह्या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नाचा निकाल लावण्याचा शिकस्तीने प्रयत्न करावा असे मला वाटते.

७. *कुटुंब–नियोजन*

आणखी एका प्रश्नाकडे समाजसुधारकांनी आपले लक्ष देणे अवश्य आहे असे मला वाटते. तो प्रश्न कुटुंब-नियोजनाचा होय. डॉ. चंद्रशेखर यांनी अखिल भारतीय फॅमिली प्लॅनिंगच्या पहिल्या परिषदेपुढे जे भाषण केले त्यामध्ये या प्रश्नाची चर्चा सांगोपांग व सशास्त्र पद्धतीने केली आहे. आज कुटुंब-नियोजनाचा प्रश्न जरी मुळीच सुटलेला नसला तरी कुटुंब-नियोजनाला तात्त्विक विरोध मात्र बराच कमी झाला आहे. कुटुंब-नियोजनाच्या बाबतीतसुद्धा सामान्य जनता प्रत्यक्ष साहाय्याची अगदी आतुरतेने अपेक्षा करीत आहे, ह्याचे प्रत्यंतर श्रीमती शकुंतलाबाई परांजपे यांना पदोपदी येते असे त्या सांगतात. कुटुंबनियोजन करण्याची तीव्र लालसा अनेक गरीब कुटुंबातील अनेक स्त्रियांच्या मनात वावरत असते; पण ह्या कल्पनेला योग्य ते साहाय्य व मार्गदर्शन न मिळाल्यामुळे त्यांना कुटुंब-नियोजन करता येत नाही. कुटुंब–नियोजनाच्या प्रश्नाने आज एका राष्ट्रीय प्रश्नाचे स्वरूप धारण केले आहे. केवळ कौटुंबिक सुखाकरिता नव्हे तर राष्ट्रीय अभिवृद्धीकरिता कुटुंब-नियोजनाची आवश्यकता किती आहे ह्या गोष्टीचे महत्त्व डॉक्टर चंद्रशेखर यांनी आपल्या भाषणात अनेक प्रमाणांनी सिद्ध केले आहे. जन्म-मृत्यूच्या आकड्यांचा अभ्यास केल्यास दोन्ही बाबतीत आपल्या देशाने जगात फार वरचा नंबर पटकावल्याचे दिसून येते. जननाची संख्या जास्त मोठी, तसेच मयतांची संख्या फार मोठी व अल्पवयीन बालकांची मरणसंख्या त्याहूनही मोठी असे दुर्दैवी चित्र हे आकडे शाबीत करतात. दर माणशी दर वर्षी उत्पन्नाचा विचार केल्यास आपला आकडा २१ रुपयांच्यावर जाऊ शकत नाही असे शोचनीय दृश्यही आकडेशास्त्र सिद्ध करू शकेल. जर कुटुंब-नियोजनाचा प्रचार व स्वीकार आपल्या देशामध्ये मोठ्या प्रमाणावर झाला नाही तर पुढील पन्नास वर्षांत जनतेवर भुकेने व्याकुळ होऊन मरण्याची आपत्ती आल्याशिवाय राहाणार नाही. ह्या प्रश्नावर जास्त सशास्त्र चर्चा करण्याचा माझा अधिकार नाही पण कुटुंब–नियोजनाचे कार्य समाजपरिषदेने हातामध्ये घ्यावे असा मात्र माझा दृढ विश्वास असल्यामुळे मी ह्या प्रश्नाकडे परिषदेचे लक्ष वेधू इच्छितो.

सामाजिक समतेचा जयजयकार

शेक्सपिअरने मानवी जीवनाबद्दल असे म्हटले आहे की, "मानवी जीवनामध्ये भरतीचे व ओहटीचे क्षण नेहमीच येत असतात. भरतीच्या क्षणांचा फायदा घेऊन मानवाने प्रयत्न केल्यास तो यशाप्रत व भाग्याप्रत जाऊ

शकतो.''[१] जी गोष्ट वैयक्तिक जीवनाबद्दल खरी आहे तीच सामाजिक व राष्ट्रीय जीवनाबद्दलही खरी आहे. राजकीय स्वातंत्र्य मिळविल्यानंतर भारताच्या इतिहासात जे पर्व सुरू झाले आहे त्या पर्वाला भाग्याचे पर्व असे संबोधणे अयोग्य होणार नाही. 'विश्वंभरा भगवती' अशी जी भवितव्यता ती आज कुतूहलाने आजच्या युगाकडे पाहात आहे. आपले मार्गदर्शन करण्याकरिता पंडित जवाहरलाल नेहरूंसारखा अद्वितीय पुढारी देऊन भवितव्यतेने अखिल राष्ट्रावर मोठे उपकार केले आहेत. पंडित नेहरूंचे चर्चिल साहेबांनी असे वर्णन केले आहे की, 'जगामध्ये कल्पनांची भीती नसलेला व क्रोधापासून मुक्त असलेला हा एक अद्वितीय पुरुष आहे.' हे वर्णन करणाऱ्या चर्चिल साहेबांची योग्यता लक्षात घेता ह्या वर्णनास विषयभूत झालेले पंडित नेहरू केवढे मोठे असतील ह्याबद्दलची कल्पना सहज करता येईल. आज जगात कल्पनांच्या भीतीचे साम्राज्य पसरलेले आहे. क्रांतिकारक कल्पना आपल्या दारावर ठोठावीत आहेत ह्या भीतीने, स्वार्थाचे (Vested Interests) दरवाजे बंद करून त्यांना संप्रदायांचे, अंधश्रद्धेचे व विषमतेचे अडसर लावण्याचे प्रयत्न ठिकठिकाणी चालले आहेत. 'Fear of ideas' म्हणजे कल्पनांपासून भीती ह्या रोगावर बुद्धिवादासारखे रामबाण औषध नाही. बुद्धिवादाचा स्वीकार करून क्रांतिकारक कल्पनांचा प्रचार करताना क्रोधही जिंकणे आवश्यक आहे आणि म्हणूनच क्रोधापासून मुक्त झालेला व कल्पनांची भीती ज्याला कधीही शिवत नाही असा अद्वितीय नेता भरतखंडाला आज लाभला आहे, हे आजच्या आपल्या युगाचे महनीय भाग्य होय. राजकारणात जहाल असणारे अनेक लोक समाजकारणात प्रतिगामी असतात. तसेच समाजकारणात जहाल असणारे अनेक लोक राजकारणात अगर अर्थकारणात प्रतिगामी होऊ पाहातात; व त्यामुळेच सर्वगामी व सर्वांगीण अशी क्रांती दुरावते. पुरोगामी बुद्धिवाद हा कप्पेवादी (Compartmental) बुद्धिवाद कधीही असू शकत नाही. सामाजिक समतेवरील निष्ठा ही सर्वंकष व सर्वांगीण असावी लागते. राजकीय, सामाजिक व आर्थिक समतेवरील एकांतिक निष्ठेचे व चिकित्सक पुरोगामी बुद्धिवादाचे अलौकिक उदाहरण म्हणून पंडित जवाहरलाल नेहरूंचा उल्लेख आज कोणीही करू शकेल. आजच्या युगाचे महत्त्व ओळखून पंडित नेहरूंनी परवा एका सभेत "आराम हराम है" अशी घोषणा मोठ्या त्वेषाने केली हे आपणाला आठवत असेलच. "आराम हराम है" ह्या घोषणेचा जन्म क्रांती घडवून आणण्याच्या अधीरतेत आहे. ह्या घोषणेचा जन्म सभोवार पसरलेल्या उदासीन वृत्तीच्या निषेधात आहे; ही गोष्ट लक्षात ठेवून आपण आज क्रांतीला अनुकूल असे सामाजिक आंदोलन करण्याचा प्रयत्न करणे जरूर

---

१. "There is a tide in the affairs of men, which taken at the flood, leads on to fortune."

आहे. लोकशाहीचे अस्तित्व कायम ठेवण्याकरिता लोकशाहीवर निष्ठा असणाऱ्या सर्व नागरिकांनी आज सामाजिक व आर्थिक समतेच्या तत्त्वाचा स्वीकार करून लोककल्याणाचे ध्येय साध्य करण्याकरिता लोकशाहीला साथ देणे जरूर आहे. भरतखंडामध्ये अस्तित्वात असलेली आर्थिक विषमता ही आजच्या लोककल्याणाचा एक प्रबळ शत्रू आहे हे खरे; पण आर्थिक विषमतेपेक्षाही जास्त प्रबळ असा लोककल्याणाचा शत्रू सामाजिक विषमता आहे असे मला वाटते. म्हणून सामाजिक विषमता नष्ट होण्यासाठी, सामाजिक समतेचा प्रचार करण्याची महत्त्वाची कामगिरी आपल्या परिषदेने अंगावर घ्यावी असे मी आग्रहाने सुचवितो. **राजकीय समता ही सामाजिक व आर्थिक समतांचे साहाय्य मिळविल्याशिवाय फार टिकाव धरू शकणार नाही** हे सत्य आपण विसरता उपयोगी नाही. म्हणून सामाजिक सत्याचा शोध करण्यास निघालेल्या सर्व समाजसुधारकांना माझी अशी विनंती आहे की, स्वातंत्र्ययुगाला आवश्यक व पोषक असणाऱ्या सामाजिक समतेच्या तत्त्वाचा जयजयकार करण्यास त्यांनी जनतेला शिकवावे व त्या जयजयकारातूनच सामाजिक समतेच्या तत्त्वाचे आचरण सामाजिक जीवनात प्रतिबिंबित करण्यास जनतेला प्रवृत्त करावे. अशा रीतीने सामाजिक, आर्थिक व राजकीय समतांच्या त्रिवेणी संगमाचा जीवनप्रवाह जेव्हा भरतखंडात दिसेल तेव्हाच लोककल्याणाचे ध्येय साध्य झाले असे यथार्थतेने म्हणता येईल.

हिंदू कायदा विधेयक

आपल्या विद्यापीठाने आयोजित केलेल्या व्याख्यानसत्रात हिंदू कायदा विधेयकावर दोन व्याख्याने मी द्यावी अशी जेव्हा मला विनंती करण्यात आली तेव्हा आपले आमंत्रण स्वीकारावे की स्वीकारू नये याबद्दल मनाची निश्चिती होईना. एक प्रकारे मन काकू करू लागले. हे विधेयक लोकसभेसमोर आता चर्चिले जात आहे. तेथे, त्याचप्रमाणे बाहेर सर्व देशभर हे विधेयक एक गरमागरम वादाचा विषय झाले आहे. अशा परिस्थितीत या विषयावर मी बोलावे की बोलू नये हा एक संभ्रमात टाकणारा प्रश्न आहे. राजकीय विषयासंबंधी त्याचप्रमाणे जे वादग्रस्त विषय निर्णयासाठी न्यायाधीशासमोर येण्याची शक्यता असते, अशांसंबंधी न्यायाधीशांनी जाहीर चर्चेत भाग घेऊ नये, असा एक संकेत आहे, एक परंपरा आहे. मला त्याची जाणीव आहे. विधियंत्रणा, कारभारयंत्रणा आणि न्याययंत्रणा यांची कार्यक्षेत्रे निश्चित झालेली आहेत. त्यांच्या कार्याच्या कक्षाही ठरलेल्या आहेत. विधियंत्रणेचा शहाणपणा व दूरदृष्टी, कार्यकारी यंत्रणेची भ्रष्टाचारविरहित कार्यक्षमता आणि न्याययंत्रणेची स्वतंत्रता, निःपक्षपातीपणा व सचोटी यांवरच आधुनिक लोकशाही राज्यव्यवस्थेची प्रगती आणि स्थैर्य अवलंबून आहे. राज्य-व्यवस्थेच्या या तीनही घटकांनी परस्परांबद्दल आदर राखून आपापल्या क्षेत्रात काम केले पाहिजे. नागरिकांचे मूलभूत हक्क रक्षण करण्याचे उत्तरदायित्व उच्च आणि उच्चतम न्यायालयावर भारतीय संविधानाने सोपविले आहे. हे कार्य करीत असताना असेही क्षण येतील की जेव्हा न्यायालयांना, नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा भंग करणाऱ्या विधेयकांचा विचार करावा लागेल. त्याचप्रमाणे कारभार-विषयक आदेश कायदेशीर आहेत किंवा कसे या संबंधीही निर्णय करावे लागतील. हे सर्व खरे असले तरी असे कामजेव्हा न्यायालयांसमोर चालते तेव्हा एक गोष्ट

आपण लक्षात ठेवली पाहिजे की न्याययंत्रणा व कारभारयंत्रणा ह्या आपापल्या क्षेत्रात शासनाचे नोकर म्हणूनच काम करीत असतात. कित्येकदा असे घडते की, कारभारयंत्रणेच्या काही आदेशांसंबंधी किंवा कृतींसंबंधी त्याचप्रमाणे एखाद्या विधेयकातील काही तरतुदींसंबंधी न्यायालयीन काम करीत असताना न्यायालयांना नापसंतीचे उद्गार काढावे लागतात. याचा अर्थ मात्र असा नव्हे की या तीन यंत्रणांमध्ये काही झगडा आहे. असा झगडा आहे असे म्हणणे नुसतेच चुकीचे होणार नाही तर अन्यायाचे ठरेल. काही अपवादात्मक प्रसंग सोडल्यास सहसा न्यायाधीशांचा विधेयकामागील ध्येयधोरणाशी संबंध येत नाही. कायद्याचा अर्थ लावून तो जसा आणि ज्या स्वरूपात असेल त्याच स्वरूपात त्याची अंमलबजावणी करावयाची, एवढेच काम न्यायालये कारीत असतात. असे असण्याची शक्यता आहे की एखाद्या कायद्यामागील ध्येयधोरणविषयक कल्पना व्यक्तिशः एखाद्या न्यायाधीशाला पटणारी नसेल. पण आपले वैयक्तिक ग्रह, आग्रह यांचा परिणाम आपल्या न्यायालयीन निवाड्यावर होऊ न देणे, हीच न्यायालयीन सामर्थ्याची व सचोटीची ग्वाही आहे. यासाठीच ज्या देशात लोकशाही जीवनपद्धती स्वीकारण्यात आली आहे त्या देशातील न्यायाधीश स्वतःवर काही बंधने घालून घेतात. आपल्या देशात स्वातंत्र्याच्या या सुरवातीच्या काळात तरी मोठ्या हुद्द्याच्या सरकारी जागांवर काम करणाऱ्यांनी आपल्या वर्तनाने आणि वचनाने सर्व देशासाठी एक आदर्श घालून दिला पाहिजे. या संदर्भात विचार केला असता आपल्या देशातील न्यायधीशांवरील जबाबदारी निःसंशयपणे फार मोठी आहे. सबब, हिंदू कायदा विधेयकाच्या जाहीर वादविवादात न शिरणे मी माझे कर्तव्य समजतो. असा एखादा जाहीर वाद सुरू करावा, हा मला व्याख्यानाला बोलाविण्यात आपलाही हेतू नाही. या विधेयकामुळे जे प्रश्न निर्माण झाले आहेत त्यांचा आपल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी शांतपणे आणि निःपक्षपातीपणे अभ्यास करावा आणि अशा अभ्यासास उत्तेजन मिळावे या हेतूनेच माझी व्याख्याने आपण आयोजित केली आहेत, याबद्दल मला मुळीच शंका नाही. अशा भावनेनेच मी देखील आपल्या आमंत्रणाचा स्वीकार केला आहे. या विधेयकामुळे निर्माण झालेले प्रश्न हे या देशातील लक्षावधी हिंदूंच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असे प्रश्न आहेत, त्यामुळे त्यांचा नीट शास्त्रशुद्ध विचार झाला पाहिजे. हेकेखोर आग्रही वृत्ती शास्त्रीय संशोधनाशी सुसंगत नाही. ज्या काही प्रश्नांसंबंधी मी बोलणार आहे त्याबाबत दोन मते असण्याचीही शक्यता आहे. आपण माझे विचार पारखून घेतल्याशिवाय स्वीकारू नयेत. न्यायाधीश झाला तरी तो नागरिक असतोच. न्यायाधीश होण्याने न्यायाधीशाचे नागरिकत्व काही संपुष्टात येत नाही. न्यायाधीशाला नागरिक म्हणून सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपाच्या कार्यक्रमात भाग घेता येत असतो. सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणांसंबंधीचे प्रश्न जेथे चर्चिले जातात अशा ठिकाणी त्या चर्चेत

भाग घेण्यास न्यायाधीशाला काही प्रत्यवाय असू नये. त्याचप्रमाणे ज्या कार्यक्रमांमुळे राष्ट्राचे सांस्कृतिक जीवन अधिक निरोगी, विशाल आणि मौल्यवान होणार आहे अशा कार्यक्रमांना त्याने साहाय्यभूत झाले पाहिजे. न्यायाधीशाने फक्त न्यायाधीशच राहावे, अन्य काही करू नये; असा आदर्श ठेवावयाचा म्हटला तर तो फार दुबळा आदर्श ठरेल. हिंदू कायद्याचे अभ्यासक आणि हिंदू समाजसुधारक, ज्यांनी ह्या विधेयकाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करावयाचा ठरविला आहे अशा आपणासमोर आता मी चर्चा करीत आहे.

[याप्रमाणे सुरवातीस सांगून न्यायमूर्ती गजेन्द्रगडकरांनी हिंदू कायद्याची ऐतिहासिक दृष्ट्या कशी प्रगती झाली, हे सांगितले. जुन्या संस्कृत ग्रंथांचा आधार घेऊन, हिंदू कायदा स्थिर स्वरूपाचा नसून तो कसा परिवर्तनशील होता हे स्पष्ट केले. त्यांनी हिंदू धर्म व हिंदू कायदा यांतील फरक दाखविला. परिवर्तनशील आणि वर्धिष्णू अशा हिंदू कायद्याची गती ब्रिटिश राजवटीत कशी कुंठीत झाली होती या संबंधाने काही उदाहरणे दिली. विवाहविषयक कायदा, वाटपासंबंधीचा कायदा, स्त्रियांची मिळकत, मराठा व लिंगायत समाजांचे स्थान या संबंधीची सविस्तर चर्चा त्यांनी केली. पूर्वसूरींनी वेळोवेळी दिलेल्या न्यायालयीन निवाड्यांचाही त्यांनी निर्देश केला. त्याचप्रमाणे प्रचलित हिंदू कायद्यातील विविध विधेयकांचा इतिहास त्यांनी सांगितला. नव्या हिंदू कायद्याच्या विधेयकाची पार्श्वभूमी त्यांनी विशद केली. त्याचप्रमाणे ह्या विधेयकाच्या वैशिष्ट्यांचा उल्लेख करून, तत्संबंधीच्या काही मौलिक सूचनाही त्यांनी केल्या. ह्या विधेयकाने कोणकोणते महत्त्वाचे बदल घडून येणार आहेत याची कल्पना दिली. विवाहविच्छेदन, वारसाहक्क, मुलींचा हक्क व हिस्सा त्याचप्रमाणे स्त्रियांच्या मिळकतीच्या हक्कांचे स्वरूप सांगून आपल्या भाषणात न्या. मृ. गजेन्द्रगडकर पुढे म्हणाले,]

हिंदू विधेयकाच्या गुणदोषावर बुद्धिप्रामाण्याने आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने आपण विचार केला पाहिजे, ही गोष्ट मी आपणास आर्जवून सांगत आहे. हिंदू कायदा अपरिवर्तनीय आहे, त्याच्यात कधीच स्थित्यंतरे झाली नाहीत व त्याचा उगम दैवी स्वरूपाचा आहे असे मानणे भ्रमाचे ठरेल. वस्तुतः हकीकत अशी आहे की तो कायदा अनेक स्थित्यंतरांतून गेलेला आहे. त्याच्यात वेळोवेळी बदल झालेले आहेत. ज्या पद्धतीने हे बदल करण्यात आले ती पद्धती मात्र नेहमीपेक्षा वेगळी होती. इंग्रजांच्या राजवटीत हिंदू कायद्याचे स्वरूप स्थिर होते, हे मी तुम्हास सांगितलेच आहे. स्वाभाविकपणे यातून काही दोष निर्माण झाले. त्यांचा परिणाम न्यायालयांवरही झाला. परिणामी हिंदू कायद्याची प्रगती कुंठित झाली. हिंदू कायद्याचा काही भाग तरी सुधारणे आवश्यक आहे, अशी हाकाटी ऐकू येत होती. तशी सुधारणा व्हावी म्हणून काही प्रयत्नही करण्यात आले होते.

आता मात्र या समस्येवर संपूर्ण तोडगा शोधला पाहिजे. निर्भयतेने हे कार्य केले पाहिजे आणि सर्वच हिंदू कायदा एका बुद्धिप्रामाण्यवादी भूमिकेवर आणून ठेवला पाहिजे. लक्षावधी हिंदूंच्या संबधातील कायदा सोपा व सरळ असला पाहिजे. याबाबत दुमत होण्याचे कारण नाही. हिंदू समाजाची चार वर्णांमध्ये विभागणी करणारा प्रचलित कायद्यातील भाग आक्षेपार्हच असा भाग आहे. ही वर्णावर आधारलेली विभागणी आधुनिक काळात निरुपयोगी व कुचकामी झालेली आहे. या बाबत मी अधिक विवरण करण्याची जरुरी नाही. ऐतिहासिक दृष्ट्या असे असण्याची शक्यता आहे की ही वर्णव्यवस्था राजकीय कारणातून उगम पावली असेल. तिला धार्मिक कारण नसेलही. त्याचप्रमाणे हेही शक्य आहे की पूर्वी ही व्यवस्था फार उपयुक्त ठरली असेल. आज मात्र आपल्या देशात असे कोणी म्हणणार नाही की श्रेष्ठकनिष्ठतेवर आधारलेली ही वर्णव्यवस्था योग्य आहे. आपण सर्वजण एका ऐतिहासिक अशा कालखंडात वावरत आहोत. घटनापरिषदेने आम्हाला भारतीय संविधान दिले आहे. त्याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटत आहे. या देशात एक क्रांती जन्माला येत आहे. त्याचबरोबर एका नव्या आणि स्वतंत्र जीवनाची आम्हाला अनुभूती येत आहे. जात, पंथ किंवा लिंगभेद यांचा विचार न करता सर्वच हिंदूंसाठी एक समान हिंदू-विधेयक असावे, ही आजच्या युगाची आवश्यक अशी गरज आहे. हे एकदा कबूल केले म्हणजे अशी सुधारणा घडवून आणण्यासाठी सर्वांचे एकमत झाले पाहिजे. आज जो हिंदू कायदा प्रचलित आहे त्याची अंमलबजावणी करताना मराठा आणि लिंगायत यांचा स्वाभिमान दुखविला जाईल, अशा भूमिकेवरून न्यायालयांना काम करावे लागते. ही परिस्थिती बदलली पाहिजे. पण जोपर्यंत प्रचलित कायदा लागू आहे तोपर्यंत न्यायालयांना त्याच कायद्याप्रमाणे निर्णय द्यावे लागतात. त्या त्या समाजातील रूढींप्रमाणे कायद्याची अंमलबजावणी करावयाची म्हटले तर पुराव्याच्या कायद्याप्रमाणे, एखादी गोष्ट रूढीनुसार आहे हे शाबीत करणेही कठीण जाते. तेव्हा अखिल भारतीय स्वरूपाचा नवीन कायदा संमत करण्यानेच हे सुधारणेचे काम होणार आहे. स्त्रियांच्या हक्कांबद्दलचा आजचा हिंदू कायदाही बदलला पाहिजे. स्त्रियांना हक्क नाहीत हे जुन्या ग्रंथांचा आधार घेऊन म्हणण्याचे दिवस आता गेले आहेत. काळ झपाट्याने बदलला आहे. गेलेला काळ परत येण्याची आता शक्यता नाही. जुने संस्कृत वाङ्मय आपण जरूर वाचले पाहिजे. अशा अभ्यासामुळे एका विश्लेषणात्मक दृष्टीने इतिहासाची मांडणीही करता येईल. हे जुने संस्कृत ग्रंथ हा अभिमान वाटावा असा आमचा ठेवा आहे. मात्र, आधुनिक काळातील समस्या सोडविण्यासाठी या ग्रंथांचा आधार घेणे हे अशास्त्रीय व चुकीचे ठरेल. स्त्रियांना पुरुषांच्या लेखी कमी मानावे या विचारसरणीचा आज कोणी पाठपुरावा करणार नाही. खेरीज, असे कोणी सांगू लागला तर ती गोष्ट

भारतीय संविधानाने दिलेल्या मूलभूत हक्कांशी विसंवादी ठरेल. सर्व हिंदूंना समान अशा हिंदू कायद्याची आज अतिशय गरज आहे, हे मी आपणास आग्रहपूर्वक सांगत आहे. राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काही दृश्ये अशी पाहावयास मिळत आहेत की जी पाहून विचारवंतांना धक्का बसावा; त्यांनी निराश व्हावे. ज्या एकीच्या बळावर सारे राष्ट्र इंग्रजी सत्तेविरुद्ध लढण्यासाठी उभे राहिले होते ती एकतेची भावनाच आज धोक्यात आहे. कधी या रूपाने तर कधी त्या रूपाने फुटीर प्रवृत्ती डोके वर काढीत आहेत. खरे म्हणजे सर्वच सुजाण आणि देशप्रेमी नागरिकांनी याबाबत जागृत राहाणे आवश्यक आहे. सर्व हिंदूंसाठी एक विधेयक या एकतेच्या संदर्भात सुद्धा आवश्यक आहे. अशा विधेयकाने आपण लोकांमधील एकतेची भावना जास्त दृढ करू शकू. यासाठी पुढचे पाऊल टाकले पाहिजे. वर्ण, जात, पंथ किंवा लिंग यांचा भेद न करता सर्व हिंदू जर एका विधेयकाने एकत्र आणता आले, त्यांच्यात भ्रातृत्वाची भावना निर्माण करता आली तर ती एक अत्यंत अभिमानास्पद अशी गोष्ट ठरणार आहे.

प्रचलित हिंदू कायद्यामध्ये सुद्धा काही समानस्वरूपी वैशिष्ट्ये आहेत. त्याचबरोबर काही महत्त्वाच्या मुद्द्यांबाबत भिन्न मते सांगणाऱ्या विचारशाखाही आहेत. या भिन्न मतांच्या बाबतीत विचार करण्याची आता वेळ येऊन ठेपली आहे. आपण या भिन्न मतांतून न्याय्य, वाजवी व योग्य असे समान सिद्धांत शोधले पाहिजेत. आणि ते सिद्धांत संबंध देशाला लागू केले पाहिजेत. द्विजांसाठी एक आणि शूद्रांसाठी एक अशा भिन्न तरतुदी जुन्या विचारशाखा सांगत आल्या आहेत. ज्या जीवनपद्धतीवर ह्या भिन्न तरतुदी करण्यात आल्या ती जीवनपद्धती आता निरुपयोगी झाली आहे. ती आता अस्तित्वातही नाही. मानवी व्यवहारात केवळ काही गोष्टीतच स्वातंत्र्य आणि समता कार्यवाहीत आणावयाची असते, हे म्हणणे खरे नाही. वस्तुतः आमचे सर्वच सामाजिक जीवन स्वातंत्र्य आणि समतेच्या कल्पनांनी व्यापून टाकले पाहिजे. स्वातंत्र्य आणि समतेची कल्पना आमच्या संविधानाचा आधार आहे. यासाठी सर्व स्त्रीपुरुष नागरिकांचे हे कर्तव्य आहे की त्यांनी ह्या कल्पना कार्यवाहीत आणण्यासाठी सदैव यत्नशील असले पाहिजे. जीवनाच्या सर्व अंगांना त्या कल्पनांनी भारून टाकले पाहिजे. शैक्षणिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक अशा सर्वच क्षेत्रांत त्यांचा संचार झाला पाहिजे. स्वतंत्रतेचे आणि समतेचे एक नवीन पर्व सुरू करण्याचे अभिवचन संविधानाने सर्वांना दिले आहे. त्या अभिवचनाच्या पूर्तीसाठीच नवे हिंदू विधेयक पुढील पाऊल टाकीत आहे. सर्वच नागरिकांसाठी एक समान सिव्हिल कोड असावे, असे म्हणणारा एक वर्ग आहे. ह्या विषयासंबंधी बोलणे मी कटाक्षाने टाळले आहे. कारण तत्संबंधी बोलावयाचे म्हटल्यास घटनेतील तरतुदींची छाननी करावी लागेल. खेरीज असा विषयप्रवेश हा माझ्या प्रस्तुतच्या व्याख्यानाच्या कक्षेबाहेरील आहे.

भारतीय संविधानाच्या ४४ व्या कलमाप्रमाणे असा कायदा करण्याचा प्रयत्न व्हावा असा आदेश मात्र आहे. विधिमंडळाकडून जेव्हा विभागवार असा कायदा संमत करण्याचा प्रयत्न होतो तेव्हा टीकाकार म्हणतात की कायदा सर्वंकष स्वरूपाचा हवा. जेव्हा हिंदू विधेयकासारखा सर्वंकष स्वरूपाचा कायदा करण्याचा प्रयत्न होतो तेव्हा टीकाकार म्हणतात की हा कायदा फक्त हिंदूंपुरताच आहे. खरे म्हणजे आपण हिंदू विधेयकाच्या रूपाने एक फार मोठे पाऊल योग्य दिशेने पुढे टाकीत आहोत. तूर्तास तरी ही समाधानाची गोष्ट आहे. एकदा हे पाऊल पुढे टाकले म्हणजे यथावकाश समान सिव्हिल कोडासंबंधीचेही पाऊल पुढे टाकता येईल आणि त्या कायद्याची अंमलबजावणी भारतातील सर्वच नागरिकांसाठी करता येईल. तेव्हा केवळ सर्व भारतवासीयांसाठी हे विधेयक नाही, फक्त हिंदूंसाठीच आहे, अशा कारणाने हिंदू विधेयकाला पाठिंबा न देणे शहाणपणाचे ठरणार नाही. अशा वृत्तीने समान सिव्हिल कोड निर्माण करून ते संमत करण्याचे काम तर रेंगाळेलच पण त्याचबरोबर येऊ घातलेला हिंदू कायदाही लांबणीवर पडेल.

आपण सर्वच जण असे म्हणत असतो की सर्व जातिजमाती समान आहेत. स्त्रीपुरुषांमध्ये काही भेद नाही. तरीही व्यक्तिगत कायद्याच्या संदर्भात असे भेद उत्पन्न होत असतात. मिताक्षरापद्धतीचा आपण विचार करू. ही पद्धती एके काळी उपयुक्त होती, असे असण्याची शक्यता आहे. जेव्हा राजकीय आणि सामाजिक स्थैर्य अस्तित्वात नव्हते त्या काळी मोठ्या एकत्र हिंदू कुटुंबदाऱ्या अस्तित्वात होत्या. त्या काळात त्या त्या कुटुंबातून पिढ्यान् पिढ्या एकच एक धंदा चालत असे. या सर्वांचे काय परिणाम होतील हे तेव्हा लक्षात आले नसेल. आज परिस्थिती बदलली आहे. सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने विचार केला तर भूतकाळातील या गोष्टी एका अर्थाने प्रगतीला साहाय्यभूत ठरण्याऐवजी अडसरच ठरणाऱ्या आहेत. या संदर्भात मद्रासचे थोर कायदेपंडित श्री. एस्. श्रीनिवास अयंगार यांचे विचार मननीय आहेत. त्यांनी ह्या पद्धतीसंबंधी टीका केली असून या पद्धतीचे वैफल्य व निरुपयोगिता सांगितली आहे. आज हिंदू कुटुंबदारीची कल्पनाच बदलून गेली आहे. शहरांची वाढ व विकास होत आहे. निरनिराळ्या व्यवसायांच्या आणि उद्योगांच्या निमित्ताने कुटुंबातील घटक निरनिराळ्या ठिकाणी वास्तव्य करीत आहेत. व्यक्तिमत्त्वाच्या कल्पना बदलल्या आहेत. आज एक आधुनिक स्वरूपाची हिंदु कुटुंबदारी जन्माला आली आहे आणि ही कुटुंबदारी जुन्या काळातील कुटुंबदारीपेक्षा वेगळी आहे. मिताक्षरापद्धतीचा आणि दत्तक-संबंधीचा कायदा अनेकविध खटल्यांचे उगमस्थान असून त्यामुळे वकील मंडळीला चांगली कमाईही होत आहे. डॉ. जयकरांच्या प्रयत्नामुळे 'दि हिंदूज गेन्स ऑफ लर्निंग' हा कायदा संमत झाला. प्रचलित मिताक्षरापद्धतीच्या कल्पनांवर त्याचा फार गंभीर स्वरूपाचा परिणाम झालेला आहे. त्या कायद्याची अंमलबजावणी आपण

पाहात आहोत. त्या कायद्यामुळे जे घडले ते पाहाता मिताक्षरापद्धती आधुनिक काळाच्या संदर्भात बदलण्याची गरज निर्माण झाली आहे, हे आपणास कळून येईल. मिताक्षरापद्धतीने कधी कधी कशी आपत्ती ओढवते, हे सोदाहरण समजून घेता येईल. चार भावांचे एकत्र हिंदु कुटुंब आहे, अशी कल्पना करा. हे भाऊ मरण पावले म्हणजे प्रथम मृत्यू पावलेल्या तिघांच्या विधवांना फक्त पोटगीचा हक्क पुराणमतवादी दृष्टिकोनातून प्राप्त होतो आणि शेवटी जो मृत्यू पावणार त्याची विधवा मात्र त्या कुटुंबाच्या मिळकतीची वारसदार ठरणार. हे उघड उघड अन्याय्य आहे. त्याचप्रमाणे कल्पना करा की दोन अविभक्त भाऊ आहेत. त्यातील एक मृत्यू पावला व त्याला एक मुलगी आहे. तिला जुन्या मताप्रमाणे काही एक हिस्सा मिळणार नाही. परंतु त्याच्यामागून मरणाऱ्या भावाच्या मुलीला मात्र सर्व मिळकत मिळेल. विरोधकांशी मिळते घेण्याच्या हेतूने सरकार आता विधेयकातील मूळ प्रस्तावांशी तडजोड करण्याचे कबूल करीत आहे, असे दिसते. योग्य असा आदर ठेवून माझे असे सांगणे आहे की जर अशी तडजोड करावयाची ठरली तर मूळ ठरावांचे, प्रस्तावांचे सत्त्वहरणच होईल. फार जोराचा विरोध असेल तर विधेयकात मूळ ठरावांचा समावेश करू नये, हे मला कबूल आहे. पण ह्या ठरावांमागील सिद्धांत जर अतिशय महत्त्वाचे असतील आणि ते तसे महत्त्वाचे आहेत असेच माझे मत आहे, तर सिद्धांतविषयक तडजोड करणे उपयुक्त व उचित ठरणार नाही.

विवाहित त्याचप्रमाणे अविवाहित मुलींना हिश्शेदार ठरवून त्यांना मिळकतीत वाटा देण्याबाबत, त्याचप्रमाणे स्त्रियांच्या मिळकतीच्या हक्काचे आजचे स्वरूप बदलण्यासंबंधी ह्या विधेयकात जो ठरावाचा भाग आहे त्यालाही विरोध दिसून येतो. इतर राज्यांच्या मानाने मुंबई राज्यात हिंदू स्त्रियांची परिस्थिती निश्चितपणे अधिक चांगली आहे. ज्या घरात त्यांचा जन्म झाला त्या घरातून त्यांना मिळणारी मिळकत ही त्यांच्या पूर्ण मालकीची समजण्यात येते. मुंबई राज्यातील हिंदू विवाहितेला विवाहानंतर नवऱ्याच्या कुटुंबातील जी मिळकत आता मिळेल तीही त्यांच्या पूर्ण मालकीची ठरणार आहे. आणि हे विधेयक संमत झाल्यावर इतर राज्यांतील स्त्रियांनाही असाच हक्क मिळणार आहे. या संबंधात राव समितीसमोर अनेक वाद घालण्यात आले. समितीच्या प्रतिवृत्तावरून हे स्पष्ट होईल की ह्या सर्व वादांची सूक्ष्म रीतीने छाननी करण्यात आलेली आहे. मुलींना जर हक्क आणि हिस्सा दिला तर कुटुंबाची एकता भंग पावेल, त्यांच्या भावांना त्यांच्याविषयी प्रेम वाटणार नाही, असे याबाबत म्हणण्यात आले. या देशातील स्त्रिया अज्ञान आहेत, अशिक्षित आहेत. त्यांना जर मिळकत देण्यात आली तर मिळकतीचा नाश होईल. ती उधळली जाईल, असेही सूचित करण्यात आले. वस्तुतः हे म्हणणे समर्थनीय नाही. दुर्दैवाने हे खरे आहे की या देशात फार मोठ्या प्रमाणात स्त्रिया अशिक्षित

व अज्ञान आहेत. पण हेही विसरून चालणार नाही की मिळकत धारण करणाऱ्या पुरुषांपैकी पुष्कळ पुरुष मंडळीही अशिक्षित आहेत. सर्व सुसंस्कृत न्यायशास्त्रांनी स्त्रियांच्या मिळकतीला मान्यता दिलेली आहे. काही जुन्या संस्कृत ग्रंथांतूनही या मताला आधार सापडतो. काही विरोधक म्हणतात की या विधेयकाद्वारे स्त्रियांना दुहेरी हक्क प्राप्त होतील. ज्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला त्या कुटुंबातील मिळकतीच्या त्या जशा धनी होतील त्याचप्रमाणे विवाहामुळे ज्या कुटुंबात त्यांचा प्रवेश होईल त्या कुटुंबातील मिळकतीच्याही त्या मालकिणी ठरतील. वस्तुतः ह्या तथाकथित दुहेरी हक्काने काहीही बिघडणार नाही. कारण मुली त्यांच्या जन्माच्या घरातून त्यांच्या हक्काची मिळकत घेऊन जशा जातील त्याचप्रमाणे सुना त्यांच्या आईवडिलांकडील त्यांच्या हक्काची मिळकत घेऊन सासरी येतील. आजच्या बदलत्या काळाला अनुसरून हिंदू समाजाच्या वर्तमान विवेकाशी सुसंवादी होईल अशा पद्धतीने प्रचलित हिंदू कायदा बदललाच पाहिजे.

हिंदू विधेयकातील सर्वच ठरावांबाबत तपशीलवार चर्चा करण्याचा माझा हेतू नाही. ज्याबाबतीत आतापर्यंत मी चर्चा केली त्या सर्वच तुम्ही स्वीकाराव्या, असेही माझे म्हणणे नाही. आतापर्यंत मी जे सांगितले ते सर्वच मोठे नवे व अभिनव सांगितले आहे, असाही माझा दावा नाही. वस्तुतः जे विचार मी आपणांसमोर ठेवले आहेत त्या विचारांना हिंदू कायद्याच्या सर्वच अभ्यासकांनी व समाज-सुधारकांनी प्रतिसाद द्यावा, असे मला वाटते. विधेयकातील सर्वच भाग आपण स्वीकारावा असा माझ्या बोलण्यातील हेतू नाही. परंतु या सर्वच ठरावांच्या गुणदोषावर आपण विचार करावा, असे मात्र मी आग्रहपूर्वक सांगत आहे. या देशात सर्वच हिंदूंसाठी एक समान विधेयक असावे ह्या मुख्य कल्पनेला आपण पाठिंबा द्यावा. या प्रश्नाचा बुद्धिप्रामाण्याने व शास्त्रीय पद्धतीने आपण विचार करावा. प्रमाणाबाहेर कायदा संमत करणे, घाईगर्दीने कायदा संमत करणे किंवा समाजाची तयारी नसताना कायदा संमत करणे योग्य होणार नाही, हे मला मान्य आहे. त्याचबरोबर सामाजिक विवेकतत्त्वाच्या फार मागे राहणारा असा कायदा अस्तित्वात राहू देणेही युक्त ठरणार नाही. बदलत्या काळाबरोबर समजुती, रूढी, श्रद्धा बदलत असतात. या बदलत्या गोष्टींशी सुसंवाद राखणारा कायदा संमत करून जुन्यानव्यातील अंतर आपण कमी केले पाहिजे. तरच कायदा परिवर्तनशील, वर्धिष्णू आणि उपयुक्त होईल व सामाजिक प्रगतीला साहाय्यभूत ठरेल. आज आपण अशा एका काळात राहात आहोत की जेव्हा जीवनविषयक जुन्या धार्मिक समजुती कामाच्या नाहीत. त्या अव्हेरल्याच पाहिजेत. जुन्या संस्कृत ग्रंथांतून आढळून येणारा धार्मिक व तत्त्वज्ञानपर भाग आपण वेगळा केला पाहिजे. त्याचबरोबर करणात्मक स्वरूपाचा जो भाग आहे तोही आपण पृथक केला पाहिजे. जो करणात्मक स्वरूपाचा भाग आहे तो कधीही स्थिर व अपरिवर्तनीय नव्हता. पूर्वीच्या टीका-

कारांनी व भाष्यकारांनी जे गौरवास्पद काम केले तेच काम आता विधिमंडळातील सदस्यांनी चालू ठेवले पाहिजे व पुरे केले पाहिजे. हिंदू कायद्याच्या अभ्यासकांनी जेवढी आणि ज्या सर्वंकष प्रमाणात हिंदू विधेयकाची चर्चा करावयास हवी होती तेवढी केली नाही, ही मोठी दुर्दैवाची गोष्ट होय. आपणाला हिंदू विधेयकाबाबत विचार करण्यास प्रवृत्त करावे यासाठीच या व्याख्यानांचा मी प्रपंच केला आहे. या विधेयकातील प्रस्तावांचा आपणा सर्वांवर मूलभूत स्वरूपाचा परिणाम होणार आहे, असे म्हणण्यात मुळीही अतिशयोक्ती नाही. सबब विधेयकातील प्रस्तावांबाबत वादंग न माजविता निःपक्षपातीपणे आपण विचार करावा. हे विधेयक अद्याप विधिमंडळासमोर आहे. तत्संबंधीचे विचार व्यक्त करून सुशिक्षित व बुद्धिमान हिंदूंची तत्संबंधीची काय प्रतिक्रिया आहे, हे विधिमंडळातील सदस्यांना समजले पाहिजे. असे करणे हे सर्व हिंदू नागरिकांचे कर्तव्यच आहे. यासंबंधीची लोकभावना काय आहे याचा विचार त्या सदस्यांना करावा लागणार आहे. कर्नाटक विद्यापीठातील विद्यार्थी, त्याचप्रमाणे कर्नाटकातील कायदेपंडित्त आणि सुशिक्षित नागरिक ह्या विधेयकाच्या गुणदोषांसंबंधी लोकमत तयार करण्याच्या दृष्टीने कार्यप्रवृत्त होतील, अशी मी आशा बाळगतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ..... दिः .....
क्रमांक ..... नोंद दिः .....

हिंदू कायद्याची ऐतिहासिक पृष्ठभूमी आणि तात्त्विक बैठक

कायद्याचे महिमान

भारताच्या संविधानाने (राज्यघटनेने) भारताच्या इतिहासातील एका नवीन ऐतिहासिक महत्त्वाच्या पर्वाचा उदय झाला आहे हे घोषित केले. आपल्या सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक जाणि राजकीय न्याय मिळवून देण्याबद्दल संविधानाने देशाला वचनबद्ध करून टाकले आहे. कल्याणकारी राज्याच्या बुडाशी विकासशील असे नवीन सामाजिक तत्त्वज्ञान आहे. तदनुसार राज्याने सामाजिक आणि आर्थिक न्यायाबाबतच्या सर्व रास्त मागण्या पुरविण्याचे मान्य केले आहे. त्या मागण्या पुरविताना राज्याला, बे(बि)व्हरिज अहवालाच्या चित्ररमणीय भाषेत म्हणावयाचे झाल्यास, 'आळशीपणा, रोगराई, गलिच्छपणा आणि दैन्य या राक्षसांशी' अपरिहार्यपणे सामना द्यावयाचा आहे. कल्याणकारी ध्येयाकडे वाटचाल करताना राज्याला अनिर्बंध आर्थिक व्यक्तिवाद व हा व्यक्तिस्वातंत्र्यवाद ज्यावर उभारला जातो तो तटस्थता सिद्धान्त या दोहोंचाही त्याग करावा लागेल. फ्रिडमनने म्हटल्याप्रमाणे[1] नवीन सामाजिक तत्त्वज्ञान स्वीकारण्याचा परिणाम असा होतो की, अनिर्बंध अर्थव्यवस्थेवर अधिष्ठित असलेल्या समाजाचे रूपांतर नियोजित, निर्बंध-युक्त अर्थव्यवस्थेवर अधिष्ठित असलेल्या समाजामध्ये होते. आधुनिक प्रजासत्ताक कल्याणकारी राज्यात कायद्याची भूमिका व कार्य किती विस्तृत होत आहे याची त्वरीत कल्पना करून घ्यावयाची असेल तर त्याकरिता कायद्याची तत्त्वे व तत्त्वज्ञान

---

१. W. Friedmann *Law and Soical Change in Contemporary Britain (1951)* पान २८१

यांचा पुनर्विचार करणे व 'कायद्याचे राज्य' म्हणजे काय याची पुनर्व्याख्या करणे अत्यंत आवश्यक होते. कल्याणकारी राज्याच्या नियोजित अर्थव्यवस्थेपुढे महान प्रश्न उभे असतात. त्या प्रश्नांची समंजस सोडवणूक फक्त एका गोष्टीनेच होऊ शकेल. ती म्हणजे नियोजनाची गरज आणि ज्यावर नियोजन विसंबून असते ते कायद्याचे बळ या दोहोंचा व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्कांशी समन्वय साधला गेला पाहिजे. म्हणूनच, भारताच्या या सांप्रतच्या स्वातंत्र्य-युगात कायद्याची भूमिका काय याचा यथार्थ, यथोचित अभ्यास करणे हे आवश्यक झाले आहे. ...कायद्याचा महिमा बृहदारण्यकोपनिषदात वर्णिलेला आढळून येतो. धर्माचे किंवा कायद्याचे इतके वक्तृत्वपूर्ण वर्णन इतरत्र क्वचितच सापडेल. या उपनिषदात म्हटले आहे की,

"स नैव व्यभवत्। तच्छ्रेयोरूपमत्यसृजत धर्मम्। तदेतत्क्षत्रस्य क्षत्रं यद्धर्मः। तस्माद्धर्मात्परं नास्ति। अथो अबलीयान् बलीयाꣳसमाशꣳसते धर्मेण। यथा राज्ञैवम्। यो वै स धर्मः सत्यं वैतत्। तस्मात् सत्यं वदन्तमाहुर्धर्मं वदतीति। धर्मं वा वदन्तꣳसत्यं वदतीति। एतद्ध्येवैतदुभयं भवति॥"[1]

["तो अजून विकास पावला नव्हता. त्याने आणखी एक प्रशस्ततर रूप निर्माण केले, तोच धर्म. क्षत्रियवर्गाचे क्षात्र सामर्थ्य तोच धर्म. म्हणूनच धर्मापेक्षा श्रेष्ठ असे दुसरे काही नाही. दुबळा माणूस बलवान् माणसाला कह्यात ठेवतो तो धर्माने; जसा राजाने ठेवावा तसा. जो धर्म म्हणतात तेच सत्य. म्हणूनच सत्य बोलणाऱ्या मनुष्याविषयी म्हणतात की, तो धर्म बोलतो आणि धर्म बोलणाऱ्या मनुष्याविषयी म्हणतात की तो सत्य बोलतो. खरोखरी, दोन्हीही एकच होत."]

प्रस्तुत लेखाचा हेतू, हिंदू कायद्याच्या अभ्यासाची जी दोन अंगे किंवा बाजू त्यांच्या स्थूल लक्षणांचा परामर्श घेणे हा आहे. ती दोन अंगे किंवा बाजू : हिंदू कायद्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी कोणती? व हिंदू कायद्याचे तात्त्विक अधिष्ठान कोणते?, ही होत.

प्राचीन कायदा : त्याची लक्षणे

जगातील मानववंश आणि राष्ट्रे नेहमी एकाच मार्गाने व एकाच गतीने मार्गक्रमण करतात असे नाही, असे जे मेटलंडने म्हटले आहे ते खरे आहे. असे असले तरी, जगातील प्राचीन कायद्यांचा तौलनिक अभ्यास केला असता त्यांमध्ये नजरेत भरण्याजोगी कितीतरी सादृश्ये दिसून येतात. मेन या ग्रंथकाराने एका बाजूने असे दाखवून दिले आहे की, जिवंत प्राण्यांतील जाती-प्रजातींप्रमाणे कायद्याच्या कल्पना व संस्था यांचाही एक प्रकारचा खराखुरा विकासक्रम आढळून

---

१. बृ. उ. १. ४-१४

येतो आणि या विकासक्रमाच्या प्रत्येक टप्प्यात त्यांच्यामध्ये त्यांच्या प्रकृतीस अनुसरून येणारी लक्षणे दिसून येतात. दुसऱ्या बाजूने मेनने असेही स्पष्टपणे दाखवून दिले आहे की, ह्या (विकासाच्या) प्रक्रिया स्वतंत्रपणे अभ्यसनीय असून त्यांचा तसा अभ्यास केला पाहिजे; त्या प्रक्रिया ज्या समाजात घडून येतात त्या समाजाच्या सर्वसाधारण इतिहासात त्या प्रक्रिया म्हणजे केवळ प्रासंगिक गोष्टी होत असे समजून चालणार नाही.[1] सर हेन्री मेन याने प्राचीन कायद्याच्या विशेष लक्षणांसंबंधी जे सर्वसाधारणपणे निष्कर्ष काढले आहेत ते आज स्थूलमानाने यथार्थ म्हणून स्वीकृत झाले आहेत. सर हेन्री मेनने म्हटले आहे : "जर कोणत्याही साधनाने आपण न्यायविषयक प्राचीन संकल्पांचे स्वरूप निश्चित करू शकलो, तर ते अत्यंत मोलाचे ठरेल. भूगर्भशास्त्रज्ञाला ज्याप्रमाणे पृथ्वीच्या आतील प्राथमिक थरांचे महत्त्व आहे, त्याचप्रमाणे कायदेपंडिताला या मूलतत्त्वांचे महत्त्व वाटते. पुढे कायद्याला कालाच्या ओघात जे प्रौढ स्वरूप आले त्याची बीजे या प्राथमिक अवस्थेतील विचारांतून आढळतात."[2] मेनच्या मते राजा जेव्हा एखाद्या कज्ज्याचा निवाडा आपल्या न्यायबुद्धीने देत असे, तेव्हा तो निवाडा ईश्वराकडून त्याला जे साक्षात दिव्य स्फुरण झाले त्याचा परिणाम होय असे मानले जात असे. ग्रोटने म्हटले आहे की, 'देवांचा राजा झ्यूस किंवा पृथ्वीवरील मानवी राजा हे कायदे करणारे नव्हेत. ते फक्त न्यायाधीश होत; त्या न्यायाधीशांच्या तोंडून दिव्य शक्तीच्या स्फुरणाने जे निवाडे बाहेर पडतात तेच कायदा होत." असे साधारणपणे निश्चित धरावयास हरकत नसावी की, मानवजातीच्या इतिहासक्रमातील प्राचीन कालखंडात आधुनिक काळी ज्याला आपण विधानमंडळ म्हणतो, किंवा अमुक एक कायदा बनविणारा कायद्याचा प्रवर्तक होऊन गेला असे जे म्हणतो, त्याचा मागमूसही नसावा. त्या प्राचीन काळी ज्याला आपण रूढी (Custom) म्हणून संबोधतो त्या रूढीच्याही पातळीपर्यंत कायदा विकसित झाला नसावा. मेनने म्हटल्याप्रमाणे, त्या काळी कायदा म्हणजे अंगवळणी पडलेल्या संवयीसारखा प्रकार असावा. फ्रेंच भाषेमध्ये एक वाक्यसंप्रदाय आहे त्याचा अर्थ आहे in the air (वातावरणात). वातावरणात एखादी गोष्ट भिनलेली असावी त्यासारखे कायद्याचे स्वरूप त्याकाळी होते.

प्राचीन कायद्याच्या विकासक्रमातील दुसऱ्या टप्प्यात न्यायनिवाडा देण्याच्या अधिकाराचे राजाकडून सरदारांकडे हस्तांतर झालेले दिसून येते. लष्करी व धार्मिक अल्पजन सत्तागट यावेळी उदय पावलेले आढळून येतात. या काळात

---

१. Sir Henry Maine, *Introduction to Ancient Law (1906)*, Pallock p. XVI.

२. पूर्वोक्त, पान २

राजाचे अधिकार जरी बाजूला सारले गेले नसले, तरी एवढे खरे की राजाने दिलेले न्यायनिवाडे लष्करी आणि धार्मिक सत्ताधारी अल्पजनांच्या सल्ल्याने दिलेले असत. मेनने असा सिद्धान्त प्रतिपादिला आहे की, पौरस्त्य देशांतून ह्या सत्तागटांचे धार्मिक अभिजनसत्तेत रूपांतर झाले, तर पाश्चात्त्य देशांतून त्यांचे नागरिक वा राजकीय अभिजनसत्तेत रूपांतर झाले. राजांच्या सत्तेचे युग संपून त्याच्या जागी अभिजनसत्तेचे जे युग आले ते युग म्हणजे इंडोयुरोपीय राष्ट्र-कुटुंबांत झालेल्या कायद्याच्या अभिवृद्धीचे एक विशिष्ट लक्षण होय असे मानावयास हरकत नाही. या युगात देखील हा अभिजात वर्ग 'आपण कायदे बनविणारे आहोत' असे मानीत नाही. त्यांचा दावा असा की, "आम्हांलाच कायद्याचे ज्ञान आहे, आम्हीच त्या ज्ञानाचे मक्तेदार आहोत." हे ज्ञान गृहीत धरून त्यांनी त्या आधारावर जे न्यायनिवाडे दिले त्यातूनच पुढे रूढिगत विधी उदित झाला. या दृष्टीने पाहाता या युगात रूढिगत विधीचा टप्पा गाठला गेला, असे म्हणावयास हरकत नाही.

रूढिगत विधीच्या युगानंतर विधीच्या तत्त्वमीमांसेचे युग आले, असे रोमन कायद्यांच्या अभ्यासावरून दिसून येते. या युगाला कायद्यांच्या संहितेचे युग म्हणता येईल. रोमची प्रसिद्ध बारा कोष्टके ('कायदे') हे या युगाचे उत्कृष्ट प्रतीक होय. या कोष्टकांचे अवलोकन केले असता असे दिसून येईल, की त्यात प्रक्रियात्मक विधी दिला असून मूलभूत विधीचा विचार केलेला नाही. प्राचीन कायद्याच्या या प्रथमप्रथमच्या विकासावस्थेचा ऐतिहासिक अभ्यास करणारांना एक विशेष गोष्ट आढळून येईल, ती ही की, एका बाजूला कायद्याची प्रवृत्ती स्थिरता आणण्याकडे आणि समाजव्यवस्थेला पक्की व टिकाऊ बनविण्याकडे असते, तर दुसऱ्या बाजूला, सामाजिक परिस्थिती सारखी बदलत असल्यामुळे कायद्यात बदल घडवून आणण्याकडे तिची नेहमी प्रवृत्ती असते. एका बाजूला कायद्याचा अक्षरशः अर्थ लावण्याची प्रवृत्ती व दुसऱ्या बाजूला बदलणाऱ्या समाजव्यवस्थेच्या गरजांनुसार कायद्यात बदल करण्याची गरज, या दोहोंमधील अंतर कमी करण्याचा प्रयत्न वेळोवेळी झालेला आढळून येतो.

सर्वच प्राचीन कायद्यांचे आणखी एक वैशिष्ट्य लक्षात ठेवण्यासारखे आहे. एका बाजूला धर्म, नीतिनियम, सदाचार आणि दुसऱ्या बाजूला ज्याला आपण कायद्याची विधायक बाजू म्हणतो असे कायद्याचे विधायक (सर्व नागरिकांना लागू होणारे, धर्मनिरपेक्ष) नियम असा फरक प्राचीन कायद्यात केलेला आढळून येत नाही. आपली वाटचाल करीत असताना कायद्याने अनेक नवीन अतृप्त सामाजिक गरजा लक्षात घेऊन त्या पुरविण्याचा प्रयत्न जरी वेळोवेळी केला असला, तरी आपण त्या कायद्याचे प्रणेते आहोत, आपण तो कायदा बनविला, असा दावा त्या समाजातील माणसांनी कधीही केलेला दिसून येत नाही. कायद्याची उत्पत्ती

ही ईश्वरकृत, अपौरुषेय आहे अशीच समजूत चालू होती. मोझेसचा कायदा, हम्मूरबीचे कोड, किंवा मनूची स्मृती या प्रत्येकाचा दावा असा आहे की, प्रत्येकाचा जन्म दिव्य स्फुरणातून, ईश्वरी प्रेरणेतून झाला आहे. अथेन्समधील ज्यूरीसमोर भाषण करताना डेमॉस्थेनिसने माणसांनी कायदा का पाळावा याची चार कारणे सांगितली. त्याने म्हटले आहे[1] माणसांनी कायद्याचे पालन केले पाहिजे कारण, (१) कायदे हे ईश्वराने नेमून दिले आहेत. (२) कायदे परंपरागत चालत आले असून, ज्यांना जुन्यापुराण्या चालीरीती, रूढी माहीत आहेत अशा धर्मवेत्त्या माणसांनी ते कायदे शिकविले आहेत. (३) कायदे हे नित्य व अपरिवर्तनीय अशा ईश्वरी नीतिनियमांवरून काढलेले निष्कर्ष आहेत. (४) व चौथे कारण म्हणजे, कायदे हे माणसामाणसांतील करार किंवा 'समय' होत. आपण दिलेले वचन पाळणे हे नैतिक कर्तव्य असल्यामुळे हे करार पाळणे माणसांना बंधनकारक आहे. त्याप्रमाणे सिसरोचेही मत नमूद केलेले आढळून येते की, न्याय आणि समाजजीवनाची सर्व संघटना ही शेवटी ईश्वरावर आणि माणसांच्या ईश्वरविषयक श्रद्धेवर अवलंबून आहे. रोमन लोकांच्या कल्पनेप्रमाणे, कायद्याचे अधिष्ठान दोन गोष्टींत होते. एक ईश्वरी नियमन, दुसरे, मानवाने केलेले नियम.[2]

मध्ययुगीन युरोपात ख्रिस्ती धर्मपीठाने आपले धर्मोपदेशक राज्याच्या धर्मबाह्य अधिकारातून देखील मुक्त असावे, असा हक्क प्राप्त करून घेतला होता, असे दिसून येते. त्याचप्रमाणे त्यावेळी धर्मपीठाने, आपण हल्ली ज्यांना धर्मनिरपेक्ष नागरिक कायदेकानूंचे क्षेत्र मानू, अशा क्षेत्रातील कित्येक गोष्टींबाबतही सर्व लोकांवर आपला अधिकार चालविलेला दिसून येतो. या काळात, ईश्वराचे कायदे प्रत्येकाला पाळायला लावणे आपले कर्तव्य आहे असे राज्यसंस्था मानीत असे आणि धार्मिक न्यायालयांच्या द्वारा ती आपले हे कर्तव्य पार पाडीत असे.[3] पुढे नवजीवनाच्या काळातच केवळ बुद्धिप्रामाण्याचा मनू सुरू झाला. नवजीवनयुगातील प्रोटेस्टंट पंथाच्या विधिज्ञ-धर्मशास्त्रज्ञांनी धर्मनिरपेक्ष आणि केवळ विवेकबुद्धीवर आधारलेल्या अशा कायद्याच्या तत्त्वज्ञानाची मांडणी केली. परंतु विकासक्रमातील हा टप्पा बराच नंतरचा होय, हे लक्षात ठेवले पाहिजे.

सर अब्दुर रहीम यांच्या मते, मुसलमान धर्माने आपल्या धर्मानुयायांचे केवळ भौतिक वा धार्मिकेतर नव्हे तर सर्वच जीवन आपल्या देखरेखीखाली आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या दृष्टीने, कायद्याला दोन बाजू असतात : एक धार्मिक व दुसरी धर्मनिरपेक्ष. कायद्याचे ध्येय, वैयक्तिक व सामाजिक या दोन्ही

---

१ Roscoe Pound; *An Introduction to the Philosophy of Law (1946)*, p. 22.

२. S. Varadachariar, *The Hindu Social System* (1946), p. 33.

३. Holdsworth, *History of Ancient Law*, p. 616.

१५१९८/१६१

वाजूंनी माणसाचे कल्याण साधण्याचे आहे. केवळ ऐहिक जीवनापुरतेच नव्हे तर मरणोत्तर जीवनातही कल्याण साधावयाचे आहे.

आतापर्यंतच्या विवेचनावरून असे दिसून येईल की, कायद्याच्या विकास-क्रमाच्या आरंभीच्या अवस्थांतून, कायद्याचे नियम हे ईश्वरनिर्मित होत असे निरपवाद रीतीने मानले जात असे. त्यांना मान्यता मिळण्याचे कारण म्हणजे ते परमेश्वराचे मूर्तिमंत आदेश समजले जात. कायद्याच्या विकासक्रमातील या अवस्थेत, ज्या मुख्य कल्पनेवर कायद्याचा पाया आधारलेला होता, ती कल्पना, पौंडच्या शब्दांत सांगावयाची झाल्यास अशी होती—"कायद्याचे अस्तित्व त्या त्या समाजात शांतता व सुव्यवस्था राखण्याकरिता असते; शांतता ही कोणत्याही प्रसंगी, लागेल ती किंमत देऊन टिकविण्याकरिता कायदा पाहिजे असतो. प्राथमिक अवस्थेतील कायदा म्हणून जो म्हटला जातो त्याच्या बुडाशी ही संकल्पना आहे."[२] आपल्या सिद्धान्ताच्या समर्थनार्थ पौंडने प्लेटोच्या सुप्रसिद्ध उपपत्तीचा उल्लेख केला आहे. प्लेटोने म्हटले आहे, "चांभाराने चांभारच बनून राहायचे, आणखी नावाडी व्हायचे नाही. शेतकऱ्याने शेतकरीच बनून राहायचे, त्याने आणखी न्यायाधीशही होता कामा नये; शिपाईगड्याने शिपाई गडीच राहिले पाहिजे, त्याने शिवाय व्यापारीही होऊ नये; आणि जर एखादा सर्वव्यापी प्रतिभेचा मनुष्य जो सर्व काही होऊ शकतो व सर्व काही करू शकतो असा, ध्येयभूत नगरराज्यामध्ये येऊन दाखल झाला, तर त्याला आपला रस्ता सुधारायला भाग पाडावे." पौंडने शेवटी म्हटले आहे : "सेंट पॉल जेव्हा असे आवर्जून सांगतो की पत्नींनी आपल्या पतींची आज्ञा पाळावी, चाकरांनी आपल्या धन्याची आज्ञा पाळावी आणि म्हणून समाजव्यवस्थेने ज्या व्यक्तीला ज्या वर्गात घातले आहे त्या वर्गाचे जे नियत कर्तव्य असेल ते त्या व्यक्तीने करीत राहावे, तेव्हा तो कायद्याच्या ध्येयाविषयी ग्रीक लोकांची असलेली जी धारणा तिचाच आविष्कार करीत आहे."[३]

यासंबंधीच्या ज्या विविध उपपत्ती नंतरच्या काळात मांडल्या गेल्या, त्यांचा उल्लेख या प्रसंगी करणे प्रस्तुत ठरेल. कांटच्या मते "कायदा म्हणजे मानवी कृत्यांना लागू करावयाचा विश्वव्यापी नियमांमधील तत्त्वांचा संग्रह होय. त्यामुळे कर्म करणाऱ्या कर्त्याचे इच्छास्वातंत्र्य इतर प्रत्येकाच्या इच्छास्वातंत्र्याबरोबर गुण्या-गोविंदाने नांदू शकते." या उलट, हेगलच्या मते, "कायदा म्हणजे अशा तत्त्वांचा संग्रह, की ज्यांमधून व ज्यांद्वारे स्वातंत्र्याची कल्पना मानवी अनुभवात साकार होत असते." बेन्थॅमने कायद्याची बुद्धिवादी उपपत्ती अशी मांडली : "कायदा

---

१. Sir Abdur Rahim, *Muhammadan Jurisprudence* p. 55.
२. Pound, *An Introduction to the Philosophy of Law*, p. 72.
३. पूर्वोक्त, पान ७६-७७.

म्हणजे राज्यसंस्थेने घालून दिलेल्या व जारी केलेल्या अशा नियमांचा संग्रह की ज्या नियमांच्या योगाने प्रत्येक व्यक्तीला विमुक्तपणे आत्माविष्कार करता येऊन जास्तीत जास्ती सुख मिळण्याची हमी मिळते."[1] शेवटी ऑस्टिनने मांडलेल्या उपपत्तीचा उल्लेख करावयाचा आहे. ऑस्टिनने प्रत्येक कायद्याचे तीन भाग कल्पिले : (१) कायदा ज्याने घालून दिला त्याचा आदेश; (२) त्यामुळे नागरिकावर लादली गेलेली जबाबदारी; आणि (३) अवज्ञा केली गेल्यास उगारलेल्या शिक्षेचे भय. या सर्व उपपत्तींच्या बाबतीत हे लक्षात ठेविले पाहिजे की, हे सर्व दृष्टिकोन कायद्याच्या इतिहासक्रमात पुष्कळच पुढच्या काळात परिणत झाले. कायद्याच्या विकासक्रमाच्या आधीच्या प्राथमिक अवस्थांतून कायदेशीर बंधन आणि शिष्टाचाराचे बंधन यात फरक केला जात नसे हे स्पष्ट आहे. प्राचीन कायद्याच्या स्थूल लक्षणांचे वर जे विवेचन दिग्दर्शन म्हणून आले आहे, त्यावरून आपणास प्राचीन कायद्याची पृष्ठभूमी व तात्त्विक अधिष्ठान यांचे थोडे दर्शन घडते. ही लक्षणे प्राचीन हिंदू कायद्यात कितपत आढळून येतात याचा, हिंदू कायद्याची पृष्ठभूमी व तात्त्विक अधिष्ठान यांचा संक्षिप्तपणे वेध घेऊन, शोध घेण्याचा या लेखाचा हेतू आहे.

हिंदू कायद्याची ऐतिहासिक पृष्ठभूमी

हिंदू संस्कृतीप्रमाणेच, हिंदू कायदाही जगाच्या इतिहासात प्राचीनतम आहे. त्याची मुळे प्राचीनतम काळापर्यंत जाऊन पोहोचतात, हे विधान नेहमी केले गेल्यामुळे शिळे झालेले आहे असे वाटेल, पण ते खरे आहे. दुर्दैवाने परिस्थिती मात्र अशी आहे की, प्राचीन संस्कृत ग्रंथांच्या बाबतीत विश्वसनीय कालानुक्रम सिद्ध करून देणारा पुरावा उपलब्ध नाही; त्यामुळे प्राच्यविद्यापंडितांपुढे जुन्या संस्कृत ग्रंथांचा काल निश्चित कसा ठरवावयाचा ही बव्हंशी न सुटणारी मोठी समस्या आहे. आपल्या जीवनाची चरित्रासारखी माहिती लिहून ठेवण्याचा, किंवा आपण आपला ग्रंथ कोणत्या स्थळी वा काळी लिहिला हे निर्दिष्ट करण्याचा प्राचीन काळच्या बहुतेक भारतीय ग्रंथकारांचा प्रघात नव्हता असे दिसते. त्यामुळे ऐतिहासिक व्यक्ती व प्रसिद्ध ग्रंथकार यांचा काळ ठरवावयाचा झाल्यास त्यांनी लिहिलेल्या वाङ्मयातील अंतर्गत पुराव्यावर भिस्त ठेवावी लागते, आणि अशा रीतीने कालानुक्रम ठरविताना साहजिकच निरनिराळ्या पंडितांमध्ये विविध मते व तीव्र मतभेद आढळून येतात. सामान्यतः, पाश्चात्य विद्वानांचा कल प्राचीन संस्कृत वाङ्मयाची प्राचीनता कमी करण्याकडे व त्याचा काळ अलीकडे ओढण्याकडे होता; तर त्याउलट, ज्यायोगे प्राचीन संस्कृत वाङ्मय अधिक प्राचीन ठरेल अशा उपपत्ती

---

१. पूर्वोक्त, पान ८४

मान्य करण्याकडे भारतीय प्राच्यविद्याविशारदांचा अंतर्मनातील कल झुकत होता. प्रस्तुत स्थळी प्राचीन संस्कृत वाङ्मयाच्या, विशेषतः कायद्यासंबंधीच्या संस्कृत वाङ्मयाच्या कालानुक्रमाच्या वादात शिरावयाचा माझा हेतू नाही. महामहोपाध्याय पां. वा. काणे यांनी 'हिस्टरी ऑफ दी धर्मशास्त्र' या आपल्या ग्रंथात जो कालानुक्रम स्वीकारला आहे तोच मी ग्राह्य मानणार आहे. कारण, काणे यांनी स्वीकारलेला कालानुक्रम मला साधार व बरोबर वाटतो.

हिंदू कायद्याची उगमस्थाने म्हणून धर्मशास्त्र वाङ्मयाने जे ग्रंथ प्रमाण मानले आहेत त्यांत वेदांना अग्रपूजेचा मान आहे, हे हिंदू कायद्याच्या अभ्यासकांना विदितच आहे. वैदिक संहिता, ब्राह्मणे आणि उपनिषदे यांचा काल इ. स. पूर्व ४००० ते १००० या मर्यादांमध्ये पसरलेला आहे. आपस्तंब, आश्वलायन, बौधायन आणि कात्यायन इत्यादींची मुख्य मुख्य श्रौतसूत्रे, आपस्तंब, आश्वलायनादींची गृह्यसूत्रे इ. स. पूर्व ८०० ते ४०० या अवधीत रचिली गेली असावी. इ. स. पूर्व ६०० ते ३०० हा काळ गौतम, आपस्तंब, बौधायन, वसिष्ठ यांच्या धर्मसूत्रांचा आणि पारस्करादींच्या गृह्यसूत्रांचा असावा. कौटिलीय अर्थशास्त्राची रचना इ. स. पूर्व ३०० ते इ. स. नंतर १०० या काळात झाली असावी. आपली हल्लीची मनुस्मृती इ. स. पूर्व २०० ते इ. स. नंतर १०० या काळातील म्हणता येईल. यानंतर याज्ञवल्क्यस्मृती इ. स. १०० ते इ. स. ३०० या काळात झाली. व्यवहारविषयावरील कात्यायनस्मृतीचा काळ स्थूल मानाने इ. स. ४०० ते इ. स. ६०० असावा. इतर स्मृतिग्रंथ इ. स. ६०० ते इ. स. ९०० या काळात रचिले गेले. विश्वरूपाची याज्ञवल्क्यस्मृतीवरील टीका इ. स. ८०० ते इ. स. ८५० या काळात, तर मेधातिथीची मनुस्मृतीवरील व्याख्या इ. स. ९०० मध्ये लिहिली गेली. विज्ञानेश्वराची मिताक्षरा इ. स. १०७० ते इ. स. ११०० या काळात लिहिली गेली असली पाहिजे. दायभाग या टीकाग्रंथाचा कर्ता जीमूतवाहन हा इ. स. ११०० ते इ. स. ११५० मध्ये होऊन गेला. 'दायतत्त्व' लिहिणारा रघुनंदन इ. स. १५२० ते इ. स. १५७५ या काळात होऊन गेला. 'दत्तकमीमांसे'चा कर्ता नंदपंडित याचा काळ इ. स. १५९० ते इ. स. १६५० यामध्ये आहे. 'निर्णयसिंधु' या ग्रंथाचा कर्ता कमलाकर भट्ट याने आपला ग्रंथ इ. स. १६१० ते इ. स. १६४० मध्ये लिहिला असावा. नीलकंठभट्टाने आपला ग्रंथ 'व्यवहारमयूख' इ. स. १६१५ ते इ. स. १६४५ या दरम्यान रचिला असावा. 'वीरमित्रोदया'ची रचनाही याच काळात झाली. बाळंभट्टाने आपली 'मिताक्षरे'वरील टीका इ. स. १७५० ते इ. स. १८२० या काळात लिहिली. काशीनाथाचा 'धर्मसिंधु' इ. स. १७९० मध्ये रचिला गेला.[१]

१. Mm. Dr. P. V. Kane "*History of Dharmashastra*" V. III, XVII to XIX.

वरील कालानुक्रमनिर्देशावरून दिसून येईल की हिंदू कायद्याच्या विकास-क्रमाचा इतिहास ब्रिटिशांनी हिंदुस्थान जिंकून घेईपर्यंत सुमारे ६००० वर्षांच्या कालावधीत पसरलेला आहे. ब्रिटिश कारकीर्दीत, हिंदू कायद्याची प्रगती एका अर्थाने खुंटली असे म्हणता येईल. टीकाकारांचे युग संपले आणि त्याजागी न्यायाधिशांचे युग अवतरले. या न्यायाधिशांच्या युगात, हिंदू कायद्याच्या मुख्य उगम ग्रंथांच्या जागी टीका येऊन बसल्या. पण तो विषय स्वतंत्र आहे. प्रस्तुत स्थळी, आपणास हिंदू कायद्याच्या ऐतिहासिक पृष्ठभूमीबद्दल सांगावयाचे आहे. त्याकरिता हिंदू कायद्याच्या विकासक्रमाच्या या प्रचंड कालावधीमध्ये हिंदुस्थानची राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती कशा प्रकारची आढळून येते याचे समालोचन केले पाहिजे.

प्राचीन भारतीय राज्यतंत्र

अगदी प्राचीन वैदिक काळी कशा प्रकारची राज्यपद्धती भारतात प्रचलित होती? ऐतरेय ब्राह्मण या ग्रंथात 'राजा' ही संस्था कशी निर्माण झाली याबद्दल जी उपपत्ती दिली आहे त्या वैदिक उपपत्तीचा डॉ. जयस्वाल यांनी आपल्या ग्रंथात उल्लेख केला आहे. ऐतरेय ब्राह्मणात म्हटले आहे की, देवांना म्हणजेच जे त्यांचे उपासक हिंदू त्यांना सुरवातीस राजा नव्हता. देवासुर-संग्रामा-मध्ये देवांचा सारखा पराभव होत गेला, तेव्हा देवांनी आपल्या पराभवाचे असे निदान केले की, असुरांना राजा आहे, तो त्यांचे नेतृत्व करतो, म्हणून ते जिंकतात. म्हणून देवांनी देखील तोच प्रयोग करून पाहावयाचे ठरविले. त्यांनी राजा निवडायचे निश्चित केले. "देव व असुर लढत होते. असुरांनी देवांचा पराभव केला. देव म्हणाले : 'आम्हांला राजा नाही म्हणून असुर आमचा पराभव करतात. आपण राजा निवडू या.' सर्वांनी संमती दिली."[1] या राजपदाचे स्वरूप कसे होते हे शुक्लयजुर्वेदावरून[2] कळून येते. पुढे दिलेल्या मंत्राचा उच्चार राजाने राज्याभिषेकाच्या प्रसंगी करावा असे त्यात म्हटले आहे : 'इयं ते राट्। यन्तासि यमनो ध्रुवोऽसि धरुणः। कृष्यै त्वा क्षेमाय त्वा रय्यै त्वा पोषाय त्वा' ("हे राज्य तुला दिले आहे. तू सर्व प्रजेचा यंता (संचालक), नियमन करणारा, (ही जबाबदारी) पक्केपणाने धारण करणारा, शेतीच्या भरभराटीकरिता, कल्याणाकरिता समृद्धीकरिता, लोकांचे पोषण होण्याकरिता"). ए. सी. दास यांचे देखील मत बव्हंशी तसेच आहे. ते म्हणतात : "ज्याच्यातून राजा निवडला जात असे अशा राज्यकर्त्या क्षत्रियगणाला नैतिक, आध्यात्मिक आणि राजकीय

---

१. K. P. Jayaswal, *Hindu Polity* (1955), p. 184.

२. ९-२२

मार्गदर्शन एखाद्या ऋषिवर्याकडून मिळत असे. त्यावरून आपणास असे गृहीत धरावयास हरकत नाही की, राजाच्या मरणानंतर, त्याच्या स्थानावर येणारा नवीन राजा त्या ऋषिवर्याच्या संमतीने नेमला जात असला पाहिजे. वस्तुतः पाहाता, असेही सप्रमाण सिद्ध होऊ शकते की ऋषीच खरोखरी राजांचा कर्ताहर्ता असे. अथर्ववेदाच्या दोन सूक्तांतून,[1] ऋत्विज-ऋषीला राजांचा कर्ता असे म्हटले आहे. हा ऋषीच मृत राजाच्या पाठीमागून राज्यावर बसणाऱ्या राजाचे नाव सुचवीत असे; हे सुचविताना बहुधा तो राजकुलातील व्यक्तींचा व दरबारातील लोकांचा सल्ला घेत असावा. ज्या व्यक्तीचे नाव तो अशा रीतीने राजपदाकरिता सुचवीत असे ती व्यक्ती लोकांपुढे स्वतः जात असे वा लोक तिला बोलावून घेत असत. मग ती व्यक्ती लोकांकडून राजा म्हणून निवडली जात असे. झिमरचे[2] मत असे आहे की "राजपदावर राजा निवडला जात होता. हा लोकांकडून निवडला जाणारा राजा राजाच्या कुटुंबियांमधूनच निवडला जात असे की कुटुंबाबाहेरील इतर सर्व अभिजात क्षत्रिय गणांतील व्यक्तींमधून निवडला जात असे याबद्दल स्पष्ट उल्लेख सापडत नाही." ऋग्वेदात एक ऋचा आहे.[3] **(ता ईं विशो न राजानं वृणाना बीभत्सुवो अप वृत्रादीतेन्॥)** तीवरून राजा लोकांकडून वा प्रजेकडून निवडला जात असावा असे सूचित होते. या ऋचेचे विल्सनने भाषांतर अशा अर्थाचे केले आहे: "राजाला निवडणाऱ्या प्रजांप्रमाणे जलधारा भयभीत होऊन वृत्रापासून पळून गेल्या"[4] ए. सी. दास यांनी ऋग्वेदातील एका सूक्ताचा[5] उल्लेख केला आहे. त्या सूक्तावरून असे दिसून येते की राजाचे आपल्या सिंहासनावरील स्थैर्य प्रजाजनांच्या सदिच्छेवर अवलंबून होते. राज्याभिषेकाच्या वेळी राजाला जी प्रतिज्ञा धार्मिक समारंभाने घ्यावी लागे त्यावरून देखील वरील विधानास पाठिंबा मिळतो. महाभारतात (१२·५९·११२) या प्रतिज्ञेला श्रुती असे म्हटले आहे, त्याअर्थी ती वेदावर आधारलेली असली पाहिजे. त्या प्रतिज्ञेचा आशय असा आहे: "मनाने, कर्माने व वाणीने (मनसा, कर्मणा, गिरा) प्रतिज्ञेवर आरूढ हो. प्रत्यक्ष आचरण करण्याच्या दृष्टीने पुढील वाक्यांचा तोंडाने उच्चार कर: (अ) देशाची प्रगती होईल अशी मी काळजी घेईन, आणि देश हा ईश्वर आहे (हे भौम ब्रह्मच आहे) असे मी सदैव मानीन. (ब) जो येथे कायदा लागू असेल, धर्मनीतीला जे विहित असेल, दंडनीतीशी जे विरुद्ध नसेल तदनुसार आचरण मी निःशंकपणे करीन. मी स्वच्छंदपणाने कधीही वागणार नाही." राजाने अशी प्रतिज्ञा घेतल्यावर, राजाच्या

---

१. ४–२२, ३–½; ८. ७. ६.
२. *Vedic Index* II p. 211.
३. १०–१२४·८
४. A. C. Das, *Rigvedic Culture (1925)*, p. 307.
५. १०·१७३

निवडणुकीच्या समारंभाला जी मंडळी उपस्थित असत, ती त्या राजाला 'तथास्तु' म्हणून प्रतिसाद देत.[1]

लोकांच्या अनुमतीने निवडलेल्या राजाचे राज्य कशा प्रकारचे होते? त्या राज्यात उपाध्यायाचे, पुरोहिताचे वर्चस्व होते की राजा म्हणजे सगळ्या प्रजांचा पिता, त्याने सांगितलेले प्रजेने ऐकायचे असे ते पितृसत्ताकसदृश राज्य होते? राजाला असलेले अधिकार ईश्वरदत्त आहेत असे ते राज्य मानीत होते काय?... राज्य पुरोहितप्रधान नव्हते किंवा पितृसत्ताकसदृशही नव्हते. कोणत्याही इतर नागरिकाप्रमाणे राजालाही कायदा लागू होता. राजाला ईश्वरदत्त अधिकार असतात हे पाश्चात्य राज्यशास्त्राला ज्ञात असलेले तत्त्व हिंदुस्थानाला अपरिचित होते. एकंदरीने विचार करता, असे म्हणता येईल की प्राचीन भारतीय राज्याचे ध्येय प्रामुख्याने प्रस्थापित नीतिव्यवस्थेला धरून चालणे हे होते. समाजव्यवस्थेत सुधारणा घडवून आणणे हे ध्येय त्या मानाने गौण मानले जाई. राज्यव्यवस्थेची मूळ पायाभूत कल्पना व उद्दिष्ट ही बदलत्या सामाजिक परिस्थितीशी जुळवून घेतली जात असत व असे जुळवून घेण्याची प्रक्रिया कित्येक हजार वर्षे हिंदुस्थानात चालू असलेली आढळून येते. त्यामुळे प्राचीन भारतातील राज्यव्यवस्थेचे स्वरूप कसे होते हे निश्चित व अचूक सांगणे खरोखरीच कठिण आहे. या लेखाच्या मर्यादित कक्षेत या विषयाचा सविस्तर ऊहापोह करणे शक्य होणार नाही. सारांशरूपाने आतापर्यंतच्या विवेचनाचे समालोचन करावयाचे झाल्यास, प्राचीन संस्कृत वाङ्मयाचा काळजीपूर्वक, पृथक्करणात्मक अभ्यास करून प्राचीन भारतातील राज्यव्यवस्थेचे रेखाचित्र जे आपल्यासमोर उभे राहाते ते असे: राजा आरंभी लोकांच्या संमतीने निवडला जात असे, पुढे काही काळानंतर पुरोहिताचाही सल्ला घेतला जाऊ लागला. प्राचीन भारतीय राज्यशास्त्राच्या दृष्टिकोनाप्रमाणे राजे हे राज्याचे विश्वस्त मानले जात; परमेश्वराने घालून दिलेल्या नीतिनियमांचे पालन करणे याला इतर कशाहीपेक्षा सर्वोच्च महत्त्व होते; राजाला अशी प्रतिज्ञा घ्यावी लागे की "माझ्यावर ज्या राज्याचा कारभार सोपविला आहे, त्या राज्याच्या नैतिक, आध्यात्मिक व भौतिक कल्याणाची मी जपणूक करीत राहीन."

प्राचीन भारतातील सामाजिक संरचना

वेदांच्या काळात, जन्माधिष्ठित जातिव्यवस्था बहुधा अस्तित्वात नसावी. उपलब्ध आधारांवरून असे दिसते की प्राचीन समाजरचनेत समाजाचे तीन वर्ग किंवा वर्ण त्यांच्या व्यवसायातील फरकाच्या आधारावर केलेले होते आणि चवथा वर्ग किंवा वर्ण हा या देशाच्या मूळ रहिवाश्यांचा बनला. आर्य लोकांना भारतात

---

१. K. P. Jayaswal, *Hindu Polity (1955)*, p. 216.

आपले बस्तान बसविण्यापूर्वी याच मूळ रहिवाश्यांशी लढून त्यांना जिंकावे लागले. आर्य हे उत्तरध्रुव प्रदेशातून हिंदुस्थानात आले, त्यांना 'दास' लोकांना म्हणजे हिंदुस्थानातील मूळ रहिवाश्यांना जिंकावे लागले, हा जो टिळकांचा सिद्धांत तो आता पुष्कळ प्राच्यविद्यापंडितांना मान्य झालेला आहे असे म्हणता येईल. परंतु ए. सी. दास यांचे मत निराळे आहे. अगदी वेदांपासून दरोबस्त सर्व संस्कृत वाङ्मयात, आर्य लोक आक्रमक म्हणून हिंदुस्थानात आले आणि त्यांचे मूलस्थान हिंदुस्थानाबाहेर होते असे म्हणण्याला काहीही पुरावा उपलब्ध नाही, असे दास यांचे म्हणणे आहे.[1] नंतरच्या काळात, कर्मकांडाला फार महत्त्व आले त्यामुळे ब्राह्मणांचे महत्त्व व वर्चस्व वाढले. शुद्धाशुद्धता, धार्मिक उच्चनीच-भाव यांविषयीच्या कल्पना वाढीस लागून समाजातील जातिभेद फार कडक व कृत्रिम बनले. डॉ. घुर्ये यांनी म्हटले आहे : "जातिभेदयुक्त समाजाची विविध अंगे हा अनेक कारणांचा परिपाक आहे. त्यातील पहिले कारण हे की ब्राह्मणी संस्कृतीच्या पुरस्कर्त्यांनी येथील मूळचे रहिवासी व शूद्र यांच्याशी धार्मिक आणि सामाजिक संपर्क टाळून आपणापासून त्यांना दूर ठेवले. अशा रीतीने आर्य व त्यांच्याविरुद्ध दास हे वेदकालातील द्वंद्व जाऊन त्याऐवजी ब्राह्मणांनी द्विजाती आणि एकजाती (शूद्र) असे केलेले वर्गीकरण प्रचलित झाले. ब्राह्मणग्रंथांच्या व त्यानंतरच्या कालातील लेखकांच्या मनात दास म्हणजे शूद्र असे बदललेले समीकरण प्रचलित झाले असे दिसते. यज्ञातील क्रियाकांड हा ब्राह्मणी संस्कृतीचा महत्त्वाचा घटक होता. या क्रियाकांडामुळे, क्रियाकर्मांच्या शुद्धतेविषयीच्या अवास्तव कल्पनांचे भयंकर स्तोम माजले."[2] डॉ. आंबेडकरांच्या मते, अस्पृश्यतेचे मूळ दोन कारणांत सापडते. (अ) बौद्धांसारख्या फुटून निघालेल्या माणसांचा ब्राह्मणांनी केलेला तिरस्कार व द्वेष. (आ) इतरांनी गोमांसभक्षण सोडले परंतु या फुटलेल्या माणसांनी ते चालू ठेविले. डॉ. आंबेडकरांनी आणखी असेही मत मांडले आहे की, अस्पृश्यतेला वांशिक किंवा व्यावसायिक आधार नाही.[3] हिंदू समाजव्यवस्थेच्या पुढील इतिहासावरून असे दिसून येते की, यज्ञीय शुद्धतेच्या कृत्रिम कल्पनांवर फोफावलेल्या जातिभेदांनी हिंदू समाजात अधिकाधिक भेद पाडले. ही जातिसंस्था किंवा जात कायमची राहाणार अशी अशुभ लक्षणे प्रकट झाली आहेत. पुरोहितवर्गाने हिंदू कायद्याच्या विकासाला खूपच हातभार लावला. हिंदू कायद्याने जातिभेदास मान्यता देऊन, पुष्कळ बाबतीत उच्चनीचतेच्या कल्पनांवर अधिष्ठित असलेले नियम घालून दिले. पुरोहितवर्गाचा हिंदू कायद्याच्या

---

१. A. C. Das, *Rigvedic Culture (1925)* p. 323.
२. *Castes and Races in India.*
३. *'Untouchables — who were they and why they became untouchables' (1948),*

विकासात जो वाटा आहे त्याचे स्वरूप ठरविताना, आणि त्याच्या परिणामांचे निर्धारण करताना ब्राह्मणवर्गाचा कट्टर टीकाकार जो मेन त्याने ब्राह्मणवर्गाची जी प्रशंसा केली आहे तिचा उल्लेख करणे उचित होईल. मेनने म्हटले आहे : "ज्या या वर्गाच्या कल्पना व विचार वाङ्मयात प्रतिबिंबित झाले आहेत त्यांना स्वसुखाभिलाषी धार्मिक अभिजात वर्ग मानणे अगदी चुकीचे होईल. त्यांनी आपल्या जीवनक्रमाची जी आखणी केली आहे, त्यात चैनीला अजिबात वाव नाही, त्यात सुखसोयीही विरळाच. त्यांचे आयुष्य म्हणजे अथपासून इतिपर्यंत भयानक संभाव्यतेच्या भीषण सावलीत कठिलेले जीवन होय. ब्राह्मणवर्गाच्या वृत्तीत एका बाजूला स्वप्रतिष्ठापना, तर दुसऱ्या बाजूला आत्मसंन्यास व आत्मदमन या दोन्ही गुणांचे मीलन झालेले दिसून येते. ब्राह्मणांचे मुख्य विचार व कल्पना यांच्यांतून जे अत्यंत चिवट असे जोरदार चैतन्य खेळत असलेले दिसून येते त्याचे मूळ त्यांच्यामध्ये झालेल्या या दोन गुणांच्या मीलनात असावे."[१]

प्राचीन भारतातील ग्रामसंस्था

हिंदू कायद्याच्या ऐतिहासिक पृष्ठभूमीचा विचार करताना प्राचीन भारतातील ग्रामसंस्था व त्याखाली नांदणारा ग्रामीण समाज यांच्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. सर जॉर्ज बर्डवुड यांनी याविषयी जे विधान केले आहे ते खरे आहे : "हिंदुस्थानात जगातील कोणत्याही देशापेक्षा अधिक धार्मिक आणि राजकीय क्रान्त्या झाल्या. पण सर्व हिंदुस्थानभर ग्रामसंस्थांचा ग्रामशासनासंबंधीचा जोम कायमच राहिला आहे." हिंदुस्थानाशिवाय जगातील प्राचीन काळच्या इतर समाजातही ग्रामसंस्था जोरदार होत्या. पण हिंदुस्थानातल्या ग्रामसंस्थांची गोष्ट त्यांच्यापेक्षा अगदी निराळी होती. हिंदुस्थानात ज्या ग्रामसंस्था निर्माण झाल्या त्या कोणी स्वायत्त मध्यवर्ती केन्द्रसत्तेने योजनापूर्वक आपली सत्ता त्यांच्यावर सोपवून आणि आपले अधिकार व कार्य मर्यादित करून निर्माण केलेल्या नाहीत. त्या खरे म्हटले तर स्वतःच निर्माण झाल्या.[२]

आतापर्यंत आपण प्राचीन भारताच्या इतिहासाचा जो आढावा घेतला त्यावरून हे दिसून येईल की हिंदू कायद्याचा विकास आणि ज्या तत्त्वांवर हिंदू कायदा अधिष्ठित आहे ती तत्त्वे यांचा अभ्यास आतापर्यंत वर्णिलेली सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पृष्ठभूमी लक्षात घेऊनच केला पाहिजे.

---

१. *Early Law and Custom* p. 46.
२. Dr. Radhakumud Mookerji, *Local Government in Ancient India*, p. 2-6

कायद्याच्या संकल्पनेचा विकास

हिंदू कायद्याचे आद्य उगमस्थान वेद होत असाच सर्वसाधारणपणे हिंदू समाजाचा परंपरागत संकेत चालत आला आहे. परंतु खरे पाहू जाता, ज्याला आपण आधुनिक अर्थाने विधिव्यवसायाचा कायदा म्हणू तशा तऱ्हेची सामग्री वेदांतून मिळत नाही. वेदांमध्ये सूक्ते असून त्या सूक्तांचे विषय धार्मिक विधी, सत्यज्ञान आणि मोक्ष हे आहेत. काही सूक्तांत निसर्गाची अत्यंत सुंदर वर्णने आली असून, ती प्राचीनतम वैणिक काव्याचे उत्तम नमुने होत असे यथार्थत्वाने म्हणता येईल. काही सूक्तांतून वर्ण्य विषयाबरोबर ओघाने जाता जाता, त्या काळी प्रचलित असलेल्या सामाजिक चालीरीती व रूढी यांचेही प्रासंगिक उल्लेख आले आहेत. याच प्रासंगिक उल्लेखांवरून त्या वेळच्या कायद्याचे नियम निवडून एकत्रित करावे लागतात. कायदा आणि नीतिनियम या दोन्ही अर्थांचा वाचक असा एकच शब्द इंग्रजी भाषेत आढळून येत नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. याउलट, संस्कृत भाषेतील धर्म हा शब्द स्मृतिवाङ्मयात कायद्याचे नियम या अर्थी उपयोजिलेला असून, नीती आणि सदाचार असाही अर्थ त्यात गर्भित असून तो निराळा काढता येत नाही. परंतु धर्म हा शब्द देखील अनेक अर्थांच्या अवस्थांतरातून गेला आहे. त्याचा अर्थ निश्चित व अचूक सांगणे कठीण आहे. कायद्याच्या बुडाशी गर्भित असलेली सगळ्यात प्राचीन कल्पना ऋग्वेदातील 'ऋत' या शब्दात सापडते. 'ऋता'चा अर्थ विश्वाचे नियमन करणारा सर्वोच्च असा कायदा किंवा नियम किंवा विश्वनियामक तत्त्व. देव देखील ऋताचे पालन करतात. डॉ. काणे यांनी दाखवून दिले आहे की, व्रत, धर्म, धामन् आणि स्वधा हे ऋताचेच विशिष्ट आविष्कार आहेत. ऋत हे विश्वाचे संघटक, नियामक तत्त्व असून पृथ्वीवरील जीवनाचे आपल्या दिव्य प्रभावाने नियमन करीत असते.[1] धर्म हा शब्द ऋग्वेदामध्ये निदान ५६ वेळा आला आहे, असे डॉ. काणे यांनी म्हटले आहे. धर्म शब्द हा 'धृ' धातूपासून झाला आहे हे स्पष्टच आहे. 'धृ' चा अर्थ 'सावरून धरणे, आधार देणे, पोषण करणे' असा आहे. बहुतेक ठिकाणी धर्म याचा अर्थ धार्मिक आज्ञा किंवा विधी असा आहे. काही ऋचांमधून 'धर्म' याचा अर्थ 'ठराविक तत्त्वे, आचाराचे नियम' असा दिसून येतो. 'ऐतरेय ब्राह्मणा'त[2] धर्म हा शब्द यापेक्षाही सूक्ष्म अर्थी, 'सर्व धार्मिक विधींचा समूह' या अर्थी वापरलेला आढळून येतो. डॉ. काणे यांचा धर्म या शब्दाच्या अर्थाबाबत निष्कर्ष असा आहे : धर्माचे अर्थ अनेक अवस्थांतरातून बदलत गेले. शेवटी त्याचा मुख्य अर्थ व आशय आर्य

---

१. M M. Dr. P.V. Kane, *History of Dharmashastra III*, pp. 244, 245.
२. ७. १७.

म्हणून, एखाद्या जातीचा किंवा वर्णाचा एक घटक म्हणून, चार आश्रमांपैकी एका विशिष्ट आश्रमाचे आपल्या आयुष्यात पालन करणारा म्हणून, अशा निरनिराळ्या नात्यांनी असणारा जो माणूस त्या माणसाचे हक्क, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या असा होऊ लागला.[१] वेदवचनांच्या आज्ञांमधून जे निर्दिष्ट केले जाते असे इष्ट प्राप्तव्य वा पर्यवसान म्हणजे धर्म अशी जैमिनीने धर्माची व्याख्या केली आहे.[२] ज्यापासून अभ्युदय व निःश्रेयस साधतात तो धर्म अशी वैशेषिकसूत्रात धर्माची व्याख्या दिली आहे.[३] बौद्धांच्या धर्मग्रंथांतून, धर्म याचा अर्थ बुद्धाची समग्र शिकवण असा आहे. स्मृतिवाङ्मयातून धर्म हा शब्द व्यापक अर्थी वापरलेला आहे; त्यात ज्यांना आपण व्यावहारिक किंवा धर्मनिरपेक्ष कायद्याचे नियम असे मानतो अशा अनेक विषयांचा अंतर्भाव 'धर्म' या शब्दाच्या अर्थात दिसून येतो. धर्मनिरपेक्ष कायद्याचे नियम ही (स्मृतिप्रणीत) 'धर्मा'ची एक शाखा; त्या शाखेला 'व्यवहार' असे म्हटले गेले. कायद्याच्या संकल्पनेच्या विकासक्रमात 'व्यवहार' या नावाने ओळखले जाणारे कायद्याचे नियम हा एक अत्यंत परिणत अवस्थेचा टप्पा असून, ते नियम हल्लीच्या आपल्या नागरी किंवा धर्मनिरपेक्ष कायद्याशी समकक्ष आहेत. कात्यायनाने म्हटले आहे की, व्यवहार म्हणजे विविध संशयांचे निराकरण करणारी धर्माची शाखा होय. वि म्हणजे विविध, अव म्हणजे संशय, हृ(हर) म्हणजे निराकरण करणे. कात्यायाने लावलेल्या अर्थाप्रमाणे संशयांचे निराकरण हे व्यवहाराचे साध्य होय. न्यायनिवाडा देण्याच्या पद्धतीचे प्रयोजन सत्यसंशोधन करणे हे आहे. ज्याअर्थी कायदा हा संशय, शंका यांचे निराकरण करावयास सहायभूत होतो त्याअर्थी सत्याचा शोध करण्यास प्रवृत्त झालेल्या न्यायदानपद्धतीला कायदा उपकारकच आहे हे निश्चित. व्यवहार म्हणजे धर्मनिरपेक्ष आणि नागरी कायदे या मताला उपोद्बलक प्रमाण महाभारतात सापडते. महाभारतात म्हटले आहे की व्यवहारनियमांचे प्रामाण्य धर्मनियमांच्याइतकेच पवित्र व थोर आहे. धर्मनियमांचे मूळ वेदांनी घालून दिलेल्या नियमात आहे, तर व्यवहारनियमांचे मूळ राजकीय शासनात आणि राजपदात आहे. राजकीय शासन हे एक पवित्र कृत्य आहे, कारण ते सृष्टिकर्त्याने आज्ञापिले आहे. म्हणूनच त्या शासनाने केलेले व्यवहार-नियम देखील पवित्रच होत.[४] यावरून असे दिसते की धर्माच्या संकल्पनेने कायदा हा नीतिशास्त्र, सदाचार आणि परमार्थ यांचाच एक भाग म्हणून मानले, तर व्यवहाराची संकल्पना ही एक अधिक

---

१. *History of Dharmashastra* I, p. 2.
२. पूर्वमीमांसासूत्र १. १. २
३. १. १.
४. महाभारत, १२–१२१. ४९–५७

परिणत झालेली संकल्पना असून ती पूर्णतः नव्हे तरी मुख्यतः नागरी आणि धर्मनिरपेक्ष कायद्याचे विवेचन करते.

हिंदू कायद्याची उगमस्थाने

मनूने म्हटले आहे की धर्मांची उगमस्थाने पाच आहेत : अखिल वेद, वेदवेत्त्यांची स्मृती आणि शील, साधुजनांचे आचार आणि आत्मतुष्टी.[१] याज्ञवल्क्याचेही तसेच मत आहे: "श्रुती, स्मृती, सदाचार, स्वतःच्या आत्म्याला जे प्रिय असेल ते, आणि योग्य संकल्पानंतर झालेली इच्छा (सम्यक् संकल्पज काम)—ही धर्माची परंपरेने मानलेली उगमस्थाने होत."[२] श्रुती किंवा वेद यांच्या योगाने हिंदू कायद्याचे नियम निश्चित करण्यास कितपत व कोणत्या स्वरूपाचे मार्गदर्शन मिळते त्याचे दिग्दर्शन वर आलेच आहे. स्मृतिवाङ्मयाकडे जर नुसती ओझरती नजर टाकली तर त्यावरून धर्मशास्त्र या नावाखाली स्मृतींमध्ये अनेक विषयांचा ऊहापोह केलेला आहे असे दिसून येईल. उदाहरणार्थ, मेधातिथीने दाखविले आहे की, मनुस्मृतीमध्ये वर्णधर्म, आश्रमधर्म, वर्णाश्रमधर्म, नैमित्तिक धर्म (प्रायश्चित्त), गुणधर्म (राज्याभिषेक ज्याला झालेला आहे अशा राजाचे कर्तव्य) यांचे प्रतिपादन आहे. परंतु स्मृतिवाङ्मयातील जो 'व्यवहार' नावाचा भाग आहे त्यात खरोखरी ज्याला कायदा म्हणतात त्याचे विवेचन आहे. कुमारिलाने आपल्या 'तन्त्रवार्त्तिका'मध्ये स्मृतिग्रंथांच्या विश्वसनीयतेसंबंधी चर्चा केली आहे. तो म्हणतो : "मनू आणि इतर स्मृतिकार यांचे स्मृतिग्रंथ हे इतर ग्रंथकारांच्या स्मृतीवर किंवा स्मरणावर अवलंबून आहेत. आणि स्मृतीची विश्वसनीयता ज्याची ती स्मृती त्याच्या सत्यवादित्वावर किंवा सत्यप्रियतेवर अवलंबून असते. म्हणून, असा एकही स्मृतिग्रंथ नाही की जो वेदांप्रमाणे स्वतःसिद्ध आहे असे मानता येईल. तरीही वेदवेत्त्या माननीय लोकांच्या अविच्छिन्न परंपरेने ज्याअर्थी त्यांना मान्यता दिली आहे, त्याअर्थी हे स्मृतिग्रंथ अगदी अविश्वसनीय, असे म्हणून ते टाकाऊ ठरविता येत नाहीत. तरीपण स्मृतिग्रंथांच्या विश्वसनीयते-विषयी अनिश्चिततेची शंका डोकावतेच;"[३] तेव्हा हिंदू कायद्याचे एक उगमस्थान म्हणून स्मृतिग्रंथ मानले जातात याचे मुख्य कारण हे की वेदांतील नियम जे स्मृतीत साठवून ठेविले होते ते या स्मृतिग्रंथांत उद्धृत केले गेले आहेत. स्मृतिग्रंथांचा हिंदू कायद्याच्या विकासाच्या कामी जो उपयोग झाला आहे, त्याविषयीची सांकेतिक समजूत अशा प्रकारची आहे. हिंदू कायद्याच्या उत्क्रांतीच्या इतिहासा-

---

१. २.६

२. १.७

३. तन्त्रवार्त्तिक (भाषांतर). पान १०५

वरून असे दिसून येते की, हिंदू कायद्याच्या उगमस्थानांपैकी एक जी रूढी तिचे महत्त्व फार आहे. रूढी विचारात घेतली गेल्यामुळे, हिंदू कायदा प्रगतिशील बनण्यास मोठी मदत झाली. आणि तिच्यामुळे एका बाजूला कायद्याच्या अक्षरांचा काटेकोर अर्थ आणि दुसऱ्या बाजूला बदलत्या सामाजिक गरजा भागविण्याची आवश्यकता या दोहोंमधील अंतर कमी करून त्यांची सांगड घालण्याच्या हेतूने नवीन तरतुदी समाविष्ट करण्यात आल्या. समाजात एखादी रूढी प्रचलित असून त्या रूढीचा स्मृतिग्रंथ किंवा श्रुती यांतील नियमांच्या कांटेकोर अर्थाशी जर विरोध उत्पन्न झाला, तर अशा परिस्थितीत रूढी बलवत्तर समजून तिला प्राधान्य द्यावे ही गोष्ट प्राचीन हिंदू विधिज्ञांना मान्य होती असे दिसून येते. मनूने म्हटले आहे : "आचार (रूढी आणि प्रघात) हे तर्कातीत परम धर्मच होत. श्रुतीत आणि स्मृतीत सांगितलेले आचारदेखील तसेच आहेत. म्हणून स्वतःचे कल्याण करून घेऊ इच्छिणाऱ्या द्विजाने त्या आचारांचे पालन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे." डॉ. काणे यांनी असे मत व्यक्त केले आहे की, वरील मनुवचनामध्ये, आचार हा शब्द, नुसता, श्रुत्युक्त व स्मार्त ही विशेषणे वगळून घेतला पाहिजे. या बाबतीत माझे मत डॉ. काणे यांच्याप्रमाणेच आहे. न्यायनिवाडा करताना, प्रचलित आचार किंवा रूढी या विचारात घेणे आवश्यक आहे असे गौतम, मनू, कात्यायन इत्यादी धर्मशास्त्रकारांच्या वचनांवरून दिसून येते. देश किंवा जनपदे, नगरे, ग्राम, जाती, कुटुंब, श्रेणी आणि निगम यांच्यामध्ये प्रचलित असलेल्या रूढी आणि प्रघात विचारात घ्यावे असे या धर्मशास्त्रकारांनी म्हटले आहे.[1] या संदर्भात याज्ञवल्क्य-स्मृतीतील श्लोकांवर (२·११८–११९) व्याख्या करताना विज्ञानेश्वराने जे महत्त्वाचे विधान केले आहे त्याचा उल्लेख करणे उचित होईल. विज्ञानेश्वर म्हणतो: "या प्रकरणातील श्लोकवचनांतून जे लोकांमध्ये प्रत्यक्ष प्रचलित आहेत अशा आचारांचा पुनरुच्चार केला आहे." भिन्न भिन्न धर्मशास्त्रवचनांवर आधारलेल्या धर्म-व्यवहार-नियमांमध्येच जेव्हा विरोध उत्पन्न होतो तेव्हा त्याचा कसा परिहार करावा याबद्दल प्राचीन धर्मशास्त्रवाङ्मयातून फार उद्बोधक चर्चा केलेली आढळते. कौटिल्याने म्हटले आहे की, "एखाद्या बाबतीत धर्मशास्त्र आणि रूढी किंवा धर्मशास्त्र आणि धर्मनिरपेक्ष व्यवहार यांमध्ये जर विरोध उत्पन्न झाला, तर राजाने धर्माचा आधार घेऊन न्यायनिवाडा करावा. आपल्याला जो नियम न्याय्य व बुद्धीला पटणारा वाटतो त्याविरुद्ध जर धर्मशास्त्रवचन असेल, तर त्या वचनाचा शब्दशः अर्थ अस्तित्वात नाही असे समजावे व आपल्याला न्याय्य वाटणाऱ्या नियमाच्या बाजूने निर्णय द्यावा."[2] आपस्तंबाने म्हटले

---

१. *History of Dharmashastra;* III pp. 875, 876.

२. कौटिलीय अर्थशास्त्र ३.१

आहे : "या धर्मसूत्रात न सांगितलेला असा जो उरलेला धर्मसूत्राचा भाग तो सर्व जातीचे पुरुष आणि स्त्री यांच्याकडून घ्यावा असे काही विधिपंडितांचे मत आहे."[1] बृहस्पती व नारद यांनी असा नियम घालून दिला आहे की, "केवळ शास्त्रवचनांच्या आधारावर निर्णय करू नये : जर निर्णय बुद्धीला पटणारा नसेल, तर धर्माचा लोप होतो. न्यायालयापुढील खटल्यात, एखादा निरपराधी सज्जन मनुष्य अपराधी ठरणे, एखादा सदाचारी मनुष्य दुराचारी ठरणे, किंवा एखादे पुण्यकृत्य पाप ठरणे शक्य आहे. अशाच अविवेकी निर्णयामुळे मांडव्य हा चोर ठरला."[2]

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, श्रुती आणि स्मृती यांतील वचनांबद्दल ज्या काळात आदर वाटत होता त्या काळात देखील न्यायनिवाडा करताना विवेकाला पटेल असा दृष्टिकोन स्वीकारण्याचे अपरिहार्य महत्त्व विधिपंडितांनी प्रतिपादिले आहे.

पुढे कालाच्या ओघात, स्मृतिवचनांचा अक्षरशः अर्थ आणि प्रचलित रूढी यांच्यामधील अंतर वाढत जाऊन भीतिप्रद रूप धारण करू लागले, तेव्हा टीकाकार अवतीर्ण झाले. त्यांनी त्याच प्राचीन वचनांचे अत्यंत कल्पकतेचे अर्थ लावून, धर्मशास्त्रांतील नियम लोकांच्या प्रचलित आचारांशी किंवा रूढींशी जुळवून घेण्याचे स्तुत्य कार्य केले. या बाबतीत विज्ञानेश्वराने केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे. कायद्याचा कल्पकतापूर्ण अर्थ लावण्याची पद्धती आपणाला माहीत असलेल्या तिन्ही न्यायमीमांसांच्या पद्धतींमध्ये—रोमन, इंग्लिश आणि हिंदू या तिन्हीही पद्धतीत आढळून येते. परंतु या तीन पद्धतींमध्ये याबाबत जी एक कुतूहलजनक विभिन्नता दिसून येते, तिच्याकडे श्री. शंकरराम शास्त्री यांनी लक्ष वेधले आहे.[3] इंग्लंडमधील निर्णयविधीला प्रामाण्य प्राप्त झाले ते तेथील न्यायाधीशांनी प्राप्त करून दिले. याउलट रोमन कायद्यातील रेस्पोन्सा प्रुडेंटिअम आणि संस्कृतमधील धर्मशास्त्रावरील टीका यांना अधिकृत प्रामाण्य वकिलांनी प्राप्त करून दिले. इंग्लंडमध्ये, कायद्याची प्रगती जी झाली ती संपूर्णपणे न्यायालयापुढे आलेल्या कज्ज्यांचा न्यायनिवाडा करावयाची जी तांतडीची गरज ती भागविण्याच्या अनुरोधाने झाली. याउलट हिंदुस्थानात आणि रोममध्ये कोर्टापुढे आलेल्या प्रत्यक्ष कज्ज्यांचा संबंध न आणता, विधिपंडितांना एक सुसंबद्ध आणि एकसूत्री असा विधींचा समुच्चय बनविणे शक्य झाले. या संदर्भात बेन्थॅमने केलेल्या

---

१. आपस्तंब धर्मसूत्र २. ११. २९. १४–१५.

२. याज्ञवल्क्यस्मृतीवरील अपरार्काच्या टीकेतून उद्धृत. २.१.
History of Dharmashastra, I, p. 208.

३. Sankararama Sastri, *Fictions in the Development of the Hindu Law Texts (1926)*, p. 169.

विधानांचा उल्लेख करणे बोधप्रद होईल. वेन्थॅमने म्हटले आहे : "कायद्याचा कपोलकल्पित अर्थ म्हणजे एक जाणूनबुजून अवलंबिलेले असत्य होते. त्याचे उद्दिष्ट हेच की जे लोक कायद्याच्या अधिकारापासून वंचित होते आणि जे तो हक्क सांगावयास धजले नाहीत त्यांना कायद्याचा अधिकार या प्रच्छन्न मार्गाने उपलब्ध करून द्यावा. या आभासाच्या अभावी त्या लोकांना कायद्याच्या अधिकाराचा उपयोग करून घेता आला नसता." कसेही असो, हे खरे की, कायद्याचा कल्पित अर्थ लावण्याच्या पद्धतीने हिंदू कायद्याच्या उत्क्रांतीत अत्यंत प्रगतिशील असे कार्य केले आहे. ही प्रक्रिया या देशात ब्रिटिश कारकीर्दीत खुंटली आणि त्यामुळे हिंदू कायदा हा प्रस्तरीभूत बनला. कारण हिंदू समाजातील बदलते प्रघात व रूढी विचारात न घेता न्यायाधीश मुख्यतः टीकांवर विसंबून राहिले.

हिंदू कायद्याच्या उत्पत्तीचा अजून विचार करावयाचा राहिला आहे. वैदिक वाङ्मयात यासंबंधाचे काही प्रासंगिक उल्लेख सापडतात. जयस्वाल यांनी असा एक सिद्धान्त मांडला आहे की, हिंदू कायद्याचा प्राचीन आणि आद्य उगम 'समय' म्हणजे लोकांच्या सभांनी मंजूर केलेले ठराव यांमध्ये आहे. ज्यामुळे लोकांचे आचार नियंत्रित होतात व जे 'समया'वर आधारलेले आहेत ते धर्मनियम होत असे आपस्तंबाने म्हटले आहे.[1] निगमाने एकत्र जमून केलेले ठराव असा समयाचा अर्थ होऊ शकेल. जयस्वाल यांच्या मताप्रमाणे, धर्मसमय म्हणजे निरनिराळ्या वेदांच्या शाखांच्या अनुयायांनी एकवट होऊन किंवा भिन्न भिन्न रीतीने संघ करून त्यांत निर्णयरूपाने पास केलेले कायदे होत. समय हे मूलतः जमातींचे संघशः एकत्र जमून केलेले नियम होत.[2] पुढे कालक्रमाने याच संघांच्या ग्रामसंस्था बनल्या असाव्यात. प्राचीन भारतातील राजकीय जीवनाचे वैशिष्ट्य म्हणून या संस्था गणल्या जातात. आपस्तंबाने आपल्या ग्रंथाच्या शेवटच्या सूत्रात म्हटले आहे की, "प्रमाणभूत धर्मशास्त्रग्रंथांतून सगळेच धर्मनियम सापडत नाहीत, ज्या देशात आर्य राहातात त्या देशातील सर्व आर्यांची ज्याबाबत एकवाक्यता आहे अशी रूढीही धर्मनियम होऊ शकेल."[3] हे म्हणताना आपस्तंब कायद्याचे एक उगमस्थान जो 'समय' त्याचा उल्लेख करीत आहे. धर्मसूत्रे हिंदू कायद्याचा मुख्य उगम म्हणून वेदांचा उल्लेख करतात हे खरे आहे. 'समय' या उगमाचा उल्लेख अपस्तंबाने केलेला आहे, तो 'समय' नंतरच्या वाङ्मयात आढळत नाही. पतंजली सर्व धर्मसूत्रग्रंथांना मिळून धर्मशास्त्र असे संबोधतो व त्यांचे प्रामाण्य मान्य करतो. मनू आणि याज्ञवल्क्य यांनी ज्या उगम-

---

१. १, १. १. १.
२. K. P. Jayaswal, *Manu and Yajnavalkya–A Basic History of Hindu Law*, p. 65.
३. आपस्तंब, १. १. १ (२३)

स्थानांचा उल्लेख केला आहे त्यांचा निर्देश वर आलाच आहे. लोकांच्या गणांनी किंवा संघांनी एकत्र जमून केलेले ठराव किंवा संकेत हे कायद्याचा भाग बनले याला एक उद्‌बोधक प्रमाण शिलालेखातून उपलब्ध झालेले आहे. त्या शिलालेखाचा उल्लेख डॉ. महालिंगम् यांनी आपल्या 'ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ॲण्ड सोशल लाइफ अण्डर विजयानगर' या पुस्तकात केला आहे.[1] त्या विशिष्ट शिलालेखात त्या विशिष्ट ठिकाणच्या ब्राह्मणांनी केलेला करार नमूद केला आहे. "आपण कन्यादानविधीनेच विवाह करावेत, जे या विवाहाकरिता द्रव्य देतील किंवा घेतील त्यांना वाळीत टाकून, राजाने त्यांना शिक्षा करावी" असा त्या कराराचा आशय आहे. यावरून हिंदू कायद्याचे आद्य आणि प्राचीन उगमस्थान 'समय' किंवा लोकांच्या गणांनी आपल्या निगमित सभांतून जे ठराव किंवा करार केले ते असावेत असे गृहीत धरणे सयुक्तिक होईल.

अर्थशास्त्र व धर्मशास्त्र यांचे परस्पर संबंध

हिंदू कायद्याची उगमस्थाने आणि या निरनिराळ्या उगमस्थानांमध्ये परस्पर विरोध दिसून आल्यास विरोधाचा परिहार करण्याकरिता हिंदू कायद्याने केलेले नियम यांच्या केलेल्या चर्चेमधून आजच्या घटकेस अत्यंत महत्त्वाचा असलेला प्रश्न उत्पन्न होतो; तो म्हणजे, अर्थशास्त्र आणि धर्मशास्त्र या दोहोंमध्ये कोणते नाते वा संबंध आहे?—डॉ. शामशास्त्री यांनी १९०९ मध्ये म्हैसूर संस्कृत सीरिज या ग्रंथमालेत कौटिलीय अर्थशास्त्र प्रसिद्ध केले. कौटिलीय अर्थशास्त्राचे प्रकाशन ही हिंदू कायद्यासंबंधीच्या संशोधनाच्या इतिहासात एक युगप्रवर्तक घटना होय. कौटिल्याने आपला हा ग्रंथ इ. स. पूर्व ३०० ते इ. स. नंतर १०० या कालावधीत रचला. हा ग्रंथ मनुस्मृतीच्या पूर्वीचा आहे. कौटिलीय अर्थशास्त्रातील 'धर्मस्थीयम्' नावाच्या प्रकरणात चर्चिलेल्या विषयाला तर कायद्याच्या इतिहासात सर्वतोपरी अद्वितीय असे स्थान आहे. जगातील प्राचीनतम धर्मनिरपेक्ष कायद्यांच्या संहितांपैकी ती एक असल्याचा मान तिला हक्काने मिळू शकेल. ज्या उच्च पातळीवरून कायद्यासंबंधीची व न्यायविद्येसंबंधीची तत्त्वे या ग्रंथात चर्चिली आहेत ती उच्च पातळी, ज्या नेमकेपणाने त्यातील विधाने करण्यात आली आहेत तो नेमकेपणा आणि त्यात खेळत असलेले संपूर्णपणे धर्मनिरपेक्ष असे वातावरण या सर्वांमुळे कायद्याच्या वाङ्मयाच्या इतिहासात या अर्थशास्त्राला अग्रपूजेचा मान मिळाला. देशातील त्या वेळच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीवर अर्थशास्त्राने भरपूर प्रकाशझोत टाकलेला आहे. कौटिलीय अर्थशास्त्रात १५ अधिकरणे व १५० प्रकरणे आहेत. त्यात सुमारे १८० विषयांचा परामर्श घेतलेला आहे. या ग्रंथात

---

१. पान २५२.

एकंदर सुमारे ६००० श्लोक आहेत. श्लोकांमध्ये मधूनमधून गद्य भाग आला आहे. सबंध ग्रंथात विषयांची अत्यंत पद्धतशीर मांडणी केलेली असून, संकल्पनाची एकता ग्रंथात विशेष रीतीने साधली आहे. या ग्रंथाचा कर्ता अद्भुत बुद्धिमान आणि आपल्यासमोरील प्रश्नांविषयी शुद्ध धर्मनिरपेक्ष, कायदेशीर आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोन बाळगणारा असला पाहिजे याविषयी संशय राहात नाही. कौटिलीय अर्थशास्त्रामध्ये अर्थशास्त्रावरील पूर्वी होऊन गेलेल्या ग्रंथकारांचे १२ हून अधिक उल्लेख आले आहेत. यावरून असे साहजिकच अनुमान निघते की नागरिकांना लागू होणाऱ्या धर्मनिरपेक्ष कायद्याचे विवरण कौटिल्यापूर्वी अनेक ग्रंथकारांनी केलेले होते. त्यामुळे अर्थशास्त्राच्या संप्रदायाचा पाया निखालसपणे कौटिल्याच्या पुष्कळच पूर्वी घातला गेला होता, असे निष्पन्न होते. आता प्रश्न उत्पन्न होतो तो असा : कौ० अर्थशास्त्रामध्ये प्रतिपादिलेला धर्मनिरपेक्ष कायदा हा स्मृतिवाङ्मयात आढळणाऱ्या हिंदू कायद्याशी काही संबंध नाही अशा रीतीने अमलात येऊन प्रगत होत होता की काय ?

हल्ली उपलब्ध असलेल्या मनुस्मृतीच्या रचनाकालापर्यंत, अर्थशास्त्राची प्रगती धर्मशास्त्राहून अगदी स्वतंत्र अशी चालू होती, असे जयस्वाल यांचे मत असून ते त्यांनी जोरदारपणे मांडले आहे.[1] त्यांच्या मते, कौटिलीय अर्थशास्त्रात मौर्यांच्या साम्राज्यातील कायद्यांचे सार निविष्ट झाले आहे, तर मानवधर्मशास्त्र (मनुस्मृती) हे शुंगांच्या ब्राह्मणी साम्राज्यातील हिंदू राष्ट्राच्या मनोभूमिकेवर आधारलेले आहे. मनूनंतर झालेली याज्ञवल्क्य स्मृती शातवाहनांच्या काळी हिंदू कायद्याचे जे स्वरूप होते त्याचे प्रतिनिधित्व करते. याज्ञवल्क्यस्मृतीचे धोरण सर्वसाधारणपणे मनुस्मृतीच्यापेक्षा अधिक उदार आहे आणि ब्राह्मणांना तिने कमी सवलती दिल्या आहेत. काही महत्त्वाच्या बाबतीत याज्ञवल्क्यस्मृतीचे मनुस्मृतीपेक्षा कौ० अर्थशास्त्राशी अधिक साम्य आहे. याज्ञवल्क्याने ज्याला दिवाणी कायदा असे यथार्थपणे म्हणता येईल त्यातील प्रश्नांच्या विचारांना अधिक जागा दिली. मनूने असे केलेले नाही. याज्ञवल्क्याने सर्वसामान्यपणे करारासंबंधी विवेचन केले असून, समुद्रावरील व्यापारी आणि कारागीर यांच्या भागीदारीचा विचार केला आहे. निगमांच्या विधीचाही याज्ञवल्क्यस्मृतीत ऊहापोह आढळून येतो. जयस्वाल यांनी मांडलेल्या सिद्धान्तानुसार, मनस्मृतीला श्रेष्ठ स्थान व प्रामाण्य आल्यानंतर, अर्थशास्त्राचे स्वतंत्र स्थान व अस्तित्व संपुष्टात आले आणि 'व्यवहार' हा विषय धर्मशास्त्राचा केवळ एक भाग बनला; पुढे याज्ञवल्क्यस्मृतीने मनुस्मृतीचे परिणामतः उच्चाटन केले. याज्ञवल्क्याने अधिक उदार धोरण अंगीकारिले; ब्राह्मण्याची वृत्तीही त्याच्यात कमी प्रमाणात दिसून येते. पण याज्ञवल्क्याने देखील 'व्यवहार' हा धर्माचाच एक भाग

---

१. Jayaswal, *Manu and Yajnavalkya*

म्हणून मानला आणि भविष्यकाळात हिंदू कायद्याचा तोच नमुना व साचा बनून राहिला. काही काळ लोटल्यावर, टीकाकार उदयास आले आणि त्यांनी याज्ञवल्क्य स्मृतीतील तजविजींमध्ये त्यांच्या काळाला जुळणारे व मानवणारे बदल केले. त्या त्या काळातील सामाजिक विचारप्रवाहांशी जुळवून घेण्याच्या दृष्टीने, याज्ञवल्क्याचे उदार व्यापक धोरण संकुचित करण्यात येऊ लागले. रंगस्वामी आयंगार यांचे मत या दृष्टिकोनाशी पुष्कळसे जुळते आहे.[1]

जयस्वालनी प्रतिपादिलेल्या सिद्धान्तावर एस्. वरदाचारिअर यांनी जोरदार टीका केली आहे.[2] वरदाचारिअरनी म्हटले आहे : "कायद्यासंबंधी चर्चा करणारा मनुस्मृती हा पहिलाच धर्मशास्त्रग्रंथ होय असे म्हणणे बरोबर नाही. तसेच शुंगकाळात मनुस्मृती रचिली गेली हेही गृहीत धरता येत नाही. गौतम, बौधायन आणि आपस्तंब यांच्या धर्मसूत्रांतून कायद्याचे काही विषय चर्चिले गेले आहेत. तसेच ब्राह्मणांच्या वरिष्ठत्वास व वर्चस्वास सुरवात शुंग घराण्याच्या वेळेपासून झाली हेही खरे नव्हे. ब्राह्मणांच्या वर्चस्वास खरोखरी बौद्ध धर्माच्या पाडावानंतर सुरवात झाली." परंतु याशिवाय वरदाचारिअर यांच्या टीकेतील मुख्य मुद्दा असा की, जयस्वाल यांनी मांडलेला सिद्धान्त कायद्याच्या इतर पद्धतींचा विकास ज्या इतिहासक्रमाने झाला त्या इतिहासक्रमाशी विसंगत आहे. डॉ. काणे यांचे असे मत आहे की अर्थशास्त्र ही खरोखरी धर्मशास्त्राची एक शाखा आहे; कारण राजांनी आपल्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये कशी पार पाडावीत याबद्दलचे धर्मशास्त्रात आलेले नियम अर्थशास्त्रात विस्ताराने सांगितले आहेत.[3]

माझ्या मनाचा कल जयस्वालांचा सिद्धांत स्वीकारण्याकडे आहे. कौटिल्य आणि मनू या दोघांच्या दृष्टिकोनांत व मतांत जे काही बाबतीत फरक आढळून येतात, ते पाहिल्यास मला असे का वाटते ते कळेल. कौटिल्य आणि मनू या दोहोंच्या दृष्टिकोनांत तीव्र आणि मूलगामी स्वरूपाचे फरक आहेत. कौटिल्याने विधवांना आणि रोगग्रस्त पुरुषांच्या पत्नींना नियोगाची परवानगी, प्राचीन काळी जितक्या विमुक्तपणे देत असत तितक्या विमुक्तपणे दिली आहे. याउलट मनूने नियोगाचा निषेध केला आहे. कौटिल्याने गणिकांचे अस्तित्व गृहीत धरले आहे आणि त्यांची संघटना असावी अशी इच्छा प्रकट केली आहे. याउलट मनू गणिका या सार्वजनिक नीतिमत्तेला शापभूत मानतो व त्यांना शिक्षा सांगतो. कौटिल्याचा प्रयत्न जुगार आणि मद्यपान नियमित करण्याकडे आहे, तर मनूने त्यांना पाप मानून त्यांचा निषेध केला आहे. कौटिल्याने पुनर्विवाहित विधवा आणि

---

१. *Considerations of some Aspects of Ancient Indian Polity* (1935).
२. Radhakumud Mookerji : *Endowment Lectures on the Hindu Judicial System. pp. 38 f.*
३. *History of Dharmashastra* I, p. 87.

अविवाहित माता यांचे अस्तित्व मानले आहे. याउलट मनूने अक्षतयोनी विधवा वगळून इतर विधवांच्या बाबतीत पुनर्विवाह निषिद्ध मानला आहे. मनूने पाखंड्यांचा जोरदार निषेध केला आहे. परंतु कौटिल्याचे तसे मत दिसत नाही; स्वधर्मत्यागी लोकांचा आपल्या कुटुंबाच्या इस्टेटीमधून आपल्या निर्वाहापुरता हिस्सा मागण्याचा हक्क हिरावून घेण्यापेक्षा जास्त त्यांच्याविरुद्ध तो काही सुचवीत नाही; उलट त्याने असेही म्हटले आहे की स्वधर्मत्यागी मातेचे भरणपोषण तिच्या मुलांनी केले पाहिजे. वारस म्हणून बहिणींना मालमत्तेचा किती हिस्सा द्यावा याबाबतही कौटिल्य आणि मनू यांचे मतभेद दिसून येतात. कौटिल्याने आत्महत्येस बंदी केली असून, सतीला अमान्यता दर्शविली आहे. याउलट मनूने सतीचा स्पष्ट शब्दात निषेध केलेला आढळून येत नाही. फलज्योतिषाच्या मागे लागलेल्यांचा कौटिल्याने निषेध केला आहे. मनूचे त्याबाबत म्हणणे एवढेच की, फलज्योतिषाचा कोणी व्यवसाय करू नये. त्याचप्रमाणे कौटिल्य आणि मनू यांच्या ग्रंथांमधून, ब्राह्मणांचा दर्जा, हक्क, आणि त्यांना द्यावयाच्या सवलती या बाबतीत कितीतरी फरक आढळून येतात. कौटिल्य आणि मनू यांमध्ये एवढे फरक का याचे समाधानकारक स्पष्टीकरण एकाच उपपत्तीने मिळू शकते; ती अशी की कौ० अर्थशास्त्राचा प्रतिपाद्य विषय धर्मनिरपेक्ष विधी हा होता; आणि तत्संबद्ध प्रश्नांकडे पाहाण्याचा अर्थशास्त्राचा दृष्टिकोन शुद्ध धर्मनिरपेक्ष आहे; याउलट मनूच्या धर्मशास्त्राने कायद्याच्या प्रश्नांचा विचार नैतिक, धार्मिक आणि सदाचाराच्या दृष्टिकोनातून केला आणि ज्या कल्पनांवर हिंदूंची सामाजिक संरचना आधारलेली आहे त्या कल्पना अमलात आणल्या.

याच गोष्टीचा आणखी एका बाजूने विचार केला तरी वर सांगितलेलाच निष्कर्ष निघतो. कौटिल्याच्या मते, धर्म, व्यवहार, रूढी आणि राजाज्ञा हे न्यायगत खटल्यांचे चार पाय असून, यात पूर्वीच्या प्रत्येक पादापेक्षा मागाहून येणारा उत्तर पाद बलवत्तर आहे. यावरून राजाज्ञेला प्रमुख स्थान दिले आहे हे स्पष्ट होते. परंतु राजाज्ञेचे हे स्थान धर्मशास्त्र मान्य करीत नाही. याखेरीज, व्याजाचा दर आकारताना, कौटिल्याने धर्मशास्त्र आणि व्यवहारनियम यात फरक केला आहे. धर्मनियमाने व्याजाचा दर दरमहा दरशेकडा $1\frac{1}{4}$, तर व्यवहाराने तोच व्याजाचा दर दरमहा दरशेकडा ५ हा मान्य केला आहे. यावरून हे स्पष्ट होते की कौ० अर्थशास्त्राप्रमाणे व्याज-आकारणीच्या बाबतीत व्यवहाराचे नियम धर्मशास्त्रनियमापेक्षा निराळे व स्वतंत्र होते. साकल्याने विचार करता प्राचीन काळी धर्मशास्त्राशी काही संबंध नाही अशा रीतीने अर्थशास्त्र अस्तित्वात व अमलात असावे, व त्या अर्थशास्त्राचा विषय नागरिक किंवा धर्मनिरपेक्ष कायदा हा असावा असे गृहीत धरणे सयुक्तिक व साधार वाटते. अर्थशास्त्रातील अर्थ–धर्मनियम किंवा आर्थिक कायदा राजाच्या कायद्यांचे प्रामाण्य मानीत असे आणि राजाने केलेले कायदे बंधनकारक मानले जात.

इतक्या प्राचीन काळी निर्भेळ धर्मनिरपेक्ष विधीचा उदय व विकास होणे हे एक उल्लेखनीय महत्कृत्य आहे; व इतर प्राचीन समाजांतून ज्या पद्धतींनी कायद्याची निर्मिती व विकास होतो त्या पद्धतींचा विचार करून जो सिद्धान्त प्रस्थापित झाला आहे त्या सिद्धान्ताशी ही गोष्ट विसंगत दिसते, हे खरे. परंतु त्याबरोबरच हे लक्षात घ्यावयास हवे की, अर्थशास्त्र या नावाखाली मोडणारे खूपसे कायदा-विषयक वाङ्मय आपल्यासमोर एक समस्या उभी करते. अर्थशास्त्र हे धर्मशास्त्राचा एक भाग होता असे नुसते प्रतिपादन केल्याने ही समस्या सुटत नाही. कारण धर्मशास्त्र आणि अर्थशास्त्र या दोन शास्त्रांतून चर्चिलेल्या विषयांची व्याप्ती, त्यांचा दृष्टिकोन, निरनिराळे विषय हाताळण्याची त्यांची पद्धती, त्यांनी चर्चेकरिता घेतलेल्या विषयांचे स्वरूप व संख्या आणि महत्त्वाच्या मुद्द्यांबाबत त्यांनी जे विशिष्ट नियम सांगितले आहेत त्या नियमांतील तफावत इत्यादी गोष्टींचा विचार करता, अर्थशास्त्र हे धर्मशास्त्राचा एक भाग होते ही वर सुचविलेली उपपत्ती समाधानकारक वाटत नाही. मनुस्मृतीनंतर अर्थशास्त्राला स्वतंत्र अस्तित्व व कार्य राहिले नसेल, व हिंदूंनी आपल्या व्यवहाराकरिता स्मृती व त्यावरील टीका यांतील विधी प्रमाण मानले असतील, असेही असणे शक्य आहे. परंतु हिंदू कायद्याच्या उत्पत्तीबाबत जी कल्पना स्वीकृत झाली आहे तिला कौटिलीय अर्थशास्त्राचा शोध लागल्याने हितकारक असा धक्का बसला आहे. आणि इतर देशात प्राचीन काळी झालेल्या कायद्याच्या विकासाशी जयस्वाल यांचा सिद्धान्त जुळत नाही म्हणून तो सारतः व तत्त्वतः फेटाळून लावणे बरोबर होणार नाही.

मेन या ग्रंथकाराने प्राचीन हिंदू कायद्यासंबंधाने जी अत्यंत कठोर टीका केली आहे, ती खरोखरी अन्याय्य आहे असेच आता म्हटले पाहिजे. मेनने म्हटले आहे : "धर्मशास्त्रावरील ग्रंथांचा अभ्यास केल्यावर मनावर जो ठसा उमटतो तो हा की, राजकीय, बौद्धिक आणि आध्यात्मिक वर्चस्व एके ठिकाणी केन्द्रित होऊन त्याच्यामुळे उद्भवलेली जुलूमशाही इतक्या भयानक स्वरूपात दुसरीकडे कुठेही अस्तित्वात नसेल." तो[1] आणखी असे म्हणतो : "हिंदूंनी केलेल्या न्यायतत्त्वमीमांसेला दूरदृष्टी व सुयोग्य निर्णयबुद्धी यांचा आधार आहे. परंतु असमंजस अनुकरण करणारांनी त्यात निर्दय तर्कशून्यतेच्या विधिविधानांची प्रचंड भर घालून ठेविली आहे."[2] मेनने रोमन लोकांच्या 'बारा कोष्टकां'ची (कायद्यांची) फार प्रशंसा केली आहे आणि असे विधान केले आहे : "जर रोमची बारा कोष्टके प्रकाशात आली नसती, तर हिंदू लोकांच्या दुबळ्या आणि विकृत संस्कृतीप्रमाणे रोमन लोकांनाही दुबळ्या आणि विकृत संस्कृतीचे जिणे कंठावे

---

१. *Early Law and Custom*, p. 46
२. *Ancient Law*, p 17

लागले असते असे विधान करणे सयुक्तिक व योग्य नसले, तरी एवढे मात्र खचित की या बारा कायद्यांमुळे रोमन लोक त्या दुःखमय भवितव्याच्या शक्यतेपासून निखालस सुटले.''[1] मेनसारख्या थोर ग्रंथकाराला अन्याय न व्हावा म्हणून हे नमूद केले पाहिजे की, ज्या काळी मेनने आपला ग्रंथ लिहिला त्या काळी प्राच्यविद्या-पंडितांना अर्थशास्त्राच्या अस्तित्वाची जाणीव नव्हती; आणि कौटिल्याचे अर्थशास्त्र तेव्हा प्रकाशात आले नव्हते. रोमन 'बारा कायदे' रचिले जाण्याच्या पुष्कळ पूर्वी अर्थशास्त्र जर होऊन गेले असेल तर मेनने प्राचीन हिंदू विधी व त्यांविषयी जी कठोर भाषा वापरली आहे ती सर्वस्वी अन्याय्य आणि हिंदू कायद्याच्या उत्क्रांतीविषयीच्या अपुऱ्या ज्ञानावर आधारलेली आहे असे म्हटले पाहिजे.

अर्थशास्त्र आणि धर्मशास्त्र यांच्यामधील परस्परसंबंधाच्या तापदायक समस्येवर अखेरचा शब्द उच्चारण्यापूर्वी तत्संबंधी समग्र उपलब्ध वाङ्मय व्यापक दृष्टीने व चिकित्सापूर्वक अभ्यासिले पाहिजे, हे मी मोकळेपणाने कबूल करतो. काय सांगावे, काळाच्या ओघात अर्थशास्त्रावरील आणखी काही ग्रंथांचा शोध लागेल आणि त्यांच्यामुळे या प्रश्नावर आणखी प्रकाश पडेल. दुर्दैवाने, ब्रिटिश अमदानीत हिंदू कायद्याचा अभ्यास, खरा 'आतमधून' त्यावरील संस्कृत ग्रंथांच्या साहाय्याने झालेला नाही. 'मदुराचे कलेक्टर–विरुद्ध–मूटू रामलिंग' या खटल्याच्या प्रकरणी[2] प्रिव्ही कौन्सिलने असे विधान केले : ''हिंदु कायद्याप्रमाणे न्यायनिवाडा करणाऱ्या न्यायाधीशाचे कर्तव्य, आपल्यासमोर उपस्थित झालेले वादग्रस्त तत्त्व हे प्राचीनतम प्रमाणग्रंथांतून खरोखरी योग्य रीतीने निघू शकते की नाही ह्याचा शोध घेण्याचे नसून, ज्या जिल्ह्यात हा खटला कोर्टापुढे आला आहे त्या जिल्ह्यात प्रमाण-भूत मानल्या गेलेल्या धर्मशास्त्राच्या विशिष्ट संप्रदायाने ते तत्त्व स्वीकारले आहे की नाही, एवढेच पाहाणे हे आहे.'' प्रिव्ही कौन्सिलच्या या दृष्टिकोनामुळे न्याया-धीशांच्या न्यायदानावर मर्यादा घातल्या गेल्या आणि हिंदू कायद्याप्रमाणे न्याय-निवाडा करण्याच्या बाबतीत, त्या त्या प्रदेशात मान्यता पावलेल्या टीका-भाष्यकाराला सार्वभौम महत्त्व प्राप्त झाले. परंतु हिंदू कायदा, त्याची उत्पत्ती, वाढ आणि उत्क्रांती यांचा खरा यथोचित अभ्यास करावयाचा तर त्याकरिता या विषयावरील उपलब्ध असलेल्या सर्व संस्कृत ग्रंथांच्या अध्ययनाचा कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे. डॉ. राशबिहारी घोष यांनी बऱ्याच वर्षांपूर्वी म्हणून ठेवल्याप्रमाणे हिंदू कायद्यावरील वाङ्मय हे संशोधकाला समृद्ध व विविधतापूर्ण असे क्षेत्र उपलब्ध आहे. डॉ. घोष यांनी म्हटले आहे : ''क्षेत्रात अमाप पीक, कापणी करणाऱ्यांच्या कोयत्याची वाट पाहात उभे आहे. पण कापणी करणाऱ्यांच्या पुरेशा संख्येची

---

१. पूर्वोक्त, पान १७

२. *12 Moore's Ind. App.* 397, 436

वाण आहे, हा आपलाच दोष आहे. त्यामुळे सामग्रीची ही लयलूट आपल्या अभिमानाचा विषय होण्याऐवजी आपल्या अप्रतिष्ठेची गोष्ट होऊन बसली आहे."[१]

डॉ. घोष यांनी याविषयी द्रष्टेपणाने अशी आशा व्यक्त केली आहे की "संस्कृत भाषेच्या अभ्यासाचा उपयोग तत्संबद्ध भाषाशास्त्राच्या अभ्यासाला जसा झाला आहे तसाच हिंदू कायद्याचा अभ्यासही न्यायतत्त्वमीमांसेला उपकारक व पोषक असाच होईल." मला तर असे वाटते की, अर्थशास्त्राने हिंदू कायद्याची उत्क्रांती घडवून आणण्याच्या बाबतीत जे कार्य केले आहे ते जेव्हा संशोधनाअंती पूर्णपणे उजेडात येईल तेव्हा डॉ. घोष यांची भविष्यवाणी खरी होईल

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ..... विः .....
आकि ..... नोंद दिः .....

१. Dr. Rash Behari Ghose, *Law of Mortgages, IVth Edn.* p. 35

सामाजिक सुधारणेचे एक शतक

रानडे मानीत की "खऱ्या सुधारकापुढे कोरी पाटी कधी नसते. समाजसुधारणेचे अर्धवट राहिलेले वाक्य पुरे करणे हेच बहुधा त्याचे कार्य असते. पूर्वकालाशी असलेला संबंध सर्वस्वी तोडणे आपल्याला शक्य नसते, कारण तो एक आपला संपन्न वारसा आहे आणि त्याची लज्जा वाटण्याचे आपल्याला काहीच कारण नाही. पण पूर्वकालाविषयी आदर बाळगत असतानाही त्याच्याभोवती माजलेले व्यावहारिक गोष्टींचे किटण साफ करण्याचा आपण सतत प्रयत्न केला पाहिजे." गेली जवळजवळ १५० वर्षे हिंदुस्तानात जी समाजसुधारणेची चळवळ झाली तिचे विशाल दृश्य अवलोकिले असता "हे अर्धवट सोडलेले वाक्य पुरे करण्याकरिता" समाजसुधारकांनी केलेले कार्य रेखीवपणे नजरेसमोर उभे राहते. ही कथा सूचक रीतीने राजा राममोहन राय यांनी १८१८ साली लिहिलेल्या सतीच्या निबंधापासून सुरू होते, ती सत्तावनच्या क्रांतियुद्धाच्या शताब्दी महोत्सवापर्यंत येऊन ठेपते. त्यात आपल्याला सामाजिक समतेच्या पायावर उभारावयाच्या नव्या समाजरचनेचे ध्येयचित्र पाहणाऱ्या थोर थोर समाजसुधारकांचे दर्शन घडते. त्यांच्यामध्ये सर्वांत पूर्वी महापुरुष राजा राममोहन राय हे अग्रेसर दिसून येतात तर राष्ट्रपिता गांधीजी हे शेवटचे दिसतात.....

हिंदुस्तानातील सामाजिक सुधारणेच्या संपूर्ण व विस्तृत कथेचा व्याप खरोखर एकोणिसाव्या शतकाच्यामागे कित्येक शतके पसरलेला आहे. हिंदू संस्कृतीप्रमाणेच हिंदू सामाजिक संस्थानाही जगाच्या इतिहासात सर्वांत प्राचीन कुलपरंपरा आहे असे रास्तपणे म्हणता येईल. खिस्तपूर्व ४००० वर्षे इतक्या प्राचीनतम कालात रचल्या गेलेल्या ऋग्वेदापासून आमच्या सामाजिक संस्थांचा प्रारंभ होतो. वैदिक काळामध्ये, आर्यांच्या समाजरचनेत व्यवसायभेदावर अधिष्ठित अशा तीन वर्गांचे

आपणाला दर्शन घडते. पौरुषयुक्त आर्य लोकांनी भारतावर स्वारी केली आणि तेथे वस्ती करण्यास सुरवात केली तेव्हा या नवागतांत आणि या देशात राहणाऱ्या मूळच्या नागरिकांत अपरिहार्यपणे लढा सुरू झाला. अनेक पौरस्त्य विद्वानांच्या मते शूद्रवर्णाचे मूळ जितके राजकीय आहे तितके सामाजिक अथवा धार्मिक नाही. आक्रमणकारी आर्यांचा भारतातील मूळच्या रहिवाश्यांकडून प्रतिकार झाला तेव्हा आपल्या या विरोधकांना हीनवंशीय म्हणून ते कमी लेखू लागले आणि त्यांना ते 'दास' किंवा 'दस्यू' म्हणू लागले. त्यानंतर त्यांना 'शूद्र' म्हणून म्हणण्यात येऊ लागले. 'शूद्र' हा शब्द ऋग्वेदात एकदाच आलेला दिसतो; पण दस्यू जमातींचे किंवा दासांचे बऱ्याच वेळा उल्लेख आलेले आहेत. "आम्ही चहूबाजूंनी दस्यूंनी वेढलेले आहो, ते यज्ञ करीत नाहीत, त्यांची कशावरही श्रद्धा नाही, त्यांचे विधी भिन्न आहेत, ते मानव नाहीत. हे अरिनाशका! त्यांचा वध कर, दास लोकांना नष्ट करून टाक," असे वैदिक कवी म्हणतो.[1] वेदकाळच्या समाजरचनेत असे अनेक रूपविशेष आहेत की ज्यांचे जगभरच्या सर्व इतिहासपूर्व, आदिम समाजरचनांशी साम्य आहे.

वैदिक युगानंतर ब्राह्मणे, आरण्यके, उपनिषदे आणि पुराणे आली. जसजसा काळ लोटला तसे समाजजीवनात कर्मकांड व यज्ञयाग यांना प्राधान्य मिळू लागले आणि त्यातून पुरोहितवर्गाच्या सत्तेचा उदय झाला. कृत्रिम सोवळेपणाच्या कल्पनांमुळे त्या काळी असलेल्या जाती दृढतर बनण्याकडे प्रवृत्ती होऊ लागली आणि हिंदू समाजाचे कप्पेबंद विभाग पडण्याच्या प्रवृत्तीने डोके वर काढले.

तथापि वेळोवेळी मोठमोठ्या धर्मसुधारकांनी जातींच्या अपवर्जक प्रवृत्तीला व त्यायोगे अपरिहार्यपणे पोसल्या जाणाऱ्या उच्चनीचतेच्या कल्पनांना तीव्र विरोध केला; या विरोधातूनच पुढे भिन्न मतांचे संप्रदाय निघाले. अशा सामाजिक क्रांतिकारकांत बहुमानाचे स्थान बुद्धाला दिले पाहिजे. "पूर्वकालीन बुद्ध धर्म कर्मकांडाच्या वेड्यात न अडकलेले नैतिक व सद्गुणसंपन्न जीवन हाच धर्म मानीत होता. शास्त्राच्या आदेशांतून मनुष्य मुक्त आहे असे त्याने घोषित केले. बुद्ध धर्म म्हणजे खरोखर रूढ परंपरेविरुद्ध बंड होते आणि कर्मकांडाने पीडिलेल्या, जातींनी दडपून गेलेल्या मानवाला स्वतःचे ज्ञान करून घेण्याकरिता एक बुद्धिवादी विचारसरणी देण्याचा त्याने प्रयत्न केला..."[2] बुद्धानंतर महावीरस्वामी आले; जैन धर्म म्हणजे, बुद्ध धर्माप्रमाणेच, क्षत्रियांनी पुरोहितवर्गाच्या संकुचितपणाला केलेला विरोध होता; त्या वर्गाने संन्यासाश्रमात प्रवेश करण्याचे द्वार फक्त ब्राह्मण जातीलाच मोकळे ठेवण्याची इच्छा धरली. ब्राह्मणांच्या श्रेष्ठत्वाविरुद्ध आणि

---

१. ऋग्वेद १०. २२·८

२. 'इंडियन फिलॉसॉफी' खंड १, पा. ३४८–डॉ. राधाकृष्णन्

पुरोहितवर्गाने माजविलेल्या कर्मकांडाच्या स्तोमाविरुद्ध महावीरस्वामींनी बंडाचा झेंडा उभारला. यानंतर काही शतकांनी बसवराय आले, त्यांनीही आपल्या उपदेशातून तेच तत्त्व प्रतिपादन केले.

महाराष्ट्रात ज्ञानेश्वर, तुकाराम आदी संतांनी तेच सामाजिक आणि धार्मिक सुधारणेचे कार्य पुढे चालविले. जातिभावनेमधील अपवर्जकतेच्या जरठ वृत्तीचा कडकपणा कमी करण्याचा त्यांनी भगीरथ प्रयत्न केला; शूद्रांना आध्यात्मिक शक्तीच्या उच्च पातळीवर नेण्याची आणि ब्राह्मणांच्या बरोबरीने त्यांना सामाजिक महत्त्व प्राप्त करून देण्याची त्यांनी धडपड केली. कौटुंबिक संबंधांना त्यांनी शुचिता आणली आणि स्त्रियांचा दर्जा वाढविला. रानड्यांच्या शब्दात सांगावयाचे तर, "समाजात माणुसकी आणणे व परस्परांविषयी सहिष्णुता बाळगण्याच्या सिद्धांतांवर भर देणे हा त्यांच्या शिकवणुकीचा परिणाम होता." हिंदू समाजातील सामाजिक संस्थांच्या दीर्घ इतिहासात घडलेल्या प्राचीन उत्थानांचा हा येथे केवळ अत्यंत संक्षेपाने उल्लेख केला आहे. या सर्व क्रांतिकारी चळवळींचे सर्वांत मोठे लक्षणीय वैशिष्ट्य हे होते की सर्वसामान्य लोकांच्या भाषेत आणि त्यांना समजेल अशा रीतीने त्या चळवळी त्यांच्याशी बोलत होत्या. या सुधारकांपैकी कोणीही घ्या, त्याने सर्वसामान्य जनतेच्या बोलीभाषेत आपले धर्मविषयक आणि तत्त्वज्ञानविषयक विचार प्रकट केले आहेत; संस्कृत भाषेचा आश्रय घेण्याचा रूढ ब्राह्मणी मार्ग त्यांनी सोडून दिला आहे.

चार हजारांवर वर्षे चालत आलेल्या हिंदू सामाजिक संस्थांचा उगम व वाढ हा एक ऐतिहासिक व चिकित्सक अभ्यासाचा मोठा मनोल्हादक विषय आहे... अलीकडच्या काळात यावयाचे तर, हिंदूंची जीवनसरणी व हिंदू समाजपद्धती सुधारण्याकरिता सुशिक्षित भारतीयांनी केलेल्या प्रयत्नांमध्ये पहिला सुसंघटित प्रयत्न म्हणजे राजा राममोहन रॉय यांनी स्थापन केलेला ब्राह्मो समाज हा होय. या समाजाचे मत असे होते की "मानवाची धार्मिक परिस्थिती ही या जगातील त्याच्या परिस्थितीच्या इतर अंगांप्रमाणे प्रगती करीत चालली आहे." मुक्तीची प्राप्ती करून घेण्याचा पश्चात्ताप हाच एक मार्ग आहे असे हा समाज मानीत होता. आध्यात्मिक कल्याणाकरिता त्याने प्रार्थनेचा अवलंब केला; अशा प्रार्थना सफळ होतात अशी त्याची श्रद्धा होती. कोणतेही धार्मिक विधी किंवा संस्कार त्याने ठेवले नाहीत आणि तत्त्वतः कसलाही जातिभेद मानला नाही. तथापि, वेदांचे अपौरुषेयत्व आणि अप्रमादित्व यांच्यावर समाजाच्या संस्थापकाचा विश्वास होता आणि त्यांचे तो समर्थन करीत असे. अर्थातच धार्मिक प्रार्थना चालविणारा त्यांचा आचार्य हा पुष्कळ वर्षेपर्यंत नेहमी ब्राह्मणच असावयाचा. त्या स्थानावर जेव्हा केशवचंद्र सेन यांची नियुक्ती झाली तेव्हाच ही रूढी मोडली गेली. त्यातून केशवचंद्र सेन आणि देवेन्द्रनाथ टागोर यांच्यामध्ये जो वाद उत्पन्न झाला त्यावरून केशवचंद्र सेन

यांना ब्राह्मो समाजाला सामाजिक सुधारणेचे अधिक प्रभावशाली हत्यार बनविण्याची इच्छा होती असे दिसते. त्यांनी व त्यांच्या मित्रांनी ब्राह्मणी यज्ञोपवीत काढून टाकण्याचे ठरविले आणि ब्राह्मोखेरीज दुसऱ्या कोणीही प्रार्थना चालवू नयेत असा आग्रह धरला. या मतभेदांतून ब्राह्मो-अनुयायांत दोन तट पडले आणि फुटलेल्या लोकांनी आपला एक स्वतंत्र समाज बनविला. ब्राह्मो समाजाच्या चळवळीने हिंदू धर्म व हिंदूच्या सामाजिक चालीरीती व रूढी यांच्यांत सुधारणा करण्याच्या आवश्यकतेविषयी लोकमानसात जागृती करण्याच्या कामी मोठी कामगिरी केली यात काहीच संशय नाही. एका अर्थी समाजाने त्या काळी आचारात असलेले हिंदू धर्मातील मताग्रह व भ्रामक समजुती यांचा बौद्धिक निषेध करण्याच्या प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व केले असे म्हणता येईल.

त्यानंतर दयानंद पुढे आले व त्यांनी आर्यसमाजाची स्थापना केली. आर्यसमाज जन्माधिष्ठित कडक जातिभेदाच्या विरुद्ध होता यात संशय नाही; परंतु व्यक्तीच्या गुणकर्मांवर आधारलेल्या चातुर्वर्णिक वर्गीकरणाला त्याचा विरोध नव्हता. त्याने वेदांना पूज्य मानले आणि त्यांत सांगितलेल्या हिंदुधर्माचे आद्य शुद्ध स्वरूप आणि ती आद्य समाजरचना यांचे पुनःस्थापन करण्याचे स्वप्न त्याने बाळगले. आर्यसमाजाची ही चळवळ धार्मिक त्याचप्रमाणे राष्ट्रीय चळवळ होती. हिंदुस्तानात आणि हिंदू प्रजेत त्याने एक नवचैतन्य आणले. वेदांना त्याने गौरविले आणि प्राचीन हिंदू संस्कृतीचे अध्ययन व्हावे असे त्याने आवाहन केले. उपनिषदांत दर्शविलेल्या प्राचीन आदर्शानुरूप अनेक शैक्षणिक संस्था काढून त्याने फार मोलाचे असे पायाभूत कार्य केले. दयानंदांनी सुरू केलेली चळवळ हा समाजसुधारणेच्या वृत्तांतातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे.

हिंदू समाजाला त्याच्या संपन्न वारशाने प्राप्त झालेल्या समृद्धीची जाणीव करून देणे आणि एक समाज म्हणून असलेल्या आपल्या सांघिक जीवनात खऱ्या धार्मिक आदेशांचे अनुसरण करण्याविषयी त्याला आवाहन करणे या बाबतीत श्रीरामकृष्ण व त्यांचे शिष्य विवेकानंद यांची कामगिरी फार महत्त्वाची आहे. विवेकानंद म्हणाले, "ज्याचे हृदय गरीबाकरिता तुटते त्याला मी महात्मा म्हणतो, ज्याचे तुटत नाही तो दुरात्मा होय. कोट्यवधी लोक जोवर उपासमारीत व अज्ञानात राहात आहेत तोवर, त्यांच्या श्रमावर शिक्षित होऊन जो त्यांच्याकडे ढुंकूनही पाहात नाही असा प्रत्येक मनुष्य मी देशद्रोही समजतो." स्वामी विवेकानंदांनी स्थापन केलेल्या रामकृष्ण मिशनने आधुनिक भारतात समाजसेवेच्या क्षेत्रात फार महत्त्वाचे कार्य केले आहे. गरीब व दलित लोकात त्याने प्रशंसनीय असे परोपकाराचे कार्य केले आहे. वेदान्ताचा व रामकृष्णांच्या उपदेशाचा प्रचार करण्याकरिताही त्याने मिशनरी कार्य चालविले आहे. तसेच साऱ्या देशभर पसरलेल्या आपल्या केंद्रांमध्ये संघटित शैक्षणिक कार्याचा उपक्रम केला आहे. जात, पंथ किंवा वर्ण

यांचा भेद न ठेवता सर्व देशभर मिशन जी महनीय सेवा करीत आहे तीच खरोखर श्रीरामकृष्णांच्या व विवेकानंदांच्या स्मृतीला मोठी श्रद्धांजली आहे.

मुंबईमध्ये समाजसुधारकांनी प्रार्थनासमाज काढला, त्याचे कार्य बंगालमधील ब्राह्मो समाजासारखेच चालत होते, फक्त त्यांचा दृष्टिकोन व भर थोडासा भिन्न होता इतकेच. महाराष्ट्रात आगरकर, फुले व कर्वे यांनी समाजसुधारणेच्या जगन्नाथाच्या रथाला पुढे वाहून नेण्याचे फार मोठे कार्य केले. आगरकरांनी आपल्या सामर्थ्यशाली लेखणीने सुशिक्षित वर्गांना आवाहन करून सर्व भोळसट समजुतींचा त्याग करण्याला व तर्कबुद्धीवर श्रद्धा ठेवण्याला सांगितले. त्यांनी आपले विचार केवळ तार्किकतेवर व बुद्धिवादी दृष्टिकोनावर आधारले होते आणि अशा निर्दय तर्कवादाने त्यांनी सामाजिक सुधारणेची शिकवण दिली. फुले हे प्रत्यक्ष कार्य करणारे समाजसुधारक होते, त्यांचा सामाजिक समतेच्या सिद्धान्तावर मनापासून विश्वास होता आणि परकीय राज्यसत्तेचे अनिष्ट परिणाम ते उत्कटतेने समजावून सांगत. त्यांनी उपदेशिलेल्या मतांतून पुढे महाराष्ट्रात एक प्रचंड चळवळ निघाली व तिने सामाजिक समतेची जोरात मागणी केली. शतायुषी महापुरुष कर्वे यांनी आपले सारे आयुष्य स्त्रीशिक्षणाला अर्पण केले आणि त्यांच्या जीवितकार्याची ही महान् कथा आपणा सर्वांना परिचित आहे. याखेरीज, आधुनिक भारताची महान् विभूती रानडे यांची प्रकाशमय आणि प्रेरक वाणी त्यांच्या आयुष्यकाळात सामाजिक सुधारणेच्या चळवळीला वाट दाखवीतच होती.

कालांतराने गांधीजी पुढे आले; आणि त्यांनी अस्पृश्यतेच्या पापप्रवृत्तीवर अपूर्व अशा तळमळीने व पोटतिडिकेने हल्ला चढविला; नव्हे, अस्पृश्यतानिवारण हे त्यांनी महान् राष्ट्रीय आंदोलनाचे एक महत्त्वाचे व अभिन्न अंगच बनविले. तथापि, गांधीजींनी वर्णाश्रम ही जन्मावर आधारलेली उपकारक अशी श्रमविभागणी मानली. आजच्या जातीच्या कल्पना या मूळ वर्णधर्मांची विकृती आहे हे त्यांना मान्य होते आणि सामाजिक उच्चनीचतेचे तत्त्व त्यांना अमान्य होते. लोकांच्या समजुतीत वर्ण हे जन्मावर आधारलेले आहेत हे त्यांना मान्य होते; पण शूद्राला वैश्य होणे शक्य आहे असे त्यांचे मत होते. अर्थात् वैश्याची कर्तव्ये अमलात आणण्याकरिता शूद्राने स्वतःला वैश्यच म्हणवून घेण्याची आवश्यकता आहे असे नाही. जो ब्राह्मणाचा धर्म पाळतो तो पुढच्या जन्मी सहजच ब्राह्मण होईल. जातीच्या संबंधात गांधींची जी सामाजिक विचारसरणी होती तिचे हे थोडक्यात सार आहे.

सामाजिक सुधारणेच्या चळवळीला अनेक बाबतीत यश लाभले. पूर्वकाळातील समाजसुधारकांना कोणत्या बिकट प्रश्नांना तोंड द्यावे लागले त्यांचे स्वरूप यथातथ्यपणे लक्षात घेणे आज आपल्याला अवघड जाईल. त्या काळी समुद्रपर्यटनाला बंदी होती; आणि जो कोणी ही रूढी मोडील त्याला सामाजिक बहिष्काराची शिक्षा

होती. बालविवाह हा सर्रास चालू होता आणि विधवांची स्थिति असह्य होती. जातिविषयक अन्यायांचा धाक दूर करण्याकरिता किंवा संमतिवय दाखल करण्याकरिता कायदे करून घेण्याचे जे जे प्रयत्न केले गेले त्यांना 'धर्म धोक्यात आहे' असा जोराचा ओरडा करून विरोध करण्यात आला. स्त्रीशिक्षणावर समाजाची वक्रदृष्टी होती आणि एकाच जातीतल्या भिन्न पोटजातींतील विवाहांचा धर्मविरोधी म्हणून निषेध करण्यात येत होता. सामाजिक आणि धार्मिक विधी व संस्कार करताना धर्मभोळ्या क्रियाकर्मांचे पालन करणे सर्रास चालू होते. या व अशाच इतर सामाजिक अनिष्ट प्रकारांशी समाजसुधारणेच्या चळवळीने पूर्वीच्या काळी जो लढा दिला त्यात बऱ्याचशा प्रमाणात तिने विजय मिळविला आहे. अस्पृश्यतेच्या पापप्रवृत्तीवरसुद्धा असाच हल्ला चढविला गेला आणि आता संविधानात व कायद्यात कलमे घालून तिला आटोक्यात ठेवण्यात आले आहे. याखेरीज, जातींचा व क्षुद्र जातिनिष्ठांचा प्रश्न, त्याचप्रमाणे त्यातूनच अपरिहार्यपणे उद्भवणाऱ्या सामाजिक उच्चनीचतेच्या भावना यांच्यावर अजून हल्ला झालेला नाही, आणि सामाजिक समानता ही बऱ्याच मोठ्या लोकसंख्येला दूरच्या स्वप्नासारखीच अजून आहे! गेल्या १५० वर्षांतील सामाजिक सुधारणेच्या चळवळीच्या सिंहावलोकनात्मक अभ्यासातून साहजिकच त्या चळवळीची संभाव्य वाटचाल आणि भवितव्य काय असा प्रश्न निर्माण होतो. सामाजिक समतेचे ध्येय अविलंबेकरून कसे जास्तीत जास्त गाठता येईल आणि सामाजिक सुधारणा यशस्वी करण्याकरिता कोणते मार्ग व साधने अवलंबिली पाहिजेत? हे प्रमुख प्रश्न आहेत आणि त्यांचे त्वरित उत्तर मिळाले पाहिजे. गतकालच्या समाजसुधारकांचा अनुभव या प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याच्या कामी आपल्या फार उपयोगी पडेल यात मुळीच संशय नाही.

गेल्या १५० वर्षांतील समाजसुधारणेच्या आंदोलनाचे सिंहावलोकन करून त्याचे व्यापक समीक्षण केल्यास एक अर्थपूर्ण सत्य स्पष्टपणे प्रत्ययास येते; आणि ते म्हणजे हिंदुस्तानातील परकीय राज्यसत्तेचा दोन प्रकारचा आणि एकमेकाशी काहीसा विसंगत असा, झालेला परिणाम. या देशात पाश्चिमात्य पद्धतीचे शिक्षण सुरू झाले आणि त्याचा पगडा शिक्षित भारतीयांच्या मनावर बसून जीवनाकडे बुद्धिवादी व वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहाण्याची बीजे त्यांच्या मनात रुजली. सामाजिक समतेचे तत्त्व व समाजातील सर्व वर्गांना स्वतःची आर्थिक प्रगती करण्याकरिता समान संधी देण्याचे महत्त्व यांचा प्रभाव शिकलेल्या हिंदी लोकांच्या विचारांवर व विचारसरणीवर पडला; आणि या नव्या विचारसरणीच्या प्रकाशात ते हिंदू समाजरचना, धर्म, चालीरीती व रूढी यांची तपासणी करू लागले. या तपासणीतूनच सामाजिक सुधारणेच्या आधुनिक आंदोलनाचा जन्म झाला आहे.

दुसऱ्या बाजूने, परकीय राज्यसत्तेमुळे राष्ट्रीय भावनेला उधाण आले, ती भावना राष्ट्राच्या गतवैभवाकडे मोठ्या अभिमानाने पाहू लागली आणि परक्यांचे

वर्चस्व नष्ट करण्याची उत्कट इच्छा बाळगू लागली. राजकीय स्वातंत्र्याच्या या उत्कट ओढीतून जी राष्ट्रीय जागृती झाली तिची शिक्षित भारतीयांच्या मनावर अनिवार मोहिनी पडली आणि तिची सत्ता सर्व भारतीयांच्या अंतःकरणावर, स्वातंत्र्याचे स्वप्न १९४७ साली प्रत्यक्षात उतरेपर्यंत, अखंडित चालत होती. इतिहास घडला तो असा. राजकीय स्वातंत्र्याची साधना करताना राष्ट्रीयतेने आमच्या समाजरचनेतील गंभीर दोषांचे व उणीवांचे महत्त्व कमी लेखले—केव्हा तर दुर्लक्षिले आणि समाज-सुधारणेच्या प्रश्नाकडे पाठ फिरविली. राजकीय स्वातंत्र्य आले की त्यातून सारे सामाजिक व आर्थिक प्रश्न आपोआप सुटतील असे तिने मानले. सर्वांना आता माहीत होऊन गेले आहे की या काळात राजकीय सुधारणा आधी की सामाजिक सुधारणा आधी असा काहीसा कटुवाद साऱ्या भारतभर गाजत होता. सामाजिक प्रश्न सोडविण्याला हात घातला की त्याने राष्ट्रीय आघाडी कमकुवत होईल असे राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांना वाटत होते, परकीय सत्तेशी झुंजण्याकरिता एकच ध्येय असणे अत्यंत आवश्यक आहे असे त्यांना भासत होते; तर समाजसुधारणावादी लोकांचे आग्रहपूर्वक म्हणणे होते की परकीय सत्ता येथे आली ती हिंदुसमाजरचनेत जो मुळात दुबळेपणा आहे त्याचा परिणाम म्हणूनच आली व हा दुबळेपणा जर काढून टाकला नाही किंवा दुरुस्त केला नाही तर राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करणे व ते संभाळणे शक्य होणार नाही. या काळामध्ये अनेक समाजसुधारक जे सामाजिक सुधारणेच्या बाबतीत क्रांतिवादी होते त्यांची मनःप्रवृत्ती राजकीय स्वातंत्र्याच्या बाबतीत अपरिवर्तनवादी, नव्हे क्रांतिविरोधी, होती; तर काही राष्ट्रीय वृत्तीची माणसे जी राजकीय स्वातंत्र्याच्या बाबतीत क्रांतिवादी होती ती सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत अपरिवर्तनवादी, नव्हे क्रांतिविरोधी होती, ही एक मोठी लक्षात घेण्याजोगी गोष्ट आहे. दुर्दैव असे की या झगड्याचा सामाजिक सुधारणेच्या चळवळीच्या वाढीवर अनिष्ट परिणाम झाला. त्यामुळेच, इंग्रजी शिक्षणाने सामाजिक सुधारणेकरिता पाया तयार केला पण इंग्रजी सत्तेने अप्रत्यक्षतः सामाजिक सुधारणेच्या प्रश्नाला लोकमानसात दुय्यम स्थान दिले असा विरोधाभास आपल्या दृष्टोत्पत्तीस येतो.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रत्येक विचारी मनुष्याला आता कळून चुकले आहे की राजकीय स्वातंत्र्य आल्यामुळे सामाजिक किंवा आर्थिक प्रश्न सुटतात असे नाही. या देशात जी राजकीय क्रांती घडून आली ती काही सर्वांगीण मूलगामी जीवनदर्शनातून नव्हे. राष्ट्रीयतेला आणि राष्ट्रसेवेच्या हाकेला ज्या देशभक्तांकडून प्रतिसाद मिळाला त्यांच्यापैकी काहींचा आर्थिक व सामाजिक क्रांतिवादावर विश्वास नव्हता; आणि म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीनंतरसुद्धा, आर्थिक व सामाजिक न्यायावर ज्यांचा संपूर्ण विश्वास आहे अशा पुरोगामी शक्तींनी सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याच्या ध्येयाच्या मागे लोकमत आणून उभे केले पाहिजे हे अवश्य आहे. राष्ट्राची प्रगती ही कल्पनाकल्पांनी होत नसते आणि राजकीय स्वातंत्र्याच्या सोबतीने जर आर्थिक

व सामाजिक समता आली नाही तर ते स्वातंत्र्यही पूर्णत्वाने भरभराटू शकत नाही. रानडे यांना स्वतंत्र भारताच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक रचनेची व्यापक दृष्टी होती; त्यांनी कितीतरी वर्षांपूर्वी मत हे व्यक्त करून ठेवले आहे. त्यांनी आपल्या देशबांधवांना आगाऊ सूचना दिली की, "तुमचे राजकीय हक्कांचे पारडे जर हलके असले तर तुमची समाजपद्धतीही चांगली राहू शकणार नाही, आणि तुमची समाजपद्धती जर बुद्धिवादावर व न्यायावर आधारलेली नसेल तर राजकीय हक्कांचा व विशेषाधिकारांचा वापर करण्याची तुम्हांला पात्रता येणार नाही. तुमची सामाजिक मांडणी जर अपूर्ण असेल तर तुमची अर्थरचनाही चांगली राहू शकणार नाही. तुमचे धार्मिक विचार जर हीन व क्षुद्र असतील तर तुम्ही सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय क्षेत्रांत यश मिळवू शकणार नाही. हे परस्परावलंबन म्हणजे काही आकस्मिक प्रकार नसून तो आपला प्रकृतिधर्म आहे." रानडे यांचे हे विधान नितांत सत्य आहे हे आजच्या समाजसुधारकांनी ओळखणे अत्यंत जरूरीचे आहे.

लोकशाहीच्या काळात सामाजिक व आर्थिक न्याय व समता प्रस्थापित करण्याच्या कामी कायद्याला गतिशील बनून मोठी कामगिरी बजावता येण्याजोगी आहे. आर्थिक बाबतीत लोकशाहीला कायद्याचे शस्त्र प्रभावीपणे वापरता येईल; परंतु सामाजिक बाबतीत मात्र समाजाच्या जागृत सदसद्विवेकबुद्धीच्या संपूर्ण सहकार्याविाचून सामाजिक न्यायप्रस्थापनेचे ध्येय गाठणे केवळ कायद्याने शक्य होणार नाही. हिंदू कायद्याच्या संबंधातील सर्व बाबींचा समावेश करून घेणारे हिंदू कोड जेव्हा कायदा म्हणून दाखल होईल तेव्हा भारतीय लोकशाहीने एक फार महत्त्वाचे साध्य गाठले असे होईल यात शंका नाही. हिंदू कोड हे या अर्थाने क्रांतिकारक आहे की त्यात हिंदूंच्या खास कायद्याला धर्मनिरपेक्ष स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु इतिहासाच्या अभ्यासूंना हे चांगले माहीत आहे की सामाजिक बाबतीत कायदा हा समाजाच्या सदसद्विवेकबुद्धीच्या फार पुढे पाऊल टाकू शकत नाही; आणि येथेच समाजसुधारकांना लोकमत शिक्षित करून सामाजिक कायद्यांची परिणामकारक अंमलबजावणी होण्याला सुयोग्य व अनुकूल वातावरण निर्माण करण्याच्या बाबतीत महत्त्वाची कामगिरी बजावावयाची आहे. सामाजिक शिक्षण व सामाजिक कायदा हे जर हातात हात घालून चालले तर समाजसुधारणेचे उद्दिष्ट अधिक झपाट्याने पदरात पडेल.

सामाजिक उद्दिष्टांची साधना करणाऱ्यांना भूत, वर्तमान आणि भविष्य यांच्यामधील अदृश्य परंतु प्रगाढ संबंध दुर्लक्षून चालणार नाही. समाजसुधारणा ही काही कोऱ्या पाटीवर काढावयाची अक्षरे नाहीत हे मान्य व्हावे. एका अर्थी 'आज' हे 'काल'चे अपत्य असून त्याच्याकडे उद्याचे पितृत्व असते; परंतु समाज-रचनेत जो एक सातत्याचा भाग असतो त्याकडे समाजसुधारकाला जसे दुर्लक्ष करता येत नाही, त्याचप्रमाणे अंध पुनरुज्जीवनवादाची वृत्ती आपल्या देशात डोके वर

काढत नाहीना याचीही खबरदारी घेणे अवश्य असते. रानड्यांनी म्हटले आहे, "आम्हांला जेव्हा आमच्या संस्था आणि प्रथा यांचे पुनरुज्जीवन करायला लोक सांगतात तेव्हा कशाचे त्यांना पुनरुज्जीवन हवे आहे? हेच त्यांना समजत नाहीसे दिसते." असा प्रश्न टाकून रानडे यांनी गेल्या अनेक शतकांत हिंदुस्तानात झालेल्या सामाजिक प्रगतीच्या इतिहासाचे परीक्षण केले आणि ते उद्गारले: "जे एकदा मृत झाले, गाडले गेले, जळून भस्म झाले ते कायमचेच तसे झाले. आणि म्हणून जुन्या जड सामग्रीचे जर नव्या सेंद्रिय जीवात रूपांतर करणे शक्य असले तरच या मृतभूताचे पुनरुज्जीवन करता येईल." या सिद्धान्ताची सत्यता समाजसुधारकांनी सतत मनात बाळगणे अवश्य आहे.

सामाजिक समतेचे समर्थन करताना आणि तिला आपल्या समाजरचनेचे अंग बनवू पाहताना संस्था या धर्मनिरपेक्ष व केवळ सामाजिक उपयुक्ततेच्या बुद्धिवादी विचारावरच आधारलेल्या असल्या पाहिजेत, या गोष्टीवर जोर देणे अगत्याचे आहे; आणि धर्म हा ज्या अर्थाने हिंदूंमध्ये सर्वसामान्यपणे मानला जातो त्या अर्थाने धर्माला या संबंधात कोठेही हात घालू देता कामा नये. सामाजिक समता प्रत्यक्षात उतरविण्याच्या बाबतीत मुख्य व दुर्लंघ्य अडचण म्हणजे हिंदू समाजरचनेवर पगडा गाजविणाऱ्या अनेकानेक जाती–पोटजाती होत. पूर्वकाळी या जातींचे मूळ काय असेल ते असो, आज त्यांचे चालू असलेले अस्तित्व हे सामाजिक समतेला सततचे आव्हान होऊन बसले आहे यात मुळीच शंका नाही. आणि म्हणून या मुद्द्यावर खरोखर कसलीही तडजोड असूच शकत नाही. या जातीच हिंदू समाजाची आखबंद कप्प्यात विभागणी करतात, संकुचितपणाच्या भावना वाढवितात, खऱ्याखुऱ्या सामाजिक एकतेच्या वाढीला प्रतिबंध करतात, आपापल्या संकुचित घरकुलात आपल्या क्षुद्र निष्ठांची जोपासना करतात, आणि उच्चनीचतेची भावना पैदा करतात. अस्पृश्यतेचा प्रश्न जो अजून सुटलेला नाही तो या जातीपद्धतीची जी दुष्टता तिचेच एक संवर्धित रूप आहे. खऱ्या रीतीने सामाजिक समतेवर आधारलेला जातिविरहित समाज जेव्हा अस्तित्वात येईल तेव्हाच सामाजिक समतेचे ध्येय गाठले गेले असे होईल. या ध्येयाची उपासना करीत असताना समाजसुधारकांनी धर्मावर श्रद्धा न ठेवता केवळ बुद्धिवादावरच श्रद्धा ठेवली पाहिजे. आध्यात्मिक मूल्ये ही सामाजिक सुधारणेचा पाया होतील हे खरे; पण आध्यात्मिक मूल्ये आणि विपरीत स्वरूपात समजल्या गेलेल्या धर्मनियमांतून उत्पन्न झालेली उच्चनीचतेची मूल्ये यांत भेद केला पाहिजे. अशा रीतीने जे नियुक्त कार्य समाजसुधारणा सुधारकांच्यापुढे ठेवते ते अत्यंत बिकट आहे. सामाजिक विषमतेवरील निष्ठा ही बहुतांशी अज्ञानावर आधारलेली असते; अशी विषमता ही धर्मानेच घालून दिली आहे असे केवळ अज्ञानाने मानले जाते. म्हणून समाजसुधारकांनी लोकमताला शिक्षित करून लोकांच्या हे गळी उतरविले

पाहिजे की खरा हिंदुधर्म हा प्रगतिशील राहिला आहे आणि बदलत्या काळाच्या गरजांशी तो नेहमी मिळते घेत आला आहे. आणखी एका गोष्टीवर भर देऊन सांगण्याची गरज आहे, ती ही की ज्याला लोक धर्म म्हणतात त्याचा जातिविरहित समाजरचना उभारण्याच्या समस्येच्या बाबतीत काही हात नसला पाहिजे. आर्थिक समता आली तरी तिच्यामुळे सामाजिक समता येईलच असे नाही; लोक शिक्षित करून आणि कायद्यांच्या बाबतीत लोकांचे सहकार्य मिळवूनच सामाजिक विषमतेचा पाया नष्ट केला पाहिजे. आपण आता भारताच्या स्वातंत्र्ययुगात नांदत आहो, आणि आमच्या संविधानाच्या द्वारा आम्ही स्वतःपुढे कल्याणकारी राज्याचे ध्येय ठेवलेले आहे. आमच्या संविधानात सामाजिक व आर्थिक न्यायाला बहुमानाचे स्थान दिलेले आहे; आणि हा सामाजिक व आर्थिक न्याय अविलंबेकरून साधला जात आहे, हे पाहणे आमचे कर्तव्य आहे. भवितव्यतेने समाजसुधारणेच्या आंदोलनाकडे ही कामगिरी बजावण्याचे नियत कार्य सोपविले आहे, आणि समाज-सुधारकांनी आजच्या संदर्भात हाच कार्यभाग उचलण्याला तयार राहिले पाहिजे. सामाजिक न्यायाच्या मंदिराप्रत जाणारा मार्ग लांबचा आहे आणि त्या मार्गात बऱ्याच अडचणी आणि धोके आहेत. या मार्गात लोकांचे अज्ञान व जातिनिष्ठेचे पुरस्कर्ते अडथळे आणतील. परंतु सामाजिक न्यायाचे मंदिर गाठले नाही तर राजकीय स्वातंत्र्याचे प्रमुख उद्दिष्ट साधलेच नाही असे म्हणावे लागेल. सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने राजकीय स्वातंत्र्य हेच शेवटचे साध्य नाही, होऊ शकत नाही, हाच अखेरचा निष्कर्ष. सामाजिक व आर्थिक न्याय संपादन करण्याचे फक्त ते साधन आहे. हे सामाजिक न्यायाचे ध्येय प्राप्त करण्याच्या कामीच सामाजिक सुधारणेला फार मोठी कामगिरी बजावावयाची आहे. सामाजिक सुधारणेच्या चळवळीपुढे हेच खरोखर प्राप्तव्य आहे.

हे कार्य सिद्ध करण्याकरिता समाजसुधारकाने कशा रीतीने प्रयत्न केला पाहिजे ? त्याचे बिरुद काय असले पाहिजे व त्याची रीत कोणती असली पाहिजे ? या प्रश्नांच्या उत्तरांचे सूचन करताना महान समाजसुधारक गौतम बुद्ध याचेच उद्‌गार येथे उद्धृत करण्याहून मी अधिक चांगले काही सांगू शकणार नाही. बुद्ध म्हणाला, "श्रद्धा हे बीज मी पेरतो, आणि सत्कर्मे ही त्या बीजाला सुफलित करणाऱ्या पर्जन्याप्रमाणे आहेत; सुजाणपणा व विनय हे नांगराचे दोन भाग आहेत आणि माझे मन ही बैलाला वळवणारी काढणी आहे. मी (नांगराच्या) धर्मरूपी मुठीवर हात ठेवतो; उत्कटता ही पराणी मी उपयोगात आणतो; आणि उद्यम हा माझा जुंपलेला बैल आहे. अशा रीतीने नांगर चालत आहे आणि भ्रमाचे तण उपटून नष्ट होत आहे. पीक जे मिळते ते म्हणजे निर्वाणीचे अमृत फळ होय आणि या नांगरटीने सर्व दुःखाचा अंत होतो." समाजसुधारणेची चळवळ आपल्या सामाजिक समतेच्या ध्येयभूत निर्वाणाच्या शोधार्थ या मार्गाचे अनुसरण करो.

६

नवमहाराष्ट्रापुढील काही प्रश्न

नव्या महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक अशा काही समस्यांची चर्चा करण्याकरिता जो परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे त्यात भाग घेण्यास मला फार आनंद वाटतो. महाराष्ट्रापुढे उभ्या असलेल्या निकडीच्या समस्यांची स्पष्ट स्वरूपात मांडणी करणे आणि त्या समस्यांची उत्तरे शोधणे याकरिता विधायक प्रयत्न केले पाहिजेत. हे प्रयत्न करण्यासाठी सहकार्य भावनेने एकत्रित होण्याचा महाराष्ट्रातील बुद्धिमंतांचा कळकळीचा प्रयत्न या परिसंवादाने दिसून येतो. महाराष्ट्राच्या पुरोगामी विद्वानांनी राज्याला मार्गदर्शन करण्यात लक्ष घातले पाहिजे आणि सर्व समस्या व त्यांचा उकल यांची चर्चा समतोलपणे, निर्भयपणे व निरंकुशपणे केली पाहिजे, हे अत्यंत आवश्यक आहे. या परिसंवादात विचाराकरिता म्हणून काही प्रश्न मांडून त्यांची उत्तरे मी सुचवू इच्छितो, त्यात माझा उद्देश मताभिनिवेशी प्रतिपादनाच्या सुरात मार्गदर्शन करण्याचा नसून त्या प्रश्नांची चर्चा व्हावी हा आहे. आजच्या सामाजिक व आर्थिक समस्यांना यथायोग्य व परिणामकारक उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करताना आपली चर्चा जिज्ञासू वृत्तीने आणि वस्तुनिष्ठ अन्वेषणाच्या पातळीवर सुरू व्हावी ही गोष्ट सर्वाधिक महत्त्वाची आहे.

महाराष्ट्राला ज्याला तोंड द्यावे लागणार असा पहिला प्रश्न म्हणजे मुंबई व महाराष्ट्र यांची सामाजिक व भावनात्मक एकात्मता घडवून आणणे हा आहे. मुंबई हे एक मोठे विश्वकुटुंबी शहर आहे. अलिकडे झालेल्या राजकीय वादावादीत मुंबईच्या विश्वकुटुंबी स्वरूपावर भर देण्यात आला होता. त्यातील हेतू मुंबईसारखे विविध समाज असलेले शहर अलग ठेवावे हे सुचविण्याचा होता; आणि बहुतांश महाराष्ट्रीयांना या सूचनेचा राग आला होता. पण मुंबईच्या भवितव्यासंबंधीचा

राजकीय झगडा हा आता भूतकालात समाविष्ट झाला आहे आणि मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी होऊन चुकली आहे. असे असले तरीही, मुंबई हे बहुसमाजात्मक शहर आहे आणि त्याची सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक संरचना भिन्न भिन्न घटकांनी बनलेली आहे, त्यातील प्रत्येक घटक तिच्या वैभवात भर टाकणारा आहे, हे नाकबूल करण्यात अर्थ नाही. अशी मुंबई आपले मुख्य शहर आहे याचा महाराष्ट्रीयांना अभिमान वाटावा, आणि या आपल्या शहराचा बहुसमाजात्मक स्वभावधर्म कायम ठेवण्याचा त्याने बुद्धिपुरस्सर प्रयत्न करावा. श्रीशिवाजी महाराजांसारख्या आपल्या ऐतिहासिक महापुरुषाच्या काळापासून उदार दृष्टी, सहिष्णुता आणि 'जगा व जगू द्या' या तत्त्वविचारावर शाश्वत श्रद्धा ही महाराष्ट्रीय संस्कृतीची अंगभूत लक्षणे असल्याचे महाराष्ट्रीय नेहमी सांगतात. त्या संस्कृतीशी प्रामाणिक राहण्याची आणि आपल्या राजधानीचे बहुसमाजात्मक जीवन अबाधितपणे कायम राहील व महाराष्ट्राच्या अभिमानाचे ते स्थान होईल हे सिद्ध करण्याची महाराष्ट्रीयांना हीच वेळ आहे. महाराष्ट्राची आपल्या राजधानीशी भावनात्मक एकात्मता होण्याकरिता या दिशेने बुद्धिपुरस्सर व सतत प्रयत्न होणे आवश्यक आहे.

मुंबईचे बहुसमाजात्मक स्वरूप कायम ठेवण्याकरिता मुंबईत बऱ्याच संख्येने असलेले अल्पसंख्य समाज बोलत असलेल्या अनेक भाषांना त्यांची वाढ आणि विकास होण्याकरिता पूर्वीप्रमाणे संपूर्ण स्वातंत्र्य दिले जावे हे अगत्याचे आहे. महाराष्ट्रातील पुरोगामी बुद्धिमंतांना माझी अशी कळकळीची विनंती आहे की, मुंबई विद्यापीठातील विद्यापीठीय उच्च शिक्षणाच्या बाबतीत, त्याचप्रमाणे न्यायालयीन कारभाराच्या वरिष्ठ शाखांत अल्पसंख्यांकांच्या भाषांना पूर्वी जे स्थान होते तेच पुढेही राहू देण्याची गरज आपण सहर्ष व निःसंकोचपणे मान्य करणे अवश्य आहे हे त्यांनी लक्षात ठेवावे. आपल्या भाषा, संस्कृती आणि राहणीकरणी या पूर्वीप्रमाणेच टिकून राहतील, नव्हे महाराष्ट्राच्या राजधानीचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन सबंध महाराष्ट्राच्या अभिमानाचे आणि गौरवाचे स्थान होण्याच्या दृष्टीने त्याही आपली भर घालतील असा विश्वास मुंबई शहरातील भाषिक अल्पसंख्याकांच्या मनात उत्पन्न व्हावा असे वातावरण महाराष्ट्रातील विद्वानांनी उत्पन्न करावे. मुंबईतील निरनिराळ्या जातींच्या, पंथांच्या व धर्मांच्या तसेच निरनिराळ्या भाषांच्या सर्व नागरिकांच्या मनांत नव्या राज्याच्या विशाल व पुरोगामी धोरणाविषयी अभिमानाची भावना निर्माण व्हावी असा प्रयत्न या नव्या राज्याचा असावा.

दुसऱ्या बाजूने, मुंबईसारख्या मोठ्या विश्वकुटुंबी शहरानेही महाराष्ट्रराज्याची राजधानी बनण्याची आपली अर्थपूर्ण व ऐतिहासिक कामगिरी बजावण्याच्या दृष्टीने स्वतः महाराष्ट्रात मुरून जाण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न केला पाहिजे. मुंबई ही केवळ महाराष्ट्राची राजधानीच बनलेली नाही; तर सबंध महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक व

भावनात्मक एकात्मतेचे ते केंद्रस्थान बनेल असा त्याचा अल्पावकाशातच विकास झाला पाहिजे. महाराष्ट्राला ज्या सामाजिक-आर्थिक समस्यांना तोंड द्यावयाचे आहे, त्याच्या ज्या परंपरागत श्रद्धा आहेत, जी संस्कृती आहे, त्याचा वारसा, त्याच्या अडचणी, त्याच्या सामाजिक जीवनावर पडणारा ताण आणि भार आणि त्याच्या आशा-आकांक्षा या सर्वांत बहुविध समाज असलेल्या मुंबईने सक्रिय आस्था दाखविली पाहिजे. मुंबईत एकीकडे वरच्या दर्जाचे झगझगाटाचे जीवन आहे तर दुसरीकडे लक्षावधी मजूर जेथे राहातात त्या कोंदट चाळी आणि गलिच्छ वस्त्या आहेत; त्या दोघांना विभागणारी मधली भिंत नष्ट झाली पाहिजे आणि कारखानदार व मजूर, धनवान आणि निर्धन यांच्यामध्ये पूर्ण मेळ आणि सहकार्य असल्याचे युग सुरू झाले पाहिजे. कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांची बरीच मोठी संख्या महाराष्ट्राच्या निरनिराळ्या खेड्यांतून येते, त्यांना आपल्या हक्कांची पुरती जाणीव असते आणि आपल्या राज्याकडून ते सामाजिक व आर्थिक न्यायाची मागणी करतात. औद्योगिक क्षेत्रात शांतता, सुसंवाद व सहकार्य यांचा जमाना सुरू करण्याकरिता बहुसमाजात्मक मुंबईने कामगारवर्गाच्या अस्तित्वाविषयी, त्यांच्या मागण्या आणि गरजा यांच्याविषयी अधिक सहानुभूतीची जाणीव अंगी बाणविली पाहिजे. महाराष्ट्र व त्याची राजधानी यांच्या या परस्परांशी जमवून घेण्याच्या व परस्परात मुरून जाण्याच्या प्रक्रियेत मुंबईच्या बुद्धिमान वर्गाने महत्त्वाचा कार्यभाग बजावला पाहिजे. महाराष्ट्राने आपल्या राजधानीतील विशाल व्यापक होत जाणारे, सहिष्णू व उदारमतवादी वातावरण आत्मसात् केले पाहिजे, आणि मुंबईने महाराष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीसंबंधीच्या आकांक्षा आत्मसात् केल्या पाहिजेत. महाराष्ट्रातील बुद्धिमान वर्गाने जर मुंबईविषयीची महाराष्ट्राला व महाराष्ट्राविषयी मुंबईला समजूत घालून देण्यात सक्रिय भाग घेतला तर महाराष्ट्र आणि त्याची राजधानी यांच्यामध्ये भावनिक व सामाजिक एकात्मता घडून येण्याचा प्रश्न सहज सुटू शकेल यात मला शंका वाटत नाही.

महाराष्ट्रापुढे येणारा दुसरा प्रश्न विदर्भ व मराठवाडा आपल्यात भावनात्मक दृष्टीने एकरूप कसे होतील हा आहे. मराठवाड्याच्या सामाजिक व आर्थिक गरजा ऐतिहासिक कारणांमुळे फार काळपर्यंत दुर्लक्षिल्या गेलेल्या आहेत आणि आपल्या हितसंबंधांना जो अग्रक्रम मिळणे रास्त आहे तो कदाचित मिळणार नाही अशी एक आशंका मराठवाड्यातील लोकांच्या मनात असण्याचा संभव आहे. विदर्भाने आपल्या सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक व आर्थिक बाबतीत जी प्रगती गाठली आहे त्याबद्दल त्याला अभिमान आहे व तो वाजवी आहे; पण आता विलिनीकरणामुळे आपल्या सामाजिक-आर्थिक प्रगतीचे पुढे काय होईल याबद्दल त्याला आशंका वाटत असण्याचा संभव आहे. एका बाजूला विदर्भ व मराठवाडा आणि दुसऱ्या बाजूला बाकीचा महाराष्ट्र या परस्परांमध्ये

समान पूर्वपरंपरांची व सामाजिक-आर्थिक राहणीच्या समान स्वरूपाची इतकी मोठी संपत्ती आहे की त्यांच्यामध्ये भावनात्मक एकात्मता होण्याच्या बाबतीत कसलीही अडचण भासू नये. हा प्रश्न फारसा राजकीय नसून मानसिक आहे, हा मानवी संबंधांचा प्रश्न आहे, आणि तो सोडविण्याचे आव्हान स्वीकारताना आमच्या सर्व सार्वजनिक कार्यकर्त्यांनी तसेच राज्यकारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांनी व्यवहार-चातुर्य, समजूतदारपणा व कल्पनाशक्ती दाखविली पाहिजे. तुम्ही काय करता याला तितके महत्त्व नाही जितके ते तुम्ही कशा रीतीने करता याला आहे. कारभारात ––तो मग अमलबजावणीचा असो की न्यायशाखेचा असो त्यात––एकसारखेपणा आणण्याची तडफ बाळगताना निरनिराळ्या प्रदेशांतील पूर्वीपासून चालत आलेल्या परंपरा आणि काम करण्याच्या रीतीभाती यांची कदर करण्याचीही गरज ओळखली जावी. याही एकात्मतेच्या प्रश्नासंबंधात बुद्धिमंतांना निर्णायक भाग बजावता येण्यासारखा आहे.

महाराष्ट्र अशा रीतीने आपल्या सर्व विभागांची भावनात्मक एकात्मता घडवून आणण्याच्या प्रश्नाला तोंड देत असताना आपण सर्वांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की महाराष्ट्राच्या नव्या राज्याचा जन्म म्हणजे नव्या राष्ट्राचा जन्म नव्हे, तर भारतीय संघराज्याच्या एका नव्या एकभाषीय घटकराज्याचा जन्म होय. हे नवे राज्य जन्माला आल्याने जिकडेतिकडे भावनोद्रेकाची, हर्षोन्मादाच्या सीमेपर्यंत जाणारी एक लाट उसळल्यासारखी दिसत आहे. प्रत्येक प्रदेशाला स्वतःचा इतिहास, स्वतःची संस्कृती, आणि स्वतःची परंपरा असल्यामुळे आपापली प्रदेशनिष्ठा असते ही गोष्ट दृष्टिआड करणे अयुक्त व व्यर्थ होईल हे खरे; परंतु आपण हे सतत लक्षात बाळगू या की सबंध राष्ट्रापुढे आज उभी असलेली मुख्य समस्या, या प्रादेशिक निष्ठांचा भारतदेशाच्या सर्वोच्च निष्ठेशी योग्य रीतीने मेळ घालणे ही आहे. प्रदेशनिष्ठा काढून टाकता येणार नाहीत––टाकण्याचे कारणही नाही, परंतु मुख्य निष्ठा जी भारतनिष्ठा तिच्या अधीन त्यांना केले पाहिजे, हे निःसंशय. म्हणून, नव्या राज्याच्या निर्मितीतून निष्पन्न झालेल्या आव्हानाला महाराष्ट्र तोंड देत असताना आणि आपल्या सर्व घटकप्रदेशांची भावनात्मक एकात्मता अल्पकालात घडवून आणीत असतानाच, महाराष्ट्राच्या बुद्धिमान वर्गाने महाराष्ट्रातील सर्व जनतेपुढे, आपल्या प्रादेशिक निष्ठेचा सबंध देशाच्या निष्ठेशी मेळ घालावयाचा आहे, ही गोष्ट सतत ठेवीत राहिले पाहिजे. भावनात्मक एकात्मतेच्या सर्वसामान्य प्रश्नात त्या प्रश्नाच्या या पैलूला महत्त्वाचे स्थान आहे.

महाराष्ट्राला सोडवावयाचा दुसरा एक प्रश्न आहे तो भारतातल्या सर्व राज्यांना समान असा आहे. तो प्रश्न म्हणजे जातींचा व त्यांतून अपरिहार्यपणे उत्पन्न होणाऱ्या जातिवादी भावनेचा; हा प्रश्न म्हणजे जातीय निष्ठा, जातीय दबाव व जातीय संघर्ष यांचा आहे. हा प्रश्न सोडविताना त्याचे गैरवाजवी महत्त्वही

मानू नये, तसे त्याचे अस्तित्व दुर्लक्षूही नये हे शहाणपणाचे होईल. या प्रश्नाचे मूळ कारण सामाजिक विषमतेत आहे आणि ते हिंदू समाजव्यवस्थेचे अत्यंत गर्हणीय असे अंग आहे. जातींचे अस्तित्व आणि त्यातून हटकून उत्पन्न होणाऱ्या संकुचित निष्ठा हे लोकशाहीला नित्याचे आव्हान आहे आणि लोकशाही ज्याच्याकरिता आहे त्या सामाजिक-आर्थिक न्यायाला तो नित्याचा धोका आहे. दुर्दैव असे की हिंदुस्तानात झालेल्या ज्या क्रांतीने राजकीय मिळविले तिचे लक्ष्य केवळ राजकीय स्वातंत्र्याची प्राप्ती एवढेच राहिले. राजकीय स्वातंत्र्य संपादण्याकरिता झगडणाऱ्या सैनिकांत ऐक्यभावना असली पाहिजे आणि अशी ऐक्यभावना सामाजिक-आर्थिक प्रश्नांच्या आव्हानापुढे टिकू शकली नसती; हा विचार त्यामागे होता आणि तो बरोबरही असेल. म्हणूनच 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवीनच' या तत्त्वाच्या प्रसाराकरिता ज्यांनी आपले रक्त ओतले ते टिळक सामाजिक वाद उकरून काढण्याला व समाजसुधारणेचा उपदेश करण्याला फारसे उत्सुक नव्हते. भारताचे राष्ट्रपिता म्हणून ज्यांना वाजवीरीत्या मानले जाते त्या गांधीजींनी अस्पृश्यता नष्ट करण्याकरिता इतिहासात नमूद होईल असा प्रयत्न केला आणि राजकीय लढ्याच्या आपल्या कार्यक्रमात त्या बाबीला बहुमानाचे स्थान दिले, हे खरे; पण गांधीजींचा अस्पृश्यतेला विरोध हा मानवतेच्या भूमिकेवरून होता, कारण त्यांनी उघडपणे सांगितले होते की वर्णाश्रमाहून भिन्न अशी जातिव्यवस्था असली तरी मी तिला धिक्कारणीय किंवा दुष्ट व्यवस्था मानीत नाही. "असे माझे मत असल्यामुळे, अस्पृश्यता ही वर्णाश्रमधर्माचा नाश झाल्यावाचून नाहीशी होणार नाही असे मानणारे डॉ. आंबेडकरांसारखे जे नामवंत देशबांधव आहेत त्यांच्यापेक्षा माझे मत नेहमीच भिन्न राहिले आहे" असे गांधीजींनी म्हटले आहे. याचा परिणाम असा झाला की राजकीय स्वातंत्र्याकरिता झगडणाऱ्या शूर योद्ध्यांत असेही अनेक देशभक्त होते की, ज्यांचा सामाजिक समतेच्या सिद्धान्ताला मनापासून पाठिंबा नव्हता आणि म्हणून, राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुद्धा सामाजिक समतेचा अभाव तसाच टिकून आहे आणि त्याने लोकशाहीच्या वाढीला व प्रगतीला गंभीर धोका उत्पन्न केला आहे.

तथापि, महाराष्ट्रात असे क्रांतिकारक निर्माण झाले की ज्यांचा राजकीय स्वातंत्र्याइतकाच सामाजिक-आर्थिक समतेवर विश्वास होता. ज्या ज्योतिबा फुल्यांच्या स्मृतीची लक्षावधी महाराष्ट्रीय पूजा करतात त्यांना राजकीय स्वातंत्र्याचा आशय काय याचे बरोबर दर्शन होते. त्यांनी राजकीय स्वातंत्र्याच्या आवश्यकतेची शिकवण धर्मभावनेच्या हिरीरीने दिली आणि त्याच हिरीरीने सामाजिक समतेच्या आवश्यकतेचा आग्रह धरला. आगरकरांनी त्याच व्यापक दृष्टिकोनातून समाजाच्या पुनर्रचनेच्या प्रश्नावर हल्ला चढविला. सर्व सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्नांवर चढाई करताना त्यांनी शास्त्रीय व बुद्धिवादी दृष्टिकोन स्वीकारण्याची आवश्यकता

कठोर तर्कवादाने व जोरदार भाषेत प्रतिपादिली, आणि सिद्धपुरुषाच्या भविष्यवाणीने सांगितले की राजकीय स्वातंत्र्याबरोबरच बुद्धिवादी भूमिकेवर आधारलेली सामाजिक-आर्थिक पुनर्रचना जर झाली तरच या देशाचे भवितव्य महान् होईल. राजकीय क्रांतिकारकांच्या पराक्रमांनी राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे आणि या देशात आता लोकशाहीच्या युगाला सुरवात झाली आहे; परंतु सामाजिक समतेचा प्रश्न सोडवावयाचा अजून तसाच राहिला आहे.

या प्रश्नाची सोडवणूक शिक्षणाच्या प्रसाराने व सामाजिक मूल्यांच्या योग्य जाणिवेनेच होणे शक्य आहे. या संबंधात पुरोगामी बुद्धिमंतांना अत्यंत महत्त्वाचा कार्यभाग पार पाडावयाचा आहे. महाराष्ट्रातील बहुजनसमाजाचा महाराष्ट्राच्या सामाजिक व सामुदायिक जीवनात सामाजिक समता स्थापन व्हावी असा आग्रह आहे आणि ते स्वाभाविक आहे. सामाजिक तणातणीचे हेच प्रमुख उगमस्थान आहे. या तणातणीचे दुसरे उगमस्थान म्हणजे हरिजनांची दंड थोपटून उभे राहाण्याची इच्छा; डॉ. आंबेडकरांच्या स्फूर्तिदायक नेतृत्वाखाली त्यांना आपल्या मानव म्हणून असलेल्या प्रतिष्ठेची व या देशाचे नागरिक म्हणून असलेल्या हक्कांची पूर्ण जाणीव आलेली आहे. नवबौद्धांनी पुढे टाकलेल्या प्रश्नांना महाराष्ट्रातील बहुतेक सर्व खेड्यांत तोंड द्यावे लागणार आहे. राजकीय स्वातंत्र्य मिळून तेरा वर्षे होऊन गेली तरी हरिजनांना सर्वत्र गावांच्या व लहान लहान शहरांच्या बाहेर राहावे लागत आहे आणि अजून त्यांना देशाच्या सामाजिक जीवनात त्यांचे वाजवी असे स्थान दिले जावयाचेच आहे हे आपण विसरता कामा नये. पुढारलेल्या जमातींविरुद्ध बहुजनसमाज, त्याचप्रमाणे बहुजनसमाज विरुद्ध हरिजन हे प्रश्न पुरोगामी बुद्धिमंतांनी सामाजिक समतेच्या तत्त्वाचा प्रसार करून ते लोकप्रिय करण्याकरिता केलेल्या अखंड प्रयत्नांनीच सुटणे शक्य आहे. सामाजिक विषमतेचा प्रश्न हा अत्यंत निकडीचा प्रश्न आहे, आणि जे बुद्धिमंत कोणत्याही राजकीय पक्षात नाहीत त्यांनी, त्याचप्रमाणे सर्व राजकीय पक्षांच्या सभासदांनी एका समान व्यासपीठावर येऊन आपल्या सर्व शक्तिनिशी या प्रश्नाचा मुकाबला केला पाहिजे. या प्रश्नाचा मुकाबला करताना मतभेदाला किंवा दृष्टिकोनाच्या भेदाला मुळीच वाव असू शकत नाही. या प्रश्नाने पुढे टाकलेल्या आव्हानाला जर प्रभावीपणे तोंड दिले तरच जातीय दबावाची व संघर्षाची सर्व भये नाहीशी होतील आणि सार्वजनिक जीवनातील मतभेद हे केवळ राजकीय-आर्थिक मतप्रणालींच्या वरच आधारलेले राहतील. वर्तमान हा भूतकाळाचा गोषवारा आणि भविष्याचे भाकित आहे असे म्हटले जाते. जर महाराष्ट्राच्या नव्या राज्याची पुनर्घटना करताना 'आज' हा 'काल'शी झगडण्यात गुंतला तर 'उद्या' हातचा निघून जाईल. म्हणून आपण गतकालातील चुका व गफलती विसरून जाऊ या; गतकालात जे मंगल होते, उदात्त होते, स्फूर्तिप्रद होते त्याविषयी आदरभाव वाढवू

या, आणि भविष्यकाळीं अधिक मंगल, अधिक उदात्त व अधिक स्फूर्तिदायक प्राप्तव्याकरिता साहसाची वृत्ती अंगी बाणवू या.

महाराष्ट्र आता सामाजिक व आर्थिक न्याय शोधण्याच्या धर्मयात्रेला निघाला आहे. या शोधाचा हेतू रानड्यांनी बहारदार शब्दांत वर्णिला आहे. रानडे म्हणतात, "ज्या बदलाची आपण इच्छा धरावी तो बदल म्हणजे जेथे नियंत्रण आहे तेथे स्वातंत्र्य, भोळसटपणा आहे तेथे श्रद्धा, दर्जाच्या जागी परस्पर संमती, हुकुमीपणाच्या ऐवजी बुद्धिवाद, असंघटित जीवन आहे तेथे संघटित जीवन, मतांधता आहे तेथे मतसहिष्णुता, अंध सामंतशाही आहे तेथे मानवी प्रतिष्ठेची जाणीव, येणे हा होय."

आधुनिक लोकशाहीच्या राज्यात कायदा निःसंशय गतिशील असतो. तो सामाजिक व आर्थिक विषमता दूर करण्याच्या कामी मदत करू शकतो, बऱ्याच वेळा करतो आणि त्याने केलीही पाहिजे. पंचवार्षिक योजनांचा इतिहास पाहिला तर राज्याच्या आर्थिक प्रगतीला कायद्याच्या प्रक्रियेने चांगल्या परिणामकारक रीतीने मदत होऊ शकते असे दिसून येते; परंतु सामाजिक समता संपादन करण्याच्या कामी निवळ कायदा काहीही करू शकणार नाही. कायद्याच्या प्रक्रियेने अस्पृश्यता घालविली गेली आहे, पण समाजाच्या प्रत्यक्ष जीवनात ती अजून तशीच जिवंत आहे; आणि म्हणून कायदा जर सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या बाबतीत यशस्वी व्हावयाचा झाला तर लोकांचे ज्ञानयुक्त व उत्स्फूर्त सहकार्य अवश्य आहे. या मोहिमेत समाजाच्या जागृत मनोदेवतेनेच निर्णायक कामगिरी केली पाहिजे आणि येथेच पुरोगामी बुद्धिमंतांचा संबंध येतो. लोकांना त्यांच्या स्थिर सनातनी समजुतींच्या कुंभकर्णी निद्रेतून जागृत करणे ही एक दीर्घसूत्री व मंद क्रिया आहे, पण आपल्याला नव्या महाराष्ट्र राज्यात जर सामाजिक समतेचा नवा मनू आणावयाचा असेल तर ती सुरू करणे अपरिहार्य आहे. या देशाच्या संविधानात सामाजिक व आर्थिक समानतेला मानाचे स्थान देण्यात आले आहे आणि त्याने आमच्यापुढे कल्याणकारी राज्याचा आदर्श ठेवला आहे. यथातथ्य समजलेल्या समाजवादाचे अनुशीलन करण्यात आमच्या सामाजिक-आर्थिक प्रश्नांचा उलगडा आहे याविषयी मला शंका नाही. या संबंधात मी आपल्या अनुज्ञेने समाजवादाचे हिंदुस्तानातील महान् द्रष्टे पंडित नेहरू यांचे प्रमाणवचन येथे उद्धृत करतो. ते म्हणतात, "जगाच्या प्रश्नांवर आणि हिंदुस्तानच्या प्रश्नांवर तोडगा समाजवाद हाच आहे याविषयी माझी खात्री झाली आहे, आणि मी हा शब्द वापरतो तो संदिग्ध अशा मानवतेच्या अर्थाने नव्हे तर शास्त्रीय आर्थिक अर्थाने वापरतो. तथापि समाजवादाची व्याप्ती आर्थिक सिद्धांताहून काही विशेष आहे. तो जीवनाचे एक दर्शन आहे, आणि त्या अर्थानेसुद्धा मला त्याचे आकर्षण आहे." मला वाटते की या तत्त्वदर्शनातील भाव हाच देशातील सामाजिक-आर्थिक विषमता समूळ नष्ट करण्याचा प्रभावी मार्ग आहे.

नव्याने जन्माला आलेल्या महाराष्ट्राने आर्थिक प्रगतीचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेण्यावाचून गत्यंतर नाही. आणि तो सर्व ग्रामीण भागात पसरलेल्या सहकारी प्रयत्नानेच सिद्धीस जाईल. या भागातील सर्वसामान्य स्त्री-पुरुषांचे सहकार्य या कामी जोडले जाईल. महाराष्ट्राच्या आर्थिक वाढीतून आणि समृद्धीतून खेड्यांचा तोंडवळाच पालटेल आणि महाराष्ट्र भारत देशाच्या घटकावयवांमध्ये प्रभावाचे व प्रतिष्ठेचे आपले वाजवी स्थान प्राप्त करून घेईल. महाराष्ट्राची भूमी समाजवादाची हाक उचलून धरण्याला अधिक अनुकूल होईल, कारण त्याचा इतिहास, त्याची संस्कृती, त्याच्या परंपरा व त्याचे तत्त्वज्ञानच तसे आहे; आणि कल्याणकारी राज्यस्थापनेच्या शर्यतीत महाराष्ट्र हा भारताच्या घटकावयव स्पर्धक राज्यबंधूंच्या मध्ये बहुमानाचे स्थान पटकावील अशी आशा व विश्वास बाळगण्याचे मी धाडस करतो. तरीही महान् क्रांतिकारक ल्यूथर देशाच्या खऱ्या संपत्तीसंबंधी जे म्हणाला ते आपण विसरता कामा नये. तो म्हणाला, "एखाद्या देशाची समृद्धी त्याच्यापाशी असलेल्या उदंड साधनसामुग्रीवर अवलंबून नसते, ती त्याच्या गड-किल्ल्यांच्या मजबुतीवर किंवा त्याच्या सार्वजनिक इमल्यांच्या देखणेपणावरही अवलंबून नसते; ती अवलंबून असते ती त्याच्यात सुसंस्कृत नागरिक किती आहेत, सुशिक्षित, ज्ञानी व चारित्र्यसंपन्न माणसे किती आहेत यावर. यातच त्या देशाचे खरे हित, त्याची खरी मजबुती, त्याची खरी सत्ता आढळून येत असते."

शेवटी, या परिसंवादाने परिकल्पिलेल्या महाराष्ट्रातील पुरोगामी बुद्धिमंतांच्या सहकारयुक्त प्रयत्नातून महाराष्ट्राला त्याचे खरे हित, त्याची खरी मजबुती आणि त्याची खरी सत्ता त्याच्या ज्ञानी, सुसंस्कृत व पुरोगामी नागरिकांच्या रूपाने मिळण्याला मदत व्हावी असे मी प्रार्थितो.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
क्रमांक ..... दि: .....
वर्ग ..... कॉ दि .....

खंड दुसरा

लोकसत्ताक भारताची वाटचाल

अनुक्रम

१ मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये

[ऑल इंडिया रिपोर्टर लि०, नागपूर, या संस्थेने केलेल्या स्वागताला उत्तरादाखल केलेले भाषण. नागपूर, ११ फेब्रुवारी १९६१. निवडक अंशाचा मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

२ कल्याणकारी राज्यातील न्यायव्यवस्था

['भारतीय सार्वजनिक प्रशासन विद्यालय' (Indian School of Public Administration) या संस्थेच्या दीक्षान्त समारंभाच्या अध्यक्षपदावरून केलेले भाषण. नवी दिल्ली, १५ जुलै १९६३. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

३ कल्याणकारी राज्यात सामाजिक प्रशासकाची भूमिका

['भारत आंतरराष्ट्रीय केंद्र' (India International Centre) या संस्थेने इतर संस्थांच्या सहभागित्वाने संघटित केलेल्या "विकासमार्गावरील देशांतील सामाजिक प्रशासन" या विषयावरील चर्चासत्राच्या उद्घाटनाचे भाषण. नवी दिल्ली, १६ मार्च १९६४. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

४ भारतीय लोकशाहीच्या आधारभूत संकल्पना

[कर्नाटक विद्यापीठाच्या वार्षिक दीक्षान्त समारंभाचे मुख्य वक्ते म्हणून केलेले भाषण. धारवाड, ६ नोव्हेंबर १९६५. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

५ ऐहिकतावाद आणि भारतीय समाज

['भारतीय विधि संस्था' (Indian Law Institute) या संस्थेतर्फे "भारतातील कायदा आणि जीवन यांच्या संदर्भात ऐहिकतावाद" या विषयावरील चर्चासत्राच्या उद्घाटनाचे भाषण. नवी दिल्ली, १ नोव्हेंबर १९६५. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

६ भारतीय संविधान आणि ऐहिकतावाद (धर्मनिरपेक्षता)

[राजस्थान विद्यापीठाच्या अठराव्या वार्षिक दीक्षान्त समारंभाचे मुख्य वक्ते म्हणून केलेले भाषण. विषय : "भारताच्या संविधानाला अभिप्रेत असलेला ऐहिकतावाद". जयपूर, १८ डिसेंबर १९६५. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

१

मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये

कदाचित कोणाला माझे विधान थोडे अतिरेकीपणाचे वाटेल, परंतु ही गोष्ट निश्चितच खरी आहे की, विधि-नियमांची अधिसत्ता सुप्रतिष्ठित होण्यावरच लोकशाहीचे भवितव्य अवलंबून आहे. ही अधिसत्ता किंवा 'कायद्याचे राज्य' टिकल्यासच लोकशाहीची भरभराट होईल. लोकसत्ताक राज्यपद्धतीत बुद्धिमान व सुसंस्कृत लोक-प्रतिनिधीच्च विधानसभेचे सभासद असावयास पाहिजेत; कार्यकुशल व न्यायी असा शासकवर्ग पाहिजे आणि निःपक्षपाती व निर्भय न्यायदान मंडळ पाहिजे, हे उघड आहे. न्यायाधीश निर्भीड वृत्तीचे पाहिजेत. अधिकारग्रहणसमयी त्यांनी घेतलेल्या शपथेनुसार त्यांनी समतोलबुद्धीने, न्याय्य वृत्तीने, आणि निर्भयतेने आपले न्यायदानाचे कार्य केले पाहिजे.

लोकशाही जीवनक्रमाचे व्यक्तिस्वातंत्र्य हे मुख्य सार आहे, आणि आपल्या घटनेने नागरिकांच्या मूलभूत हक्कांसंबंधी ज्या तरतुदी केलेल्या आहेत, त्यात या व्यक्तिस्वातंत्र्याची हमी घेतलेली आहे. तसेच या देशाच्या नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करून व्यक्तिस्वातंत्र्याची बूज राखण्याचे पवित्र कार्य घटनेने न्यायदानमंडळावर सोपविलेले आहे.

नागरिकांच्या किंवा व्यक्तीच्या मूलभूत अगर जन्मसिद्ध हक्कांच्या संरक्षणाचा प्रश्न जेव्हा चर्चेसाठी किंवा निर्णयासाठी पुढे येतो, तेव्हा जणू काही न्यायदान मंडळ आणि राज्यशासन यांच्यात एक संततचा संघर्ष आहे असेच मानण्यात येते. परंतु ही समजूत सर्वस्वी खरी नाही. विधिमंडळाचे सभासद जेव्हा एखादा अधिनियम पास करतात, तेव्हा त्यांच्या मते तो न्याय्य व योग्यच असतो; तसेच शासनसुद्धा आपली कृती न्यायशील व समर्थनीय आहे असे समजून चालते; परंतु नागरिकांना असे वाटते की शासनाची कृती किंवा तथाकथित विपरीत अधिनियम आपल्या

मूलभूत हक्कांवर गदा आणीत आहे आणि म्हणून ते आपले गाऱ्हाणे न्यायासनासमोर आणतात, न्यायासन कित्येक वेळा कायदेमंडळाने स्वीकृत केलेले अधिनियम अथवा कार्यकारी मंडळाने केलेली कार्यवाही रद्द करते, कारण की त्यामुळे नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर अतिक्रमण होत असते. यामुळे लोकांचा असा साहजिक समज होतो की, कार्यकारी मंडळ व न्यायदान मंडळ यांच्यांत द्वंद्व अगर विरोध आहे. परंतु आपण जर या बाबतीतील परिस्थितीचे थोडे विश्लेषण केले तर असे ध्यानात येईल की, विरोध वा वाद उत्पन्न होण्याचे कारण विधिमंडळाने जाणून बुजून घटनेचा अवमान केला किंवा शासनाने स्वखुषीने नागरिकांच्या हक्कांची पायमल्ली केली, हे नसते; वाद उत्पन्न होतो तो अनेक प्रकरणांमध्ये निर्णयांच्या प्रमादांमुळे किंवा काही बाबतीत प्रामाणिक मतविरोधामुळे. परंतु जेव्हा विधिमंडळ अगर राज्यकारभार यांच्या एखाद्या नियमाची घटनात्मक बाजू विचारासाठी समोर येते तेव्हा न्यायासनाचा निर्णय हा अखेरचा शब्द मानला गेला पाहिजे आणि न्यायासनानेही समतोलपणे, निर्भीडपणे आणि वस्तुनिष्ठ दृष्टीने, वादविषय झालेल्या अधिनियमाच्या वैधानिकतेसंबंधी आपला निर्णय दिला पाहिजे. यासाठीच लोकसत्ताक राज्यात शासनसंस्थेचे तीन स्वतंत्र भाग असतात. विधानमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ हे ते तीन अवयव. हे तीन्ही निरनिराळी कामे करीत असतात. आणि जेव्हा न्यायमंडळ शासनाची अगर विधानमंडळाची चूक दुरुस्त करते तेव्हा त्यांच्यांत संघर्ष अगर कलह आहे अशातला भाग नसतो; तर तसे करताना ते आपले न्याय्य कर्तव्य पार पाडीत असते. प्रत्येक भाग आपले कार्य आपल्या कर्तव्यसीमेत राहून व आपल्या सर्व योग्यतेनिशी पार पाडीत असतो.

आपण नागरिकांच्या मूलभूत हक्कांची जेव्हा चर्चा करतो तेव्हा आपल्याला काय म्हणायचे असते? व्यक्तिस्वातंत्र्य, भाषण अगर उच्चारस्वातंत्र्य, खाजगी मालमत्तेचा हक्क, संचारस्वातंत्र्य, संघ स्वातंत्र्य, आणि सेवास्वातंत्र्य यांची जपणूक करण्यासाठीच मूलभूत हक्क नागरिकांना दिलेले असतात. घटनेच्या १९ व्या कलमात या स्वातंत्र्यांचा गौरवाने उल्लेख केलेला आहे. आज आपण घटना स्वीकृत करून दहा वर्षे झालेली आहेत. परंतु मला असा कधी कधी प्रश्न पडतो की, आपला देश फक्त मूलभूत हक्कांवरच तर फार जोर देत नाही ना?

आपल्या मूलभूत हक्कांची अमलबजावणी करावयाची झाल्यास आपण आपली मूलभूत कर्तव्ये काय आहेत याचा विचार केला पाहिजे. आणि याच संदर्भात न्यायासनांना फार महत्त्वाचे कार्य करावयाचे आहे. आपण जर आपल्या मूलभूत हक्कांचाच घोशा चालवला अगर घोळ घातला व केवळ आपली मूलभूत कर्तव्ये घटनेमध्ये नमूद केलेली नाहीत म्हणून आपण जर त्यांची हेळसांड केली तर लोकशाही धोक्यात आल्याशिवाय राहाणार नाही. लोकशाहीने आज एक आव्हान स्वीकारलेले आहे. जोपर्यंत आपल्या देशातील दूरदूरच्या खेड्यापाड्यात व लहान

गावात पसरलेल्या कोट्यवधी लोकांच्या भुकेचा प्रश्न सुटत नाही आणि लोकसत्तात्मक मार्गाने तो सुटेल असे जोपर्यंत त्यांना वाटत नाही तोपर्यंत लोकशाही जीवनक्रमाचे साफल्य सिद्ध होणार नाही. म्हणूनच मला असे वाटते की न्यायमंडळाने जसे नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे दृढतेने, निर्भयतेने व सातत्याने संरक्षण केले पाहिजे तसेच न्यायाधीश, विधिज्ञ व नागरिक या सर्वांनी भारताच्या इतिहासात आज कायदा जी गतिमान महान भूमिका पार पाडीत आहे व पुढेही पार पाडणार आहे तिचा विसर पडू देता कामा नये.

आमची विधिमंडळे अनेक अधिनियम पास करून काय मिळवीत आहेत? आमच्या राजकीय स्वातंत्र्याला अभिप्रेत असा जो सामाजिक व आर्थिक समतेचा आशय आहे त्याला आकार देण्याचा व तो प्रत्यक्षात आणण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. स्वातंत्र्याला जर काही अर्थ असेल तर तो त्याच्या राजकीय बाजूच्या जोडीला सामाजिक व आर्थिक आशय असल्यामुळेच आला आहे. आपल्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्यात आमच्या विधानमंडळांनी चांगले अधिनियम स्वीकृत करून मदत केली पाहिजे. कायद्याच्या या गतिमान स्वरूपाचे मर्म न्यायाधीश, विधिज्ञ व नागरिक या सर्वांनी जाणले पाहिजे. मूलभूत हक्कांसंबंधीच्या साऱ्या विवाद्य विषयांत, विधि-नियमांच्या सामाजिक व आर्थिक बाजूंचे नीट स्मरण ठेवले तरच योग्य निर्णय घेता येईल. कल्याणकारी राज्याच्या स्थापनेच्या मार्गात राष्ट्राला कायदा अगर नियम यांचे फार साहाय्य होते.

उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालय नेहमीच स्वतंत्रपणे, समतोलपणे आणि निर्भयतेने त्यांच्यासमोर आलेल्या निवाड्याचे परीक्षण करतात, व तसेच त्यांनी केले पाहिजे. न्यायमंडळाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची ती नेहेमीच आपल्या पूर्ण शक्तिबुद्धिनुसार काळजी घेतात. परंतु मला हे सत्य सांगावेसे वाटते की, देशाच्या प्रगतीसाठी मूलभूत हक्कांबरोबरच मूलभूत कर्तव्यांचीही जाणीव ठेवली पाहिजे. घटनेमध्ये मूलभूत कर्तव्यांचे खास विवेचन केलेले नाही परंतु ती कर्तव्ये लोकशाही जीवनक्रमात अंतर्भूत आहेत. मूलभूत हक्कांवर नेहेमी जोर देणे आणि मूलभूत कर्तव्यांचे विस्मरण होणे याचा शेवट मला वाटते की, काही काळानंतर मूलभूत हक्कांची पायमल्ली होण्यातच होईल. न्यायासनांकडून आम जनतेला जर कोणता संदेश मिळावयाचा असेल तर तो हा की, मूलभूत हक्कांची जाणीव ठेवा परंतु कर्तव्यांचे विस्मरण होऊ देऊ नका; मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्यांमुळे होणारे समाजहित, यांचे संश्लेषण अगर सुसंवाद यानेच आपल्या देशाचे भले होईल आणि आपण कल्याणकारी राज्याच्या स्थापनेस साहाय्य करू शकू. त्याबरोबरच आपण हे विसरता कामा नये की, जितक्या शीघ्र गतीने आपण कल्याणकारी राज्याचे ध्येय गाठू तितकेच आपल्या देशातील लोकशाहीचे भवितव्य उज्ज्वल होईल.

२

कल्याणकारी राज्यातील न्यायव्यवस्था

या वर्षी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदवीदान करण्याचा 'भारतीय सार्वजनिक प्रशासन विद्यालया' तर्फे जो समारंभ आयोजित करण्यात आला आहे त्यात सहभागी होण्यात मला फार संतोष वाटत आहे. या संस्थेचे कार्य देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे व मार्गदर्शक आहे. आणि म्हणून या समारंभात भाग घेण्यामध्ये मला विशेष संतोष होत आहे.

लोकशाही कल्याणकारी राज्यात प्रशासनाचे महत्त्व अतोनात असते. तेव्हा अशा राज्यात प्रशासनाचे विहित कार्य कोणते असते या व एतत्संबंधी विषयांवर मी आज चार शब्द बोललो तर ते अनुचित ठरणार नाही असे वाटते.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला देश राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झाला. आधुनिक भारताच्या इतिहासात या दिवसाची नोंद एक युगप्रवर्तक दिन म्हणूनच करावी लागेल. पुढे आपल्या देशाला २६ जानेवारी १९५० रोजी संविधान (राज्यघटना) मिळाले, तेव्हा राजकीय स्वातंत्र्याचा जो सामाजिक व आर्थिक आशय आहे त्यावर भर देण्यात आला. आणि देशासमोर कल्याणकारी राज्यव्यवस्थेचे ध्येय मांडण्यात आले. त्यामुळे २६ जानेवारी १९५० हा दिवस १५ ऑगस्ट १९४७ पेक्षा अधिक मोलाचा व महत्त्वाचा मानावा लागेल. त्याला अग्रहक्क द्यावा लागेल. कल्याणकारी राज्याची संकल्पना देशाने एकदा मान्य केली म्हणजे प्रशासनाची कार्यकक्षा आणि जबाबदाऱ्या यांच्या कल्पनेतही बदल होणे आवश्यक ठरते. प्रशासनाचे विहित कार्य कोणते याचा विचार आपण ह्या संदर्भातच केला पाहिजे.

कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचा उद्भव

पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस रशियामध्ये साम्यवाद अवतरला. दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीपर्यंत मुसोलिनीच्या नेतृत्वाखाली इटलीत आणि हिटलरच्या

अधिपत्याखाली जर्मनीत फॅसिझमचा संचार झाला. या दोन्ही शासनपद्धती म्हणजे लोकशाहीला आव्हान होते. या आव्हानाला तोंड द्यावयाचे म्हणजे कल्याणकारी राज्यव्यवस्थेच्या कल्पनेला जवळ करणे आवश्यक होते. दुसऱ्या महायुद्धात इंग्लंडला फार वाईट अशा काळातून जावे लागले. त्यावेळी म्हणजे १९४१ साली तेथे सामाजिक सुरक्षितता व इतर सामाजिक सेवा यांचा सर्वस्पर्शी विचार करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. लॉर्ड बेव्हरिज त्या समितीचे अध्यक्ष होते. १९४२ साली सदर समितीने आपला रिपोर्ट दाखल केला. एकतंत्री हुकूमशाहीने लोकशाहीला जे आव्हान दिले आहे त्या आव्हानाचा मुकाबला करण्यासाठी लोकशाही जीवनपद्धती आणि कल्याणकारी राज्यव्यवस्था ह्या तोडग्याचा आश्रय घेतला पाहिजे, अशी सावधगिरीची जाणीव त्या समितीने दिली. दुर्भिक्ष, रोगराई, अज्ञान, अस्वच्छता आणि आलस्य या पाच दुष्ट दैत्यांशी समर्थपणे झगडले पाहिजे, असे आवाहन त्या समितीने केले.[1] इंग्लंडला केवळ युद्धच जिंकावयाचे नव्हते तर शांतीही संपादन करावयाची होती. ही शांती संपादन करावयाची म्हणजे लोकशाहीने साम्यवादाचे आणि फॅसिझमचे आव्हान स्वीकारणे अवश्य होते. अर्थात लोकशाहीच्या पद्धतीने देखील आर्थिक सामाजिक कल्याण परिणामकारक रीतीने साध्य होईल आणि व्यक्तिस्वातंत्र्याचाही पूर्ण मान राखला जाईल हे शाबीत करून दाखविले पाहिजे.

कल्याणकारी राज्याच्या कल्पनेबरोबरच शासनाच्या कारभारासंबंधीच्या कल्पनाही बदलल्या. शासनाचा कारभार स्थिरस्वरूपी असावा ही कल्पना गेली. त्याऐवजी शासनाचे कार्य गतिशील असले पाहिजे हा विचार पुढे आला. कायद्याच्या अधिराज्याची कल्पनाही मान्य करण्यात आली. परिणामी शासनाची म्हणून पाच कर्तव्ये सांगण्यात आली. शासनाने रक्षणाचे काम केले पाहिजे. त्याचबरोबर शासनाने सामाजिक सेवांचे निर्वाहकही बनले पाहिजे. तिसरे आद्यौगिक व्यवस्थापकाचेही काम केले पाहिजे, चौथे आर्थिक नियंत्रणाकडेही लक्ष दिले पाहिजे; आणि अखेर त्याने लवादाचीही भूमिका योग्य रीतीने वठविली पाहिजे. हीच ती पाच कर्तव्ये होत. आज चालू असलेल्या सामाजिक आणि आर्थिक संघर्षाकडे शासन निष्क्रीय प्रेक्षकाच्या भूमिकेतून पाहू शकत नाही. त्या संघर्षाच्या मध्ये पडून आर्थिक समता स्थापन करण्यासाठी सुनियमित रीतीने जोराचे प्रयत्न करीत राहणे शासनाला आवश्यक झाले आहे. कल्याणकारी ध्येयधोरणांच्या पूर्तीसाठी लोकशाही राज्य अर्थातच कायद्यांवर विसंबून असते. आणि यामुळेच शासनाच्या कारभारासंबंधीच्या कल्पना जशा गतिशील झाल्या त्याचप्रमाणे न्यायतत्त्वाच्या अधिराज्याचीही स्थितिशील कल्पना बदलून त्याऐवजी गतिशील कल्पना अस्तित्वात आली आहे.

---

१. Beveridge Report : *Social Insurance and Allied Services*, p. 170, para 456.

लोकशाही जीवनपद्धतीत व्यक्तिस्वातंत्र्याला गौरवाचे स्थान आहे. सर्वाधिकारशाहीप्रमाणे नागरिकांच्या जीवनाचे व मनोव्यापारांचे साचेबंद बराकीकरण करण्याची कल्पना लोकशाहीला मंजूर नाही. त्याचबरोबर हेही विसरता येत नाही की समाजहित साधण्यासाठी प्रसंगी व्यक्तिस्वातंत्र्यालाही काहीशी मुरड घालावी लागते. व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजहित ह्यांचा समन्वय साधावा लागतो. असा समन्वय साधण्याच्या प्रयत्नात व्यक्तिस्वातंत्र्याचा कधी कधी संक्षेप होतो. व्यक्तिस्वातंत्र्याची जपणूक व्हावी म्हणून झटले पाहिजे हे जरी खरे, तरी सामाजिक व आर्थिक समता स्थापन करून राज्यव्यवस्था कल्याणकारी झाली पाहिजे, यासाठीही यत्न झाला पाहिजे, हे तितकेच खरे आहे. या प्रयत्नात नानाविध प्रश्न निर्माण होतात आणि त्यांची सोडवणूक सोपी नाही. परंतु लोकशाही यशस्वी करण्यासाठी हे प्रश्न आपण विवेकपूर्णतेने सोडविले पाहिजेत, कारण कल्याणकारी राज्याच्या कल्पनेने लोकशाहीमध्ये क्रांतिकारी नैतिकतेचे तत्त्व आणून सोडले आहे.

कल्याणकारी राज्यातील प्रशासक

शासनाच्या सामाजिक व आर्थिक ध्येयधोरणांची अंमलबजावणी परिणामकारक करण्याच्या दृष्टीने, कल्याणकारी राज्यातील प्रशासन हे एक क्रांतिकारक साधन होय. कल्याणकारी राज्यव्यवस्थेने गाठावयाची म्हणून जी उद्दिष्टे ठरविली आहेत त्यासंबंधी प्रशासनालाही उत्साह वाटला पाहिजे. प्रशासकाला याबाबत सम्यक् कल्पना असली पाहिजे. सेवेच्या सर्वच क्षेत्रांशी त्याने परिचय करून घेतला पाहिजे. विकासयोजनेचे काम असो, पंचयतीचे अगर आरोग्यविषयक किंवा विमायोजनेसारखे असे कोणतेही काम असो, त्याच्या सेवेची गरज कोठेही आणि म्हणून सर्वत्र लागणार आहे. हे सेवेचे काम करीत असताना त्याने अहंगडाच्या आहारी जाता कामा नये. त्याने विनम्र असायला हवे. आपण समाजाचे मालक नसून सेवक आहोत याचा विवेक त्याने सदैव बाळगावा. सेवेच्या वृत्तीतून नम्रता जन्माला येते. अशी सेवावृत्ती हेच त्याचे मार्गदर्शक तत्त्व असावे. समाजापासून त्याने फटकून अलग राहू नये. उलट समाजाशी त्याने एकरूप व्हावे. समाजाशी त्याचे वर्तन भारदस्तपणाचे आणि संयमित असावे. आपण कोणीतरी आगळे आहोत आणि आपला निवास हस्तिदंती मनोऱ्यावर आहे, असे त्यास वाटता कामा नये. मोकळ्या मनाने त्याने काम केले पाहिजे व आपली कर्तव्ये बजावीत असताना त्याच्या समोर जी आव्हाने उभी राहतील त्यांना त्याने समर्थपणे तोंड दिले पाहिजे.

सामान्य नागरिक प्रशासकाच्या वर्तणुकीवरून शासनासंबंधीचे मत ठरवीत असतो, ह्याचा विसर प्रशासकाने होऊ देता कामा नये. आपले कर्तव्य पालन करीत असताना ते त्याने करड्या निःपक्षपातीपणाने आणि कार्यक्षमतेने केलेच

पाहिजे आणि तरीहि त्याचे काम, वागण्याची तऱ्हा माणुसकीला पारखी असता कामा नये. संकुचित भावनेचा त्याने त्याग करावा. अशा भावनेच्या आहारी जाऊन त्याने निर्णय घेऊ नयेत. त्याने जसे भ्रष्टाचारापासून चार हात दूर राहिले पाहिजे त्याचप्रमाणे त्याचे वर्तन असे असावे की त्याबद्दल त्याला कोणी ठपका देता कामा नये. लोकशाहीचे यश किंवा आपण असेही म्हणू की, सामाजिक व आर्थिक समतेच्या प्रस्थापनेसाठी लोकशाहीने जो महान यज्ञ आरंभिला आहे त्याचे यश विधिमंडळातील सदस्यांच्या शहाणपणावर जसे अवलंबून आहे तसेच ते प्रशासनातील प्रामाणिकपणा, सचोटी आणि कार्यक्षमता यांवरही अवलंबून आहे. या संदर्भात विचार करता आपली ही संस्था लोकशाहीला उपयुक्त होईल असेच काम करीत आहे.

प्रशासकीय कायदे व न्यायाधिकरणे

कल्याणकारी राज्यव्यवस्थेत प्रशासकाचे कार्य कोणते आहे, याची भूमिका काय असावी हे सांगितल्यावर दोन प्रश्नांचा उल्लेख मला करावासा वाटतो. प्रशासन-विषयक कायदे आणि प्रशासन न्यायाधिकरणे यांचा प्रश्न हा त्यांपैकी एक होय. शासनाचे कार्य नानाविध स्वरूपी आहे. आधुनिक काळात अनेक लोकशाही राज्यांनी, नागरिकांचे तसेच नागरिक विरुद्ध शासन या संबंधातले जे विविध तंटे सामाजिक आणि आर्थिक धोरणांच्या शासकीय अमलबजावणीतून निर्माण होतात त्यांच्या निवाड्यासाठी प्रशासकीय न्यायाधिकरणे स्थापन केलेली आहेत. त्यासंबंधी कायदेपंडितांमध्ये मोठा वाद आहे. या संबंधात जे वेगवेगळे मतप्रवाह आहेत त्या बाबतची थोडक्यात माहिती सांगतो. अशा न्यायाधिकरणांच्या विरोधी मत असणाऱ्यांमध्ये डायसीचे नाव प्रामुख्याने घेतले पाहिजे. 'दि लॉ ऑफ दि कॉन्स्टिट्यूशन' या नावाचा त्याचा एक ग्रंथ आहे. त्यात तो म्हणतो, 'न्यायतत्त्वाच्या अधिराज्याची कल्पनाच ही आहे की त्यात न्यायाला सर्वश्रेष्ठ मानण्यात आले आहे. लहरी सत्तेला विरोधी अशी ही न्यायतत्त्वाच्या अधिराज्याची कल्पना आहे. शासनाला योग्य वाटेल ते करण्याची मोकळीक देणारी सत्ता ही न्यायतत्त्वाच्या अधिराज्याशी जुळणारी अगर त्याला संमत होणारी नाही. न्यायविषयक कामकाज करणाऱ्या न्यायालयांनीच तंट्यांचा निवाडा केला पाहिजे. त्यासाठी खास प्रशासन-विषयक न्यायाधिकरणांची गरज नाही. ही कल्पना इंग्लंडला अनोखी आहे आणि आमच्या रूढी व परंपरा यांच्या विरुद्ध आहे.'[1]

डायसीच्या मतांचा पाठपुरावा अनेक कायदेपंडितांनी आणि विद्वानांनी केला आहे. न्या.मू. लॉर्ड हेवर्ट यांनी तर याबाबत फार प्रभावी प्रतिपादन केले आहे.

---

१. Dicey : *The Law of Constitution*, Pp. 202-203.

ते म्हणतात, 'न्यायतत्त्वाचे अधिराज्य आणि प्रशासकीय कायदा यांत महदंतर आहे आणि ह्या दोन्ही गोष्टी परस्परविरोधी आहेत.'[1] १९२९ साली त्यांचे ह्या संबंधातले पुस्तक जेव्हा प्रसिद्ध झाले तेव्हा त्यामध्ये व्यक्त केलेल्या मतांच्या संदर्भात अनुकूल तशीच प्रतिकूल स्वरूपाची टीका झाली.

दुसरा एक विचारवंतांचा—विद्यालयीन पंडितांचा एक वर्ग आहे. कल्याणकारी राज्यव्यवस्थेचा तो पुरस्कर्ता आहे. प्रशासकीय न्यायाधिकरणांना अनुकूल असा तो वर्ग आहे. लँडीसचे असे मत आहे की, न्यायालयीन आणि विधिमान्य व्यवस्थेचे जे दोष आहेत त्यांना प्रशासकीय न्यायाधिकरण हे एक चोख उत्तर आहे. आमच्या पिढीने शोधून काढलेला तो एक तोडगा आहे.

विधिज्ञांची आणि विचारवंतांची कशी वेगवेगळी मते आहेत, त्यांना काय म्हणावयाचे आहे, हे आपण आता पाहिलेच आहे. या संबंधात आपण अगदी यथार्थ आणि नीट असा अभ्यास केला पाहिजे. प्रशासकीय न्यायाधिकरणांच्या संबंधात लॉर्ड डेनिंगने म्हटले आहे की, सामाजिक व आर्थिक स्वरूपाचे कल्याणकारी कायदे संमत झाल्यामुळे जे वाद उत्पन्न होतात, तंटे उद्भवतात त्यांच्या निवाड्याचे काम नेहमीच्या न्यायालयांना जमणारे नाही. त्याने पुढे असेही म्हटले आहे की यामुळे निर्माण होणारे तंटे विविध स्वरूपाचे असतील व त्यांची संख्याही फार असेल. या संबंधीचे काम करण्यासाठी न्यायाधीशांची संख्याही अपुरी पडेल. अन्य तंट्यांची गोष्ट निराळी असते. विशिष्ट तांत्रिक ज्ञानाच्या बळावर त्यांचा निवाडा करणे न्यायाधीशाला शक्य असते. खेरीज तत्परता आणि मितव्यय ह्यांचाही विचार ओघानेच येतो. नेहमीच्या न्यायालयीन कामकाजपद्धतीत या दोन्ही गोष्टींसंबंधी तरतूद नसते. तेव्हा या नवीन कायद्यांमुळे मिळणारे हक्क व निर्माण होणाऱ्या जबाबदाऱ्या याबाबतचा विचार, हे प्रश्न प्रशासनपद्धतीचाच एक भाग आहे, असे समजून झाला पाहिजे.[2] मला वाटते की न्यायमूर्तीमहाशयांनी अगदी बिनचूक असे निदान केले आहे व साररूपाने सर्व सांगितले आहे. प्रशासकीय न्यायाधिकरणे न्यायतत्त्वाच्या अधिराज्याच्या कल्पनेशी विसंगत नाहीत. मात्र त्यासाठी त्यांची रीतसर स्थापना झाली पाहिजे. त्याचप्रमाणे प्रशासनाच्या कायदेशीर आणि निरोगी अशा परंपराबरहुकूम त्यांनी काम केले पाहिजे. अशा मंडळांना आपण काय नावाने संबोधतो, ही गोष्ट गौण आहे. कोणत्या पद्धतीने कामकाज चालते, ते महत्त्वाचे आहे. सामाजिक आणि आर्थिक स्वरूपाचे कायदे संमत केल्यामुळे नागरिकांमध्ये, किंवा एका बाजूला नागरिक व दुसऱ्या बाजूला शासन, असे प्रश्न निर्माण होणारच. त्यांचे स्वरूप लक्षात घेऊन जर न्यायमंडळे

---

१. Hewart : *The New Despotism*, P. 37.
२. Denning : *Freedom under the Law*, P. 77

स्थापन करणे आवश्यक वाटले तर त्याप्रमाणे त्यांची स्थापना झालीच पाहिजे. त्याला विरोध करण्याचे काही कारण नाही. अशा न्यायाधिकरणांवर सुयोग्य, विशिष्ट ज्ञानसंपन्न व कार्यक्षम अधिकाऱ्यांची नेमणूक केली पाहिजे. काही निश्चित कालमर्यादेपर्यंत तरी किमानपक्षी त्यांची नेमणूक केली आहे, ह्याबाबतची निश्चिती त्यांना वाटली पाहिजे. खात्याला आपल्या लहरीप्रमाणे वाटले म्हणून नेमणूक करावयाची व लहर फिरली म्हणजे नेमणूक संपुष्टात आणावयाची, असा प्रकार होता कामा नये. अशा न्यायमंडळासमोरचे कामकाज खुले, योग्य आणि निःपक्ष रीतीने चालले पाहिजे. सर्वसाधारणपणे वकील मंडळींना तेथे काम करण्याची मोकळीक ठेवली पाहिजे. निवाड्यांचा निर्णय प्रसिद्ध झाला पाहिजे. काय कारणांनी अमुक एक निवाडा दिला त्याची चर्चा निकालपत्रात आली पाहिजे. निवाडे देताना न्यायाधीशांना स्वतःचा योग्यायोग्य विवेक वापरण्याची मोकळीक दिली पाहिजे. अशी मोकळीक स्वभावतः दोषस्वरूपी नसते. इतर न्यायाधीशांना सुद्धा अशी मोकळीक असते. दक्षता फक्त ही घेतली पाहिजे की ही मोकळीक लहरीनुसार वापरावयाची गोष्ट नाही. त्या बाबत न्यायतत्त्वाचा विवेकच मार्गदर्शक मानला पाहिजे.

'आंबुड्स्मन'—सदाचारमूर्ती

आता आणखी एका प्रश्नाचा विचार करावयाचा आहे तो प्रश्न म्हणजे 'आंबुड्स्मन'चा (Ombudsman) होय. ही संस्था महत्त्वाची आहे. तिच्यामुळे प्रशासनातील भ्रष्टतेवर नागरिकाला इलाज उपलब्ध होणार आहे. ही संस्था स्वीडनमधील आहे. गेल्या १५० वर्षांहून अधिक काळ ही संस्था तेथे फार चांगले काम करीत आहे. १९ व्या शतकाच्या सुरवातीस स्वीडन देशात नवीन संविधानाचा स्वीकार करण्यात आला. त्या संविधानातील तरतुदीनुसार 'आंबुड्स्मन'ची स्थापना करण्यात आली. या यंत्रणेमागील कल्पना समजून घेतली पाहिजे. कायद्याचे परिपालन यथायोग्य होते की नाही यावर देखरेख ठेवणे, सरकारी अधिकारी व न्यायालये यांच्याकडून तत्संबंधीची अंमलबजावणी कशी होते हे पाहाणे, यासाठी तेथे आंबुड्स्मनची नेमणूक करण्यात आली. सनदी नोकरांच्या गैरप्रशासना-संबंधी आंबुड्स्मनयंत्रणा तपासाचे काम करते. आणि प्रसंगी जेथे अन्याय दिसेल त्याबाबत शासनाचे मन वळविण्याचे दृष्टीने हस्तक्षेपही करते. ज्यांच्यावर अन्याय झाला असेल आणि ज्यांना तत्संबंधी कायदेशीर उपाययोजना उपलब्ध नसेल अशांना न्याय मिळावा म्हणूनही ही यंत्रणा काम करते. आंबुड्स्मनची नेमणूक निष्णात न्यायशास्त्रज्ञांमधून होते. त्याचे स्थान फार मोठे असते आणि सर्वोच्च न्यायाल-याच्या न्या. मू. एवढा त्याचा पगार असतो. स्वीडन देशात सनदी नोकर मंत्र्यांच्या नियंत्रणाखाली नसतात. आपल्या देशात मात्र परिस्थिती वेगळी आहे. सनदी नोकरांतील भ्रष्टाचाराला आळा बसविण्याचे अन्यही मार्ग आहेत. आपल्या संस्थेने

या यंत्रणेच्या बाबतीत सर्वांगीण स्वरूपाचा अभ्यास करणे उपयुक्त होईल. संशोधन करणाऱ्या विद्वान मंडळीकडे हा प्रश्न सोपविणेही योग्य ठरेल. ज्या काही कल्याणकारी योजना आमचे शासन कार्यवाहीत आणू इच्छिते त्यांचे यश नागरिक किती प्रमाणात सहकार्य करतात त्यावर अवलंबून आहे. अशा सहकार्याखेरीज त्या योजनांना गतीही येणार नाही. लोकांनी अशा योजनांना अंतःकरणपूर्वक सहकार दिला पाहिजे. त्याचप्रमाणे प्रशासनाशीही सहकार्य केले पाहिजे. प्रशासकांपाशी कार्यक्षमता, सचोटी आणि प्रामाणिकपणा असेल तरच असे सहकार्य देण्याचा विश्वास नागरिकांना वाटेल. लोकांना विश्वास वाटणे ही गोष्ट महत्त्वाची आहे. आपल्या देशात आंबुड्स्मन किंवा तत्सम अशी यंत्रणा जर स्थापन केली तर हा विश्वास वाढीस लागेल.

न्यायासंबंधी असे म्हटले आहे की केवळ न्याय करून भागत नाही तर न्याय केला आहे ह्याची प्रचिती लोकांना आली पाहिजे. प्रशासनाच्या संदर्भात सुद्धा हेच सांगावे लागेल. मंत्री आणि न्यायाधीश ह्या दोघांचेही वर्तन संशयातीत पाहिजे. जनतेला त्याबद्दल खात्री वाटली पाहिजे. उच्चपदस्थांच्या वर्तनाबद्दल संशयास्पद कुजबुजही ऐकू येता कामा नये. मग ते प्रशासक असोत, न्यायाधीश असोत की मंत्री असोत. ह्या कुजबुजीला प्रभावीपणे तोंड देणे असल्यास आंबुड्स्मन सारखी एक यंत्रणा असणे अत्यावश्यक आहे. अशी यंत्रणा स्थापन केल्यानेच आपल्या समोरच्या आव्हानाला समर्थपणे आपण प्रत्युत्तर देऊ शकू. नागरिकांच्या तक्रारींची दखल घेण्याचा अधिकार त्या यंत्रणेला देता येईल. त्याचप्रमाणे ती यंत्रणा जे निर्णय देईल ते निर्णय प्रसिद्ध केले पाहिजेत. या प्रश्नाचा आजच्या संदर्भात आपण विचार करावा.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रमांक ..... दिः .....
आवृत्ति ..... क्रं दिः .....

कल्याणकारी राज्यात सामाजिक प्रशासकाची भूमिका

अशा तऱ्हेच्या चर्चासत्रांचे उद्घाटन करणे हे आधुनिक काळात एक अहिंक होऊ लागले आहे; आणि आजच्या या उद्घाटनाच्या विधीचा पुरोहित होण्याचा अधिकार मला प्राप्त झाला आहे, याचे कारण एकच दिसते, ते हे की विधि-प्रशासनाच्या क्षेत्रात मी काम करीत असल्यामुळे सामाजिक प्रशासनाच्या विशाल क्षितिजाचे मला अंधुकसे दर्शन झालेले असावे !

'सामाजिक प्रशासन' या शब्दांनी सार्वजनिक प्रशासनाची उद्दिष्टे व ध्येये यात क्रांतिकारक बदल झालेला आहे हे सूचित होते. आपणास माहीत असेल की व्हिक्टोरियन कालात व विसाव्या शतकाच्या पहिल्या चतुर्थांशाच्या अखेरपर्यंत लोकशाही शासनव्यवस्थेतही सरकारी कारभाराचा स्वतःविषयीचा दृष्टिकोण फारच संकुचित होता. मी ते सांगायचे झाल्यास असे म्हणू शकेन की सरकारचा कारभार पोलिसी दृष्टिकोनावर म्हणजे कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याच्या मनोवृत्तीवर आधारलेला होता. सरकारने आपल्या देशाच्या अंतर्गत भागात शांतता व सुव्यवस्था सांभाळली व परदेशाच्या आक्रमणापासून आपल्या देशाच्या सीमांचे संरक्षण केले म्हणजे सरकारने आपले कर्तव्य पार पाडले असे समजण्यात येई. लोकशाही राज्यकारभाराची ही तटस्थतेची वृत्ती त्या काळातील अर्थशास्त्रज्ञांनी ज्या मताचा प्रचार चालविला होता त्यावर आधारलेली होती.

मुक्त-बाजाराचा विख्यात सिद्धान्त आपण सर्वांनी ऐकलाच असेल. सर्व सामाजिक व आर्थिक संबंधांचे बाजाराच्या नियमाने नियमन होऊ शकते असे ॲडॅम स्मिथ व रिकार्डो मानत असत. लोकांना वाटत असे की समाजात जे सामाजिक-आर्थिक ताण असतात व त्या ताणांतून जे संघर्ष उद्भवतात त्यांच्या बाबतीत समायोजन करण्याचे कार्य त्यांच्यावरच सोपवावे. त्यावेळी व्यक्तिस्वातंत्र्याला एक दैवत म्हणून

मानण्यात येत असे. तुम्हाला आठवत असेल की लॉर्ड ॲक्टन म्हणायचा की व्यक्तिस्वातंत्र्य हे एखाद्या साध्यासाठी उच्च साधन नव्हे, तर व्यक्तिस्वातंत्र्य हे स्वतःच सर्वोच्च राजकीय व नैतिक साध्य आहे. व्यक्तिस्वातंत्र्यावरील या एकान्तिक निष्ठेमुळे मिल्लसारखे तत्त्वज्ञानी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याच्या शासनसंस्थेच्या प्रयत्नांकडे देखील संशयाने पाहात. स्पेन्सरला असे वाटे की जर तुम्ही सामाजिक आरोग्य-व्यवस्था सक्तीने लोकांवर लादली तर तसे करण्यात तुम्ही व्यक्तिस्वातंत्र्याच्या प्रांतावर आक्रमण करीत आहात. जेव्हा कराराचे स्वातंत्र्य अनिर्बंध स्वरूपात प्रचलित होते व सामाजिक व आर्थिक व्यवहार हे अहस्तक्षेप व बाजाराचा नियम यांना अनुसरून चालत होते, त्यावेळच्या वातावरणात जरी सरकारचे स्वरूप लोकशाही असले तरी, ते आपल्या कारभारासंबंधी संकुचित दृष्टिकोन ठेवण्यात समाधान मानीत असे. आणि त्या काळात लोकशाही जीवनाच्या संकुचित दृष्टिकोनानुसार साहजिकपणे शासन हेसुद्धा केवळ 'सार्वजनिक प्रशासन'च राहात असे.

आता मात्र परिस्थिती बदलली आहे. कारण लोकशाही जीवनमार्गापुढे पहिल्या महायुद्धानंतर व विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर विचारप्रणालीचे एक आव्हान पूर्वी कधी नव्हते अशा प्रचंड प्रमाणात उभे राहिल्याचे दिसून आले. या नव्या जगाच्या उंबरठ्यावर साम्यवाद येऊन उभा राहिला व लोकशाहीच्या विचारवंत पुरस्कर्त्यांना अशी जाणीव झाली की या काळात जर लोकशाही जगावयाची असेल तर तिचा जीवनाकडे बघण्याचा निष्क्रीय असा दृष्टिकोन तिने सोडला पाहिजे. या जाणिवेतून कल्याणकारी राज्याच्या कल्पनेचा उगम झाला. लोकशाहीला नंतर अशी जाणीव झाली की सामाजिक व आर्थिक संघर्षांचे अंगण सर्व प्रकारच्या कलहांसाठी मोकळे राखणे व अशा कलहांकडे तटस्थ साक्षीच्या वृत्तीने बघत राहणे यातच समाधान मानून राहाणे आपल्याला उचित ठरणार नाही. लोकशाहीने समाजाला सतावणाऱ्या पाच राक्षसांना जिंकावयास पाहिजे. आणि ते राक्षस तुम्हाला माहीतच आहेत; दारिद्र्य, अज्ञान, रोगराई, घाणेरडेपणा व आळस. आणि मग लोकशाही जीवनमार्गाला कल्याणकारी कल्पनेने सांगितले की हुकूमशाही राज्यपद्धतीच्या आव्हानाला जर तुला तोंड द्यावयाचे असेल तर तुला खडबडून जागे झाले पाहिजे, क्रियाशील झाले पाहिजे व आपल्यापुढे समाजकल्याणाचे ध्येय ठेवले पाहिजे; आणि कल्याणकारी कल्पनेच्या जन्माने लोकशाही जीवनमार्गाचे क्षितिज रुंदावले व तिच्या सीमा विस्तृत केल्या. साहजिकपणे, लोकशाही जीवनमार्गाच्या सीमा जशा रुंदावल्या व आपल्यासमोर ठेवलेले तिचे क्षितिज जसे विस्तारले त्या प्रमाणात सार्वजनिक प्रशासन व्यापक व विस्तृत बनले; व त्यातून सार्वजनिक प्रशासन हे केवळ सार्वजनिक प्रशासन म्हणून न राहता ते **सामाजिक प्रशासन** असते ह्या कल्पनेचा जन्म झाला. सार्वजनिक प्रशासनाला जेव्हा सामाजिक स्वरूप प्राप्त झाले तेव्हा ते समाजसेवेचा एक भाग बनला. आणि याच संदर्भात मी असे गृहीत

धरतो की हे चर्चासत्र सामाजिक प्रशासनाच्या समस्येचा विचार करणार आहे.

या संदर्भात लोकशाहीच्या हातातील एक क्रांतिकारक साधन म्हणून सामाजिक प्रशासनाने कार्य करावयास पाहिजे. कायद्यांच्या व नियमांच्या पुस्तकांनी घेरलेल्या आपल्या हस्तीदंती मनोऱ्यात सामाजिक प्रशासनास संतुष्ट होऊन राहाता येणार नाही. कायदेकानू हे जरूर चांगले आहेत. ते समाजात एकविधता निर्माण करण्यास मदत करतात. प्रशासनात निर्माण होणारा लहरीपणा व छांदिष्टपणा टाळण्यास त्यांची अवश्य मदत होते. परंतु कायदेकानू हे चाकर असतात, मालक नव्हे. कायदे व निर्बंध यांचे काटेकोरपणे परिपूर्ण पालन करण्यामुळे जो एक प्रकारचा जड व पोलादी चौकटीचा दृष्टिकोन निर्माण होतो तो आज प्रशासनाकडे लोकशाही ज्या प्रकारची मागणी करते तिला अनुरूप नाही.

सामाजिक प्रशासनाची दृष्टी ही मानवतायुक्त असली पाहिजे. तिला स्वतःच्या प्रतिष्ठेच्या तोऱ्यात समाजापासून फटकून लांब राहाता येणार नाही. जेथे प्रत्यक्ष जीवनात सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविले जातात त्या मानवी प्रयत्नांच्या क्षेत्रात तिने जावयास पाहिजे. आजच्या सामाजिक प्रशासकामध्ये कल्पकता पाहिजे. अशा दृष्टीने सामाजिक प्रशासन हे गतिशील विधीसारखे आहे; मलादेखील गतिशील विधीनुसार न्यायदान करण्याचे भाग्य लाधले आहे. सामाजिक प्रशासन हे एक सामाजिक शास्त्र आहेः ते सामाजिक अभियांत्रिकीचे शास्त्र आहे; कायदा जसा गतिशील असतो, तसे सामाजिक प्रशासनही गतिशील राहावयास पाहिजे. व अभियांत्रिकीच्या शास्त्रात त्याची उत्क्रांती व्हावयास पाहिजे. आणि ह्या दृष्टीने सामाजिक प्रशासकाने आपले मन अमूर्त आणि विशिष्ट-ज्ञान–पारंगत असे तयार न करता, लास्की म्हणत असे त्याप्रमाणे प्रत्येक प्रश्नाच्या विविध अंगोपांगांचे व गुंतागुंतीचे ज्यास यथार्थ आकलन करता येऊ शकेल व जरूर पडेल त्याप्रमाणे अशा प्रश्नांना समर्पक उत्तरे ज्याला शोधून काढता येतील असे सर्वसाधारण मन त्याने घडविले पाहिजे.

जेव्हा तुम्ही सामाजिक प्रशासनाविषयी बोलता तेव्हा जिच्यावर तुम्ही भर दिला पाहिजे अशी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवावयास पाहिजे. ह्या देशात सामाजिक प्रशासन जर यशस्वी व्हावयाचे असेल तर आपल्या मूल्यविषयक समजुतीत आमूलाग्र परिवर्तन व्हावयास पाहिजे. सध्या या देशात दुर्दैवाने मूल्यदृष्टी राजकीय सामर्थ्यावर केंद्रित झालेली आहे. ब्रिटिशांनी आपणावर राज्य केले तेव्हापासून राजकारणच देशाचे सर्व लक्ष वेधून घेणारे बनले, तोच वारसा त्यानंतर आतापर्यंत चालत आला असावा. श्रेष्ठकनिष्ठ भाव, जास्त व कमी महत्त्व, सार्थकता–निरर्थकता हे राजनैतिक शिष्टाचारांच्या पद्धतीने ठरविले जातात असे मी म्हणेन. तुम्ही अग्रक्रमाचे अधिपत्र पाहता; आणि मग कोणाचा काय दर्जा हे तुम्ही त्याच्यावरून ठरविता. लोकशाही जीवनमार्गास ही वृत्ती व दृष्टी सर्वथैव अननुकूल

आहे. या देशात सामाजिक प्रशासनाची जर प्रगती व्हावयाची असेल तर या वृत्तीचा त्याग केला पाहिजे. व्यक्ती केवळ मोठ्या पदावर आरूढ आहेत म्हणून त्यांना तुम्ही महत्त्व देऊ नये. ज्यांच्या ठिकाणी समृद्ध अनुभव व ध्येयात्मक दृष्टी असेल अशा व्यक्तींना तुम्ही महत्त्व द्यावयास पाहिजे. म्हणून मला असे दिसते की या देशाच्या व्यवहारात सामाजिक प्रशासनाला जर त्याचा उच्च दर्जा लाभावयाचा असेल तर आपली मूल्यविषयक दृष्टी आमूलाग्र बदलण्यासाठी प्रयत्न करावयास पाहिजे.

सामाजिक प्रशासनही दोन प्रकारांनी कार्य करणारे व्हावयास पाहिजे. सामाजिक प्रशासकाने आपल्या निर्जीव फायलींत गुरफटून व आपल्या कार्यालयात स्वतः बंदिस्त होऊन राहाता कामा नये. सामाजिक प्रशासकाने जेथे प्रत्यक्ष कार्य चालते अशा क्षेत्रात प्रसन्न मनाने संचार केला पाहिजे व त्याने आपल्या कार्यात व्यापक समाजाचा मनःपूर्वक प्रतिसाद मिळविला पाहिजे. जर आपल्या सामूहिक योजना व गटविकास योजना व आपली संपूर्ण नियोजन संरचना यांना जसे मिळावे तसे यश प्राप्त झाले नसेल तर त्याचे प्रमुख कारण असे की त्या सरकारी यंत्रणेच्या प्रयत्नांना समाजमनाचे संपूर्ण सहकार्य मिळालेले नाही. इथेच खरोखरी सामाजिक प्रशासनाने हातपाय हलविले पाहिजेत, चलनशील झाले पाहिजे व त्याने मानवी प्रयत्नांच्या प्रत्यक्ष क्षेत्रात स्वतः जाऊन उभे राहावयास पाहिजे. अशा रीतीने द्विविध सहयोग झाला पाहिजे—प्रत्यक्षांच्या क्षेत्रात प्रशासनाने भाग घेतला पाहिजे व जनतेने शासनसंस्थेच्या धोरणांच्या अंमलबजावणीत सहभागी झाले पाहिजे.

साहजिकपणे यातूनच सरकारी यंत्रणेमार्फत चालणारे सामाजिक प्रशासन व स्वेच्छेने काम करणाऱ्या संस्था यातील संबंधाचा प्रश्न निर्माण होतो. हा फार पुरातन प्रश्न आहे. आपल्या सध्याच्या भारतीय जीवनाचे एक काहीसे आश्चर्यकारक आणि नाउमेदकारक लक्षण असे आहे की ज्या स्वेच्छाप्रेरित व बिनसरकारी संस्था स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळात खूपच भरभराटल्या होत्या त्या आता संपुष्टात येऊ लागल्या आहेत, आणि त्याचे कारण असे की आपणा सर्वांचा असा समज झालेला दिसतो की आपली प्रत्येक समस्या मग ती सामाजिक असो, आर्थिक, राजकीय, किंवा वैधिक असो, ती राजकीय सामर्थ्याचा वापर करून सोडविली जाणार आहे. भारत जेव्हा राजकीय स्वातंत्र्यासाठी झगडा करीत होता तेव्हा जसे स्फूर्तिदायी नेतृत्व कोणत्याही सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक चळवळीला केवळ खासगी संघटना देत होत्या तसे स्फूर्तिप्रद नेतृत्व आता तितके प्रभावी राहिले नाही, ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे.

केवळ राजकीय स्वातंत्र्य स्वतःच समस्या सोडवीत नाही. त्याला अशी एक अभागी सवय आहे की ते नवीन नवीन समस्या उभ्या करते. या देशात सामाजिक

प्रशासन यशस्वी व्हावयाचे असेल तर त्याला लोकांच्या स्वेच्छाप्रेरित प्रयत्नांचे सहकार्य जास्तीत जास्त प्रमाणात मिळत राहिले पाहिजे, अशा तऱ्हेचा विचार प्रचलित केला पाहिजे. मार्गशोधनाचे कार्य समर्पणाच्या भावनेवर आधारलेले केवळ स्वेच्छाप्रेरित प्रयत्नच करू शकतील. कल्याणकारी राज्याच्या सामाजिक व आर्थिक धोरणांच्या प्रशासनात नवे नवे प्रश्न उपस्थित होत राहातात; आणि ते प्रश्न सोडविण्यासाठी वेळोवेळी नवीन उत्तरेही शोधावी लागतात. प्रत्यक्ष प्रकरणांचा अभ्यास करावा लागतो. गटांचा अभ्यास करावा लागतो. माझ्या मते हे सर्व काम स्वेच्छाप्रेरित संघटना व अभिकरणे हीच अधिक परिणामकारकरीत्या करू शकतात. मात्र अशा संस्थांना बळ चढले पाहिजे. आणि म्हणूनच ह्या ठिकाणी तुमच्या मूल्यदृष्टीत आमूलाग्र परिवर्तन व्हावयास पाहिजे. थोड्या वर्षांपूर्वी ज्या व्यक्तींनी आपले सार्वजनिक जीवन भूषविले होते अशा सामाजिक कार्यकर्त्यांना परत आपल्या क्षेत्रात येऊन असे कार्य करण्यास पाचारण केले पाहिजे; आणि हे सामाजिक कार्याचे व्यापक व्यासपीठ सर्व पक्षांच्या व्यक्तींना, मग त्यांची राजकीय मते ही कोणतीही असोत, आपण उपलब्ध करून दिले पाहिजे. एखाद्या व्यक्तीला सामाजिक व आर्थिक क्रांतीचे महत्त्व, सार्थकता व निकड वाटत असेल तर त्या व्यक्तीला या व्यासपीठावर येण्याचा हक्क आहे. म्हणून सामाजिक प्रशासनाने या देशाच्या सार्वजनिक जीवनात मानाचे स्थान स्वतःकडे न घेता आत्मत्यागाच्या भावनेने ते स्वेच्छाप्रेरित अभिकरणांकडे दिले पाहिजे.

ऐच्छिक अभिकरणे साहजिकपणे मदतीसाठी सरकारच्या तोंडाकडे पाहाणार. मदत करण्याच्या बुडाशी काही हेतूचे सूत्र असते असे आपण सर्व म्हणत असतो. परंतु स्वयंस्फूर्त संघटनांना जी सरकारी मदत दिली जाते तिला असे काही सूत्र जोडलेले असू नये. अशा संघटनांना आपापले कार्य करण्यास पूर्ण मोकळीक द्यावयास पाहिजे.

ह्या चर्चासत्राला ज्या दुसऱ्या एका समस्येचा विचार करावा लागेल ती म्हणजे ग्रामीण विभागातील सामाजिक कार्य. हजारो व्यासपीठांवरून आपण असा उद्घोष करीत असतो की भारत हा खेड्यात राहतो; शहरी जीवनाच्या सामाजिक–आर्थिक समस्यांवर जर तुम्ही तुमचे मन व लक्ष केंद्रित केले तर भारताच्या सद्यःस्थितीच्या गरजांचे वेढंगी आणि वक्रीभूत स्वरूप तुम्हांला दिसेल.

ग्रामीण विकासाचा प्रश्न कसा हाताळणार? हा प्रश्न हाताळतानाही तुम्ही सामान्य माणसाकडे गेलेच पाहिजे व त्याचे सहकार्य मिळविले पाहिजे. आणि असे करताना कृपा करून अशा सर्व विकास कार्यक्रमांचे मूल्यमापन करताना त्यांच्यापासून अर्थोत्पादन किती होते हे पाहून त्यावर त्यांची किंमत ठरवावयाची या जुन्या परंपरागत दृष्टिकोनाचा पगडा तुमच्या मनावर बसू देऊ नका. मागासलेल्या जमातींचा विकास ही बाब आज गृहखात्याच्या कक्षेत येते ही गोष्ट

उल्लेखनीय आहे. हा राजकीय प्रश्न नाही, पोलिसी प्रश्न नाही, कायदा व सुव्यवस्था यांचा प्रश्न तर सुतराम नाही; तो एक सामाजिक प्रश्न आहे. म्हणून समस्या ह्या राजकीय शक्तीचा उपयोग करून सोडविल्या जाऊ शकतात ह्या आपल्या जुन्या कल्पनेचा आपण त्याग केला पाहिजे. आपण विशाल अशा आपल्या जनसमुदायाकडे परत जावयास पाहिजे व आपल्या कार्यक्रमांना ज्यायोगे विस्तीर्ण जनसमुदायाकडून हार्दिक, सहजवृत्तीचा व स्वयंस्फूर्त प्रतिसाद मिळेल असे मार्ग अवलंबिले पाहिजेत. आज सामाजिक व आर्थिक समस्या इतक्या महत्त्वाच्या आहेत की त्या त्वरित लोकशाही मार्गाने जर आपण सोडवू शकलो नाही तर त्यामुळे आपला लोकशाही जीवनमार्गच धोक्यात आल्याशिवाय राहाणार नाही, अशी भीती व्यक्त करण्याचे धाष्टर्य करावेसे मला वाटते.

इंग्लिश कायदेपंडितांचा विख्यात अधिपति लॉर्ड मॅक्मिलन एकदा इंग्लिश वकिलांना म्हणाला होता—"कायदेपंडितांनो! मला माहीत आहे की तुम्ही तुमच्या अशीलांच्या कामात फार गुंतलेले आहात. परंतु तुमच्या कागदपत्रातून डोके वर काढून तुमच्या चेंबरच्या खिडकीतून बाहेर जरा एकदा तरी दृष्टी टाका अशी माझी तुम्हांला विनंती आहे. सामान्य मनुष्य रस्त्यात वावरतो आहे. तुम्ही जर थोडे रस्त्यातून हिंडाल व कल्पनाशक्ती वापराल तर सामान्य माणसाच्या डोळ्यात तुम्हाला एक मोठे प्रश्नचिह्न दिसेल." भारतातील सामान्य मनुष्य अज्ञानी असेल, निरक्षर असेल, परंतु या देशात राजकीय स्वातंत्र्य आल्यानंतरही त्याची परिस्थिती मात्र पुरेशी सुधारली नाही, ह्याची त्याला पूर्ण जाणीव झालेली आहे; आणि तो शहरात राहाणाऱ्या तुम्हाला व मला प्रश्न विचारतो—"राजकीय स्वातंत्र्याचे मला काय? लोकशाही जीवनमार्गाचा मला काय फायदा?" आणि या देशाच्या प्रत्येक नागरिकाच्या शांत पण बोलक्या डोळ्यांनी जे आव्हान आपणास दिले आहे, त्याला सामाजिक प्रशासनाने आज उत्तर देण्याची वेळ आली आहे. ह्या आव्हानाला ज्या प्रमाणात व जितक्या त्वरित आपण समंजसपणाने, बुद्धिवादाच्या आधाराने, शांततेने व लोकशाही मार्गाने उत्तर देऊ तितक्या प्रमाणात या देशात लोकशाही जिवंत राहील.

४

भारतीय लोकशाहीच्या आधारभूत संकल्पना

प्रास्ताविक : पुनरागमन

कुलपती, कुलगुरू आणि मित्रहो,

यंदाच्या दीक्षान्त भाषणासाठी कर्नाटक विद्यापीठाने मला पाचारण केले याबद्दल मला धन्यता वाटते. वास्तविक पाहता असे भाषण करण्याची माझी मोठी पात्रता आहे असे नाही; विद्यापीठांची देशाचे भवितव्य घडविण्याबाबतची भूमिका कोणती हे जाणणाऱ्या द्रष्ट्या विद्वानांनाच दीक्षान्त उपदेश करण्याचा वास्तविक पाहाता अधिकार. तरीही मी हे आमंत्रण स्वीकारले, कारण मला असे वाटले की त्यामुळे धारवाडला येण्याची संधी मला मिळेल आणि अशा रीतीने हा भटकलेला मुलगा स्वगृही परत येईल.

मला हे अभिमानाने सांगावेसे वाटते की कर्नाटक कॉलेजात मी १९१८ साली प्रवेश केला आणि माझ्या आयुष्यातली दोन अत्यंत सुखाची आणि संस्कारक्षम वर्षे धारवाडच्या स्फूर्तिदायक परिसरात घालविली. उपकुलगुरू महाशय, आपणही १९१९ साली या कॉलेजात प्रवेश केला आणि अजूनही माझ्या मनश्चक्षूसमोर कर्नाटक कॉलेजात प्रवेश करणारा तो शालीन, बुजरा पण जीवनाचे आव्हान स्वीकारण्यासाठी कृतनिश्चय झालेला तरुण उभा राहातो. त्या तरुण विद्यार्थ्याने जीवनाचे आव्हान खरोखरच मर्दुमकीने स्वीकारले आणि आज कर्नाटक विद्यापीठाला आपले कुलगुरू म्हणून त्यांच्यावर अभिमानाने हक्क सांगता येतो आहे. त्यांच्या समर्थ आणि प्रगतिशील नेतृत्वाखाली कर्नाटक विद्यापीठाने लक्षणीय प्रगती केली आहे. म्हणून यंदाच्या छात्रांसमोर दीक्षान्त भाषण करण्याविषयीचे निमंत्रण मला आले तेव्हा मला वाटले की महाशय, आपण आणि मी ४५ वर्षांपूर्वी ज्या ठिकाणी आपल्या शिक्षणास प्रारंभ केला त्या पवित्र धारवाड क्षेत्राची

यात्रा करण्याची ही एक संधीच आपल्याकडे चालून आली आहे.

१९५० साली हिंदू कोड बिलावर व्याख्याने देण्यासाठी मी येथे आलो होतो. या बिलाविषयी तेव्हा खडाजंगी वाद चालला होता. प्रस्तुत विधेयकाच्या क्रांतिकारक स्वरूपामुळे हिंदू कायद्याच्या नेमस्त आणि सनातनी आकृतिबंधात जो क्रांतिकारक बदल होणार होता तो मला योग्य वाटत असल्यामुळे ज्या वैचारिक आणि प्रागतिक तत्त्वांवर हिंदू कोड बिल आधारलेले होते, ती सर्वसामान्य जनतेला समजावून सांगणे हे एक नागरिक म्हणून मला माझे कर्तव्य वाटले. माझे विचार मांडण्यासाठी मी एखाद्या विद्यापीठाच्या शोधात होतो तोच कर्नाटक विद्यापीठाचे त्यावेळचे कुलगुरू श्री. जहागिरदार यांच्याकडून याच विषयावर विद्यापीठाच्या विद्यमाने व्याख्याने देण्याचे निमंत्रण मला आले. त्याला पंधरा वर्षे होऊन गेली.

आणि आज मला केवळ दीक्षान्त भाषणाचेच निमंत्रण नाही, तर कर्नाटक विद्यापीठाची सन्मान्य डॉक्टोरेटची पदवी स्वीकारण्यासाठीही निमंत्रण आहे. माझ्या या सन्मानाबद्दल विद्यापीठाविषयी कृतज्ञता व्यक्त करताना या सन्मानाला माझी पात्रता नाही ही माझी भावना मला स्वतःपासून, आपणा सर्वांपासून, लपविता येत नाही. तरीही या विद्यापीठाने माझा अशा तऱ्हेने सन्मान करण्याचे योजिले या विचाराने माझे मन कृतार्थतेने आणि विनम्रतेने भरून गेल्याशिवाय राहात नाही.

पदवीधरांसाठी

जे विद्यार्थी आज पदवीधर झाले त्यांना मला शिक्षणाविषयीच्या एका पायाभूत पैलूबद्दल सांगायचे आहे. या गोष्टीला कधी कधी पुरेसे किंवा योग्य तेवढे महत्त्व दिले जात नाही. ज्ञान संपादण्याची क्रिया ही सतत, अविरत, अखंड चालणारी क्रिया आहे. ज्ञानसंपादनाविषयीची प्राचीन कल्पना एका सोप्या संस्कृत सुभाषितात सांगितलेली आहे :

आचार्यात्पादमादत्ते पादं शिष्यः स्वमेधया ।
पादं सब्रह्मचारिभ्यः शेषं कालक्रमेण तु ॥

ज्ञानसंपादनाची क्रिया ही कशी अखंड आणि व्यापक आहे, तसेच ती विद्यार्थी-विद्यार्थी व विद्यार्थी-गुरू यांच्यातील सहकार्यावर कशी आधारलेली आहे हे या सुभाषितात सांगितलेले आहे. ज्ञानाचा एकचतुर्थांश हिस्सा गुरूकडून, एकचतुर्थांश विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या परिश्रमातून, एकचतुर्थांश विद्यार्थी-बंधूंकडून आणि बाकी कालक्रमाने जीवनाकडून संपादन केला जातो, असे हे सुभाषित सांगते. वैशिष्ट्यपूर्ण भारतीय शैलीत शिक्षणाच्या अखंड क्रियेचे सारभूत स्वरूप या काव्यपंक्तीत आले आहे.

विद्यार्थी जेव्हा विद्यापीठामध्ये शिकत असतो तेव्हा त्याने केवळ स्वतःच्याच

प्रयत्नांवर अवलंबून राहून भागणार नाही. प्रगती साधण्यासाठी त्याला स्वतःचे प्रयत्न, उद्यम आणि व्यासंग हे आवश्यक आहेतच, परंतु यांचे सूत्र आपल्या बरोबरच्या विद्यार्थ्यांशी सहकार्य साधून त्याबरोबर जोडून घेतले पाहिजे. विद्यापीठात शिकत असलेल्या विषयांबाबत विद्यार्थीमित्रांत सदैव विचारांची देवघेव व्हावयास पाहिजे. यातून सर्व विद्यार्थीवर्गात बंधुभावाचे वातावरण निर्माण होण्यास स्वाभाविकपणेच मदत होते. याशिवाय ज्ञानसंपादनासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूकडेही गेले पाहिजे कारण शिक्षणाच्या या वैशिष्ट्यपूर्ण क्रियेत विद्यार्थी आणि गुरू यांच्यातील एक प्रकारचा मनमोकळा सु-संवाद अनुस्यूत आहे. कित्येकदा आपल्या विद्यापीठांतून विद्यार्थ्याविद्यार्थ्यांमधील वैचारिक देवघेव आणि गुरू–छात्र यांच्यातील संवाद ही दोन्ही आढळत नाहीत. पूर्वापार चालत आलेली विद्यार्थ्यांना व्याख्याने देण्याची पद्धती शिक्षक अवलंबितात आणि विद्यार्थी टिपणे लिहून घेण्याच्या सनातन पद्धतीचा आश्रय करतात. शिक्षणाच्या पुरातन भारतीय कल्पनेत या पद्धतीला वाव नाही. शिक्षक जेव्हा विद्यार्थ्यांना शिकवतो तेव्हा त्याने त्यांची जिज्ञासा, त्यांचा चौकसपणा हे गुण जागृत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आणि ज्ञानदानाच्या आणि ज्ञानसंपादनाच्या क्रियेत गुरूचे ज्ञान आणि छात्राची जिज्ञासा यांची प्रभावी क्रियाप्रतिक्रिया व्हावयास पाहिजे. तथापि पदवी संपादन करून विद्यार्थी जीवनाच्या प्रवाहात शिरतात तेव्हा ज्ञानसंपादनाची क्रिया संपत नाही. जीवनापासून आपण अनेक महत्त्वाचे धडे घेतो आणि म्हणून ज्ञानाचा उरलेला चवथा भाग संपादन करून आपले ज्ञानभांडार समृद्ध करण्यासाठी आपण सर्वांनी जीवनानुभवाकडे वळले पाहिजे. ज्ञानाचा हा चवथा भाग संपादण्याची क्रिया मग आमरण चालूच राहाते, राहावयास पाहिजे. अशा रीतीनेच आपण सर्व जन्मभर विद्यार्थीदशेत राहतो.

विद्यापीठातून बाहेर जाणाऱ्या प्रत्येक पदवीधराला मला दोन प्रश्न विचारावेसे वाटतात. आपल्या शिक्षणाचा खरा भाग आताच कुठे सुरू झाला आहे आणि सुशिक्षित माणूस म्हणून जर आपल्याला जगायचे असेल तर सतत शिकत राहिले पाहिजे याची आपल्याला जाणीव आहे काय ? हा माझा तुम्हाला पहिला प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर तुम्ही प्रामाणिकपणे जर होकारार्थी देऊ शकलात तर कर्नाटक विद्यापीठाचे प्रयोजन तुमच्या शिक्षणातून साध्य झाले असे म्हणता येईल. माझा दुसरा प्रश्न असा. कामाची शिस्त तुम्ही स्वतःला लावून घेतली आहे काय ? शिक्षणाचे एक प्रमुख कार्य असे की त्याने कार्यरत असण्याची तळमळ विद्यार्थ्यांत निर्माण झाली पाहिजे. उद्यम म्हणजे सेवा हे तत्त्व अक्षरशः आणि संपूर्णपणे सत्य आहे. आपल्या विद्यार्थीदशेत जीवनातील श्रमाच्या पावित्र्याविषयीचे हे तत्त्व तुम्ही जर बाणवून घेतले नसेल तर तुमचे शिक्षण पूर्ण किंवा समाधानकारक झाले असे म्हणता येणार नाही. म्हणून तरुण पदवीधरांनो, माझा तुम्हाला सल्ला असा की केवळ

विद्यापीठ सोडले म्हणून तुमच्या शिक्षणात अडथळा येऊ देऊ नका आणि मानवी सुख आणि प्रगती यांचे खरे उगमस्थान उद्योग हेच आहे याचा विसर पडू देऊ नका.

आधुनिक विद्यापीठाचे कार्य

शिक्षणाचे सातत्य आणि उद्योगाचे वैशिष्ट्य यांचे जीवनात असलेले महत्त्व आपणाला सांगत असताना आधुनिक भारताच्या जीवनात विद्यापीठाच्या कार्याचे खरे स्वरूप काय याचा विचार करणे हे प्रस्तुत ठरेल. शिक्षण आणि संशोधन यांच्या द्वारे प्रामुख्याने विद्यापीठ हे समाजाच्या उच्च स्वरूपाच्या गरजा भागवते. दुसरी कोणतीही संस्था हे कार्य करू शकत नाही. विद्यापीठ ज्ञानाचा शोध घेत असते; त्याचे तेथे बुद्धिवादाच्या आधाराने आणि जबाबदारीने योग्य दिग्दर्शन केले जाते. राष्ट्रापुढे उभ्या असलेल्या महान् बौद्धिक आणि शैक्षणिक समस्यांना सामोरे जाणे हा त्यातला उद्देश असतो. 'क्षितिज घडविणारा नेत्र' म्हणजे विद्यापीठ असे त्याचे वर्णन इमर्सनने केले आहे. आजच्या विद्यापीठांना उद्याच्या भारताचे तेजस्वी, प्रकाशमान आणि विस्तृत क्षितिज घडवावयाचे आहे. भारताच्या घटनेने जे थोर ध्येय या देशापुढे ठेवले आहे त्यामुळे येथे सामाजिक आणि आर्थिक समता निर्मिण्याची भव्य आणि स्फूर्तिशाली संधी प्राप्त झाली आहे. लोकशाही मार्गानी जे समाज-स्वप्न भारताला साकार करायचे आहे ते प्रत्यक्ष योजना, कृती आणि साध्ये यांच्या स्वरूपात साकार झाले पाहिजे. भारताचे स्वप्न अशा रीतीने साकार होण्याचा परिणाम म्हणूनच उद्याचे तेजस्वी, प्रकाशमान आणि विस्तृत क्षितिज उभे राहील. या क्षितिजाच्या चित्रातील तपशील आजच्या विद्यापीठांनी भरले पाहिजेत.

आपल्या मनाच्या संकुचित कोशातून विद्यार्थी जसे बाहेर पडतील तसे विद्यापीठांनी व्यक्तिशः त्यांची मने मुक्त करून जीवनाचा पाठलाग करण्याची जी सामर्थ्यशाली क्रिया, तिच्यासाठी त्यांना सक्षम बनविले पाहिजे. विद्यापीठांनीच विद्यार्थ्यांची मने पुरोगामी, प्रगतिशील आणि चैतन्यपूर्ण केली पाहिजेत आणि राष्ट्राची वैभवशाली उद्दिष्टे साधण्यासाठी अवश्य असलेले कौशल्य आणि साधने यांचा राष्ट्राला पुरवठा केला पाहिजे.

डॉक्टर जेम्स या सुप्रसिद्ध अमेरिकन शिक्षणतज्ज्ञाने एकदा म्हटले होते की, "विद्यापीठे ही बदलणाऱ्या समाजाच्या प्रेरक शक्ती आणि फले अशी दोन्हीही असतात. त्यांचे भवितव्य आणि त्यांचा विस्तार ही नेहमीच भावी कालाकरिता आणि भावी कालामुळे ठरविली जातील." आज भारताच्या भावी कालाचीच ही विद्यापीठांना हाक आहे आणि म्हणून आपल्या विद्यार्थ्यांना स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून जी शौर्याची आणि शक्तीची कार्ये उद्या हाती घ्यायची आहेत

त्यांसाठी या विद्यार्थ्यांची पूर्वतयारी करण्याच्या निश्चयाने या विद्यापीठांना चेतना मिळाली पाहिजे. आजचे विद्यापीठातले जीवन सामाजिक जाणिवेने फुलले पाहिजे आणि हे ईप्सित साधण्यासाठी एक प्रकारच्या समर्पणाची जाणीव गुरू आणि छात्र यांच्यात निर्माण झाली पाहिजे. आजच्या भारताच्या राष्ट्रीय जीवनात विद्यापीठांना ही जी महत्त्वाची भूमिका पार पाडायची आहे तीमुळे आपल्या विद्यापीठांना आगळे महत्त्व आहे.

आजचे आवाहन

न्यायमूर्ती रानडे यांनी एकदा मानवी सौख्याच्या वेगवेगळ्या प्रकारांविषयी चर्चा केली होती ती मला आठवते. रानडे हे अनेक दृष्टींनी फार थोर पुरुष होते हे तुम्हाला माहीतच आहे. एवढे असूनही ते भारतीय संस्कृतीच्या खऱ्या परंपरेप्रमाणे निरंहकारी आणि विनम्र होते. सौख्याविषयी बोलताना ते म्हणाले की मानवी सुखाचे प्रकार एकंदर तीन. आपल्या फावल्या वेळात स्वतंत्र भारताचे स्वप्न मनश्चक्षूसमोर आणण्याचा जे प्रयत्न करतात त्यांना मिळणारे सुख हा पहिला प्रकार. अशा लोकांच्या गटात आपण मोडतो असे शालीनतेने रानडे म्हणत. राजकीय स्वातंत्र्य मिळविलेल्या भारतीय समाजाचे चित्र कल्पिताना त्यांना फार सुख होत असे. रानडे म्हणत की यापेक्षाही मोठ्या पातळीवरचे सुख म्हणजे भारताच्या स्वातंत्र्यचळवळीत जे प्रत्यक्ष भाग घेतील त्यांना होणारे. गांधीजींच्या नेतृत्वाखाली आपल्या अनेक देशभक्तांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी कसा अविरत लढा दिला हे आपणा सर्वांना माहीतच आहे. रानड्यांच्या मते या वर्गातल्या स्वातंत्र्ययोद्धयांनाच वरच्या पातळीचे सुख अनुभवता येईल. या योद्धयांना आणि हुतात्म्यांना मिळणाऱ्या सुखापेक्षाही वरच्या दर्जाचे सुख भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या वेळी जे तरुण असतील त्यांचे, असे रानडे म्हणत. कोणत्याही भारतीय नागरिकाच्या दृष्टीने सर्वोच्च सुख म्हणजे हेच असे त्यांना वाटे.

परंतु स्वातंत्र्य उपभोगण्याच्या या सुखापेक्षाही वरच्या पातळीचे एक सुख आहे असे मला वाटते. भारताचे स्वातंत्र्य आणि त्याचा एकसंघपणा यांचे संरक्षण करताना होणारे सुख हेच ते सुख होय. तुमच्यापैकी जे आज तरुण आहेत त्यांना हे सर्वोच्च मानवी सुख अनुभवता येण्यासारखे आहे. आजच्या काळाचे आव्हान, ज्या आणीबाणीने आपला पाठपुरावा चालविला आहे तीतच दिसते आणि आजचे तरुण स्त्रीपुरुषहो, हे आवाहन स्वीकारण्याचे व भारताचे स्वातंत्र्य, एकता आणि भारताने निवडलेला जीवनमार्ग यांचे संरक्षण करण्याचे सद्भाग्य तुमचे आहे.

या आव्हानाचे वैशिष्टय

या आवाहनाशी परिणामकारकपणे मुकाबला करायचा असेल तर त्याचा अर्थ

आणि त्याचे महत्त्व आपण स्वतः पूर्णपणे जाणले पाहिजे आणि आपल्या देशातील बहुजनसमाजाला समजावून सांगितले पाहिजे. घटनेच्या आणि कायद्याच्या दृष्टीने भारताचा अविभाज्य घटक असलेल्या काश्मीरवर पाकिस्तानने जेव्हा उघड आक्रमण केले तेव्हा सध्याची आणीबाणीची परिस्थिती उद्‌भवली. काश्मीरचा प्रश्न पाकिस्तान वारंवार काढीत असले तरी काश्मीर हे केवळ एक बाह्य कारण आहे. सध्याच्या लढ्यामध्ये अनुस्यूत असलेल्या ज्या तत्त्वाचे काश्मीर हे एक प्रतीक आहे ते थोर तत्त्व आपण विसरता कामा नये. १९४७ साली धार्मिक तत्त्वावर भारताचे विभाजन झाले असे पाकिस्तानने सोईस्करपणे आणि जाणूनबुजून गृहीत धरले आहे. याच गृहीतावर पाकिस्तानने आपला काश्मीरवरचा, स्वतःची अविचारी आणि माथेफिरू वृत्ती दर्शविणारा हक्क आधारला आहे. सार्वमत घेण्याची पाकिस्तानी सूचना ही केवळ एक सबब आहे. बाहेरच्या जगातील ज्या लोकांना वस्तुस्थिती पूर्णपणे कळू शकत नाही त्यांना फसविण्यासाठी आणि त्यांच्या डोळ्यांत धूळ फेकण्यासाठी घेतलेला तो एक बुरखा आहे. काश्मीरचा वाद युनायटेड नेशन्समध्ये नेण्यात आल्यानंतर जे जे घडले त्याकडे पाकिस्तानने संपूर्णपणे डोळेझाक केली आहे आणि सध्याची आपत्ती निर्माण करणे म्हणजे काश्मीर बळकाविण्याचा उतावळा पाकिस्तानी डाव आहे.

या उलट भारताने मात्र दोन धर्म मानणाऱ्या भारतातील दोन प्रमुख जमातींसाठी दोन राष्ट्रे पाहिजेत हे तत्त्व कधीही स्वीकारलेले नाही. धर्मनिरपेक्षतेच्या सिद्धांतावर भारताचा दृढ विश्वास आहे. म्हणून आपल्या दृष्टीने काश्मीरसाठी लढा हा भारताचा अविभाज्य घटक असलेल्या काश्मीरच्या प्रादेशिक एकतेसाठीच केवळ नाही; तो धर्माधिष्ठित राज्य (Theocracy) आणि धर्मनिरपेक्ष लोकशाही (Secular democracy) यांच्यातील संघर्ष आहे. आपल्या अंतर्गत राजकीय बाबतीत धर्म घुसडून देऊन पाकिस्तान त्याच्या गैरफायदा घेते, एवढेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय राजकारणातही धर्माला घुसवून आपले परराष्ट्रीय संबंध पाकिस्तान त्याच तत्त्वानुसार घडविण्याचा प्रयत्न करते. राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय राजकारणात धर्माधिष्ठित दृष्टिकोन वापरणे भारताच्या दृष्टीने हीन मनोवृत्तीचे, असंस्कृततेचे, तर्कहीन आणि प्रतिगामी स्वरूपाचे आहे. हा दृष्टिकोन मध्ययुगीन आहे. म्हणून पाकिस्तानी आक्रमणाला भारताने तोंड द्यायचे ठरविले ते आपण स्वीकारलेल्या लोकशाही जीवनपद्धतीच्या मौलिक तत्त्वांचे संरक्षण करण्याच्या पूर्ण निश्चयाने, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. या आणीबाणीच्या प्रसंगी निधर्मी तत्त्वज्ञानापासून प्रत्येक हिंदी नागरिक स्फूर्ती घेत असल्यामुळे अखिल भारतीय धर्मनिरपेक्ष लोकशाही या आव्हानाला तोंड देण्यासाठी एका आवाजाने उठून उभी राहिली आहे. स्वतंत्र भारताच्या आणीबाणीच्या परिस्थितीतील हा काल इतिहासात मोठ्या अभिमानपूर्वक सुवर्णाक्षरांनी नोंदला जाईल.

विद्यापीठे आणि बुद्धिमंत यांचे या संदर्भात समाजाच्या दृष्टीने एक कर्तव्य आहे. या लढ्याचे खरे महत्त्व त्यांनी जनतेला समजावून सांगितले पाहिजे आणि या करिता काय किंमत द्यावी लागेल याबद्दल कोणताही संशय त्यांनी कोणाच्याही मनात उरू देता कामा नये. आणीबाणीच्या सक्त दडपणाखाली जी एकतेची आणि निग्रहाची भावना सहजस्फूर्त रीतीने निर्माण झाली ती कुशल आणि सुबुद्ध योजकतेने टिकवून ठेवली पाहिजे, तिला योग्य मार्गाने वाट काढून दिली पाहिजे. हे साधण्यासाठी आपल्या देशात लोकशाही जीवनाला उत्स्फूर्त करणारी जी पायाभूत मूल्ये आहेत त्यांच्यावर भर दिला पाहिजे. देशातील बुद्धिमंतांचे त्यांच्या स्वतःच्या आणि त्यांच्या देशबांधवांच्या बाबतीत हे कर्तव्य आहे. या कर्तव्याच्या संदर्भातच कर्नाटक विद्यापीठाच्या पदवीधरांना चार शब्द सांगावे अशी माझी इच्छा आहे.

भारतीय लोकशाहीची मूलभूत तत्त्वे

भारतीय लोकशाहीची मूलभूत तत्त्वे कोणती ? भारतीय लोकशाहीचे पहिले महत्त्वाचे तत्त्व म्हणजे देशापुढे असलेले सर्व महत्त्वाचे सामाजिक आणि आर्थिक प्रश्न बौद्धिक आणि शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले आणि सोडविले पाहिजेत. आपले कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट साधताना जे जे प्रश्न पुढे उभे राहातील ते लोकशाही पद्धतीने यशस्वी रीतीने सोडविता येतील असा भारतीय लोकशाहीचा विश्वास आहे. विवेक हा भारतीय लोकशाहीचा मार्गदर्शक आहे आणि कायद्याचे अधिराज्य हा त्याचा थोर पाठीराखा आहे. आंतरराष्ट्रीय शांततेला बाध आणणाऱ्या समस्यासुद्धा विवेकानेच सोडविता येतील असा भारतीय लोकशाहीचा विश्वास आहे. म्हणून आपल्या प्रश्नांना तोंड देताना आपण विवेकाचा आवाज उठविला पाहिजे, शस्त्रांच्या खणखणाटाचा नव्हे.

बुद्धिवादी आणि शास्त्रीय दृष्टिकोन स्वीकारायचा याचाच अर्थ हा की सामाजिक आणि आर्थिक प्रश्न धर्माच्या साहाय्याने किंवा धार्मिक ग्रंथांच्या मदतीने सोडविता येणार नाहीत. धर्म ही प्रत्येक नागरिक आणि त्याचा देव यांच्यातील बाब आहे. कोणत्याही सामाजिक किंवा आर्थिक प्रश्नाच्या चर्चेमध्ये किंवा निर्णयामध्ये तिने लुडबूड करू नये. धर्माधिष्ठित राज्य भारतीय लोकशाहीची ही मूलभूत कल्पना समजू शकत नाही, समजावून घेऊ इच्छित नाही. राज्याच्या धर्मनिरपेक्ष कार्यकलापाच्या बाबतीत नागरिकाचा धर्म कोणता याला काहीही महत्त्व नाही. म्हणून धर्माकडे धाव घेणे हा मार्ग भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने संपूर्णपणे कालातीत, हीन वृत्तीचा आणि तर्कदुष्ट आहे.

धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व हे भारतीय लोकशाहीचे एक अत्यंत सारभूत तत्त्व आहे. भारतीय संविधानाने आपल्या सर्व नागरिकांना समान घटनात्मक हक्क दिले

आहेत आणि सामाजिक व आर्थिक न्यायाचा जो आदर्श साधण्याचा भारतीय संविधानाने निरनिराळ्या राज्यांना आदेश दिला आहे त्यात धर्म, जाती यांतील भेदांना स्थान दिलेले नाही. भारतीय लोकशाही जेव्हा दारिद्र्य, अज्ञान, बेकारी, दैन्य आणि रोगराई यांचा विचार करते तेव्हा नागरिकांतील धर्म, जाती, लिंग इत्यादी भेद संपूर्णपणे अप्रस्तुत ठरतात. धर्मातीत राज्याच्या तत्त्वाच्या अधिष्ठानाखाली भारताच्या प्रत्येक नागरिकाला भारतीय नागरिकत्वाचा अभिमान वाटतो. भारतीय लोकशाहीचे हे अंग आपल्यापैकी प्रत्येकाचे श्रद्धास्थान बनले पाहिजे.

भारतीय लोकशाहीची दुसरी मूलभूत कल्पना म्हणजे भारताशी इमान आणि भारताच्या एकतेवर श्रद्धा. भारताच्या संघराज्यात अनेक घटकराज्ये आहेत आणि तिथे वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात. परंतु भारताविषयीच्या निष्ठेला आपल्या जीवनात सर्वांत महत्त्वाचे स्थान असले पाहिजे हे सत्य आपणाला पटले आहे. निरनिराळ्या राज्यांबद्दलच्या संकुचित निष्ठांना भारताबद्दलच्या इमानापुढे कमी महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे आणि त्यांना या महत्तम निष्ठेशी युक्तिसंगत रीतीने एकसंध बनविले पाहिजे. भारतीय लोकशाहीची अंगभूत लक्षणे जीवनाविषयीच्या ज्या पुरोगामी, प्रगतिशील आणि चैतन्यमय तत्त्वज्ञानातून प्रगट होतात ते तत्त्वज्ञान उपदेशिणे आणि त्याचा पुरस्कार करणे हे आजच्या विद्यापीठांचे कार्य आहे. अशा तऱ्हेच्या प्रगतिशील तत्त्वज्ञानाच्या विकासामुळेच सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या आपल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करण्यास भारतीय लोकशाहीला मदत होईल.

आजचे आव्हान म्हणजे एका अर्थाने भारताच्या गौरवाचा क्षण ठरला ही आपल्यापैकी प्रत्येकाला अभिमानाची बाब आहे. आणीबाणी सुरू होताच आपल्या देशातले सर्व मतभेद संपले, सर्व वादविवाद थांबले आणि हे राष्ट्र जणू काही एक व्यक्ती अशा स्वरूपात खडे झाले. या देशातील सामान्य स्त्रीपुरुषांनी हे दाखवून दिले आहे की आपल्या राष्ट्रनिष्ठेसाठी, आपल्या देशाची एकता राखण्याकरिता निश्चयाने उभे ठाकण्यासाठी, आणि राष्ट्राच्या मूलभूत जीवनमूल्यांचे रक्षण करण्यासाठी आपण पडेल तो कोणताही त्याग करायला सिद्ध आहोत. पाकिस्तानी आक्रमणाला तोंड देताना सर्व भारतीयांनी सच्चेपणाने आणि संपूर्णपणे असे दाखवून दिले की प्रथम आणि अखेरपर्यंत भारतीयच राहाण्यात आपल्याला एक अवर्णनीय असा अभिमान वाटतो. जाती, धर्म, भाषा, समाज, किंवा संप्रदाय यांपैकी कोणत्याही गोष्टीच्या विचाराने, आज आपण ज्या आव्हानाचा मुकाबला करीत आहोत त्याला साद देण्याचे कामात कमतरता आली नाही. म्हणून सध्याच्या या आव्हानाचे विशिष्ट महत्त्व बुद्धिमंतांनी पूर्णपणे जाणले पाहिजे आणि समाजाला विशद करून सांगितले पाहिजे. आजच्या संदर्भात विद्वांनानी पार पाडलेच पाहिजे असे हे एक पवित्र कर्तव्य आहे.

बसव आणि सामाजिक न्याय

आपण जेव्हा सामाजिक आणि आर्थिक न्यायाविषयी बोलतो तेव्हा या ध्येयाचा खरा अर्थ काय हे समजावून घेतले पाहिजे. या तत्त्वाचा खरा अर्थ आणि त्याचे संपूर्ण महत्त्व समजून घेण्यासाठी आपल्याला बसवांच्या शिकवणुकीकडे धाव घेता येईल. हिंदू संस्कृतीच्या आणि समाजाच्या इतिहासावरून ही पुरातन संस्कृती कशी प्रगतिशील आणि चैतन्यपूर्ण होती हे आपल्याला दिसून येते. ती कधीच स्थितिशील नव्हती. या संस्कृतीचा इतिहास खिस्तपूर्व तीन हजार वर्षांपर्यंत मागे जातो आणि इतर संस्कृती जरी विलयाला गेल्या असल्या तरी या संस्कृतीचा जिवट कणखरपणा अजून टिकून आहे. याचे कारण असे की वेळोवेळी सामाजिक क्रांतिकारकांनी समाजाच्या तत्त्वज्ञानात योग्य ते फेरफार केले आणि त्याला अधिक प्रगतिशील बनविण्याचा प्रयत्न केला. महावीर, बुद्ध, बसव, गुरू नानक, ज्ञानेश्वर, तुकाराम आणि दयानंद यांनी जे क्रांतिकारक कार्य केले त्याचा विचार करा. या थोर पुरुषांनी आपल्या काळात जे सामाजिक तत्त्वज्ञान सांगितले त्याची काही समान वैशिष्ट्ये आहेत. कर्मकांडाचे प्राधान्य आणि पुरोहितवर्गाचे वर्चस्व त्यांना मान्य नव्हते. सर्व ज्ञान ही पुढारलेल्या वर्गाची मिरासदारी मानावयाची ही तत्कालीन प्रवृत्ती त्यांना पसंत नव्हती. उच्चनीचत्वाच्या ज्या कल्पनांवर समाजसंरचना आधारलेली होती त्या त्यांना मंजूर नव्हत्या. माणूस कोणत्याही जातीचा असो, सर्व जण समान असे त्यांना वाटे. स्त्रिया या पुरुषांच्या मानाने हीन आहेत ही कल्पना त्यांनी धुडकावून लावली आणि हरिजनांना मिळणाऱ्या अन्याय्य वागणुकीचा त्यांनी धिक्कार केला. केवळ अल्पसंख्य लोकांनाच कळणाऱ्या संस्कृत भाषेत आपली शिकवण आणि तत्त्वज्ञान यांचा पुरस्कार न करता तो त्यांनी बहुजनसमाजाच्या भाषेत केला. महावीर, बुद्ध, बसव, गुरू नानक, ज्ञानेश्वर, तुकाराम आणि दयानंद यांच्या कार्यांचा तुम्ही विचार केला तर ही त्यांची समान लक्षणे तुम्हांला उठून दिसतील. हे सर्व सामाजिक क्रांतिकारक होते आणि यांच्या प्रयत्नांमुळेच भारतीय जीवनरीती प्रगतिशील आणि चैतन्यपूर्ण झाली.

[यानंतर बसवेश्वराने प्रतिपादिलेल्या सामुदायिक कष्टांची प्रतिष्ठा, जातिभेदविरोध आणि सामाजिक समता या तत्त्वांचे उज्ज्वल वर्णन करून न्यायमूर्ती पुढील मुद्याकडे वळले—]

आजच्या संदर्भात बुद्धिमंतांचे कर्तव्य

आजच्या संदर्भात बुद्धिमंतांचे कर्तव्य कोणते हे उघड आहे. सामान्य जनतेला त्यांनी भारतीय लोकशाहीच्या मूलतत्त्वांची शिकवण दिली पाहिजे. सामान्य नागरिकाच्या

मनात सामाजिक आर्थिक समतेची तळमळ त्यांनी निर्माण केली पाहिजे. सामाजिक आर्थिक न्यायाकडे चाललेली ही यात्रा जर यशस्वी व्हावयाची असेल तर ज्या मूल्यांवर भारतीय लोकशाहीची श्रद्धा आहे त्यांबद्दल सर्व भारतीय नागरिकांमध्ये एक प्रकारची समर्पणाची भावना आणि जीवनप्रयोजनाची जाणीव उत्पन्न झाली पाहिजे. आजच्या आव्हानाचा मुकाबला आपल्याला केवळ रणभूमीवरच करावयाचा आहे असे नाही, तर सामाजिक आर्थिक जीवनाच्या सर्व भागांत आणि सर्व वाटांवर त्याला आपल्याला तोंड द्यायचे आहे. आधुनिक युद्धे ही केवळ रणभूमीवरच लढली जात नाहीत, शेते आणि कारखाने येथे चाललेल्या उद्योगाचे पाठबळ त्यांना लागते. आघाडीवर लढणाऱ्या जवानाला शेतात राबणाऱ्या किसानाचा आणि कारखान्यात काम करणाऱ्या कामगाराचा प्रामाणिक, जाणता आणि उत्तेजक प्रतिसाद मिळाला पाहिजे. जवान, किसान आणि कामगार हे भारतीय समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या कमजोर असलेल्या थरातून येतात. भारताच्या एकतेकरिता चाललेले युद्ध हे केवळ भारतीय भूभागाच्या एकसंधपणासाठी नसून भारतीय लोकशाहीचे अधिष्ठान असलेल्या तत्त्वांच्या, आणि ज्या सामाजिक आर्थिक न्यायाच्या आदर्शाला ही लोकशाही वाहिलेली आहे त्या आदर्शांच्या रक्षणासाठी, पुरस्कारासाठी आणि फलद्रूपतेसाठी आहे याची जाणीव या सर्वांच्या मनांत उत्पन्न केली पाहिजे. सध्याच्या लढ्यातील विधायक, निर्मितीक्षम, रचनात्मक आशय हा केवळ बुद्धिमंतांना समजून उपयोगी नाही, तो बहुजनसमाजापर्यंत सुद्धा पोचविला पाहिजे. घटनेने जी जबाबदारी आपणा सर्वांवर टाकली आहे तिला वाहून घेण्याची हीच वेळ आहे. हे कार्य निःसंशय कठीण आहे, परंतु त्यासाठी आपण निष्ठेने बांधले गेले आहोत, त्यापासून माघार अशक्य आहे आणि ते साधण्याच्या वाटचालीत आपण कचरता कामा नये. भारताच्या कसोटीच्या आणि गौरवाच्या काळात त्याचे नागरिक होण्याचे भाग्य ज्यांना लाभले आहे त्यांनी अस्मितेची, अर्पणाची, हेतूपूर्ण जीवनाची जाणीव विकसित केली पाहिजे आणि हे आजचे बुद्धिमंत करू शकतील. पदवीधरांना या संदर्भात फार महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागेल.

कालाची हाक

दैव हे नेहमी मोठ्या सैन्याच्या बाजूला असते असे नेपोलियन म्हणत असे. हे नेपोलियनच्या काळात जितके सत्य होते तितके आजही आहे. आपल्या देशाचे भवितव्य जितके अंतर्गत सामर्थ्यावर अवलंबून आहे, तितके ते इतर देशांच्या आपल्याबद्दलच्या सदिच्छांवर नाही हे आपण विसरता कामा नये. आपल्याला जे सामर्थ्य पाहिजे आहे ते सर्व आघाड्यांवर आणि सर्व क्षेत्रांत हवे आहे. लष्करी क्षेत्रात, आर्थिक क्षेत्रात आणि सामाजिक क्षेत्रात हवे आहे. आपण धीमेपणाने पण जोमाने आणि अथकपणाने या तीन्ही क्षेत्रातील सामग्री एकत्र करून

बाढविली पाहिजे. हे होण्यासाठी साहजिकच अविरत, निष्ठापूर्ण, जाणीवपूर्ण आणि आजचे आव्हान स्वीकारण्याच्या निश्चयाने उत्स्फूर्त असा प्रयत्न आवश्यक आहे.

भगवद्गीतेत म्हटले आहे :

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

यश, समृद्धी आणि सुख मिळविण्यासाठी आपणाला भगवान कृष्ण आणि योद्धा अर्जुन यांचे सहकार्य हवे आहे. भारतीय लोकशाहीने स्वीकारलेल्या प्रगतिशील आणि चैतन्यपूर्ण जीवनरीतीचा रचनात्मक, निर्मितिक्षम आणि तात्त्विक पाया म्हणजे भगवान श्रीकृष्ण. भारतीय जनतेची सैनिकी, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय शक्ती म्हणजे अर्जुन. रणांगणावरील सामर्थ्याला आधार देण्यासाठी देशातील अंतर्गत सामर्थ्य उभे पाहिजे. हे सामर्थ्य उभे करावयाचे असेल तर आपल्या बहुवंशी, बहुभाषी, बहुधर्मी देशातील सर्व समाजघटकांनी धर्मनिरपेक्षतेचा सिद्धान्त आणि सामाजिक–आर्थिक न्यायाचा सिद्धान्त यांच्यावरील अढळ आणि दृढभावात्मक श्रद्धेच्या पायावर बंधुभावाची जोपासना केली पाहिजे. शेतातील किसान, कारखान्यातील कामगार आणि युद्धभूमीवरील जवान यांनी आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करावयाची असेल तर त्यांना हे जाणवले पाहिजे की ज्या देशाच्या स्वातंत्र्याकरिता ते आपापल्या परीने लढत आहेत तो देश असे एक नवयुग निर्माण करणार आहे की जेथे दारिद्र्य विलयाला जाईल, अज्ञान दूर केले जाईल, रोगराईवर मात केली जाईल आणि सामाजिक–आर्थिक न्यायाचा जय होईल. या संदर्भात बुद्धिमंतांनी आपली भूमिका पार पाडताना डगमगता कामा नये. व्यक्ती आणि समाज यांच्या जीवनात असे प्रसंग येतात की जेव्हा कृतिशून्यता हा गुन्हा होतो आणि स्तब्धता हा अपराध ठरतो. भारतीय लोकशाही ज्या मूलभूत तत्त्वांवर आधारलेली आहे त्यांचा आपण पुरस्कार केला पाहिजे आणि आपल्यापैकी प्रत्येकाने आपापल्या क्षेत्रात आपापल्या परीने आणीबाणीच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी आवश्यक तो राष्ट्रीय प्रयत्न जारी ठेवला पाहिजे. आजच्या पदवीधरांना आणि खरे म्हणजे आजच्या सर्वच तरुणतरुणींला असलेली कालाची हाक स्पष्ट आहे.

तस्मादुत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः ।

ही ती हाक आहे.

> "भारतीय युवकयुवतींनो, उठा जागृत व्हा—आणि लढा लढण्यासाठी सज्ज व्हा. —केवळ तुमच्या वैयक्तिक जीवनासाठी नव्हे, तर भारतीय स्वातंत्र्य, एकता याच्या संरक्षणासाठी आणि भारतीय जीवनपद्धतीच्या विजयासाठी जो लढा आज लढला जात आहे, त्या लढ्यासाठी सज्ज व्हा !"

ऐहिकतावाद व भारतीय समाज

*इंग्रजीतील Secularism या शब्दाला '**ऐहिकतावाद**' आणि '**धर्मनिरपेक्षता**' असे दोन प्रतिशब्द वापरण्यात येतात. दोन्ही शब्द योग्य आहेत. त्यांत Secularismच्या अर्थातील भिन्न भिन्न छटांना प्राधान्य दिले आहे. दोन्ही अर्थच्छटांचे भान व्हावे म्हणून प्रस्तुत ग्रंथात दोन्ही पर्यायांचा आलटूनपालटून उपयोग केला आहे. हा शब्द विशेषेकरून या व पुढील लेखात आला आहे.*

—संपादक

धर्मनिरपेक्षतेच्या प्रश्नाची, अर्थात् धर्मनिरपेक्षतेचे भारतातील कायदा व जीवन यांवर परिणाम यांची, चर्चा करण्यासाठी हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. चर्चेसाठी निवडलेला हा विषय जगातील सर्व प्रगतिपर व लोकशाही समाजांना महत्त्वाचा वाटावा असाच आहे. तथापि भारतात या विषयाला एक आगळेच महत्त्व प्राप्त झालेले आहे. मी ज्या ज्या वेळी 'धर्मनिरपेक्षता' हा शब्द ऐकतो तेव्हा तेव्हा हिंदुवंशाविषयी मॅक्समुलर जे म्हणाला होता ते मला आठवते. मॅक्समुलरने म्हटले "पृथ्वीच्या पाठीवर केवळ हिंदूंचाच असा एक वंश आहे की जो असे प्रांजळपणे मानतो की आपण या पृथ्वीवरचे केवळ मुशाफिर आहो, व आपले शाश्वत धाम स्वर्गातच आहे." मॅक्समुलरला असे वाटे की अशा प्रकारच्या पारलौकिकत्वाच्या भावनेने भारल्यामुळे मानवी जीवनातील प्रसंग व घटना यांच्याविषयी संपूर्ण औदासीन्य त्यांच्या मनात निर्माण होते. मॅक्समुलरने भारतीय संस्कृतीसंबंधी हे जे सर्वसामान्य मत व्यक्त केले आहे ते तितकेसे बरोबर नाही असे मला वाटते. हिंदू संस्कृती ही सदैव गतिशील, चिन्मय व

प्रगतिशाली राहिलेली आहे व ह्या तिच्या स्वरूपामुळेच गेल्या तीन हजार वर्षांपेक्षा अधिक काळ ती यौवनवती राहिलेली आहे.

हिंदू समाज त्याच्या सुरवातीच्या काळात देवांकित किंवा धर्मसत्ताक नव्हता; तर धर्मनिरपेक्ष होता. अर्थात् इतर सर्व प्राचीन संस्कृतींप्रमाणे भारतीय संस्कृतीही अवनतीच्या अवस्थेतून गेली; पण क्रांतिकारक सामाजिक तत्त्वज्ञानी लोकांनी तिला पुनरुज्जीवित केले. तिच्या अवनतीच्या कालात कर्मकांडाचा बराच प्रभाव होता व अंधश्रद्धाही वाढल्या होत्या. परंतु हिंदू समाजचिंतकांनी हिंदू तत्त्वज्ञानाचा अर्थ लावताना त्यात नवी तत्त्वे अंतर्भूत केली व त्यावरून हे स्पष्ट होते की भारतीय संस्कृती अद्याप जिवंत व यौवनशाली आहे. उदाहरणार्थ, कायद्याच्या उगमस्थानां-संबंधी जी उपपत्ती आहे, तीच घ्या. कायद्याच्या उगमस्थानात निःसंशयपणे **श्रुती** व **स्मृती** तर समाविष्ट आहेतच; परंतु **सदाचार** म्हणजे **लोकाचार**–रूढी ही सुद्धा कायद्याचे उगमस्थान मानली जाते.

श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियत्मामनः ।
सम्यक् संकल्पजः कामः धर्म मूलमिदं स्मृतम् ॥

सदाचाराबरोबरच कायद्याची इतर उगमस्थाने आहेत : जे जे आपल्याला हितकारक असेल व निकोप इच्छेचे जे फळ असेल ते ते सर्व. ही उगमस्थाने हिंदू कायद्याच्या विकासाचा वेळोवेळी पाया बनत गेली व त्यामुळे हिंदू कायद्याला परिस्थितीशी मेळ घालता आला, अशा रीतीने की कायद्याचे शब्द आणि सामाजिक विवेकबुद्धी यांच्यातील तफावत त्यामुळे कमी व्हावी.

तथापि संतत परिवर्तनाची आणि तत्त्वाच्या समायोजनाची ही प्रक्रिया ब्रिटिश राजवटीमध्ये अति मंद झाली....आणि कायद्याचे शब्द व विशेषतः टीकाकारांची मते यांचे हिंदू कायद्याच्या अर्थलापनिकेत अपवर्जक वर्चस्व प्रस्थापित झाले.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतीय लोकसभेने जे हिंदू कोड संमत केले त्यावरून हिंदू कायद्याला धर्मनिरपेक्ष रूप देण्याची जी प्रक्रिया स्थगित झालेली होती ती पुनः सुरू करण्यात आली हे दिसून येते. हिंदू कोड जेव्हा लोकसभेपुढे चर्चेकरिता होते तेव्हा पुराणमतवादी व परंपरावादी लोकांनी 'हिंदू धर्म संकटात आहे' अशा प्रकारची ओरड सुरू केली. परंतु पुराणमतवादी व परंपरावादी लोकांच्या जोराच्या विरोधास न जुमानता हिंदू कोडाचे विधेयक विधिपुस्तकात समाविष्ट करण्यात आले, आणि त्यावरून वैयक्तिक कायदा ही एक धर्मनिरपेक्ष संस्था असते, व तो कायदा बुद्धिवादी आणि धर्मनिरपेक्ष विचारांवरच आधारला गेला पाहिजे असे तत्त्व प्रस्थापित झाले. ही भूमिका हिंदू कायद्याच्या खऱ्या प्राचीन प्रारंभिक दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. जुन्या संकल्पनेस अनुसरून धर्म ही शुद्ध ऐहिक संस्था आहे. जो समाजाची धारणा करतो तो धर्म. सर्वत्र पसरलेल्या

जनतेचे ज्यामुळे एकत्र धारण करता येते तो धर्म होय.

धारणाद् धर्म इत्याहुर्धर्मो धारयते प्रजाः ।

ध्रियते अनेन प्रजाः इति धर्मः ।

आता हिंदू कोड तीच भाषा बोलते व हिंदू कोडात ज्या कायदेविषयक बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे त्या केवळ ऐहिक स्वरूपाच्या आहेत व त्यांचा धर्माशी काही संबंध नाही अशी भूमिका हिंदू समाजाने आता स्वीकारली आहे.

पश्चिम युरोपात एकोणिसाव्या शतकात धर्मनिरपेक्षतेची विचारधारा सुरू झाली. सुरवातीला धर्मापासून फुटून निघण्याचा कल्पनेपासून तिला प्रारंभ झाला. ती प्रामुख्याने धर्मविरोधी, किंवा कदाचित असे म्हणता येईल की, ईश्वरविरोधी स्वरूपाची होती. परंतु भारतीय धर्मनिरपेक्षतेस हा विचार मान्य नाही. सामाजिक व आर्थिक बाबींच्या चर्चा व निर्णय यांच्या बाबतीत नागरिकाच्या धमाचा काहीही संबंध नाही असे ती मानते यात काही शंका नाही. या बाबतीत संकल्पनेनुसार कायदा ही एक सारतः ऐहिक, धर्मनिरपेक्ष संस्था आहे. असे असूनही धर्म हा मानवी जीवनातून नेहेमीच हद्दपार केला जाऊ शकत नाही किंवा त्याला हद्दपार केलेच पाहिजे असेही नाही, ही वस्तुस्थिती भारतीय धर्मनिरपेक्षता मान्य करते.

केवळ धर्मविरोध, ईश्वरविरोध किंवा अध्यात्मिक जिज्ञासेचा विरोध यांसारख्या नकारात्मक दर्शनावर आधारली जाण्यात धर्मनिरपेक्षतेस जर समाधान वाटत असेल तर अशा प्रकारची धर्मनिरपेक्षता केवळ एक निष्क्रिय शक्ती होईल असे मला वाटावयास लागते. धर्मनिरपेक्षता ही जरी धर्मनिरपेक्ष अवस्था असली तरी ती काही नैतिक विचारांवर आधारलेली असते. म्हणून तर आपण बऱ्याच वेळा धर्मनिरपेक्ष नीती व सामाजिक सद्सद्विवेकबुद्धी यांचा उल्लेख करीत असतो. धर्मनिरपेक्षतेस स्फूर्ती देणारी जी आधुनिक उदारमतवादी श्रद्धा आहे ती असे मानते की प्रत्येक नागरिकाचे समाजाविषयी काही कर्तव्य असते. प्रत्येक नागरिकास समाजासंबंधी काही कर्तव्य असते अशा तऱ्हेची दृढ धारणा धर्मनिरपेक्षतेला नैतिक अंग पुरविते असे म्हणता येईल.

आपले संविधान संमत झाल्यानंतर नागरिकांच्या मूलभूत हक्कांसंबंधी आपण वरचेवर बरेचसे ऐकत आलो आहोत. परंतु त्या मूलभूत हक्कांवरच केवळ भर देऊन नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांविषयीच्या विचाराकडे जर आपण दुर्लक्ष केले तर त्यामुळे भारतीय ऐहिकतेचे (धर्मनिरपेक्षतेचे) चित्र अपूर्ण व अपयात झाल्याशिवाय राहाणार नाही. जीवन, स्वातंत्र्य व सुख यांचा पुरेपूर आस्वाद प्रत्येक नागरिकास घेता यावा यासाठी त्याला समर्थ करण्याची आकांक्षा ऐहिकतावाद

अवश्य धरतो व त्याला तशी मदतही करतो; परंतु या ध्येयाचा पाठपुरावा करताना, ऐहिकतावादाला मानणाऱ्या व्यक्तींना आपल्या इतर समाजबंधूंशी वागताना नैतिकतेच्या जाणिवेतून स्फूर्ती मिळालेली असली पाहिजे.

सामाजिक व आर्थिक समस्यांचा विचार करीत असताना धार्मिक काय आहे व अधार्मिक काय आहे, पाप कोणते व पुण्य कोणते याचा विचार त्यात घुसडण्यास धर्मनिरपेक्षता कडाडून विरोध करते. या समस्यांची चर्चा करताना समाजास हितकारक व चांगले काय आहे व सामाजिक दृष्ट्या वाईट व घातक काय आहे असा सर्वथैव उपयुक्ततेवर आधारलेलाच विचार केला जातो. आणि उपयुक्तता व अधिकांचे अधिक कल्याण यांचा विचार करीत असताना त्याबरोबर नीतितत्त्वांचा विचार अपरिहार्यपणे येतोच; अशा धर्मनिरपेक्षतेची नैतिक विचारापासून फारकत करता येत नाही. ह्याला **धर्मनिरपेक्षतेची—ऐहिकतावादाची—नीती** असे म्हणता येईल. यापासून समर्पणाची भावना व समाजसेवेची वृत्ती यांचा प्रादुर्भाव होतो. याप्रमाणे नागरिकांच्या केवळ हक्कांच्या विचारावरच धर्मनिरपेक्षता आधारलेली नसते; समाजाविषयी नागरिकांची जी कर्तव्ये असतात त्यांच्या जाणिवेपासूनही ती पोषण मिळवीत असते.

जरी संविधान सर्व धर्मांना स्वातंत्र्य देते तरी काही विशिष्ट परिस्थितीत काही बाबतीत धार्मिक रूढाचार हे सामाजिक व आर्थिक समस्यांवर आघात करू शकतात. अशा वेळी व अशा बाबतीत, ज्या ठिकाणी सामाजिक व आर्थिक प्रश्न अथवा हितसंबंध गुंतलेले असतात त्या ठिकाणी, समाजकल्याणाच्या रक्षणार्थ शासन-संस्थेस हस्तक्षेप करण्याचा हक्क राहील असेही संविधानाने स्पष्ट केले आहे.

सामाजिक व आर्थिक समस्यांचा विचार व उकल करण्यात बुद्धिवादी व शास्त्रीय दृष्टिकोनाचा अवलंब करण्याचा निर्धार हे भारतीय धर्मनिरपेक्षतेचे एक विशेष लक्षण आहे. कोणत्याही पवित्र ग्रंथाला आंधळेपणाने अनुसरणे अथवा त्याच्यावर विश्वासून राहाणे ही गोष्ट भारतीय धर्मनिरपेक्षतेस सर्वथा वर्ज्य आहे. मग तो पवित्र ग्रंथ मार्क्सचा असो की मनूचा असो. एखाद्या प्रमेयाच्या बाबतीत अनुकूल अथवा प्रतिकूल मत बनविताना ग्रंथप्रामाण्यावर अवलंबून राहाण्याची प्रवृत्ती मानवी मनात फारच प्रभावी असते; व म्हणून आपल्या समस्यांचा विचार करताना मुद्रित वचनाचे अथवा प्रमाणग्रंथाचे दडपण आपणावर पडू न देता स्वतंत्र आणि मूलगामी चिंतन करण्याची प्रवृत्ती लोकांच्या ठिकाणी वाढीस लावण्यासाठी बुद्धिमंतांनी सतत बुद्धिपुरस्सर प्रयत्न करीत राहाण्याची आवश्यकता आहे. न्यायालयात पूर्वीच्या खटल्यांच्या निकालांच्या स्वरूपात पूर्व दाखल्यांचा प्रभाव न्यायनिवाड्यांच्या दृष्टीवर इतका पडलेला असतो की एखाद्या विवाद्य बाबतीत कोणते मूलभूत मुद्दे अंतर्भूत आहेत ह्याचे पृथक्करण व चिंतन करण्याकडे न्यायाधीशांचा कल नसतो, ही गोष्ट कायदेपंडितांना माहीत आहे. पूर्ववर्ती उदाहरणांची किंमत

नाकारता येणार नाही. परंतु काही वेळा पूर्व-उदाहरणे युक्तायुक्तविवेक करणाऱ्या मनावर बंधन निर्माण करतात व अशी दृष्टी ही काटेकोरपणे बुद्धिवादी म्हणता येणार नाही; आणि म्हणून ती धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वज्ञानाशी विसंगत ठरते.

जाती हे हिंदू समाजाचे वैशिष्ट्य आहे व जातींच्या संरचनेवर धर्मनिरपेक्षतेचा जिव्हाळ्याचा परिणाम घडत आहे. सनातनी हिंदू लोक जाती ही एक धार्मिक संस्था होय असे मानतात; हिंदूंच्या समाजरचनेवर जर धर्मनिरपेक्षतेचा पूर्णपणे प्रभाव पडावयाचा असेल तर त्यांच्या ह्या कल्पनेचा संपूर्णपणे मूलोच्छेद झाला पाहिजे. सुरवातीस वेदकालात जातींची निर्मिती संभवतः व्यवसायांच्या पायावर झाली असावी. परंतु नंतर मात्र जाती वाढत गेल्या; जातिभेद जे वाढत गेले व जातींची संख्यावृद्धी झाली ती कर्मकांडविषयक कल्पनांमुळे. जाती व उपजाती अपरिहार्यपणे श्रेष्ठ व कनिष्ठ अशा भेदावर आधारलेली सामाजिक सोपानपरंपरा तयार करतात, व धर्मनिरपेक्षतेला पायाभूत असलेल्या समानतेच्या कल्पनेशी ही उच्चनीच भेदावर आधारलेली सोपानपरंपरा पूर्णपणे विसंगत ठरते. भारतात धर्मनिरपेक्षतेचे जे पुरस्कर्ते आहेत त्यांच्यापुढे जातींची समस्या हे एक आव्हान सतत खडे आहे. जाति-भेदातून उद्भवलेल्या उच्चनीचतेच्या भावनेमध्ये जी दुष्टता गर्भित आहे तिच्याविरुद्ध आपल्या देशातील प्रगतिशील बुद्धिमंतांनी जनतेचे मन शिक्षित केले पाहिजे आणि जातिभेद व लोकशाही या दोन गोष्टी एकत्र नांदू शकत नाहीत याविषयी जनतेच्या विवेकबुद्धीची खात्री पटविली पाहिजे.

मला आठवते की जेव्हा लोकसभेत हिंदू कोड बिलावर वाद चालू होता तेव्हा काही पुराणमतवादी हिंदूंनी वरकरणी आकर्षक असा एक युक्तिवाद केला होता की एखादे मुलकी कोड तयार करावयाचे असेल तर ते भारतातील सर्व जमातींना लागू करण्यात यावयास पाहिजे. असा युक्तिवाद करण्यामागे त्यांचा हेतू हे कोड मुसलमानांना लागू करण्यात यावे असे म्हणण्याचा नव्हता, तर त्या कोडाच्या मार्गात अडचणी निर्माण करण्याचा, शक्य झाल्यास ते हाणून पाडण्याचा होता. हिंदू कोडाच्या पुरस्कर्त्यांना मात्र योग्य दिशेने पहिले पाऊल टाकावयाचे होते. या बाबतीत मुसलमान जमातीचे मत पुरेसे शिक्षित झालेले नव्हते व त्यामुळे मुसलमान समाजाला या मुलकी कायद्याच्या कक्षेत आणणे अव्यवहार्य ठरले असते ह्याची त्यांना चांगली जाणीव होती. त्यावेळी सुधारकांनी ते कोड पहिले पाऊल या नात्याने हिंदूंच्यासाठीच म्हणून मर्यादित करण्यात जो दृष्टिकोन अंगीकारला तो धर्मनिरपेक्षतेचे एक दुसरे अंग होय. ते असे की देशाच्या सामाजिक जीवनात स्वतःचे तत्त्वज्ञान प्रस्थापित करण्यासाठी ऐहिकतावाद (धर्मनिरपेक्षता) व्यवहार्य दृष्टिकोनाचा अंगीकार करतो.

धर्मनिरपेक्षता कोणत्याही ऐकान्तिक तत्त्वावर विश्वासून राहात नाही. सामाजिक व आर्थिक समस्यांना तोंड देण्यात परस्परांशी स्पर्धा व संघर्ष करणाऱ्या तत्त्वांमध्ये

मेळ निर्माण करावा लागतो ह्याची तिला जाणीव असते; म्हणून हिंदू तत्त्वज्ञानाला सुसंगत राहून सुसंवादी समन्वयाची तत्त्वे उत्क्रांत करण्याचा धर्मनिरपेक्षता प्रयत्न करीत असते. या सुसंवादी मेळ घालण्याच्या तत्त्वाला संस्कृतात 'समन्वय' असे म्हणतात. स्पर्धा करणाऱ्या भिन्नभिन्न संकल्पनांमध्ये काही सामाजिक सत्याचा अंश असू शकतो हे तत्त्व गृहीत धरून समन्वयाचे तत्त्वज्ञान मार्गक्रमण करीत असते. जेव्हा धर्मनिरपेक्षता एखाद्या श्रद्धेय मतावर ते अंतिम निरपेक्ष सत्य म्हणून विश्वास ठेवण्यास नकार देते तेव्हा तिची दृष्टी समन्वयाची असते. खरे पाहता जसजसे सामाजिक व आर्थिक प्रश्नांसंबंधी आपणास अधिकाधिक कळू लागते तसतसे आपण कमी कमी मताग्रही बनू लागतो, ही गोष्ट प्रगतिशील बुद्धिमंतांना पटते. आणि ज्यांना धर्मनिरपेक्षतेचा प्रसार करावयाचा आहे अशा प्रगतिशील बुद्धिमंतांच्या ठिकाणी हा दृष्टिकोन अपरिहार्यपणे विनयाची भावना निर्माण करतो. मानवी बुद्धी स्खलनशील असते ह्याची जाणीव असणे, सत्य हे एखाद्या विशिष्ट दृष्टिकोनाची मक्तेदारी नसते याची जाणीव असणे व कोणत्याही धर्ममतास किंवा श्रद्धेस आंधळेपणाने बळी पडावयाचे नाही असा खंबीर निर्धार असणे ही धर्मनिरपेक्ष दृष्टीची प्रमुख लक्षणे आहेत; सर्व प्रगतिशील बुद्धिमंतांनी ही अंगीकारावयास पाहिजेत.

भारतात आजच्या संदर्भात धर्मनिरपेक्षतेच्या प्रश्नास विशिष्ट महत्त्व आहे. पाकिस्तानने काश्मीरवर केलेल्या नागड्या आक्रमणाने आपल्या देशात आणीबाणीची परिस्थिती निर्माण केलेली आहे; व ह्या आणीबाणीत आपणास युद्धाच्या एका गंभीर दिव्यास तोंड द्यावे लागले आहे. परंतु आपल्या कसोटीचा क्षण हा आपल्या गौरवाचाही क्षण ठरला आहे. पाकिस्तानच्या आक्रमक कृत्याच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी भारतातील सर्व जमाती एका माणसाप्रमाणे सिद्ध झाल्या ही गोष्ट आता संदेहातीत रीतीने प्रस्थापित झाली आहे. आपल्या देशाविषयीच्या अविचलित भक्तीने या लढाईत समरभूमीवर आपल्या देशातील मुसलमान, पारशी, ख्रिश्चन आणि हिंदू हे सर्व लढले, यामुळे आम्हांला अत्यंत अभिमान वाटून आमची मने थरारून गेली. अशा प्रकारची निष्ठा सर्व जमातींच्या लोकांना वाटण्याचे मुख्य कारण असे आहे की आपल्या देशातील सर्व नागरिकांना माहीत आहे की त्यांचा धर्म कोणताही असला तरी धर्मनिरपेक्षता व कायदा यांच्या दृष्टीला सर्व नागरिक समानच वाटतात, व देश त्या सर्वांकडे ते प्रथम भारतीय, नंतर भारतीय व शेवटी भारतीय म्हणूनच पाहातो.

हल्लीच्या आणीबाणीच्या परिस्थितीत, मला असे वाटते की, सर्व प्रगतिशील बुद्धिमंतांनी धर्मनिरपेक्षांतेच्या या तत्त्वाचा प्रचार करावा आणि ते लोकप्रिय करावे; त्याच्या सर्व बाजू व पैलू लोकांना विशद करून सांगावे. सर्व बुद्धिमंतांचे हे कर्तव्य आहे. धर्मनिरपेक्ष असलेली भारतीय लोकशाही या देशात सामाजिक व आर्थिक

न्याय कायद्याच्या साहाय्याने प्रस्थापित करण्यासाठी बद्धपरिकर झालेली आहे हे आपण सर्व लोकांना स्पष्ट करून सांगावयास पाहिजे.

या संदर्भात 'क्रियाशील विधिशास्त्रास' निर्णायक कार्य करावयाचे आहे. कायदा हा सामाजिक व आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याचे एक साधन आहे व डीन पाउंडच्या अभिजात शब्दात सांगावयाचे झाल्यास तो "सामाजिक अभियांत्रिकीची एक शाखा आहे." कायद्याचा गुरुत्वमध्य हा कायदेमंडळे किंवा न्यायालये यांमध्ये नसून लाखो नागरिकांच्या अतृप्त पण न्याय्य अशा इच्छा व आकांक्षा यांच्यामध्ये आहे. लोकांच्या इच्छा व आकांक्षा यांची तृप्ती करण्यात कायदा पुढाकार घेतो व दारिद्र्य, अज्ञान, बेकारी ह्यांच्या समस्या विशुद्ध ऐहिकतेच्या रीतीने सोडविण्याचा उपक्रम करतो. भूक ही जमात किंवा धर्म जाणत नाही. आणि दारिद्र्य, अज्ञान किंवा रोगराई यांचा प्रश्न सर्वव्यापी असतो. तो कोणत्याही एका जमातीपुरता किंवा धर्मापुरता मर्यादित नसतो. याकरिताच कायदा धर्मनिरपेक्ष असावा लागतो व अशा रीतीने कायद्याच्या मदतीने भारतीय लोकशाही आपले स्वप्न साकार करण्याची आशा बाळगते.

तरीपण आपण हे लक्षात ठेविले पाहिजे की लोकशाहीच्या हातात कायदा हे जरी शक्तिशाली शस्त्र असले तरी केवळ कायदा आपले उद्दिष्ट साध्य करू शकणार नाही. त्याला लोकांच्या विवेकबुद्धीचे पूर्ण सहकार्य मिळावयास पाहिजे आणि लोकांची ही विवेकबुद्धी प्रगतिशील बुद्धिमंतांनी जागृत केली पाहिजे. लोकांच्या विवेकबुद्धीला आवाहन करताना ऐहिकतावाद संपूर्णतः भौतिक लाभाच्या दृष्टीवर विसंबून राहाणार नाही; तो आपल्या नागरिकांना सामाजिक व आर्थिक न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करील यात शंका नाही; परंतु धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व प्रतिपादण्यात व सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या उद्दिष्टास पाठिंबा देण्यात सर्व प्रगतिशील बुद्धिमंतांना लोकनीतीकडून स्फूर्ती मिळावयास पाहिजे. धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व व सामाजिक व आर्थिक न्यायाचे ध्येय प्रत्येक नागरिकाच्या जीवनाचा व तत्त्वज्ञानाचा एक भाग बनला पाहिजे, व जर प्रगतिशील बुद्धिमंत या कामात पुढाकार घेतील तरच हे साध्य होऊ शकेल.

मी ह्या चर्चासत्रास यश चिंतितो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम..... वि: .....
प्रति ..... दि: .....

६

भारतीय संविधान आणि ऐहिकतावाद (धर्मनिरपेक्षता)

प्रास्ताविक

आज या पदवीदानाच्या समारंभात सहभागी होण्यास मला अतिशय आनंद होत आहे. प्रख्यात कुलगुरूंचे साहाय्य मिळण्याच्या बाबतीत राजस्थान विद्यापीठ भाग्यशाली ठरले आहे. कुलगुरुमहाशय, आपल्या कारकीर्दीत या विद्यापीठाने खूप प्रगती केली आहे. आपल्या गतिमान, प्रगतिशील व प्रबुद्ध नेतृत्वाने भारतातील इतर विद्यापीठांमध्ये आपल्या विद्यापीठास मानाचे स्थान प्राप्त करून देण्यास बरेच साहाय्य केले आहे. या विद्यापीठात तरुण विद्यार्थ्यासंगी पंडित आपापल्या विषयात विद्याध्ययनाला वाहून घेण्याच्या भावनेने प्रविष्ट झाले आहेत व त्यांच्या अविश्रांत श्रमांचा परिणाम म्हणून भारतातील विद्याप्रेमी जग राजस्थान विद्यापीठाकडे मार्गदर्शनाच्या अपेक्षने बघत आहे, आणि विद्येतील संशोधन व कार्य यांच्या सर्व प्रगतिशील मार्गांमध्ये या विद्यापीठातील विद्वान मंडळींच्या कडून नेतृत्वाची अपेक्षा करीत आहे. म्हणून यावर्षी येथील पदवीदान समारंभप्रसंगी भाषण करण्याची संधी मिळाल्याबद्दल मला माझा विशेष गौरव झाल्यासारखा वाटतो.

प्राचीन भारतातील विद्यापीठे

आधुनिक काळातील विद्यापीठीय शिक्षणाची परंपरा प्राचीन भारतीय विद्यापीठांकडे योग्य अशा अभिमानाने पाहू शकते. नालंदा व तक्षशिला यांची स्मृती आपल्या डोळ्यांसमोर विद्यापीठीय जीवनासंबंधीचे स्फूर्तिदायक आणि उत्साहकारक चित्र उभे करते. ज्ञानाच्या सर्व शाखांत ज्ञान मिळविण्याच्या निर्धाराने भारताच्या सर्व भागातील विद्यार्थी त्या विद्यापीठांत जमा होत. प्राचीन भारतीय विद्यार्थ्यांच्या ठिकाणी जोमदार जिज्ञासू वृत्ती आणि ज्ञानप्राप्तीसाठी खडतर कष्ट

करण्याची तयारी प्रकर्षाने दिसून येत असे. अशा तऱ्हेच्या विद्यार्थ्यांच्या वृत्तीला त्यावेळच्या शिक्षणाच्या प्रसाराला वाहून घेतलेल्या शिक्षकांकडून हार्दिक साद मिळत असे. आपल्या विषयात आपल्याला जे जे माहीत असेल ते ते सर्व आपल्या विद्यार्थ्यांना देण्याची सुसंधी मिळणे, यापेक्षा जीवनात इतर काही पारितोषिक किंवा अनुग्रह मिळण्याची त्यांना कधी अपेक्षा नसे. प्राचीन भारतीय विद्यापीठातील वातावरण अद्भुतरम्य असे व ज्या जिज्ञासावृत्तीमुळेच केवळ विद्यापीठाला समाजाच्या जीवनात मानाचे स्थान प्राप्त होते अशा वृत्तीला पोषक असे.

प्राचीन भारतात विद्वत्तेला मानाचे स्थान असे. ज्या प्रसिद्ध संस्कृत कवितेत राजकीय शक्ती व विद्वत्ता यांची तुलना केलेली आहे आणि असंदिग्ध शब्दात विद्वत्तेची श्रेष्ठता व तिच्या प्रख्यातीची चिरकालिकता घोषित केली आहे ती कविता तुम्हांला माहीत आहे :

विद्वत्वं च नृपत्वं च नैव तुल्यं कदाचन ।
स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ॥

प्राचीन भारतात शिक्षणासाठी जे प्रयत्न झाले त्यांवरून आपणास पुष्कळ शिकण्यासारखे आहे; आणि म्हणून आज राजस्थान विद्यापीठाच्या तरुण पदवीधरांसमोर भाषणास उभा असता त्या प्राचीन कालात भारतीय कुलपती आपल्या तरुण स्नातकांना उद्देशून जो विवेकवचनांचा उपदेश करीत असत तो मी आठवण्याचा प्रयत्न करतो. ते कुलपती म्हणत—

"सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायात् मा प्रमदः ।
सत्यात् न प्रमदितव्यम् । धर्मात् न प्रमदितव्यम् ।
कुशलात् न प्रमदितव्यम् ।"

सामाजिक सत्यापासून कधी ढळू नका, कर्तव्याच्या मार्गापासून कधी च्युत होऊ नका, सामाजिक कल्याणापासून कधी परावृत्त होऊ नका हे त्यांच्या उपदेशाचे सार आहे. हे शब्द आठवून मी मला स्वतःला विचारतो की आजच्या तरुण पदवीधरांचा सामाजिक धर्म किंवा कर्तव्य कोणते असू शकेल ? आणि जे उत्तर देण्याचा मला मोह होतो ते असे की ऐहिकतावादाचे अनुसरण करणे ही आजच्या घडीची हाक आहे. आणि आजच्या तरुण पदवीधरांनी या मार्गापासून कधी परावृत्त होऊ नये अशी माझी इच्छा आहे. आणि म्हणूनच मी आज माझ्या व्याख्यानाचा विषय **'भारतीय संविधानातील ऐहिकतावाद'** असा निवडला आहे.

ऐहिकतावाद उर्फ धर्मनिरपेक्षता

सध्या **ऐहिकतावाद उर्फ धर्मनिरपेक्षता** या विषयामध्ये राजकीय महत्त्वाच्या भावनापूर्ण लढाऊ अधिस्वरांचा भरणा झालेला आहे; त्यामुळे त्या विषयाचा वस्तुनिष्ठ

रीतीने शांतपणे विचार करणे काहीसे अवघड झाले आहे. भारतात धर्मनिरपेक्षतेचा एक राजकीय संकल्पना म्हणून जन्म झाला. भारतातील प्रमुख दोन जमातीत एक प्रकारचे ऐक्यतत्त्व प्रस्थापित करण्याचा एक मनःपूर्वक प्रयत्न या संकल्पनेने केला. आपल्या राजकीय स्वातंत्र्य–लढ्याच्या कालात व भारत स्वतंत्र झाल्यानंतर अधिक विशेषत्वाने धर्मनिरपेक्षतेच्या ह्या सिद्धान्ताचा मुख्यत्वेकरून राजकीय पातळीवर तत्परतेने, बुद्धिपुरस्सर आणि भक्तिपूर्वक पाठपुरावा केला जात आहे. ह्याच सिद्धान्ताने आपल्या राष्ट्राला मध्ययुगीन द्विराष्ट्रवादाच्या उपपत्तीचा प्रतिकार करण्यास स्फूर्ती देऊन समर्थ केले आहे. आमचा असा विश्वास आहे की नागरिकांच्या धर्मावर आधारलेल्या द्विराष्ट्रवादाच्या उपपत्तीला अनेक वंश, अनेक भाषा, अनेक धर्म यांनी बनलेला भारतीय समाज कधीही मान्यता देऊ शकत नाही. हा सिद्धान्त नुकत्याच निर्माण झालेल्या आणीबाणीच्या कसोटीला उतरला आहे; व आपल्या परीक्षेच्या क्षणी, जेव्हा आक्रमकाने काश्मीरवर आक्रमण केले व भारताचे सार्वभौमत्व व ऐक्य ह्यांना आव्हान दिले तेव्हा सर्व जमाती, सर्व धर्म, सर्व जाती व सर्व संप्रदाय हे जणू काही एकच व्यक्ती अशा स्वरूपात त्या आव्हानाला तोंड देण्यासाठी सज्ज होऊन उभे राहिले तेव्हा आपणास अभिमानाने ऊर भरून येण्यासारखे प्रेक्षणीय दृश्य दिसले. साहजिकपणे आपणा सर्वांना असेच वाटते की जी आपल्या परीक्षेची घटका होती ती आपल्या गौरवाची पण घटका ठरली; आणि तिने धर्म-निरपेक्षतेच्या सिद्धान्तावर भावनिक व समरोचित अधिस्वरांची झूल चढविली आहे. आज धर्मनिरपेक्षतेच्या सिद्धान्तावर माझे विचार व्यक्त करण्यात माझा उद्देश त्या प्रश्नाच्या चर्चेला त्याच्या मूलभूत व व्यापक सामाजिक तत्त्वज्ञानावर यथार्थपणे पुनः-स्थापित करावे, हा आहे. त्या दृष्टीने पाहिल्यास धर्मनिरपेक्षता हा केवळ राजकीय सिद्धान्त नाही व तो ह्या देशाच्या फक्त व हिंदू मुसलमान यांच्यापुरताच मर्यादित नाही. तो भारतातील सर्व जमातींना आपल्या कवेत घेणारा असा एक व्यापक सामाजिक व आर्थिक सिद्धान्त आहे आणि त्याचा स्वतःचा असा एक क्रियात्मक संदेश आहे.

मानवी विचाराच्या विकासाचा इतिहास असे दाखवितो की काही वेळा स्फूर्तिप्रद व युगप्रवर्तक कल्पना लोकांच्या भ्रान्त संकल्पना व अंधश्रद्धा यांच्या चौकटीत अडकून पडतात; अशा प्रसंगी लोकांच्या भ्रान्त संकल्पनांच्या बंधनातून त्यांची सुटका करणे व त्यांचे खरे क्रांतिकारक स्वरूप व अर्थ सर्वसामान्य जनतेला स्पष्ट करून सांगणे अवश्य असते. आज धर्मनिरपेक्षतेच्या विषयावर चार शब्द बोलण्यात भारताच्या संविधानात अंतर्भूत असलेल्या धर्मनिरपेक्षतेच्या मूलभूत व सारभूत संकल्पनांचे वर्णन करण्याचा प्रयत्न करावा असा माझा हेतू आहे.

धर्मनिरपेक्षता ईश्वरविरोधी किंवा धर्मविरोधी नाही

पश्चिम युरोपात होल्योक हा धर्मनिरपेक्षतेचा जनक समजला जातो. सुमारे

१८४६ साली त्याने धर्मनिरपेक्षतेच्या विचारसरणीचा प्रचार करण्यास सुरवात केली आणि आपल्या *Principles of Secularism* आणि *The Origin and the Nature of Secularism* या ग्रंथांत त्याने त्याची प्रमुख तत्त्वे मांडली. धर्माला शासनसंस्थेपासून वेगळे करण्याच्या इच्छेतून ही चळवळ निर्माण झाली. ती प्रामुख्याने जडवादी व बुद्धिप्रधान अशी होती. शासनसंस्थेच्या सामाजिक व आर्थिक व्यवहारांवर धर्माचे प्रभुत्व स्थापित होण्याकडे कल झुकू लागला असे सामाजिक विचारवंतांना वाटले; आणि म्हणून धर्मापासून पूर्णपणे फारखत करून घेण्याच्या त्यांच्या इच्छेतून धर्मनिरपेक्षतेचा जन्म झाला. एम्. एन्. रॉय हे त्या काळचे एक आघाडीचे बुद्धिवादी व धर्मनिरपेक्षतावादी गृहस्थ होते; त्यांना शासनसंस्थेने आपल्या नागरिकांना अनेक भिन्न धर्म अथवा धार्मिक सिद्धान्त यांतून निवड करण्याचे स्वातंत्र्य देण्याऐवजी सर्व धर्मांच्या जुलमापासून मुक्त होण्याचे स्वातंत्र्य मानवी मनाला द्यायला पाहिजे होते. रशियात साम्यवादाच्या प्रारंभीच्या दिवसांत धर्माला एकप्रकारची अफू समजण्यात येई आणि साम्यवादी शासन-संस्थेने धर्मापासून संपूर्णपणे फारखत झालेल्या धर्मनिरपेक्ष राज्याचा प्रकार निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्या अवस्थेत साम्यवादाच्या परंपरागत दृष्टिकोनावर आधारलेल्या शासनसंस्थेच्या कार्यास प्रेरणा देणारे जे तत्त्वज्ञान होते ते धर्माला शासनसंस्थेपासून निराळा काढून त्याला एकटा सोडण्यास तयार नव्हते; धर्मनिर-पेक्षतेच्या खऱ्या जडतावादी आशयाची अभिवृद्धी साधण्यासाठी धर्माविषयी प्रतिकूलता दाखवून धर्मविरोधी मतांना प्रोत्साहन द्यावयास पाहिजे असे त्याला वाटे. जडतावादी धर्मनिरपेक्षतेविषयीचा हा उत्कट उत्साह धर्मविरोधी भाव, आणि केव्हा केव्हा धर्माचा द्वेष, यांच्या रूपाने व्यक्त होत असे. धर्माला जगू दिले जात होते हे खरे, पण ते बऱ्याचशा अनिच्छेने. धर्म व धर्माचरण यांवर कडक नियंत्रण चालविण्यात येई व लोकांच्या मनांत धर्माविषयीच्या निष्ठेच्या वाढीला दाबून टाकणे हे त्यावेळचे उद्दिष्ट असे.

भारतातील धर्मनिरपेक्षता अशा प्रकारची संकुचित व चढाईखोर नाही. डॉ. राधाकृष्णन् म्हणतात—"मला अधिकृत रीतीने असे सांगायचे आहे की धर्मनिरपेक्षता म्हणजे अधर्म नाही. तिचा अर्थ, सर्व धर्म व सर्व श्रद्धा यांविषयी आम्हाला आदर वाटतो, असा आहे. आमची शासनसंस्था कोणत्याही विशिष्ट धर्माशी एकरूप होत नाही." गांधीजी यापुढे आणखी एक पाऊल जाऊन म्हणत असत की सर्व धर्म खरे आहेत व "माझ्या धर्माविषयी मला जेवढा आदर आहे तेवढाच मला इतर धर्मांविषयीही आदर आहे" अशी आपल्या म्हणण्याला ते पुस्ती जोडीत. भारतीय धर्मनिरपेक्षतेची ही बाजू हिंदू तत्त्वज्ञान व नीतिशास्त्र यांच्याशी सुसंगत आहे. भगवद्गीतेने उत्कटतेने पुरस्कारलेला सिद्धान्त आपणा सर्वांना माहीत आहे. भगवद्गीता म्हणते—

येऽप्यन्यदेवताभक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः।
तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम् ॥

हे तत्त्व ही गोष्ट मान्य करते की सत्यशोधनाचे अनेक मार्ग आहेत व सत्य हे कोणाही एका धर्माची मक्तेदारी नाही. भगवान् श्रीकृष्ण म्हणतात, "जो आपल्या धर्माच्या तत्त्वांचे श्रद्धेने व बुद्धिमत्तेने पालन करतो तो शेवटी मला येऊन मिळतो." हिंदू जीवनमार्गाप्रमाणे जगातील तत्त्वज्ञानी व ऋषी यांनी उपदेशिलेले सर्व मार्ग सत्याचा साक्षात्काराकडे नेतात. ह्या प्रशस्त, सर्वव्यापी व प्रगतिशील हिंदू तत्त्वज्ञानावर भारतीय धर्मनिरपेक्षता आधारलेली आहे.

तत्त्वतः धर्मनिरपेक्षता ही धर्मविरहित, धर्मविरोधी व संशयवादी असू असते; परंतु धर्मनिरपेक्षतेविषयी भारताचा दृष्टिकोन अशी अकरणात्मक भूमिका घेत नाही. भारतीय धर्मनिरपेक्षता धर्माचे अस्तित्व व गरज मान्य करते, परंतु त्याचबरोबर ती धर्माला शासनसंस्थेपासून व तिच्या सामाजिक—आर्थिक क्रियाकलापापासून वेगळा करण्याचा प्रयत्न करते. भारतीय धर्मनिरपेक्षतेची ही भावरूप बाजू आहे.

मानवी जीवनात धर्म आणि तत्त्वज्ञान यांचे स्थान

पार्सन्स म्हणतो—"अस्तित्वाचा बोधात्मक अर्थ, सुख व दुःख, शिव आणि अशिव यांचा अर्थ, हे धर्माचे मध्यवर्ती प्रश्न आहेत. तथापि आत्मैक्य, जबाबदाऱ्या व कर्तव्ये यांसाठी स्वतःच्या व्यक्तित्वाच्या अन्तर्यामी केंद्राशी संबंधित असलेली धर्म ही वैयक्तिक बाब असते व तशीच ती मानली पाहिजे." मानवी जीवनाचा अंतिम हेतू कोणता हे जाणण्याची इच्छा असणे, मृत्यूनंतरच्या जीवनाचे स्वरूप कोणते असते या निरंतर आव्हान देणाऱ्या प्रश्नाच्या अंतर्यामात डोकावण्याची इच्छा वाटणे, जो मानववंशाच्या नियतीवर अधिराज्य चालवितो असा कोणी या सृष्टीचा निर्माता आहे की काय अशी पृच्छा करण्याची इच्छा वाटणे; या सर्व गोष्टी मानवाच्या मनात मुळातच रुजलेल्या असतात; आणि सनातन सत्याचा उत्कटतेने शोध करण्याच्या वृत्तीतून सर्व धर्म व तत्त्वज्ञाने यांचा उगम होत असतो. पंडित जवाहरलाल नेहरू हे स्वतंत्र भारतात भारतीय धर्मनिरपेक्षतेचे अत्यंत मोठे उद्‌गाते होते व त्यांचा दृष्टिकोन हा संपूर्णपणे बुद्धिनिष्ठ होता. त्यांनी स्वतः सनातन सत्याच्या या शोधासंबंधी अत्यंत हृदयस्पर्शी उद्गार काढले आहेत. ते म्हणतात, "व्यक्तीला विज्ञानाच्या वृत्तीने व भूमिकेवरून जीवनास तोंड द्यावे लागत असते; तिचा तत्त्वज्ञानाशी संबंध असतो व तिला जीवनाच्या पलीकडे जे काही आहे त्याविषयी पूज्यभाव असतो." या 'पलीकडच्या'विषयी नेहरूंनी पुढील उद्‌गार काढले आहेत, "बऱ्याच वेळा जेव्हा मी जगाकडे बघतो तेव्हा मला रहस्यांची व अज्ञात अशा गंभीरतेची संवेदना होते. मला शक्य होईल तोपर्यंत त्याच्याशी एकरूप होऊन त्याच्या समृद्धीचा अनुभव घेण्याच्या द्वाराने त्याचे

आकलन करून घेण्याची मला इच्छा होते." सर्व संवेदनाशील मानवी मनांना भिडणारा हा पूज्यभाव आणि दुर्दम्य व निकोप जिज्ञासा यांची उपेक्षा करता येत नाही; आणि म्हणून भारतीय धर्मनिरपेक्षता ही धर्माच्या प्रश्नासंबंधी नकारात्मक किंवहुना निष्क्रिय दृष्टिकोनाचा अवलंब करीत नाही. ती धर्माविषयी निःसंशयपणे पूज्यभाव बाळगते, परंतु धर्माने आपल्या न्याय्य कक्षेतच आपली हालचाल मर्यादित केली पाहिजे असाही तिचा निर्धार आहे. तिचा असा आग्रह आहे की आधुनिक समाजाला ज्या सामाजिक–आर्थिक समस्यांना तोंड द्यावयाचे आहे त्यांच्या चर्चेत अथवा निर्णयात धर्माने आपल्या मर्यादा सोडून अपप्रवेश करता कामा नये; व नागरिकांचे सामाजिक–आर्थिक वर्तन कसे असावे हे ठरविण्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रयत्न त्याने करू नये. जेथपर्यंत धर्म आपल्या न्याय्य सीमेत राहील तेथपर्यंत धर्मनिरपेक्षता त्याविषयी अत्यंत कटाक्षाने तटस्थ राहील.

नागरिकाचा धर्म व त्याच्या धर्माच्या शिकवणीप्रमाणे त्याची प्रार्थनेवरील श्रद्धा ह्या गोष्टी तो व त्याचा ईश्वर यांच्यातील वैयक्तिक बाब आहे असे धर्मनिरपेक्षता मानते. शासनसंस्थेचा नागरिकाच्या धर्माशी काही संबंध नाही; व म्हणून त्याच्या पूजेची स्थाने मग ती चर्चे, मंदिरे, मशिदी किंवा गुरुद्वारे कोणतीही असोत—त्यांच्याविषयी शासनसंस्था सारख्याच सहिष्णुतेची भावना धारण करीत असते; परंतु कोणतीही सक्रिय आस्था मात्र दाखवीत नाही. ही भारतीय धर्मनिरपेक्षतेची दुसरी बाजू आहे.

एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे की 'धर्मनिरपेक्ष' किंवा 'धर्मनिरपेक्षता' हे शब्द भारताच्या संविधानात कोठेही वापरलेले नाहीत; तरीही संविधानातील बहुधा प्रत्येक महत्त्वाच्या व अर्थपूर्ण उपबंधात धर्मनिरपेक्षतेची संकल्पना सर्वत्र व्यक्त झालेली आहे. संविधानाने भारताच्या नागरिकांना कल्याणकारी राज्य प्रस्थापित करण्याचे अभिवचन दिलेले आहे, व असेही गंभीर वचन दिले आहे की या देशात सामाजिक, राजकीय व आर्थिक न्यायाचा सदैव विजय होईल व त्याचाच अधिमान राहील. या ध्येयाने संपूर्ण भारतीय संविधान धर्मनिरपेक्षतेच्या स्फूर्तिप्रद दीप्तीने उजळवून टाकले आहे.

भारतीय नागरिकत्व हे शुद्ध व संपूर्णतया धर्मनिरपेक्ष स्वरूपाचे आहे. नागरिकांना ज्या मूलभूत हक्कांची हमी दिलेली आहे आणि जी मूलभूत कर्तव्ये त्या हक्कांत अपरिहार्यपणे गर्भित आहेत, ते हक्क आणि ती कर्तव्ये नागरिकत्वातून प्राप्त झालेली आहेत, व त्या बाबतीत नागरिकाची जमात, जात, धर्म, भाषा, लिंग यांसंबंधीचा कोणताही प्रश्न पूर्णतया अप्रस्तुत ठरतो. मूलभूत हक्कांच्या ज्या पायाभूत संकल्पनेचा भारतीय संविधानाला वाजवी अभिमान वाटावा ती ही की कायद्यासमोर सर्वजण सारखे आहेत आणि कायद्याने सर्वांना समान संरक्षण दिलेले आहे अशी नागरिकांना हमी देण्यात आलेली आहे. ही हमी घटनेच्या १४ व्या

कलमात ग्रथित करण्यात आली आहे. एका अर्थाने ही संरक्षणाची समता हे भारतीय संविधानाचे पायाभूत अधिष्ठान आहे. समतेच्या ह्या मूलभूत संकल्पनेपासून इतर मूलभूत हक्क निष्पन्न होतात व मूलभूत हक्कांचा हा भव्य विस्तार भारतीय संविधानाचे धर्मनिरपेक्ष स्वरूप स्पष्टपणे व निःसंदिग्धपणे व्यक्त करतो. या धर्म-निरपेक्ष स्वरूपाचा विस्तार सर्वस्पर्शी असा आहे व तो आपले हितकारी संरक्षण केवळ हिंदू व मुसलमान यांनाच देतो असे नव्हे, तर असे संरक्षण तो या देशातील सर्वच जमाती व धर्म यांना देतो, ही गोष्ट स्पष्ट आहे. हा देश ही एक अनेक धर्मांची, अनेक भाषांची व अनेक जमातींची भूमी आहे; आणि संविधानाने देशाच्या सर्व नागरिकांना सारखेच मूलभूत हक्क दिलेले आहेत. त्याचा अनिवार्य उपसिद्धांत म्हणून संविधान देशाच्या सर्व नागरिकांकडून भारताचे ऐक्य व अखंडता यांविषयी सारखीच निष्ठा अपेक्षिते, व राष्ट्राची जी सामाजिक–आर्थिक न्यायाकडे आगेकूच चालली आहे तिला साहाय्य करण्याच्या त्यांच्या मूलभूत कर्तव्याचीही ते नागरिकांकडून अपेक्षा करते.

धार्मिक स्वातंत्र्याचा सिद्धान्त—
संविधानाचे अनुच्छेद २५, २६, आणि ३०.

या तत्त्वज्ञानाला सुसंगतपणे अनुसरून भारतात जे धर्म लोकांच्या आचरणात आहेत त्यांना समान संरक्षण मिळण्यासाठी घटनेने काही विशेष तरतुदी केलेल्या आहेत. २५ वा अनुच्छेद सदसद्विवेक बुद्धीचे स्वातंत्र्य व धर्माचे मोकळेपणाने प्रकट कथन, मुक्त आचरण व मुक्त प्रसार यांची हमी देतो; २६ वा अनुच्छेद धार्मिक व्यवहार संभाळण्याचे स्वातंत्र्य देतो. हे दोन अनुच्छेद सर्व धर्मांना समान स्वातंत्र्य देतात; परंतु या संरक्षणाच्या बाबतीत सर्वात अधिक महत्त्वाचा भाग असा आहे की हे संरक्षण काही मूलभूत व अधिभावी विचारितांच्या अधीन आहे. २५ (१) या अनुच्छेदात अशी तरतूद आहे की—"नीती, सार्वजनिक सुव्यवस्था, आरोग्य व या भागातील इतर तरतुदी यांना अधीन राहून सर्व लोकांना सारख्याच रीतीने सदसद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे प्रकट कथन, धर्माचे आचरण व धर्माचा प्रसार यांचे मुक्त स्वातंत्र्य उपभोगण्याचा हक्क राहील." या अनुच्छेद-खंडाच्या सुरवातीच्या शब्दांकडे लक्ष द्या. त्यांवरून असे स्पष्टपणे दिसून येईल की जर धर्म, त्याचे प्रकट कथन, त्याचा आचार व त्याचा प्रचार यांत आणि सार्वजनिक सुव्यवस्था किंवा नीती किंवा आरोग्य किंवा तिसऱ्या भागातील इतर तरतुदी यांत जर संघर्ष उत्पन्न झाला तर अशा वेळी आधी सांगितलेल्या गोष्टींवर पश्चादुक्त गोष्टी अधिभावी होतील. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास संविधानाने असे स्पष्टपणे जाहीर केले आहे की धर्माने आपल्या न्याय्य मर्यादांच्या कक्षांतच कार्य केले पाहिजे आणि शासनसंस्थेच्या सामाजिक–आर्थिक कार्यक्षेत्रात अपप्रवेश करता कामा

नये. ह्या सामाजिक–आर्थिक कृती सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या आहेत आणि या ध्येयाकडे वाटचाल करण्याच्या रूपाने समतावादी कल्याणकारी राज्याचा दर्जा प्राप्त करून घेण्याच्या धाडसी मोहिमेस शासनसंस्थेने सुरवात केली आहे. या ध्येयाच्या वाटचालीत सार्वजनिक सुव्यवस्था महत्त्वाची आहे; नीतिमत्ता महत्त्वाची आहे; आरोग्य महत्त्वाचे आहे; आणि मूलभूत हक्क महत्त्वाचे आहेत. त्यांचे महत्त्व अधिभावी आहे व धर्माला त्यांच्यावर आक्रमण करू दिले जाणार नाही.

जी भूमिका अनुच्छेद २५(१)च्या सुरवातीच्या शब्दांत गर्भित आहे ती २५ व्या अनुच्छेदाच्या २ ऱ्या खंडाने आणखी स्पष्ट केली आहे. पहिल्या खंडाने दिलेली धार्मिक स्वातंत्र्याची हमी, ज्या आर्थिक, अर्थशास्त्रीय, राजकीय किंवा इतर धर्मनिरपेक्ष कृती धर्माचरणाशी सहयोगी असतील त्यांचे नियमन व निर्बंधन करण्यासाठी कायदे करण्याला राज्याला प्रतिबंध करू शकणार नाही तसेच सामाजिक कल्याण व सुधारणा करण्यास किंवा सार्वजनिक स्वरूपाच्या हिंदू धार्मिक संस्थात, हिंदूंच्या सर्व वर्गांना व शाखांना मुक्त प्रवेश करण्यास प्रतिबंध करता येणार नाही, असे या खंडाने उपबंधित केले आहे. याप्रमाणे २५ व्या कलमात साकार झालेली धार्मिक स्वातंत्र्याची संकल्पना ही भावरूप, विधायक असून दुहेरी स्वरूपाची आहे. जोपर्यंत धर्म आपल्या न्याय्य मर्यादात काम करतो तोपर्यंत त्याला संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आहे. त्याचबरोबर सामाजिक–आर्थिक न्यायाच्या बाबतीत जर त्याने ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला तर सामाजिक व आर्थिक न्याय त्याची कुरघोडी सहन करणार नाही. याप्रमाणे धार्मिक स्वातंत्र्याची संकल्पना ही धर्मविरोधी किंवा ईश्वर–विरोधी नाही; मानवी जीवनातील धर्माची गरज व धर्माचा हेतू यांचे महत्त्व ती ओळखते; परंतु त्याचबरोबर धर्माचे नेमके न्याय्य कार्यक्षेत्र आणि ज्या व्यापक आर्थिक व सामाजिक व्यवहारांवर शासनसंस्था व तिची धोरणे यांचे अधिराज्य चालले पाहिजे, त्यांचे कार्यक्षेत्र या दोहोंच्या मर्यादारेषा ठरविण्याचा ती प्रयत्न करते.

जे २५ व्या अनुच्छेदामध्ये खरे आहे ते २६ व्या विषयीही खरे आहे. धार्मिक व्यवहार संभाळण्याचे स्वातंत्र्य तर दिले आहे; परंतु धार्मिक संस्थांच्या मालमत्तांचे प्रशासन करण्याचे जे स्वातंत्र्य आहे त्यावर मात्र कायद्याचे नियंत्रण राहील अशी तरतूद आहे, व कायदा हा धर्मनिरपेक्ष सामाजिक–आर्थिक आहे; शासनसंस्था आपल्या सामाजिक व आर्थिक धोरणानुसार वेळोवेळी हवा तसा कायदा घडवू शकते.

धार्मिक स्वातंत्र्य संपूर्ण व परिणामकारक करण्याच्या दृष्टीने अल्पसंख्यांकांना ३० व्या अनुच्छेदानुसार आपल्या इच्छेप्रमाणे शिक्षणसंस्था स्थापन करणे व त्या चालविणे ह्या त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी घटनेने विशेष तरतूद केलेली

आहे. हे भारतीय संविधानाने सर्व धर्मांना दिलेल्या स्वातंत्र्याचे स्वरूप आहे असे स्थूलमानाने म्हणता येईल.

सामाजिक–आर्थिक न्याय आणि धर्म यांच्यातील संघर्ष कसा सोडविला ?

सर्व जगभरच्या धर्मांच्या इतिहासावरून असे दिसून येते की, काही वेळा संघटित सामाजिक स्वरूपात धर्म समाजाच्या सामाजिक व आर्थिक व्यवहारांचे नियमन करण्याचा प्रयत्न करीत असतो. अस्पृश्यतेचाच प्रश्न घ्या. आपल्या परंपरागत दृष्टिकोनानुसार अस्पृश्यतेचा आचार हा काही प्राचीन ग्रंथांवर, जरी त्यांची अधिकृतता संशयास्पद असली तरी, आधारलेला आहे. हिंदूंच्यामध्ये प्रचलित असलेल्या धर्माचरणाचा अस्पृश्यता एक भाग होता. अस्पृश्यतेचा जो आचार हिंदू संस्कृती व हिंदू धर्म यांवरील खरोखरच कलंक होता तो पूर्णतया पुसून काढून सामाजिक जीवनातून त्याची हकालपट्टी केली पाहिजे ह्याची घटनेला जाणीव झाली व म्हणून घटनेने १७ व्या अनुच्छेदानुसार अस्पृश्यतेचा आचार करण्यास बंदी करण्याची विशेष तरतूद केलेली आहे. हे कलम अशी स्पष्ट ताकीद देते की अस्पृश्यतेवर आधारून जर कोणावर काही अपात्रता लादण्यात आली तर ते कृत्य कायद्यानुसार शिक्षेस पात्र होईल. जर अस्पृश्यता ही धार्मिक ग्रंथ किंवा आचरण ह्यांचा आधार घेऊन आपला हक्क सांगू लागली तर घटनेने असे स्पष्ट जाहीर केले आहे की अशा धार्मिक ग्रंथांना किंवा आचरणाला घटना प्रमाणभूत समजणार नाही, कारण समाजाच्या सामाजिक–आर्थिक जीवनावर ते अतिक्रमण करतात; आणि म्हणून घटनेच्या एका विशेष कलमाने अस्पृश्यतेच्या आचाराला प्रतिबंध घातला आहे.

हिंदू कोड—धर्मनिरपेक्षतेचा विजय

घटनेला जे ध्येय साध्य करून घ्यावयाचे आहे ते ४४ व्या कलमात ग्रथित केले आहे. हे कलम असे म्हणते की भारताच्या सर्व भागांत सर्व नागरिकांसाठी एकच अशी व्यवहार-विधि-संहिता घडविण्याचा शासनसंस्था प्रयत्न करणार आहे. ह्या ध्येयाला अनुलक्षूनच हिंदू कोड कायद्याच्या पुस्तकात प्रविष्ट करण्यात आले आहे. तुम्हांला आठवत असेल की ज्यावेळी भारताच्या लोकसभेत हिंदू कोड विधेयक प्रथम मांडण्यात आले तेव्हा सनातनी हिंदू मताकडून त्याला तीव्र विरोध झाला. भारताच्या स्वातंत्र्याच्या सुरवातीच्या काळात सनातनी मताने अत्यंत तीव्रतेने हे आह्वान दिले होते, व भारतीय धर्मनिरपेक्षतेस त्याला तोंड द्यावे लागले होते. ह्या आह्वानाला खंबीरपणे तोंड देण्यात आले व शेवटी जिंकण्यात आले; आणि हिंदू कोड ही आता एक सिद्ध गोष्ट झाली आहे.

अद्याप ह्या देशातील सर्व जमातींना समान अशी एक व्यवहारसंहिता सिद्ध करण्याचे ध्येय आपणास प्राप्त करून घ्यावयाचे राहिले आहे हे खरे आहे; पण भारतीय संविधानाला याची जाणीव आहे की धर्मनिरपेक्षतेने पायरीपायरीने, एका अवस्थेकडून दुसऱ्या अवस्थेकडे सावकाशपणे प्रगती केली पाहिजे. भारतासारख्या अनेक भाषांच्या आणि अनेक जमातींच्या विकासशील देशात धर्मनिरपेक्षतेच्या वाटचालीत एकान्तिक व निरपेक्ष असे काही असत नाही; आणि म्हणून कालांतराने ज्या वेळी मुसलमान जमात पुरेशी सुशिक्षित होईल व सामाजिक दृष्टिकोनाच्या बाबतीत पुरेशी प्रगत होईल तेव्हा भारतातील सर्व जमातींसाठी एक सामान्य व्यवहारसंहिता तयार करता येऊ शकेल अशी आशा भारतीय धर्मनिरपेक्षतावादी लोक बाळगून आहेत. पहिली पायरी म्हणून भारतीय लोकसभेने हिंदू कोडास संमती दिली ही गोष्टच असे दाखविते की हिंदू समाज ही धर्मनिरपेक्ष सुधारणा स्वीकारण्यास परिपक्व झालेला होता व योग्य दिशेने हे पाऊल टाकण्यात तो संतोष मानत होता. भारतीय धर्मनिरपेक्षतेच्या विजयाचे हिंदू कोड हे दीप्तिमान उदाहरण आहे.

भारतीय धर्मनिरपेक्षतेचा व्यापक पाया

भारतासारख्या नानामतसंकुल देशास ज्या समस्येला तोंड द्यावयाचे आहे तिच्यासंबंधीच्या बुद्धिवादी व शास्त्रीय दृष्टिकोणावर भारतीय धर्मनिरपेक्षता आधारलेली आहे. नागरिकत्वाची संकल्पना, तिचे हक्क व कर्तव्ये ही बुद्धिनिष्ठ व धर्मनिरपेक्ष पायावर आधारण्याची अनिवार्य आवश्यकता आहे हे भारतीय धर्मनिरपेक्षता गृहीत धरते. ज्या समतावादी कल्याणकारी समाजात सामाजिक व आर्थिक न्याय नांदतो आहे, असा समाज प्रस्थापित करण्याचे ध्येय भारताला जर गाठावयाचे असेल तर आपणास आपल्या परंपरागत समाजरचनेशी फारखत करून घेतली पाहिजे ह्याची धर्मनिरपेक्षतेस जाणीव आहे. आधुनिक काळात सामाजिक व आर्थिक प्रश्नात धर्माधिष्ठित दृष्टिकोन स्वीकारणे ही कालविसंगती समजावयास पाहिजे. नवाचारप्रवर्तन व परिवर्तन ही धर्मनिरपेक्षतेस स्वाभाविक वाटतात. धर्माधिष्ठित दृष्टिकोन परंपरेस पवित्र मानतो आणि तिची छाननी करण्यास संमती देत नाही. त्यामुळे सामाजिक संस्था इतक्या दृढमूल बनतात की त्यांच्यात बदल होऊ शकत नाही. उलटपक्षी धर्मनिरपेक्षता उपयुक्तता व अनुकूलन यांवर भर देते. बाह्य परिस्थितीवर स्वामित्व चालविले पाहिजे ही गोष्ट ती ओळखते व सामाजिक आर्थिक समस्या सोडविण्यासाठी वैज्ञानिक अनुभूतिवादाचा ती आश्रय घेते. सामाजिक आर्थिक परिवर्तनासंबंधीच्या प्रस्तावांवर चर्चा व वादविवाद होतो व त्यांची युक्तायुक्तता ही बुद्धिनिष्ठ भूमिकेवरून ठरविली जाते. एका अवस्थेत समस्यांच्या ज्या सोडवणुकी अंगीकारल्या त्यांच्या परिणामकारकतेत न्यूनत्व आढळून

आले किंवा त्या गैरसोयीच्या किंवा अपर्याप्त ठरल्या तर त्यांच्यात सुधारणा करण्यात येतात. आवश्यकता वाटल्यास आपले निष्कर्ष अनुभवाच्या प्रकाशात तपासून पाहाण्याची व त्यांच्यात सुधारणा करण्याची सक्ती हे धर्मनिरपेक्षतेचे एक विशेष अंग आहे. सामाजिक मूल्यांची योग्य ती जाणीव विकसित करण्यावर धर्मनिरपेक्षता भर देत असते आणि सामाजिक–आर्थिक न्यायाच्या आदेशानुसार आपल्या वर्तनाला वळण लावण्याचे शिक्षण ती नागरिकांना देते. एका अर्थाने जरी धर्मनिरपेक्षतेचा दृष्टिकोन जडवादी असला तरी मुळाशी तो नैतिक असतो. आपल्या बांधवांच्या हिताकरिता कसोशीचे प्रयत्न करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे ह्याची धर्मनिरपेक्षतेस जाणीव असते, आणि सामाजिक–आर्थिक न्यायाच्या प्राप्तव्यासाठी स्वसमर्पण करण्याचे तत्त्वज्ञान ती निर्माण करते. तिच्या दृष्टीने आधुनिक काळात नैतिकतेचे हेच अत्युच्च रूप होय. म्हणूनच धर्मनिरपेक्षता स्वतःची अशी एक नैतिक संहिता घडविते व तिला साद देण्यास लोकांच्या विवेकबुद्धीस आवाहन करते. भारतीय धर्मनिरपेक्षतेचा हा असा प्रशस्त, समावेशक, प्रगतीशील व पुरोदर्शी पाया आहे.

हिंदू समाज आणि ऐहिकतावाद (धर्मनिरपेक्षता)

विशेषतः सामाजिक विषमतेच्या बाबतीत हिंदूंना उद्देशून धर्मनिरपेक्षता उच्च स्वाने स्पष्ट शब्दात बजावते. परस्परांना वेगळ्या करणाऱ्या अशा अभेद्य कप्प्यांनी एकमेकांपासून वियोजित अशा जातींच्यामध्ये हिंदू समाजाचे विभाजन करणारी जातिसंस्था ही सामाजिक समतेचा निरास करणारी आहे असे धर्मनिरपेक्षता जाहीर करते. जाती व उपजाती या अपरिहार्यपणे उच्चनीच भाव निर्माण करतात व समाजात व्यावर्तकतेचे वातावरण उत्पन्न करतात आणि धर्मनिरपेक्षता नेमके तेच सहन करीत नाही. एकीकडे अत्यंत उच्च व उदात्त तत्त्वज्ञान व त्याचबरोबर दुसरीकडे घृणास्पद अनुदार आचरण हा हिंदू सामाजिक संस्थांना एक शापच आहे. त्याचे निदर्शन हेच की एका बाजूस हिंदुधर्म उदात्ततम आणि अत्यंत प्रबुद्ध अशा तत्त्वज्ञानाचा उद्घोष करतो, तर प्रत्यक्ष आचारात तो नागरिकांना अनेक कप्प्यांमध्ये विभागतो व आपल्या अनुयायांच्या एका विभागाला निखालस कमी दर्जाचे समजतो. हिंदू तत्त्वज्ञानाची उदात्तता व त्याचा अनुदार आचार यांतील तफावतींच्या रूपाने अस्पृश्यतेचा शाप हा हिंदुधर्मावर कायमचा कलंक होऊन राहिलेला आहे. हिंदूच्यामधील सर्व जाती व उपजाती या नाहीशा करून व हिंदूंच्यामध्ये बंधुत्वाची भावना निर्माण करून सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्याची निकडीची आवश्यकता आहे ह्याचा साक्षात्कार त्वरित व्हावा म्हणून धर्मनिरपेक्षता हिंदू धर्मीयांना आवाहन करीत आहे. असे करण्याने सर्वच भारतीय नागरिकांचे व्यापक बंधुत्व प्रस्थापित करण्यास शेवटी मदत होणार आहे. ह्या घडीला धर्मनिरपेक्षतेचा

हिंदू समाजास हा विशेष उत्कट संदेश आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जी भारतीय लोकशाही सामाजिक न्यायावर आधारलेली आहे तिचा प्रत्यक्ष आचरणात जाती व उपजातींवरील निष्ठा वाढविण्याकडे कल झुकला आहे ही घटना खरोखरच दुर्दैवाची, किंबहुना उपरोधपूर्ण होय. स्पर्धा करणाऱ्या संकुचित जाती व उपजातींवरील निष्ठांचा जोपर्यंत निरास होत नाही तोपर्यंत आपल्या देशात लोकशाहीची मुळे सुदृढपणे रुजणे शक्य नाही ह्या तथ्याची देशातील सर्व नागरिकांनी गंभीरपणे दखल घेतली पाहिजे.

भारतात ऐहिकतावादाचा प्रसार करण्यात विद्यापीठांचे कार्य

भारतीय संविधानान्तर्गत असलेली धर्मनिरपेक्षता ही बुद्धिनिष्ठ व वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारलेली आहे. प्रज्ञेची उपासना करण्यावर तिचा विश्वास आहे व बुद्धीवर आधारलेले निष्कर्ष ती अनुभवाच्या कसोटीवर तपासते आणि आवश्यकता वाटल्यास ते बदलते. तिला आपल्या निष्कर्षांचा पुनर्विचार करण्याची भीती वाटत नाही, कारण अनुभवाच्या प्रकाशात पुनर्विचार करणे हे जिवंतपणाचे लक्षण आहे, आणि पुनर्विचारणाची प्रक्रिया ही जीवनाप्रमाणे प्रगतिशील व गतिमान दृष्टीचा अवलंब करते. धर्मनिरपेक्षता ही अपरिवर्तनीय एकान्तिक तत्त्व मानीत नाही; तिचा दृष्टिकोन अत्याग्रही स्वरूपाचा नसतो. ती विशिष्ट धर्ममतांना व अंधश्रद्धांना चिकटून बसत नाही. तिचा दृष्टिकोन अनुभववादी व उपयुक्ततावादी असतो; जे या देशास निष्ठावंत आहेत आणि सामाजिक–आर्थिक न्यायाच्या दिशेने भारताची प्रगती करण्याच्या व भारताचे ऐक्य व अखंडता प्राप्त करून घेण्याच्या ध्येयाला जे वाहिलेले आहेत अशा नागरिकांचा समानधर्मी समाज ह्या देशात निर्माण करण्याचे धर्मनिरपेक्षतेचे ध्येय आहे. याप्रमाणे धर्मनिरपेक्षता ही व्यापक, विस्तृत पायावर आधारलेली व गतिमान संकल्पना आहे. तिचे स्वरूप केवळ राजकीय नाही. तिचा गाभा नैतिक स्वरूपाचा आहे; आणि तिला स्फूर्ती देणाऱ्या लोकनीतीने अखेर या देशातील प्रत्येक नागरिकाला स्फूर्ती द्यावयास पाहिजे. याप्रमाणे धर्मनिरपेक्षता जर तिच्या नैतिक अर्थाने यथार्थपणे समजावून घेतली तर ती अपरिहार्यपणे सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेप्रत जाऊन पोचल्याशिवाय राहाणार नाही. ज्यावेळी धर्मनिरपेक्षतेला भूक, दारिद्र्य, अज्ञान, रोगराई व ओंगळपणा ह्यांच्या प्रश्नाला तोंड द्यावयाचे असते आणि लोकमताच्या सक्रिय साहाय्याने कायदेमंडळाच्या मार्फत लोकशाही पद्धतीने त्यांच्यावर मात करण्याची तिची इच्छा असते तेव्हा तिला या पाच राक्षसांची धर्म किंवा भाषा यांच्याशी काहीच कर्तव्य नसते. हे राक्षस विश्वव्यापी भाषा बोलतात आणि धर्मनिरपेक्षतेच्या विश्वव्यापी भूमिकेवरूनच त्यांच्या या आव्हानास तोंड द्यावयाचे असते.

आणि याच संदर्भात भारतीय विद्यापीठांना महत्त्वाचे कार्य करावयाचे आहे.

व्यक्तीच्या जीवनाप्रमाणे देशाच्या जीवनात सुद्धा काही क्षण मौल्यवान व ऐतिहासिक महत्त्वाचे असतात. आज भारत अशाच ऐतिहासिक महत्त्वाच्या क्षणातून जात आहे. येत्या पाच वर्षांत या देशातील लोकशाही व ऐहिकतावाद—धर्मनिरपेक्षता—यांचे भवितव्य ठरणार आहे. ह्या गंभीर आणीबाणीच्या प्रसंगी नियती आपल्या कृतीकडे बारकाईने लक्ष देऊन पाहात आहे आणि या देशाच्या कोनाकोपऱ्यात ऐहिकतावादाचा संदेश पसरविण्याचा अप्रतिहत व हेतुपुरस्सर प्रयत्न करण्यासाठी सर्व विद्यापीठांना खुणावीत आहे. विद्यापीठे हस्तिदंती मनोऱ्यात राहून कार्य करू शकत नाहीत व तसे त्यांनी मुळीच करता कामा नये. आपले शिक्षक, आपले पदवीधर व आपले विद्यार्थी यांनी ऐहिकतावादाचे पुरस्कर्ते व त्याचे उत्कट आणि एकनिष्ठ उद्गाते बनले पाहिजे. आपल्या देशात ऐहिकतावादाच्या साक्षात्कारावर आधारलेल्या बंधुत्वाच्या भावनेचा उदय व्हावा यासाठी देशाच्या प्रत्येक भागातील सामान्य नागरिकापर्यंत ऐहिकतावादाचा संदेश पोहोचविला पाहिजे. भारतीय संविधानाने प्रतिपादिलेल्या तत्त्वांच्या उत्स्फूर्त नेतृत्वाखाली लोकशाही मार्गाने सामाजिक–आर्थिक न्यायाच्या मंदिराकडे द्रुत गतीने कूच करणारे भारतीय नागरिकांचे विराट बंधुत्व निर्माण करण्याचे कार्य आपली विद्यापीठे करू देत. भारतीय घटनान्तर्गत धर्मनिरपेक्षतेचा हाच संदेश आहे, आणि राजस्थान विद्यापीठाच्या पदवीधरांना मला आज हाच संदेश देण्याची इच्छा आहे.

मागील कुलपतींनी विद्यार्थ्यांना दिलेल्या सल्ल्याकडे परत वळून मी राजस्थान विद्यापीठाच्या शिक्षकांना व विद्यार्थ्यांना असे आवाहन करतो की त्यांनी हे लक्षात ठेवावे की धर्मनिरपेक्षतेचा प्रसार करणे, तिच्यावर श्रद्धा ठेवणे व तिला आपल्या जीवनाचा एक भाग बनविणे हाच त्यांचा आजचा धर्म आहे व हेच त्यांचे आजचे कर्तव्य आहे. आणि आजच्या धर्माच्या या संकल्पनेला अनुसरून माझी अशी विशुद्ध श्रद्धा आहे की आजच्या संदर्भात खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष होणे हेच खऱ्या अर्थाने धार्मिक बनणे होय.

राजस्थान विद्यापीठाचे सिंहद्वार आज सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांना उद्देशून मी भाषणाच्या अंती म्हणेन—

सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायात् मा प्रमदः ।
सत्यात् न प्रमदितव्यम् । धर्मात् न प्रमदितव्यम् ।
कुशलात् न प्रमदितव्यम् ।

खंड तिसरा

न्यायतत्त्वाचे अधिराज्य

अनुक्रम

१ कायदा, कायदेपंडित आणि न्यायाधीश

[Advocates' Association of Western India (पश्चिम भारत अधिवक्त्यांची परिषद) या संस्थेच्या शताब्दी समारंभाच्या उद्घाटनाचे भाषण. मुंबई, १२ आक्टोबर १९६३. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

२ जनतेचा विश्वास आणि न्यायालयांचे कर्तव्य

[दिल्ली बार असोसिएशनपुढे केलेले भाषण. नवी दिल्ली, १४ फेब्रुवारी १९६४. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

३ लोकशाहीतील न्यायाची दृष्टी

[फिरोज गांधी स्मारक व्याख्यानमालेत केलेले भाषण. नवी दिल्ली, ८ सप्टेंबर १९६४. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

४ न्यायव्यवस्था आणि शासनव्यवस्था यांचे विलगीकरण

[पंजाब राज्यातील न्यायव्यवस्था व शासनव्यवस्था यांच्या विलगीकरणानिमित्त झालेल्या समारंभात केलेले अध्यक्षीय भाषण. चंदीगढ, २ आक्टोबर १९६४. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

५ भारतीय संविधानाच्या छत्राखाली कायदा व न्याय

[सोव्हिएत प्रजासत्ताक संघराज्यांच्या सर्वोच्च न्यायालयापुढे केलेले भाषण. मास्को, ९ जुलै १९६५. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

६ न्यायतत्त्वाचे अधिराज्य

[International Commission of Jurists (आंतरराष्ट्रीय न्यायपंडितांचा आयोग) या संस्थेच्या सभेपुढे दिलेले भाषण. जिनीव्हा, २१ जून १९६५. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

कायदा, कायदेपंडित व न्यायाधीश

प्रास्ताविक

तुमच्या असोसिएशनच्या शतसांवत्सरिक महोत्सवात भाग घेण्याची ही तुम्ही मला संधी दिलीत हा मी माझा अभिमानास्पद गौरव समजतो. आजचा हा प्रसंग असोसिएशनच्या आयुष्यात अतिशय उदात्त व ऐतिहासिक महत्त्वाचा आहे. शतसांवत्सरिक महोत्सवातील मुख्य समारंभाचे उद्घाटन करायला तुमच्यासमोर उभा राहिलो असता मला खरोखर कृतार्थ झाल्यासारखे वाटते. या कोर्टाच्या अपेलेट बाजूकडे मी १९२६ च्या ऑगस्टमध्ये दाखल झालो, आणि मला वाटते त्या कामासाठी इतकी कमी तयारी असलेला व कोर्टातील व्यवहाराशी आणि कामकाजाच्या पद्धतीशी इतका अपरिचित असलेला दुसरा कोणी क्वचितच कधी वकीलमंडळाला येऊन मिळाला असेल. कुटुंबाची परंपरा व माझे स्वतःचे अध्ययन यांचा विचार केला तर मी अध्यापनाच्या क्षेत्राकडेच वळायला हवे होते. पण कुठल्याही व्यावहारिक विचारावर न आधारलेल्या आंतरिक ऊर्मीमुळे पुढे लोटला गेलेला असा मी, सल्लामसलतीला कोणी मित्र नाही, मार्गदर्शनाला कोणी ज्येष्ठ सहकारी नाही, कायद्याच्या व्यवसायातील माणसे व विषय यांची माहिती नाही, अशा स्थितीत सदतीस वर्षांपूर्वी या कोर्टाच्या अपेलेट बाजूच्या खोलीत प्रवेश करिता झालो. अगदी पहिल्याच कामासाठी अपेलेट बाजूच्या डिव्हिजन बेंचपुढे उभा राहिलो त्यावेळी मी पत्करलेल्या कामाच्या दृष्टीने माझी तयारी किती तोकडी आहे याची मला पूर्ण कल्पना आली. ते एक किरकोळ प्रकरण होते; अपीलदारांच्या बाजूने स्थगन अर्ज (Stay petition) करण्यात आलेला होता व सामनेवाल्यांनी मला वकीलपत्र दिले होते. त्या काळी स्थगन अर्जदेखील डिव्हिजन बेंचपुढे येत असत. खाली पहिल्या वर्गाच्या दाव्यात सामनेवाल्यांना 'दरम्यानच्या

काळातील नफा' म्हणून बरीच मोठी रक्कम देण्याचा व स्थावर मिळकतीतही सामनेवाल्यांना हिस्सा देण्याचा हुकूमनामा झालेला होता. त्याविरुद्ध अपील होते, आणि सर्वच हुकूमनाम्याची अंमलबजावणी स्थगित व्हावी असा अपीलदारांचा अर्ज होता व त्यावर त्यांनी तात्पुरता हुकूम मिळविलेला होता. सामनेवाल्यांनी मला वकीलपत्र दिले त्यावेळी स्थगन अर्जाला उत्तर देण्यासाठी काय काय करावे लागते याची मला अजीबात कल्पना नव्हती. अज्ञानापोटी मला असे वाटत होते की स्थगन अर्ज मंजूर केला तर माझ्या अशीलांच्यावर कसा अन्याय होईल हे दाखवून देणारे एक भाषण कोर्टासमोर केले म्हणजे झाले. त्या समजुतीने मी कोर्टात जाऊन आमची नावे पुकारण्याची वाट बघत बसलो. काही काळाने आमचा अर्ज पुकारण्यात आला, अपीलदारांच्या वाजूने श्री. जी. एन्. ठाकोर (श्री. एस्. वाय्. अभ्यंकर यांच्या सहाय्याने) दाखल झाले. श्री. ठाकोर म्हणाले की मी (गजेंद्रगडकर) माझे वकीलपत्र दोन आठवड्यांपूर्वीच दाखल केले आहे, असे असूनही जबाबी प्रतिज्ञालेख दाखल केलेला नाही, तेव्हा स्थगन अर्जावर आधी देण्यात आलेला तात्पुरता हुकूम कायम करण्यात यावा. श्री. ठाकोर कोर्टाला उद्देशून जे काही बोलले ते सगळेच्या सगळे माझ्या डोक्यावरून गेले. मी जबाबी प्रतिज्ञालेख दाखल न केल्याचा परिणाम स्थगन अर्जावरील तात्पुरता हुकूम कायम होणार हे माझ्या लक्षात आले नाही. पहिला हुकूम कायम करण्यात यावा या विनंतीचा खरा अर्थ काय, हेही माझ्या लक्षात आले नाही. त्या गूढ शब्दांना माझ्या लेखी त्या दिवशी काहीच अर्थ नव्हता. माझी केविलवाणी स्थिती लक्षात घेऊन बेंचचे अध्यक्ष सर लल्लुभाई शहा यांनी सहानुभूतिपूर्ण आवाजात विचारले, "जबाबी प्रतिज्ञालेख दाखल करायला तुम्हांला किती वेळ लागेल ?" कोर्टात बरीच गर्दी होती, मी पार गोंधळून गेलो होतो; कोर्टातून बाहेर पडायची मला घाई झाली होती. कसे तरी पुटपुटलो की एक आठवडा बस होईल. त्या कृपावंत न्यायाधीशांना माझ्या मनात चाललेली घालमेल दिसत होती, म्हणून ते म्हणाले की तीन आठवड्यांची मुदत घ्या व रीतसर जबाबी प्रतिज्ञालेख दाखल करा ! काही दिवसांनी एक विस्तृत जबाबी प्रतिज्ञालेख मी दाखल केला. तो अर्ज परत सुनावणीला निघाला त्यावेळी स्थावर मिळकतीबाबतचा मनाई हुकूम कायम करण्यात आला, पण इतर बाबतीत रद्द करण्यात आला. वकीलांशी सदैव सौजन्याने वागणे आणि कोर्टासमोर येणाऱ्या प्रकरणांकडे व्युत्पन्न, कळकळीच्या आणि वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहून निकाल देणे या आपल्या गुणांनी ज्यांनी न्यायालयीन शिष्टाचार व दक्षता यांचा आदर्श निर्माण केला, की ज्याचे अनुकरण त्यांच्यामागून आलेले आम्ही न्यायाधीश लोक करण्याचा प्रयत्न करीत आहोत, त्या कृपाळू न्यायाधीशाची ती उपकारशीलता मी कधीही विसरणार नाही. सर लल्लूभाई शहा यांच्या कोर्टातील माझ्या पहिल्या अनुभवाने माझी अशी खात्री पटली की वकिलांपैकी नवशिक्यांच्या मनातदेखील

आत्मविश्वास निर्माण करणे हीच न्यायाधीशाच्या व्यक्तिमत्त्वाच्या व मोठेपणाच्या मूल्यमापनाची कसोटी होय.

काही काळाने मी कोर्टात अनेक मित्र जोडले आणि व्यवसायातही काहीशी प्रगती केली. तुम्हा सगळ्यांना माहीत आहेच की वकिलांची खोली म्हणजे एक बरोबरच्यांचा क्लब असून मते व्यक्त करण्याचे अनिर्बंध स्वातंत्र्य तेथे सर्वभौम असते, कोणीही व्यक्ती टीकेच्या पलीकडची मानली जात नाही. मी जेव्हा झगडत-झगडत माझा मार्ग काढत होतो तेव्हा व पुढे जेव्हा व्यावसायिक कामाच्या गर्दीने वेढला गेलो त्याहीवेळी फुरसतीचे क्षण मित्र, न्यायाधीश, सार्वजनिक व्यक्ती व राजकारणी लोक यांच्याबरोबरच्या मनमोकळ्या, प्रांजळ आणि रसरशीत वैचारिक देवाण-घेवाणीत जात असत; तसेच सर्व चालू प्रश्नांची कठोरपणे व आवेशपूर्ण पद्धतीने सांगोपांग चर्चा होई. असा काळ जात असता १९४५ साली माझी न्याया-धीश म्हणून नेमणूक झाली. न्यायाधीश म्हणून झालेल्या उन्नयनामुळे माझ्या हृदयात एक खोल कळ उठली, कारण जिवाभावाच्या व ऊबदार मैत्रीत काही अंशी कपात झाली. न्यायाधीशाच्या जीवनात काहीसा विलगपणा अपरिहार्य असतो, मित्रांबरोबर दिलखुलास जवळिकीने वागता येत नाही याची मला जाणीव झाली. तरीदेखील न्यायाधीश झाल्यानंतरही, माझ्या आयुष्याची अतिशय क्रियाशील व आनंददायी एकोणीस वर्षे जिथे मी घालवली त्या वकिलांच्या खोलीकडे अपेक्षेने रेंगाळणारे कटाक्ष मी अनेक वेळा टाकीत असे; आणि योग्य संधी मिळे तेव्हा तेव्हा वकीलवर्गाबरोबरचे संबंध उजळण्यात मला आनंद होत असे. वकिलांच्या खोलीत घालवलेला वेळ व निर्माण झालेले स्नेह हे माझ्या जीवनाचे अंग होऊन राहिले आहे; आणि मी असेही म्हणण्याचे धाडस करतो की माझा या असोसिएशनबरोबरचा संबंध हा अल्पांशाने का होईना पण असोसिएशनच्या जीवनपटाचा एक भाग बनला आहे. त्यामुळेच तुमच्या असोसिएशनच्या अध्यक्षांनी शतसांवत्सरिक महोत्सवाचे उद्घाटन करण्याची जेव्हा मला विनंती केली तेव्हा ती मी अतिशय आनंदाने स्वीकारली, कारण या गंभीर व ऐतिहासिक प्रसंगी तुम्हा सर्वांना भेटण्याची मला सुवर्णसंधी मिळणार होती. ज्यांच्यातलाच मी एक होतो त्या वकीलमंडळाविषयी वाटणारा जिव्हाळा, आणि जिचा मी एक सभासद होतो व जिच्या छायेखाली माझा विधिज्ञ म्हणून विकास झाला त्या असोसिएशनबरोबर असलेली भावनिक आत्मीयता यांमुळे आज संध्याकाळच्या या समारंभात भाग घेताना मला कृतार्थतेचे खरेखुरे समाधान लाभत आहे.

ॲडव्होकेट्स् असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया—एक आदरांजली

आपल्या असोसिएशनचा शतसांवत्सरिक महोत्सव साजरा करत असताना आपण असा न्याय्य दावा करू शकतो की देशातल्या वकीलमंडळांमध्ये आपली

संस्था बहुधा सर्वांत ज्येष्ठ आहे. मुंबई हायकोर्टाचा कारभार ता. १४ ऑगस्ट १८६२ रोजी सुरू झाला आणि त्यानंतर लवकरच हायकोर्टाच्या अपेलेट बाजूकडे प्रॅक्टीस करणाऱ्या वकिलांनी आपला संघ २४ जानेवारी १८६४ रोजी स्थापन केला. त्या दिवशी जमलेल्या सहा ज्येष्ठ वकीलमहाशयांनी एकत्र जमून पास केलेल्या ठरावाचे ते फळ होते. या जनक संस्थापकांची नावे पुढीलप्रमाणे होत : धीरजलाल मथुरादास, रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक, नानाभाई हरिदास, शांताराम नारायण, पांडुरंग बळिभद्र आणि गणपतराव भारकर. संघटना सुरू केल्यापासून एका आठवड्याच्या आत नियम वगैरे तयार करण्यात आले, आणि ३१ जानेवारी १८६४ रोजी झालेल्या बैठकीत संघाचे 'वकील्स असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया' असे नामाभिधान करण्यात आले. १८८१ साली नावात 'प्लीडर्स असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया' असा थोडा बदल करण्यात आला. कागदपत्रांवरून असे दिसते की १६ ऑगस्ट १९०६ रोजी असा ठराव मांडण्यात आला की असोसिएशनचा अध्यक्ष गुप्त मतदान पद्धतीने निवडण्यात यावा. तो ठराव बहुमताने नापास झाला व सरकारी वकील हा असोसिएशनचा पदसिद्ध अध्यक्ष असावा हा पूर्वसंकेत चालू राहिला. ९ सप्टेंबर १९२६ रोजी 'इंडियन बार कौन्सिल्स ॲक्ट' हा कायदा अंमलात आला; परिणामतः २५ नोव्हेंबर १९२९ रोजी संघाच्या नावात बदल करणे प्राप्त झाले; 'ॲडव्होकेट्स् असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया' हे नाव तेव्हापासून कायम झाले. असोसिएशनचा पदसिद्ध अध्यक्ष या नात्याने सरकारी वकिलाची उपस्थिती ही असोसिएशनच्या विचारकक्षेत येणाऱ्या विषयांची चर्चा करताना अध्यक्ष आणि संस्थेचे सभासद या दोघांनाही अडचणीची वाटू लागली, आणि म्हणून १९३१ साली संघाच्या घटनेत मूलगामी बदल करण्यात आला व असोसिएशनचा अध्यक्ष दर वर्षी निवडण्यात यावा असे ठरले. त्याप्रमाणे पहिल्या अध्यक्षाची निवड झाली; व श्री. नीळकंठ आत्माराम शिवेश्वरकर यांना तो बहुमान मिळाला.

आजच्यासारख्या प्रसंगी आपण भूतकाळाकडे अभिमानपूर्वक दृष्टिक्षेप करणे व असोसिएशनने निर्माण केलेल्या महनीय परंपरा टिकवून त्यांच्या गौरवात तरुण पिढ्या आपल्या कर्तव्गारीने भर टाकतील अशी प्रार्थनापूर्वक आशा व्यक्त करणे अगदी स्वाभाविक आहे. म्हणून ज्यांनी ही असोसिएशन निर्माण केली व आपल्या चिकाटीच्या प्रयत्नांनी तिच्या वाढीला हातभार लावला त्या सर्व महाभागांना आपण श्रद्धांजली अर्पण करू या. सहा जनकसंस्थापक व त्यांच्यानंतरचे असोसिएशनचे कर्तेधर्ते यांनी हा थोर परंपरांचा वारसा आपणाला दिल्याबद्दल आपण सदैव कृतज्ञ राहू.

त्या काळचे प्रभावशाली कायदेपंडित

अपेलेट बाजूकडील प्रभावशाली वकिलांपैकी माझ्या काळी ज्यांचे कर्तृत्व गाजत असलेले मी पाहात होतो अशा काहींचा नामोल्लेख केला तर अनुचित होणार

नाही. एके काळी वकीलवर्गाचे नेते असलेले गणपत सदाशिव राव कोर्टाला उद्देशून वक्तृत्व करीत त्यावेळी त्यांचे भाषण ऐकणे हा एक आनंदाचा ठेवा असायचा. त्यांना मधुरगंभीर आवाजाची देणगी मिळालेली होती. त्यांच्या अभिजात व रेखीव शैलीमुळे प्रिव्ही कौंसिलच्या निवडक निकालांतील आदर्श वाक्यरचनेची आठवण होई. प्रिव्ही कौंसिलच्या निकालांशिवाय इतर निकालांचा उल्लेख आपण क्वचितच करतो अशी राव यांची रास्त प्रौढी असे. ए. जी. देसाई हे वकीलवर्गाचे अनेक वर्षे अनभिषिक्त नेते होते. उंच व भरदार शरीरयष्टी, साधा पोषाक, वागण्याबोलण्याची मुक्त अनिर्बंध तऱ्हा, तरल युक्तिवाद करण्यातला हातखंडा, वशीकरणकुशल वाणी, आणि विविध न्यायाधीशांची प्रवृत्ती व मनोवृत्ती लक्षात घेऊन एका कोर्टातून दुसऱ्या कोर्टात आपल्या वक्तृत्वाची तऱ्हा बदलण्याची अजोड लकब हे त्यांचे गुण. त्यांना न्यायासनावर बसवून स्वतःचा बहुमान करून घेण्याची संधी मुंबई हायकोर्टाने का घेतली नाही हे मला कधीच उमगले नाही. सरकारी वकील शिंगणे आपल्या अधिकाराच्या स्थानामुळे बाररूममध्ये नेहमी प्रभाव गाजवीत.[1] प्रकरण कितीही मोठे व गुंतागुंतीचे असो, सर्व तपशील त्यांच्या हुकमतीत असे; प्रकरणनिविष्ट घटनांची ते जोरदार, ओघडधोंडड व ठाशीव पद्धतीने मांडणी करीत. एका चतकोर कागदात त्यांची सर्व टिपणे सामावलेली असत आणि त्यांच्या अधिवक्तृत्वात सर्व मुद्दे स्मरणशक्तीतून नेमक्या क्रमाने सरसर बाहेर येत. जी. एन्. ठाकोर हे तर आमच्या काळचे महारथी होत. दिसण्यात करडे, वागणुकीत कडक, युक्तिवादात खंबीर व आग्रही, न वाकणारे व आक्रमक अशा ठाकोरांना प्रतिपक्षाने निर्देशिलेल्या दाखल्यांपैकी विसंगत कोणते हे चटकन दाखवून देण्याचे विलक्षण कसब साधले होते. खानदानी व प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे एच्. सी. कोयाजी हे जुन्या काळच्या ऋषीमुनींसारखे वाटत. त्यांचे वागणे म्हणजे मूर्तिमंत सौजन्य होते, नवशिक्यांना ते नेहमी सहानुभूतीचा हात देत. सौम्य आवाज व समजावून देण्याची विलक्षण हातोटी या गुणांमुळे कोर्टात ते एखाद्या अभिजात कलाकारासारखे वाटत. सखोल विद्वत्ता, कमावलेले वक्तृत्व, अंतर्बाह्य सुसंस्कृतपणा व लाघवी शिष्टाचार या गुणांनी मु. रा. जयकरांचे व्यक्तिमत्त्व खुलून दिसत असे; कोर्टातील त्यांची भाषणे ऐकणे ही एक मेजवानीच असायची. असोसिएशनचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष शिवेश्वरकर वैशिष्ट्यपूर्ण पागोटे घालीत. भारंभार कामे घेण्यावर त्यांचा विश्वास नव्हता. मोजकीच कामे ते स्वीकारीत, आपल्या श्रीमंत अशिलांकडून भरपूर फी घेत आणि घेतलेल्या प्रत्येक रुपयाचा पुरेपूर मोबदला ते अशिलाच्या पदरात टाकीत. हाती घेतलेल्या प्रकरणाचा सर्व बारीकसारीक तपशील त्यांना माहीत असे, आणि फक्त आपल्याच पक्षकाराचा दावा खरा आहे, प्रतिपक्षाचा नाही, अशा ठाम विश्वासाने खालच्या आवाजात, छोट्या छोट्या चपखल वाक्यांनी ते आपला युक्तिवाद मांडीत. धारपांना ओरिजिनल व अपेलेट, दिवाणी व फौजदारी, दोन्हीकडला व्यापक व संपन्न

बाजूंकडील परंपरेने चालत आलेल्या कामांपेक्षा या नवीन कामांचे स्वरूप मूलतः भिन्न आहे, त्यामुळे त्यांच्या मांडणीसाठी वकीलालही वेगळ्या तऱ्हेच्या साधन-सज्जतेची आवश्यकता आहे; या कामात स्वतःसिद्ध अपेलेट किंवा ओरिजिनल असे काहीही नाही. दोन्ही बाजूंकडील वाकबगार तरुण वकील, सॉलिसिटर, ॲडव्होकेट अशा दुहेरी पद्धतीच्या सहाय्याशिवायही हे नवीन प्रकारचे काम चांगल्या रीतीने हाताळू शकतील असा विश्वास बाळगायला हरकत नाही.

या प्रश्नाच्या गुणदोषांची सांगोपांग चर्चा करत असताना आपण हेही लक्षात घेतले पाहिजे की बुद्धिजीवी व्यवसायासकट सर्वच सामाजिक-आर्थिक व्यवहारांतील जुन्या परंपरा व संकेत जर सनातनी हिंदू जातिपद्धतीतल्याप्रमाणे मक्तेदारी निर्माण करण्याला अथवा अपवर्जनाची भावना वाढविण्याला उत्तेजन देणारे असतील तर ते आजच्या गरजांच्या दृष्टीने कालबाह्य ठरतील.

कायद्याच्या व्यवसायावरील भावनाशून्य टीका

कायद्याचे व्यावसायिक आपला व्यवसाय फार पुरातन आहे असे म्हणू शकतात, आणि त्यांचे अनुदार टीकाकारही तसाच दावा करू शकतात. आधुनिक लोकशाही समाजात कायदेपंडितांचे स्थान काय आहे याची चर्चा करत असताना या व्यवसायाच्या टीकाकारांचे काय म्हणणे आहे तेही लक्षात घेतले पाहिजे. मनूने म्हटले आहे, "साक्षीदार, जामीनदार आणि न्यायाधीश यांना दुसऱ्यांच्या वादामुळे निष्कारण त्रास होतो, तर कज्जेदलालीमुळे राजा (कोर्ट-फी मिळते), धनको (हुकूमनामा मिळतो), व्यापारी (प्रतिवादीला बचावासाठी पैसे दिले असल्यास त्या बदल्यात त्याची मालमत्ता मिळते), आणि ब्राह्मण (दोन्ही बाजूंना कायद्याची सल्ला देऊन फी उकटणारा वकील) यांचा मात्र फायदा होतो."[१] 'वकिलीचे नीतिशास्त्र' या विषयावरील भाषणात लॉर्ड मॅकमिलन यांनी पुढील अर्थाच्या म्हणीचा उल्लेख केला आहे :

वकील आहे पण चोर नाही
अशी वस्तु मिळणे नाही![२]

लॉर्ड मॅकमिलनने असेही म्हटले आहे की प्राचीन चित्रकलेत संताच्या शेजारी नेहमी एक मांजर (वकिलाचे प्रतीक म्हणून) दाखविलेले असते. याचे कारण असे की "मांजर हे एक प्रकारे वकिलाचे प्रतीक होय, कारण ते आपल्या भक्ष्याच्या हालचालीचे बारकाईने निरीक्षण करीत असते, योग्य वेळी चपळाईने झडप घालते,

---

१. मनु ८–१६९.
२. An advocate but not a thief,
A thing wellnigh beyond belief.

आणि भक्ष्य एकदा तावडीत सापडले की त्याच्याबरोबर खेळण्यात आनंद मानते; पण आपल्या पंजातून मात्र त्याला कधीही सुटू देत नाही.''[१] स्विफ्टने वकीलवर्गाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे, ''काळे हे पांढरे आहे व पांढरे हे काळे आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्या प्रमाणात फी निघेल त्या प्रमाणात कमीअधिक शब्द वापरण्याच्या कलेची तारुण्यापासून जोपासना करीत वाढलेल्या माणसांचे मंडळ.''[२] सर वॉल्टर स्कॉटने म्हटले आहे की ''पाद्री लोक आपल्या पापांवर, वैद्यमंडळी आपल्या रोगांवर, आणि वकील लोक आपल्या दुर्भाग्यावर जगत असतात.'' अशा प्रकारची टीका ही कायद्याचा हेतू व कायद्याच्या अंमलबजावणीतील वकिलांचे स्थान यांविषयीचे अज्ञान व गैरसमजुती यांच्यापोटी होत असते. सुधारलेल्या समाजात माणसामाणसांतील तंटे कुठल्यातरी 'दिव्यां'नी वा गुद्यांच्या किंवा दंड्याच्या जोरकस युक्तिवादाने सोडवले जात नाहीत. न्यायाची अंमलबजावणी हे शासनसंस्थेचे प्राथमिक कर्तव्य समजले जाते व या कर्तव्याच्या पालनात न्यायालये सहाय्य करीत असतात आणि वकीलमंडळी आपला कार्यभाग पार पाडीत असतात. कायद्याच्या व्यवसायावरील उपरोक्त तिखट व चेष्टेखोर टीकेच्या पृष्ठभूमीवर न्यायमूर्ती होम्सचे स्फूर्तिदायी शब्द फार उत्साहवर्धक वाटतात. न्यायमूर्ती होम्सनी म्हटले आहे की, ''कायदा हा आपल्या नैतिक जीवनाचा साक्षीदार व बाह्य जामीनदार आहे. त्याचा इतिहास म्हणजे मानवजातीच्या नैतिक विकासाचा इतिहास आहे. लोक कधी कधी त्याची टवाळी करीत असले तरी व्यवहारात कायद्याचा उपयोग चांगले नागरिक व चांगली माणसे बनविण्यास साह्य करतो.''[३]

कायदा व त्याचे विहित कार्य

कायद्याच्या उदात्त कार्याविषयी होम्सनी वरीलप्रमाणे उद्‌गार काढले त्यावेळी त्यांच्या मनात कायद्याच्या पुस्तकांतील किंवा विविध निकालांतील अनेकविध तरतुदी नव्हत्या, तर कायद्याचा तत्त्वमीमांसात्मक भाग किंवा कायद्याचे अंतिम तत्त्वज्ञान व नैतिकता हे त्यांना अभिप्रेत होते.

कायद्याच्या या तत्त्वमीमांसात्मक कल्पनेत न्यायविदांनी कायद्याकडे विश्लेषक दृष्टीऐवजी व्यावहारिक दृष्टीने पाहिल्यामुळे अर्थपूर्ण फरक पडला आहे. उल्पीयनच्या म्हणण्याप्रमाणे ''न्यायतत्त्वमीमांसा म्हणजे मानवी व दैवी वस्तूंचे ज्ञान होय, न्याय आणि अन्यायाचे शास्त्र होय.''[४] व्यवहारी कायदेशास्त्र म्हणून ज्याचे सार्थपणे वर्णन

---

१. *Law and Other Things*—Macmillan, p. 172.
२. ,, ,, ,, p. 180.
३. *Voices in Court*—O. W. Holmes, p. 497.
४. *Selected Writings of Benjamin Nathan Cardozo*—Ed. Margaret E. Haul, p. 248.

केले जाते त्या समाजशास्त्रीय न्यायतत्त्वमीमांसेमध्ये व्यवहारवाद (pragmatism) हा कायद्याचे तत्त्वज्ञान म्हणून पुरस्कारिला आहे. गेली अनेक वर्षे या विचार-प्रवाहाचे प्रमुख प्रवक्ते असलेले डीन रॉस्को पाउंड यांनी म्हटले आहे की, "न्यायतत्त्वमीमांसेची समाजशास्त्रीय पद्धती म्हणजे जी सामाजिक उद्दिष्टे गाठायची असतील त्यांच्या संदर्भात समाजाच्या नियमनाचे एक सामाजिक साधन या नात्याने कायद्याची व्यवस्था व्यवहारात कशी काय काम करते याचा व सामाजिक संस्था, ध्येये, आकांक्षा व आचार यांचा अभ्यास करण्याची पद्धती होय. त्यात असे गृहीत धरलेले असते की कायदा हे समाजनियमनाचे एक विशिष्टीकृत साधन होय."[१] या विचारसरणीनुसार प्रत्येक युगातील बदललेल्या परिस्थितीचे आव्हान कायद्याला स्वीकारावे लागते. पाउंड यांनी अतिशय ओजस्वी रीतीने म्हटल्या-प्रमाणे, "ही कर्तव्ये न्यायशास्त्री व कायदेपंडित पार पाडीत असताना एक नवी समाजव्यवस्था अस्तित्वात येत असते व ती अनेक अतृप्त इच्छा पूर्ण करण्याच्या मागण्या कायद्याच्या व्यवस्थेकडे वाढत्या प्रमाणात करीत असते. परत एकदा अशी वेळ येते की नुसती सुधारणा करून चालत नाही, नवी उभारणी करावी लागते; बारीसारीक तपशिलाची तर्कशुद्ध जुळणी करून सुसूत्र क्रमबद्ध मांडणी करण्याने भागत नाही, नवनिर्मितीचीच गरज असते."[२] पाउंड यांच्या दिव्यदृष्टी-नुसार "कायद्याचा इतिहास म्हणजे मानवी मागण्या, अपेक्षा व इच्छा यांची वाढत्या प्रमाणात सामाजिक नियमनाद्वारे परिपूर्ती करण्याच्या प्रयत्नांचा, सामाजिक हितांची अधिक व्यापक व अधिक परिणामकारक साधना करण्याचा, सतत वाढत्या प्रमाणात व यशस्वीरीत्या अपव्यय टाळून जीवनातील सुखास्वादात मानवी संघर्षाचा व्यत्यय कमीत कमी येईल अशा प्रयत्नांचा—थोडक्यात, सातत्याने यशस्वी होत जाणाऱ्या सामाजिक अभियांत्रिकीचा इतिहास होय."[३] या तत्त्वज्ञानाच्या प्रकाशातच आजच्या परिस्थितीत कायद्याचे कार्य काय याचा विचार केला पाहिजे.

असा विचार करू लागले म्हणजे, होम्सच्या शब्दात कायदा म्हणजे अंतराळात रमणारा सर्वशक्तिशाली विचार न राहाता समाजव्यवस्थेचे ते एक लवचिक साधन आहे, हे लक्षात येते. ज्या समाजाचे नियमन करायचे आहे त्याच्या राजकीय मूल्यांप्रमाणे त्या समाजातील कायद्याचा आशय ठरत असतो. म्हणूनच कायद्याच्या व्यवस्थेत आज न्याय व स्वातंत्र्य यांना मानाचे स्थान दिले जाते, अर्थात लोकशाही समाज-रचनेने साधावयाच्या सामाजिक न्यायाच्या मूल्यांची त्यांना जोड दिली पाहिजे.[४]

---

१. *Jurisprudence*—Dean Roscoe Pound, Vol. I, part 1, p. 17.
२. *An Introduction to the Philosophy of Law*—D. R. Pound, p. 57.
३. " " " "
४. *Law and Social Change in Contemporary Britain*
—W. Friedmann, p. 284.

याच संदर्भात लॉर्ड मॅकमिलन यांनी म्हटले आहे की कायदा हा जगातील सर्वांत मूल्यवान अशा दोन वस्तूंचा पालक व रक्षणकर्ता आहे त्या दोन वस्तू म्हणजे न्याय व स्वातंत्र्य ! न्याय व स्वातंत्र्य यांचा योग्य अर्थ जाणून घेतला तर त्यात सामाजिक न्याय आणि सर्वांना समान संधी ही मूल्ये अध्याहृत आहेत हे सहज लक्षात येईल. लॉर्ड हॅल्सबरीने म्हटल्याप्रमाणे कायदा हा अर्थातच पूर्णांशाने शास्त्र या पदवीला पोहोचू शकत नाही. मूलतः तो एक मानवी व्यवहार आहे. शास्त्रीय गृहीत कृत्ये व शास्त्रीय सूत्रे यांच्याशी नव्हे तर सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील बाबींशी त्याला व्यवहार करायचा असतो.[1] प्रचलित समस्यांचे आव्हान यशस्वीरीत्या स्वीकारता यावे म्हणून कायद्याला भूतकाळाचा अभ्यास अशा रीतीने करावा लागतो की जेणेकरून काल 'आज'ला व आज 'उद्या'ला पंगू करून ठेवणार नाही.[2] आपले कल्याणकारी राज्याचे ध्येय साध्य करण्यासाठी लोकशाहीच्या हातातील कायदा हे एक प्रभावी शस्त्र आहे. आजच्या लोकशाही सरकारांचे उद्दिष्ट स्वाभाविकपणेच त्यांच्या नागरिकांचे कल्याण हे आहे, आणि ते साध्य करण्यासाठी ती सरकारे कायद्यावर जास्तजास्त विसंबू लागली आहेत व कायद्याच्या सहाय्याने सामाजिक–आर्थिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. स्थूल मानाने पाहाता आजच्या परिस्थितीत कायद्याचे विहित कार्य हे आहे आणि ते पार पाडले जात असताना विधिज्ञांना त्यात आपली भूमिका पार पाडावयाची आहे.

लोकशाही समाजातील कायद्याच्या गतिमान कार्याची चर्चा करत असताना एक महत्त्वाचा सिद्धान्त ध्यानात ठेवला पाहिजे. कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट साधण्यासाठी कायद्यावर अधिकाधिक विसंबण्याचा लोकशाहीला निःसंशय अधिकार आहे; पण ते उद्दिष्ट समोर ठेवून कायदे केले जात असताना उन्नत, डोळस लोकमत व कायद्याचा शब्दार्थ यांत वाजवीपेक्षा जास्त तफावत पडू नये. कायदा जी समाजसंरचना निर्माण करू इच्छितो ती जड नसावी पण स्थिर असावी; स्थितिशील नसावी पण मजबूत पायावर उभारलेली असावी. प्राध्यापक टॉयन्बी यांच्या म्हणण्याप्रमाणे सर्व मानवी विकासाचे वैशिष्ट्य 'आव्हान व त्याचा स्वीकार' या सिद्धान्तात आहे, लोकशाही शासनसंस्थेतील गतिशील कायद्यांतही त्याचे प्रतिबिंब उमटले पाहिजे. वेळोवेळी निर्माण होणाऱ्या सामाजिक–आर्थिक प्रश्नांनी दिलेले आव्हान कायद्याने स्वीकारलेच पाहिजे; पण आपल्या गतिशील कायद्याच्या साहाय्याने लोकशाही समाज त्या आव्हानावर मात करण्यासाठी जी उपाययोजना करील तीत भूतकाळातील सदंशाचा अनुबंध ठेवण्याची व भविष्याचा मार्ग सुकर

---

१. *Law and Other Things*—Macmillan, p. 128.
२. *Selected Writings of Benjamin Nathan Cardozo*, p. 128.

व्हावा या दृष्टीने समुचित आणि पर्याप्त बदल करून घेण्याची दक्षता घेतली गेली पाहिजे. कायद्याच्या साहाय्याने घडवून आणावयाच्या सामाजिक-आर्थिक क्रांतीच्या या नाजूक प्रक्रियेत लोकमत जागृत व डोळस बनविण्याचे महत्त्वाचे कार्य कायदे-पंडितांनी पार पाडले पाहिजे.

कायदेपंडित—कायद्याच्या क्षेत्रातील महान भ्रातृमंडळ

कायद्याच्या अंमलबजावणीतील कायदेपंडितांच्या स्थानाचा विचार करत असताना हे लक्षात घेतले पाहिजे की वकिली हा काही केवळ व्यापार किंवा धंदा नव्हे; तो एक जीवनधर्म आहे. ज्यांनी तो अंगीकारला आहे त्यांनी आपला व्यवसाय करत असताना ज्या आदर्शांचे व परंपरांचे ते पालक होत त्यांना वेळोवेळी आपले तनमन पुनः समर्पित करणे हे उचित होय.[१] लॉर्ड मॅक्मिलन म्हणतात, "कायद्याच्या जगातील उपासकांना एका भ्रातृमंडळात गोवणारे सूत्र कोणते याचे स्पष्टीकरण शोधावयाचे असेल तर मी असे म्हणण्याचे धाडस करीन की संस्कृतीची सुनियंत्रित प्रगती साधण्याला हातभार लावणे या उच्च आदर्शावर असलेली आपणा सर्वांची निष्ठा हेच ते सूत्र होय."[२] या आदर्शाभोवतीच सर्व कायदेपंडितांच्या उदात्त परंपरा गुंफल्या गेल्या आहेत, आणि त्या आदर्शांच्या उपासनेमुळेच कायद्याचा व्यवसाय हा समाजसेवेचा स्पृहणीय व उदात्त मार्ग बनला आहे. न्यायमूर्ति कार्डोझो यांनी म्हटले आहे की "यामुळेच कायद्याच्या परंपरेविषयी एक प्रकारचा दबदबा निर्माण झाला आहे, त्याच्याभोवती लोककथेचे वलय निर्माण झाले आहे; प्रत्येक कायदेपंडिताच्या वर्तनात त्या सत्याचे दर्शन घडेलच असे नाही, पण त्यामुळेच त्या व्यवसायाला काही सार्थता व उदात्तता प्राप्त झाली आहे. योग्य प्रसंगी त्यातील सत्य व उन्नत मूल्य प्रकट झालेले आढळते, आणि आपण असे खुशाल समजावे की त्या आदर्शाअभावी ती सर्व परंपरा धुपून जाईल, निष्प्राण होईल. ती परंपरा, की जी एखादे वेळी दंतकथेसारखी भासेल तर एखादे वेळी साध्या व्यावहारिक वस्तुस्थितीसारखी दिसेल, तीच या व्यवसायातील सर्व उपासकांना एका सूत्रात गोवते. मानवी मनाची सर्वांत महान असलेली आकांक्षा म्हणजेच ती परंपरा, पृथ्वीतलावर न्यायाची प्रस्थापना करण्याची आस, ही होय."[३] लोकशाहीला आजच्या परिस्थितीत ज्या आव्हानाला तोंड द्यावयाचे आहे त्या संदर्भात कायदेपंडितांच्या कार्याचे रंगरूपही स्वाभाविकपणेच बदलले आहे. लोकशाहीतील कायद्याचे कार्य गतिशील असल्याने कायद्याचे राज्य ही कल्पनादेखील गतिशील बनली आहे, आणि त्यामुळे कायदेपंडिताला त्याच्या

---

१. *Law and Other Things*—Macmillan, p. 127.
२. " " " " p. 135.
३. *Selected Writings of Benjamin Nathan Cardozo*, p. 105.

आजच्या परिस्थितीतील नवे आव्हान स्वीकारणे क्रमप्राप्त झाले आहे. फ्रीडमनने म्हटल्याप्रमाणे, "समाजातील उत्क्रांतिरूप वा क्रांतिरूप बदलांची अखंड आव्हाने स्वीकारण्यास असमर्थ ठरेल अशी शिळावृत्ती कायद्याच्या अंगी निर्माण झाली तर ती एक शोकांतिका ठरेल. या आव्हानाचा कायदेपंडिताच्या दृष्टीने अर्थ असा की तो केवळ कारागीर राहू शकत नाही. कायद्याचे तंत्रात्मक ज्ञान त्याला आवश्यक ती अवजारे देऊ शकेल पण समाजाबद्दलच्या जबाबदारीची जाणीवच त्याला चांगला न्यायशास्त्री अथवा चांगला वकील होण्याची स्फूर्ती देऊ शकेल."[1] कल्याणकारी राज्याचे ध्येय स्वीकारलेल्या प्रत्येक लोकशाही देशात लोकशाहीच्या यशस्वितेसाठीच काही किमान नियोजनाची गरज असते व त्यामुळे कायद्याच्या तत्संबंधित वैधिक तत्त्वांचा फेरविचार करणे आवश्यक होऊन बसते. व्यक्तीचे स्वातंत्र्य व नियोजन यांच्यातील संघर्ष टाळणे व आवश्यक त्या प्रमाणात आणि आवश्यक त्या क्षेत्रात समायोजन साधून समाजपरिवर्तनाच्या गरजा व व्यक्तिस्वातंत्र्य यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करणे सहज शक्य आहे. सामाजिक-आर्थिक उत्क्रांती शांततेने घडविण्याची नितांत गरज एकदा मान्य झाली की नियोजन व स्वातंत्र्य यांच्यात सुसंवाद निर्माण करण्याच्या दृष्टीने कायदेपंडित महत्त्वाची कामगिरी सहजपणे बजावू शकतो.

न्यायालयीन दृष्टिकोन

कायद्याच्या अंमलबजावणीत वकिलांनी कोणती भूमिका पार पाडली पाहिजे याचा विचार करताना कायद्याच्या अंमलबजावणीत न्यायविषयक योग्य दृष्टिकोन स्वीकारला जाण्याचे महत्त्व मी थोडक्यात विशद करू इच्छितो. न्यायमूर्ती जॅक्सन म्हणत त्याप्रमाणे एखाद्या कृत्याविषयी खटला भरला असता आपल्या कोर्टात त्याचे चालणारे कामकाज हे प्रतिद्वन्द्वी कामकाजासारखे असते. नॉर्मन काळात एखाद्या वादाचा निवाडा लढाईने केला जाई व तीत प्रत्येक बाजू प्रतिपक्षाला नामोहरम करण्यासाठी आपल्या संग्रही असलेल्या सर्व शस्त्रांचा वापर करी. आपल्या कोर्टातील काही कामकाजांना कधी कधी अशा लढाईचे स्वरूप येते. या प्रतिद्वंद्वी पद्धतीचे काही फायदे आहेत हे खरे. पण ही पद्धत सत्य शोधून काढण्यासाठी चालविल्या जाणाऱ्या कामकाजात वापरली जात असेल तर त्यात न्यायाधीशाला अतिशय महत्त्वाची भूमिका बजावावी लागते. लढतीचा निर्विकार प्रेक्षक अशी भूमिका त्याला घेऊन चालणार नाही; लढाईच्या आखाड्यात त्याने कधीही उतरता कामा नये हे जरी खरे असले तरी सुप्रस्थापित व सर्वांना माहीत असलेल्या नियमांच्या आधारे त्याने त्या लढतीचे नियमन केले पाहिजे व दोन्ही बाजू तो खेळ नीट

---

१. *Law in Changing Society*, p. 503.

खेळतात की नाही हे पाहिले पाहिजे. कोर्टात न्यायाधीशांनी उच्चासनावर बसण्याची पद्धत आहे, पण त्यांनी हे कधीही विसरता कामा नये की ते व त्यांना आदराने संबोधून बोलणारे वकील हे प्रत्येक प्रकरणातील सत्य शोधून काढण्याच्या प्रयत्नातील प्रामाणिक व खरेखुरे भागीदार होत. न्यायाच्या अंमलबजावणीत सहाय्य करत असताना न्यायाधीशाने अतिशय नम्रपणे व स्वतःच्या स्खलनशीलतेचे भान ठेवून आपल्या नियत कर्तव्याला हात घातला पाहिजे; त्याने हे सतत ध्यानात ठेवावे की चूक न केलेला किंवा न करणारा न्यायाधीश अद्याप जन्माला यावयाचा आहे. न्यायमूर्ती कार्डोझो यांनी म्हटल्याप्रमाणे "कायद्याच्या प्रगतीला वळण देण्याचे कर्तव्य पार पाडण्यासाठी ज्याला सांगितले जाते त्याच्या मनात पास्कलच्या आत्मसंशोधनाची व आत्मनिंदेची भूमिका असली पाहिजे."[1] या संदर्भात न्यायाधीशांनी न्यायमूर्ती लर्नेड हँड यांचे मार्मिक बोल ध्यानात ठेवले पाहिजेत. त्यांनी म्हटले आहे, "प्रत्येक प्रार्थनाघराच्या, प्रत्येक कोर्टाच्या व प्रत्येक चौकाच्या प्रवेशद्वारावर ऑलिव्हर क्रॉम्वेलने डनबारच्या लढाईपूर्वी काढलेले उद्गार लिहून ठेवले जावेत अशी माझी इच्छा आहे. 'खिस्ताच्या अंतरंगात तुम्ही असलात तरी मी तुम्हांला विनंती करतो : आपल्याकडून चूक घडली असेल असे तुम्ही माना.'"[2] न्यायाधीशाला अपुऱ्या पुराव्यावरून भरीव निष्कर्ष काढावे लागतात; पण सतत बदलत्या स्थितीला व घटनांना कधीही न बदलणारी तत्त्वे लागू करायची ही त्याची प्रधान समस्या असते. म्हणूनच धीमेपणा व जाणून घेण्याची प्रामाणिक इच्छा यांचा अंगीकार केला असता आपले कर्तव्य पार पाडणे न्यायाधीशाला सुलभ जाईल; आणि वकीलवर्गाशी सहानुभूतिपूर्ण व शिष्टाचारसंपन्न वागणूक ठेवल्यास त्यांच्यातल्या उत्तम गुणांचे सहाय्य त्याला मिळू शकेल. कोर्टातला अनुभव असे दाखवतो की सुयोग्य, कणखर न्यायाधीश आणि वाकबगार वकीलवर्ग यांचा परस्परांवर परिणाम होत असतो. कणखर न्यायाधीश वकीलवर्गाच्या वाह्यातपणावर नियंत्रणे घालतो तर वाकबगार वकीलवर्ग न्यायाधीशांच्या वैयक्तिक लहरींना आवर घालू शकतो. शहाण्या न्यायाधीशांना ही खूणगाठ नेहमी पटलेली असते की त्यांच्या निकालांची गुणवत्ता बहुधा सदोदित त्यांच्यासमोर केल्या जाणाऱ्या युक्तिवादावर अवलंबून असते, आणि म्हणून कायद्याच्या विकासातील श्रेयाच्या वाट्यात न्यायाधीश व वकील दोघेही सुयोग्य हिस्सेदार आहेत. म्हणून आपल्या कोर्टात न्यायाच्या अंमलबजावणीसाठी न्यायाधीश व वकील यांचे पूर्ण सहकार्य असणे अत्यंत आवश्यक आहे.

हे खरे आहे की, "आनुवंशिक सहजवृत्ती, परंपरेने चालत आलेले समज व

---

१. *Selected Writings*. . . ., p. 180.
२. *The Spirit of Liberty*—Learned Hand, p. 24.

अनुभवाने प्राप्त झालेल्या निष्ठा यांमुळे प्रत्येकाचा आयुष्याकडे पाहाण्याचा, सामाजिक गरजांविषयीचा एक दृष्टिकोन तयार झालेला असतो; आणि त्यामुळे एखाद्या प्रकरणात दोन्ही बाजूंना पुरेशी साधार कारणे दाखवली गेली तर एखाद्याचा कल कोणीकडे झुकेल हे त्या दृष्टिकोनावर अवलंबून असते."[1] तरीदेखील न्यायाधीशांनी हे कधीही विसरता कामा नये की सांप्रदायिक मते व समज यांच्या गुलामगिरीला त्यांनी कधीही बळी पडता कामा नये व आपल्या श्रद्धा आणि ग्रह यांच्या प्रभावाला किंवा दडपणाला आपली मने अजाणतासुद्धा शरण जाणार नाहीत अशी दक्षता त्यांनी घेतली पाहिजे. कोर्टातील कामकाजाला सुरवात करण्यापूर्वी न्यायाधीश व वकील न्यायासनाला अभिवादन करतात, त्यावेळी आपल्यापैकी प्रत्येकाने मनोमन याची आठवण ठेवली पाहिजे की कोर्टाच्या दिवाणखान्यात सत्याचा शोध घेण्याचे पवित्र व गंभीर कर्तव्य आपल्याला पार पाडावयाचे आहे. कोर्टातील आपल्या कामकाजात अत्युच्च नीतितत्त्वांचा लोप होऊ देता कामा नये, कारण ते काम म्हणजे न्यायदेवतेच्या मंदिरातील पवित्र उपासना होय. आपल्या कामाचे हे पवित्र गांभीर्य आपण सर्वजण जाणू, तरच सामाजिक न्यायाच्या गरजा भागविणारे उपयुक्त व योग्य साधन ठरेल अशा पद्धतीने, न्यायाच्या अंमलबजावणी-तील आपले काम आपण नम्र भावाने व सत्यशोधनाच्या आंतरिक तळमळीने करू शकू. याच पद्धतीने कायद्याच्या वैभवशाली विकासात न्यायाधीश व वकील एकमेकांच्या सहकार्याने मोलाची भर घालू शकतील असे मला वाटते.

कायद्याचे अधिराज्य—त्याचे आजच्या परिस्थितीत महत्त्व

आजच्या परिस्थितीत 'कायद्याचे अधिराज्य' या कल्पनेला फार मोलाचे कार्य पार पाडावयाचे आहे. आपण आपले संविधान स्वीकारून लोकशाही जीवनपद्धतीचा अंगीकार केला आहे व सामाजिक-आर्थिक समता आणि कल्याणकारी राज्याची स्थापना हे ध्येय ठरविले आहे. सामाजिक-आर्थिक क्रांतीच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी आपली कायदेमंडळे विविध कायदे करीत आहेत, त्यामुळे सामाजिक-आर्थिक क्रांतीच्या गरजा व व्यक्तीचे मूलभूत हक्क यांच्यात समतोल व समायोजन साधणे हा प्रश्न कठीण व नाजूक बनत चालला आहे. पण लोकशाही जीवनपद्धती यशस्वी व्हावयाची असेल तर तो प्रश्न विवेकशील दृष्टीने सोडविलाच पाहिजे. व्यक्तीचे स्वातंत्र्य व बंधमुक्तता आणि समाजाचे हित व कल्याण यांत तर्कशुद्ध, विवेकशील सुसंवाद व सामंजस्य प्रस्थापित केले पाहिजे. या प्रक्रियेत अनेक कायद्यांची विधिग्राह्यता तपासून पाहाण्याची वेळ येते, त्यात न्यायाधीश व वकील यांना महत्त्वाची कामगिरी बजावावयाची असते. अशा वेळी आपण प्रत्येक

---

१. *Selected Writings*, p. 109.

पाऊल काळजीपूर्वक टाकले पाहिजे. जनतेचा विश्वास हा जो आपला मुख्य आधार तो कधीही गमावता कामा नये. कायद्याच्या अंमलबजावणीचे कार्य भीतीपासून, त्याचबरोबर बक्षिशीच्या आशेपासून मुक्त असले पाहिजे. चारित्र्य घसरण्याच्या वेतात आले आहे अशा प्रकारची सार्वजनिक टीका आपण आजकाल बऱ्याच वेळा ऐकतो. सुदैवाने न्यायाच्या अंमलबजावणीविषयीच्या लोकांच्या विश्वासाला तडा गेलेला नाही; पण आता सर्वसाधारण नागरिक जागरूक व डोळस झाला आहे, म्हणून न्यायाची अंमलबजावणी योग्य रीतीने, निःपक्षपातीपणाने व निःस्पृहपणे होत राहील अशी दक्षता घेणे आपले कर्तव्य आहे. सर्व लोकशाही देशांतील निकोप संकेतांनुसार मान्य झालेल्या आचारसंहितेचे काटेकोर पालन वकिलांनी व न्यायाधीशांनी अतिशय कटाक्षाने केले पाहिजे. लोकांच्या आपल्यावरील विश्वासाला पात्र राहावे असा प्रयत्न आपण सतत करीत राहू या.

निरोगी व सुदृढ संकेतांचे महत्त्व

कायद्याचे अधिराज्य हे लोकशाही जीवनपद्धतीचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य होय, यावर सर्वांचे एकमत आहे. कायद्याचे अधिराज्य हे काही निरोगी व सर्वमान्य संकेतांच्या पालनावर अवलंबून असते याकडे आग्रहाने लक्ष वेधणे इथे आवश्यक आहे. 'ॲडव्होकेट्स् ॲक्ट' हा कायदा पास झाल्यापासून भारतातील वकीलवर्ग पूर्णतया स्वायत्त व स्वयंशासित झाला आहे. त्या कायद्यानुसार स्थापन झालेली 'बार कौन्सिले' यांच्यावर वकीलव्यवसायातील निकोप आणि सर्वमान्य संकेत व परंपरा यांचे रक्षण करण्याची जबाबदारी येऊन पडली आहे. न्यायालयीन वर्तणुकीबाबत न्यायाधीशांनीसुद्धा योग्य व निकोप संकेतांचे कटाक्षाने पालन केले पाहिजे. न्यायाधीश हे कोणी मठात वा भिक्षुविहारात राहाणारे बैरागी वा भिक्षू नव्हेत; ते काही हस्तिदंताच्या मनोऱ्यात राहात नाहीत. तेही समाजाचे घटक आहेत आणि अधिकारपदाने घालून दिलेल्या विशिष्ट मर्यादेच्या परिघात तेही राष्ट्रजीवनाच्या प्रवाहात सहभागी होत असतात. न्यायालयातल्या कामकाजाबाबत त्यांनी हे जाणले पाहिजे की त्यांचे कामकाज खुल्या मुक्तद्वार कोर्टात चालते व चौकशीचे काम सार्वजनिकरीत्या केले जाते. 'आंद्रे पॉल विरुद्ध ॲटर्नी जनरल ऑफ त्रिनिदाद'[1] या खटल्यात लॉर्ट ॲटकिन यांनी ओजस्वी रीतीने म्हटल्याप्रमाणे, "न्याय हा काही बंद घरातील सद्गुण नव्हे; सर्वप्रकारची छाननी, चिकित्सा व सर्वसामान्य नागरिकांनी आदराने परंतु निर्भीडपणे दिलेले अभिप्राय यांना तोंड देण्याची न्यायदेवतेची सदैव तयारी असली पाहिजे." वस्तुतः शहाण्या, समजदार न्यायाधीशांना आपल्या स्खलनशीतेचे सतत भान असते, आणि त्यामुळेच

१. ए. आय. आर. १९३६ प्रिव्ही कौन्सिल १४१.

जाणकार, सुबुद्ध नागरिकांनी त्यांच्या निकालांवर व्यक्त केलेल्या मतांविषयी गैरसमज करून न घेता ते त्यांचा आस्थेवाईकपणे विचार करतात.

भारतातील कायद्याच्या क्षेत्रात काम करणारांनी या प्रश्नाच्या आणखी दोन पैलूंकडे लक्ष दिले पाहिजे. 'कमिशन्स ऑफ इन्क्वायरी ॲक्ट' (१९५२ चा क्र. ६०) याच्या तरतुदीनुसार राज्य किंवा केंद्र सरकार एखाद्या कामावर असलेल्या न्यायाधीशाला चौकशी करण्याची विनंती करते व न्यायाधीशही सर्वसाधारणपणे ती विनंती स्वीकारणे हे आपले कर्तव्य आहे असे समजून चौकशीच्या कामाला सुरवात करतात. या चौकशा न्यायाधीशांकडून होत असल्याने त्यांचे काम स्वाभाविकपणेच आवश्यक त्या प्रतिष्ठितपणाने व संयमाने उघड, मुक्तद्वार स्वरूपात चालविले जाते. आपल्यासमोर आलेल्या पुराव्याचा साकल्याने व काळजीपूर्वक विचार करून न्यायाधीश आपला अहवाल सादर करतो. अशा वेळी प्रश्न उपस्थित होतो की ज्या सरकारने हे चौकशीचे काम सोपवलेले असते त्याच्यावर तो अहवाल स्वीकारण्याचे बंधन आहे की नाही? याबाबतीतल्या माझ्या अनुभवाचा उल्लेख करायची मला येथे परवानगी असावी. न्यायमूर्ती राजाध्यक्षांच्या दुर्दैवी मृत्यूनंतर १९५५ साली बँक ॲवॉर्ड कमिशनचे काम माझ्याकडे सोपविण्यात आले होते. त्यावेळी असे अलिखितपणे मान्य करण्यात आले होते की माझ्या शिफारशी स्वीकारल्या जातील. कमिशनकडे सोपविण्यात आलेल्या वादाचा इतिहास बराच मोठा, खंडित व अनेक वळणे घेतलेला होता; म्हणून अहवाल सादर करण्याची मी एक कालमर्यादा ठरविली व त्या मर्यादेच्या आत अहवाल सादर केला. त्यानंतर थोड्याच दिवसांनी माझ्या शिफारशी सरकारने स्वीकारल्या व त्यांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक तो कायदा पास करण्यात आला. माझ्या मते जेव्हा एखाद्या न्यायाधीशाला चौकशीचे काम करण्याची विनंती करण्यात येते त्यावेळी हाच संकेत पाळला गेला पाहिजे. मी असे सुचवीत नाही आहे की अशा चौकशीच्या वेळी नोंदविण्यात आलेल्या घटना व न्यायाधीशांनी केलेल्या शिफारशी चौकशीचा हुकूम देणाऱ्या सरकारवर आपोआप बंधनकारक आहेत. या प्रश्नाच्या कायदेशीरपणावर मला मुळीच चर्चा करायची नाही. मला फक्त सुदृढ व सुयोग्य संकेतांची चर्चा अभिप्रेत आहे, आणि माझी अशी सूचना आहे की 'कमिशन्स ऑफ इन्क्वायरी ॲक्ट' नुसार केल्या जाणाऱ्या चौकशांत न्यायाधीशांनी दिलेले अहवाल स्वीकारण्याचा संकेत आपल्या देशात रूढ व्हावा; नाहीतर आमच्या असे अनुभवाला आले आहे की रीतसर चौकशी करून न्यायाधीशांनी विस्तृत अहवाल सादर केल्यानंतर त्याची छाननी करण्याचे काम एखाद्या कार्यकारी अधिकाऱ्याकडे सोपविले जाते व त्याने तयार केलेले टिपण हा त्या प्रकरणातील सरकारी निर्णयाचा आधार बनतो. बहुधा सरकार आपला निर्णय अतिसंक्षिप्तपणे जाहीर करते. न्यायाधीशाचे कुठले निष्कर्ष पूर्णतया व कुठले अंशतः मान्य आहेत, आणि कोणते निष्कर्ष अजिबात मान्य नाहीत हे

दर्शविले जाते. काही प्रश्नांची न्यायालयीन किंवा निमन्यायालयीन चौकशी होणे आवश्यक आहे अशी गरज तीव्रतेने जाणवल्यानंतरच पदस्थित न्यायाधीशाकडे चौकशीचे काम सोपविले जाते. अशा स्थितीत न्यायाधीशाचे निष्कर्ष व शिफारशी सरकारने स्वीकारल्या पाहिजेत अशी सर्वसाधारण अपेक्षा करणे पूर्णतया औचित्याला धरून होय. सरकार काय करते हे न्यायाधीशाच्या दृष्टीने महत्त्वाचे नाही; महत्त्वाचे हे आहे की सरकारच्या अशा कृतीचा 'कायद्याचे अधिराज्य' या कल्पनेच्या आवश्यक गृहित कृत्यांवर काय व किती आघात होतो? म्हणून माझे असे मत आहे की या बाबतीत समुचित निकोप संकेत मान्य केले जाणे अगत्याचे आहे.

न्यायमंडळ, सरकार किंवा कारभारयंत्रणा यांतील उच्च पदावरची माणसे येतील व जातील; पण ज्याच्यावर देशातल्या लोकशाहीचे भवितव्य प्राणपणाने अवलंबून आहे ते 'कायद्याचे अधिराज्य' सतत चालू राहिले पाहिजे. म्हणून कायद्याच्या क्षेत्रातील मंडळी आणि उन्नत, जागृत लोकमत यांना नम्रपणे पण अतिशय तळमळीने मी असे आवाहन करू इच्छितो की कायद्याचे अधिराज्य अबाधितपणे चालत राहील असे समुचित व निकोप संकेत विकसित करून रूढ करण्यात त्यांनी मनोमन सहकार्य करावे.

परवलीचे शब्द—या क्षेत्रातील भ्रातृभावाचा मार्ग प्रकाशित करणे.

माझे भाषण संपविण्यापूर्वी 'न्यूयॉर्क कौंटी लॉयर्स असोसिएशन'च्या वार्षिक संमेलनासमोर 'श्रद्धा व संशयी जग' या विषयावर भाषण करताना न्यायमूर्ती कार्डोझो यांनी जे उद्‌गार काढले त्यांची आठवण करून देऊ इच्छितो. "ऑगस्टसची अशी प्रौढी होती, (मी त्यांचे शेवटचे शब्द उद्‌धृत करतो आहे) की त्याला विटांचं रोम मिळाले पण त्याने त्याचे संगमरवरी नगरीत रूपांतर केले. आपल्या राष्ट्राधिपतीला जर अशी प्रौढी मारता आली की माझ्यापूर्वी कायदा महाग होता, मी तो स्वस्त केला; पूर्वी तो एक बंदिस्त ग्रंथ होता, मी त्याची पाने उघडून सामान्य जनतेसमोर ठेवली; पूर्वी कायदा म्हणजे श्रीमंतांची मिरासदारी होती, मी तो गरिबांचा वारसा बनविला; पूर्वी कायदा म्हणजे कूटनीती व दडप शाहीचे दुधारी शस्त्र होते, मी त्याला प्रामाणिकपणाचा राजदंड व निरपराध्यांची ढाल बनविले, तर ती केवढी उदात्त गोष्ट होईल!" लॉर्ड ब्रौहॅमच्या भाषणातला हा अतिशय अर्थगर्भ उतारा देऊन न्यायमूर्ती कार्डोझोंनी आपल्या ढंगदार शैलीने पुढे म्हटले आहे, "किंचित भडक, अतिशयोक्त असला तरी हा एक अतिशय तेजोमय फडकणारा ध्वज आपणांसमोर आहे. आपणांत असे काही सरदार आहेत का, की जे तो ध्वज आपल्या सम्राटाच्या—त्या थोर जनताजनार्दनाच्या—आवाक्यात आणून त्यालाही वरीलसारखी प्रौढी मारण्याची संधी देतील?"[1]

1. *Selected Writings of Benjamin Nathan Cardozo*, p. 102.

२

जनतेचा विश्वास आणि न्यायालयांचे कर्तव्य

आज आपल्या भेटीची जी संधी आपण मला दिली त्याबद्दल मी आपणा सर्वांचे आभार मानतो. आपल्या वतीने आपल्या अध्यक्षांनी मला भोजनाचे निमंत्रण दिले होते, परंतु मी त्यांना सांगितले की औपचारिक स्वरूपाच्या भोजनसमारंभाला उपस्थित राहून माझा आपल्याला भेटण्यातील मुख्य उद्देश साध्य होणार नाही. माझ्या भेटीचा मुख्य हेतू आपला परस्परांचा परिचय घडून यावा असा आहे हे आपल्या सहजच लक्षात येईल. आणि याचा अर्थ असा की मला आपल्याशी मिसळण्याचे अधिक स्वातंत्र्य हवे. कारण त्यामुळे आपल्या परस्परपरिचयास मदत होईल. म्हणूनच मला अशी आशा आहे की माझ्या स्वागतार्थ एखादा भोजन-समारंभ घडवून आणण्याचा आपला बेत रद्द करण्याविषयी जी विनंती मी आपणांस केली त्याबद्दल आपण मजविषयी काही गैरसमज करून घेणार नाही. भोजनसमारंभ हा दिल्लीच्या सामाजिक जीवनाचा एक ठराविक भाग झालेला आहे. अशा समारंभा-पासून न्यायाधीशांनी सामान्यतः अलिप्त राहावे असे मला नेहमीच वाटत आलेले आहे हे आपल्याला सांगायला हरकत नसावी. न्यायाधीश हे 'हस्तिदंती मनोऱ्या'त राहातात अशातली काही गोष्ट नाही. परंतु आपले कर्तव्य योग्य प्रकारे, निर्भयपणे आणि वस्तुनिष्ठ दृष्टीने बजावण्याच्या दृष्टीने न्यायाधीशांना काही प्रमाणात अलिप्तता आवश्यक आहे. या कारणाकरिताच औपचारिक स्वरूपाच्या भोजनसमारंभांना उपस्थित राहाण्याची कल्पना मला सामान्यतः आवडत नाही.

कायद्याची अंमलबजावणी करणे हा आदर्श अर्थाने समाजसेवेचाच एक भाग आहे असे मला नेहमी वाटत आले आहे. आपल्या न्यायालयांतून आपण जे काम करतो त्यामुळे आपल्या देशात 'कायद्याचे अधिराज्य' (Rule of Law) टिकून राहाते. म्हणून न्यायालयांचा आधार घेणाऱ्या जनतेचा न्यायदानाच्या पावित्र्या-

वर जो विश्वास आहे तो विचलित होऊ न देण्यासाठी आपण सर्वांनीच काळजीपूर्वक पावले टाकणे आवश्यक आहे. न्यायदानातला समभाव, निःपक्षपातीपणा, सच्चेपणा आणि स्वातंत्र्य यांच्याबद्दल शंका घेणाऱ्या नुसत्या कुजबुजीनेसुद्धा न्यायदानाची गंगा दूषित होता कामा नये. दिल्लीमधील मॅजिस्ट्रेट कोर्टे आणि दुय्यम व्यवहार न्यायालये यांतील कर्मचाऱ्यांच्या अयोग्य वर्तणुकीविषयीची कुजबूज–जी कित्येकदा मोठ्यांदा आणि सारखी न थांबता होत असते—मी ऐकतो तेव्हा मी अस्वस्थ होतो. या कर्मचाऱ्यांवर किंवा कधी कधी न्यायाधीशांवरसुद्धा भ्रष्टाचाराबद्दलचे आरोप जेव्हा करण्यात येतात तेव्हा या तक्रारींकडे आपल्याला डोळेझाक करता येणार नाही. न्यायालयांनी दिलेल्या निर्णयांबद्दल खटला खेळणाऱ्यांना असमाधान वाटणे हे नेहमीचे आहे आणि कधी कधी निराश झालेले लोक त्यांच्याविरुद्ध लागलेल्या निकालांच्या बाबतीत न्यायालयांवर दूषित हेतूचा आरोप करून मोकळे होतात. परंतु यामुळे न्यायाधीशांचे मन विचलित होत नाही आणि होता कामा नये. पण न्यायालयांचा आश्रय घेणारी सर्वसामान्य जनता, तेथील कर्मचारी लाचलुचपतीचा अवलंब करतात असे म्हणते तेव्हा आपण या तक्रारींची दखल घेतली पाहिजे आणि निष्ठुरपणे आपला कारभार निर्मळ राखण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. या तक्रारी खऱ्याच असतात असे मला सुचवायचे नाही. मला एवढेच म्हणायचे आहे की या तक्रारींची दखल आपणाला घेतलीच पाहिजे; या तक्रारी रीतसर करण्यात आलेल्या नाहीत आणि त्या कायदेशीर रीतीने सिद्ध झालेल्या नाहीत अशी तांत्रिक भूमिका आपण स्वीकारणे बरोबर होणार नाही. कर्मचाऱ्यांकडून काही नियमबाह्य गोष्टी घडत असतील किंवा त्यांच्यात भ्रष्टाचाराचा शिरकाव झाला असेल तर त्याचा अर्थ तेथील सत्ताधारी न्यायाधीश आपल्या हाताखालच्या कर्मचारी समुदायाच्या हालचालींना नीट काबूत ठेवायला असमर्थ आहे, उदासीन आहे किंवा अनुत्सुक आहे, असा होतो. आणि म्हणूनच जेव्हा न्यायाधीशांच्या कर्मचाऱ्यांमध्ये लाचलुचपत बोकाळते तेव्हा आपल्याला टीकेच्या माऱ्यातून निसटता येणार नाही. सध्या आपल्या देशामध्ये खरोखर चारित्र्याचा प्रश्न निकराला येऊन पोचला आहे आणि म्हणून 'कायद्याच्या अधिराज्या'चा पाया असलेला जो न्यायालयीन कारभार त्याची कीर्ती लाचलुचपतीच्या आरोपांमुळे मलिन होऊ न देणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. अखेर न्यायदानाच्या कारभाराविषयी सर्वसामान्य जनता आणि न्यायप्रविष्ट होणारे लोक यांना जो विश्वास वाटतो तो विश्वास हेच त्या कारभाराचे सामर्थ्य आहे आणि म्हणून न्यायाधीश आणि कायदेपंडित यांच्याजवळ माझे एकच मागणे आहे की व्यावसायिक नीतिमत्ता आणि न्यायविषयक कर्तव्ये यांचे सर्वोच्च आदर्श टिकवून ठेवण्यासाठी परस्परांशी सहकार्य करून सर्वसामान्य जनतेच्या विश्वासास पात्र होण्याचा दोघांनीही प्रयत्न करावा. यासाठीच आपणांपैकी प्रत्येकाने कायद्याच्या अंमलबजावणीचे कार्य हा एक

धंदा असे न मानता एक जीवनधर्म म्हणून मानला पाहिजे आणि म्हणून आपले कर्तव्य बजावताना आपल्यापैकी प्रत्येकाने त्याबाबतीत नैतिक मूल्यांची जाणीव ठेवली पाहिजे. आपल्या व्यवसायाच्या उत्कृष्ट परंपरांप्रमाणे आपण चाललो तर न्यायदानाचे कार्य हा या देशात एकात्मता निर्मिणारा एक मोठा घटक ठरेल याबद्दल मला संशय नाही. राष्ट्रीय एकात्मतेला त्याच्यामुळे बळकटी प्राप्त होईल आणि जे लोकशाही जीवन आपण स्वीकारले आहे ते टिकविण्यासाठीही त्याची मदत होईल.

मॅजिस्ट्रेट कोर्टात जे गैरप्रकार घडतात त्यांच्याविषयीच्या तक्रारींचा मी जेव्हा विचार करतो तेव्हा खालच्या पातळीवरील फौजदारी गुन्ह्यांबाबतचे न्यायदानाचे काम अजूनही सरकारच्या अंमलबजावणी खात्याकडे (Executive) आहे याचे मला आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही. न्यायदान विभाग आणि अंमलबजावणी विभाग हे एकमेकांपासून अलग करणे हे लोकशाही जीवनाचे मूलभूत तत्त्व आहे. वास्तविक पाहाता हे तत्त्व आपल्या देशाने फार पूर्वीपासून स्वीकारले आहे. जेथे न्यायदान आणि राज्यकारभार यांचे विलगीकरण पूर्वीच अंमलात आले होते अशा राज्यातून मी आलेलो असल्यामुळे हे प्राथमिक तत्त्व आपल्या देशाच्या काही भागात अजूनही का अंमलात आणण्यात आलेले नाही हे मला समजू शकत नाही. सर्वसाधारणपणे भारताच्या दक्षिण आणि पश्चिम भागात या तऱ्हेची फारकत संपूर्णपणे करण्यात आली असून त्यामुळे फौजदारी कायद्याच्या अंमलबजावणीचा लौकिक वाढला आहे. उत्तरेकडील भागात या तत्त्वाचे पूर्णपणे प्रतिपालन केले गेलेले नाही, तर काही ठिकाणी हे तत्त्व अंशतः अंमलात आणले आहे तर काही ठिकाणी अजिबात नाही; असे का याचे मला काहीसे कोडे पडले आहे. राष्ट्रीय आणीबाणीच्या परिस्थितीत आपण असताना हे तत्त्व अंमलात आणू नये हा युक्तिवाद मला निखालस असमर्थनीय वाटतो. न्यायखाते आणि अंमलबजावणी खाते यांची फारकत घडवून आणण्याचा विचार जेव्हा आपण करतो तेव्हा तेथे राष्ट्रीय आणीबाणीचा विचार सर्वथैव अप्रस्तुत आहे. मध्यवर्ती सरकारने जर न्यायदान आणि राज्यकारभार यांची फारकत सत्वर अमलात आणली तर पंजाबचे मुख्य न्यायमूर्ती मॅजिस्ट्रेट कोर्टांवर कडक नियंत्रण ठेवून पर्यवेक्षण करतील. त्यामुळे दिल्लीच्या मॅजिस्ट्रेट कोर्टांतील फौजदारी कायद्याच्या अंमलबजावणीबद्दल जनतेच्या मनात विश्वास निर्माण होण्यास मदत होईल अशी मला आशा आहे. लोकशाही देशांत कायद्याच्या अंमलबजावणी-बाबत जे तत्त्व प्राथमिक मानण्यात आले आहे त्याबद्दल काही राज्यांनी इतकी भावनाशून्य बेपरवाई दाखवावी ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आपण जेव्हा तत्त्वांचा विचार करतो तेव्हा चालू उपयुक्ततेचे विचार अप्रस्तुत मानले पाहिजेत.

३

लोकशाहीतील न्यायाची दृष्टी

प्रधानमंत्री महाशय, विधिमंत्री महाशय आणि मित्र हो,

फिरोज गांधींच्या स्मृतीला श्रद्धांजली वाहण्याची संधी फिरोज स्मारक समितीने मला दिली याबद्दल तिचा मी ऋणी आहे. फिरोज गांधींचा व माझा प्रत्यक्ष परिचय नव्हता. पण चालू घटनांचा एक अभ्यासक या नात्याने मी जाणत होतो की देशाच्या सेवेला त्यांनी आपले आयुष्य समर्पिलेले होते. विशेषेकरून, जेव्हा ते संसदेचे सदस्य झाले तेव्हा सांसदीय लोकशाहीच्या सभ्याच्या कार्यपद्धतीतसुद्धा खंबीर निर्धाराचा एक खासगी सदस्य पुष्कळच साध्य करू शकतो, हे त्यांनी दाखवून दिले. सांसदीय शासनाच्या कारभार-यंत्रणेमध्ये खासगी सदस्याला, त्यातल्या त्यात तो सरकार पक्षाचा असेल तर, अगदी गौण व अलक्षणीय भूमिका पतकरावी लागते, ही खेदाची गोष्ट होय. परंतु फिरोझ गांधींनी वेळोवेळी महत्त्वाच्या विशिष्ट सार्वजनिक प्रश्नांवर आपले लक्ष केंद्रित केले आणि त्या प्रश्नांवरील वादविवादात त्यांनी जो वाटा उचलला तो सर्वांच्या आदराला व स्तुतीला पात्र झाला. ते काहींच्या भीतीचा, तर काहींच्या स्तुतीचा विषय झाले होते. आणि ज्यांनी त्यांना जाणले व समजून घेतले त्यांना ते प्रिय झाले होते. चालू पद्धतीनुसार त्यांचे स्मारक म्हणून त्यांच्या नावे एखादी संस्था स्थापन न करता त्यांच्या स्मारकादाखल, त्यांनी ज्या कल्पनांचा व विचारांचा प्रचार केला त्या विचार-कल्पनांच्या प्रसाराची व्यवस्था करावी हे मला युक्तिसंगत वाटते. म्हणूनच प्रत्येक वर्षी ८ सप्टेंबरला फिरोज गांधींचे मित्र व चहाते यांनी जमावे आणि एखाद्या सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर भाषण करण्यास कुणाला तरी निमंत्रण करावे ही मला फार चांगली व सयुक्तिक योजना वाटते.

आज आपल्यापुढे बोलण्याकरिता 'भारताच्या लोकशाही संविधानांतर्गत

न्यायमंडळाची भूमिका' हा विषय मी निवडला आहे. यासंबंधी बोलावयास सुरवात करण्यापूर्वी एक गोष्ट मला स्पष्ट करावयाची आहे ती ही की मी आज या सभेत आलो आहे तो भारताचा सरन्यायाधीश म्हणून किंवा सुप्रीम कोर्टाचा एक न्यायाधीश या नात्याने आलेलो नाही. भारताचा एक नागरिक म्हणून या कार्यक्रमाला मी उपस्थित आहे. येथे बोलताना मला एका गोष्टीवर जोर द्यावयाचा आहे. ती गोष्ट ही की लोकशाहीच्या इतर सर्व राष्ट्रांप्रमाणेच भारतातसुद्धा वृत्तपत्रे व लोक यांच्याकडून न्यायाधीशांना अतिशय सौजन्याने, संभावनेने व आदरपूर्वक वागविले जाते. आणि म्हणूनच या विश्वासाला पात्र राहाणे हे न्यायाधीशांचे कर्तव्य आहे, असे मला वाटते. आपण जे बोलतो किंवा करतो त्यायोगे लोकांचा हा विश्वास आपण गमावत नाही ना याची न्यायाधीश नेहमीच काळजी घेतात. स्वाभाविकच, ते आपण होऊन स्वतःवर काही निर्बंध लादून घेतात. तथापि न्यायाधीश हा काही मठात राहणारा यती नाही, किंवा जगाचा ज्याने त्याग केला आहे असा तो संन्यासी नाही. त्याचे मन आणि डोळे सताड उघडे असतात आणि वेळोवेळी राष्ट्रातील सांस्कृतिक जीवनाच्या प्रवाहाला जाऊन मिळण्याची त्याला इच्छा असते. असा एक नागरिकबंधू या नात्याने आज येथे मी आपल्यापुढे उभा आहे. एक नागरिक या नात्याने निवडलेल्या विषयावर माझे विचार मी प्रकट करीन.

आपल्यापुढे बोलावयास उभा असताना मला काहीसा संकोच होत आहे, कारण मी निवडलेला विषय मांडत असताना मला अशी विधाने करावी लागतील की जी सकृद्दर्शनी अतिवापरामुळे शिळी झालेली वाटण्याचा संभव आहे. आपण जेव्हा नित्याची सामान्य बोधवचने ऐकतो तेव्हा उपहासपूर्वक आपण उद्गारतो : "अं:, माहीत आहे हे सारे तत्त्वज्ञान, ऐकले आहे आम्ही ते पूर्वी." दुर्दैव असे आहे की विचारांच्या बाजारातील चढाओढीला सत्य हे अगदीच टिकणारे नाही. ते वेचव लागते, आणि म्हणून, मी माझे विचार एकामागून एक मांडत जात असताना आपण कृपा करून उपेक्षावृत्तीने त्यांची संभावना करू नका अशी माझी आपल्याला प्रार्थना आहे. मी जे बोलणार आहे ते मूलभूत सत्य आहे असे मला वाटते, तसा माझा विश्वास आहे.

या विषयाचा विचार करताना अमेरिकेचे महान अध्यक्ष जेफरसन जे म्हणत असत ते लक्षात आणणे उपयुक्त होईल. ते म्हणत असत की एखाद्या देशाची इच्छा लोकतंत्रात्मक स्वातंत्र्यही असावे आणि अज्ञानी राहावे अशी असेल तर ही गोष्ट कधी झाली नाही आणि होणार नाही. लोकतंत्रात्मक जीवनपद्धती ही एखादी आदर्श राज्यघटना बनवून, आणि आदर्श न्यायाधीश निवडून यशस्वी होत नसते; कारण तुमची राज्यघटना आणि तिच्यातली कलमे आणि तुमच्या न्यायाधीशांचे मार्मिक निर्णय देशातील लोकशाहीची जीवनपद्धती यशस्वी करीत नसतात. ती यशस्वी करण्याचे सामान्य नागरिकाच्या हाती असते. त्या अर्थाने माझ्या मनात

आले की या देशात आपण लोकतंत्रात्मक जीवनाच्या दुसऱ्या अवस्थेतून जात आहोत, एक नवा मनू उदयास येत आहे, आणि काही धोक्यांना तोंड द्यावे लागणार आहे याची कल्पना ठेवूनच ही लोकशाही आपल्याला सुस्थित करावयाची आहे. अशा या भारताच्या इतिहासाच्या ऐनप्रसंगी, तुम्ही आम्ही एकत्र यावे आणि भारतीय संविधानाच्या अमलाखाली न्यायखात्याचे कार्य काय याचा विचार करावा, हे मला उपयुक्त वाटते.

सामान्य नागरिकाला न्यायमंडळाची भूमिका काय हे कळले पाहिजे. भारतीय संविधानाच्या किंवा भारतीय लोकशाहीच्या छत्राखाली न्यायमंडळ कोणती भूमिका पार पाडते या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी, दोन गोष्टी स्पष्टपणे समजून घेतल्या पाहिजेत. पहिली म्हणजे, खुद्द लोकशाहीचे तरी कार्य काय ? ह्या प्रश्नाचे आपण उत्तर दिले म्हणजे मग आपण दुसऱ्या प्रश्नाकडे जाऊ. तो म्हणजे लोकशाहीत कायद्याचे कार्य काय ? या दोन प्रश्नांचे जर आपण बरोबर रीतीने, समाधानकारक उत्तर देऊ शकलो तर तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर आपोआप मिळेल.

तेव्हा लोकशाहीचे कार्य काय ? आपण सर्वजण जाणताच की गेल्या शतकात, विसाव्या शतकाच्या जवळजवळ पहिल्या पावहिश्शापर्यंत, लोकशाहीचे कार्य अगदी अकरणात्मक राहिले. लोकशाहीच्या सरकारांना वाटत असे की लोकशाहीची सरकारे या नात्याने आपल्याला करावयाचे कर्तव्य म्हणजे समाजात कायदा आणि सुव्यवस्था संभाळावयाची आणि देशाच्या सरहद्दींचे परकीय आक्रमणापासून संरक्षण करावयाचे एवढेच आहे. ही खरे म्हणजे, पोलिसाची, किंवा रात्रीच्या गस्तवाल्याची सत्तेची कल्पना झाली. सामाजिक-आर्थिक झगड्यांच्या रंगणात उतरण्याची त्या सरकारची तयारी नव्हती, कारण त्याची सदोदित धारणा अशी राहिली की अनिर्बंध बाजाराच्या नियमानुसार या झगड्यांचा निकाल आपोआपच लागू दिला पाहिजे. आपणा सर्वांच्या लक्षात असेल की एकोणिसाव्या शतकात प्रबुद्ध बुद्धिमंतांचा धर्म बनलेला राजकीय उदारमतवाद व्यक्तिस्वातंत्र्य, कराराचे स्वातंत्र्य, व्यवहाराची निरंकुशता यांवर भर देण्यात समाधान मानीत होता आणि अर्थातच या तत्त्वांना धर्मानेही आपला हातभार लावला. इथे धर्माचा उल्लेख, मी धर्माचे नैतिक तत्त्वज्ञान या स्वरूपात करीत नाही; माझ्या म्हणण्याचा रोख आज आचारात असलेल्या परंपरागत धर्माकडे आहे आणि सामान्यतः तो धर्म मनुष्याच्या अंतःकरणात असलेले दैवी असमाधान दडपून टाकत असतो. 'हरी ठेवील तैसे राहावे' असे तो मनुष्याला शिकवितो. त्यामुळे, एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व्हिक्टोरियाच्या काळात धार्मिक सिद्धान्तांनी, आर्थिक तत्त्वज्ञानाच्या व राजकारणशास्त्राच्या जोडीने, लोकशाहीच्या सरकारांना, मधूनमधून समाजात वादळ निर्माण करणाऱ्या सामाजिक आर्थिक झगड्यांत पूर्ण अलिप्तपणाच्या धोरणाला चिकटून राहाण्याला मदत केली.

या अलिप्ततेचा १९१४ च्या पहिल्या महायुद्धाने धक्का देऊन भंग केला. त्या काळी इंग्लंडांतील फेबियन म्हटल्या जाणाऱ्या बुद्धिमान वर्गाने समाजवादाचा प्रचार करायला सुरवात केली होती. पावले त्या मानाने मंदगतीनेच पडत होती. लोकशाहीला व तिने पत्करलेल्या अकर्मण्यतेला वरचेवर धक्के बसत होते, पण खरा परिणामकारक धक्का पहिल्या महायुद्धाच्या शेवटी रशियाच्या बाजूने जेव्हा वेगळा आवाज ऐकू आला तेव्हा मिळाला. मार्क्सच्या या आवाजाला राजकीय व आर्थिक आशय होता. मार्क्सच्या राजकीय आशयाशी मला कर्तव्य नाही. या ठिकाणी मला एवढ्याच गोष्टीवर भर देऊन सांगावयाचे आहे की समाजवादाने आणि साम्यवादाने सामाजिक आर्थिक नियमन करूनच दारिद्र्याशी लढा देता येतो असा सिद्धान्त सांगावयास सुरवात केली. लोकशाहीपुढे हे एक आव्हान येऊन उभे ठाकले. लोकशाही ही प्राणवान संस्था आहे असे दृढपणे मानणाऱ्यांपैकी मी आहे. तिने लगोलग प्रतिसाद दिला आणि बेव्हरीज् रिपोर्ट पुढे आला. बेव्हरीज् रिपोर्टातून निष्पन्न झालेल्या कल्याणकारी राज्याच्या कल्पनेने लोकशाहीच्या जीवनपद्धतीला एक मुळापासून भिन्न असा तोंडवळा दिला.

'लोकशाहीचे कार्य' या संकल्पनेच्या मर्यादारेषा व्यापक झाल्या आणि जशा त्या व्यापक झाल्या तशा कायद्याच्या मर्यादारेषाही तितक्याच रुंदावल्या. मग कायदा हा सामाजिक-आर्थिक क्रांतीचे एक लवचिक साधन बनू लागला. पूर्वीच्या काळात लोकशाही जेव्हा तटस्थ होती तेव्हा कायदासुद्धा तटस्थ भूमिका घेण्यातच संतुष्ट होता. लोकशाही जेव्हा गतिशील झाली, लोककल्याणाचे ध्येय जेव्हा तिच्यापुढे ठेवण्यात आले, तेव्हा ती कायद्याच्या आपल्या प्रतापी शस्त्रावाचून दुसऱ्या कोणाकडे पाहाणार किंवा पाहू शकणार ? आणि म्हणून, कायदा हा गतिशील झाला. जेव्हा मी कायदा म्हणतो तेव्हा कायदेमंडळांनी पास केलेल्या अनेक कायद्यांतील नाना कलमांसंबंधी मी बोलत नाही. न्यायाधीश रोजच्यारोज कोर्टात जे निकाल देतात त्यांच्यासंबंधीही हा माझा उल्लेख नाही. मी उल्लेख करीत आहे तो ज्याला तांत्रिक दृष्ट्या कायद्याचा तत्त्वमीमांसात्मक भाग, कायद्याच्या मुळाशी असलेले तत्त्वदर्शन म्हणता येईल त्याचा. कायद्याचा जो गतिशील भाग आहे त्याचे उपनिषदात सुस्पष्ट वर्णन केलेले आढळेल. उपनिषद म्हणते : "धर्म राजांचा राजा आहे, त्यांच्यापेक्षाही तो उग्र व शक्तिमान आहे, त्याच्या बळानेच सत्य विजयी होईल आणि दुर्बळांना सबळांवर जय प्राप्त होईल." गतिशील कायद्याची कल्पना ही आहे. कायदेपंडितांच्या बुद्धीने या कल्पनेच्या बाबतीत गती घेण्याला काही काळ जावा लागला.

अगदी प्रथम कायद्याच्या तत्त्वमीमांसेचा, विश्लेषण पद्धतीचा अवलंब करणारा संप्रदाय होता. राजाज्ञा म्हणजे कायदा असे त्याचे म्हणणे होते. आपल्याकडे हिंदुस्थानात याचसारखे 'चोदनालक्षणो धर्मः' असे वचन आहे. कायदा

म्हणजे राजांचा हुकूम. हा विश्लेषणात्मक संप्रदाय. कालांतराने हे अपुरे वाटू लागले.

त्याच्यामागून दर्शन-संप्रदाय आला. या संप्रदायाचे म्हणणे असे की कायदा म्हणजे नुसती आज्ञा नव्हे. कायद्याचा पूर्ण अर्थ तेवढ्याने होत नाही. कायदा हा नीतिशास्त्रावर म्हणजे बरे-वाईट, पाप अथवा पापाच्या विरुद्ध असलेले पुण्य, सद्गुण आणि दुर्गुण या कल्पनेवर, आधारलेला आहे. यानंतर ऐतिहासिक विचारसंप्रदाय आला. या संप्रदायाचे मत असे की कायदा हा केला जात नाही, तो सापडतो. आपल्या श्रुतींमध्ये सज्जनांचा आचार हाच कायदा असे म्हटले आहे. कायद्याची कथा नेहमी सुरू होते ती कायदा तेवढा दैवी या श्रद्धेपासून, हेही पुढे असमाधानकारक आढळले. त्यातून न्यायतत्त्वमीमांसेच्या समाजशास्त्रीय संप्रदायाचा उदय झाला. कल्याणकारी राज्यात याच संप्रदायाचा आज पगडा आहे. न्यायतत्त्वमीमांसेचा समाजशास्त्रीय संप्रदाय अशा निर्णयावर आला की कायदा हा अंशतः आज्ञेने बनतो, अंशतः रूढीवर आणि अंशतः नीतिशास्त्रविषयक विचारांवर आधारलेला असतो; पण कायद्याचा गुरुत्वमध्य कायदेमंडळ नव्हे, किंवा कोर्टही नव्हे किंवा कायदेपंडितांची जनसंपर्कविरहित विवादगृहेही नव्हेत. कायद्याचा गुरुत्वमध्य समाज हाच खुद्द आहे. या तत्त्वज्ञानाच्या आरंभीच्या पुरस्कर्त्यांपैकी **एरलिश** हा एक होता. त्याने एके ठिकाणी म्हटले आहे की कायदेमंडळे कायद्यांची निरनिराळी कलमे बनविण्यात गुंतली आहेत, न्यायतत्त्ववेत्ते न्यायतत्त्वासंबंधीचे नवीन नवीन सिद्धान्त शोधून काढण्याच्या धडपडीत आपल्या ग्रंथांचे आलोडन करीत आहेत, अशा वेळी त्यांच्या दारांवर असंतुष्ट पण न्याय्य मानवी इच्छा-आकांक्षांचा समुदाय गर्दी करून त्यांचे दार ठोठावतो; या इच्छा-आकांक्षांतूनच कायद्याचा उदय होतो. या आकांक्षा आणि इच्छा अतृप्त आहेत, पण लक्षात ठेवा त्या न्याय्य आहेत, त्या तृप्त झाल्याच पाहिजेत. त्या काळाकाळाला बदलत असतात. त्या या नेहमी बदलणाऱ्या पण सतत उद्भवणाऱ्या अतृप्त पण न्याय्य मानवी इच्छा व आकांक्षाच कायद्याला जन्म देतात. कायद्याचा हा समाजशास्त्रीय दृष्टिकोन आहे. कायदेविषयक या दृष्टिकोनात सर्व सामाजिक शास्त्रांना आपआपला कार्यभाग करावयाचा आहे. त्यात तत्त्वज्ञान येईल, समाजशास्त्र येईल, अर्थशास्त्र येईल. अंती कायद्याला मिटवावयाची आहे ती दारिद्र्याची समस्या. जेव्हा मी कायद्याचा आणि त्याच्या लोकशाहीतील कामगिरीचा उल्लेख करतो तेव्हा कायद्याचा हा अर्थ माझ्या मनात असतो. कायद्याला गतिमान भूमिका येताच कितीतरी प्रश्न एकदम पुढे येतात. व्यक्तिस्वातंत्र्याचा सामाजिक हिताशी मेळ कसा घालवयाचा? स्वातंत्र्याच्या तत्त्वाशी करार व त्याचे निर्बंध याचा मेळ कसा घालवयाचा? उदाहरणार्थ, करारस्वातंत्र्याचे तत्त्व घ्या. करारस्वातंत्र्याचे तत्त्व हे सर्वस्वी उत्कृष्ट तत्त्व आहे ह्याविषयी बिलकूल शंका

नाही. पण तुम्ही जेव्हा करारस्वातंत्र्याविषयी बोलता तेव्हा खरोखर तुमच्या मनात औपचारिक करारस्वातंत्र्य असते की वास्तविक करारस्वातंत्र्य असते? एका मोठ्या मालकाचे उदाहरण घ्या; नोकरी शोधणाऱ्या माणसांचा त्याच्याभोवती गराडा पडला आहे. ही अर्धपोटी, भुकेली माणसे जेव्हा काम शोधायला येतात, तेव्हा नोकरीवर राहाण्याच्या आपल्या शर्ती मालकाशी बरोबरीच्या नात्याने वाटाघाटी करून ठरविण्याचे करारस्वातंत्र्य त्यांना असते काय? नसते असे जर तुम्हाला वाटत असेल तर मग करारस्वातंत्र्यावर निर्बंध घालावेच लागतील. हे द्वंद्व वेळोवेळी निरनिराळ्या, नाना प्रकारच्या स्वरूपांत दिसून येते हे तुम्हाला माहीत आहे, आणि म्हणून कायद्याला व त्याच्या अंमलबजावणीला परिस्थितिसापेक्ष बनणे भाग पडते. कायद्यात किंवा त्याच्या अंमलबजावणीत एकान्तिक असे काही नाही. एक परिस्थिती निर्माण होते, तिचा व्यावहारिक दृष्ट्या विचार होतो आणि तिची सोडवणूक केली जाते.

खरोखर मी आपल्याला सांगतो, न्याय देत असताना जेव्हा आम्ही व्यक्ति-स्वातंत्र्य व समाजहित, करारस्वातंत्र्य व समाजहिताच्या दृष्टीने त्यावर नियंत्रण घालण्याची गरज अशा द्वंद्वांचा विचार करीत असतो तेव्हा आम्हांला अती कठीण, अती नाजूक, आणि केव्हा केव्हा अती क्लेशकारक प्रश्नांना तोंड देण्याचा प्रसंग येतो. बरे आणि वाईट यांमध्ये निवड करण्याजोगी ही परिस्थिती नसते. पांढरे आणि काळे यामध्ये आपण निवड करावी तशी ही परिस्थिति नसते. हा झगडा चांगले, अधिक चांगले आणि सर्वांत चांगले यांच्यांतला असतो, ही चढाओढ यांच्यांतली असते. न्यायिक प्रक्रियेच्या चरकातून जो गेला आहे तोच फक्त चांगले, अधिक चांगले आणि सर्वांत चांगले यांच्यांत निवड करणे किती क्लेशकारक असते हे जाणतो.

व्यक्तिस्वातंत्र्य आणि गुलामगिरी घ्या. करारस्वातंत्र्य जर तंतोतंत लागू करण्यात आले असते, तर गुलामगिरी नष्ट झालीच नसती. कारण अमेरिकेचा इतिहास आपल्याला सांगतो की गुलामगिरी नष्ट करण्याकरिता लिंकन जेव्हा झगडला त्यावेळी वर्षानुवर्ष गुलामीचा सराव झालेले काही गुलाम स्वतःशीच म्हणू लागले की "आम्ही स्वतंत्र झालो तर आमचे व्हायचे कसे?" अमेरिकन तर त्याकरिता प्रत्यक्ष लढाई, मोठे युद्ध खेळले होते. म्हणून, व्यक्तिस्वातंत्र्यावर निर्बंध हे घालावेच लागतील. ते कसे आणि कोणत्या मार्गाने घालावयाचे या प्रश्नाला लोकशाहीने तोंड द्यावयाचे आहे.

आणि लोकशाही त्या प्रश्नाला तोंड देऊ लागते तेव्हा आपले संविधान पुढे उभे ठाकते. नागरिकांना मूलभूत हक्कांची हमी मिळेल असे कलम घालून त्याने हा प्रश्न सोडविला आहे. नव्हे, मूलभूत हक्क हे तर आपल्या संविधानाचा आधार-भूत, अगदी पायाचा, चावीचा दगड आहेत. परंतु संविधानात हेही स्पष्ट करण्यात

आले आहे की हे मूलभूत हक्क काही अनिर्बंध नाहीत. समाजहिताच्या दृष्टीने सर्व तऱ्हेच्या मूलभूत हक्कांचे नियमन, नियंत्रण करता येते. त्यातून अर्थातच नाना प्रश्न उत्पन्न होतात.

ते कसे उत्पन्न होतात याचे मी एक उदाहरण आपल्याला देतो. व्यक्तीला भाषणाचे स्वातंत्र्य असल्याचा प्रश्न घ्या. उत्साहाच्या पहिल्या भरात संविधानाच्या मसुद्यात १९ वे कलम इतक्या व्यापक शब्दात तयार करण्यात आले की, सर्वसाधारणपणे भाषणस्वातंत्र्य सहजगत्याच नियंत्रणाच्या पलीकडे गेले. त्या कलमात या स्वातंत्र्याच्या बाबतीत काही अपवाद घालण्यात आले. पण आमच्या एका हायकोर्टात असा एक प्रश्न उपस्थित झाला की अत्याचारी गुन्हा करण्याकरिता इतरांना चिथावणी देणाऱ्या माणसाला शिक्षा देणाऱ्या इंडियन पीनल कोडाच्या कलमावर ते वेकायदेशीर व संविधानविरोधी आहे असे म्हणून आक्षेप घेता येईल की नाही? यात भाषणस्वातंत्र्याचा प्रश्न आला; आणि भाषणस्वातंत्र्यावर बंधन घालता येते या तत्त्वाला अनुसरून एकच अपवाद करण्यात आलेला होता; तो म्हणजे राज्याची सुरक्षितता. त्या हायकोर्टाने असा पक्ष घेतला की सार्वजनिक सुव्यवस्थेहून राज्याची सुरक्षितता ही वेगळी कल्पना आहे. एखादा मनुष्य गुन्हा करण्याला इतरांना चिथावणी देत असेल तर त्यात राज्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न येत नाही. आणि हे कलम संविधानविरोधी आहे असा अभिप्राय पडला. संविधान लगेच पुढे आले आणि म्हणाले की १९ व्या कलमाचा असा जर अर्थ होत असेल, तर सार्वजनिक अशांतता टाळण्याकरिता भाषणस्वातंत्र्यावर निर्बंध घालता येईल असे आम्ही ठरवून देतो, आणि तसे झाले.

दुसरे एक उदाहरण घ्या. संविधानाच्या १५ व्या कलमाने घालून दिले आहे की धर्म, लिंग, जात वगैरेच्या सबबीवर मुळीच भेदाभेद केले जाऊ शकणार नाहीत. आता आपणाला माहीत आहे की या देशात अशी कोट्यवधी मूक प्रजा आहे की जिला हिंदू रूढींनी आजपर्यंत वाईट रीतीने वागविले आहे आणि तिला खास संरक्षण देण्याची गरज आहे. आता कायद्याने किंवा सरकारने जर हे संरक्षण द्यावयाचे म्हटले तर १५ व्या कलमाने अडचणी उत्पन्न होत असलेल्या दिसल्या. या वादविवादाच्या गुणावगुणाविषयी मी बोलत नाही. मी फक्त काय घडले ते तुम्हांला सांगत आहे. मागासलेल्या वर्गांच्या व जमातींच्या विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक संस्थांत काही राखीव जागा ठेवण्याविषयीचा हुकूम काढण्यात आला. ही बाब कोर्टापुढे आली. अशा प्रकरणांच्या बाबतीत कोर्टाला काही करता येत नाही. त्याला शब्दांतूनच अर्थ काढणे भाग असते. त्याने सांगितले की १५ व्या कलमात कोणत्याही प्रकारचा अपवाद करण्यात आलेला नाही. म्हणून तो हुकूम रद्दबातल ठरविण्यात आला. लगेच संविधान पुढे झाले आणि म्हणाले : "आम्ही अपवाद घालून देतो. मागासलेल्या वर्गांच्या व जमातींच्या हितार्थ

केलेल्या कोणत्याही खास गोष्टी त्या १५ व्या कलमात बसत नाहीत म्हणून यापुढे रद्दबातल करता येणार नाहीत असे आम्ही सांगतो." अशा रीतीने कायदा आणि कायद्याची अंमलबजावणी यांनी सहकार्याने आगेकूच केली.

न्यायाधीशाच्या न्याय देतानाच्या दृष्टिकोनाचा जेव्हा आपण विचार करतो, तेव्हा सर्वसामान्य नागरिकाला ही प्रक्रिया कशी चालते याची अधिक ओळख असली पाहिजे. न्याय देण्याची प्रक्रिया ही मुळातच नम्र वृत्ती आहे. दररोज सकाळी जेव्हा आम्ही जज्जलोक आणि वकील मंडळी त्या दिवशीच्या कामाला सुरवात होण्यापूर्वी कोर्टात जमतो तेव्हा आम्ही न्यायपीठापुढे मान वाकवितो. पूज्यतेच्या भावनेने आम्ही तसे करतो. आम्ही न्यायाधीश आणि वकीलमंडळ दोघे मिळून एकमेकाला सांगतो की आपण येथे जमलो आहोत ते निकालपत्रांचा ढीग पाडण्याकरिता नव्हे; तर न्यायमंदिरात पूजा करण्यासाठी जमलो आहोत. ही आमची कोर्टात भावना असते. स्वाभाविकच या भावनेतून नम्रपणाची वृत्ती निर्माण होते. ज्याने काही काळापुरते न्यायाधीशाचे काम केले आहे अशा प्रत्येकाला न्यायमूर्ती लर्नेड हँडच्या या वचनाच्या यथार्थतेची जाणीव असते. ते वचन हे, 'एकही चूक ज्याने केलेली नाही असा न्यायाधीश अजून जन्मलेला नाही.' अश्रद्ध माणसे म्हणतात की ज्याच्याविरुद्ध अपीलच होऊ शकत नाही तोच न्यायनिवाडा बरोबर समजला जातो. न्यायदानामधील ताळा आणि पडताळा यांची प्रक्रिया ही अशी एक विचित्र प्रक्रिया आहे: घटनांचा संच तोच, निवाडा देणाऱ्या न्यायाधीशांची मने समान वस्तुनिष्ठ, असे असूनही दोन न्यायाधीशांच्या मनात एकच ठसा उमटत नाही. तेव्हा चूक होण्याचा संभव टाळण्याकरिता सुरक्षिततेचा उपाय म्हणून कायदा अपीलाची आणि फेरअपीलाची तरतूद करून ठेवतो. न्यायाचा विचार करताना आम्ही नेहमी सहकाऱ्यांची मदत घेत असतो, पण तरीसुद्धा आमच्या हातून चूक होण्याचा संभव आहे अशी जाणीव सतत आमच्या मनात नांदत असते. या जाणिवेतून साहजिक सहिष्णुतेचा जन्म होतो. सत्याला कायद्यात इतके पैलू आहेत की कोर्टापुढे येणाऱ्या बहुधा प्रत्येक मुद्द्याला दोनतीन तरी पैलू असतातच. तुम्ही शेवटी त्यातला एक पैलू पसंत करता, कारण तुम्हांला पसंती करावीच लागते. आपण म्हणतो तेच बरोबर आणि दुसरे मत चुकीचे आहे याविषयी कधीच तुमच्या मनाची खात्री नसते.

सहिष्णुतेच्या जोडीनेच दुसरी एक अशी भावना असते की सत्याचा शोध ही एक कधी न थांबणारी प्रक्रिया आहे. न्यायदानाच्या कारभारात न्यायवितरण दोन प्रकारचे असते. परंपरागत प्रकार म्हणजे नागरिकनागरिकांमधील कज्जे-खटले हा होय. आणि या प्रकारच्या दाव्यांच्या बाबतीत सत्य उघड करून कोर्टाला मदत करण्याचा प्रयत्न न होता कोर्टात सत्य दडपून टाकण्याचाच प्रयत्न होतो हे आपण जाणताच. अशा प्रकरणात पुरावे जेव्हा व्यवस्थित एकामागून एक मांडणी करून

आणि पढवून कोर्टापुढे आणले जातात तेव्हा, जोड नामक तत्त्वज्ञ ग्रंथकाराने वर्णिल्याप्रमाणे न्यायाधीश हा केव्हा केव्हा तत्त्वज्ञाचा अवतार धारण करतोसे दिसते. जोडने एके ठिकाणी म्हटले आहे की, तत्त्वज्ञाचा सत्याचा शोध बघितला की आपले डोळे पूर्णपणे झाकून घेऊन अगदी गडद मध्यरात्री काळोख्या खोलीत शिरून त्या खोलीतून अगोदरच पसार झालेल्या काळ्या मांजराचा शोध करण्याची धडपड करणाऱ्या माणसाची मला आठवण येते. परंपरागत स्वरूपाच्या दाव्यांतून सत्य शोधून काढण्याचे काम हे असे अत्यंत बिकट असते. ते संस्कृत वचन आहे ना, त्याप्रमाणे सत्य हे अंधकूपाच्या अगदी तळाशी असते. ते तुम्हाला कधी सापडत नाही. त्यामुळे न्यायाधीश अधिकच नम्र बनतो. त्याला निव्वळ सिद्धान्तवादी बनून कधी चालत नाही. तो नेहमी म्हणतोः "माझ्या माहितीप्रमाणे हे माझे आजचे मत आहे."

न्यायवितरणाचा दुसरा प्रकार म्हणजे संविधानविषयक बाबतींचा. यांचा प्रश्न उपस्थित होतो तेव्हा न्यायाधीशाला समदृष्टी, वस्तुनिष्ठ आणि संपूर्णपणे निर्भय असावे लागते. भयमुक्तीचे दोन प्रकार आहेत. तुम्ही भय सोडून दिले पाहिजे, हे सहज होण्यासारखे आहे. पण कोणत्याही लभ्यांशाच्या आशेपासून मुक्त राहाणे ही गोष्ट फार दुर्घट आहे. आणि न्यायाधीशाने तर भय आणि आशा या दोहोंपासून मुक्त राहिले पाहिजे. संविधानात्मक बाबींचा विचार करताना न्यायाधीशाने वस्तुनिष्ठ राहाणे भागच आहे. दोन प्रकारचे प्रश्न आमच्यापुढे येतात. संविधानाने कायदेमंडळ, अंमलबजावणीखाते व न्यायखाते बनविले आहे. कायदेमंडळाला त्याच्या अखत्यारात सोपविलेल्या विषयांवर कायदे करण्याची शक्ती दिलेली असते. आपल्या अधिकारकक्षेच्या मर्यादेत काम करण्याच्या दृष्टीने कायदेमंडळ हे संपूर्णपणे मुक्त आणि सार्वभौम असते. पण त्या सार्वभौमत्वावर नियंत्रण मूलभूत हक्कांचे असतेच आणि बऱ्याच वेळा कोणत्याही विशिष्ट विधि-विधानाच्या बाबतीत अवघड प्रश्न निर्माण होतात. अमुक गोष्ट कायदेमंडळाच्या कायदे करण्याच्या पात्रतेत बसणारी आहे का? उत्तर जर होकारार्थी असेल तर लगेच त्याच्या पुढचा टप्पा म्हणजे तिने मूलभूत हक्कांचा भंग होत आहे का? आणि हा दुसरा प्रश्न मी जिला मघा क्लेशकारक म्हटले तशी समस्या निर्माण करतो. कायद्याने जो निर्बंध घालण्यात आला तो लोकहिताच्या दृष्टीने वाजवी आहे की नाही याचा न्यायाधीशाला निर्णय द्यावा लागतो. या निर्बंधांच्या संबंधात अतिशूरपणा जसा त्याज्य मानला पाहिजे तसा अतिभित्रेपणाही टाकला पाहिजे. कायदेमंडळे विनाकारण निर्बंध घालू लागली तर तो अतिशूरपणा होईल; पण ती जर लोकहिताच्या दृष्टीने या मूलभूत हक्कांवर निर्बंध घालणे इष्ट असूनही तसे करण्यास बिचकू लागली तर तो भित्रेपणा होईल. एका बाजूला लोकहित आणि दुसऱ्या बाजूला व्यक्तिस्वातंत्र्य या दोहोंच्या या संघर्षात निर्णय करण्याची प्रक्रिया

ही अतिशय अवघड, अतिशय नाजूक बाब बनते; आणि मी म्हटले त्याप्रमाणे, ही प्रक्रिया चांगले, त्याहून चांगले, सर्वांत चांगले यांत निवड करण्याची असते.

हे अवघड काम करण्याचा जेव्हा न्यायाधीश प्रयत्न करतात तेव्हा स्वभावधर्म व दृष्टिकोन यानुसार त्यांचे दोन गट पडतात. एका गटाला वाटते की कायद्याचा अर्थ लावताना कोशपद्धतीचा आणि व्याकरणनियमांचा अवलंब करणे अधिक सुरक्षितपणाचे आहे. शब्द घ्यावयाचे, त्यांचे कोशांत अर्थ शोधून काढावयाचे, आणि त्यांचे तटस्थपणे, वस्तुनिष्ठपणे निर्वाचन करावयाचे. दुसऱ्या पंथाला वेगळे वाटते. पण दोन्ही पंथ प्रामाणिक मत बाळगणारे आहेत. दुसऱ्या पंथाचा असा विचार होतो की संविधान हा जर अनंत काळपर्यंत या देशाच्या भवितव्याला मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने केलेला क्रांतिकारक दस्तैवज आहे, तर अर्थ लावण्याची कोशपद्धती स्वीकारणे हे पर्याप्त ठरणार नाही. ज्याला अर्थ लावण्याचा विधायक किंवा सर्जनात्मक दृष्टिकोन म्हणता येईल तो तुम्हाला अवलंबावा लागेल. तसे तुम्ही केलेत की धोके पुढे ठाकलेच समजा. प्रत्येकाचे स्वतःचे एक सामाजिक-आर्थिक दर्शन असते, यात न्यायाधीशही येतात. परंतु सुज्ञ न्यायाधीशाने आपल्या सामाजिक आर्थिक तत्त्वदर्शनाची आपल्या अंतर्मनातील ओढ किंवा दबाव आपल्या न्यायनिवाड्याच्या कामात आक्रमण करीत आहे की काय याबद्दल खबरदार राहून जपण्याचा सतत प्रयत्न ठेवला पाहिजे. असे असले तरी, त्याला त्याच्या आजूबाजूस विकसित होणाऱ्या सामाजिक जाणिवेकडे डोळेझाक करून भागणार नाही. अर्थात न्यायाधीशाला यापुढे जनताविन्मुख होऊन चालणार नाही. आणि म्हणूनच माझ्यासारखी माणसे, काही काही वेळा, संधी चालून येते तेव्हा, राष्ट्रीय जीवनाच्या सांस्कृतिक प्रवाहात अवगाहन करण्याला तयार होतात. या प्रश्नांचा विचार आपण करतो तेव्हा आपला प्रसंग शब्दांशी असतो. आणि शब्द हे केव्हा विचाराचे पर्याप्त वाहक असतात, केव्हा नसतात. शब्दांचे अर्थ केवळ कोशात पाहून लावता येत नाहीत, या गोष्टीवर भर देताना न्यायमूर्ती लर्नेड् हँड कधी कंटाळले नाहीत. सामाजिक मूल्यांच्या कल्पना जशा व्यापक होतात, बदलतात, तसे शब्दांचे अर्थही व्यापक होतात, बदलतात. आणि स्वतःच्या व्यक्तिगत पक्षपाताला चर्चेच्या किंवा निर्णयाच्या प्रांतात फिरकू न देता सामाजिक मूल्यांच्या बदलत्या संकल्पनेशी जुळेल असा शब्दांचा विस्तरशील अर्थ शोधून काढणे यात न्यायाधीशाचे कर्तृत्व असते; यातच त्याचे कौशल्य असते.

गतिमान कायदा म्हणजे काही आकाशातील सर्वशक्तिमान परमेश्वर नव्हे. कायदा ही एक सामाजिक संस्था आहे, सामाजिक-आर्थिक बदलाचे ते एक संभाव्य हत्यार आहे, समाजात होत जाणारे सामाजिक-आर्थिक बदल यांचा तो साक्षी आहे. त्या रीतीनेच कायद्याची आगेकूच चालू असते. आपल्याला मी सांगितले त्याप्रमाणे ही पुढे जाण्याची प्रक्रिया चालत असताना कायदा दुहेरी अनुभवातून शिकत असतो.

कायदा अनुभवातून जन्म पावतो. कायदे करणारांच्यापुढे सामाजिक प्रश्न येतात. ते ते प्रश्न हाती घेतात आणि त्यांना लोकांकडून अनुकूलता मिळते. कायदा केला जातो. पुनः अनुभव पुढे येतो आणि त्या कायद्याला अनुभवाची कसोटी लागते. अनुभवातून जन्म, तर्कबुद्धीने घडण, अनुभवाची कसोटी, पुनः तर्कबुद्धीने घडण— अशी ही कायद्याची प्रक्रिया आहे. लोकांच्या अतृप्त इच्छा ज्या तृप्तीकरिता ओरडा करतात त्याही कायदाच होत. हा प्रश्न केवळ शाब्दिक कुस्त्यांनी सोडविता येण्याजोगा नाही. लोकशाही स्वरूपाचा कायदा ही एक फार अर्थपूर्ण संस्था आहे. स्थूलतः दिसणारा कायदा हे लोकशाहीचेच खास वैशिष्ट्य नव्हे. अत्यंत निरंकुश राजासुद्धा कायद्यानेच राज्य करतो; फक्त इतकेच की त्याचा कायदा तो स्वतः बनवितो. लोकशाही स्वरूपाच्या कायद्याची काही उठून दिसणारी लक्षणे आहेत. पुष्कळ वेळा माझ्या मनात येऊन जाते की या कायद्याचा विशेष तीन 'डी'मध्ये आहे. खुद्द 'डेमॉक्रसी' या शब्दाचा प्रारंभ 'डी'ने होतो. कायदा करण्याशी संबंधित अशी पहिली गोष्ट म्हणजे सार्वजनिक व्यासपीठावरून व वृत्तपत्रातून भरपूर व अनिर्बंध 'डिस्कशन्' म्हणजे चर्चा होणे. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. जेव्हा आपण मतप्रदर्शनाचे स्वातंत्र्य म्हणतो तेव्हा ते स्वातंत्र्य आपल्याशी जे सहमत आहेत त्यांच्यापुरतेच मानावयाचे असे समजण्याची चूक होऊ नये. मतप्रदर्शनाच्या स्वातंत्र्यात विरोधी आणि आपल्याला आक्षेपार्ह नव्हे गर्हणीयसुद्धा वाटणारी मते ऐकण्याची आपली तयारी गृहीत मानणे अवश्य आहे. म्हणून जेव्हा एखादा सामाजिक–आर्थिक प्रश्न पुढे येतो, तेव्हा त्यावर सार्वजनिक व्याख्यानांच्या द्वारा व वृत्तपत्रांतून भरपूर, मनमोकळी व संपूर्ण चर्चा म्हणजे 'डिस्कशन्' होते. लोकशाही स्वरूपाच्या कायद्याशी संबंधित ही पहिली 'डी' आहे.

मग आपण येतो कायदेमंडळाच्या सभागृहात. तेथे भरपूर 'डिस्कशन्' म्हणजे चर्चा होते. पुनः तेथेसुद्धा बहुमताच्या यांत्रिक नियमाचा अंमल चालू नये हे बरे. अल्पमताच्या व विरोधी पक्षांनी व्यक्त केलेली मतेसुद्धा विचारात घेतली गेली पाहिजेत. जेव्हा एखादे बिल कायद्याच्या स्वरूपात पुढे आणावयाचा विचार होतो तेव्हा त्याच्या अनुकूल–प्रतिकूल बाजूवर पूर्ण चर्चा झाली पाहिजे, हे लोकशाहीत आवश्यक आहे. ज्यातून कायदा बनतो ती ही पुढची अवस्था झाली. हे कायदेमंडळातील 'डिस्कशन्' ही लोकशाही स्वरूपाच्या कायद्याच्या संबंधातील दुसरी 'डी' आहे. अशा रीतीने कायदा जेव्हा कायदेपुस्तकात जाऊन बसतो, त्यावेळी तिसरी एक कसोटी व्हावयाची राहिलेलीच असते आणि ती म्हणजे कोर्टाची 'डिक्री' किंवा कोर्टाचा आदेश. कायद्यांची परीक्षा कोर्टात होत असते. त्यांच्या यथायोग्यपणावर आक्षेप घेतला जातो. आणि भारतातील सर्व हायकोर्टे आज कितीतरी दिवस सतत हाच प्रश्न हाताळीत आहेत. या कार्यपद्धतीतून कायदा जातो तेव्हा तो, लोकशाही ज्या कार्यपद्धतीतून जात असते, त्याच पद्धतीतून

जात असतो. त्यात एकान्तिक, अखेरचे असे काही नसते. त्या अर्थाने या देशात कायदा हा फार मोठी प्रगती करीत आहे. आपल्याभोवती काय घडत आहे याचे न्यायाधीशांना भान असते आणि त्या अर्थाने मला असे दिसते की जरी त्यांना जनतेपासून वेगळे राहावे लागत असले तरीसुद्धा ते लोकशाहीच्या वाढीत महत्त्वाचा भाग बजावीत आहेत.

मला माहीत नाही, कदाचित् माझे मत चुकीचेही असेल पण माझ्यावर अशी छाप आहे की न्यायमंडळ या देशाचे ऐक्य वाढविण्याच्या कामी जी भूमिका पार पाडीत आहे त्याची या देशाला जितकी जाणीव असावयाला हवी तितकी नाही. आम्ही न्यायाधीश आणि वकील आणि आमचे कोर्टातील निकाल एकच भाषा बोलतात. एकच भाषा म्हणजे इंग्रजी असे मला म्हणावयाचे नाही. ती विवादात्मक बाब आहे. आम्ही एकच विचारसरणी बोलतो. न्यायिक कार्यवाहीच्या एकाच ठराविक नमुन्याचे आम्ही कुरकूर न करता पालन करतो आणि म्हणून न्यायिक कार्यवाही भारतीय एकतेच्या प्राथमिक, महत्त्वाच्या व अर्थपूर्ण अंगांपैकी एक अंग आहे. या सभागृहाला माझी हात जोडून प्रार्थना आहे की त्याने या ऐक्य घडवून आणणाऱ्या शक्तीत व्यत्यय आणू नये. इंग्रजी संपुष्टात आली पाहिजे असे जर तुम्हाला वाटत असेल, तर तिच्या जागी हिंदी आणा. एकदा का तुम्ही हायकोर्टात प्रादेशिक भाषांना त्यांची जागा घेऊ दिलीत की कायद्याच्या अंमलबजावणीची ही महान ऐक्यसाधक शक्ती टिकून राहील की नाही हे मला सांगता येणार नाही. कायद्याची अंमलबजावणी आज एकाच पद्धतीने होत आहे आणि कायद्याची धोरणे संविधानाने घोषित केलेल्या आदर्शांकडे आपल्याला त्वरेने नेत आहेत.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला हे आपल्याला ठाऊकच आहे. २६ जानेवारी १९५० रोजी आपल्या स्वतंत्र संविधानाचा अंमल सुरू झाला. या दोन दिनांपैकी कोणत्या दिनाला देशाच्या पंचांगात प्राधान्य द्यावे असे जर मला कोणी विचारले तर मी निःसंकोचपणे एकदम २६ जानेवारीला मत देईन. १५ ऑगस्टला आपण राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झालो, पण या राजकीय स्वातंत्र्याचा सामाजिक–आर्थिक आशय काय तो २६ जानेवारीने आम्हाला सांगितला. ही सामाजिक-आर्थिक न्यायप्रस्थापना करण्याच्या कामी आमचे कायदे क्रांतिकारक कामगिरी बजावीत आहेत आणि न्यायाधीश सुद्धा त्यानुसार भूमिका पार पाडीत आहेत. आम्ही न्यायाधीश लहान माणसे आहोत. आम्ही मोठे असल्याचा आव आणीत नाही, पण संविधानाने आम्हाला नेमून दिलेले जे काम आहे त्या कामाच्या ऐश्वर्याचे, माहात्म्याचे परावर्तन होऊन आम्हाला गौरव लाभतो, असा आमचा दावा आहे. आमच्याकडे जे सोपविण्यात आले आहे ते मोठे काम आहे. मी तुम्हांला सांगितलेच की मी काही मोठासा धार्मिक मनुष्य नाही, पण गेली वीस वर्षे न्यायपीठावर मी काम करीत आहे, आणि प्रत्येक दिवशी

कोर्टात मी जातो तेव्हा मी न्यायाच्या मंदिरात प्रवेश करीत आहे अशीच भावना मनात अनुभवतो. ही नीतीची, नैतिक महत्तेची जी जाणीव आहे तिच्या प्रेरणेने न्यायदानाचे कार्य चालते. न्यायाचा दृष्टिकोन व न्यायाचा कारभार आम्हाला नम्र, विनीत व क्षमाशील व्हावयास सांगतो. आपल्याला आठवत असेल, टॉयनबी यांनी नुकतीच काही व्याख्याने दिली, त्यांत त्यांनी या जगाचे अंतिम साध्य काय राहील हा प्रश्न स्वतःपुढे ठेवला आणि ते म्हणाले, जगाचे अंतिम साध्य एकवट जग हेच असले पाहिजे. सबंध मानवजात ज्याकडे कूच करीत आहे ते हेच साध्य आहे. पण ही कूच फारशी सुखाची नाही. रस्ता फार खडबडीत आहे. वाटेत धोके आहेत, अंधकूप आहेत यात शंका नाही; आणि ही एकजगाची जाणीव वाढविण्याकरिता हिंदू तत्त्वज्ञानासारखे दुसरे कोणतेही तत्त्वज्ञान नाही, असेही ते म्हणाले हिंदू तत्त्वज्ञानाचे एक ठळक वैशिष्ट्य हे आहे की ते हिंदू मार्ग हाच एक ईश्वराकडे पोचण्याचा मार्ग असे म्हणत नाही. तसे इतर धर्मांचे नाही. भगवान कृष्णांनी सांगितले, "अर्जुना, जेव्हा लोक भिन्न धर्म निष्ठापूर्वक, प्रामाणिकपणे पाळतात तेव्हा ते माझेच अनुसरण करतात." हिंदू संस्कृतीचे हे वैशिष्ट्य आहे. या सहिष्णू वृत्तीनेच आपण नम्र बनतो, आपल्यात बंधुभाव निर्माण होतो आणि आपले मन विशाल होते. हे कार्य न्यायाधीश बजावीत आहेत आणि न्यायाधीशांच्या कामगिरीचा या देशाच्या सामान्य नागरिकांना हाच संदेश आहे.

न्यायाधीश आणि कायदेमंडळे यांच्यांत काही संघर्ष आहे असा गैरसमज होऊ नये. संविधानाने आमचे परस्परांचे कार्यविभाग ठळकपणे ठरवून दिले आहेत. जनतेतून निर्माण होणाऱ्या दबावांना व आह्वानांना कायदेमंडळे पुरी पडण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि कायदे पास करीत आहेत. कायद्यांचे काही एक उद्दिष्ट आहे. न्यायाधीशांना ते उद्दिष्ट शोधून काढावयाचे असते. त्या उद्दिष्टाच्या प्रकाशात त्या कायद्याचा अर्थ लावावयाचा असतो. अमुक कायदा घटनेला धरून आहे की नाही या प्रश्नाला उत्तर देणे अनिवार्यच असते. पुष्कळ वेळा एखाद्या न्यायाधीशाला कायदा पसंत असला, तरी तो संविधानाचा नोकर असल्यामुळे त्याचे काही चालत नाही. कायदेमंडळावर व कोर्टांवर कठोरपणे मर्यादा घालण्यात आल्या आहेत. असे असले तरी वाटचाल पुढे सुरू आहे, आणि जर आपल्या दृष्टीची पोच असेल तर आपल्याला जाणवेल की नेहरूंनी या देशाची धुरा खांद्यावर घेतली आणि ते स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान झाले आणि संविधानाचा जन्म झाला, थेट तेव्हापासून ही चाल, एक यात्रा असे मी तिला म्हणू इच्छितो, सतत चालू आहे. आपण झपाट्याने अशा एका मंदिराकडे चाललो आहेत की जेथे सामाजिक आर्थिक न्याय प्रस्थापित झालेला असेल. हे मंदिर मोठे मोहक, उत्साहदायक मंदिर आहे. तिकडे जाण्याचा रस्ता मात्र बिकट आहे. आपल्याला आपल्या पावलाखाली सतत दृष्टी ठेवावी लागेल. जे लोक वरिष्ठ सरकारी अधिकारपदावर आहेत त्या आपणा

सर्वांनाच आपली पावले कशी पडताहेत याकडे अत्यंत काळजीपूर्वक नजर ठेवावी लागेल. शेवटी लोकांचा जो विश्वास आपण कमवू तेच आमचे बळ. म्हणून आपण सारेजण हातात हात घालून चालू या. एक नागरिक या नात्याने मी नेहमीच स्वतःला प्रश्न करतो : या यात्रेचे अंतिमधाम काय? आम्ही सारे कुठे जात आहोत? आणि या प्रश्नाला मला नेहमी उत्तर मिळते—टागोरांच्या शब्दांत. आपण गीतांजली वाचली आहे की नाही मला माहीत नाही. मनाला त्रस्त करणाऱ्या घटनांनी मनःस्वास्थ्य बिघडले की गीतांजलीकडे धाव घ्या. गुरुदेव टागोर संदेश देतील. आपली संमती घेऊन, गुरुदेव टागोरांनी न्यायाच्या मंदिराचे, ज्या स्वर्गाकडे भारताने १५ ऑगस्ट १९४७ पासून वाटचाल सुरू केली आहे त्याचे, वर्णन कसे केले आहे ते मी आपल्याला सांगू इच्छितो. ही वाटचाल तर सुरू राहिलीच पाहिजे. तुम्ही आणि मी, मंत्री आणि न्यायाधीश, सार्वजनिक पुढारी, सामान्य नागरिक, आपण सारे त्या मंदिराकडे नेणाऱ्या पथाचे यात्रिक आहोत. ज्याकडे आपण चाललो आहोत तो स्वर्ग आहे कसा?

जेथे मन भयमुक्त आहे
अन् माथा उन्नत आहे;
जेथे ज्ञानाची दारे खुली आहेत;
जेथे मध्ये भिंती घालून संकुचित घरकुलात
जगाचे तुकडे पाडलेले नाहीत;
जेथे सत्याच्या गव्हरातून शब्द बाहेर पडतात;
जेथे अविश्रांत साधना आपले हात पसरून
पूर्णत्वाला स्पर्शू पाहात आहे;
जेथे बुद्धीचा शुद्ध प्रवाह आपली वाट चुकून
सवयीच्या घोर मरुस्थलीत लुप्त झालेला नाही;
जेथे मनाला हाती धरून चालवीत तू नित्य विशाल
विचाराकडे अन् कर्माकडे नेत आहेस;
त्या मुक्ततेच्या स्वर्गात, हे तात, माझा देश
जागा होऊन प्रवेशू दे.

न्यायव्यवस्था व शासनव्यवस्था यांचे विलगीकरण

आजच्या या अत्यंत महत्त्वाच्या अशा ऐतिहासिक समारंभात प्रत्यक्ष भाग घेण्याची मला संधी मिळाली याबद्दल माझ्या मनाला एक प्रकारची धन्यता वाटत आहे.

या समारंभाला मी उपस्थित राहिलो, याला एक वैयक्तिक बाजूही आहे. ती बाजू कोणती हे मी आपणाला सांगितले तर ते उचितच होईल असे मला वाटते. मला वाटते, ती ऑगस्ट महिन्याची वीस तारीख असावी. त्या दिवशी या तुमच्या राज्याच्या मुख्य मंत्रीमहाशयांची व माझी भेट होण्याचा योग आला होता. त्यावेळी, चंदीगढला येण्याचा माझा कधी विचार आहे अशी त्यांनी सहजच चौकशी केली. तेव्हा मी त्यांना म्हटले होते, 'मुख्य मंत्रीसाहेब, तसेच काही-तरी विशेष महत्त्वाचे काम असल्याशिवाय निरनिराळ्या राज्यांच्या राजधानीच्या शहरांना भेटी देत बसण्याचा एक धर्माचार भारताच्या सरन्यायाधीशाने घालून देऊ नये, असे माझे स्पष्ट मत आहे' (टाळ्या). तेव्हा ते सहजच म्हणाले, 'असा महत्त्वाचा प्रसंग कोणता असू शकेल याची मला थोडीशी कल्पना आली तर बरे होईल.' मी त्यावर ताबडतोब उत्तर दिले की, 'न्यायव्यवस्था आणि शासनव्यवस्था यांचे विलगीकरण करून तसे दि. २ ऑक्टोबरच्या आत तुमच्या राज्याच्या कायद्यांच्या पुस्तकात नमूद करणार असाल (टाळ्या) तर त्या दिवशी मी मोठ्या आनंदाने चंदीगडला येण्यास तयार आहे.' तुमच्या राज्याच्या मुख्य मंत्रीमहाशयांनी आपले वचन पाळले आणि मी माझा शब्द खरा करण्यासाठी आज येथे उपस्थित राहिलो आहे. सर्वसाधारणपणे लोकांचा अनुभव असा आहे की, पुढाऱ्यांनी दिलेली वचने पाळली जात नाहीत (हशा). पण अपवादानेच नियम सिद्ध होत असतो, नाही का? (टाळ्या)

ही वैयक्तिक बाजू सोडली तरी आज सकाळच्या या समारंभाला फार मोठे ऐतिहासिक महत्त्व आहे असे मला वाटते. न्यायव्यवस्था व शासनव्यवस्था यांचे विलगीकरण करण्यात यावे म्हणून १८८९ साली प्रथम चळवळ सुरू झाली असे नुकतेच आपल्या मंत्रीमहाशयांनी सांगितले. पण त्याच्याही थोडेसे पुढे जाऊन मला आपणास असे सांगावयाचे आहे की १८८६ साली हिंदुस्थानच्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात यासंबंधी एक ठराव संमत करण्यात आला होता. आजच्या कामकाजाला सुरवात करण्यापूर्वी मी आपणा सर्वांचे लक्ष त्या ठरावाकडे वेधू इच्छितो. तो ठराव असा : 'ही कॉंग्रेस असे नमूद करीत आहे की, न्यायव्यवस्था व शासनव्यवस्था यांचे संपूर्ण विलगीकरण ही एक अत्यंत निकडीची आवश्यकता असून या सभेचे असे मत आहे की या विलगीकरणामुळे काही प्रांतांना खर्चाचा जादा भार सोसावा लागणार असला तरीही हे विलगीकरण ताबडतोब करणे हे सरकारचे कर्तव्य आहे.' अर्थात, ही ओरड १८८६ साली सुरू झाली असे म्हणावे लागते. त्यानंतर भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या प्रत्येक अधिवेशनात हा ठराव नमूद करण्यात येत होता. पण आपल्या मुख्य मंत्रीमहाशयांनी आताच सांगितले की, १९०९ साली हिंदुस्थानच्या गृहमंत्र्यांनी या बाबतीत पुढील घोषणा केली : 'या संबंधात सावधगिरीने आणि प्रयोग म्हणून पावले टाकण्याचा सरकारचा निश्चय आहे.' सावधगिरीने आणि प्रयोग म्हणून पावले टाकण्याचा हा उपक्रम भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही चालूच राहिला (हशा). १९५० साली भारताला संविधान मिळाले. त्या संविधानात ज्या अनेक महान तत्त्वांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे त्यात कलम ५० मध्ये, राज्यसरकारांनी अविलंबेकरून न्यायव्यवस्था व शासनव्यवस्था यांचे विलगीकरण करावे, असे म्हटलेले आहे. घटनासभेच्या काही सभासदांनी पंतप्रधानांना अशी विनंती केली होती की, या विलगीकरणासाठी काहीतरी ठराविक मुदत देण्यात यावी. पण त्यावेळी पंतप्रधानांनी असे ठासून उत्तर दिले होते की, 'या कामासाठी मुदत देण्याची मला आवश्यकता वाटत नाही; कॉंग्रेसच्या हाती राज्यसत्ता आल्याबरोबर प्रथम हाच विषय कायदेमंडळापुढे मांडण्यात येईल.' पण १९५० साल संपले, १९५१ सालही निघून गेले, त्यानंतरची आतापर्यंतची अनेक वर्षे आली नि गेली, पण सावधगिरीने आणि प्रयोग म्हणून उपक्रम करण्याची सरकारची चाल आजमितीलाही तशीच चालू आहे.

मी १९५७ साली दिल्लीला आलो, तेव्हा माझ्या असे पहिल्यानेच लक्षात आले की, विंध्यपर्वताच्या पलीकडे, म्हणजे भारताच्या उत्तरेकडील प्रदेशात या तत्त्वाला अजून मान्यता मिळालेली नाही. विंध्यपर्वताच्या दक्षिणेकडील विभागात न्यायव्यवस्था आणि शासनव्यवस्था यांचे विलगीकरण झाल्याला अनेक वर्षे होऊन गेली. पण मी उत्तर भारतात आल्यापासून पाहातो आहे, तर हे तत्त्व अमलात आणण्याला रुष्टपणाने आणि प्रच्छन्न पण सतत असा विरोध चालू आहे; आणि

म्हणूनच माझ्या मनात असा एक विचार येऊन गेला की, जर पंजाबचे मुख्य मंत्रीमहाशय आपल्या कायदेमंडळाला पटवून देऊन ही सुधारणा आपल्या राज्यात घडवून आणणार असतील तर त्या महत्त्वाच्या प्रसंगी भारताचा सरन्यायाधीश या नात्याने पंजाब सरकारचे व जनतेचे अभिनंदन करण्यासाठी इथे उपस्थित राहाणे हे माझे कर्तव्यच आहे. आजचा हा समारंभ म्हणजे उत्तर भारतातील राज्यांना ही सुधारणा ताबडतोब अमलात आणण्यासाठी निकराचे आवाहनच आहे असे म्हणायला हरकत नाही. माझ्या दृष्टीने या समारंभाचे सर्वप्रथम महत्त्व हे आहे. या समारंभाने हे दाखवून दिले आहे की तत्त्व आणि त्याचे आचरण या दोन्ही दृष्टींनी पंजाबने कायद्याचे अधिराज्य स्वीकारले आहे (टाळ्या). इतर राज्ये या बाबतीत पंजाबचे अनुकरण करतील अशी मला आशा आहे; आणि माझा लहानसा आवाज इतर प्रांतांच्या राज्यकर्त्यांच्या कानापर्यंत जाऊन पोहोचू शकत असेल तर त्यांना माझे अत्यंत नम्र भावाने असे आवाहन आहे की, त्यांनी या सुधारणेच्या बाबतीत सावधगिरीने आणि प्रयोगात्मक पद्धतीने जाण्याचा उपक्रम सोडून देण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे आणि काळाची ही पावले ओळखून त्यांनी या सुधारणेची केवळ तत्त्व म्हणून पूजा करीत बसण्यापेक्षा तिची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली पाहिजे (टाळ्या).

या समारंभाचे मला आणखी एक महत्त्व दिसते ते असे. तत्त्व आणि प्रत्यक्ष आचरण या दोहोंमध्ये अंतर राहू नये याबद्दल खबरदारी घेण्याचा या पंजाब राज्याची विधानसभा आणि या राज्याचे सरकार यांचा निश्चय झालेला आहे. आपल्या सार्वजनिक जीवनात—सामाजिक जीवनात म्हणा हवे तर—अत्यंत घृणास्पद गोष्ट अशी दिसून येते की व्यासपीठावरून करण्यात येत असलेल्या घोषणा आणि प्रत्यक्ष व्यवहारातील आचरण यात नेहमीच तफावत—फार मोठी तफावत—पडत असते. तुमच्या राज्याचे मुख्य मंत्रीमहाशय आणि तुमचे विधिमंडळ यांनी असे ठामपणे सिद्ध केले आहे की, अशा प्रकारच्या सुधारणांच्या बाबतीत तत्त्व आणि आचरण यांच्यात फारकत असता कामा नये. म्हणून मी केवळ पंजाब सरकारचेच नव्हे तर येथील विधानसभेच्या सभासदांचेही ह्या सुधारणेला अत्यंत मनःपूर्वक पाठिंबा दिल्याबद्दल आभार मानतो. तत्त्व म्हणून न्याय्य असलेली सुधारणा अमलात आणण्याचे सरकारने ठरविल्यास विधानसभेतील सरकारविरोधी पक्षही तिला विरोध करीत नाहीत हे देखील यासंबंधात प्रसंगोपात्त रीतीने सिद्ध झाले आहे. या सुधारणेला विधानसभेने एकमुखाने पाठिंबा दिला आहे. या तुमच्या पंजाब राज्याच्या कायदेपुस्तकात हे तुमचे बिल—म्हणजे १९६४ चा २५ वा कायदा—सुवर्णाक्षरातच छापला गेला पाहिजे (टाळ्या). इतर राज्यांतील एतद्विषयक कायद्यांशी तुलना करता तुम्ही केलेला हा कायदा अनेक दृष्टींनी पुरोगामी आहे असे सकृद्दर्शनी दिसून येते.

आता हे खरेच आहे की, शासनव्यवस्था ही न्यायव्यवस्थेहून निराळी करण्याचे ठरविल्यावर दोन प्रश्नांना तोंड दिल्याशिवाय गत्यंतर नाही. या उपक्रमामुळे खर्चाचा बोजा वाढतो असे म्हणतात. पण लोकशाहीच्या तत्त्वाला धरून एवढे आत्यंतिक महत्त्वाचे तत्त्व अंमलात आणताना खर्चाच्या बोजाला बिचकणे अप्रस्तुत आहे.

आपले मुख्य मंत्रीमहाशय नि त्यांचे सरकार यांस मी असे सुचवू इच्छितो की, यानंतर न्यायव्यवस्थेतील मुख्य ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेटांच्या अधिकारक्षेत्रात अधिक वाढ होणार असून त्यांना अधिक जबाबदारीचे काम हाताळावे लागणार आहे. तेव्हा त्यांना मिळणाऱ्या पगारासंबंधाने आणि मोबदल्यासंबंधाने फेरविचार करण्यात यावा आणि त्यांच्या पगाराची श्रेणी हळूहळू त्यांच्या जबाबदारीच्या कामाशी सुसंगत ठरेल इथपर्यंत आणून ठेवावी. इतक्या दिवसांची प्रथा अशी होती की आपण पुढेमागे जिल्हान्यायाधीश होऊ अशी आशा ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट्सना वाटत असे. पण आता त्यांची संख्या दुप्पट होणार आहे आणि म्हणून बढतीच्या त्यांच्या अपेक्षा साहजिकच दुरावणार आहेत. ही बाब विचारात घेणे हे सरकारचे कर्तव्यच आहे. मुख्य न्यायाधीश मिस्टर फॉलशॉ हे या प्रश्नाचा मुख्य मंत्रीमहाशयांशी ऊहापोह करतील तेव्हा मुख्य मंत्रीमहाशय तो प्रश्न सुजाणपणे आणि सहानुभूतीने हाताळतील अशी मला आशा आहे (टाळ्या).

दुसरी एक अडचण जोराने पुढे मांडण्यात येत असते. न्यायव्यवस्था व शासनव्यवस्था यांचे विलगीकरण केल्याने जास्त जास्त आरोपी निरपराध ठरून सुटतील अशी सरकारला एक प्रकारे भीती वाटत असते. लॉ कमिशनच्या रिपोर्टावरून असे दिसून येते की पंजाब सरकारचे चीफ सेक्रेटरी कमिशनपुढे साक्ष देताना असे स्पष्ट म्हणाले होते—आणि त्यांच्या या प्रामाणिकपणाबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो—की, 'शासनव्यवस्था व न्यायव्यवस्था यांचे आपण विलगीकरण केले तर शांतता नि सुव्यवस्था स्थापन करण्याचे काम फारच बिकट होईल. कारण त्यामुळे वाजवीपेक्षा जास्त लोक निरपराध ठरून मोकळे सुटतील.'

महत्त्वाच्या अशा कोणत्याही गोष्टीचा विचार करताना त्या गोष्टीला दोन बाजू असतात आणि खरोखरी एकान्तिकता कुठेच नसते, हे न्यायाधीश या नात्याने, मी पक्के जाणतो. आपण सत्याचा शोध केला पाहिजे. मी उल्लेख केलेली वरील प्रकारची भीती अगदीच अवास्तव असेल असे मी म्हणत नाही. पण ती भीती प्रकट करण्यानेच ही समस्या सोडविण्याचा मार्ग सुचेल. फौजदारी खटला ऐकून घेतल्यावर मॅजिस्ट्रेट आरोपीला दोषमुक्त म्हणून सोडून देतो तेव्हा आरोपीला सोडून दिल्याचा कायद्याच्या अंमलबजावणीवर काय परिणाम होईल याचा त्याने विचार करावा अशी अपेक्षा असते काय? मी असे म्हणण्याचे धाडस करतो की, 'नाही!' आणि म्हणूनच न्यायव्यवस्था व शासनव्यवस्था

यांचे विलगीकरण केले असता आरोपी अधिक प्रमाणात दोषमुक्त केले जातात असा अनुभव आल्यास त्याच्यावर एखादा निराळाच तोडगा शोधून काढला पाहिजे—त्या कारणास्तव या तत्त्वाची अंमलबजावणी थोपविणे हे अत्यंत अनुचित होईल.

आता पंजाब सरकारने हे विलगीकरण घडवून आणले आहे तेव्हा न्याय-व्यवस्थेतील मॅजिस्ट्रेट मंडळींनी—खरे म्हणजे सगळ्याच न्यायाधीशांनी हे—लक्षात ठेवले पाहिजे की सर्वसामान्य माणसाच्या मनावर फौजदारी कायद्याच्या प्रशासनाचा जो परिणाम होतो त्याचे महत्त्व फार मोठे आहे. आता हे खरे आहे की आरोपीचा निरपराधीपणा गृहीत धरून चालण्याच्या तत्त्वावर आपली दृढ श्रद्धा आहे आणि एका निरपराधी माणसाला विनाकारण शिक्षा होण्यापेक्षा नऊ गुन्हेगार मोकळे सुटलेले अधिक बरे, या तत्त्वावरच फौजदारी कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत असते. पण आता मला हे पटू लागलेले आहे की फौजदारी कायद्याचा अंमल करताना निरपराधी माणसाला शिक्षा होता कामा नये या तत्त्वाबरोबरच गुन्हेगाराला शिक्षा झालीच पाहिजे असेही कायदा ठणकावून बजावीत असतो, हे न्यायाधीशांनी विसरता कामा नये (टाळ्या). विशेषतः मालमत्ता आणि व्यक्ती यांच्या संबंधीच्या गुन्ह्यांच्या बाबतीत तर हे विशेषच लक्षात ठेवले पाहिजे.

मला असे अनेक खटले माहीत आहेत की ज्यांचा निकाल ऐकल्यानंतर त्या खटल्यांशी संबंधित असलेल्या सर्वसामान्य खेडुताचे मन गोंधळून विस्मय-चकित होऊन जाते. घरफोड्या घरफोडी करतो, त्याला प्रथम खालच्या कोर्टापुढे उभे करण्यात येते, त्यानंतर त्याचा खटला सेशन कोर्टात जातो आणि कधीकधी त्याच्याविरुद्ध पुरावा सादर करण्यात न आल्यामुळे तो दोषमुक्त ठरतो, इतकेच नव्हे, तर कोर्टापुढे सादर करण्यात आलेल्या लुटीसह तो त्याच्या दुष्कृत्याला बळी पडलेल्या माणसासमोर उभा राहून सांगतो की, 'तुझ्या नाकावर टिच्चून मी केलेल्या लुटीसह राजरोस परत आलो आहे.' अशा प्रकारचा अनुभव आल्यानंतर फौजदारी कायद्याच्या अंमलबजावणीसंबंधाने सर्वसामान्य नागरिकाच्या मनावर एक भयानक परिणाम होतो. फौजदारी खटले ज्यांच्यापुढे चालविले जातात ते रक्तपिपासूच असले पाहिजेत असे मला सूचित करावयाचे नाही. पण फौजदारी खटल्यांचा निकाल देणाऱ्या न्यायाधीशांनी त्या खटल्यांकडे वास्तववादी दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे आणि निरपराधी माणसाला शिक्षा होता कामा नये या तत्त्वाच्या पालनाबरोबरच समोर दाखल झालेल्या पुराव्याकडे हस्तिदंती मनोऱ्यात राहाणाऱ्या माणसासारखे न पाहाता समाजात वावरणाऱ्या माणसाप्रमाणे पाहिले पाहिजे.

माझे एक स्नेही एका राज्याचे गृहमंत्री होते. ते आम्हाला नेहमी आपला अनुभव सांगायचे. तो असा की आरोप ठेवण्यात आलेल्या शंभर लोकांपैकी चाळीस आरोपी फौजदारी कोर्टात न्यायचौकशी करणाऱ्या न्यायाधीशाकडून निरपराधी

ठरतात; आणि दोषी ठरलेले साठ आरोपी सेशन्स कोर्टापुढे उभे करण्यात येतात त्यांतील तीस जण त्या कोर्टात निरपराधी ठरतात. अपराधी ठरलेल्या बाकीच्या तीसजणांपैकी वीसजण हायकोर्टाकडे धाव घेतात आणि त्यांतले दहा निरपराधी ठरतात. जे लोक अपील करण्याच्या खटाटोपात पडत नाहीत तेवढेच बिचारे तुरुंगाची हवा खायला जातात असा त्या गृहमंत्र्यांनी आपला अनुभव सांगितला (हशा). मी त्या माझ्या मित्राला सांगत असे की, फौजदारी खटल्यांचे निकाल इतके काही हास्यास्पद नसतात. ते काही असले तरी फौजदारी खटले ऐकत असताना वास्तविक परिस्थिती नेहमी लक्षात घाळगिली पाहिजे आणि न्यायसुद्धा दुहेरी असतो हे विसरता कामा नये. निरपराध्याला शिक्षा होता कामा नये, तसेच, अपराधी मोकळा सुटता कामा नये, असे न्यायच बजावून सांगत असतो.

यासंबंधात मुख्य मंत्रीमहाशय आणि त्यांचे सहकारी यांचे या प्रश्नाच्या एका महत्त्वाच्या बाजूकडे मी लक्ष वेधू इच्छितो. जर जास्त आरोपी दोषमुक्त ठरत असतील तर त्याचे प्रमुख कारण असे असते की, आरोपीच्या गुन्ह्याचा तपास करण्यात बरीचशी उणीव राहात असते. पण आता न्यायव्यवस्था आणि शासनव्यवस्था यांचे विलगीकरण केल्यानंतर गुन्ह्याच्या तपासात सुधारणा कशी करता येईल याकडे त्यांनी ताबडतोब आणि काळजीपूर्वक लक्ष पुरवावे. गुन्ह्याचा तपास अपुरा आणि खटल्याचा उपन्यास सदोष असला म्हणजे न्यायदान करणारांचा नाइलाज होऊन आरोपींना निर्दोषी ठरवून त्यांना सोडून द्यावे लागते. न्यायनिवाडा करणारी आम्ही न्यायाधीश मंडळी प्रत्यक्ष खटल्यापासून एक प्रकारे अलिप्त असतो; खटला चालविणाऱ्या वकिलाची भूमिका आम्ही कधीही घेत नाही. आमच्यासमोर जो पुरावा सादर झालेला असतो त्याच्या आधारावरच आम्हांला आपला निकाल द्यावा लागतो; आणि म्हणून वर्षानुवर्ष चालू असलेली जुनीपुराणी परंपरागत गुन्हातपासणीची पद्धत टाकून देण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे.

महाराष्ट्र राज्यातील माझा अनुभव असा आहे की गुन्ह्याच्या तपासाचे काम जर हुषारीने करण्यात आले, चौकशी करणारी यंत्रणा उत्कृष्ट प्रकारे कार्यक्षम आणि तपासणीचे शास्त्र जाणणारी असली तर खटल्याचे काम अधिक चांगले व लौकर होऊ शकते. महाराष्ट्रात शहरापासून दूरच्या भागात चालू असलेले बहुतेक फौजदारी खटले कबुलीजबाबांवर चालविण्यात येत असतात; आणि आपणास हे माहीतच आहे की, कोर्टासमोर आलेला कबुलीजबाब हा राजीखुषीने देण्यात आलेला आहे की नाही याबद्दल कोर्ट साशंक असते आणि त्या कबुलीजबाबाच्या आधारे कार्यवाही करण्यास राजी नसते. खुद्द मुंबई शहरात मात्र मला असा अनुभव आला की, बहुतेक खटल्यांच्या प्रसंगी कबुलीजबाबाचा उपयोग करण्यात आला नाही. याचे कारण असे की तेथील तपासणीयंत्रणा तपासणीकलेमध्ये वाकबगार होती. कायद्याप्रमाणेच गुन्हातपास करण्याची सुद्धा एक कला होऊन

बसली आहे आणि तुम्हांला आता तपासणीच्या कलेचे व शास्त्राचे प्रशिक्षण घेतलेल्या तपासणी अधिकाऱ्यांची एक श्रेणी निर्माण करावी लागेल. गुन्हा तपासाचे काम उत्तम प्रकारे होऊ शकले आणि फौजदारी कायद्याची अंमलबजावणी करणारे न्यायाधीश आपल्यावरील दुहेरी जबाबदारीविषयी जागरूक असले तर मला अशी खात्री वाटते की, या दोन व्यवस्थांचे विलगीकरण केल्याने लोकांच्या मनावर कोणताही प्रतिकूल परिणाम होणार नाही.

कायद्याचे राज्य यथार्थाने प्रस्थापित करावयाचे असल्यास न्यायव्यवस्था व शासनव्यवस्था यांचे विभक्तीकरण करण्यात आलेच पाहिजे असे मी प्रतिपादन करतो त्यावेळी माझा मुख्य हेतू काय असतो? माझा मुख्य हेतू हा असतो की कायद्याचे राज्य म्हटले की ते कांही आवश्यक गोष्टी गृहीत धरून चाललेले असते. कायदेमंडळे कायदे करतात, न्यायव्यवस्था ते कायदे पारखून घेते आणि त्यांचे अर्थ लावते व शासनव्यवस्था त्यांची अंमलबजावणी करते. कायद्यांशी संबंध येणाऱ्या या तिन्ही घटकांचे संबंध परस्परांशी खेळीमेळीचे असले, त्यांच्यात कोणत्याही प्रकारे विसंवाद नसला, त्यांचा एकमेकांशी पूर्ण सहकार असला तरच ती राज्ययंत्रणा लोकशाहीच्या तत्त्वावर सुस्थिर झालेली आहे असे म्हणता येते.

पूर्वी रानडे या नावाचे एक फार निष्णात असे कायदेपंडित, न्यायाधीश, तत्त्वज्ञ आणि विद्वान गृहस्थ होते. मानवी सुखाविषयी चर्चा करीत असताना एकदा ते म्हणाले होते की, 'मानवी सुखाच्या श्रेणीतील सर्वात वरचा वर्ग म्हणजे भारत स्वतंत्र झाल्यावर त्यात नांदणारी तरुण पिढी.' रानड्यांचा हा विचार ऐकून तुम्हाला वर्ड्सवर्थच्या शब्दांचे स्मरण होईल. फ्रेंच राज्यक्रांती-बद्दल आपले विचार व्यक्त करताना वर्ड्सवर्थने म्हटले होते की, 'त्या काळात जीवन जगणे म्हणजे परम आनंद होता, पण त्या काळात तरुण असणे हा तर प्रत्यक्ष स्वर्गच होता.'

अनुभवाअंती मला खात्री आहे की, रानडे यांनी सांगितलेल्या सर्वात वरच्या वर्गाच्याही वर एक वर्ग असून तुम्ही आणि मी त्या वर्गाचे घटक आहो. लोकशाहीच्या जीवनमार्गाचे संरक्षण करणे ही या वर्गाची जबाबदारी आहे. आज लोकशाही स्थिर करण्याचे कार्य सुरू आहे. भारताच्या संविधानानुसार गेली जवळजवळ १४ वर्षे लोकशाहीच्या तत्त्वानुसार भारताचा राज्यकारभार चाललेला आहे. लोकशाहीची बाल्यावस्था संपून ती आता आपल्या जवानीत प्रवेश करू लागल्यावर काही अडचणींना तोंड देण्याचे प्रसंग तिच्यावर येऊ लागलेले आहेत आणि लोकशाहीचे संरक्षण करण्याचा खास अधिकार तुमचा नि माझा आहे—आज जिवंत असणाऱ्या सर्वांचाच आहे. जर तुम्ही कोणत्याही प्रकारे हातचा राखून न ठेवता लोकशाहीचे रक्षण करण्याचा निर्धार केला असेल तर कायद्याच्या राज्याला तुम्ही संपूर्णपणे पाठिंबा दिलाच पाहिजे (टाळ्या). कायदा हे एखादे खेळणे

नसून ते गतिमान असे शस्त्र आहे. याच एकट्या शस्त्राच्या जोरावर आपली लोकशाही सरकारे अखिल भारतात कल्याणकारी राज्याची ती गौरवास्पद अवस्था अवतरविण्याचा उपक्रम करू पाहात आहेत. कायद्यामुळे आदर्शभूत कल्याणकारी राज्य अस्तित्वात येणार नसेल तर खुद्द लोकशाहीच धोक्यात येईल आणि म्हणूनच मी असे म्हणतो की, लोकशाहीचे जतन करण्याची अभिमानास्पद कामगिरी आपणाला, तुम्हांला आणि मला पार पाडावयाची आहे.

आपणाला केवढा थोर वारसा मिळालेला आहे याचे आपणास कधी कधी विस्मरण पडत असते. यावरून मला एका फ्रेंच विनोदी लेखकाच्या नाटकाची आठवण होते. त्या नाटकात एका लक्ष्मीपुत्राचे एक पात्र आहे. तो लक्ष्मीपुत्र वयाने खूपच वाढल्यावर त्याला वाङ्मयविशारद होण्याची हुक्की आली. द्रव्याचे भक्कम पाठबळ असल्यामुळे वाङ्मयाच्या एका विख्यात प्रोफेसराची शिकवणी ठेवणे त्याला सहज शक्य झाले. प्रोफेसर मजकूर आले आणि त्यांनी आपल्या शिष्याला शिकविण्यास सुरवात केली. ते आपल्या शिष्याला म्हणाले, 'वाङ्मयाचे दोन प्रकार असतात. एक गद्य आणि दुसरा पद्य.' शिष्याने पृच्छा केली, 'गुरुजी, गद्य म्हणजे काय?' गुरुजींनी उत्तर केले, 'तू आता जे बोलतो आहेस तेच गद्य.' शिष्य आश्चर्याने थक्कच झाला. आपण जन्मभर गद्यच बोलत आलो आहो हे तोपर्यंत त्याला माहीतच नव्हते (हशा). आपलीही परिस्थिती कधीकधी अशीच होते.

आपण ज्या काळात वावरत आहो त्या काळात लोकशाहीचा प्रयोग चालू आहे आणि आपल्या या देशात लोकशाही स्थिर व्हावी म्हणून आपल्यांतील प्रत्येक स्त्रीपुरुषाने या बाबतीतील आपले कर्तव्य बजावलेच पाहिजे. नुसत्या तोंडाच्या घोषणा करीत बसल्याने लोकशाही वाढीला लागणार नाही. लोकशाहीची तत्त्वे आपणापैकी प्रत्येकाच्या हाडीमाशी खिळून बसली पाहिजेत आणि ती आपल्या आचरणात उतरली पाहिजेत. लोकशाही वाढीला लागावी अशासाठी आपले प्रयत्न सुरू आहेत. अशा दृष्टीने विचार केल्यास आताचे हे विलगीकरण योग्य अशा वेळीच होत असून त्याचा लोकशाहीला खूपच प्रमाणात फायदा होईल यात काहीच शंका नाही; आणि म्हणूनच या समारंभात प्रत्यक्ष भाग घेण्याची संधी मला मिळाल्याबद्दल मी स्वतःला धन्य मानतो.

भारतीय संविधानाच्या छत्राखाली
कायदा व न्याय

सोव्हिएट समाजवादी प्रजासत्ताक संघराज्याच्या उच्चतम न्यायालयाचे अध्यक्ष-महाशय, सोव्हिएट संघाचे न्यायाधीश, अधिवक्ते आणि कायदेशास्त्रज्ञ बांधव हो,

आजच्या सायंकाळी या थोर लोकांच्या समुदायाला उद्देशून भाषण करण्याची संधी मला मिळाली आहे हा मी माझा मोठा सन्मान समजतो. आपल्या या समुदायात सोव्हिएट संघाचे श्रेष्ठ न्यायाधिकारी, न्यायसंरक्षक आणि त्यांचे अधिकारी, अधिवक्ते आणि कायदेशास्त्रज्ञ उपस्थित आहेत. या सर्वांनी सोव्हिएट संघाच्या वैधिक इतिहासामध्ये नाणावलेले कार्य केले आहे. केवढे महामान्य सज्जन येथे जमलेले आहेत हे पाहिले म्हणजे भारतीय संविधानाच्या छत्राखाली कायदा व न्याय यांचे स्थूल स्वरूप कसे आहे हे पर्याप्त रीतीने स्पष्ट करून सांगण्याच्या माझ्या योग्यतेविषयी मला आशंका वाटू लागते.

परदेशाच्या सर्वोच्च न्यायाधीशाच्या नेतृत्वाखाली आलेले पहिले अधिकृत शिष्टमंडळ भारतातूनच आलेले असावे हा एक लक्षात ठेवण्याजोगा योगायोग आहे असे मला वाटते. अर्थात् या योगायोगाचे महत्त्व आणि त्यातील अर्थ स्पष्ट आहे. सोव्हिएट संघ आणि भारत यांची मैत्री भारत १९४७ साली स्वतंत्र झाल्यापासून तहत आजच्या घटकेपर्यंत अखंड चालत आली आहे आणि म्हणून सोव्हिएट संघाप्रत पहिले अधिकृत शिष्टमंडळ नेण्याचा खास सन्मान भारताच्या सर्वोच्च न्यायाधीशाला मिळावा हे न्याय्य, उचित आणि स्वाभाविक आहे असे मला वाटते. आजच्या सभेला प्रथमारंभीच मी हे सांगू इच्छितो की सोव्हिएट गणराज्य संघाच्या उच्चतम न्यायालयाचे अध्यक्ष श्री. गॉर्किन यांनी आम्हांला दिलेले निमंत्रण हा माझा व माझ्या सहकाऱ्यांचा सन्मान होय असे मी समजतो. सोव्हिएट

संघामधल्या आमच्या वास्तव्यात आमचे अत्यंत प्रेमाने आदरातिथ्य झाले आणि सोव्हिएट संघाच्या सर्व जनतेच्या मनात भारताविषयी गाढ प्रेमाची भावना वसत आहे याबद्दल अनुभवाने आमची खात्री पटली आहे.

आजच्या विषयाला आरंभ करण्यापूर्वी एक प्रास्ताविक विचार मला सांगावयाचा आहे. आमच्या भारतीय तत्त्वज्ञानात एक सारभूत सिद्धान्त असा आहे की सत्याला अनेक बाजू व पैलू आहेत आणि सत्याचा शोध करण्याचे मार्ग अनेक असतात. या सिद्धान्ताच्या महान आशयावर विश्वास असल्यामुळे भारतीय न्याय-पंडित आपलीच न्यायतत्त्वमीमांसा परिपूर्ण आहे असा दावा करीत नाहीत. भारतीय न्यायमीमांसेमध्ये कित्येक चांगल्या बाबी आहेत असे जरी त्यांचे म्हणणे असले तरी तिच्यामध्ये काही उणिवा असू शकतील याची त्यांना जाणीव आहे. आणि म्हणून या देशाला येण्यात माझा मुख्य उद्देश हा आहे की सोव्हिएट संघामधील न्यायाधीश, अधिवक्ते आणि कायदेशास्त्रज्ञ यांना भारताच्या संविधानाची स्थूल रूपरेषा समजावून सांगावी आणि त्यांच्यापासून सोव्हिएट न्यायमीमांसेच्या स्थूल स्वरूपाची माहिती करून घ्यावी. या हेतूस्तव आजच्या सायंकाळच्या चर्चेसाठी 'भारतीय संविधानाच्या छत्राखाली कायदा आणि न्याय' हा विषय मी निवडला आहे.

स्थूल रूपाने सांगायचे म्हटल्यास भारतीय संविधानाच्या अंतर्गत सत्तेचे विभाजन करण्यात आले आहे. भारतीय लोकशाहीचे कार्य तीन परस्परभिन्न अवयवांच्या द्वारा चालते. विधानमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ. हे तीन अवयव परस्पर स्वतंत्र आहेत आणि ते आपआपल्या आखून दिलेल्या क्षेत्रात आपले विहित कार्य करतात. विधानमंडळे कायदे करतात, कार्यकारी मंडळ (शासन) त्यांची अंमलबजावणी करते आणि न्यायमंडळ जरूर पडेल तेव्हा कायद्यांची विधिमान्यता तपासून पाहते आणि देशाला मार्गदर्शन करण्याकरिता कायद्यांचे निर्वाचन करते.

या विषयाची आणखी एक बाजू आहे तिचा ह्याच स्थळी निर्देश करणे अवश्य आहे. भारतात सत्ताधारी पक्षाखेरीज विरोधात असलेले अनेक पक्ष आहेत आणि तात्त्विक दृष्ट्या त्यांच्यापैकी कोणताही एखादा पक्ष निवडणुकीचा निकाल आपल्याला अनुकूल करून घेऊन सत्ता काबीज करू शकतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास जिच्यामध्ये एकच पक्ष संभवतः सदोदित अधिकारावर राहाणार नाही अशा सांसदीय स्वरूपाच्या शासनावर भारतीय लोकशाही उभारलेली आहे.

आपणा सर्वांना माहीतच आहे की ब्रिटिशांचा वसाहतशाही अंमल १९४७ मध्ये संपुष्टात आला आणि भारताच्या घटनापरिषदेने १९५० साली देशाला संविधान तयार करून दिले. हे संविधान लिखित स्वरूपात आहे. हे संविधान भारतातील कायद्यांचा कायदा असून कायदा आणि न्याय यांना आपले विहित कार्य संविधानाने

घालून दिलेल्या मर्यादांच्या आत राहून करावे लागते. संविधानाने नागरिकांना राजकीय, सामाजिक आणि आर्थिक न्यायाची हमी दिली आहे. सामाजिक-आर्थिक न्यायाच्या हमीचा अपरिहार्य अर्थ असा होतो की भारतीय लोकशाही हे कल्याणकारी राज्य आहे. लोकशाही समाजवाद हे त्याचे ध्येय आहे. "लोकशाही समाजवाद" या शब्दप्रयोगाला दुहेरी अर्थ आहे. 'लोकशाही' या विशेषणात प्रत्येक नागरिकाचे व्यक्तित्व, त्याची स्वतंत्रता आणि मालमत्ता संपादन करण्याचा त्याचा अधिकार या सर्वांचा आदर करण्याचे तत्त्व अनुस्यूत आहे. याचाच अर्थ असा की काही पायाभूत हक्कांना सर्व नागरिकांचे मूलभूत अधिकार म्हणून संविधानाने मान्यता दिली आहे व त्यांची हमी दिली आहे. या मूलभूत अधिकारांचा आदर हे भारतीय लोकशाहीचे पहिले वैशिष्ट्यदर्शी लक्षण होय.

'लोकशाही' या विशेषणाने युक्त अशा समाजवादात सामाजिक–आर्थिक न्यायाची प्रतिष्ठापना अपरिहार्य रीत्या अंतर्भूत होते; याचा अर्थ असा की यद्यपि व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि नागरिकांचे मूलभूत अधिकार महत्त्वाचे असले, तथापि सामाजिक हित अधिक महत्त्वाचे आहे आणि एका अर्थी सर्वश्रेष्ठ आहे. जर कधीकाळी समाजहित आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांत संघर्ष निर्माण झाला तर व्यक्तिस्वातंत्र्याचा समाजहिताशी समन्वय केला पाहिजे, किंवा व्यक्तिस्वातंत्र्याला, आवश्यक आणि सयुक्तिक प्रमाणात, समाजहिताच्या अधीन केले पाहिजे. भारतीय लोकशाहीने स्वतःच्यापुढे हा आदर्श ठेवला आहे आणि यालाच 'लोकशाही समाजवाद' असे नाव दिले आहे. भारतीय लोकशाही गतिशील कायद्याला आपला मुख्य साध्यकर्ता मानते आणि त्याच्यावर अवलंबून राहाते. वसाहतशाही शासनामध्ये कायदा स्थितिशील होता तो आता गतिशील बनला आहे आणि लोकशाही साधनांनी समाजवाद प्रस्थापित करण्याच्या कामात भारतीय लोकशाहीला सहाय्य करणे हे त्याचे मुख्य प्रयोजन आहे.

गतिशील कायद्याची ही संकल्पना भारताला नवीन नाही. खिस्तापूर्वी सुमारे २९०० वर्षे एका भारतीय तत्त्वज्ञाने कायद्याचा महिमा ज्या शब्दांत वर्णिला त्यांची अर्थपूर्णता आजही आपल्या प्रत्ययाला येते. तो म्हणाला, "धर्म (कायदा) राजांचा राजा आहे; त्यांच्यापेक्षा तो अधिक शक्तिमान व दृढ आहे; धर्मापेक्षा उच्चतर असे काही नाही; स्वर्गाच्या अधिपतीच्या सामर्थ्यासारख्या त्याच्या सामर्थ्याने अशक्त सशक्तांवर मात करतील आणि न्यायाचा विजय होईल." कायद्यासंबंधीची ही प्राचीन संकल्पना भारतीय संविधानाच्या देव्हाऱ्यात प्रस्थापिली आहे.

संविधानाने अशा रीतीने लोकशाही समाजवाद प्राप्त करून घेण्यासाठी दुहेरी तरतूद केली आहे. पहिली ही की त्याने व्यक्तिशः नागरिकांचे काही मूलभूत अधिकार मान्य केले आहेत. भाषणाचे आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य; शांततापूर्वक

शस्त्रविरहित एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य; संस्था व संघरूपाने संघटित होण्याचे स्वातंत्र्य; भारताच्या प्रदेशात सर्वत्र अनिर्बंध जाण्यायेण्याचे आणि कोणत्याही भागात राहाण्याचे व कायम वस्ती करण्याचे स्वातंत्र्य; मालमत्ता संपादन करणे, धारण करणे व तिची विल्हेवाट लावणे यांचे स्वातंत्र्य; कोणताही धंदा, व्यापार, आजीविका अथवा व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य—असे हे मूलभूत अधिकार आहेत. कायद्याच्या अनुज्ञेविना गिरफ्तार केले जाणार नाही अशीही हमी दिली आहे. भारताच्या नागरिकांना ज्या स्वतंत्रतांची हमी दिली आहे, त्यापैकी काही वर नमूद केल्याप्रमाणे आहेत.

नागरिकांचे मूलभूत अधिकार सुरक्षित करून ठेवण्याची याप्रमाणे तरतूद केल्यानंतर, या मूलभूत अधिकारांचा समाजहिताशी समन्वय केला पाहिजे किंवा जरूर पडेल तर त्यांना सार्वजनिक हिताच्या अधीन केले पाहिजे याविषयी तरतुदी करून ठेवण्याची भारतीय संविधानाने खबरदारी घेतली आहे. लोकशाही समाजवाद साध्य करून घेण्यासाठी संविधानाने केलेली दुहेरी तजवीज ही अशी आहे.

भारतातील कायदेमंडळे जे कायदे सामाजिक–आर्थिक न्याय प्रस्थापिण्याच्या उद्देशाने मंजूर करतात ते सामान्य माणसाच्या दबावामुळे केले जातात आणि त्यांचा उद्देश समाजहित साधणे हा असतो, या गोष्टीचे या सभेत उपस्थित असलेले कायदे-शास्त्रज्ञ सहजच कौतुक करतील. विहितकार्यवादी न्यायमीमांसेचा हाच अभिप्राय आहे आणि तो भारतीय संविधानाच्या एकंदर संकल्पाशी जुळणारा आहे. सामाजिक आर्थिक बदल घडवून आणण्यास उपयोगी पडणारे कायदे हे अशा प्रकारे सामाजिक–आर्थिक क्रांतीचे लवचिक साधन बनतात. अर्थात्च हे कायदे गरीब आणि श्रीमंत यांच्यामधील संघर्ष मिटवू पाहातात आणि आर्थिक विषमतेचा परिहार करून सामाजिक संरचनेमध्ये समंजस सुसंवाद आणण्याचा प्रयत्न करतात.

कायदे सामाजिक आर्थिक उद्दिष्ट साध्य करण्याच्या मागे लागले की लगेच ज्या नागरिकांना त्यांची झळ लागते ते आपल्या मूलभूत अधिकारांवर आक्रमण झाले अशी तक्रार करू लागतात. व्यक्तिशः नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि सार्वजनिक हित यांच्यामधील संघर्षातून नेहमी संविधानासंबंधी वादस्थल निर्माण होते; कायद्यांची विधिमान्यता ही वादविषय बनते. अशा विवादांचा परामर्श घेण्याची शक्ती संविधानाने उच्च न्यायालय आणि उच्चतम न्यायालय यांना दिली आहे.

उपस्थित श्रोत्यांना एका गोष्टीचे जरा कुतूहल वाटेल. भारतातील कायदे-मंडळाकडून कायदे मंजूर केले जाण्यापूर्वी त्यांच्या गुणदोषांची वृत्तपत्रांमधून आणि सार्वजनिक व्यासपीठांवरून निर्भयपणाने मोकळेपणाने परिपूर्ण चर्चा केली जाते. विधानसभागृहामध्ये त्यांचा निःशेषपणे विचार केला जातो; विरोधी पक्ष त्यांतील दोषांवर कडाडून हल्ला चढवितात. अखेरीस नागरिकांनी जर त्यांच्याबद्दल हरकत घेतली तर त्यांची विधिमान्यता न्यायालयांकडून परीक्षिली जाते. अशा रीतीने,

कायदे पास होण्यापूर्वी प्रत्येक अवस्थेत खुली चर्चा आणि पास झाल्यानंतर न्यायालयांमध्ये त्यांच्या विधिमान्यतेची परीक्षा ही भारतीय कायद्यांची संविधानाला अभिप्रेत असलेली खास लक्षणे आहेत.

या स्थली आमच्याकडील न्यायव्यवस्थेची माहिती सांगणे अवश्य वाटते. प्रत्येक न्यायाधीशाला वकील म्हणून काही काळ तरी काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक असते. कनिष्ठ स्तरावरील न्यायाधीशांची निवड त्या त्या राज्यांच्या लोकसेवा आयोगांकडून केली जाते. या न्यायाधीशांपैकी काही न्यायाधीश दिवाणी स्वरूपाच्या कज्जांचे व काही न्यायाधीश फौजदारी स्वरूपाच्या खटल्यांचे कामकाज पाहातात. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा न्यायाधीशाचे न्यायालय असते. त्यांची निवड ही खालच्या न्यायाधीशांमधून किंवा जिल्हान्यायालयात वकिली करणाऱ्या वकीलमंडळीतून होते. प्रत्येक राज्याचे उच्च न्यायालय असते व तेथे काम करणाऱ्या न्यायमूर्तीची निवड ही जिल्हा न्यायाधीशांतून किंवा उच्च न्यायालयाच्या वकिलांतून होत असते. आमच्या संघराज्यात अशी १५ उच्च न्यायालये आहेत.

उच्चत्तम न्यायालय हे भारतीय संघराज्याचे सर्वोच्च न्यायालय आहे. तेथील न्यायमूर्तीची नेमणूक उच्च न्यायालयात काम करणाऱ्या न्यायमूर्तींमधून किंवा नामांकित कायदेपंडितांतून राष्ट्रपती करतात. घटनेप्रमाणे ह्या नेमणुका सरन्यायाधीशांच्या सल्ल्याने होतात. सर्वोच्च न्यायमूर्तींचा सल्ला घेण्याचा संकेत १९४७ सालापासून सतत पाळण्यात आलेला आहे व ह्या परंपरेत अद्याप खंड पडलेला नाही.

न्यायाधीशाच्या सेवानिवृत्तीचे वय ठरलेले आहे. ५८ व्या वर्षी न्यायाधीश सेवानिवृत्त होतात तर उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती ६२ व्या वर्षी सेवानिवृत्त होतात. उच्चतम न्यायालयातील न्यायमूर्ती ६५ व्या वर्षापर्यंत काम करून निवृत्त होतात.

न्यायाधिकाराचे काम करणारी ही मंडळी कोठल्याही राजकीय पक्षाचे सभासद नसतात. आमच्या देशात पुष्कळच पक्षोपपक्ष आहेत. न्यायाचे काम निःपक्षपातीपणाने चालते असा विश्वास सर्वांना वाटला पाहिजे यासाठी न्यायाधीशाच्या मनात कोणत्याही स्वरूपाचा राजकीय पूर्वग्रह असता कामा नये आणि म्हणून त्याने राजकीय पक्षांपासून नेहमीच दूर राहिले पाहिजे. मात्र न्यायाधीश मंडळी शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमात भाग घेत असतात. पण जो प्रश्न आपल्या समोर निर्णयार्थ येण्याची शक्यता आहे अशा प्रश्नासंबंधी ते कधी लोकात चर्चा करीत नाहीत. एका अर्थाने ते सोवळे असे जीवन जगत असतात. कोणत्याही राजकीय संघर्षात किंवा चळवळ, चर्चेत ते भाग घेत नाहीत. जनता आणि वृत्तपत्रे त्यांना मोठा मान देतात. न्यायाधीशमंडळी निस्पृहपणे आणि

निर्भयपणे आपले काम करीत आहेत, असा विश्वास आमच्या देशात न्यायाधीशांबद्दल सर्वांनाच वाटतो.

उच्च किंवा उच्चतम न्यायालयासमोर निर्णयासाठी प्रश्न येतात तेव्हा त्या प्रश्नांची शहानिशा काही कसोट्यांवर करावी लागते. आमच्या संविधानात काही निदेशक तत्त्वे परिगणित केली आहेत. त्यावरूनच ह्या कसोट्या सूचित होतात. जेव्हा एखादा कायदा हा घटनेशी विसंगत असून त्यामुळे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा भंग झाला आहे, असे न्यायालयात प्रतिपादिले जाते तेव्हा दोन प्रश्न निर्माण होतात. पहिला प्रश्न असा की, मूलभूत अधिकारांचा भंग हा वाजवी स्वरूपाचा झालेला आहे की कसे? आणि दुसरा प्रश्न असा की, जर हा भंग वाजवी स्वरूपाचा असेल तर त्यामुळे जनहित-समाजहित साधणार आहे का? तसेच, मूलभूत अधिकारांच्या बाबतीत जे अपवाद सांगितले आहेत त्या अपवादांच्या कक्षेत हे भंग येऊ शकतात का? न्यायालयाचे जर असे मत पडले की मूलभूत अधिकारांवरील अतिक्रमण गैरवाजवी आहे किंवा वाजवी असूनही अपवादात बसणारे नाही तर सदरचा कायदा हा अवैध व गैरलागू आहे असा निर्णय देण्यात येतो.

उदाहरण देऊन हा मुद्दा जास्त स्पष्ट करता येईल. दोन किंवा तीन वर्षांपूर्वीची गोष्ट. विरोधी पक्षातील एका पुढाऱ्याने काही जहाल भाषणे केली. लोकांनी जमिनीवरचे काही कर देऊ नये, असे त्याने लोकांना सांगितले. राज्यसरकारच्या तत्संबंधी कायद्यानुसार त्याच्यावर खटला भरण्यात आला. आणि त्याला शिक्षा ठोठावण्यात आली. पुराव्यावरून जे शाबीत झाले होते त्यावरून हे स्पष्ट दिसत होते की त्याने जहाल भाषणे दिली होती व लोकांनी तो कर देऊ नये, असा सल्लाही दिला होता. संबंधी कायद्याप्रमाणे ही गोष्ट गुन्हा होती आणि म्हणून दंडार्ह होती. हा कज्जा जेव्हा उच्चतम न्यायालयासमोर आला तेव्हा आरोपीचे म्हणणे असे होते की, संबंधी कायदा हा अवैध व गैरलागू होय. त्यामुळे भाषण-स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्काचा गैरवाजवीरीत्या भंग होत आहे. आम्ही या बाबतीत असा निर्णय दिला की ज्या कलमान्वये आरोपीस दोषी ठरविण्यात आले होते त्या कलमामुळे भाषणस्वातंत्र्याच्या हक्काचा गैरवाजवीरीत्या भंग होत आहे. परिणामी त्या कलमावर प्रहार करून ते पाडण्यात आले व त्याला झालेली शिक्षाही रद्द करण्यात आली.

भाषणस्वातंत्र्याचा हक्क लोकशाही कारभाराच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा आहे. आमच्या देशात विविध राजकीय पक्ष आहेत. सत्ताधारी पक्षाच्या ध्येय-धोरणाबाबत निर्भयपणे टीका करण्याचा हक्क विरोधी पक्षाला असलाच पाहिजे. तत्संबंधी काही विरोधी कारवाई करणे असल्यास त्याबद्दलही त्याला आवाज उठविता आला पाहिजे. अहिंसात्मक सविनय कायदेभंगाची चळवळ ही एक मान्य गोष्ट आहे. आणि म्हणून त्या राजकीय पुढाऱ्याला जेव्हा संबंधी कायदा अन्याय्य

वाटला व त्याने लोकांना, तुम्ही जमिनीवरील कर देऊ नका असे सांगितले तेव्हा असे सांगण्याचा त्याचा हक्क आपण हिरावून घेऊ शकत नाही.

भारतीय न्यायालयासमोर असे गुंतागुंतीचे कज्जे जेव्हा निर्णयासाठी येतात तेव्हा आमची न्यायालये, व्यवहारवादी दृष्टिकोनाचा अवलंब करतात. या दृष्टिकोनानुसार कायद्यामध्ये अंतिम, एकांतिक असे काही नसते. प्रत्येक कज्जाचा त्याच्या गुणदोषावरच निकाल करावा लागतो. चांगले आणि अधिक चांगले यात अधिक चांगले स्वीकारावे लागते. मार्क्सवाद व गांधीवाद ह्यांमध्ये अनेक महत्त्वाच्या बाबतींत विरोध आहे. सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविण्याच्या बाबतींत दोघांचे मार्ग भिन्न आहेत. त्यांच्या कार्यपद्धतीही वेगळ्या आहेत. पण एका मुद्द्यावर मात्र दोघेही एकमत आहेत. दोन्ही वाद काही मूलभूत तत्त्वे मान्य करतात आणि ह्या तत्त्वांची अंमलबजावणी करताना व्यवहारानुसार बदलणाऱ्या मार्गाचाच अवलंब करतात. प्रत्येक गोष्ट चिकित्सेने पारखून घेण्याची संवय दोघांनाही मान्य आहे. सामाजिक किंवा आर्थिक प्रश्नासंबंधी जेव्हा एखादे उत्तर किंवा तोडगा सुचविण्यात येतो तेव्हा त्याचा स्वीकार करण्यात येतो. प्रत्यक्ष प्रयोगान्ती त्या तोडग्याचे गुणदोष तपासले जाऊन जर तोडगा किंवा उत्तर बदलण्याची गरज निर्माण झाली तर अनमान न करता तोडगा किंवा उत्तर बदलण्यात येते. हीच पद्धती भारतीय लोकशाहीने कायदे संमत करण्याच्या संदर्भात स्वीकारली आहे आणि न्यायधीशही कायद्याचा वैधपणा ठरविताना ह्या पद्धतीचाच अवलंब करतात.

लोकशाही समाजवाद आणण्यासाठी भारतीय लोकशाहीने स्वतःला वाहून घेतले आहे. प्रत्येक भारतीयाची ही खात्री तशीच प्रार्थनाही आहे. सामाजिक व आर्थिक क्षेत्रातील विषमतेमुळे समाजरचनेला तडा जात असतो. तो तसा जाऊ नये म्हणून भारतीय लोकशाही कायद्याला सामाजिक परिवर्तनाचे लोकशाही साधन समजते व त्यावर विसंबते. आमच्या देशात, सामाजिक आणि आर्थिक बदल घडवून आणण्याचे दृष्टीने १९५० पासून कायदा फार मोठी कामगिरी बजावीत आहे. या संबंधीच्या तपशिलात आज ह्या व्याख्यानप्रसंगी मला जाता येणे शक्य नाही. मात्र आपणापैकी काहीजणांनी तरी माझ्या देशाला भेट द्यावी, असे आग्रहाचे आमंत्रण मी देत आहे. आपण माझ्या देशात या. आमच्या लोकांचे, त्यांच्या जीवनाचे बारकाईने निरीक्षण करा. कायद्याच्या माध्यमाने तेथे सामाजिक आणि आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याचा जो प्रयोग चालला आहे आणि त्यामुळे तेथे एक नवे युग कसे आकार धरू पाहात आहे, ते जरूर पाहा.

न्यायवचन हे विवेकसंगत असून ते विवेकातूनच उत्स्फूर्त होत असते, अशी आमची श्रद्धा आहे. आपली श्रद्धा ह्याहून वेगळी नाही, अशी माझी खात्री आहे. भारत व सोविएत देश दोघांचाही सहजीवनाच्या तत्त्वावर विश्वास आहे. राज्यांतर्गत किंवा राज्याराज्यातील वादांचा निर्णय जसा कायदा करतो त्याचप्रमाणे

आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे जे वाद आहेत त्यांचाही निर्णय आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार झाला पाहिजे, अशी आपल्या राष्ट्रांची धारणा आहे. भारतातील त्याचप्रमाणे सोविएत देशातील न्यायशास्त्रज्ञांनी एकत्र येण्याचा शुभ क्षण आता आला आहे. जागतिक शांततेसाठी एकत्रित आवाज उठविला पाहिजे. तंत्रविद्येच्या विकासामुळे मानवता आज नीतितत्त्व आणि न्यायतत्त्व यांपासून भ्रष्ट होत आहे. आणि म्हणूनच आपणासमोर ठाण मांडून बसलेल्या ह्या संकटापासून आपण मानवता वाचविली पाहिजे. ज्या नीतितत्त्वांवर आंतरराष्ट्रीय कायदा उभा आहे त्या तत्त्वांचा विजय झाला पाहिजे. जगातील सर्वच न्यायशास्त्रज्ञांचे हे काम आहे आणि ह्या संदर्भात ते महत्त्वाची भूमिका वठवू शकतील.

अध्यक्षमहाराज आणि मित्रांनो, भारत स्वतंत्र झाल्यापासून भारतीय न्यायशास्त्र कसे काम करीत आहे ह्याची आपणास कल्पना यावी ह्या उद्देशानेच ह्या व्याख्यानाचा मी प्रपंच केला आहे. सोविएत न्यायशास्त्र आणि त्याची वैशिष्ट्ये ह्यांचा आम्हास अभ्यास करावयाचा आहे. न्यायतत्त्वाच्या विकसनासाठी विचारांची देवाणघेवाण होणे आवश्यक आहे. दोन्ही न्यायशास्त्रांच्या तुलनात्मक अभ्यासास जर आपण उत्तेजन दिले तर त्यामुळे दोघांनाही लाभ होणार आहे. ह्या शिष्ट-मंडळाचे उद्दिष्टच प्रामुख्याने जिज्ञासायुक्त निरीक्षणाचे आहे. तुमच्यातील अधिकारी मंडळींना आम्ही भेटलो. काही समान प्रश्नावर त्यांच्याशी चर्चा केली. माझी खात्री आहे की अशा या निरीक्षणामुळे व चर्चेमुळे दोन्ही देशांतील न्यायशास्त्रज्ञांमध्ये सहकार्य वाढू लागेल. दोन्ही देशांतील स्नेहाचे धागे जास्त घळकट होतील.

अध्यक्षमहाराज आणि मित्रांनो, आपण इतक्या शांतपणे माझे भाषण ऐकले याबद्दल मी आपले आभार मानतो. ह्या देशातील आमच्या मुक्कामात आपण ज्या आपुलकीने व आदरातिथ्याच्या भावनेने आम्हास वागविले त्यामुळे मी व शिष्टमंडळातील माझे सहकारी भारावून गेलो आहोत. आपल्या या थोर देशाला आम्ही जी भेट दिली, तिची अत्यंत सुखद स्मृती परतताना आम्ही बरोबर घेऊन जात आहोत. भारतीय जनतेविषयी खऱ्या मैत्रीचीच भावना या देशातील लोकांना वाटत आहे ह्याची आम्हाला पूर्ण खात्री झाली आहे.

न्यायतत्त्वाचे अधिराज्य

सरचिटणीस महाशय आणि मित्र हो,

आपणासारख्या मान्यवर श्रोतृवर्गासमोर उपस्थित राहाण्याची संधी मिळाल्याबद्दल मला वाटणारी कृतज्ञता व्यक्त करण्यास मी केवळ असमर्थ आहे. ह्या ठिकाणी, आपल्या रूपाने अखिल जगाचा न्याय–विवेकच जणू माझ्यासमोर मूर्त झाला आहे, असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणारे नाही. आपणासारख्या आदरणीय मंडळीपुढे मी बोलावयास उभा आहे. या प्रसंगी मला संकोचल्यासारखे वाटत नाही. मला संकोच का बरे वाटत नाही ? अवतीभोवती जेव्हा मी पाहातो तेव्हा मला तर अपरिचित नजरा दिसत आहेत. आणि तरीही त्या नजरेत मला स्नेहाचे दर्शन होत आहे. न्यायतत्त्वाच्या अधिराज्याबद्दल आपणा सर्वांना वाटणारा जिव्हाळा, हे ह्या स्नेहाचे खरे कारण आहे. तत्संबंधीच्या निष्ठेमुळेच आपण एकत्र आलो आहोत. ही निष्ठा हे एक सामर्थ्य आहे. सावकाशीने काम करणारे परंतु इतिहासाच्या साक्षीप्रमाणे परिणामकारक ठरलेले, असे हे सामर्थ्य आहे. ह्या निष्ठेचाच मी एक अंशरूप असल्यामुळे आपणासमोर मला परकेपणा वाटत नाही, संकोच वाटत नाही. मा. सरचिटणीस, तुमचे अध्यक्ष श्री. बोस त्याचप्रमाणे तुमच्या संस्थेतील मंडळी ह्या सर्वांचे असे मत आहे की न्यायतत्त्वाचे अधिराज्य वर्धिष्णू व परिवर्तनात्मक स्वरूपाचे असते. भारतीय संविधनाची उभारणी ह्याच तत्त्वावार करण्यात आली आहे. ज्या मानवी हक्कांची घोषणा १९४८ साली समारंभपूर्वक करण्यात आली ते हक्क जगातील न्यायतत्त्वाचा पायाभूत आधार होत. मानवी स्वातंत्र्य आणि न्याय हे न्यायतत्त्वाच्या अधिराज्याचे ध्येय आहे, असे आपण मानीत आहात. ह्यातच न्यायतत्त्वाच्या वर्धिष्णू व परिवर्तनात्मक स्वरूपाची गुरुकिल्ली आहे. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधानाने घोषणा केली ती या संबंधानेच.

मानवी स्वातंत्र्य आणि न्याय या दोन तत्त्वांचा सुसंवाद राखणे, त्यांना व्यवस्थित रूप देणे हाच न्यायतत्वाच्या अधिराज्याचा हेतू असला पाहिजे. हा हेतू साध्य करण्याचा कृतनिश्चय केला तरच त्याला काही अर्थ आहे, औचित्य आहे. हे ओळखले नाही तर न्यायतत्त्वाचे अधिराज्य हे केवळ एक विडंबन ठरेल.

राजकीय, सामाजिक आणि आर्थिक न्यायाची स्थापना करणे हे भारतीय लोकशाहीचे ध्येय आहे. यावरच भारतीय संविधानाची उभारणी झाली आहे. आणि म्हणूनच भारतीय लोकशाहीचे कार्य परिवर्तनाला सहाय्यभूत व्हावे, अशा स्वरूपाचे आहे. पहिल्या महायुद्धापूर्वी अशी कल्पना होती की शासनाचे कार्य केवळ राखणदाराचे कार्य होय. समाजाला अंगवळणी पडलेल्या व्यवस्थेत काहीहि उलथापालथ होऊ नये व शांतता आणि सुव्यवस्था राखली जावी, एवढाच त्यावेळी लोकशाहीचा अर्थ होता.

पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धानंतर जेव्हा साम्यवादाची साद कानी येऊ लागली तेव्हा आम्हालाही जाग आली व वाटू लागले की लोकशाहीला राजकीय व आर्थिक आशय देऊनच साम्यवादाच्या आव्हानाचा स्वीकार करता येईल. साम्यवादाचा राजकीय आशय हा लोकशाही जीवनपद्धतीवर कुठारघात आहे; तर उलट सामाजिक व आर्थिक न्यायाच्या अभावी लोकशाही ही अधुरी, अपुरी राहाणार आहे.

व्यक्तिस्वातंत्र्य हे लोकशाही जीवनपद्धतीचा मूलभूत पाया आहे. दारिद्र्य, भूक, रोगराई, अज्ञान आणि बेकारी यांविरुद्ध लोकशाहीला लढावयाचे आहे. एकदा ही परिवर्तनात्मक भूमिका लोकशाहीने घेतली म्हणजे तिचे कार्यक्षेत्र रुंदावते आणि तिने अंकित करावयाची क्षितिजेही विस्तार पावू लागतात.

भारतीय संविधानाने काही मूलभूत हक्क मान्य केले आहेत. त्याचप्रमाणे काही मूलभूत स्वातंत्र्यांबद्दलही हमी दिलेली आहे. हे हक्क आणि हे स्वातंत्र्य न्यायाशी समवायानेच अवतरू शकतात. अलगपणे संभवू शकत नाही. व्हिक्टोरियन काळात या संबंधीची कल्पना वेगळी होती. कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करू नये, काहीही ढवळाढवळ करू नये, या तत्त्वाचा तेव्हा पाठपुरावा करण्यात येई. त्यावेळी आर्थिक संघर्षाचा निर्णय क्रयविक्रय तत्त्वावर लागत असे. परंतु दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीपर्यंत यावद्दलच्या विचारात आमूलाग्र बदल झाला. मानवी स्वातंत्र्य आणि न्यायतत्त्व यांचा समन्वय कसा होईल, हा आजचा प्रश्न आहे. आपल्या संस्थेने त्याचप्रमाणे जगातील सर्व लोकशाही राष्ट्रांनी सोडविला पाहिजे असा हा प्रश्न आहे.

नागरिकांचे मूलभूत हक्क हा लोकशाहीचा गाभा आहे. भारतीय संविधानाने तत्संबंधीची तरतूद केलेली आहे. त्या हक्कांच्या वाजवी वापराबद्दल हमी दिलेली आहे. यातून, एका बाजूस मूलभूत स्वातंत्र्य आणि दुसऱ्या बाजूस समाजहितासाठी त्या स्वातंत्र्याचे केलेले नियमन असा वाद उत्पन्न होतो. याबाबतचे पुष्कळ तंटे

भारतातील उच्च आणि उच्चतम न्यायालयांसमोर निर्णयासाठी येतात व तत्संबंधी विचारही न्यायालयांना करावा लागतो. उदात्त आर्थिक तत्त्वज्ञानाचा आश्रय घेतल्याशिवाय हे प्रश्न समाधानकारक रीतीने सोडविता येणार नाहीत. असे करताना काही सैद्धांतिक अडचणी आल्या तरीसुद्धा हे प्रश्न सोडविलेच पाहिजेत. व्यक्तीच्या काय किंवा समाजाच्या काय जीवनात निरपवाद असे हक्क आहेत, असे भारतीय न्यायतत्त्व अगर लोकशाही मानीत नाही. सुवर्णमध्याचा आश्रय घेऊन लोकशाहीची वाटचाल झाली पाहिजे. यात एका गोष्टीचा दुसऱ्या गोष्टीशी समन्वय घालण्याचा प्रश्न येतो. हा प्रश्न फारच नाजूक असा प्रश्न आहे. चांगले आणि वाईट यांमध्ये निवड करण्याचा हा प्रश्न नाही. तर चांगले आणि अधिक चांगले यात निवड करण्याचा हा प्रश्न आहे. अशी निवड करणे सोपे नसते. हे जरी खरे असले तरीसुद्धा कल्याणकारी लोकशाही व्यवस्थेने हा प्रश्न सोडविलाच पाहिजे. कायदे संमत होण्याचे ठिकाण केवळ विधिमंडळच आहे, हे म्हणणे खरे नव्हे. बव्हंशी कायदे हे समाजातूनच उगम पावतात. विधिमंडळ सार्वभौम नाही. सार्वभौम व सर्वश्रेष्ठ आहे ते संविधान. विधियंत्रणा, न्याययंत्रणा आणि कार्यकारी यंत्रणा संविधानाच्या अधीन आहेत. न्याययंत्रणा संविधानाची भाष्यकार आहे. मूलभूत हक्कांचे रक्षण करून न्याययंत्रणा कायदे तयार करण्याच्या प्रक्रियेलाही सहाय्यभूत होत असते.

लोकशाहीचे यश सामाजिक आणि आर्थिक न्यायावरच निर्भर आहे. हे एक मार्गदर्शक तत्त्व आहे, असे भारतीय लोकशाही मानते. लोकशाही यशस्वी व्हावयाची असल्यास ती आर्थिकस्वरूपी झाली पाहिजे. समान संधी व सामाजिक आणि आर्थिक न्याय यांच्या संपादनासाठी व्यवहाराचे स्वातंत्र्य अतिशय महत्त्वाचे ठरते. पण हे स्वातंत्र्य समाजहिताशी सुसंवादी असले पाहिजे. प्रसंगी समाज-हिताच्या संदर्भात त्या स्वातंत्र्याला मुरडही घातली पाहिजे. भारतीय संविधानाचा हाच संदेश आहे. भारतीय संविधानाच्या अभ्यासकांना हे आढळून येईल की गेल्या १५ वर्षांत, सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या संपादनासाठी सावकाश पण निश्चितपणे आम्ही प्रयत्न करीत आहोत. भूतकाळात काही प्रमाद घडले असतील. पुढेही काही प्रमाद कदाचित घडतील. परंतु भारतीय लोकशाहीचा दृढनिश्चय आहे की संविधानाने सांगितलेल्या सामाजिक व आर्थिक न्यायाच्या मार्गानेच जावयाचे. भूतकाळातील चुका परत होणार नाहीत, ह्याबद्दल आम्ही दक्ष राहू. यातून काही नवीन समस्या निर्माण होतील. संविधानाने त्या समस्या सोडविल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे विधिमंडळातील सभासद, न्यायाधीश आणि कारभारविषयक अधिकारी या सर्वांनाही त्यासंबंधीचा विचार करावा लागणार आहे. सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या ध्येयाप्रत आम्ही मोठ्या धाडसाने पाऊल टाकीत आहोत.

गतिमान असे न्यायतत्त्वाचे अधिराज्य माझ्या देशात काय साधणार आहे, ह्याचे यथार्थ चित्र जगातील बुद्धिमंतांच्या समोर ठेवण्याचा मी प्रयत्न करीत आहे. संविधानाने सोडवावयाच्या प्रश्नांपैकी अस्पृश्यतेचा प्रश्न हा एक आहे. संबंधी अभ्यासकांना हा प्रश्न कसा हाताळला याची कल्पना येऊ शकेल. कायद्यासमोर सर्वचजण समान आहेत. कोणाच्याही बाबतीत वेगळा भेद करता येत नाही. असे असूनसुद्धा अस्पृश्यांच्या बाबतीत भेद व अपवाद करावा लागला. संविधान दुरुस्त करावे लागले. या दुर्दैवी वर्गांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर तरतुदी करण्यात आल्या. कारण अशा स्थितीत विवेक आणि अनुभव यांचा आश्रय घ्यावा लागतो. ठोकळेबाज नियमांनी जखडले जाऊन चालत नाही.

सुमारे ७५० वर्षांपूर्वी मॅग्नाचार्टा प्रसिद्ध झाला. पण त्याहीपूर्वी कित्येक वर्षे आमच्या देशात उपनिषदकारांनी न्यायतत्त्वाच्या अधिराज्याचा गुणगौरव वर्णिला. उपनिषदकार म्हणतात—

> **तदेतत् क्षत्रस्य क्षत्रं यद् धर्मः । तस्माद् धर्मात् परं नास्ति ।**
> **अथो अबलीयान् बलीयांसं आशंसते धर्मेण, यथा राज्ञा एवम् ।**[1]

आजच्या काळातही ह्या वर्णनाला अर्थ आहे. आणि हा गुणगौरव योग्य ठरणारा आहे. कायद्याचे–न्यायतत्त्वाचे हे वर्धिष्णू तत्त्व दुर्बलांना समर्थांच्या विरुद्ध संरक्षण देणारे आहे. आर्थिक न्यायाची स्थापना करणारे आहे. भारतीय संविधानाच्या मुळाशी हेच तत्त्व आहे. यामुळेच मला असे वाटते की आपल्या संस्थेतील कायदेपंडितांचे त्याचप्रमाणे जगातील सर्व लोकशाही राष्ट्रातील कायदे-पंडितांचे कार्य फार मोलाचे व महत्त्वपूर्ण आहे.

भारतातील आम्हा न्यायाधीशांची शक्ती फार मर्यादित आहे. आम्हाला आमच्या मर्यादांची जाणीव आहे. तरीही यथाशक्ती आम्ही आमचे कार्य पार पाडण्याचा प्रयत्न करीत आहोत. सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याचे कार्य आम्हाला करावयाचे आहे. आपली संस्थाही हेच कार्य करीत आहे. या कार्यासाठीच आपली संस्था विस्तार पावली पाहिजे. जगातील थोर कायदेपंडितांचा तिला आधार मिळाला पाहिजे. आपली संस्था ह्या दृष्टीने प्रयत्नशील आहे. पुष्कळदा असे होते की आपण अंगिकारलेल्या कार्याचे आध्यात्मिक महत्त्व काय आहे याची कायदेपंडितांना जाणीव नसते. ताजमहालाच्या भव्य शिल्पाकडे पाहात असता त्याच्यामध्ये एक संस्कार घडविण्याचे सामर्थ्य आहे, हे बहुधा लोक विसरतात. सर्व कायदेपंडित व न्यायाधीश यांनी न्यायतत्त्वाला जे परिवर्तनात्मक, उदात्त आणि महत्त्वपूर्ण कार्य पार पाडावयाचे आहे, त्याची सदैव आठवण ठेवावी

---

१ बृहदारण्यकोपनिषद, १–४–१४. (मागे पान ९७ पाहा.)

असा भारतीय संविधानाचा आदेश आहे. सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात संतुलन राखून मानवतेचे अधिराज्य स्थापन करावयाचे, हे आपणासमोरील खरे कार्य आहे. समाजाच्या बांधणीला कायदा आधारभूत झाला पाहिजे आणि समाजातील आर्थिक विषमता त्याने दूर केली पाहिजे.

आपल्या संस्थेचा हाच दृष्टिकोन आहे. प्रत्येक लोकशाहीप्रेमी कायदेपंडिताचाही तोच दृष्टिकोन असला पाहिजे. यासाठी पुढील पाऊल टाकले पाहिजे. आणि न्यायतत्त्वाच्या विधायक अशा आंतरराष्ट्रीय पद्धतीचा आपण अवलंब व परिपोष केला पाहिजे.

हे एक मनोराज्य आहे असे वाटेल. पण इतिहासाची साक्ष आहे की आजचे मनोराज्य उद्या प्रत्यक्ष म्हणून अवतरते. कदाचित हा उद्या फार दूरवर असेल. परंतु सर्व कायदेपंडितांनी त्या उद्यावर लक्ष ठेविले पाहिजे. सर्व जगालाच न्यायतत्वाच्या आंतरराष्ट्रीय पद्धतीने त्या 'उद्या'वर एकत्र आणले पाहिजे. आपली संस्था त्या ध्येयाप्रत जाण्यासाठी कित्येक वर्षे झटत आहे. भारतीय संविधानाची वाटचालही त्या ध्येयाच्या दिशेने होत आहे.

न्यायतत्त्वाच्या अधिराज्याचे हे जे वर्धिष्णू व परिवर्तनात्मक स्वरूपाचे ध्येय आहे त्याबाबत तुमची संस्था आणि मी एकमत आहोत, एका विचाराचे आहोत. आणि त्यामुळेच अनोळखी, परक्या मंडळीत उभा असून सुद्धा मला येथे मित्रांच्या मध्येच असल्यासारखे वाटत आहे. तुमची संस्था करीत असलेल्या सामाजिक व आर्थिक स्वरूपाच्या कार्याचे महत्त्व लक्षात घेता हे स्पष्टच होत आहे की हे कार्य म्हणजे एक थोर समाजसेवाच होय.

खाजगी पण संग्राह्य नाही. स्थळप्रत.

अनुक्रमांक ..... दि: .....

अभिप्राय ..... नोंद दि: .....

खण्ड चवथा

साहित्य आणि कला

अनुक्रम

१ भारतीय कलेचे पुनरुज्जीवन

[के. के. हेब्बर यांच्या चित्रकला-प्रदर्शनाचे उद्घाटन करताना दिलेले भाषण. मुंबई, १७ सप्टेंबर १९५४. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

२ मराठी ग्रंथालयांपुढील कार्य

[मराठी ग्रंथालय परिषदेच्या वाराव्या अधिवेशनाचे अध्यक्षीय भाषण. नागपूर, १२ फेब्रुवारी १९६१.]

काल, आज आणि उद्या

[व्हीनस प्रकाशन, पुणे यांच्या रौप्य-महोत्सवाचे अध्यक्षीय भाषण. पुणे, १० मार्च १९६३.]

भारतीय कलेचे पुनरुज्जीवन

मित्रहो!

या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यासाठी मला खास निमंत्रण देण्यात आले हा मी माझा बहुमान समजतो. या प्रदर्शनात श्री. हेब्बर यांनी अफगाणिस्तान, सोव्हिएट युनियन, पोलंड आणि पश्चिम जर्मनी या देशांतील जीवनाच्या स्वतःवर प्रभाव पाडणाऱ्या काही छटा चित्रांकित केलेल्या आहेत.

के. के. हेब्बर हे काही कलाजगतात नवागत नाहीत. सर्व जगातील कला-मंडळांना त्यांचे नाव परिचित आहे. दक्षिण कानडा प्रांतात उडिपी येथे १९१२ साली त्यांचा जन्म झाला. म्हैसूर चामराजेंद्र तंत्रविज्ञान संस्थेत त्यांनी प्रथम आपल्या विद्यालयीन शिक्षणाचा पूर्वार्ध संपविला. या संस्थेत हेब्बर यांनी फार शीघ्र प्रगती केली आणि ते मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्ट या संस्थेत दाखल झाले.

जे. जे. स्कूल ऑफ आर्ट या संस्थेतील प्रवेश त्यांच्या कारकीर्दीचा परिवर्तन-बिंदू ठरला. या संस्थेत त्यांना मि. जेरार्ड यांचे प्रेमळ प्रोत्साहन लाभले. त्यांची कला नवनवोन्मेष प्रकट करू लागली. त्यांच्या कलेला फुलोरा आला. अध्ययन संपल्यानंतर हेब्बर अध्यापनाकडे वळले. जे. जे. स्कूल मध्ये ते सहा वर्षे अध्यापक होते. मला असे वाटते की, सारे कलावंत भ्रमन्तीच्या वेडाने पछाडलेले असतात. हेब्बर त्याला अपवाद नाहीत. ते भारतभर भटकले आहेत. उत्तरेतील हिमालया-पासून दक्षिणेतील मलबार, केप कामोरिनपर्यंत त्यांनी प्रवास केलेला आहे. प्रवासात त्यांनी सूक्ष्म व सावधान निरीक्षण केले.

विपुल परिभ्रमण

त्यांनी निसर्गाचे वैभव पाहिले व त्याच्या विविध स्वरूपाचे मनन केले. जेथे

जेथे ते गेले तेथील मानवी जीवनाचे निरीक्षण केले. त्या जीवनाचे जे संस्कार त्यांच्या मनावर झाले ते त्यांनी आपल्या कुंचल्याने आपल्या चित्रांत अजरामर केले आहेत. हेब्बर यांनी आपली कित्येक चित्रे चित्रस्पर्धेच्या प्रदर्शनांत ठेवली आणि अनेक पदके-परितोषिके हस्तगत केली. त्यांनी मुंबईत स्वतःच्या एकट्याच्या चित्रकलेची दोन प्रदर्शने भरविली. १९४९ साली त्यांच्या परिभ्रमणाच्या वेडाने त्यांना युरोपला नेले. पॅरिसच्या कलाविद्यालयात (Art Academy) त्यांनी सहा महिने योग्य तऱ्हेने घालविले आणि नंतर ते युरोपमधील उत्कृष्ट स्थळे पाहाण्यास गेले. या प्रवासात त्यांनी लंडन, पॅरिस आणि स्वित्झर्लंडमध्ये स्वतःच्या चित्रकलेची प्रदर्शने भरविली. हेब्बर यांच्या कलेचा गौरव झाला. कलामीमांसकांकडून त्यांना विपुल आणि स्नेहपूर्ण प्रशंसा लाभली.

१९५३ साली भारतीय चित्रकलेचे प्रदर्शन रशियात भरविण्यात आले. इतर चार प्रतिनिधींसमवेत हेब्बर यांचीही प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाली. ते रशियाला गेले. हे प्रदर्शन इतके यशस्वी झाले की, आपल्या कलावंतांना पोलंड आणि पश्चिम जर्मनी या देशांकडून आमंत्रणे आली आणि या दोन देशांत प्रदर्शने भरविण्यात आली.

आज ज्या प्रदर्शनाचे मी उद्घाटन करणार आहे त्या प्रदर्शनात हेब्बर यांच्या युरोपयात्रेतील काही जीवनदृश्यांची चित्रे तुम्हास पाहावयास मिळतील. नर्तिकांची जी रेखाचित्रे त्यांनी काढली आहेत त्यात नर्तिकांची रुचिर लयबद्ध हालचाल साध्या परंतु प्रभावी रेषांनी त्यांनी रेखाटली आहे. यथातथ्य छायाचित्रापेक्षा कितीतरी प्रभावी ही रेखाचित्रे आहेत. रशियन लोकनृत्यांची चित्रे जानपदजीवनातील अकृत्रिम, साहजिक उत्साह आणि संपन्न रंगदार वातावरण यांचा प्रत्यय देतात.

हा प्रवास संपवून परत आल्याबरोबर हेब्बर आपल्या कलाविषयक विविध प्रयोगांत रममाण झाले आहेत. मला अधिक काही सांगण्याची गरज नाही कारण या संध्याकाळच्या प्रदर्शनात हेब्बर यांच्या मित्रांच्या आणि चाहत्यांच्या अपेक्षा पूर्ण करणाऱ्या चित्राकृती तुम्हाला पाहावयास मिळतील. अलिकडेच हेब्बर यांची ललितकला अकादेमीवर सभासद म्हणून भारत सरकारने नेमणूक केली आहे. ते या मानास सर्वस्वी लायक आहेत.

कला आल्हाद देते

मला हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे की, या प्रदर्शनाचे उद्घाटन करताना मला संकोच वाटत आहे. इतर सामान्य लोकांप्रमाणे मलाही कला आवडते. कला मनाला आनंद देते. परंतु मला कलेसंबंधीच्या अनेकविध सिद्धांताची काहीच माहिती नाही. आणि मला जर कोणी विचारले की, तुम्हाला अमुक चित्र का जास्त

आवडते तर मी काहीही उत्तर देऊ शकणार नाही. आणि म्हणूनच हेब्बर यांच्या कलेच्या मूल्यमापनाचा प्रयत्न करताना मी स्वसामर्थ्याबद्दल साशंक आहे. परंतु हेब्बर यांच्या कलेचा अभ्यास एखादा अनभिज्ञ करू लागला तर सुदैवाने त्याला खुद्द चित्रकाराकडूनच भरपूर सहाय्य मिळेल.

असे म्हणतात की, कवी स्वतःच्या काव्याचा अर्थ सांगण्यास अगर स्वतःच्या काव्याचे परीक्षण करण्यास कमीतकमी लायक असतात. कदाचित् हे साऱ्याच कलावंतांना लागू पडेल. परंतु माझ्या मते हेब्बर याला अपवाद आहेत. स्वतःच्या कलाविषयक प्रयोगांची मीमांसा ते करू शकतात तसेच स्वतःच्या कलाविषयक कामगिरीमागील प्रेरणेचे मोठ्या वक्तृत्वाने विश्लेषण करतात. हेब्बर म्हणतात, "माझ्या जीविताविषयीच्या भावना अगदी सोप्या तऱ्हेने कशा प्रगट करता येतील याचे मी प्रयोग करतो. ज्या क्षणी मी नवीन कामाला प्रारंभ करतो त्या क्षणी मी माझी जुनी कामगिरी विसरून जातो आणि चांगल्या परिणामासाठी नवीन मार्ग शोधू लागतो. कधी कधी इतर कलावंतही आपल्या कल्पना अगदी सहज तऱ्हेने पण प्रभावीपणे प्रकट करिताना आढळतात. आणि मी जेव्हा त्यांच्या माझ्यामधील साधर्म्याचा शोध घेतो, तेव्हा मी त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करतो, आणि त्यांचा समानधर्मा बनतो. मी त्यांचे प्रयोग आणि अनुभव माझे स्वतःचेच समजून चालतो; परंतु स्वतःचे व्यक्तित्व व अस्मिता कायम राखून." या उद्गारांनी हेब्बर यांच्या कलाविषयक कामगिरीमागील ध्येयाचे दिग्दर्शन तर होतेच, परंतु हेब्बर यांच्या व्यक्तित्वाचीही स्पष्ट कल्पना येते. हेब्बर मूलतः सच्चे मानवतावादी आहेत. ते अत्यंत विनयशील आणि निरहंकारी आहेत. आणि आजकाल सर्वसाधारणतः लोकांची कलावंतांच्या वर्तनाविषयी जी समजूत झाली आहे तिच्याशी न जुळणारे असे हेब्बर हे कलावंत आहेत. त्यांचा विनय आणि साधेपणा त्यांच्या कलाविषयक कामगिरीत त्यांचे भांडवल ठरले आहेत. सत्याच्या सतत शोधासाठी त्यांचे प्रयोग चालू असतात. हेब्बर यांचे ध्येय सत्याचा शोध हेच आहे. जो कलावंत कला-विषयक सत्याच्या शोधात निमग्न असतो तो आपली कला जड, स्थिर आणि प्रस्तरवत् होऊ देत नाही. त्याची कला नेहमीच गतिमान व प्रगतीपथावर असणार. हेब्बर यांच्या बाबतीत असेच म्हणता येईल.

सत्याचा शोध

सत्याचे शोधन करण्यासाठी त्यांनी आपल्या कलापद्धतीतही फेरबदल करण्याची तयारी ठेवलेली आहे. कलेबद्दल निरनिराळे दृष्टिकोन असलेले सारे कलामीमांसक हेब्बर यांच्या कलेची प्रशंसा करतात याचे कारण हेब्बर यांचे सत्यान्वेषण. परंपरागत सनातन दृष्टीचे श्रीयुत वेंकटाचलम्, श्रीयुत रामचंद्र राव आणि सुप्रसिद्ध कलामीमांसक श्रीयुत कार्ल खंडालावाला यांजसारखी भिन्न संप्रदायाची कलामर्मज्ञ

मंडळी एकमताने हेब्बर यांना आधुनिक भारतीय कलावंतांत फार मोठ्या मानाचे स्थान देतात. आणि आज या संध्याकाळी आपण याच श्रेष्ठ कलावंताच्या चित्रकृती पाहाणार आहोत. अशा तऱ्हेची प्रदर्शने आपण जेव्हा पाहातो तेव्हा आपल्या मनात प्रश्न उभा राहाणे साहजिक आहे, की या प्रदर्शनांचे राष्ट्रजीवनात काय स्थान? यांचा उपयोग काय? आधुनिक मानवी जीवनांत राजकारण आणि अर्थशास्त्र यांना अवास्तव प्राधान्य मिळालेले असून इतर प्रश्न बाजूला पडलेले आहेत. याचा अर्थ असा नाही की, राजकीय समस्यांचे अगर आर्थिक दुरवस्थेच्या निर्मूलनाचे महत्त्व कमी आहे.

तथापि राजकीय प्रश्नांकडे अगर आर्थिक अडचणींकडे दुर्लक्ष न करताही आपण आपल्या राष्ट्राच्या सांस्कृतिक संपत्तीचे मूल्य आपल्या मनात कायम ठेवले पाहिजे, हे अतिशय महत्त्वाचे आहे. सर्वस्वी आर्थिक आणि सामाजिक प्रश्नांनी झाकळून गेलेले असे एखाद्या व्यक्तीचे आयुष्य हा मानवी जीवनाचा कनिष्ठ दर्जाचा नमुना ठरेल. जे व्यक्तीच्या जीवनाच्या बाबतीत खरे आहे ते राष्ट्राच्या जीवनाच्या बाबतीतही तितकेच खरे आहे.

कला आणि संस्कृती

राष्ट्राचे सांस्कृतिक जीवन संपन्न करण्याच्या दृष्टीने कलाप्रदर्शनाचे मूल्य फार मोठे आहे. आजकाल 'संस्कृती' शब्दाचा विविध तऱ्हेने वापर केला जातो. संस्कृतीची व्याख्या करणेही कठीण आहे. इमर्सनने आपल्या एका व्याख्यानात संस्कृतीचे मोठ्या सूचक शब्दांत वर्णन केले आहे. ते उद्धृत करण्याचा येथे मला मोह होत आहे. इमर्सन म्हणतो, "सांप्रत सारे जग यश, वैभव आणि सत्ता यांच्यामागे धावत सुटले आहे. संस्कृती या अनिष्ट वृत्तीचा प्रतिकार करते. व्यक्तीची अस्मिता हा संस्कृतीचा आधार आहे. काही थोर पुरुषांच्या बाबतीत व्यक्तिस्वातंत्र्यवाद हा केवळ त्यांच्या स्वभावातील आत्मभिमान असे स्पष्ट झाले आहे. विविध विषयांचे आणि आकर्षणांचे उद्घाटन करून संस्कृती व्यक्तीच्या या आत्मगौरवाचे निराकरण करते आणि तिला आपला तोल सावरण्यास मदत करते. संस्कृती अहंकारी व्यक्तीला तिच्या सामर्थ्यांच्या अतिशयोक्त कल्पनांबद्दल आणि एकाकी, अनाकर्षक भयप्रद जीवनाबद्दल प्रबोधन करते. थोडक्यात ती आनंददायक सहभावना वाढविते."

मला वाटते की, कलाकृती या, आत्मकेंद्रित व्यक्तीला विविध आकर्षणांचे विशाल क्षेत्र उपलब्ध करून देऊन रोजच्या अडचणी, काळज्या व कटकटीने त्रासलेल्या मानवाला स्वतःचा तोल सावरण्यास मदत करतात. आजच्या या युगात व्यक्तित्वाची गळचेपी होत आहे आणि व्यक्तीचे स्वातंत्र्य नाकारले जात आहे. अशा परिस्थितीत संस्कृतीला एक विशेष कार्य करावयाचे आहे आणि या कार्यात

ललितकलांच्या साहाय्याचा वाटा निश्चितच फार मोठा राहील.

चित्रकलेचे विषय-क्षेत्र या विश्वाइतकेच अफाट आहे आणि तिची निःशब्द हाक अक्षरशः विश्वात्मक आहे. कवीची भाषा ज्यांना कळते त्यांच्यापुरतेच कवितेचे आवाहन मर्यादित असते. चित्रकलेला अशा मर्यादा नाहीत. तिची रेखांकनाची भाषा साऱ्या मानवजातीशी संवाद साधू शकते. चित्रकलेचा आनंद मिळविण्यासाठी कलेच्या सिद्धांतांची किंवा कलामीमांसकांनी वापरलेल्या विशिष्ट तांत्रिक परिभाषेची माहिती नेहमीच असण्याचे काहीच कारण नाही. चित्रकला ही दृश्य काव्य आहे आणि जो कोणी चांगली चित्रे पाहील त्याला अव्याहत आनंद प्राप्त होईल.

दृश्य-काव्य

आज जिथे जगात राजकीय आणि वैचारिक विसंवादाने कलह माजलेला आहे तिथे चित्रकला आपल्या मूक, निःशब्द संदेशाने साऱ्या जगाला एकत्र आणू शकेल आणि जाती, वर्ण, धर्म, आणि राष्ट्रीयत्व यांचा विचार न करता मानवमात्राला संतोष आणि शांती यांचा लाभ करून देऊ शकेल. रुचिर संगीताच्या श्रवणाने जसा शुद्ध आनंद मिळतो तसाच उत्कृष्ट चित्रांच्या दर्शनाने मिळतो. संगीताचे माध्यम जो ध्वनी हा जितका प्राकृतिक आहे तितकाच चित्रकलेचा माध्यम असलेला रंग हाही प्राकृतिक आहे. राईटने म्हटले आहे की, संगीत आणि चित्रकला जर योग्य तऱ्हेने सादर केल्या तर एका श्रेष्ठ दर्जाच्या सौंदर्यभावनेची निर्मिती करू शकतात.

चांगली कला कोणालाही पीडा देत नाही. मानवी मनाला प्रसन्नता आणणे आणि दुःखाचे निवारण करणे हेच तिचे कार्य आहे. खरोखरच एखाद्या कलाप्रदर्शनात जर वेळ घालविला तर मनुष्याचे मन आपली चिंता व औदासिन्य यांपासून थोडा वेळ तरी सुटू शकते.

परकीय सत्तेच्या काळात

परकीय सत्तेच्या काळात आमच्या इतर सांस्कृतिक चळवळींप्रमाणे कलेचीही पिछेहाट झाली. परकीयांच्या राजकीय वर्चस्वाचा नेहेमीचा परिणाम म्हणजे प्रारंभकाळात जित राष्ट्र आपला स्वाभिमानच नव्हे तर आपला आत्मा गमावून बसते. भारतवर्ष याला अपवाद नव्हते. ब्रिटिश सत्तेच्या काळात आम्हांला आमची प्राचीन कला व वाङ्मय निःसत्व, निरर्थक वाटत होते. आमच्या वाङ्मयावर व कलासंपदेवर पाश्चात्य राष्ट्रांतील श्रेष्ठ लेखकांनी टीकेचा भडिमार केला. मेकॉलेने समग्र संस्कृत वाङ्मयाचा केलेला उपहास इतिहासाच्या विद्यार्थ्यांना माहीतच आहे. रस्किनने भारतीय कलेच्या विकृत आणि विकट रूपाचा निर्देश केलेला आहे. कोट्यवधी

लोकांना स्फूर्ती देणाऱ्या आसनस्थ बुद्धाच्या मूर्तीचे जॉर्ज वर्डवुड याने कसे वर्णन केले आहे ते पाहा : "एक अर्थहीन स्थिरस्वभाव आकृती; केवळ कल्पनेतून निर्माण झालेली धातुप्रतिमा; शून्यपणे तिर्यक् दृष्टीने हातापायाच्या अंगठ्याकडे व गुडघ्याकडे पाहाणारी दृष्टी असलेली—याशिवाय काही नाही." अशा तऱ्हेने आमच्या प्राचीन कलेची निंदा पाश्चात्यांनी केलेली आहे. पुरातन भारतीय कला व वाङ्मय यांवर लिहिताना त्यांनी वापरलेली असंयत भाषा आणि अशिष्ट टीका त्यांच्या अज्ञानाची द्योतक होय. दुर्दैवाने आमच्यापैकी काही लोकांचा दृष्टिकोन हा आत्मविस्मृतीने ग्रासलेला आहे. आम्ही आमच्या प्राचीन सांस्कृतिक ठेव्याकडे डोळेझाक केली आणि मानवी कार्यक्षेत्राच्या प्रत्येक आवर्तात आम्ही पश्चिमेकडे डोळे लावून बसलो.

स्वतंत्र भारतातील कला

सुदैवाने तो काळ गेला. भारताच्या राजकीय स्वातंत्र्ययुगाचा प्रारंभ झालेला आहे. भारतीय कलांचे पुनरुत्थान करण्याची वेळ आता हीच आहे. परंपरावादी आणि आधुनिक, वास्तववादी आणि प्रतीकवादी यांच्यामधील वाद सामान्य जनांना बव्हंशी निरर्थक वाटतात. जुन्याचे पुनरुत्थान म्हणजे काही केवळ प्रतिगामी दृष्टिकोनच नव्हे आणि आधुनिक पद्धतींचा स्वीकार हा फायदेशीर व ग्राह्यच असतो असेही नव्हे. आपल्या प्राचीन ठेव्याचे जतन करून त्या कलेचा आधुनिक काळाशी सुसंवाद घडवून आणायचा हे आजच्या कलावंतांपुढील कार्य आहे. सेझाँ म्हणाला नव्हता काय, "चला आपण आपल्या जुन्या चित्रकाराकडे—Poussin-कडे वळू आणि निसर्गाच्या सान्निध्यात तो कोणच्या तत्त्वावर श्रेष्ठ कलावंत झाला त्याचा शोध घेऊ." परंपरेशी पुन्हा संबंध जोडल्यास कदाचित आजच्या कलावंताला क्रांतिकारक कल्पना सुचण्याचा संभव आहे. सामान्य जनतेचा एक अनभिज्ञ प्रतिनिधी या नात्याने मी कलावंताना आवाहन करतो की त्यांनी भारतीय कलांच्या पुनरुत्थानाच्या कार्यात आपल्या सर्व प्रतिभेनिशी सहभागी व्हावे.

पुनरुज्जीवन

भारताला स्वातंत्र्यआंदोलनाच्या कठोर दिव्यातून काही काळ जावे लागले. या राजकीय संग्रामात शौर्याचे अनेक प्रसंग घडून आले. इतिहासाचे मार्गक्रमण याच काळात सुरू झाल्याचे दिसले आणि स्वातंत्र्याच्या प्रभातकाळाने अनेक प्रबळ योजनांचा प्रारंभ पाहिलेला आहे. परंतु भारताच्या कलात्मक जीवनाचे निराशाजनक स्वरूप म्हणजे ज्या काळात या देशामध्ये प्रचंड उलथापालथ झाली त्या काळात कलेने राजकीय अगर सामाजिक आंदोलनांना साथ केली नाही, हे होय. मला अगदी खरोखर वाटते की, कला शून्यात कार्य करू शकत नाही. कलावंत ज्या सामाजिक व्यवस्थेत राहात आहे, त्या सामाजिक परिस्थितीचे सूत्रन त्याच्या कलेत

व्हावे आणि त्या समाजाशी आपली दृढता त्याने कायम ठेवावी. उमरावी काळात निर्माण झालेल्या कलेला लोकशाही वातावरणात प्रगती करणे कठीण झाले आहे काय? हा प्रश्न हर्बर्ट रीडने आपल्या आधुनिक कलेच्या तत्त्वज्ञानावरील ग्रंथात उपस्थित केलेला आहे. तो म्हणतो, "आजच्या कलावंतांनी जनतेची अभिरुची तयार केली पाहिजे, वाढविली पाहिजे, कारण त्यांच्याच आश्रयावर त्यांना जगावयाचे आहे. आधुनिक कलावंताला प्रसिद्धीच्या माध्यमावर अवलंबून राहावे लागते. आणि हाच त्याचा मोठा अपमान आहे." तो पुढे असे म्हणतो की, "लोकांना प्रतिमा समजू शकते, पण तिच्या पुरातन शुद्ध स्वरूपाची मात्र कल्पना नसते. त्यांची दृष्टी रूढ कल्पनांनी बनलेली असते. कलेचा हेतू आणि आजची लोकशाही समाजरचना यांच्यात विरोध निर्माण झालेला आहे आणि त्याचे निराकरण होणे कठीण आहे. दोघांनी म्हणजेच कलावंतांनी आणि जनतेने मानव्याचा पुरस्कार करावा—कलावंताने आश्रयासाठी आणि लोकशाहीने प्रदर्शनासाठी. संवेदनाक्षम कलावंत समजून घेतो की, काळ तर मोठा कठीण आला."

आश्रयाचा प्रश्न

हर्बर्ट रीड हे आधुनिक कलेवर अधिकारवाणीने बोलणारे गृहस्थ आहेत. परंतु "आधुनिक लोकशाही व्यवस्थेमुळे कलावंताविरुद्ध एक कट्टू वातावरण अपरिहार्यतेने तयार होते" हे त्यांचे मत मला पटत नाही. रशिया व चीन या देशात जी राजकीय व सामाजिक क्रांती घडून आली तिचा इतिहास त्यांच्या या विश्लेषणाची सत्यता पटवीत नाही. हे खरे आहे की, जुन्या काळात कला उमरावांच्या आश्रयाखाली होती आणि तिची भरभराटही झाली. कलावंत आपल्या आश्रयदात्यांना खूष करीत असत व आसपासच्या सामान्य जनतेकडे त्यांचे लक्ष नसे. सरंजामशाही आता गतकालात जमा झालेली आहे आणि कलेला आता राज्यसंस्थेच्या आश्रयावर आणि जनतेच्या प्रोत्साहनावर जगणे भाग आहे. सुदैवाने भारताच्या राज्ययंत्राला कलेच्या पुनरुज्जीवनाबद्दलच्या आपल्या जबाबदारीची जाणीव आहे. जनतेला कलेचे 'गुह्यात् गुह्यतरं' कळत नसेल परंतु तिला कलेचे योग्य मूल्य कळू शकते व त्याबाबत जनता उत्साही आहे. भारतीय जनतेला जर कलेचे रसग्रहण करता येत नसेल आणि आवश्यक उत्साह दाखविता येत नसेल तर ते त्यांना योग्य शिक्षण न मिळाल्यामुळे आणि योग्य संधी न मिळाल्यामुळेच, होय.

विद्यालयातील कला

मला वाटते की, कलेच्या अभ्यासाची आपल्या सध्याच्या शिक्षणपद्धतीशी अधिक बेमालूम सांगड घातली पाहिजे. अनेक ऐतिहासिक घटनांचा परिणाम म्हणून म्हणा आज आमच्या शिक्षणपद्धतीला वरपासून खालपर्यंत आलंबन नाही.

जीवनमूल्यांचे योग्य ज्ञान आणि त्यांचा निरामय सुसंवाद या गोष्टी आमच्या आजच्या शिक्षणपद्धतीत दिसून पडत नाहीत. आमच्या विद्यापीठांनी व विद्यालयांनी कलेच्या अध्ययनाचे महत्त्व जाणले पाहिजे. आमच्या शिक्षणाची शास्त्रपूत व समन्वयवादी पुनर्रचना केली तर सर्वसामान्य माणसाला कलेचे अल्पसे तरी शिक्षण मिळेल. आणि या शिक्षणाच्या आधारावरच सर्वसामान्य जनता कलेचे रसग्रहण करू शकेल. कलावंतांनी ही आपली अपेक्षित भूमिका योग्य तऱ्हेने पार पाडली पाहिजे. त्यांनी आपला वाटा उचलला पाहिजे. कलाप्रदर्शने देशभर भरविली पाहिजेत आणि कलावंतांनी सामान्य नागरिकांना सोप्या भाषेत कलेचा हेतू समजावून दिला पाहिजे आणि त्यांना रसग्रहणाची दिशा दाखविली पाहिजे. अशानेच कलेची प्रगती जलद होईल.

कलेच्या बाबतीत 'जुने ते सोने' हे नेहेमीच खरे ठरत नाही तसेच नवीन तेवढे परिवर्तनकारी असेही मानले जात नाही. कालिदासाने म्हटलेच आहे—

पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि काव्यं न च मित्यवद्यं

—*मालविकाग्निमित्र*

"वाङ्मयाची थोरवी ते पुरातन आहे की, अद्यतन आहे यावर ठरत नाही तर ती त्या वाङ्मयाच्या गुणवत्तेवर ठरते." कालिदासाचे हे उद्‌गार वाङ्मयाप्रमाणे कलेलाही लागू पडतात.

आजच्या कलावंतांनी परंपरेचा आधुनिक कल्पनांशी संयोग घडवून आपण ज्या क्रांतिकारक काळातून जात आहो त्या काळाचे सहचर बनावे; हेच त्यांना इष्ट होय.

नियतीचा क्षण

भारताच्या इतिहासात सध्याचा काळ अतिशय महत्त्वाचा गणला जाणार आहे. राजकीय व आर्थिक घटनांबरोबर जर सांस्कृतिक पुनरुत्थान घडून आले तरच सुवर्णयुगाचा प्रारंभ म्हणून या वैभवाच्या क्षणाचे भावी इतिहासकार वर्णन करतील. या काळाचे नियतीचा क्षण असे योग्य वर्णन करता येईल.

आपल्या देशाच्या कलेच्या पुनरुज्जीवनात अशा कलाप्रदर्शनांचे फार महत्त्व आहे असा माझा विश्वास आहे आणि या समजुतीनेच मी, हेब्बर आणि त्यांच्यासारखे इतर आधुनिक कलावंत साथीदार हे आपल्या कलाकृतींनी भारतीय कलेला संपन्न करून आपल्या राष्ट्राच्या भावी काळातील सांस्कृतिक संपत्तीत भर टाकतील अशी आशा करतो.

भारतीय जनतेचा कलेकडे पाहण्याचा दृष्टिकोन गीतेतल्या अर्जुनाप्रमाणे आहे. अर्जुन श्रीकृष्णाला म्हणाला,

"शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ।"

—*गीता, अ. २–७.*

यावर भारतीय कलावंतांनी सामान्य स्त्री-पुरुषांना श्रीकृष्णाप्रमाणे म्हणावे,

"न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा ।
दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ॥"

—*गीता, अ. ११–८.*

हेच आवाहन मी तरी सर्व भारतीय कलावंतांना करीन.

२

मराठी ग्रंथालयांपुढील कार्य

मराठी ग्रंथालय परिषदेच्या बाराव्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान मला दिल्याबद्दल मी प्रथमच माझी कृतज्ञता व्यक्त करतो. मुंबईस असताना ग्रंथालयांशी व तद्विषयक चळवळीशी माझा थोडा फार संबंध होता. पण ग्रंथालयविषयक मंत्र व तंत्र ह्यामध्ये मी सर्वस्वी अनभिज्ञ आहे. आणि म्हणून आजच्या परिषदेचे अध्यक्षस्थान स्वीकारताना माझे मन बरेचसे साशंक झाले आहे. आजच्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान स्वीकारण्यामध्ये माझा एकच हेतू होता व आहे तो असा की, आजच्या महत्त्वाच्या क्षणाला ग्रंथालयांकडून नागरिकांच्या काय अपेक्षा आहेत याबद्दल येथे जमलेल्या तज्ज्ञांसमोर थोडे विवेचन करावे.

अध्यक्षस्थान स्वीकारण्याची पात्रता नसल्यामुळे जरी मला हा मान स्वीकारताना संकोच वाटत असला तरी आजच्या अधिवेशनाचे जे असामान्य स्वरूप आहे ते लक्षात घेता हा मान मिळण्याचे भाग्य मला लाभले याबद्दल मला एका अर्थाने धन्यता वाटते. आजचे आपले अधिवेशन हे एकभाषिक महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर पहिलेच आहे, आणि त्या दृष्टीने आजच्या आपल्या अधिवेशनाचे स्वरूप असामान्य—व आजच्या प्रचलित भाषेत बोलावयाचेच झाले तर—आगळे असे आहे. माधव ज्यूलियन यांनी म्हटल्याप्रमाणे

"मराठी असे आमुची मायबोली
जरी आज ही राजभाषा नसे
नसे आज ऐश्वर्य या माउलीला
यशाची पुढे दिव्य आशा असे."

महाराष्ट्र-राज्य निर्माण होईपर्यंत सर्व मराठी भाषिक आज ना उद्या मराठीला

राजभाषेचे ऐश्वर्य प्राप्त होईल अशी आशा व प्रार्थना करीत होते. ती आशा व ती प्रार्थना पूर्ण होऊन नव-महाराष्ट्र निर्माण झालेला आहे व नव-महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतर आजचे आपले अधिवेशन प्रथमच भरत आहे. त्या दृष्टीने आजचे आपले अधिवेशन जरी बारावे असले तरी नव-निर्मित विशाल महाराष्ट्राच्या दृष्टीने आपले अधिवेशन पहिलेच आहे असे म्हणणे अयोग्य होणार नाही व अशा आगळ्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान मला मिळाल्याबद्दल सहाजिकच मला धन्यता वाटते.

ग्रंथालयांबद्दलची जुनी कल्पना

ग्रंथालयांबद्दल विचार करू लागता मला सुमारे पंचेचाळीस वर्षांपूर्वीची आठवण झाल्यावाचून राहात नाही. त्यावेळेस हायस्कूलमध्ये शिक्षण घेणारा मी एक विद्यार्थी होतो व साहजिकच इतर विद्यार्थ्यांबरोबर इंग्रजी वाङ्मय वाचण्याची मला अनिवार हौस होती. शालेय शिक्षण संभाळून बहिःशालेय वाचनाची हौस पुरवून घेण्याकरिता मी सातारा येथील व्हिक्टोरिया जनरल लायब्ररीचा सभासद झालो. त्यावेळी सदर ग्रंथालयाचे ग्रंथपाल केशवराव नावाचे एक सेवानिवृत्त गृहस्थ होते. मी इतक्या लहान वयात नवीन नवीन पुस्तके वाचण्याच्या हौसेने पुस्तकालयाचा सभासद होत आहे हे पाहून त्यांनी माझे अभिनंदन केले, पण त्यावेळेस त्यांना माझ्यासारख्या नवीन उत्साही सभासदाकडून किती उपद्रव होणार आहे याची कल्पना नव्हती. पुढे जेव्हा दर आठवड्यास एकदा, दोनदा, किंवहुना तीनदासुद्धा नवीन नवीन पुस्तके वाचण्याकरिता मागण्याचा मी सपाटा सुरू केला तेव्हा केशवराव अत्यंत नाराज व क्रुद्ध झाले व माझी वाचनाची हौस अनिवार झालेली पाहून शेवटी त्यांनी एक दिवस फार रागावून मला असे बजाविले की "जर तू अशा प्रकारे नवीन पुस्तकांची मागणी पुन्हा पुन्हा करू लागलास तर तुझ्या वडिलांच्याकडे तक्रार करून त्यांना असे सांगावे लागेल की तू शाळेतील अभ्यासाकडे दुर्लक्ष करीत आहेस." ग्रंथपाल व त्यांचे कर्तव्य, याबद्दल बिचाऱ्या केशवरावांची कल्पना अशी होती की ग्रंथालयात असलेल्या ग्रंथांचे संरक्षण करावयाचे व त्यांचा फारसा उपयोग होऊ द्यावयाचा नाही. आणि त्यामुळे साहजिकच उत्साही तरुण सभासद जेव्हा जेव्हा नवीन पुस्तकांची मागणी करू लागत तेव्हा तेव्हा केशवराव मोठ्या रागाने त्यांच्याकडे पाहात असत; आणि त्याबद्दल त्यांना दोषही देणे शक्य नव्हते, कारण जुन्या जमान्यात ग्रंथपालांच्या कर्तव्यासंबंधी तशाच प्रकारची समजूत प्रचलित होती.

ग्रंथालय म्हणजे त्या काळी एक मिळकतीची बाब समजली जात असे. सरंजामी युगामध्ये, व्यक्तिशः एखादे ग्रंथालय जवळ असणे म्हणजे एक प्रतिष्ठेची व वैभवाची बाब समजली जात असे. साहजिकच इतर मिळकतीप्रमाणेच ग्रंथालयांचे-

सुद्धा संरक्षण व संवर्धन करणे आणि त्यांचे प्रदर्शन करणे हाच एक महत्त्वाचा भाग गणला जाई.

तैलाद्रक्षेत् जलाद्रक्षेत रक्षेच्छिथिलबंधनात्
मूर्खहस्ते न दातव्यम् एवं वदति पुस्तकम्

ही कविकल्पनासुद्धा हेच दाखविते की ग्रंथांच्या संरक्षणाकडेच ग्रंथपालांचे मुख्य लक्ष असे. ग्रंथपालांचा हा दृष्टिकोन केवळ आपल्याच देशात प्रचलित होता असे नव्हे तर इतर सर्व देशांमध्येही हाच दृष्टिकोन प्रचलित होता. एकोणिसाव्या शतकामध्ये हार्वर्ड युनिव्हर्सिटीच्या मुख्य ग्रंथालयाच्या ग्रंथपालाने एकदा मोठ्या अभिमानाने असे उद्गार काढले होते की त्याच्या ताब्यात असलेल्या ग्रंथालयामधील सर्व पुस्तकांपैकी फक्त एकच पुस्तक सभासदाकडे गेलेले होते व बाकीची ग्रंथालयातील सर्व पुस्तके व्यवस्थित रीतीने साफसूफ ठेवलेली, जशीच्या तशीच होती. तात्पर्य, ग्रंथालय म्हणजे ग्रंथांचे आलय. जिथे अनेक ग्रंथ मिळवून व्यवस्थित रीतीने ठेविलेले असतात असे आगर एवढाच ग्रंथालयाबद्दल सामान्यतः समज प्रचलित होता. अशा रीतीने निरनिराळ्या ग्रंथांचा संचय व संग्रह करून त्यांचे संरक्षण करण्याचे स्थान म्हणजेच ग्रंथालय अशी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत सामान्यतः कल्पना असल्यामुळे सातारा येथील जुन्या काळचे ग्रंथपाल केशवराव यांना मी साहाजिकच दोष देऊ शकत नाही.

विसाव्या शतकामध्ये मात्र ग्रंथालयांबद्दलच्या कल्पनात आमूलाग्र बदल झाला. १९१७ साली इंग्लंडमधील सार्वजनिक ग्रंथालयांबद्दल विचार करण्याकरिता सर सिडने रॉबर्ट्स यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने ग्रंथालयांबद्दलच्या कल्पनांचा ऐतिहासिक आढावा आपल्या रिपोर्टात घेतला आहे. ती समिती म्हणते—

"At the beginning of the nineteenth century there were no public libraries in England and Wales, apart from those attached to cathedrals and colleges and a small number of parish libraries and scattered libraries endowed as charities; few of these were open to all comers, and some contained only classical and theological works. The state of education was such that there was little demand for anything more, and many persons viewed with alarm the dangers of unrestricted access by the people to knowledge and opinions of all sorts. The demand for public libraries arose as part of the campaign of the Philosophic Radicals for a national system of education. From this movement

for popular education grew the demand for libraries, which should provide books free of charge to the artisans of the towns and labourers of the villages."[1]
जी गोष्ट इंग्लंडमधील ग्रंथालयांच्या इतिहासाबद्दल खरी आहे तीच गोष्ट आपल्या देशातील ग्रंथालयांबद्दल सामान्यतः खरी आहे असे म्हणता येईल.

याचा अर्थ असा नव्हे की ग्रंथ व ग्रंथापासून मिळणारे ज्ञान याचे महत्त्व आपल्या देशात पूर्वीच्या युगात मान्य झाले नव्हते. उलट आपल्या देशात विद्यादानाचे महत्त्व अपूर्व समजले जात असे याबद्दल संशय नाही.

या दद्याज्ज्ञानमज्ञानांकुर्याद्वा धर्मदर्शनम्।
स कृत्स्नां पृथिवीं दद्यात् तेन तुल्यं न तद्भवेत्॥

ह्या मनुवचनावरून ज्ञानार्जन व ज्ञानदान यांना पुरातनकाळी सामाजिक जीवनात किती महत्त्व दिले जात होते याची यथार्थ कल्पना येईल. प्राचीन काळी भारतात महान विद्यालये व विश्वविद्यालये होती व तेथे असलेल्या प्रचंड ग्रंथालयांमधील ग्रंथांचे अवलोकन, अध्ययन व अध्यापन सतत चालू ठेवण्याच्या कार्यक्रमात तत्कालीन आचार्य व छात्र मोठ्या उत्साहाने भाग घेत असत ही गोष्ट निर्विवाद आहे. पण विद्यालयीन किंवा विश्वविद्यालयीन ग्रंथालये ही केवळ तेथे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच उपलब्ध असल्यामुळे त्यांचे कार्यक्षेत्र एका अर्थाने मर्यादित असे व सर्वसामान्य जनतेला उपलब्ध असलेल्या ग्रंथालयांचे कार्य करणे त्यांना साहजिकच शक्य नसे. म्हणूनच सार्वजनिक ग्रंथालयांबद्दल ज्या कल्पना व जे संकेत आज लोकप्रिय झालेले आहेत त्या कल्पना व ते संकेत जवळजवळ १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत आपल्या देशातही प्रचलित नव्हते असे म्हणण्यात अतिशयोक्ती होईल असे मला वाटत नाही.

ग्रंथालयांबद्दलचे आधुनिक संकेत

२० व्या शतकात सार्वजनिक ग्रंथालयांबद्दल झालेली सर्वसामान्य कल्पना वर्णून तिचे आता थोडक्यात दिग्दर्शन करणे योग्य होईल. ॲडव्हायजरी कमिटी फॉर लायब्ररीज, (मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन, गव्हर्न्मेन्ट ऑफ इंडिया, १९५९) ह्या समितीने पुढीलप्रमाणे सार्वजनिक पुस्तकालयांचे जे वर्णन केले आहे त्याचा सारांश असा: "ग्रंथालयांचे संवर्धन सार्वजनिक पैशातून व्हावे. ग्रंथालयांनी

1. Report of the Committee appointed by the Minister of Education in September 1957, presented to Parliament by the Minister of Education by Command of Her Magesty, in February 1959. *The Structure of the Public Library Service in England and Wales*, p. 2.

वाचकांकडून कोठल्याही तऱ्हेच्या वर्गणीची अपेक्षा करू नये, ग्रंथालयांचा उपयोग वाचकांचे शिक्षण करण्याकडे व्हावा आणि सर्व विषयांवर भरपूर माहिती देणारे वाङ्मय पक्षनिरपेक्ष दृष्टीने पुरविण्याची जबाबदारी ग्रंथालयांनी पार पाडावी." आज जेव्हा आपण ग्रंथालय परिषदेच्या अधिवेशनामध्ये जमून ग्रंथालयांच्या कार्य-क्षेत्राबद्दल व ग्रंथालय चळवळीच्या ध्येयांबद्दल विचार करणार आहोत तेव्हा ग्रंथालयांच्या स्वरूपाबद्दल केलेले हे दिग्दर्शन आपणाला उपयोगी पडेल असे मला वाटते. 'यूनो' तर्फे अखिल मानवजातीच्या हक्कांबद्दल जे निवेदन करण्यात आलेले आहे त्या निवेदनातील २७ वे कलम असे सांगते की—

"It is the birth-right of every individual to have free access to the results of human ingenuity exercised in art or science."

ह्या घोषणेमध्ये ग्रथित केलेला प्रत्येक नागरिकाचा जन्मसिद्ध हक्क हाच ग्रंथालय चळवळीचा मूलभूत पाया आहे असे मला वाटते, आणि त्या दृष्टीने ग्रंथालये व ग्रंथालयांची चळवळ विसाव्या शतकापर्यंत आपल्या देशातही प्रचलित नव्हती असे म्हणणे ऐतिहासिक दृष्ट्या फारसे चुकीचे होईल असे मला वाटत नाही.

ग्रंथालयांच्या कार्याचे द्विविध स्वरूप

आधुनिक समाजात ग्रंथालयांचे कार्य द्विविध स्वरूपाचे असते. ग्रंथालयांच्या सहाय्याने सर्व नागरिकांना सुसंस्कृत करण्याचे कार्य पार पाडता येते. प्रत्येक नागरिकाच्या संस्कृतीचे संगोपन करण्यास ग्रंथालये महत्त्वाचे सहाय्य देऊ शकतात. नागरिकाचे शिक्षण शालेय किंवा विश्वविद्यालयीन जीवन संपल्याबरोबर परिपूर्ण होते ही कल्पना सयुक्तिक नाही. प्रत्येक नागरिकाचे शिक्षण एका अर्थाने सर्व आयुष्यभर चालूच असते.

आचार्यात्पादमादत्ते पादं शिष्यः स्वमेधया।
पादं सब्रह्मचारिभ्यः शेषं कालक्रमेण तु ॥

ह्या कविवचनात वर्णन केल्याप्रमाणे शिक्षणाचा सर्वांत महत्त्वाचा चवथा भाग प्रत्येकाला कालक्रमाने मिळवावा लागतो आणि त्या दृष्टीने औपचारिक शिक्षणक्रम संपल्यानंतर सबंध आयुष्यभर स्वतःचे शिक्षण व संस्कृती वाढविण्याकरिता जो शिक्षणविषयक अमूल्य ठेवा समंजस नागरिकाला मिळवावा लागतो तो ठेवा मिळविण्याच्या कामी ग्रंथालयांचे अमोलिक सहाय्य त्याला मिळत असते. अशा दृष्टीने ग्रंथालये नागरिकाचे व्यक्तिविषयक शिक्षण व संस्कृतीचे संवर्धन करण्यास सहाय्यभूत होतात.

पण यापेक्षाही जास्त महत्त्वाचे कार्य आज ग्रंथालयांना करणे जरूर आहे, आणि ते म्हणजे सर्व समाजात, आजच्या युगात प्रचलित झालेल्या सामाजिक व आर्थिक निष्ठांचे ज्ञान पसरविणे हे होय. भारत स्वतंत्र झाल्यानंतर आपल्या इतिहासात महनीय भाग्याचे असे युग सुरू झाले आहे.

आपल्या देशात आता लोकशाहीची प्रस्थापना झालेली असून लोककल्याणकारी राजवट निर्माण करण्याचे ध्येय आपल्या राष्ट्राने आपल्यापुढे ठेविले आहे. आणि ते ध्येय गाठण्याकरिता सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करणे अत्यंत जरूर आहे. हे काम शासनसंस्था केवळ शासनाच्या जोरावर करू शकणार नाही. कारण सर्व लोकशाही देशांतील इतिहास असे सांगतो की केवळ कायद्याच्या जोरावर शासनसंस्था सामाजिक व आर्थिक क्रांती घडवू शकत नाही. ह्या दिशेने शासनसंस्थेने केलेल्या प्रयत्नांना अखिल समाजाचे हार्दिक सहाय्य मिळणे अवश्य असते. हे सामाजिक लोकशिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आज ग्रंथालयांनीच करावयाचे आहे, आणि त्या दृष्टीने क्रांतिकारक जीवनमूल्यांचा परिचय सर्व समाजाला करून देण्याकरिता व आपल्या सभोवार ज्या क्रांतिकारक घटना घडत आहेत त्यांचे सम्यक् ज्ञान समाजाला पटवून देण्याकरिता ग्रंथालयांनी आज तयार झाले पाहिजे. लोकशाहीचा मुख्य आधार व लोकशाहीचे खरे सामर्थ्य निष्ठावान, जागरूक व कर्तव्यदक्ष नागरिक हा आहे, आणि तसा नागरिक निर्माण करणे हे ग्रंथालय-सेवेचे ध्येय आहे हे ग्रंथपालांनी सतत ध्यानात ठेवणे जरूर आहे. ग्रंथपाल जेव्हा जेव्हा आपल्या कार्याचा आढावा घेण्यासाठी आजच्यासारखे अधिवेशनात एके ठिकाणी जमतात तेव्हा तेव्हा ग्रंथालयांच्या या द्विविध कार्याचे स्वरूप त्यांनी लक्षात घेणे जरूर आहे असे मला वाटते.

महाराष्ट्रीय ग्रंथालयांसमोरील आजचे महत्त्वाचे कार्य

विशेषतः नव-महाराष्ट्र निर्मितीनंतर ग्रंथालय परिषदेचे अधिवेशन आज प्रथमच भरत असल्यामुळे आजच्या महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात महाराष्ट्रीय ग्रंथालयांना जे अत्यंत तातडीचे व महत्त्वाचे कार्य पार पाडणे जरूर आहे त्याचाही आपण विचार केला पाहिजे. सर्व महाराष्ट्रीयांच्या मनात हार्दिक एकात्मता निर्माण करणे फार महत्त्वाचे आहे. हार्दिक एकात्मता निर्माण करण्याचा प्रश्न हा केवळ कायद्याने सुटणे शक्य नाही. ही एकात्मता निर्माण करण्याकरिता परस्परांत असलेले गैरसमज दूर करून बंधुभावाचे वातावरण निर्माण करणे फार जरूरीचे आहे आणि हे वातावरण निर्माण करण्याच्या कामी ग्रंथालय-सेवा हे एक महत्त्वाचे साधन आहे. महाराष्ट्रापुढे आज ज्या आर्थिक व सामाजिक समस्या निर्माण झालेल्या आहेत त्या समस्यांना योग्य ते उत्तर शोधून काढून त्यांचा प्रचार सामान्य जनांमध्ये करण्याचे काम अखेर ग्रंथालयांनाच करावे लागेल असे मला वाटते. लोकशाहीप्रधान

समाजामध्ये सर्व प्रश्नांचे मोकळेपणाने व निर्भयपणाने विवेचन करून प्रत्येक गोष्टीबद्दल साधकबाधक चर्चा होणे अत्यंत जरूर असते, व या अपक्ष भूमिकेवरून झालेल्या सर्वांगीण चर्चेचे जे निष्कर्ष निघतात त्यांचा परिचय सामान्य जनतेला करून देण्याचे कार्य ग्रंथालयांच्या कार्यक्षेत्रात पडते असे मला वाटते.

ग्रंथालयांचे महत्त्व

ग्रंथालयांचे महत्त्व त्यांच्या भव्य इमारती, त्या इमारतीत ठेवलेली चकचकीत कपाटे, त्यातील असंख्य पुस्तके, सुंदर खुर्च्या, टेबले वा मोठा नोकरवर्ग यांवर अवलंबून नसून, ग्रंथालयांचे खरे महत्त्व ग्रंथालयांमध्ये असलेल्या ग्रंथांच्या वैचारिक मूल्यावर आहे. ते ग्रंथालय अधिक महत्त्वाचे ठरेल की ज्या ग्रंथालयातील ग्रंथांच्या वाचनामुळे लोकशिक्षणाचे ध्येय ग्रंथालय सिद्ध करू शकेल. अशा दृष्टीने विचार करता ग्रंथालयातील ग्रंथांचा संग्रह वाढविताना ग्रंथांतील वैचारिक मूल्यांचा विचार करणे जरूर आहे आणि त्या दृष्टीने आजच्या परिस्थितीत सामाजिक शिक्षणाचे व लोकशिक्षणाचे कार्य करण्याकरिता ज्या ज्या ग्रंथांचे सहाय्य होईल त्या त्या ग्रंथांचा संग्रह करून जे ग्रंथालय आपले कार्य पार पाडण्यास उद्युक्त होईल त्याच ग्रंथालयाचे महत्त्व जास्त ठरेल.

सामाजिक, आर्थिक व राजकीय ह्या सर्व बाबतीत ज्या नव्या नव्या क्रांतिकारक कल्पना प्रचलित होत आहेत त्या कल्पनांचा प्रचार करण्याचे शस्त्रागार अशा दृष्टीने ग्रंथालयांकडे बघणे जरूर आहे. "Revolutionary ideas have legs and they travel fast" असे म्हणतात पण या क्रांतिकारक कल्पनांच्या गतीला सहाय्य देण्याला ग्रंथालयांचाच उपयोग केला पाहिजे व त्या दृष्टीने आधुनिक कालात ग्रंथालयांना लोकशाहीतील शस्त्रागार म्हणणे अयोग्य होणार नाही.

ग्रंथालयशास्त्र—रंगनाथन्कृत पंचसूत्रे

भारतामध्ये ग्रंथालय व ग्रंथपाल ह्यांबद्दल नवीन व क्रांतिकारक कल्पनांचा प्रचार करण्याचा मान डॉ. रंगनाथन् यांना दिला पाहिजे. आज अनेक वर्षे डॉ. रंगनाथन् हे ग्रंथालय-चळवळीचे कर्णधार असून त्या विषयाचा त्यांनी सतत प्रचार केलेला आहे. ग्रंथालयशास्त्राबद्दल त्यांनी जे एक सूत्रपंचक रचिले आहे ते अत्यंत अर्थपूर्ण असे आहे. डॉ. रंगनाथन् यांचे सूत्रपंचक त्यांच्याच भाषेत सांगावयाचे झाले तर––

ग्रंथालयी सदा सेवी पंचसूत्र परायणः
ग्रंथा अध्येतुमेते च सर्वैः स्वं स्वमाप्नुयुः
अध्येतुः समयं शेणेत आलयो नित्यमेव च
वर्धिष्णुः एव चिन्मूर्तिः पञ्चसूत्री सदा जयेत्

ह्याच पंचसूत्राचे इंग्रजीत भाषांतर डॉ. रंगनाथन् यांच्याच शब्दांत सांगावयाचे झाले तर—

Books are for use
Every reader his book
Every book its reader
Save the time of the reader
Library is a growing organism.

ह्या पंचसूत्रातील पहिले सूत्र हे दिसावयास अगदी साधे व सोपे आहे; पण त्या सूत्राने एक क्रान्तिकारक कल्पना प्रचलित केली आहे.

एकोणिसाव्या शतकात ग्रंथालय म्हणजे एक मिळकतीचा भाग आहे व ग्रंथपालकांचे मुख्य काम म्हणजे ग्रंथांचे संरक्षण करणे असे मानले जात असे हे मी पूर्वीच सांगितले आहे. ह्याच्या उलट डॉ. रंगनाथन् यांचे पहिले सूत्र असे सांगते की ग्रंथालये ही केवळ ग्रंथपालनाची जागा नसून ग्रंथांचा उपयोग करण्याची, वाचकांना शिकविण्याची जागा आहे. ग्रंथपालकाचे काम केवळ कृमिकीटकांपासून ग्रंथांचे संरक्षण करण्याचे नसून समाजात मिसळून नागरिकांचे शिक्षण वाढविण्याकरिता त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण करणे हे मुख्य आहे. "Ask Library anything" म्हणजे ग्रंथालयात जाऊन ग्रंथपालाला कोणताही प्रश्न विचारा वा कोणत्याही विषयाची माहिती विचारा तो तुम्हांला योग्य ते मार्गदर्शन करील अशा तऱ्हेचे ध्येयवाक्य प्रत्येक ग्रंथालयाने आपल्या ग्रंथसंग्रहावर लावावे अशी मार्मिक सूचना एका ग्रंथपालकाने केली आहे. मला वाटते या सूचनेत बराच अर्थ आहे. आधुनिक कालात ग्रंथपाल हे ग्रंथांचे नुसते काळजीवाहू (janitor) राहिले नसून त्यांना आता समाजशिक्षकाचे व लोकशिक्षकाचे कार्य करणे जरूर झाले आहे. ग्रंथपालन हे एक शास्त्र झाले असून त्या शास्त्राचे सांगोपांग अध्ययन केल्याखेरीज कोणीही ग्रंथपाल आपले कर्तव्य नीटपणे पार पाडू शकणार नाही.

ग्रंथालये ही आता ग्रंथभांडार संरक्षण करण्याची आलये नसून ग्रंथांचा उपयोग व त्यांचे वाचन लोकप्रिय करण्याची साधने समजली जातात. आणि म्हणूनच ग्रंथालय-सेवा हे आधुनिक काळात समाजसेवेचे महत्त्वाचे साधन झाले आहे. "वाचकांपासून माझे संरक्षण करा" असे आता ग्रंथ म्हणत नाहीत. उलट "जितके जास्त वाचक मला जवळ करून वाचतील व माझे म्हणणे ऐकतील व समजावून घेतील तितके मला जास्त समाधान होईल" असा ग्रंथांचा दावा आहे. "अनेक वर्षे केवळ सुरक्षित जीवन जगण्यापेक्षा अनेक वाचकांनी वाचून जीर्ण होऊन मी जरी नष्ट झालो तरी झिजून झिजून खपलेल्या चंदनाचे भाग्य मला लाभेल" अशी ग्रंथांची मनीषा असते. आणि म्हणूनच ग्रंथ हे संरक्षणाकरिता

नमूने वाचनाकरिता आहेत हे साधे दिसणारे तत्त्व किती क्रांतिकारक आहे याची सहज कल्पना करता येते.

ग्रंथपाल कसा असावा ?

अशा व्यापक दृष्टीने विचार करता ग्रंथपालाची जबाबदारी किती मोठी आहे याची साहजिकच कल्पना येते. ग्रंथपाल कसा असावा या मुद्द्यासंबंधी बोलताना ऑस्टिन डॉब्सन यांनी केलेले सुंदर व मार्मिक वर्णन उद्धृत करण्याचा मोह मला आवरत नाही. रिचर्ड गार्नेथ नावाचा एक मोठा ग्रंथपाल होऊन गेला. त्याच्याबद्दल ऑस्टिन डॉब्सन असे म्हणतो--

Of him we may justly say here was one
Who knew of most things more than any other
Who loved all learning underneath the Sun
And looked on every learner as his brother.

ग्रंथपालांचे शिक्षण व ग्रंथपालांची वृत्ती कशी असावी याचे यापेक्षा जास्त परिणामकारक वर्णन करणे शक्य नाही. ग्रंथालयाला सामाजिक शिक्षणाच्या व लोकशिक्षणाच्या कार्यात जे महत्त्वाचे स्थान आहे त्याचा विचार करता त्यांना आधुनिक कल्पनांचे शस्त्रागार म्हणून संबोधणे कसे योग्य आहे हे मी मघाशीच सांगितले आहे. ह्या शस्त्रागाराचे प्रमुख या दृष्टीने सर्व नागरिकांचे शिक्षण करण्याकरिता ज्या त्या शस्त्राचा योग्य तो उपयोग करण्याचे ज्ञान असणारा व आपले कार्य यशस्वी झालेच पाहिजे अशी तळमळ बाळगणारा समाजशिक्षक व समाजसेवक अशा दृष्टीने आजचे नागरिक ग्रंथपालांकडे पाहातात असे मला वाटते.

समाजसेवक व लोकशिक्षक ग्रंथपाल हा मुख्यत्वेकरून ग्रंथप्रेमी असला पाहिजे. निरनिराळे ग्रंथ वाचण्याची आवड असणारा, ग्रंथांमध्ये रमणारा व बागडणारा, नवीन नवीन विचार समजावून घेऊन त्यांचे समंजसपणे ग्रहण करणारा ग्रंथवेडा असा ग्रंथपाल आपले कर्तव्य योग्य रीतीने बजावू शकेल. अशा ग्रंथपालाला आपण मिळविलेले ज्ञान व आपल्याजवळ असलेली माहिती शक्य तितक्या जास्त वाचकांना पुरविण्याची हौस वाटेल व ते काम करण्यास तो नेहमीच तयार होईल, आणि पूर्वीच्या काळी वाचकांनी ग्रंथ मागितल्यास कपाळाला आठी घालून "वाचणार आहात की नुसता चाळण्याकरिता ग्रंथ पाहिजे आहे ?" अशा तऱ्हेचा निरुत्साहजनक प्रश्नही तो विचारणार नाही. उलट निरनिराळ्या नागरिकांना ग्रंथालयाकडे आकर्षून निरनिराळ्या विषयांवर प्रसिद्ध होणारे ग्रंथ त्यांनी वाचावेत अशी आवड त्यांच्यामध्ये निर्माण करणे आपले कर्तव्य आहे हे जाणून तो तशा तऱ्हेचा प्रयत्न सदैव करील. सारांश, ग्रंथालय-सेवेचे मर्म जाणणारे ग्रंथपाल निर्माण झाल्याशिवाय ग्रंथालय-सेवा यशस्वी होणार नाही. ग्रंथपालाचे काम म्हणजे केवळ द्रव्यार्जन

करून उपजीविका करण्याचे एक साधन असे मानणारे ग्रंथपाल ग्रंथालय-सेवा यथार्थपणे करू शकणार नाहीत. ग्रंथालय-सेवा हे एक समाजसेवेचे साधन आहे ही गोष्ट पटल्याशिवाय ग्रंथालय-सेवा कधीही यशस्वी होणार नाही.

ग्रंथालय-संघटनेचे ध्येय

अशा दृष्टीने विचार करता ग्रंथालय-चळवळीने आपल्या देशामध्ये एक भव्य संघटना तयार करणे जरूर आहे असे मला वाटते. या चळवळीचे जाळे भारताच्या राजधानीपासून खेड्यापर्यंत सर्व देशभर पसरले पाहिजे. राष्ट्रीय ग्रंथालये, प्रादेशिक ग्रंथालये, जिल्हा ग्रंथालये, तालुका ग्रंथालये व ग्राम ग्रंथालये अशा व्यापक संघटना ग्रंथालयांनी निर्माण करणे जरूर आहे. पाच हजार व त्यापेक्षा जास्त वस्ती असलेल्या प्रत्येक गावात ग्रंथालय निर्माण होणे जरूर आहे. त्याशिवाय छोट्या छोट्या गावांतून लोकशिक्षणाचे व समाजशिक्षणाचे कार्य करण्याकरिता फिरती वाचनालये सुरू करणे जरूर आहे. आजच्या युगात ग्रंथालयांना ज्ञानदानाचे कार्य करावयाचे असल्यामुळे ही ज्ञानदानाची सदावर्ते खेडोपाडी व गावागावात पोहोचविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आजच्या परिस्थितीत ग्रामीण ग्रंथालयांना किती महत्त्व आहे हे सांगावयास नकोच. त्या दृष्टीने ग्रामीण ग्रंथालयांचे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना उत्तेजन देऊन त्यांच्या कार्यामध्ये ज्या आर्थिक अगर इतर अडचणी निर्माण होतात, त्या दूर करण्याकरिता काय उपाययोजना केली पाहिजे याचा आपण अवश्य विचार करणे जरूर आहे. ग्रामीण ग्रंथालयांमार्फत होणारे लोकशिक्षण व समाजसेवा ही लोकशाहीच्या यशाला अत्यंत साहाय्यक असते हे लक्षात ठेऊन ग्रामीण ग्रंथालयाकडे आपण दुर्लक्ष करता कामा नये. ग्रामीण ग्रंथालयांपासून सुरवात करून राष्ट्रीय ग्रंथालयांपर्यंत व्यापक स्वरूपाची संघटना निर्माण करण्याच्या कार्यात कायद्याचे सहाय्य घेणे जरूर आहे असे मला वाटते. या दृष्टीने भारतात दोनच प्रांतांत कायदे पास झाल्याचे दिसून येते. मद्रासमध्ये मद्रास ॲक्ट (१९४८ चा २४ वा) पास झाला असून हा कायदा सामान्यतः ग्रंथालये व तद्विषयक बाबी यांविषयी आधारभूत समजण्यास हरकत नाही. हा कायदा छोटेखानी असून त्यात फक्त १९ कलमे आहेत. त्यातील महत्त्वाचे कलम १२ वे असून त्यायोगे ग्रंथालयांकरिता "लायब्ररी सेस" आकारण्याचा अधिकार त्या कलमांमध्ये निर्दिष्ट केलेल्या समितीला देण्यात आला आहे. अशाच प्रकारचा कायदा आंध्र प्रदेशात पास झाला असून त्याचे नाव हैद्राबाद ॲक्ट (१९५५ चा ३रा) असे आहे. महाराष्ट्रामध्ये अशाच प्रकारचे एक बिल १९५९ मध्ये विधानसभेसमोर आणण्यात आले होते. महाराष्ट्र सरकारने या बिलामागील तात्त्विक भूमिका मान्य करूनही त्याबद्दल विचार करावयास पुरेसा वेळ नाही या सबबीवर सरकारतर्फे या बिलाला विरोध करण्यात आला व हे बिल अखेर नामंजूर झाले.

संशोधक असे म्हणतात की मध्ययुगात भारतात अनेक राज्यांतून ग्रंथालय-विषयक ब्रह्मोत्तर नावाचा कर प्रचलित होता. ते खरे असो वा नसो आज ग्रंथालयांच्या चळवळीला जर जरूर ते व्यापक स्वरूप मिळवावयाचे असेल तर मद्रासमध्ये पास झालेल्या कायद्यासारखा कायदा निरनिराळ्या प्रदेशांत पास होणे जरूर असून सामान्यतः त्या कायद्यात मान्य झालेल्या तत्त्वांवर ग्रंथालयांची चळवळ सुधारली जावी असे मला वाटते. सध्या महाराष्ट्रामध्ये ज्या पद्धतीने ग्रंथालय-चळवळ सुरू आहे त्या पद्धतीनेच चालल्यास ग्रंथालय-चळवळीला आपले ध्येय लवकर सिद्ध करणे शक्य होईल की नाही याचा ग्रंथपालांनी अवश्य विचार करावा. या विषयाचा विचार करणाऱ्या अनेक तज्ज्ञांचे असे मत आहे की मद्रास प्रदेशात मान्य केलेला मार्ग महाराष्ट्राने स्वीकारावा. त्यांच्या मते आज महाराष्ट्रात ग्रंथालयांच्या चळवळीबद्दल जे धोरण स्वीकारण्यात आलेले आहे ते फारसे यशस्वी होणार नाही व कायद्याचा आधार घेतल्याखेरीज ही चळवळ फोफावणार नाही व आपले कार्य पार पाडू शकणार नाही. या विषयाबद्दल आपण विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा. मी जरी या प्रश्नाचा विशेष अभ्यास केला नसला तरी सामान्यतः मला असे वाटते की मद्रासच्या कायद्याने जे धोरण स्वीकारले आहे तशाच तऱ्हेचे धोरण स्वीकारून ग्रंथालयांच्या चळवळीला सहाय्य करण्याचे आवाहन आपण महाराष्ट्रातील शासनसंस्थेला करावे.

ग्रंथालयांच्या कार्याबद्दल शासनसंस्थेची अनास्था

ग्रंथालयांना आजच्या ऐतिहासिक काळात जे महत्त्वाचे कार्य करावयाचे आहे त्याचा विचार करताना ग्रंथालयांबद्दल आजपर्यंत योजण्यात आलेल्या पंचवार्षिक योजनांमध्ये जी अनास्था दाखविण्यात आली आहे त्याबद्दल विषाद वाटल्यावाचून राहात नाही. पहिल्या पंचवार्षिक योजनेत ग्रंथालयांबद्दल फक्त एकच विचार करण्यात आला होता आणि तो म्हणजे दिल्ली येथे नॅशनल सेंट्रल लायब्ररीची स्थापना करणे हा होय. (५६५–डी). दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत एवढाच विचार करण्यात आला होता की–

"for development of the National Library, Calcutta establishment of a Central Reference Library in Delhi and the publication of a National Bibliography" (p. 552).

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत थोडी प्रगती झालेली आहे. आणि ग्रंथालयांबद्दल असे म्हणण्यात आले आहे की—

"Provision has been made under the third Plan for programmes of development of languages and culture, youth programmes and the establishment of

the National Central Reference Library, etc., which were initiated in the Second Plan" (p. 105 para 27).

ह्यावरून मोठ्या खेदाने असे म्हणणे भाग आहे की पंचवार्षिक योजनांची आखणी करणाऱ्या समितीला योजना यशस्वी करण्याकरिता लोकजागृतीसारखे महत्त्वाचे कार्य ग्रंथालये करू शकतील याची जाणीव झाली नसावी. भारत सरकारने ग्रंथालयांबद्दल सल्ला देण्याकरता जी सिंह-समिती नेमलेली होती त्या समितीनेही आपल्या देशातील शासनसंस्था ग्रंथालयांबद्दल किती अनास्था दाखवितात याचा खेदपूर्वक उल्लेख केला आहे. सदर समिती म्हणते—

"At the end of March 1954, the country had nearly 32,000 libraries most of them small, stagnating pools of books. Between them they had a book stock of a little over 71 lakh volumes with an annual use of about 377 lakh books. The country spent less than half a crore of rupees on this service. Though the figures in lakhs appear imposing, the public libraries have only one book for every 50 heads and as many as 20 persons between themselves read only one book in a year. Taking into account the literate adults only, an adult reads only one book in a year. In terms of money, five Indians between themselves contributed one anna in a year-less than a pice per head per year-for the library service!"

अशा परिस्थितीत निराश न होता आपल्या परिषदेने महाराष्ट्रीय शासन-संस्थेला आग्रहाची अशी सूचना करावी की महाराष्ट्र राज्यसरकारने पुढील पाच वर्षात ग्रंथालयांची चळवळ यशस्वी करण्याकरिता शक्य ते सहाय्य मुक्तहस्ताने करावे, ते कार्य यशस्वी करण्याकरिता जरूर तो कायदा लौकर पास करून घ्यावा व सर्व प्रकारचे आर्थिक सहाय्य ग्रंथालयांच्या चळवळीला द्यावे. महाराष्ट्रामध्ये सामाजिक समता प्रस्थापित करण्याबद्दल, आर्थिक विकासाच्या सर्व कल्पना यशस्वी करण्याबद्दल महाराष्ट्राचे शासन फार जागरूक, दक्ष व तत्पर आहे ही गोष्ट मला माहीत असल्यामुळे मला असा विश्वास वाटतो की ही परिषद् ग्रंथालय-चळवळीच्या उत्कर्षाकरिता ज्या ज्या योग्य व समंजस सूचना महाराष्ट्र राज्यसरकारला करील त्या त्या सर्व सूचनांचा महाराष्ट्र राज्यसरकार सहानुभूतीपूर्वक विचार केल्याशिवाय राहाणार नाही.

अधिवेशनाने हाती घ्यावयाचे कार्य

आज भरणारे अधिवेशन हे नव-महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतर प्रथमच भरत

असल्याने ह्या अधिवेशनाने प्रथम व तावडतोब महाराष्ट्रात कार्य करीत असलेल्या चार ग्रंथालय संघांच्या संवीकरणाचा प्रश्न तडीस नेणे जरूर आहे. मराठवाड्यातील औरंगाबाद येथील मराठवाडा ग्रंथालय संघ, विदर्भातील नागपूर येथील विदर्भ ग्रंथालय संघ, महाराष्ट्रातील महाराष्ट्र ग्रंथालय संघ व मुंबई येथील मुंबई ग्रंथालय संघ या सर्व संघांनी एकत्रित येऊन संवीकरणाची एखादी योजना तावडतोब करावी अशी माझी आग्रहाची सूचना आहे. हे कार्य परस्पर सहकार्याने, समजुतीने, समंजसपणाने व कोणाच्याही भावना न दुखविता पार पाडणे जरूर आहे. महाराष्ट्रापुढील सामाजिक व आर्थिक समस्या सोडविण्याकरिता लोकशिक्षणाच्या कार्यात सहाय्य करून ग्रंथालयांना फार मोठे कार्य करता येईल असा माझा विश्वास असल्यामुळे मला असे वाटते की जर परस्पर सहकार्याने अखिल महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळ एका संघीकृत अशा संस्थेच्या हाती आली तर महाराष्ट्रापुरता तरी ग्रंथालयांच्या चळवळीचा इतिहास उज्ज्वल होईल याबद्दल मला मुळीच संशय वाटत नाही.

सर्व संस्थांचे संवीकरण केल्यानंतर महाराष्ट्रातील ग्रंथपालांनी यापुढे लोकशाहीच्या कार्यामध्ये आपल्याला काय कार्य करता येईल याचा विचार करावा. आधुनिक कल्पनेप्रमाणे अभ्यासमंडळे स्थापन करून निरनिराळ्या विषयांवर चर्चा घडवून आणण्याचे कार्य ग्रंथालयांच्या कार्यक्षेत्रात पडते. आणि त्या दृष्टीने अभ्यास-मंडळे निरनिराळ्या विभागांत स्थापन करून लोकशिक्षणाचे कार्य करणे अत्यंत जरुरीचे आहे असे मला वाटते. आज ठिकठिकाणी कम्युनिटी प्रॉजेक्ट्सचे कार्यक्रम सुरू आहेत. ह्या योजना यशस्वी करण्याकरिता जरूर असलेले सामाजिक सहकार्य मिळविण्याच्या कामी ग्रंथालयांनी सुरू केलेली अभ्यास-मंडळे फार महत्त्वाचे कार्य करू शकतील यात शंका नाही. विशेषतः ग्रंथालय-चळवळीने मोठमोठ्या शहरांपलीकडे आपला दृष्टिकोन नेऊन ग्रामीण ग्रंथालयांकडे अगत्यपूर्वक लक्ष दिले पाहिजे.

ग्रंथालयांचे कार्य हे पक्षाभिनिविष्ट नसून सर्वस्वी अपक्ष स्वरूपाचे आहे. ग्रंथपाल जेव्हा सामाजिक शिक्षक वा लोकशिक्षक या नात्याने ग्रंथालयाचा फायदा घेणाऱ्या सर्व नागरिकांशी सहकार्य करतो तेव्हा तो कोठल्याही पक्षाचा किंवा मताचा नसून सर्व पक्षांची योग्य ती माहिती करून देण्याचे व सर्व विचारांचे ग्रहण करण्यास समर्थ असणारे नागरिक निर्माण करावेत अशा प्रकारचे शिक्षणकार्य करीत असतो. त्याचप्रमाणे ग्रंथालयांतर्फे जी अभ्यास-मंडळे उघडण्यात येतात ती अभ्यास-मंडळेही अपक्ष भूमिकेवरून चालविली पाहिजेत. ग्रंथालये व त्यांची अभ्यास-मंडळे ह्यांबद्दल एका अभ्यासकाने असे अर्थपूर्ण उद्‌गार काढले आहेत की:

"Our libraries serve the precious Liberties of the nation, freedom of enquiry, freedom of the spoken

as well as the written word, freedom of exchange of ideas."

सर्व विषयांचा सांगोपांग अभ्यास करून सर्व विषयांवर निर्भयपणे व निस्पृहपणे चर्चा करण्याच्या प्रवृत्तीला उत्तेजन देण्याचे महत्त्वाचे कार्य ग्रंथपालाला करावयाचे असते. ते कार्य जितक्या यशस्वी रीतीने ग्रंथपाल करू शकतील तितक्या लौकर आज महाराष्ट्रात सुरू असलेले सामाजिक व आर्थिक क्रांतीचे कार्य यशस्वी होईल हे सांगावयास नकोच. म्हणून आजच्या आपल्या अधिवेशनाने या विषयाचा विचार करून योग्य ते मार्गदर्शन करावे अशी माझी सूचना आहे.

आजच्या आपल्या अधिवेशनात आणखी एक कार्य हाती घेणे जरूर आहे. ग्रंथालयांची एक इंडियन लायब्ररी असोसिएशन या नावाची अखिल भारतीय संघटना आहे. या संस्थेतर्फे गेल्या वर्षाच्या एप्रिल महिन्यामध्ये अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेचे बारावे अधिवेशन कलकत्ता येथे भरविण्यात आले होते; पण या संस्थेचे कार्य जितक्या जोरदारपणे चालावयास पाहिजे तितक्या जोरदार रीतीने चालत असल्याचे दिसून येत नाही म्हणून ह्या संस्थेच्या घटनेत इष्ट व जरूर ते फेरफार करून ती संस्था जास्त जोरदार कशी बनेल व त्या संस्थेमार्फत ग्रंथालयांचे जाळे सर्व देशभर पसरविण्यात कशी मदत होईल या दृष्टीने योग्य ते प्रयत्न करण्याच्या कामी या अधिवेशनाने मार्गदर्शन करावे, व त्याबद्दल एक उपसमिती नेमून योजना करावी असे मला वाटते. सामान्य नागरिकाच्या दृष्टीने पुढील पाच वर्षांमध्ये होणाऱ्या भारतातील सामाजिक व आर्थिक क्रांतीला साहाय्यभूत होण्याकरिता ग्रंथालयांना फार महत्त्वाचे कार्य करावयाचे असल्यामुळे त्या दृष्टीने विचार करून आपला पुढील वर्षाचा कार्यक्रम आपण आखावा व अशाच तऱ्हेचा कार्यक्रम अखिल भारतीय चळवळीपुढे ठेवण्याकरिता काय करणे जरूर आहे याचाही आपण विचार करावा असे मला वाटते.

महाराष्ट्रीय ग्रंथालय-चळवळीचे ध्येय

नव-महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतर अखिल महाराष्ट्रीय जनतेला अनेक शतकांच्या अपेक्षा व आकांक्षा पूर्ण झाल्याचे समाधान मिळाले यात शंका नाही; पण महाराष्ट्र-निर्मिती हे ध्येय किंवा साध्य नसून ते एक साधन आहे ही गोष्ट आपण विसरता कामा नये. अखिल भारतात स्वातंत्र्योत्तर युगामध्ये लोककल्याणाचे ध्येय साधण्याकरता एकभाषिक प्रांत म्हणून संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावा अशी महाराष्ट्र जनतेची मागणी होती. ती मागणी पूर्ण झाल्यानंतर सामाजिक व आर्थिक क्रांतीचा कार्यक्रम लोकशाहीच्या मार्गाने व विवेकवादाचा प्रसार करून यशस्वी करण्याची जबाबदारी सर्व महाराष्ट्रीय जनतेवर पडली आहे. आणि साहजिकच भारतातील सर्व प्रांतांमध्ये आपण सामाजिक व आर्थिक क्रांती यशस्वी करून पहिल्या प्रतीचे

स्थान मिळवावे अशा तऱ्हेची महत्त्वाकांक्षा सर्व महाराष्ट्रीय लोकांच्या मनात आज निर्माण झालेली आहे. ही महत्त्वाकांक्षा जर सार्थ करावयाची असेल तर सर्व महाराष्ट्रीय जनतेमध्ये बंधुभावाची भावना निर्माण करून सामाजिक समतेचे वातावरण व व्यवहार सुरू होणे अत्यंत जरूर आहे. आर्थिक समता प्रस्थापित करण्याकरिता व सर्व समाजाला आर्थिक बाबतीत समान संधी निर्माण करण्याकरिता जे जे प्रयत्न महाराष्ट्र शासन करील त्या सर्व प्रयत्नांना साथ देण्याकरिता महाराष्ट्रीय जनतेला उद्युक्त करणे आज सर्व समाजसेवकांचे कर्तव्य होऊन बसले आहे. म्हणून उत्साहाचे वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने सर्व महाराष्ट्रीय जनतेने हार्दिक एकात्मतेची भावना निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे व त्या दृष्टीने लोक-शिक्षणाचे व समाजशिक्षणाचे काम करण्याची संधी महाराष्ट्रीय ग्रंथालयांना मिळेल.

"मानसा कधीं व्हशील मानूस"

ही बहिणाबाईने दिलेली आर्त हाक आपण ऐकली पाहिजे व त्या हाकेला उत्तर देऊन सर्व महाराष्ट्रीय जनतेला माणुसकीच्या हक्कांचे ज्ञान करून देऊन माणुसकीचे सर्व अधिकार मिळवून देणे जरूर आहे. या वर्षाच्या जानेवारीच्या २६ तारखेला दिल्ली येथे झालेल्या महोत्सवामध्ये महाराष्ट्राच्या शासनातर्फे महाराष्ट्रीय संस्कृतीचे व कलेचे प्रदर्शक म्हणून जो देखावा ठेवण्यात आला होता त्यामध्ये नंदादीपाला महत्त्वाचे स्थान दिलेले होते. बंधुभाव, उत्साह व उत्कर्ष यांनी नितांत समाधान पावलेल्या महाराष्ट्राच्या मोठ्या शहरातून व खेड्यापाड्यातून नंदादीप तेवत असतो असे हृद्य व मार्मिक चित्र त्या देखाव्यात व्यक्त केले होते. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात प्रेमाचे, सौहार्दाचे व समतेचे वातावरण निर्माण करून महाराष्ट्राला उत्कर्षाच्या दिव्य मंदिराकडे नेण्याकरिता जरूर असणारे सहकार्य सर्व महाराष्ट्रीय जनता अंतःकरणपूर्वक देईल अशी परिस्थिती निर्माण करण्याच्या दृष्टीने ग्रंथालयांना फार महत्त्वाचे कार्य करता येईल. अशा ऐतिहासिक महत्त्वाच्या काळात आपली परिषद आज नागपूर येथे भरत आहे. तेव्हा आजच्या क्षणाचे महत्त्व लक्षात घेता व महाराष्ट्रापुढे उभे असलेले प्रश्न किती तातडीचे आहेत यांचा विचार करता आपल्या परिषदेने योग्य ते मार्गदर्शन महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालयांना व ग्रंथपालांना करावे अशी आपणाला माझी नम्र विनंती आहे. माधव ज्यूलियन यांच्या कवितेचा उल्लेख करून मी माझ्या भाषणाला सुरवात केली होती. त्यांच्याच स्फूर्तिदायक उद्‌गारांचा उल्लेख करून मी माझे भाषण पुरे करू इच्छितो.

मराठी असे आमची मायबोली
जरी भिन्न धर्मानुयायी असूं
पुरी बाणली बंधुता अंतरंगीं
हिच्या एक ताटांत आम्हीं बसूं

हे माधव ज्यूलियन यांचे दिव्य स्वप्न साकार करण्याकरता सर्व महाराष्ट्रीयांनी आज जागरूकतेने व निष्ठेने प्रयत्न करणे जरूर आहे. त्या प्रयत्नात ग्रंथालये व ग्रंथपाल यांचे स्थान साहजिकच फार उच्च असे आहे. त्या स्थानाला साजेल असे प्रयत्न महाराष्ट्रीय ग्रंथालयांनी व ग्रंथपालांनी करावेत अशी आशा व्यक्त करून मी माझे भाषण पुरे करतो.

३

काल, आज आणि उद्या

प्रास्ताविक :

आज आपण व्हीनस प्रकाशनचा रौप्य-महोत्सव साजरा करण्याकरिता उपस्थित झालो आहोत. अशा महत्त्वाच्या व मंगल समारंभाचे अध्यक्षस्थान मला दिल्याबद्दल कार्यकारी समिती व व्हीनस प्रकाशन या उभयतांना मी मनःपूर्वक धन्यवाद देतो. वास्तविक आजच्या समारंभाचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याची माझी पात्रता आहे असे मला वाटत नाही. व्हीनस प्रकाशनाला पुढील कार्य करण्यामध्ये उत्साह वाटेल अशा तऱ्हेचा आशीर्वाद देण्याची पात्रता असलेल्या व्यक्तीने आजचे अध्यक्षस्थान स्वीकारणे जरूर होते, पण व्हीनस प्रकाशनाचे श्रीयुत पाध्ये यांनी फार आग्रह केल्यावरून मी थोड्या नाखुषीनेच हा मान स्वीकारला आहे. आजच्या समारंभाचे मंगल वैशिष्ट्य असे आहे की, व्हीनस प्रकाशनने आपल्या 'तपश्चर्या' इमारतीचे उद्घाटन केले आहे. व्यक्तीचे किंवा संस्थेचे जीवन म्हणजे एक तपश्चर्या आहे. गेल्या २५ वर्षांत व्हीनस प्रकाशनने महनीय तपश्चर्या करून महाराष्ट्रीय सामाजिक जीवनात जे महत्त्वाचे कार्य केले आहे त्यावरून मला असा विश्वास वाटतो की, उद्याच्या महाराष्ट्राचे जे दिव्य स्वप्न सर्व महाराष्ट्रीय नागरिक मनात बाळगून आहेत ते स्वप्न साकार करण्याकरिता व्हीनस प्रकाशन प्रयत्न करील.

कर्तबगार व कार्यक्षम जीवनात, मग ते जीवन वैयक्तिक असो, सांस्थिक असो किंवा सामाजिक असो, कृतकृत्यतेच्या भावनेला फारसा अवकाश असतच नाही. कर्तबगार जीवन एकामागून एक कार्य करण्यास नेहमी अधीर असल्यामुळे कोठल्याही क्षणी केलेल्या कार्याचा हिशेब घेऊन करावयाच्या कार्याचा अंदाज घेणे त्या जीवनाला आवश्यक असते. आपण केलेले कार्य यशस्वी झाले आहे, आता आपणाला काहीच करावयाचे उरलेले नाही, अशा तऱ्हेची खोट्या कृतकृत्यतेची

भावना कर्तव्यगार जीवनाला कधीच शिवत नाही. "क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते" हे कालिदासाचे वचन कर्तव्यगार जीवनात पदोपदी प्रत्ययास येते. एक अंगीकृत केलेले कार्य संपले व त्या कार्याचे चीज झाले असे पाहून समाधानाचा क्षण अनुभवल्यानंतर लगेच कर्तव्यगार मनुष्य पुढील कार्याचा आराखडा घेऊ लागतो, आणि केलेल्या कार्याच्या यशस्वितेच्या जाणिवेमुळे त्याला जे सात्त्विक समाधान मिळालेले असते त्याच्या जोरावर ते कार्य करण्याकरिता पडलेले क्लेश पण विसरून जातो. जी गोष्ट व्यक्तीची तीच संस्थेची असे मला वाटते, आणि म्हणूनच आजच्या समारंभाला समाजातील भिन्नभिन्न थरातील व भिन्नभिन्न प्रवृत्तींचे प्रतिनिधी असलेले अनेक सुहृद् उपस्थित झालेले पाहून व्हीनस प्रकाशनाला आजपर्यंत त्याने केलेल्या कार्याबद्दल समाधान वाटणे साहजिक आहे, व आपल्या कार्याचे इतक्या उत्साहाने केलेले कौतुक पाहून पुढील कार्य करण्यास या संस्थेला हुप्पट उत्साह वाटेल यात संशय नाही. अशा प्रसंगी मनुष्य साहजिकच गतकाळाचे सिंहावलोकन करतो व पुढील काळाबद्दल विचार करू इच्छितो. त्या दृष्टीने एक सामान्य नागरिक ह्या नात्याने मी आज चार शब्द बोलणार आहे.

१५-८-१९४७ ते २०-१०-१९६२

१५ ऑगस्ट १९४७ रोजी हिंदुस्थान स्वतंत्र झाले व २० ऑक्टोबर १९६२ रोजी स्वतंत्र हिंदुस्थानच्या उत्तर दिशेचे संरक्षण करण्याची जबाबदारी ज्या हिमालयाने अनेक शतके पार पाडली त्या हिमालयावर चिनी आक्रमण झाले. मला असे वाटते की, हिंदुस्थानचा भावी इतिहासकार निःसंशय असे म्हणेल की, चिनी आक्रमणाने भारतातील स्वप्नाळूपणाचे पर्व संपून जागृतीचे पर्व सुरू झाले. स्वातंत्र्य-पूर्व कालात सामान्य जनता व पुढारी यांचा असा दृढ विश्वास होता की, परकीय राजसत्ता नष्ट झाली की देशाचे सर्व सामाजिक वा आर्थिक प्रश्न आपोआप सुटतील. स्वातंत्र्य मिळविलेल्या इतर राष्ट्रांच्या इतिहासावरून असे दिसते की, जेव्हा क्रांतिकारक तत्त्वज्ञान सर्वांगीण बनून क्रांतीला चालना देते तेव्हा राजकीय स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर सत्तारूढ पक्ष ताबडतोब निकडीने व उत्साहाने सामाजिक व आर्थिक क्रांतीच्या कार्यक्रमाला महत्त्व देतो. पण आपल्या देशात राजकीय क्रांतीबरोबर सामाजिक व आर्थिक क्रांतीचे महत्त्व इतकेसे रूढ वा मान्य नसल्यामुळे आपण सर्वांनी पाहिलेच आहे की स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुद्धा बरेचसे सामाजिक प्रश्न व अनेक आर्थिक प्रश्न आ पसरून समाजापुढे उभे आहेत. म्हणून मला असे वाटते की सामाजिक व आर्थिक प्रगतीचा रथ जो आज आस्ते आस्ते व अडखळत अडखळत पुढे चालला आहे त्याचे एक प्रमुख कारण असे आहे की स्वातंत्र्यपूर्व कालात प्रचलित असलेले क्रांतिकारक तत्त्वज्ञान असावे तितके सर्वांगीण व डोळस नव्हते.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाजामध्ये दुसरा एक दृढ विश्वास निर्माण झाला

की शासनसंस्था सर्व सामाजिक व आर्थिक प्रश्न केवळ शासनाच्या जोरावर पार पाडू शकेल. ज्याप्रमाणे स्वातंत्र्यपूर्व कालात पारतंत्र्य नष्ट झाल्याबरोबर सर्व सामाजिक व आर्थिक प्रश्न सुटतील असा भ्रांतिकारक विश्वास आपण मनाशी बाळगला त्याचप्रमाणे स्वातंत्र्ययुगामध्ये आपण असे समजू लागलो की समाजाचे व राष्ट्राचे सर्व प्रश्न—आर्थिक, सामाजिक व राजकीय—शासनसंस्था योग्य तऱ्हेने सोडवू शकेल व त्याबद्दल जनतेला तिचे म्हणून काही विशेष कर्तव्य करण्याची जरुरी नाही. आणि ह्या विश्वासाच्या जोरावरच निरनिराळे कायदे पास झाल्यानंतर, पंचवार्षिक योजना थोड्याथोड्या अंमलात येऊ लागल्याचे पाहून आपणा सर्वांना असा विश्वास वाटू लागला की आपण आता प्रगतीच्या मार्गावरून भराभर पुढे जात असून लौकरच आपले सर्व प्रश्न सुटतील, आणि ह्याच स्वप्नाळूपणामुळे आपली दृष्टी जितकी चिकित्सक असावी तितकी ती राहिली नाही व आपले कार्यक्रम जितके डोळस असावेत तितके ठरले नाहीत. पंचशीलचा जयजयकार करून आपल्या मनामध्ये आपण असा विश्वास निर्माण केला होता की, जसे राष्ट्राचे व्यवहार कायद्याने नियोजित होतात तसेच सर्व आंतरराष्ट्रीय व्यवहार स्नेहाच्या आणि सलोख्याच्या वृत्तीने, चर्चेच्या रूपाने सोडविण्याचा जणू सर्व जगाने निश्चय केला आहे. ह्या स्वपाळू वृत्तीवर चिनी आक्रमणाने मोठा जबरदस्त आघात केला व म्हणून मला असे वाटते की आपल्या इतिहासातील स्वातंत्र्योत्तर स्वप्नाळू पर्व सुरू झाले होते ते २०–१०–१९६२ रोजी संपले, व आता जागृतीचे पर्व सुरू झाले आहे. अशा प्रसंगी आपल्या मनामध्ये बद्धमूल झालेल्या अनेक निष्ठांचा व कल्पनांचा अत्यंत चिकित्सकपणे विचार करणे आवश्यक झाले आहे. इंग्रजीमध्ये ज्याला "Agonizing Reapraisal" म्हणतात असा क्लेशकारक पुनःसमीक्षेचा काल आज आला आहे. ह्या पुनःसमीक्षेमध्ये आपल्या जुन्या कल्पनांना धक्का बसून जरी आपणाला वलेश झाले तरी समीक्षा करणे आवश्यक झाले आहे.

संग्राम जीवन-निष्ठांचा : केवळ रणगाड्यांचा-विमानांचा नाही

चिनी आक्रमणामुळे आपल्या समाजापुढे जो प्रश्न निर्माण केला आहे तो केवळ रणांगणावर होणाऱ्या युद्धाचा नाही. आज रणगाड्यांचा गडगडाट स्तब्ध झाला असून, सैन्याच्या हालचालीही थांबल्या आहेत. कदाचित हे स्तब्धतेचे वातावरण बराच वेळ टिकेल, कदाचित न टिकेल; पण चिनी आक्रमणाने एक गोष्ट आपणा सर्वांना कळून चुकली आहे की, हे आक्रमण केवळ क्षात्र स्वरूपाचे नाही. ह्या आक्रमणामुळे जीवननिष्ठांचा संग्राम सुरू झाला आहे. आपण ही गोष्ट कधीही विसरता कामा नये की रणगाडे स्वतःच गोळे मारीत नाहीत. रणगाडे चालविण्याकरिता सैनिक लागतात, आणि सैनिकांचे हातच रणगाडे चालवितात असे नव्हे तर त्या हातांना उत्साह व स्फूर्ती देण्याकरिता त्यांच्या मनामध्ये ज्या जीवन-निष्ठांवर

आपल्या देशाचा विश्वास आहे त्या निष्ठांबद्दल अगत्य व आस्था वाटणे जरूर आहे. आधुनिक युद्ध हे केवळ रणांगणावर घडत नाही. आधुनिक युद्ध सबंध राष्ट्रभर पसरते आणि म्हणूनच लोकशिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन सर्व समाजामध्ये लोकशाहीवर निष्ठा निर्माण करणे अत्यंत जरूर झाले आहे. लढाई सुरू असतानासुद्धा आर्थिक विकासाचा कार्यक्रम आपण चालूच ठेविला पाहिजे, व सामान्य जनतेमध्ये सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करण्याचे ध्येय लोकशाही पार पाडीत आहे असा विश्वास निर्माण झाला पाहिजे. कम्युनिझमचा सर्व जगातील इतिहास पाहाता एक गोष्ट स्पष्ट दिसते की, कम्युनिझमचा प्रचार केवळ रणगाड्यांच्या जोरावर कम्युनिझम कधीही करीत नाही. रणगाड्यांच्या सहाय्याला कम्युनिझमचे तत्त्वज्ञान फार मोठी मदत करीत असते. "Ideas have legs and they travel very fast" हे तत्त्व आधुनिक युगात फार महत्त्वाचे आहे. क्रांतिकारक कल्पना फार द्रुतगतीने माणसांची मने जिंकतात हे आपण विसरता कामा नये. आणि म्हणूनच सामाजिक व आर्थिक समता लोकशाहीच्या मार्गाने प्रस्थापित करणे शक्य असते व ती भारतातील लोकशाही लौकरच प्रस्थापित करील व करीत आहे ही गोष्ट सामान्य जनतेला पटवून देणे अत्यंत जरूर आहे. ह्या दृष्टीने विचार करता आज प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य काय आहे हे उघड होईल. म्हणून चिनी आक्रमणाने सुरू झालेल्या संग्रामयुगामध्ये ज्या सामाजिक, राजकीय वा आर्थिक निष्ठा आपल्या लोकशाहीने आधारभूत मानल्या आहेत त्या निष्ठांचा मोठ्या हिरीरीने प्रचार करणे आज जरूर आहे. संग्राम रणगाड्यांचा नाही, निष्ठांचा आहे, हे तत्त्व आपण कधीही विसरू नये.

लोककल्याण हे ध्येय व लोकशाही हे साधन :

तसे पाहिले तर अणुबॉम्ब निर्माण झाल्यानंतर आज सर्व मानवजात भीतीने ग्रस्त झालेली आहे, आणि ह्या भीतीचे मुख्य कारण म्हणजे अण्वस्त्रांचा फार मोठा संचय करणाऱ्या दोन प्रबळ राष्ट्रांमध्ये मोठ्या कडव्या स्वरूपाच्या निष्ठांचा संग्राम सुरू झालेला आहे. मानवी इतिहासाच्या अशा क्रांतीच्या उंबरठ्यावर असलेल्या युगामध्ये लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्या भारतासारख्या राष्ट्राने लोककल्याण साधण्याचे आपले ध्येय लोकशाहीच्या साधनाने शक्य तितक्या द्रुतगतीने साध्य करून घेणे जरूर आहे. लोकशाहीला लोककल्याणाचे साध्य मिळविताना काही तत्त्वांचा विचार करणे अवश्य असते. लोकशाहीला आपल्या धोरणांचा प्रचार करण्याकरिता ज्या शस्त्राचा फार उपयोग होतो ते शस्त्र म्हणजे पुरोगामी विवेकवाद अगर बुद्धिवाद हे होय. पुरोगामी बुद्धिवाद व्यक्तिस्वातंत्र्याला फार महत्त्व देतो. "Man is born free but is everywhere in chains" हे रूसोचे वाक्य पुरोगामी बुद्धिवादाला पटते आणि म्हणूनच

लोकशाहीचे फार महत्त्वाचे वैशिष्ट्य जे पुरोगामी बुद्धिवादाला आदरणीय वाटते ते म्हणजे लोकशाहीमध्ये व्यक्तिस्वातंत्र्याला पूर्ण महत्त्व असते. व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाचा दुसरा एक भाग म्हणजे भिन्न तत्त्वप्रणालींबद्दल सहिष्णुता हा आहे. आणि पुरोगामी बुद्धिवाद कोठल्याही सामाजिक वा आर्थिक प्रश्नांचा विचार करताना भिन्न तत्त्वांबद्दल कधीही असहिष्णू वृत्ती स्वीकारीत नाही. व्यक्तिस्वातंत्र्याचे महत्त्व पटल्यामुळे विवेकवाद व्यक्तिपूजा सर्वस्वी वर्ज्य मानतो. कोठलेही मत ग्राह्य आहे किंवा नाही हे ठरविताना ह्या तत्त्वाचा पुरस्कर्ता कोण आहे याचा विवेकवाद कधीच विचार करीत नाही. ज्या मानाने समाजामध्ये व्यक्तिपूजेचे स्तोम वाढते त्या मानाने लोकशाही पंगू होते असे विवेकवाद समजतो. आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रचार करताना विवेकवाद तर्काचा आधार घेत असतो. तर्कशुद्ध विचार समाजाला पटवून क्रांतीच्या कार्यक्रमात समाजाचे सहकार्य मिळविणे हाच बुद्धिवादाचा उद्देश असतो. ही गोष्ट खरी आहे की बर्ट्रान्ड रसेलने म्हटल्याप्रमाणे "Reason is not the cause of action but only the regulator"—केवळ तर्काने क्रांतिकारक कार्य होत नाही. क्रांतिकारक कार्याची प्रेरणा निष्ठा, श्रद्धा किंवा विश्वास ह्यांनीच मिळत असते; पण निष्ठा किंवा प्रेरणा ह्यांचे मार्गदर्शन करण्याकरिता तर्काची अत्यंत जरुरी असते. आणि म्हणून लोकशाहीने आद्य महत्त्वाच्या अशा मानलेल्या क्रांतिकारक तत्त्वांचा प्रचार करताना त्या तत्त्वांबद्दल निष्ठा निर्माण करणे पहिले कर्तव्य आहे. हे लक्षात घेऊन पुरोगामी बुद्धिवाद तर्कशुद्ध पायावर लोकशिक्षण करीत असतो. केवळ कायद्याने क्रांती घडून येणे शक्य नसते. कायद्याचे हात बळकट करण्याकरिता जनतेच्या हार्दिक सहकार्याची फार आवश्यकता असते. आणि हे लक्षात ठेवूनच पुरोगामी बुद्धिवाद लोकशिक्षणाला फार महत्त्व देतो. या दृष्टीने विचार करता लोकशाहीला आपले ध्येय साधण्याकरिता पुरोगामी बुद्धिवादाचे किती सहाय्य होते हे सहज दिसून येईल.

भिन्न तत्त्वांच्या समन्वयाची आवश्यकता—सत्यासत्यविवेक

लोकशाहीमध्ये ज्या तत्त्वांचा प्रचार करणे आवश्यक असते त्या तत्त्वांना "philosophic absolutes" किंवा "dogmas" असे स्वरूप केव्हाही येऊ शकत नाही. तत्त्वातत्त्वांचा झगडा सुरू झाला म्हणजे एक तत्त्व सर्वस्वी चूक व दुसरे तत्त्व सर्वस्वी बरोबर अशी स्थिती फार क्वचित असते. झगडा कधी कधी "good" व "better"—चांगले किंवा जास्त चांगले—ह्यामध्ये होत असतो. आणि अशा वेळेस विवेकवादाला सत्यासत्यविवेक करणे आवश्यक होते. व्यक्तिस्वातंत्र्याची गोष्ट आपण घेऊ या. व्यक्तिस्वातंत्र्य म्हटले की त्याच्या पोटी करारस्वातंत्र्यही येते. आता आपण असा विचार करू या की व्यक्तीला समाजाचा घटक म्हणून आपले जीवन जगत असताना अनिर्बंध स्वातंत्र्य अनुभविता येणे शक्य

असते काय ? याचे उत्तर 'शक्यच नाही,' असे द्यावे लागेल. जेथे जेथे व जेव्हा जेव्हा व्यक्तीच्या कोठल्याही कृत्याचा दुसऱ्या व्यक्तीशी संबंध येतो तेथे तेथे व तेव्हा तेव्हा समाजहिताच्या दृष्टीने त्या कार्यावर काही निर्बंध घालणे आवश्यक ठरते. तसेच करारस्वातंत्र्याबद्दलही खरे आहे. म्हणून व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाचा प्रचार करताना कोठल्याही व्यक्तीच्या आचारावर व कार्यावर कोठलेच बंधन घालणे इष्ट नाही ही गोष्ट विवेकवादाला मान्य धरणे शक्य असत नाही. इंग्लंडमध्ये गेल्या शतकात जेव्हा कारखान्यांमध्ये लहान मुलांना नोकरीला ठेवू नये असे बिल पार्लमेंटमध्ये आणले तेव्हा जॉन ब्राइटने ह्या बिलामुळे व्यक्तिस्वातंत्र्यावर फार मोठा आघात होत आहे असा आक्रोश केला. त्याच्या मते लहान मुलाला नोकरीला ठेवावे किंवा नाही ही गोष्ट ठरविण्याचा अधिकार कारखानदाराला व त्या मुलाच्या पालकालाच केवळ आहे. समाजाने त्या हक्कामध्ये ढवळाढवळ करणे व्यक्तिस्वातंत्र्याशी विसंगत होते. अर्थात जॉन ब्राइटच्या निषेधाची पर्वा न करता कायदा पास झाला व विशिष्ट वयोमर्यादेखालील अर्भकांना कोणाही कारखानदाराने कारखान्यात नेमता कामा नये असे बंधन घालण्यात आले. व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाचा सारासार विचार न करता जॉन ब्राइटने जी भूमिका स्वीकारली ती आज कोणीही मान्य करणार नाही.

आपल्या देशात सध्या उद्योगविषयक जे अनेक कायदे पास झाले आहेत त्यांचाही तोच प्रकार आहे. उदाहरणार्थ, 'मिनिमम वेजेस ॲक्ट' असे सांगतो की, त्या कायद्याच्या कक्षेत आलेल्या कारखान्यांच्या मालकांनी नोकराला कायद्याने ठरविलेले किमान वेतन दिलेच पाहिजे. हा कायदा पास झाल्यानंतर कारखानदारांनी तक्रार केली यात विशेष आश्चर्य नाही, पण व्यक्तिस्वातंत्र्यावर निष्ठा बाळगणाऱ्या काही विचारवंतांनी सुद्धा अशी तक्रार केली की ह्या कायद्याने प्रस्थापित केलेले तत्त्व व्यक्तिस्वातंत्र्याशी विसंगत आहे. अशा संदर्भात विवेकवादाला सर्व सापेक्ष गोष्टींचा विचार करणे जरूर असते. ज्या देशामध्ये बेकारी फारच मोठ्या प्रमाणावर अस्तिवात आहे, त्या देशात कारखानदाराला अगदी थोड्या वेतनावर नोकर मिळणे सहज शक्य असते, व जर मागणी व पुरवठा ह्या तत्त्वांचा अनिर्बंधपणे अवलंब केला तर पोट भरण्याससुद्धा पुरेसे नसलेले वेतन घेऊन काम करण्याची तयारी दाखविणारे कामगार अनेक मिळू शकतील. पण लोकशाही असा प्रकार होऊ देत नाही. लोकशाहीच्या दृष्टीने "Social Justice" म्हणजे सामाजिक न्याय हे एक महनीय असे तत्त्व आहे. सामाजिक न्याय या क्रांतिकारक तत्त्वाचा आधार मिळाल्यामुळेच लोकशाहीला सामान्य जनतेच्या दृष्टीने एक विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. म्हणून 'मिनिमम वेजेस ॲक्ट'सारखा कायदा करताना व्यक्तिस्वातंत्र्य व सामाजिक न्याय ह्यांच्यामध्ये सामाजिक न्यायाला लोकशाही महत्त्व देते.

मुद्रणस्वातंत्र्याचा प्रश्नही अशाच दृष्टीने विचार करण्यासारखा आहे. भाषण-स्वातंत्र्य व मुद्रणस्वातंत्र्य या दोन स्वातंत्र्यांना लोकशाहीमध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कोठल्याही विचारवंत नागरिकाला आपले विचार—मग ते कितीही क्रांतिकारक वा अप्रिय असोत—व्यक्त करण्याचे व छापण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे हे तत्त्व कोणीही मान्य करील; पण आधुनिक काळात अनेक देशांत वृत्तसंस्था ह्या धनाढ्य लोकांच्या हातात गेल्याचे दिसून येते, व वृत्तसंस्थांचे मुद्रणस्वातंत्र्य याचा अर्थ त्या मानाने बदलतो. कधी कधी मोठ्या वृत्तसंस्थांना कारखान्याचे स्वरूप येते व मत-स्वातंत्र्य म्हणजे वृत्तसंस्थांमध्ये काम करणाऱ्या लोकांचे मत-स्वातंत्र्य असा अर्थ नेहमीच निघतो असे नाही. आणि मग अशी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर बलाढ्य वृत्तसंस्थांच्या मक्तेदारीवर निर्बंध घालणे अवश्य आहे काय असा प्रश्न लोकशाहीसमोर उभा राहतो. तात्पर्य, कोठलेही मत निरपवादपणे स्वीकारणे विवेकवादाला सुलभ वाटत नाही.

धार्मिक स्वातंत्र्य हेही अशाच तऱ्हेचे तत्त्व आहे. आपल्या घटनेने प्रत्येक नागरिकाला धार्मिक स्वातंत्र्य दिलेले आहे. पण धार्मिक स्वातंत्र्याचा अर्थ काय हा प्रश्न उत्पन्न झाला म्हणजे अनेक सापेक्ष गोष्टींचा निर्णय करणे जरूर ठरते. आपल्या देशामध्ये—विशेषतः हिंदू समाजात—धर्म आणि समाजकारण ह्यांचे इतके संमिश्रण झाले आहे की केवळ लौकिक किंवा सामाजिक व्यवहार व धार्मिक व्यवहार ह्यांचे पृथक्करण करणे सोपे असतच नाही. आणि त्यामुळे, धार्मिक स्वातंत्र्यावर हल्ला कायद्याने होत आहे, अशी तक्रार झाल्यानंतर सारासार विचार करून धार्मिक आचरण व व्यवहार म्हणजे काय व धर्माशी निगडित असलेले सामाजिक व लौकिक व्यवहार म्हणजे काय यांचाही विचार करणे आवश्यक होते. जी गोष्ट व्यक्तिस्वातंत्र्याची, मुद्रणस्वातंत्र्याची, भाषणस्वातंत्र्याची तीच गोष्ट धार्मिक स्वातंत्र्याची आहे. लोकशाहीला सामाजिक न्याय करण्याकरिता अनेक वेळी निरनिराळ्या प्रतिस्पर्धी किंवा विसंवादी तत्त्वांचा समन्वय करणे आवश्यक असते आणि म्हणून लोकशाही केव्हाही कोठल्याही मतावर "शंभर टक्के खरे" असा विश्वास अंधपणे टाकू इच्छीत नाही. सत्यासत्यविवेक हे बुद्धिवादाचे वैशिष्ट्य आहे व बुद्धिवाद हे लोकशाहीचे प्रबळ अस्त्र आहे हे आपण विसरता उपयोगी नाही.

सामाजिक मूल्ये किंवा निष्ठामूल्ये

ह्या संदर्भात ज्या सामाजिक मूल्यांवर व निष्ठांवर आपण संपूर्ण विश्वास ठेवीत आलो त्यांच्या सत्यासत्यतेबद्दल थोडी चर्चा करणे अप्रासंगिक होणार नाही. 'अहिंसा परमो धर्मः' या तत्त्वाचा उच्चार आपल्या देशात अनेक व्यास-पीठांवरून अगणित वेळा करण्यात आलेला आहे. अहिंसेचे तत्त्व निरपवादपणे स्वीकारणे विवेकवादाला शक्य आहे काय, याचा आपण विचार करावा.

समाजाची प्रगती ज्या दृष्टीने होणे इष्ट आहे त्या दृष्टीने झाली म्हणजे व्यक्ती-व्यक्तींच्या व्यवहारात, व्यक्ती व राष्ट्र यांच्या व्यवहारात, व राष्ट्रा-राष्ट्रांच्या आंतर्राष्ट्रीय व्यवहारात हिंसेला स्थान राहाणार नाही व राहू नये याबद्दल दुमत होणे शक्य नाही. पण हिंसा कोठल्याही परिस्थितीत केली की पाप होते ही भावना तर्कशुद्ध आहे काय? इंडियन पीनल कोडाप्रमाणे स्वसंरक्षणाकरिता हिंसेचा अधिकार प्रत्येक नागरिकाला देण्यात आलेला आहे. जर एखाद्या नागरिकावर डाकूने हल्ला केला व स्वतःचे रक्षण करण्याकरिता किंवा स्वतःच्या वित्ताचे अगर स्त्रीच्या चारित्र्याचे संरक्षण करण्याकरिता त्या नागरिकाने डाकूवर प्रतिहल्ला करून वाटल्यास त्याला ठार केले तर त्याने आपले कर्तव्य केले असे आपण मानणार का कर्तव्य करताना त्याचे हातून अधर्म घडला असे आपण समजणार? अहिंसेचे तत्त्व अत्यंत उदात्त आहे व अहिंसेचे विश्वभर साम्राज्य पसरावे ही भावना तितकीच उदात्त आहे हे मान्य करूनसुद्धा कोठल्याही परिस्थितीत हिंसा करणे पाप होईल ही गोष्ट विवेकवादाला पटत नाही.

गुरुं वा बालवृद्धौ वा ब्राह्मणं वा बहुश्रुतम्।
आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन्॥

हे मनूचे विधान तर्कदुष्ट आहे असे विवेकवाद म्हणू शकणार नाही. व्यक्ती-व्यक्तींच्या संघर्षातसुद्धा असे प्रसंग दुर्दैवाने निर्माण होऊ शकतील की ज्यावेळेस हिंसा हे कर्तव्य ठरेल व अहिंसा हे भित्रेपणाचे लक्षण मानले जाईल. स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या समाजाने अहिंसेच्या तत्त्वावर इतकी गाढ श्रद्धा ठेवली की, आपल्या मनामध्ये एक प्रकारचा व्यामोह निर्माण झाला की आंतरराष्ट्रीय व्यवहारातसुद्धा अहिंसेचे राज्य सुरू झाले आहे. अहिंसा व हिंसा यांच्या युक्तायुक्ततेचा विचार करताना धर्म्य आणि अधर्म्य असा भेद न करता समाजरक्षणाला आवश्यक किंवा अनावश्यक असा विचार करणे जरूर आहे. ही चर्चा करताना साहजिकच विवेकवाद असे केव्हाही म्हणणार नाही की माणसाने पदोपदी हिंसा करावी. हिंसा करणे हे सुसंस्कृत मनुष्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीशी असंबद्ध आहे व अनिष्टही आहे हे मान्य करूनसुद्धा अपवाद म्हणून हिंसा करणे कधीकधी आवश्यक होईल हीच गोष्ट विवेकवाद सांगू इच्छीत असतो. जी गोष्ट व्यक्तीव्यक्तींच्या संघर्षाबद्दल खरी आहे तीच गोष्ट राष्ट्रा-राष्ट्रांतील संघर्षाबद्दल जास्त खरी आहे. चिनी आक्रमणाने आपणा सर्वांना जो दारुण धक्का दिलेला आहे त्यावरून आपल्या समाजाला आता कळून चुकले आहे की "अहिंसा परमो धर्मः" ह्या तत्त्वाचा उच्चार करून राष्ट्राचे संरक्षण होऊ शकणार नाही. जोपर्यंत मानवी समाज अहिंसेला आवश्यक असलेल्या सुसंस्कृत स्थितीपर्यंत जाऊन पोहोचला नाही व जोपर्यंत

राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये संघर्ष होण्याची भीती आपणा सर्वांना स्पष्ट दिसत आहे तोपर्यंत क्षात्रधर्माचा अवलंब करणे अत्यंत जरूर आहे हे आता निर्विवादपणे शाबीत झाले आहे. आणि क्षात्रवृत्ती ही अधर्म्य आहे ही कल्पना सर्वस्वी त्याज्य आहे हेही आता कोणी नाकबूल करणार नाही. आज जरुरी कशाची असेल तर क्षात्रधर्म व क्षात्रवृत्ती सर्व समाजात निर्माण करण्याची आहे असे मला वाटते. व्यक्ति-स्वातंत्र्याबद्दल जे मी म्हणालो तेच अहिंसाधर्माबद्दलही खरे आहे. "There are no philosophical absolutes." शंभर टक्के निरपवाद परिस्थितीत कोठलेही तत्त्व अबाधित असते हे मान्य करण्यास विवेकवाद सहसा तयार होत नाही.

'सत्यमेव जयते' हे तर आपल्या राष्ट्राने ब्रीदवाक्य स्वीकारले आहे, आणि सत्याचा महिमा शब्दाने वर्णन करणे जरूर आहे असे मला वाटत नाही. पण सत्य व असत्य ह्यांच्यात धर्म्य आणि अधर्म्य अशा स्वरूपात चर्चा करतानासुद्धा सारासार विचार करणे अवश्य आहे. कोठल्याही नागरिकाला कधी कधी अशा परिस्थितीशी तोंड द्यावे लागते की वाचिक सत्यही अनिष्ट ठरू शकेल. नेहमीचेच उदाहरण द्यावयाचे झाल्यास एखाद्या असहाय स्त्रीचा एखादा नरपशू पाठलाग करीत असताना त्याच्या हातून ती स्त्री सुटून पळता पळता जर एखाद्या ठिकाणी लपली व त्यानंतर तिचा शोध करीत करीत तो नरपशू त्या ठिकाणी आला व त्याने विचारले की ती स्त्री कोठे आहे, तर तेथे हजर असलेल्या नागरिकाचे कर्तव्य काय आहे? सत्य बोलून ती स्त्री कोठे गेली आहे हे त्याने सांगावे, की 'मला माहीत नाही' असे असत्य बोलून त्या स्त्रीचे संरक्षण करावे? अहिंसेप्रमाणेच सत्याचे महत्त्व मान्य करूनसुद्धा वाचिक सत्याला 'डॉग्मा'चे स्वरूप देणे अनिष्ट आहे असे मला वाटते. आंतर्राष्ट्रीय व्यवहार करताना तर वाचिक सत्य सोडून समाजहिताकरिता किंवा राष्ट्राच्या कल्याणाकरिता पारमार्थिक सत्याचा मार्ग स्वीकारणे कधी कधी आवश्यक होते. म्हणून सत्य आणि असत्य यांचे द्वंद्व सुरू झाले असता निरपवादपणे असत्य म्हणजे अधर्म्य असे मानणे तितकेसे सयुक्तिक होईल असे मला वाटत नाही. या दृष्टीने—

सत्यस्य वचनं श्रेयः सत्यादपि हितं वदेत्।
यद्भूतहितमत्यंतं एतत्सत्यं मतं मम ॥

या शांतिपर्वातील वचनात बराच अर्थ आहे असे मला वाटते. अहिंसा व सत्य ह्या दोन सर्वमान्य असलेल्या तत्त्वांचा उल्लेख करण्यामध्ये माझा हेतू एवढाच आहे की, विवेकवाद लोकशाहीच्या प्रचाराकरिता जेव्हा लोकशिक्षण करू लागतो तेव्हा विवेकवादाला सर्व तत्त्वांचा सारासारविचार करून प्रचार करणे आवश्यक असते. कोठल्याही तत्त्वावर निरपवादपणे अंधश्रद्धा ठेवून त्या तत्त्वाला 'डॉग्मा'चे स्वरूप येऊ न देणे बुद्धिवादाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

ह्या संदर्भात आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणे अप्रासंगिक होणार नाही. चीनच्या आक्रमणाने आपल्या स्वातंत्र्यावर जेव्हा प्रखर हल्ला झाला व अनपेक्षित अशा आक्रमणाचा जो एक अपरिहार्य परिणाम असतो तो दिसून आला, व रणक्षेत्रावर आपला पराभव होऊ लागला, तेव्हा आपण 'यतो धर्मस्ततो जयः' असा विश्वास ठेवून आपला शेवटी जय होईलच असे समजू लागलो. रणसंग्राम सुरू झाल्यानंतर ज्या ध्येयाकरिता आपण लढत आहोत त्या ध्येयावर नितांत श्रद्धा असणे अवश्य असते, कारण अशा श्रद्धेच्या जोरावरच सैनिक हिरीरीने लढतात व सामान्य जनता संग्रामात सर्व प्रकारे सहाय्य करण्यास तयार होते. पण आपली बाजू धर्माची आहे, न्यायाची आहे, म्हणूनच आपण यशस्वी होऊ हा विश्वास मात्र अतार्किक व भ्रांतिकारक आहे. नेपोलियन ह्या विषयावर नेहमी म्हणत असे की, "Providence is on the side of big battalions." परमेश्वर हा बलाढ्य शक्तीचा पुरस्कर्ता असतो. ह्या जगात असमर्थ किंवा अशक्त असणे हा अक्षम्य गुन्हा आहे. हे तत्त्व व्यक्तीइतकेच राष्ट्रालाही लागू आहे. संग्राम सुरू झाल्यावर अशक्त व असमर्थ माणसाने अगर राष्ट्राने नुसता धर्माचा जप करून यश मिळविण्याची अपेक्षा करणे खुळेपणाचे आहे. म्हणूनच 'अहिंसा', 'सत्य' किंवा आपल्या ध्येयाचे नैतिक महत्त्व या सर्व गोष्टींचा विचार करताना विवेकवादाला तारतम्याचे पथ्य सांभाळणे फार आवश्यक असते.

लोककल्याणाचे ध्येय व जनतेच्या सहकार्याचे महत्त्व

स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या समाजामध्ये काही अपसमजुती प्रचलित झाल्या आहेत त्यांचा उल्लेख करणे अप्रासंगिक होणार नाही. गेल्या सतरा वर्षांच्या घटनांचे अवलोकन केले असता आपल्याला असे दिसून येईल की आपल्या समाजामध्ये राजकारण व राजकीय व्यक्ती यांचे अवास्तव स्तोम माजविण्याची परंपरा सुरू झालेली आहे. लोकशाहीमध्ये शासनसंस्था लोककल्याणाचा कार्यक्रम पार पाडण्याकरिता खटपट करीत असते ही गोष्ट निर्विवाद आहे आणि त्यामुळे शासनसंस्थेवर सामाजिक व आर्थिक क्रांती यशस्वी करण्याकरिता अनेक मार्गांचा अवलंब करण्याची जबाबदारी येत असते. याचा एक परिणाम साहजिकच असा होतो की सर्व सामाजिक व आर्थिक व्यवहारांवर शासनसंस्थेचे प्राबल्य दिसून येते. असे असूनसुद्धा केवळ राजकारण किंवा राजकारणी व्यक्ती यांना अवास्तव महत्त्व देण्याची प्रवृत्ती समाजाला पंगू बनविते असे मला वाटते. उदाहरणार्थ, आपण पाहातो की कोठलेही संमेलन वा सभा असो, त्या सभेचे अगर संमेलनाचे उद्घाटन करण्याकरिता सामान्यतः राजकारणी पुरुषाला बोलाविण्याची प्रथा पडू लागली आहे; मग ते संमेलन फिलॉसफीचे असो, इकॉनॉमिक्सचे असो, ओरिएंटल सायन्सिसचे असो. अशा तऱ्हेने राजकारणाला अवास्तव महत्त्व देण्यात आल्यामुळे विद्या व विद्वान

लोक यांच्याबद्दल समाजामध्ये आदर जितक्या प्रमाणात असावयास पाहिजे तितक्या प्रमाणात तो दिसून येत नाही. 'स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते' ही नुसती कविकल्पना नाही. राजकारणी पुरुषाला इतिहास फार लौकर विसरतो पण विद्वान व्यक्तीला मात्र इतिहास विसरत नाही. आणि म्हणून आज जे जागृतीचे पर्व आपल्या समाजात सुरू झाले आहे त्या जागृतीच्या पर्वामध्ये सुसंस्कृत व्यक्ती व विद्वान लोक यांचा आदर करण्याची प्रवृत्ती निर्माण करणे जरूर आहे असे मी समजतो. ह्या दृष्टीने विद्वद्रत्न काणे यांना 'भारतरत्न' करून भारत सरकारने विद्वत्तेचा गौरव करण्याची जी अभिनंदनीय प्रथा सुरू केली आहे त्याबद्दल भारत सरकारचे व विशेषतः राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांचे मनःपूर्वक अभिनंदन करणे जरूर आहे.

शासनसंस्था कायदे पास करून सामाजिक व आर्थिक क्रांतीचे कार्यक्रम उचलते ही गोष्ट उघड आहे. पण अनुभवाने आपण आता शिकलो आहोत की समाजकारण किंवा अर्थकारण विशेषतः समाजकारण केवळ कायद्याने यशस्वी होऊ शकत नाही. सामाजिक व आर्थिक क्रांतीचे कार्य लौकर यशस्वी व्हावयाचे असल्यास जनतेत जागृती करणे जरूर आहे व जनतेचे हार्दिक सहाय्य मिळविणे आवश्यक आहे. त्या दृष्टीनेही आत्मविश्वासाने व स्वयंस्फूर्त तत्त्वावर चालू असलेल्या सामाजिक व आर्थिक चळवळींचे महत्त्व आपण पूर्णरीत्या ओळखिले पाहिजे. विशेषतः जीवन-निष्ठांच्या संग्रामात आपण आता उतरलो असल्यामुळे लोकशिक्षण करून सर्व जनतेला क्रांतीच्या मार्गावरील सैनिक बनविणे किती महत्त्वाचे आहे हे सांगावयास नकोच. जीवन-निष्ठांचा संग्राम हा सर्वव्यापी असतो आणि त्यामुळे या संग्रामात केवळ सैनिकांनाच सामील होऊन चालत नाही तर सर्व नागरिकांनाही उत्साहाने सामील होणे जरूर असते. आणि ही वृत्ती निर्माण करण्याकरिता विवेकवादाच्या जोरावर लोकशाहीला लोकशिक्षणाचे कार्यक्रम करावे लागतात.

साहित्य व सामाजिक जीवन

ह्या संदर्भात, विशेषतः आजच्या संक्रमणकाळामध्ये साहित्याला केवढे महत्त्वाचे कार्य करावयाचे आहे हे विशेष विस्ताराने सांगण्याची जरुरी नाही. मी हे जाणतो की कला हे शास्त्र नाही किंवा तत्त्वज्ञानही नाही, आणि कलेला प्रचाराचे बंधन घालणे इष्ट व शक्यही होणार नाही. साहित्य सामान्यतः व्यक्तिजीवन व समाजजीवन ह्यांच्या संघर्षातून निर्माण होत असते. भोवतालची सामाजिक परिस्थिती व त्या परिस्थितीबद्दल साहित्यिकांच्या मनात होणारी प्रतिक्रिया यांच्या अन्योन्य संवादातून साहित्य निर्माण होत असते. व म्हणूनच साहित्याने प्रचाराचा आवेश आणलाच पाहिजे असे कोणीही म्हणणार नाही. "Art for Art's sake" हे जरी खरे असले तरी राष्ट्राच्या जीवनात असे काही आणीबाणीचे प्रसंग निर्माण होत असतात

की, ज्या वेळी "Art For Life" हे तत्त्व विसरता येत नाही. ज्या साहित्यिक किंवा सांस्कृतिक ध्येयांवरती लोकशाहीतील सर्व लेखक निष्ठा बाळगीत असतात, ती संस्कृती किंवा ते जीवन संकटात पडले असता साहित्यिकाला भोवताली सुरू असलेल्या संग्रामापासून अलिप्त राहाणे शक्य होणार नाही आणि ते इष्टही नाही असे मला वाटते.

जुनें जाउं द्या मरणालागुनि
जाळुनि किंवा पुरुनी टाका
सडत न एक्या ठायीं ठाका
सावध ऐका पुढल्या हांका
खांद्यास चला खांदा भिडवुनि

ही केशवसुतांची स्फूर्तिदायक गर्जना आजचे साहित्य जर करणार नसेल तर आजच्या युगात साहित्याला मिळालेली महनीय संधी साहित्यिकाने गमावली असेच कोणीही म्हणेल. समाजाने शासनसंस्था किंवा राजकारणी व्यक्ती यांच्याबद्दल अवास्तव आदर न बाळगता विद्वान व साहित्यिक यांच्याबद्दल आदर ठेविला पाहिजे असे मी जे आवेशाने म्हणालो त्याचा अर्थ असा आहे की विद्वानांना आणि साहित्यिकांना समाजाचे पुढारीपण करण्याकरिता आज बद्धपरिकर झाले पाहिजे. म्हणून साहित्याचे सत्यस्वरूप काय, वा साहित्याला कोठल्याही तऱ्हेची मर्यादा घालणे योग्य होईल की नाही, या तात्त्विक गोष्टींचा काथ्याकूट न करता आजच्या प्रसंगाचे महत्त्व लक्षात घेऊन साहित्यिकांनी सामाजिक व आर्थिक समता निर्माण करण्याकरिता जो संग्राम आपल्या देशामध्ये सुरू झाला आहे त्या संग्रामाचे पुढारीपण स्वीकारावे असे मी सर्व साहित्यिकांना आवाहन करतो. महाराष्ट्रातील साहित्याचा इतिहास फार उज्ज्वल व स्फूर्तिदायक आहे आणि मला असा विश्वास वाटतो की महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतर महाराष्ट्राच्या भवितव्याबद्दल ज्या उदात्त कल्पना सर्व महाराष्ट्रीयांच्या मनात जागृत झाल्या आहेत त्या कल्पना प्रत्यक्ष सृष्टीत अवतरण्याकरिता आवश्यक ते लोकशिक्षण व लोकजागृती करण्यास आजचे साहित्य व साहित्यिक हातभार लावतील व महाराष्ट्राच्या जुन्या परंपरा चालवतील. असे केल्यानेच महाराष्ट्राच्या जुन्या उज्ज्वल परंपरेशी आपण वेइमानी केली असे होणार नाही. सामाजिक जीवनातील मूल्यांचा प्रचार करण्याचे महत्त्व आज फार असल्यामुळे त्या प्रचाराच्या कामात साहित्यासारखे प्रबल शस्त्र दुसरे नाही आणि ह्यातच आजच्या साहित्याच्या महनीय कार्याचे रहस्य आहे.

२६ जानेवारी १९५० या दिवशी आपण आपली घटना मान्य केली आणि त्या घटनेच्या द्वारे आपण भारतीय सामान्य जनतेला असे वचन दिले की आपल्या

देशामध्ये लोकशाहीच्या मार्गाने सामाजिक, आर्थिक, राजकीय न्यायाचे साम्राज्य सुरू होईल. सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय ही ह्या युगातील एक क्रांतिकारक कल्पना आहे आणि ह्या कल्पनेच्या जोरावरच लोकशाही प्रतिस्पर्धी जीवननिष्ठांशी संग्राम करण्यास समर्थ झाली आहे. केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळून सामान्य नागरिकाला सामाजिक विषमतेची झळ लागते व आर्थिक अडचणींचा राक्षस त्याच्यापुढे उभा असतो तोपर्यंत केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यामुळे आपले ध्येय साध्य झाले आहे असे तो मानीत नाही. दारिद्र्य, आजार, निरक्षरता, बेकारी, धनाढ्य आणि गरीब यांमधील विसंवाद, सामाजिक दृष्टीने उच्च व नीच असलेल्या जनतेत दिसणारा भेदभाव, या व अशा अनेक संतापकजनक विषमतांनी सामान्य नागरिकाचे मन उद्वेगाने क्षुब्ध झालेले असते, आणि राजकीय स्वातंत्र्याच्या महत्त्वाचे मूल्यमापन तो केवळ एकाच दृष्टीने करू इच्छितो, आणि ती दृष्टी म्हणजे 'माझ्या सामाजिक व आर्थिक जीवनात काय सुधारणा झाली ?' अर्थात ह्या त्याच्या प्रश्नाला लोकशाही जर समाधानकारक उत्तर देऊ शकली नाही तर लोकशाहीला आजच्या निष्ठांच्या संग्रामात टिकाव धरणे फार कठीण जाईल, आणि म्हणूनच सामाजिक व आर्थिक न्याय ह्या क्रांतिकारक तत्त्वांच्या जोरावर लोककल्याण निर्माण करण्याचा मार्ग लोकशाही अवलंबीत असते. आपल्या घटनेने सर्वांगीण उत्कर्षाच्या शिखरावर पोहोचलेल्या ज्या भारताचे दिव्य स्वप्न सर्वसामान्य जनतेसमोर ठेविले आहे ते स्वप्न साकार करण्यास लोकशाहीचे हात समर्थ करणे हे आज आपणा सर्वांचे कर्तव्य आहे. तुम्ही कोठलाही व्यवसाय करीत असा, प्रत्येक व्यवसाय आज राष्ट्रसेवेचा मार्ग आहे या भावनेने तो आचरिला पाहिजे आणि अशा दृष्टीने सर्व नागरिक आपापल्या परीने आपआपल्या क्षेत्रात साथ देऊन ह्या देशात सुरू असलेल्या क्रांतीच्या यशाकरिता सैनिक म्हणून जेव्हा सामील होतील तेव्हाच आपल्या पंचवार्षिक योजना यशस्वी होतील आणि सामाजिक, आर्थिक न्यायाचे राज्य सुरू करण्याची आपली मनीषा तृप्त होईल.

लोकशाही व नियंत्रणे :

लोककल्याणाचे साध्य सिद्ध करण्याकरिता लोकशाही जेव्हा सामाजिक व आर्थिक व्यवहारांचे नियंत्रण कायद्याने करू लागते तेव्हा लोकशाहीला व्यक्ति-स्वातंत्र्य व समाजहित यांचा समन्वय करण्याची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक होते. आणि त्या संदर्भात जेव्हा जेव्हा लोकशाहीने मान्य केलेले कायदे, अनेक प्रकारची नियंत्रणे निर्माण करतात, तेव्हा तेव्हा नागरिकांना घटनेने दिलेले मूलभूत हक्क नष्टप्राय होत आहेत की काय याचा विचार नेहमीच निर्माण होतो. गरिबांचे दारिद्र्य, अज्ञानी लोकांचे अज्ञान, रुग्णांचे आजारीपण, बेकारांची बेकारी, व सामान्यतः सुस्थितीत नसलेल्या लोकांना भोगावे लागणारे क्लेश व आपत्ती

यांचे निराकरण जर लोकशाही सत्वर करू शकली नाही तर कम्युनिझम वा फॅसिझम हे मार्ग का स्वीकारू नयेत असा सामान्य जनतेला मोह पडण्याचा संभव असतो. अर्थात ही गोष्ट खरी आहे की कम्युनिझम किंवा फॅसिझम या राजवटींमध्ये व्यक्तिस्वातंत्र्याला महत्त्व असत नाही आणि हुकूमशाहीमुळे अनेक आर्थिक स्वरूपाचे कार्यक्रम विनाविरोध पार पाडता येतात. पण आपण ही गोष्ट विसरता कामा नये की आर्थिक व सामाजिक समता ही ध्येये जर लोकशाही सिद्ध करू शकणार नसेल तर लोकशाहीवरील सामान्य जनतेचा विश्वास ढळण्याची भीती असते. व्यक्तिस्वातंत्र्याचे महत्त्व कितीही मोठे असले तरी व्यक्तिस्वातंत्र्यामुळेच जर सामान्य जनतेची आर्थिक प्रगती होणे टळणार किंवा विलंबणार असेल तर सामान्य जनता व्यक्तिस्वातंत्र्याचे महत्त्व मानणार नाही. आणि हे सत्य ओळखूनच सामाजिक न्याय ही क्रांतिकारक कल्पना जन्मास आली. लोकशाही सामाजिक न्याय प्रस्थापित करू शकते असा सिद्धान्त लोकशाहीवर निष्ठा बाळगणारे अनेक तत्त्ववेत्ते गेल्या पंचवीस-तीस वर्षांमध्ये आवेशाने प्रतिपादीत आहेत. आणि ह्या नवीन घोरणामध्येच नियंत्रणाचे बीज आहे. निरनिराळ्या आर्थिक व्यवहारांत हस्तक्षेप केल्याशिवाय समाजाच्या आर्थिक संघटनेमध्ये क्रांती घडवून आणणे शक्य नाही ही गोष्ट पटल्यामुळे लोकशाही प्रसंगोपात्त जरूर ते कायदे पास करीत असते. १९५० साली घटना मान्य झाल्यानंतर निरनिराळ्या आर्थिक क्षेत्रात क्रांती घडवून आणण्याच्या उद्देशाने लोकसभेने किंवा प्रांतीय विधिमंडळांनी जे अनेक कायदे पास केले आहेत ते या गोष्टीची साक्ष देतील. जितका कायदा जास्त मूलग्राही व क्रांतिकारक असतो तितका त्याच्याविरुद्ध तीव्र निषेध उत्पन्न होतो की हा 'Regimentation' (बराकीकरण) चा प्रकार आहे, व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट होत आहे. यामध्ये अशा प्रसंगी लोकशाहीला विवेकवादाचा आश्रय करून व्यक्तिस्वातंत्र्य व समाजहित या दोन निष्ठांचा समन्वय घडवून आणणे जरूर असते. एक गोष्ट मात्र निश्चित आहे की, नियंत्रणांशिवाय आर्थिक क्रांती घडवून आणणे शक्य होणार नाही. पण नियंत्रणांचा अवलंब करताना लोकशाहीचा तराजू समतोल राहील अशी खबरदारी घेणे जरूर आहे. याच दृष्टीने लोकसभेने मान्य केलेल्या कायद्यांना लोकशाही आपले फार महत्त्वाचे असे क्रांतिकारक शस्त्र समजते. 'Dynamics of Law' (कायद्याचे गतिविज्ञान) हा जो नवीन विचारांचा संप्रदाय सुरू झाला आहे त्याचे रहस्य हेच होय.

नैतिक व आध्यात्मिक निष्ठांचे महत्त्व :

लोकशाही व लोककल्याण या प्रश्नांचा विचार करताना एक गोष्ट कटाक्षाने लक्षात ठेवणे जरूर आहे. शिथिल व शीलहीन अशी शासनसंस्था आणि समाजहित आणि समाजकल्याण यांबद्दल अनास्था बाळगणारा नागरिकवर्ग

ज्या राष्ट्रात निर्माण होईल त्या राष्ट्रात लोकशाही यशस्वी होणे शक्य नाही. लोकशाहीला यशस्वी व्हावयाचे असल्यास शासनसंस्था शीलसंपन्न, ध्येयवादी, कर्तबगार व न्यायनिष्ठुर अशी असली पाहिजे; व शासनसंस्थेवर नियंत्रण ठेवण्याकरिता सामान्य जनता जागरूक, आपल्या अधिकारांची जाणीव असलेली व आपली जबाबदारी मानणारी अशी असली पाहिजे. अलीकडे बऱ्याच वेळा जनतेमध्ये अविश्वासाचे वातावरण निर्माण झाल्याचा भास होतो, व साहजिकच "Crisis of Character" (चारित्र्य कोसळण्याच्या वेतात) हे तर या अविश्वासाचे कारण नसेल ना, असा प्रश्न विचारवंतांना कित्येक वेळा भेडसावितो. जसा सामान्य समाज व त्याची नैतिक पातळी तशी शासनसंस्था व तिची नैतिक पातळी असणार हे निर्विवाद सत्य आहे. म्हणून लोककल्याणाचा कार्यक्रम तातडीने पार पाडीत असताना सामान्य जनतेने व शासनसंस्थेने नैतिक व आध्यात्मिक (Ethical) निष्ठांची जोपासना करणे फार आवश्यक आहे. उदात्त तत्त्वांचा व्यासपीठावरून उच्चार केल्याने ती तत्त्वे व्यवहारात उतरतात हा भ्रांतिकारक समज आपण मनाशी बाळगता उपयोगी नाही. तत्त्व व व्यवहार यांमध्ये असणारी हृदयविदारक विसंगती हा हिंदू समाजाला असलेला एक मोठा शाप आहे. आणि म्हणून आर्थिक व औद्योगिक उत्कर्ष करून घेण्याकरिता जेव्हा जेव्हा आपण आर्थिक व सामाजिक क्रांतीच्या घटना घडवून आणीत असतो तेव्हा तेव्हा सर्व ऐहिक चळवळींना आध्यात्मिक बैठकीचा आधार असणे जरूर आहे याची जाणीव आपण आपल्या मनात सदैव तेवत ठेवली पाहिजे. आज शास्त्रांची प्रगती इतक्या झपाट्याने होत आहे की कदाचित लौकरच चंद्रावर स्वारी करणेसुद्धा शक्य होईल. पण शास्त्रसंशोधनाने घडवून आणलेली क्रांती जर मानवजातीला उपकारक व्हावयास पाहिजे असेल तर मानवाच्या मनात आणि अन्तःप्रवृत्तीत आध्यात्मिक क्रांती होणे जरूर आहे. सामान्य नागरिक जर शीलभ्रष्ट, स्वार्थी, समाजहितपराङ्मुख व समाजकल्याणाबद्दल उदासीन असा राहिला तर केवळ शास्त्रीय संशोधनाने समाजाचे अगर राष्ट्राचे कल्याण होणे शक्य नाही. आणि म्हणून नैतिक व आध्यात्मिक निष्ठांची जोपासना करून त्यांवर आधारलेल्या आर्थिक व सामाजिक क्रांतीचे कार्यक्रम लोकप्रिय करणे आज अत्यंत महत्त्वाचे झालेले आहे. हे सर्व कार्य करीत असताना लोकशाहीला व नागरिकांना विवेकवादाचा आश्रय करून सत्यासत्यनिर्णय करण्यास समाजाला शिकविणे जरूर आहे. या दृष्टीने लोकशाहीला लोककल्याणाचे ध्येय साध्य करण्याकरिता ज्यांचे अमोलिक साहाय्य होते असे दोन सुहृद् म्हणजे, एक पुरोगामी विवेकवाद, व दुसरा पुरोगामी लोकसभेने मान्य केलेले कायदे. विवेकवादामुळे निर्माण झालेली जनशक्ती व कायद्यांनी निर्माण केलेली शासनशक्ती यांचा हार्दिक समन्वय होईल तेव्हाच आपल्या क्रांतिकारक घोषणा यशाच्या मार्गावर वाट चालू लागतील.

लोककल्याणाचे ध्येय—
ज्ञानेश्वरांनी चितारलेले चित्र :

हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर व विशेषतः १९५० साली घटना देशाने मान्य केल्यानंतर आपल्या देशामध्ये सामाजिक व आर्थिक समतेच्या मंदिराकडे जाण्याकरितां मंगल व अभूतपूर्व अशी यात्रा सुरू झालेली आहे, व चीनच्या धक्क्याने जागृती आल्यानंतर लोकशाहीच्या मार्गाने ही यात्रा यशस्वी करून लोककल्याणाचे ध्येय आपण साध्य करावे अशी ईर्ष्या सर्व नागरिकांच्या मनांत निर्माण होऊ लागली आहे. ह्या जनताजागृतीचा भरपूर उपयोग करून शासनसंस्थेने प्रगतिपथावरील आपला प्रवास जोराने सुरू केला पाहिजे. हेच सध्या सुरू झालेल्या जागृति–पर्वाचे आपणा सर्वांना आवाहन आहे.

सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित झाल्यानंतर समाजाचे स्वरूप कशा तऱ्हेचे असेल असे जर आपण मला विचाराल तर त्याचे उत्तर मी माझ्या शब्दात न देता ज्ञानेश्वरांच्या शब्दात देण्याचा प्रयत्न करीन. ज्ञानेश्वरांचे आपणा सर्वांच्या परिचयाचे असलेले स्फूर्तिदायक शब्द आपण सहज आठवू शकाल. ते म्हणतात,

आतां विश्वात्मकें देवें
येणें वाग्यज्ञें तोषावें
तोषोनि मज द्यावें
पसायदान ।

जे खळांची व्यंकटी सांडो
तया सत्कर्मीं रती वाढो
भूतां परस्परें जडो
मैत्र जीवांचें ।

दुरितांचें तिमिर जावो
विश्व स्वधर्मसूर्ये पाहो
जो जें वांछील तो तें लाहो
प्राणिजात ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम..... क्रि: .....
क्रमांक ..... नों क्रि: .....

खण्ड पाचवा

व्यक्तिदर्शन

अनुक्रम

१ सर नारायण चंदावरकर

[श्री. गणेश लक्ष्मण चंदावरकर यांनी लिहिलेल्या "A Wrestling Soul—Story of the Life of Sir Narayan Chandavarkar" या ग्रंथाला लिहिलेली प्रस्तावना. मुंबई, दि. २२ नोव्हेंबर १९५५. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

२ महात्मा बसवेश्वर आणि त्यांचे कार्य

[बसव-जयंती-उत्सव-समितीतर्फे साजऱ्या झालेल्या महात्मा बसवेश्वर जयंती-समारंभाच्या अध्यक्षपदावरून दिलेले भाषण. कावसजी जहांगीर सभागृह, मुंबई, दि. १३ मे १९५६. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

३ गोपाळ गणेश आगरकर

[न्यू इंग्लिश हायस्कूल, पुणे येथे आगरकरांच्या तैलचित्राचे अनावरण करताना केलेले भाषण, पुणे, दि. १५ जुलै १९५५ आणि आकाशवाणी, मुंबई केंद्रावरून दिलेले भाषण, दि. १३ जुलै १९५६ या दोन्हींचे एकत्रीकरण.]

४ महर्षी धोंडो केशव कर्वे

[श्री. गणेश लक्ष्मण चंदावरकर यांनी लिहिलेल्या 'महर्षी कर्वे' या इंग्रजी चरित्रग्रंथाला लिहिलेली प्रस्तावना. नवी दिल्ली, दि. २१ मार्च १९५८. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

५ डॉ. पांडुरंग वामन काणे

[प्राचार्य त्र्यंबक कृष्ण टोपे यांनी लिहिलेल्या "A Modern Sage" या डॉ. पां. वा. काणे यांच्या चरित्रग्रंथाला लिहिलेली प्रस्तावना. नवी दिल्ली, दि. ८ जानेवारी १९६०. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

६ डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

[पुणे महानगरपालिकेतर्फे उभारण्यात आलेल्या डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण करताना महानगरपालिकेच्या आंबेडकर उद्यानात दिलेले भाषण. पुणे, दि. २६ जानेवारी १९६०. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

७ भाऊराव पायगौडा पाटील

[रयत शिक्षण संस्थेतर्फे सातारा येथे उभारण्यात आलेल्या अर्धपुतळ्याचे अनावरण करताना दिलेले भाषण. सातारा, दि. १४ मार्च १९६३.]

८ जवाहरलाल नेहरू

[भारताच्या सर्वोच्च न्यायालयात वाहिलेली श्रद्धांजली. नवी दिल्ली, दि. २० जुलै १९६४. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

९ लालबहादूर शास्त्री

[भारताच्या सर्वोच्च न्यायालयात वाहिलेली श्रद्धांजली. नवी दिल्ली, दि. १३ जानेवारी १९६६. मूळ इंग्रजीतून अनुवाद.]

सर नारायण चंदावरकर

चंदावरकर जन्मशताब्दी उत्सव समितीचा अध्यक्ष या नात्याने 'सर नारायण गणेश चंदावरकर यांची जीवनकथा' जनतेसमोर सादर करण्यास मला फार आनंद वाटतो. लेखकाने म्हटले आहे की, "पुढील पृष्ठांत एका थोर पुरुषाची जीवनकथा सांगण्याचा नम्र प्रयत्न केला आहे." सर नारायण यांच्या जीवनाचे इतके तेजस्वी पैलू आहेत की त्यांच्या संपूर्ण जीवनाचे चित्र सादर करताना योग्य ती निवड करण्याचे कार्य यशस्वी होणे खचितच सोपे नव्हे. "एका थोर पुरुषाची जीवनकथा सांगण्याचा नम्र प्रयत्न केला आहे", या लेखकाच्या निवेदनाशी वाचक स्वाभाविकच एकमत होतील. कारण ते काही सोपे काम नव्हते. सर नारायण हे खरोखरी सेवा आणि सामाजिक उपयोगिता यांनी पूर्ण भरलेले असे जीवन जगले! विद्यापीठाचे एक विख्यात विद्यार्थी, यशस्वी वकील, मुंबई हायकोर्टाचे एक प्रमुख न्यायमूर्ती, सुयोग्य राजकारणी, तळमळीचे समाज-सुधारक, आपल्या काळातले तरुण पिढीचे मित्र, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक, सुरवातीच्या काळातील नाणावलेले पत्रकार, उत्तम वक्ते आणि शुद्ध, साध्या सुंदर इंग्रजीचे लेखक, प्रार्थनासमाजाचे एक सत्प्रवृत्त नेते, एक आजन्म सखोल अभ्यासक, इंडियन नॅशनल काँग्रेसचे अध्यक्ष, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू, स्थानिक पुनर्घटित विधिमंडळाचे पहिले अध्यक्ष आणि सर्वांहून अधिक म्हणजे एक धर्मशील आणि तळमळीचे अध्यात्मवादी, हे सर नारायण यांच्या जीवनाचे ढोबळ आणि प्रमुख पैलू आहेत. या चरित्राचे सर्व वाचक, सर नारायण यांच्या जीवनाच्या कित्येक पैलूंचे, त्यांच्या यथार्थ भूमिकेनुसार दर्शन घडविल्याबद्दल लेखकाला धन्यवाद देतील याबद्दल मला शंका वाटत नाही. लेखकाचा लिहिण्याचा ढंग सुबोध आणि आदरभाव प्रगट करणारा आहे, हे निःसंशय; पण त्याने

सयुक्तिकपणे सर नारायण यांच्या महत्त्वाच्या कार्यांच्या मूल्यमापनाचाही प्रयत्न केला आहे.

सर नारायण आणि त्यांचे समकालीन यांची थोर कामगिरी आणि त्यांनी केलेली महान् कार्ये यांचे मूल्यमापन करण्यासाठी योग्य त्या ऐतिहासिक दृष्टिकोनाचा अवलंब करणे आवश्यक आहे. सर नारायण यांच्या मृत्यूनंतर आतापर्यंत भारतातील सर्वच घटना अत्यंत जलद गतीने घडल्या आणि क्रांतिकारी स्वरूपाचे बदल जे त्या वेळी फार दूर असल्याचे, तसेच मंद गतीने येणारे आणि साध्य होण्यास कठीण असल्याचे वाटत होते, ते अनपेक्षित जलदतेने प्रत्यक्षात आले. सर नारायण यांच्या मृत्यूनंतरच्या युगात इतिहास फार वेगाने आगेकूच करीत आहे, असेच खरोखरी म्हणता येईल. आपल्या मूल्यविषयक भावना, आपली सामाजिक आणि राजकीय उद्दिष्टे आणि समाजाच्या स्थिर आणि न्यायसंगत पुनर्घटनेच्या दृष्टीने आर्थिक गरजांसंबंधी आमच्या कल्पना यांत क्रांतिकारी परिवर्तन झाले आहे. त्यामुळे एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या २५ वर्षांत आणि विसाव्या शतकाच्या पहिल्या २५ वर्षांत—म्हणजे या अर्धशतकात झालेल्या पिढीचे विचार आणि हालचाली यांचे परीक्षण करताना काटेकोरपणे आजच्या कल्पना आणि विचार यांची कसोटी लावणे न्याय्य किंवा योग्य ठरणार नाही, असे मला म्हणावेसे वाटते. त्या काळच्या अतिरथी-महारथी महापुरुषांनी जी बहुमोल कामगिरी बजावली त्यांचे महत्त्व लक्षात येण्यासाठी त्या काळची पार्श्वभूमी, त्यावेळी रूढ असलेली सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थिती आणि त्या काळच्या अपरिहार्य व्यथांना कारण असलेल्या मर्यादा, या सर्वांचा विचार करावाच लागेल. या योग्य तर्कशुद्ध कसोटीने परीक्षण केल्यास सर नारायण यांचे जीवन व्यापक प्रमाणात सामाजिकदृष्ट्या अत्यंत सार्थ ठरले, याबद्दल मला शंका नाही.

त्यांच्या काळात सामाजिक आणि राजकीय सुधारणांच्या हक्कांबाबत संघर्ष होता आणि त्यामुळे विचारवंत व कार्यकर्ते यांची दोन परस्परविरोधी गटांत विभागणी झाली होती. राजकीय आणि सामाजिक चळवळींमध्ये समन्वय होण्याची आवश्यकता सर नारायण यांना पूर्णपणे पटलेली होती, तरीही सामाजिक सुधारणेला किंचित अधिक महत्त्व देण्याचा त्यांच्या मनाचा कल असावयाचा, हे मान्य करावे लागेल. सामाजिक प्रगतिशीलतेवरील श्रद्धेचा अभाव हे देशाच्या राष्ट्रीय राजकारणातील गंभीर स्वरूपाचे दौर्बल्य होय, या सत्याची जाणीव सर्वच प्रगतिवादी लोकांच्या मनास भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या सामाजिक सुधारणांच्या इतिहासाने करवून दिली आहे. कमीत कमी प्रतिकाराचे धोरण स्वीकारून सामाजिक सुधारणा घडवून आणण्यावर सर नारायण यांचा विश्वास नव्हता. त्यांनी म्हटले आहे की, "सर्व प्रगती ही संघर्षातूनच होते. आपण लढा आणि गैरसोयी टाळल्या पाहिजेत, असा विचार तुम्ही एकदा लोकांच्या मनात भरवला, तर तुम्ही त्यांना, त्यांच्या अंगी

चारित्र्य निर्माण होण्याच्या शक्यतेपासून वंचित करीत आहात, असे म्हणावे लागेल. कारण संघर्षामुळे महान आणि सत्यवचनी, उच्च आणि शूर मर्द, यातना सहन करणारी आणि लढा देणारी चारित्र्यवान माणसे निर्माण होण्याची क्षमता असते. असे लोक आपल्या देशाची सदसद्विवेकबुद्धी ठरून त्या नात्याने लोकांची सेवा करतात." दुसऱ्या एका प्रसंगी त्यांनी द्रष्ट्याप्रमाणे असे उद्‌गार काढले आहेत की, "परंपरा तोड्र नये, भूतकालाशी काडीमोड घेऊ नये, सावधपणे आणि हळूहळू मार्गक्रमण करावे, हा उपदेश फार छान वाटतो, यात शंकाच नाही. पण किमान भारतात तरी मानवी स्वभावाला भूतकाळाची फार आवड आहे. तो स्वभाव भूतकाळानेच भरलेला आहे. पण तो स्वभाव इतका सुस्त, शिथिल आणि आळशी आहे की, कोणताही सुधारक मागेपुढे न पाहाता भरधाव जाऊन समाजात क्रांती घडवून आणील हा धोकाच उरलेला नाही !—याऐवजी उलट उपदेश केला, तर आमचे हितच होईल—जिथे धर्मभोळेपणा, अंधश्रद्धा यांचा हिमालय हलवावयाचा आहे, तिथे तर अशा उलट उपदेशाची नितांत गरज आहे." त्यांचे हे विचार इतके खरे वाटतात की, आजच्या एखाद्या तळमळीच्या सुधारकानेसुद्धा त्या विचारांचा अवलंब करावा ! जाती आणि जातीयतेची भावना हे या देशातील लोकशाहीला गंभीर आव्हान आहे, याची सर्व प्रगतिवादी नागरिकांना आज जाणीव झालेली आहे. आपल्या काळात सर नारायण हे कित्येक वेळा याच विषयावर कंटाळा येईपर्यंत बोललेले आहेत. सर नारायण यांनी एकदा श्री. क्रोसियर यांच्या विचारातील एक उत्तम वाक्य सांगितले होते. क्रोसियरने म्हटले आहे की, "एकदा आपण वेगवेगळ्या वर्तुळात विभागले गेलो की वर्तुळाप्रमाणे आपण फक्त एकाच मुद्याला स्पर्श करू शकतो—आणि तो म्हणजे स्वार्थ!" सर नारायण यांची समाजसुधारणे-वरील भाषणे आणि लेख आजच्या समाजसुधारकांचेसुद्धा बहुमोल मार्गदर्शन करू शकतात.

सर नारायण हे आपल्या काळात, त्या वेळच्या तरुण विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठी निरनिराळ्या विषयांवर विचारपरिप्लुत व्याख्याने नेहमी देत असत आणि त्यांनी, त्यांच्या अडचणी दूर करण्याची, त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याची आणि देशाचे भावी नागरिक या नात्याने आपल्या डोळ्यासमोर ठेवावयाच्या आदर्शांचे त्यांना पूर्ण ज्ञान करवून देण्याची एकही संधी वाया दवडली नाही. आपले मित्र तेलंग यांच्याप्रमाणेच सर नारायण स्वतः आयुष्यभर एक तळमळीचे अभ्यासक होते आणि ज्ञानसाधना व शिस्तीचे महत्त्व यावर भर देताना त्यांना कधी कंटाळा किंवा थकवा आला नाही. विद्यार्थ्यांच्या एका बैठकीत सर नारायण यांनी सांगितले की, "तेलंग यांची थोरवी आणि सौजन्य यांचे रहस्य, त्यांनी स्वतःला लावून घेतलेली शिस्त आणि प्रयासाने संपादन केलेल्या अभ्यासाच्या सवयी यात सापडेल." ज्ञानाच्या वाढत्या साधनेत असताना मुंबई विद्यापीठाकडे

स्वाभाविकच्च ते निष्ठा आणि भक्तिभावनेने पाहात असत. सर नारायण यांनी म्हटले आहे की, "मुंबईसारख्या आपल्या प्रिय पुरातन शहरात निसर्ग किंवा मानवनिर्मित अनेक सुंदर ठिकाणे आहेत. पण विद्यापीठाच्या टेंगण्या इमारती आणि उंच मनोरा या दृश्यामुळे मन आदराने जसे भरून येते आणि मनोऱ्यापेक्षा उंच आकांक्षा बाळगण्यास ते जसे उत्तेजन देते, तसे मुंबईतील अन्य कोणत्याही दृश्यामुळे होत नाही. मी त्या दृश्याकडे पाहातो, तेव्हा मी आईच्या शेजारी उभा आहे व त्या आईचे आकाशाकडे डोळे लागलेले आहेत, पण पाय जमिनीत अत्यंत पक्के रोवलेले आहेत, असे मला वाटते. पावित्र्य, निश्चलता आणि गांभीर्य यांचे हे चित्र रोझेटीच्या प्रेयसीच्या मुखकमलासारखे, वस्तुजातामधील आंतरिक अर्थ आपल्या मनावर बिंबवू पाहात आहे." विद्यार्थ्यांच्या मनावर विद्यापीठाचा किती प्रभाव असावा याचे यापेक्षा उत्तम आणि प्रभावी वर्णन इतरत्र सापडू शकत नाही.

शिस्तीचे महत्त्व आणि ज्ञानाची साधना यांवर पक्का विश्वास असलेले सर नारायण कधी कधी कडक रीतीने वागणे साहजिक होते. पण श्री. नटराजन् यांनी दाखवून दिल्याप्रमाणे सर नारायण हे इतर कोणापेक्षाही—त्यांच्यासमोर येणाऱ्या अत्यंत वाईट गुन्हेगारापेक्षाही—स्वतःच्या बाबतीत अधिक कडकपणे वागणारे होते. त्यांच्याबाबत असे म्हणता येईल की, ते स्वतः असे गृहीत धरीत की –

A Silent court of Justice himself,
Himself the Judge and Jury with himself
The Prisoner at the bar.

वकिलीच्या व्यवसायाची साधना आणि न्यायदानाचे कार्य यांच्याबद्दल सर नारायण यांच्या मनात इतका पराकोटीचा आदर होता की, कायदेपंडित आणि न्यायाधीश दोघे योग्य त्या सांस्कृतिक आणि बौद्धिक ज्ञानाने युक्त असावेत, यावर त्यांचा फार कटाक्ष असे. सर नारायण यांनी म्हटलेले आहे की, "सखोल सर्वसाधारण सांस्कृतिक किंवा उदार शिक्षणाच्या अभावीसुद्धा वकिली व्यवसायात यशस्वी झाल्याची खरोखरी अनेक उदाहरणे आहेत. पण हे अपवाद आहेत, नियम नव्हे! कायदेपंडितासाठी—मग तो बारमध्ये वकिली व्यवसाय करीत असो वा न्यायासनावर बसलेला असो—संस्कृती ही फार मोलाची गोष्ट आहे आणि कायद्यापासून व केवळ कायद्यापासूनच, ज्ञानाचा प्रकाश प्राप्त करून घेणारा कोणताच कायदेपंडित कार्यक्षम ठरू शकत नाही, अशी सर्वसाधारण अनुभवाने खरी ठरणारी एक समर्पक म्हणच तयार करावी लागेल." त्याचप्रमाणे हायकोर्टाने पार पाडावयाच्या कार्यासंबंधी सर नारायण यांचा दृष्टिकोन फार उच्च होता. इ. स. १९१२ साली, मुंबई हायकोर्टाची स्थापना होऊन ५० वर्षे झाली व त्यानिमित्त महोत्सव साजरा करण्यात आला. त्या अविस्मरणीय प्रसंगी सर नारायण यांनी लिहिलेल्या लेखात मुंबई हायकोर्टाच्या त्या कालावधीतील कार्याचा आणि कामगिरीचा त्यांनी योग्य

अभिमानपूर्वक आढावा घेतला. त्यांनी लिहिले की, "आपल्या न्यायविषयक कर्तव्याच्या पार्श्वभूमीत राहून आणि त्यांच्याव्यतिरिक्तही, प्रजेच्या सामाजिक परिवर्तनावर या हायकोर्टाने अगोचरपणे प्रभाव गाजविला. हा प्रभाव त्याने, 'सामाजिक' हा शब्द या देशात सामान्यतः ज्या संकुचित अर्थाने वापरण्यात येतो तो अर्थ गृहीत धरून नव्हे, तर व्यक्तींचे व्यक्तिगत आणि सांघिक जीवन, आणि आधुनिक संस्कृतीत ज्या पैलूंचा समावेश होतो, त्या सर्वांचा समावेशक अशा अर्थाने तो शब्द वापरून गाजविलेला आहे." मुंबई हायकोर्टात एकापाठोपाठ एक आलेले नामवंत विद्वान कायदेपंडित आणि न्यायाधीश यांच्यामुळे निर्माण झालेल्या त्या हायकोर्टाच्या उदात्त परंपरेची सर नारायण यांनी जी वाखाणणी केली आहे, तिच्याशी सर्व नागरिक सहमत होतील, असा मला विश्वास आहे. बद्रुद्दिन तय्यबजी, रानडे आणि तेलंग यांनी सुरू केलेली परंपरा आणि संप्रदाय यांचे सर नारायण हे एक थोर अनुयायी होते, असे खरोखरी यथार्थतेने म्हणता येईल. मला असेही म्हणावेसे वाटते की हिंदू कायद्याचे प्रशासन करण्याच्या बाबतीत मुंबई हायकोर्ट, आपल्या उदार, प्रगतिवादी आणि व्यापक दृष्टिकोनामुळे प्रख्यात आहे. प्राचीन हिंदू कायद्याचे उदार बुद्धीने आणि व्यापक दृष्टीने विश्लेषण करण्याची. ही परंपरा इ. स. १८७० ते १८८२ पर्यंत मुंबई हायकोर्टाचे सरन्यायाधीश असलेले सर मायकेल वेस्ट्रॉप यांच्यापासून सुरू झालेली आहे आणि त्यांच्यानंतर इ. स. १८७१ ते १८८७ पर्यंत मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश असलेले सर रेमंड वेस्ट यांनी त्याच धोरणाचा अवलंब केला. या दोघा न्यायाधीशांनी, हिंदू कायद्याशी ते सुरवातीस अपरिचित होते, तरी त्याच्या तरतुदींची वहिवाट घालून देताना अत्यंत उच्च दर्जाचे कायदेपांडित्य आणि व्यापक दूरदृष्टी दाखविली. तीच परंपरा नानाभाई हरिदास, रानडे, तेलंग, लल्लुभाई शहा आणि चंदावरकर यांनी चालविली.

आपल्या विविध चळवळींमध्ये,—ज्यांपैकी काही चळवळींमुळे तीव्र वाद निर्माण झाले—सर नारायण चंदावरकर हे नेहमी तळमळीचे अध्यात्मवादी होते आणि प्रार्थनेच्या उपयुक्ततेवर त्यांचा विश्वास होता, हे अनेकांना माहीत नसेल! 'झुंजणारा आत्मा' या मथळ्याखाली लिहिलेल्या प्रकरणात सर नारायण यांच्या प्रामुख्याने अध्यात्मवादी असलेल्या दृष्टिकोनाची पूर्ण माहिती दिलेली आहे. सर नारायण यांनी म्हटले आहे की, "आपण सर्व तरुण आणि वृद्ध यांनी जर आतला आवाज ऐकला; आणि प्रार्थनेने पवित्र बनलेले संतमहात्मे, व परमेश्वर आणि मानव यांच्यावर शांत तदाकार वृत्तीने प्रेम करण्याची आराधना केल्यामुळे जे समाजसंस्थापक व लोकनेते झालेले आहेत, अशांच्या आदर्शांचे अनुसरण केले, तर जीवनाचे ओझे हा परमेश्वरी अनुग्रहच ठरेल." आज आपण जेव्हा सर नारायण यांचे जीवनचरित्र वाचतो, तेव्हा काळाच्या लांब होत चाललेल्या

छायेखाली आपल्या इतर योग्य समकालिनांच्या उदात्त जीवितकार्याबरोबर त्यांच्या जीवितकार्याचेही स्थान असल्याचे सिंहावलोकन करताना आपणास दिसते. लोकमान्य टिळकांना आदरांजली अर्पण करीत असताना सर नारायण एकदा म्हणाले होते की, "पवित्र चारित्र्य आणि प्रतिभाशाली विद्वत्ता यांच्यामुळे त्यांचा जनमनावर विलक्षण पगडा बसला होता व त्यामुळे जनतेचा अत्यादर आणि प्रशंसा त्यांनी मिळविली होती. त्यांच्याबद्दलची ही पूज्यबुद्धी व अत्यादराची भावना त्यांच्या वरील गुणांच्या अभावी कदाचित आढळलीही नसती. त्यांचे व्यक्तित्व हा आता इतिहास बनलेला आहे. त्या व्यक्तित्वाचे गुणदोष होते; पण दोष मागे पडले आणि त्यांचे गुण हे आमचे दीपस्तंभ बनले." मला वाटते, आजच्या नागरिकांनाही सर नारायण यांच्या चरित्राबाबत अधिक उत्तम रीतीने त्याच भूमिकेचा अवलंब करणे शक्य व्हावे आणि त्यांचे दोष मागे टाकून द्यावेत आणि त्यांचे गुण हे आमचे दीपस्तंभ ठरावेत.

प्रस्तुत चरित्राच्या लेखकाने जेव्हा मला आपल्या या चरित्रग्रंथाचा वाचकांना परिचय करवून देण्याची विनंती केली, तेव्हा सर नारायण यांची भाषणे आणि लेख यांच्यासह त्यांचे सर्व उपलब्ध साहित्य वाचून काढण्याची मला संधी मिळाली. सर नारायण यांची भाषणे व लेख वाचल्यानंतर मला असे म्हणण्याचा मोह होतो की, जेव्हा त्यांना परमेश्वराकडून अंतिम आज्ञा आली तेव्हा सर नारायण हे शांत, स्थितप्रज्ञ राहिले असले पाहिजेत. कार्लाईलने म्हटले आहे की, "ज्याला आपले जीवनकार्य सापडले तो खरा भाग्यवान, धन्य होय. त्याला दुसरे कोणतेही वरदान मागण्याचे कारण नाही."[१] सर नारायण यांना आपले जीवनकार्य सापडले होते आणि त्यामुळे त्यांनी दुसऱ्या कोणत्याही भाग्याची अपेक्षा केली नसावी, याबद्दल माझ्या मनात संशय नाही. खरोखरी सर नारायण यांची कार्यैकनिष्ठा इतकी बलवत्तर आणि तळमळीची होती की जेव्हा त्यांना या जगाचा अखेरचा निरोप घ्यावा लागला, तेव्हा त्यांनी आपल्याशीच असे म्हटले असेल की—

Oh, for a life
A secod life to live
To use it up in work
And die of it a second time.

१. "Blessed is he who has found his work. Let him ask for no other blessings."

महात्मा बसवेश्वर आणि त्यांचे कार्य

उत्सव समितीचे अध्यक्ष, राज्यपाल डॉ. हरेकृष्ण मेहताब आणि मित्रहो,

आज रात्री हा जो समारंभ येथे योजिलेला आहे त्यात प्रत्यक्ष भाग घेण्याची संधी मला मिळाली हे मी माझे परम सौभाग्य समजतो. सांप्रदायिक किंवा लोक-समजुतीच्या दृष्टीने बोलावयाचे झाले तर मी काही वीरशैव लिंगायत नाही, हे उघडच आहे; पण एक बुद्धिवादी, हिंदू संस्कृतीचा एक अभ्यासक आणि एक सामाजिक सुधारक या नात्यांनी मला, बसवेश्वरांनी घडवून आणलेल्या सामाजिक क्रांतीबद्दल जो आदर आहे तो बसवाच्या कोणत्याही सांप्रदायिक अनुयायापेक्षा खचितच कमी नाही. म्हणूनच प्रामाणिकपणे मला असे वाटते की या थोर संताच्या आदरणीय स्मृतीला माझी विनम्र श्रद्धांजली वाहाण्याची संधी आज मला मिळाली ही मोठ्या भाग्याची गोष्ट होय.

मला असे वाटते की बसवाच्या कार्याचे महत्त्व पुरतेपणी जाणून घ्यावयाचे असेल तर हिंदू संस्कृतीच्या प्रगतीची जी कहाणी आहे तिच्या व्यापक संदर्भात बसवाच्या जीवितकार्याचा विचार करणे अवश्य आहे. बसवाचा अभ्यास फक्त त्याच्या जीवनापुरताच मर्यादित ठेवला आणि त्याचे कार्य म्हणजे हिंदू संस्कृतीच्या इतिहासापासून वेगळी पडलेली एक एकाकी घटना आहे असे जर आपण मानले तर बसवाने जे महान कार्य योजिले व जे अत्यंत प्रभावीपणे करून दाखविले त्याचे आपण न्याय्य मूल्यमापन करू शकणार नाही. दुर्दैवाने बसवेश्वराचा उपदेश व त्याने घडवून आणलेली मोठी सामाजिक–आर्थिक क्रांती यांची माहिती ज्या व्यापक प्रमाणात लोकांना असावयास पाहिजे तशी ती नाही. परंतु जसजशी व्यापक प्रमाणात दूरदूरच्या लोकांनाही बसवाच्या शिकवणुकीची माहिती होईल आणि जेव्हा हिंदू संस्कृतीचे अभ्यासक तिचा अभ्यास करू लागतील,

तेव्हा बसवेश्वराला हिंदू संस्कृतीच्या इतिहासामध्ये अत्यंत मानाचे स्थान देण्यात येईल याविषयी मला मुळीच शंका नाही.

हिंदू संस्कृतीच्या इतिहासातील बसवाचे स्थान समजून घेण्यासाठी या संस्कृतीच्या इतिहासावरून आपण थोडक्यात एक धावता दृष्टिक्षेप टाकू या. हिंदू संस्कृतीला या जगामध्ये सर्वांत पुरातन अशी परंपरा लाभली आहे. तिची सुरवात वेदांपासून होते आणि मनुष्यजातीला ज्ञात असलेल्या सर्व मानवी लिखितांमध्ये वेद हे सर्वांत प्राचीन आहेत. अगदी पूर्ण सावधगिरीने पाहिले तरी वेदांचा काळ हा कमीत कमी इ. स. पूर्व ४००० हा असल्याचे दिसून येईल. स्वाभाविकतःच अत्यंत सारभूत असे जे वेदांचे वाक्शरीर आहे त्यात प्रागैतिहासिक मनाची जिज्ञासा प्रगट झालेली दिसते. मानवी मनाचे कुतूहल आणि जिज्ञासा हेच सर्व संस्कृतींचे उगमस्थान आहे हे आपण जाणताच आणि अगदी प्राचीन, प्राथमिक स्थितीतल्या मनांमध्ये उद्भवलेल्या प्रश्नांचे उज्ज्वल वर्णन काही उत्कृष्ट वेदवचनांमध्ये केलेले आढळून येते. वैदिक मन हे, सिद्धान्तापासून मुक्त अशा अनिर्बंध रीतीने सर्व विश्वावर दृष्टिक्षेप करीत होते. वेदांनंतर उपनिषदांचा काळ आला. या काळात हिंदू विचारप्रणाली उत्कर्षशिखरावर पोचली होती. एकदा कोणतीही गोष्ट उत्कर्ष-शिखरावर पोचली की नंतर ती खालचे वळण घेते, हे नेहमीचेच आहे. याच न्यायाने उपनिषदांनंतर 'ब्राह्मणां'चा काळ येऊन हिंदू तत्त्वज्ञानाची अधोगती सुरू झाली. 'ब्राह्मणां'च्या काळात, वैदिक सूक्तांतून अत्यंत स्पष्टपणे प्रकट झालेली आणि उपनिषदांनी कृतिशील केलेली जी अत्यंत उदात्त व श्रेष्ठ तत्त्वे त्यांचे विस्मरण झाले आणि निवळ कर्मकांडालाच समाजात मानाचे स्थान मिळाले. कर्मकांडावरच निष्ठा ठेवण्याच्या या प्रवृत्तीचाच परिणाम चातुर्वर्ण्य निर्माण होण्यात झाला आणि या चातुर्वर्ण्याची परिणती क्रमाक्रमाने संपूर्ण सामाजिक विषमतेत झाली. ब्राह्मण हे सर्वांत श्रेष्ठ व शूद्र हे सर्वांत कनिष्ठ अशी व्यवस्था असलेली एक सामाजिक योग्यता-श्रेणी अस्तित्वात आली. यज्ञयागांचे कर्मकांड जोरात चालू असण्याच्या या काळातच या देशात दोन श्रेष्ठ क्रांतिकारक जन्माला आले. इ. स. पूर्व पाचव्या शतकात साधारणतः एकाच काळात या दोघांचा जन्म झाला. त्यांपैकी एक जैन संप्रदायाचे नेतृत्व करणारा महावीर हा होता व दुसरा भगवान बुद्ध हा होता. विषमतापूर्ण सामाजिक श्रेणीत परिणत होत असलेल्या कर्मकांडाच्या प्रसारावर जैन व बौद्ध तत्त्वज्ञान हे दोन अत्यंत प्रभावशाली उपाय होते. या दोन्ही संप्रदायांनी जनतेला कळणाऱ्या अशा जनभाषेत आपला उपदेश केला. आध्यात्मिक उन्नतीच्या क्षेत्रातील ठेकेदार बनून राहिलेल्या पुरोहितशाहीच्या मध्यस्थीविरुद्ध जैन व बौद्ध या दोन्ही संप्रदायांनी बंड केले. दुर्दैवाने जैन संप्रदायाचा या देशात फारसा प्रसार झाला नाही आणि भगवान बुद्ध जरी भारतात जन्माला आला असला तरी त्याच्याही धर्माचा प्रसार भारताच्या चतुःसीमांमध्ये झाला नाही. आपणांस

माहीतच आहे की बुद्ध धर्म सिलोन, ब्रह्मदेश व चीन या देशांत पसरला पण हिंदुस्थानात मात्र हिंदू तत्त्वज्ञानाने भागवत धर्म आणि शांकर अद्वैत या आपल्या दोन आयुधांनी बुद्ध धर्माचा प्रसार रोखला.

शंकराचार्यांनी जे अद्वैत तत्त्वज्ञान इतक्या प्रभावशाली रीतीने प्रसृत केले त्यात, निराळ्या रूपाने बुद्ध धर्मातील काही तत्त्वे निहित झालेली आपणास आढळतील. तथापि, शंकराचार्यांनी बुद्ध धर्मावर जो विजय मिळविला त्यामुळे कर्मठ आचारकांडाचा पुनः उदय झाला व देशाच्या सामाजिक जीवनात पुरोहितशाहीचे वर्चस्व पुनः प्रस्थापित होऊ लागले. बहुतेक सर्व देश या कर्मठ आचारकांडाने ग्रस्त झाला व त्याची परिणती भिन्न भिन्न जातींचा उद्भव होण्यात झाली. अशा स्थितीत बसवेश्वर इ. स. ११३२ साली जन्माला आला व त्याला या जातिव्यवस्थेशी टक्कर द्यावी लागली. बसवेश्वर आपल्या क्रांतिकारक तत्त्वज्ञानाचा उपदेश, कर्नाटकाची भाषा जी कानडी तिच्यातून करीत होता, तर इकडे महाराष्ट्रातही, ज्ञानेश्वर व तुकाराम यांच्या मार्गदर्शनाखाली वारकरी पंथ हा आपले त्याच आशयाचे तत्त्वज्ञान महाराष्ट्राची भाषा जी मराठी तिच्यातून लोकांपुढे मांडीत होता, हा एक योगायोगच होय. तथापि, यातही बसवेश्वरालाच जास्त मान दिला पाहिजे कारण की बसव-तत्त्वज्ञान हे वारकऱ्यांप्रमाणे काही केवळ सुधारणेचे तत्त्वज्ञान नाही तर ते एक क्रांतिकारक तत्त्वज्ञान आहे. बसवेश्वराची श्रेष्ठता यातच आहे आणि म्हणूनच मी सुरवातीला म्हटले की बसवाचे कार्य व उपदेश यांची बाकीच्या जगाला नीट माहिती झाली की, बुद्ध आणि महावीर यांच्याप्रमाणेच बसवेश्वरालाही मानाचे पान देण्यात येईल.

बसवेश्वराच्या सामाजिक तत्त्वज्ञानातील काही प्रमुख बाबींचे आताच आपल्या-पुढे विवरण करण्यात आले आहे. मी त्यांचा थोडक्यात पुनरुच्चार करतो. पहिले महत्त्वाचे व क्रांतिकारक असे रूढिभंजन त्या काळी बसवेश्वराने जर कोणते केले असेल तर ते ब्राह्मण पुरोहितांची मक्तेदारी मोडून काढणे हे होय. आपल्याला माहीत असेलच की सनातन हिंदू संस्कृतीने स्त्रीशूद्रांना अध्ययनाचा अधिकार नाकारला होता आणि परिणामतः त्यांना सर्व ज्ञानापासून वंचित ठेवले होते. त्याचप्रमाणे आपण हेही जाणता की पूर्वीच्या काळी सर्व ज्ञान हे संस्कृत भाषेच्या कड्याकुलुपात बंदिस्त होते. त्यामुळे आपल्या पूर्वसूरींच्या मार्गापेक्षा जर कोणत्या महत्त्वपूर्ण बाबतीत बसवेश्वराने आपला वेगळा मार्ग काढला असेल तर तो भाषेच्या; त्याने कानडी भाषेतून जनतेला प्रवचने देण्यास सुरवात केली. त्यामुळे साहजिकच बहुजनसमाज त्याच्याकडे ओढला गेला व त्याच्या संदेशाकडे लोकांचे लक्ष आपोआप वेधले गेले. बसवाच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचे दुसरे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य हे की त्याने त्या काळी सर्वत्र प्रचलित असलेल्या यज्ञयागादी क्रियांना आणि पशूंचे बळी देण्याला विरोध केला. महावीर व बुद्ध यांच्याप्रमाणेच यज्ञातील पशुबळीची

उपयुक्तता काय असा प्रश्न उपस्थित करून बसवेश्वराने या रूढीवर त्वेषाने टीका केली, आणि या त्याच्या टीकेचीच परिणती जातिव्यवस्थेवरील त्याच्या हल्ल्यावर झाली. ज्यात सर्वांत वरच्या श्रेणीतील माणूस हा आपल्याला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजून इतर त्याच्याचसारख्या असलेल्या मनुष्यप्राण्यांना अत्यंत कनिष्ठ समजतो, अशा जातिव्यवस्थेवर आधारलेल्या समाजरचनेचा बसवेश्वरांनी कडक निषेध केला आहे. सामाजिक समतेच्या तत्त्वाचा बसवाने इतक्या प्रभावीपणे उपदेश केला की त्याच्या अनुयायांना जात माहीत नाहीशीच झाली. 'आपले सर्व भक्त हे समान आहेत' असे त्याने आपल्या एका वचनात म्हटले आहे. लक्षात घ्या की हे काही १९५६ साली सामाजिक समतेसाठी सार्वजनिक व्यासपीठावरून केलेले आवाहन नाही; तर बाराव्या शतकात उपदेशिण्यात आलेले हे बसवेश्वराचे एक वचन आहे. त्यातही महत्त्वाची गोष्ट ही की हे वचन प्रत्यक्षात अनुसरण्यासाठी होते, आजकालच्या भाषणांप्रमाणे निव्वळ 'क्रियेवीण वाचाळता' नव्हते. बसवेश्वर हा 'बोले तैसा चाले' या वृत्तीचा मनुष्य होता आणि म्हणूनच त्याच्या अनुयायांत कोणताही जातिभेद मानण्यात येत नसे, हे त्याच्या वचनांवरून स्पष्ट दिसते. स्त्री आणि पुरुष यांच्यामध्येदेखील बसवेश्वराने संपूर्ण समता स्थापन केली. बसवेश्वराच्या एकंदर ३०० 'शरणां'पैकी सुमारे ७० 'शरणा' स्त्रिया होत्या. या गोष्टीचे महत्त्व किती आहे हे जाणून घेण्यासाठी, आज आपल्या विधानसभेत स्त्रीसभासदांची संख्या किती आहे, हे पाहाणे पुरेसे होईल. स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये वास्तविक आणि परिणामकारक अशी समता स्थापन व्हावी म्हणून बसवेश्वरांनी केलेला तो एक फार जोराचा प्रयत्न होता. बसवेश्वराच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा आणखी एक स्पृहणीय विशेष हा की जर तुमचा कर्मकांडाच्या उपयुक्ततेवर विश्वास नसेल तर स्वाभाविकतःच जातींच्या श्रेष्ठकनिष्ठत्वावरही तुम्ही विश्वास ठेवणार नाही आणि म्हणून एखाद्या व्यक्तीला हरिजन किंवा अस्पृश्य असे तुम्हांला मानता येणार नाही. श्री. पाटील[1] यांनी आपल्या स्वागतपर भाषणात आताच आपल्याला सांगितले की बसवेश्वराने एक अस्पृश्य मुलगा व एक ब्राह्मण मुलगी यांचे लग्न लावून दिले आणि त्याचा परिणाम त्या सर्वांचा सामाजिक छळ होण्यात झाला. आजही आपणाला लाजेने मान खाली घालायला लावतील असे हे प्रकार चाललेलेच नाहीत का? वृत्तपत्रात आपण वाचले असेल की मागच्याच आठवड्यात, ठाणे जिल्ह्यातील एका खेड्यात काही हरिजन कामगारांना, सामाजिक छळाला तोंड द्यावे लागले. त्याचप्रमाणे एका हरिजन मुलाचे ब्राह्मण मुलीशी लग्न लावल्याबद्दल बसवेश्वरालाही शिक्षा देण्यात आली व या जोडप्याच्या आईबापांना तर त्यांचे डोळे काढून घेण्याची अत्यंत रानटीपणाची शिक्षा देण्यात

१. मुंबईच्या बसव जयंती-उत्सव-समितीचे अध्यक्ष.

आली ! परिणामतः हा प्रयोग बसवेश्वराला काही काळ थांबवावा लागला. ऐहिक मानवी जीविताच्या संपूर्णतेवरही बसवेश्वराने फार जोर दिला आहे. लोकजीवनाकडे पाठ फिरवायची, वानप्रस्थ व्हावयाचे, या गोष्टींवर त्याचा मुळीच विश्वास नव्हता. आपले कर्तव्य हाच आपला पूजाविषय होय अशी त्याची श्रद्धा होती. या बाबतीतील त्याचे "कायकवे कैलास" (सतत उद्योगात रममाण होणे म्हणजेच मुक्ती मिळविणे होय) हे वचन प्रसिद्ध आहे. हे जग आणि मानवी जीवन हे मिथ्या नसून सत्य आहे व म्हणूनच मानवी बुद्धीपुढे उभे राहणारे प्रश्न हे खरे प्रश्न असून त्यांची सोडवणूक केली पाहिजे, असा हिंदू तत्त्वज्ञानाशी विसदृश उपदेशही बसवेश्वराने केला आहे. सत्य आणि सामाजिक न्याय यांच्यासाठी प्रयत्न करताना बसवेश्वराने कर्मश्रेष्ठत्वाचा सिद्धान्त आपल्या अनुयायांच्या मनावर बिंबविला आणि त्यातूनच पुढे, ज्याला 'अनुभव मंडप' व 'शिवानुभव मंडप' म्हणण्यात येते त्यांची स्थापना झाली. मला असे वाटते की आपल्या अलीकडच्या समाजसेवा करणाऱ्या संस्था जशा असतात तशाच या संस्था असाव्यात. स्त्री आणि पुरुष हे दोघेही त्यांत सामील होत असत आणि तेही लोकशाही पद्धतीने. समाजाच्या सर्व क्षेत्रांत समता स्थापन करण्याच्या बसवेश्वराच्या संदेशाचा प्रसार करण्याच्या दृढनिश्चयाने ते या संघांतून सामील होत असत. बसवेश्वराला जी क्रांती घडवून आणावयाची होती ती खरोखर सर्वांगीण होती. समाजातील श्रीमंत वर्गाचे बसवाने मोठे मार्मिक वर्णन केले आहे: "श्रीमंत लोकांना इहलोक व परलोक या दोन्हीतील उत्तम फायदे आपल्याला मिळावे अशी सवय जडलेली असते. इहलोकातील सर्व सुखे तर त्यांना पाहिजे असतातच; पण परलोकात गेल्यावर तेथेही शाश्वत आनंदाची प्राप्ती व्हावी म्हणून ते मृत्यूपूर्वी थोडा दानधर्म वगैरे करतात; ते ईश्वराच्या निवासासाठी मंदिरे बांधतात." श्रीमंत मंडळींच्या या ईश्वरभक्तीमुळे बसवेश्वराच्या मनावर काहीही परिणाम झाला नाही, तो आपल्या मार्गापासून ढळला नाही व विषमता निर्माण करणाऱ्या समाजातील अल्पसंख्य अशा धनिक वर्गावर त्याने टीका केली. यावरून त्याचे द्रष्टेपण दिसून येते. अशा युगप्रवर्तक, द्रष्ट्या महात्म्याच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी आजच्या रात्री आपण येथे जमलो आहोत.

अशा तऱ्हेचे समारंभ साजरे करण्यातील उद्दिष्ट काय असते? केवळ दर वर्षी पाळावयाची एक प्रथा किंवा रूढी म्हणून जर आपण असे समारंभ करीत असाल, तर बसवाने आपल्या आयुष्यभर जिचा अत्यंत तीव्रतेने तिरस्कार केला, नेमकी तीच गोष्ट आपण करीत आहात. दर वर्षी हा समारंभ करून आपल्या अभिमानाचे प्रदर्शन करावे अशा कनिष्ठ दर्जाच्या कल्पनेचा पगडा आपल्या मनावर बसू नये. बसव आपल्या जीवनकाळात ज्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी परिणामकारक रीतीने प्रयत्न करीत होता तेच प्रश्न आजही आपल्यासमोर उभे आहेत. आजच्या काळाच्या आव्हानाला जर आपणांस तोंड द्यावयाचे असेल तर बसवाच्या

शिकवणुकीतील काही भाग तरी आपणांस निश्चितच स्फूर्ती देऊ शकेल असे मला वाटते.

या देशातील राजकीय क्रांतीबद्दल पूर्ण आदर बाळगूनही मला असे वाटते की ही क्रांती थोडी उथळ स्वरूपाची झाली. राजकीय दास्यातून देशाची मुक्तता होत असताना या राजकीय स्वातंत्र्याचा सामाजिक व आर्थिक आशय कोणता याचे जनसमाजाला जितक्या सखोलपणे शिक्षण द्यावयाला पाहिजे होते तितके ते दिले गेले नाही. खुद्द बसवाच्या प्रयत्नांचे तरी फलित काय झाले? बसवाने आपल्या आयुष्यभर जातिव्यवस्थेविरुद्ध इतका धैर्याने तीव्र लढा दिला, पण आज त्याच्या अनुयायांमध्ये, जातिव्यवस्था मुळीच अस्तित्वात नाही असे आपण छाती-ठोकपणे म्हणू शकतो काय? स्वतंत्र लोकशाहीची पहिल्या क्रमांकाची शत्रू असलेली ही जातिव्यवस्था नष्ट करण्याचे आजपर्यंतचे सर्व प्रयत्न फसलेले आढळतात. त्यातही इतिहासात आपल्याला अशी विचित्र लीला दिसून येते की जेव्हा एखादा संत जातिव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी प्रयत्न करतो तेव्हा अंती भारतीय जीवनात आणखी एक नवीनच जात स्थापन होते. म्हणूनच मला असे वाटते की आजच्या रात्री जेव्हा आपण बसवाच्या उदात्त उपदेशाचे स्वतःला स्मरण करून देत आहोत, तेव्हा आपणा सर्वांना मी अशी प्रार्थना करणे अत्यंत युक्त होईल की ज्या मूलभूत तत्त्वांसाठी बसवाने आपले आयुष्य वेचले त्यांच्याशी जातिव्यवस्था ही पूर्णपणे विसंगत आहे व म्हणून आपण ती मोडून काढली पाहिजे. विशेषतः माझ्या लिंगायत मित्रांना माझी ही विनंती आहे; आणि मी त्यांना आणखी असेही विनवितो की आपण फक्त आपल्या थोर संताभोवतीच घोटाळत राहू नका; तर दूरदूरच्या खेड्यापाड्यांतून जाऊन सामाजिक समतेचा संदेश आपण उच्च स्वाने सर्व जनतेला कथन करा. बसवेश्वर व त्याचा उपदेश यांच्यापासून जातिनिर्मूलनाच्या कार्याची स्फूर्ती घेणे हेच अशा प्रसंगाचे एकमेव औचित्य असू शकते. त्यासाठी संपूर्ण समाजाच्या सदसद्विवेकबुद्धीला आवाहन करण्याची गरज आहे आणि असे आवाहन करताना, महात्मा बसवेश्वराइतका उत्कृष्ट मार्गदर्शक आपल्याला दुसरा कोणता लाभू शकेल?

गोपाळ गणेश आगरकर

आगरकरांचे जीवनचरित्र

उद्या अखिल महाराष्ट्रीय जनता गोपाळ गणेश आगरकर ह्यांच्या स्फूर्तिदायक स्मृतीला सादर श्रद्धांजली वाहणार आहे. १४ जुलै १८५६ रोजी कऱ्हाडजवळ टेंभू या गावी आगरकरांचा जन्म गरीब पण शीलसंपन्न अशा कुटुंबात झाला व १७ जून १८९५ रोजी ज्या दुर्दम्य दम्याविरुद्ध आगरकर जन्मभर दुर्दम्य अशा उत्साहाने झगडले त्या दम्याच्या निष्ठुर प्रभावाला पुणे येथे ते बळी पडले. ह्या ३९ वर्षांच्या अल्पावधीमध्ये आगरकर यांनी केवढे महनीय कार्य केले हे पाहाण्यासाठी त्यांच्या जीवनातील घटनांचा विहंगमदृष्ट्या थोडक्यात परिचय करून घेणे इष्ट होईल. १८६८ पर्यंत आगरकर यांनी कऱ्हाड येथे इंग्रजी तीन इयत्ताअखेर अभ्यास पार पाडला. गरिबीमुळे १८६९ साली त्यांना कऱ्हाड येथे दिवाणी कोर्टात उमेदवारी करणे जरूर झाले. पुढे रत्नागिरीस जाऊन शागीर्दगिरीचा पेशा करीत असताना आगरकरांनी इंग्रजी चौथ्या व पाचव्या इयत्तांचे शिक्षण पूर्ण केले. १८७२ साली आगरकर कऱ्हाडला परत आले व तेथील एका दवाखान्यात त्यांनी कंपाऊंडरची नोकरी पत्करली. त्याच वर्षी जूनमध्ये आगरकर अकोल्यास गेले व १८७५ साली त्यांची प्रवेशपरीक्षा पास झाली. श्रीयुत महाजनी यांनी दिलेले पन्नास रुपये बरोबर घेऊन आगरकर १८७६ साली डेक्कन कॉलेजमध्ये शिक्षण घेण्यासाठी पुण्यास आले पण केवळ पन्नास रुपयांवर विश्वविद्यालयीन शिक्षण मिळविणे अशक्य असल्यामुळे त्यांनी 'एकत्र हिंदु कुटुंबपद्धती' या विषयावर निबंध लिहून बक्षीस मिळविले. शिवाय जास्त पैसा मिळवून शिक्षणाची सोय करण्याकरिता आगरकर एक नाटक लिहिण्याच्या खटपटीस लागले पण त्याच सुमारास त्यांचे गुरू केरूनाना छत्रे यांनी मोठ्या उदार अंतःकरणाने आगरकरांना आर्थिक

मदत केल्यामुळे आगरकरांचे शिक्षण फार कष्ट न होता पुढे चालू झाले. कॉलेजमध्ये असताना केवळ एका सद्‌ग्यावर आगरकरांना दिवस काढावे लागले, ही गोष्ट आजच्या विद्यार्थ्यांना खरीसुद्धा वाटणार नाही. १८७८ साली आगरकर बी. ए. ची परीक्षा पास झाले. त्यानंतर डेक्कन कॉलेजमध्ये दक्षिणा फेलो म्हणून त्यांची नेमणूक झाली. १८७९ साली आगरकर व टिळक यांचा स्नेह जमून सरकारी नोकरी न पत्करता समाजसेवेला व विशेषतः शिक्षणप्रसाराला आपले आयुष्य वाहाण्याचा निश्चय या दोघा स्नेह्यांनी डेक्कन कॉलेजमध्ये केला. त्या प्रतिज्ञेनुसार १८८० साली पुणे येथे न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना झाली.

१८८१ साली आगरकर एम्. ए. होऊन न्यू इंग्लिश स्कूलला मिळाले. त्याच वर्षी मराठा व केसरी ही दोन्ही वर्तमानपत्रे सुरू झाली. वर्तमानपत्राच्या जीवनातील पहिल्याच वर्षी बर्वे प्रकरणाचा उद्‌भव होऊन टिळक व आगरकर यांना डोंगरी कारागृहात १०१ दिवस मुक्काम करावा लागला. १८८४ साली फर्ग्युसन कॉलेजची स्थापना झाली. १८८७ साली आगरकरांनी केसरी सोडला व पुढील वर्षी त्यांनी आपला 'सुधारक' सुरू केला. सुधारक पत्र काढल्यानंतर अहर्निश सुधारणेचा संदेश महाराष्ट्रीय जनतेला पोहोचविण्याचे कार्य आगरकरांच्या लेखणीने मोठ्या उत्साहाने व सामर्थ्याने पार पाडले. १८९५ साली आगरकरांची प्रकृती दम्यामुळे फारच बिघडली व त्या रोगाचाच जोर वाढून १७-६-१८९५ रोजी आगरकर मृत्युलोकातून अंतर्धान पावले. आपल्या समाजसेवेच्या जीवनाला सुरवात करण्यापूर्वी आगरकरांनी आपल्या आईला एक पत्र लिहून आपल्या आशाआकांक्षांचे तिला ज्ञान करून दिले होते. आगरकर आपल्या आईला लिहितात " ...आपल्या मुलाच्या मोठाल्या परीक्षा पास होत आहेत. आता त्याला मोठ्या पगाराची नोकरी लागेल व आपले पांग फिटतील अशा मोठमोठ्या इच्छा तू करीत असशील, पण मी आताच तुला सांगून ठेवतो की, अधिक सुखाची हाव न धरता मी फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून सर्व वेळ लोकांच्या हिताकरिता खर्च करणार आहे."

ऐश्वर्याकडे पाठ फिरविली

आगरकर एम्. ए. ची परीक्षा पास झाले तेव्हा विपुल पैसा मिळवून ऐषारामात व सुखात आयुष्य घालविण्याचे अनेक मार्ग त्यांना सहजगत्या उपलब्ध झाले असते. पण ऐहिक सुखाकडे दुर्लक्ष करून समाजसेवेचे कंकण हातात बांधण्याचा निश्चय त्यांनी कॉलेजमध्ये असतानाच केला आणि समाजसेवेचे हे कठोर व असिधाराव्रत त्यांनी एकनिष्ठेने आजन्म पाळले यातच आगरकरांची थोरवी साठलेली आहे. महाराष्ट्र आर्थिक दृष्ट्या गरीब असेल पण विद्वत्ता, चारित्र्य, त्यागबुद्धी व देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अन्यायांविरुद्ध बंड

करण्याची प्रवृत्ती यांमध्येच महाराष्ट्राचे वैभव व सामर्थ्य आहे असे महाराष्ट्राचा इतिहास सांगतो. या महाराष्ट्राच्या वैशिष्ट्याचे अत्यंत विलोभनीय व स्फूर्तिदायक उदाहरण म्हणून आगरकरांच्या चरित्राचा निःसंशय उल्लेख करता येईल.

पुरोगामी बुद्धिवादाचे पहिले आचार्य

आगरकर हे महाराष्ट्रातील पुरोगामी बुद्धिवादाचे प्रमुख व प्रथम आचार्य होत असे मला वाटते. तर्कनिष्ठा हे बुद्धिवादाचे मुख्य ब्रीद असते. तर्कनिष्ठेचा स्वीकार हे फार कठीण असे व्रत आहे. कारण तर्कनिष्ठेला धर्मनिष्ठेशी, परंपरेशी, अंधश्रद्धेशी व व्यक्तिपूजेशी सदैव झगडा द्यावा लागतो. शाश्वत जीवनमूल्यांबद्दल निर्णय करताना पुरोगामी बुद्धिवाद गतइतिहासाचा चिकित्सक दृष्टीने अभ्यास करतो पण सामाजिक, आर्थिक अथवा राजकीय समस्या सोडविताना ज्या मूल्यांवर पुरोगामी बुद्धिवाद श्रद्धेने निष्ठा ठेवतो ती मूल्ये तर्कशुद्ध असली पाहिजेत असा पुरोगामी बुद्धिवादाचा आग्रह असतो. पुरोगामी बुद्धिवादाचा स्वीकार करणाऱ्या समाजसेवकाला लोकप्रियतेबद्दल विशेष अपेक्षा ठेवण शक्य नसते; किंबहुना 'न ब्रूयात् सत्यमप्रियम्' हे मुत्सद्देगिरीचे धोरण पुरोगामी बुद्धिवादाला कधीच मान्य होत नाही. आपली सुधारणाविषयक मते स्पष्टपणे प्रभावी भाषेत मांडल्यामुळे आगरकरांना आपल्या आयुष्यात परंपराप्रेमी समाजाकडून किती उपद्रव सोसावा लागला ह्याचे वर्णन वाचल्यानंतर पुरोगामी बुद्धिवादाचा प्रचार करणे हे एक कठोर व कठीण व्रत आहे असे पटल्याशिवाय राहाणार नाही.

सामाजिक-आर्थिक अन्यायाविरुद्ध तर्काचे हत्यार

पुरोगामी बुद्धिवाद हा साहजिकच जीवनमूल्ये ठरविताना सर्वदर्शी व सर्वांगीण प्रवृत्तीचा स्वीकार करतो. तर्काचे हत्यार केवळ राजकीय अन्यायाविरुद्ध उभारून पुरोगामी बुद्धिवाद समाधान मानीत नाही. तेच हत्यार तितक्याच निष्ठेने आणि कठोरपणे पुरोगामी बुद्धिवाद सामाजिक आणि आर्थिक अन्यायाविरुद्धही उपसतो. त्यामुळे पुरोगामी बुद्धिवाद हा राजकीय प्रश्नांवर जहाल पण सामाजिक व आर्थिक प्रश्नांवर मवाळ अशी भूमिका कधी स्वीकारीत नाही. महाराष्ट्राचा किंबहुना अखिल भारताचा गेल्या पाऊणशे शंभर वर्षांचा इतिहास असे दाखवितो की, राजकारणात जहाल असणारे निष्ठावंत देशभक्त सामाजिक अगर आर्थिक प्रश्नांवर तितकी जहाल दृष्टी ठेवीत नसत किंबहुना राजकारणातील जहाल हा समाजकारणातील मवाळ व समाजकारणातील जहाल हा राजकारणातील मवाळ अशी परंपराच तत्कालीन इतिहासाला पटल्यासारखी दिसत होती. पण ह्या परंपरेला आगरकरांचे जीवन व त्यांचा संदेश हा एक महनीय अपवाद होता. हेच आगरकरांच्या शिकवणुकीचे असामान्य वैशिष्ट्य आहे. आगरकरांच्या तेजस्वी लेखणीने, राजकीय, सामाजिक व

आर्थिक समतेचा प्रचार करण्याकरिता पुरोगामी बुद्धिवादाचा दिव्य संदेश सुधारक वर्तमानपत्रातून अव्याहतपणे महाराष्ट्रीय जनतेला दिला ही गोष्ट आज अखिल महाराष्ट्रीय जनता मोठ्या अभिमानाने मान्य करील. आर्थिक समतेवर आधारलेले समाजरचनेबद्दलचे आगरकरांचे विचार किती परिपक्व व दूरदर्शी होते हे पाहावयाचे असल्यास आगरकरांचे खालील शब्द ऐका...

"विचार करणारा, उपभोग घेणारा व काम करणारा असे जे सांप्रत काळी प्रत्येक देशात तीन ठळक वर्ग दृष्टीला पडतात ते कायमचे नव्हेत. हळूहळू प्रत्येक व्यक्तीस विचार, उपभोग आणि काम हे समप्रमाणात करावे लागून साऱ्यांच्या सुखानुभवांची यत्ता सारखी होत जाणार आहे. आणि जो जो ती तशी होईल तो तो माणसाची खरी उन्नती होऊ लागेल असे म्हणता येईल."

साधनांच्या शुचितेची जाणीव

राजकीय, सामाजिक आणि आर्थिक समतेचा प्रचार करताना पुरोगामी बुद्धिवादाला साधनांच्या शुचितेबद्दल फार निष्ठेने दक्ष असावे लागते ह्याची जाणीव आगरकरांच्या सर्व लेखांतून प्रत्ययास येते. अंधश्रद्धेवर, खोट्या परंपरांच्या अभिमानावर, प्रतिगामी प्रवृत्तींवर आणि अज्ञ समजुतींवर कडाक्याने व प्रखरपणे हल्ला करतानासुद्धा व्यक्तिशः प्रतिपक्षीयांवर कधीही हल्ला न करण्याची खबरदारी आगरकर नेहमीच घेत असत. सर्व सामाजिक व आर्थिक प्रश्नांचा विचार करताना तत्त्वावर लक्ष ठेवून व्यक्तिनिरपेक्ष दृष्टीचा स्वीकार करणे किती आवश्यक आहे हे आज तरी कोणास सांगावयास नको. साधनांच्या शुचितेबद्दल दक्षता न पाळली तर समाजाच्या सदभिरुचीला फार धोका पोहोचण्याची भीती असते ही गोष्ट समाजसेवकांनी सदैव लक्षात ठेवणे जरूर आहे. म्हणून आगरकरांचे लेख वाचताना त्यांनी लोकांच्या अभिरुचीला धक्का न लावता जे तात्त्विक विवेचन केले ते कठोरपणे, निर्भीड भाषेत पण उच्च पातळीवरून कसे केले ह्या गोष्टीचे दर्शन आजही मोठे उद्बोधक होईल असे मला वाटते. टिळक आणि आगरकर यांचे अनेक प्रश्नांवर कडाक्याचे व स्मरणीय असे वाद झाले, पण ह्या वादांचा खाजगी स्नेहाशी मुळीच संबंध नव्हता ह्याची आगरकरांनी प्रांजलपणे दिलेली ग्वाही आपण ऐका.

"टिळक आणि आगरकर ह्यांचा खाजगी द्वेष — आणि तो कशासाठी? टिळक आगरकरांचे किंवा आगरकर टिळकांचे काही एक लागत नाहीत आणि म्हणून एकाला दुसऱ्याचा द्वेष करण्याचे कारण आजपर्यंत झालेले नाही; इतकेच नाही तर त्यांपैकी एकाच्या मनाने तरी ते केव्हाच होण्याचा संभव नाही. खुद्द आगरकरांच्या किंवा आगरकरांच्या निकट आप्तांच्या डोळ्यांस पाणी येण्यासारखी काही अनिष्ट गोष्ट घडेल तेव्हा इतरांपेक्षा टिळकांस आणि टिळकांच्या घरी असा अनिष्ट प्रकार घडेल तेव्हा आगरकरांस विशेष वाईट वाटून डोळ्यास पाणी येईल

आणि मतभेदांमुळे उत्पन्न झालेल्या वैराचा क्षणात विसर पडून एक दुसऱ्यास मदत करण्यास सहज प्रवृत्त होईल."

विरोधाला न जुमानता कार्यावर निष्ठा

पुरोगामी बुद्धिवादाचा प्रचार करीत असताना समाजातील बहुसंख्य घटक सुधारणांच्या विरुद्ध असतात ह्याची आगरकरांना पूर्ण जाणीव होती पण लोकसेवेचे व्रत स्वीकारून नंतर समाजसेवेचा संदेश जनतेला देत असताना आपल्या आयुष्यात कार्याला यश मिळेल की नाही याची चिंता आगरकरांनी कधीच बाळगिली नाही. आगरकरांच्या जीवनात व त्यांच्या विविध विषयांवरील स्फूर्तिदायक लेखनात दुर्दम्य आशावाद आणि वर आत्यंतिक निष्ठा यांचे प्रतिबिंब पदोपदी दृष्टीस पडते. 'विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमाना प्रारब्धमुत्तमजनाः न परित्यजन्ति' ह्या कविवचनाचे विलोभनीय उदाहरण म्हणून आगरकरांच्या जीवनाकडे निःसंशय बोट दाखविता येईल. लोकांच्या टीकेचा भडिमार होत असताना साहजिकच आगरकरांना कधी कधी उद्वेग वाटल्याशिवाय राहिला नसेल. पण लोकांच्या अप्रीतीचा पारा कितीही वर चढला तरी हा लोकोत्तर सुधारक आपल्या समाजसेवेच्या मार्गापासून कधीही ढळला नाही. 'महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र' हा आगरकरांचा लेख वाचून ज्याचे डोळे अश्रूने ओलावणार नाहीत असा महाराष्ट्रीय आज तरी मिळणे दुर्मिळ आहे. प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपला संदेश सुधारक वर्तमानपत्रातून प्रत्येक आठवड्यास पोहोचवीत असताना आगरकरांची निष्ठा व उत्साह किती अलौकिक होता हे पाहावयाचे असल्यास त्यांच्या दुर्दमनीय वृत्तीचे सुंदर चित्र प्रतिबिंबित झालेले पुढील उद्गार आपण ऐका.

"कोण स्वस्थ बसणार? सुधारक अं? टाकातून अर्थबोधक अक्षरे काढण्याचे सामर्थ्य असेल व ते वाचण्यास एक इसम तरी तयार असेल तोपर्यंत हे स्त्रैण कर्म सुधारकाला स्पर्श करू शकणार नाही."

आगरकरांचा संदेश

उद्या आगरकरांच्या पुण्यस्मृतीला श्रद्धांजली अर्पण करीत असताना आगरकरांच्या लेखनातून कोणता संदेश आपण घेणार? राजकीय पारतंत्र्याचा प्रश्न सुटला असून, आता भारतात स्वातंत्र्ययुग सुरू झाले आहे. पण राजकीय स्वातंत्र्याने सामाजिक व आर्थिक विषमता आपोआप नष्ट होत नाही. राजकीय स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर सहजच सर्व सामाजिक आणि आर्थिक समस्या सुटतील ही कल्पना भ्रांतिमूलक असल्याचे आता सिद्ध झाले आहे. म्हणून सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करण्याचे कार्य अद्यापि अपुरे राहिलेले आहे. आज आपल्या देशात लोकशाहीच्या मार्गाने लोककल्याणाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवण्यात आले असून

सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करण्याचे भगीरथ प्रयत्न सर्व दिशेने सुरू झालेले आहेत. अशा महत्त्वाच्या काळात आगरकरांचा सामाजिक व आर्थिक समतेचा संदेश आज बहुजनसमाजाला समजावून व पटवून देण्याचे कार्य आजच्या तरुण पिढीने अंगिकारिले पाहिजे. सामाजिक व आर्थिक समता ही केवळ कायद्याच्या जोरावर कधीच पूर्णपणे प्रस्थापित होऊ शकत नाही. सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करण्याकरिता अखिल समाजाच्या अंतरात्म्याला आवाहन करणे फार अवश्य आहे व त्याकरिताच लोकशिक्षणाचे व लोकजागृतीचे कार्य महत्त्वाचे असते. हे कार्य पार पाडण्याचा आगरकरांचा संदेश आपणास निःसंशय मार्गदर्शन करील असे मला वाटते.

टिळक आणि आगरकर

महाराष्ट्राच्या वैचारिक विश्वात टिळक आणि आगरकर यांचा वाद खूपच गाजून गेल्यामुळे त्या उभयतांची तुलना करण्याची आपल्याकडे पद्धत पडून गेली. या तुलनेत अमुक बरोबर, तमुक चूक असा अभिप्रायही विद्वान मंडळी देत असतात. चिपळूणकर-टिळक-आगरकर यांच्या काळाविषयी विवेचन करताना, आगरकरांची स्तुती करायची म्हणजे टिळकांनी काय काय केले नाही हे सांगावयाचे व टिळकांची स्तुती करावयाची म्हणजे आगरकर कुठे चुकले हे सांगावयाचे अशी आमच्याकडे प्रथा आहे. जणु काही एकाच्या उणिवा दाखविल्याशिवाय दुसऱ्याचे श्रेष्ठत्व सिद्धच होऊ शकत नाही. परंतु या विचारसरणीमुळे या थोर व्यक्तींच्या जीवनकार्याविषयी जो महत्त्वाचा विचार आज केला पाहिजे त्याला आपण मुकतो. चिपळूणकर-टिळक-आगरकर या तीनही व्यक्ती आता इतिहासात जमा झाल्या आहेत व काळ त्यानंतर सर्वच बाबतीत कितीतरी पुढे गेला आहे. म्हणून या तिघांच्याही जीवनाकडे व्यापक ऐतिहासिक दृष्टीने आपण पाहिले पाहिजे. असे पाहिले असता आपणांस दिसेल की या तिघांचे कार्य एकमेकांस पूरकच होते. त्यात श्रेष्ठ-कनिष्ठता किंवा चूक-बरोबर ठरविण्याचा प्रश्न येत नाही. परक्यांनी हिरावून नेलेला स्वाभिमान चिपळूणकरांनी आपल्या तेजस्वी लेखणीने जागृत केला; लोकमान्यांनी "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे" ही घोषणा करून या स्वाभिमानाचा राजकीय अर्थ व आशय काय असावा हे सांगितले तर आगरकरांनी 'इष्ट असेल तेच बोलणार व सत्य असेल तेच सांगणार' असे महाराष्ट्रीय सुशिक्षितांस आवाहन करून हा स्वाभिमान सत्य, न्याय व बुद्धिवाद यांवर आधारित असला पाहिजे हे सांगितले. एकमेकांस पोषक असेच या तिघांचे कार्य होते. तीस वर्षांपूर्वी कर्नाटक कॉलेजात शिकत असताना 'एकच प्याला' या नाटकात मी रामलालची भूमिका केली होती. "टिळक व आगरकर यांच्यातील वाद आकाशातील तारकांप्रमाणे होत" अशा आशयाचे रामलालचे वाक्य मला

आजही आठवते. म्हणून मी तिघांच्याही जीवनकार्याकडे एकाच भावनेने पाहातो. आणि या भावनेने पाहिले असताच आजच्या परिस्थितीत उपयुक्त असा संदेश या त्रिमूर्तीच्या जीवनापासून आपणांस मिळू शकेल. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाची समाजरचना कशी होणार हे आगरकर त्या काळापासून सांगत होते. हे त्यांचे कार्य टिळकांच्या कार्याला पूरक व पोषकच होते. आजही आधी आर्थिक समता की आधी सामाजिक समता असा वाद काही लोक उपस्थित करतात. पण हा वाद घालणे निरर्थक आहे; कारण आजच्या लोकशाहीच्या युगात ही दोन्ही कार्ये एकदमच चालून ती परस्परांस पूरक होणार आहेत. निवळ आर्थिक समतेने सामाजिक समता पूर्णपणे प्रस्थापित होईल असे मला वाटत नाही. तसेच महाराष्ट्रात अंधश्रद्धा नाही, तो पूर्णपणे बुद्धिवादी आहे असे दाखविण्यासाठी जीवनात कुठेही श्रद्धास्थानच उरले नाही, अशी परिस्थिती निर्माण होऊ नये. कोणत्याही मूल्यावर श्रद्धाच न उरल्यामुळे समाजाचे तारू भरकटत जाते की काय असा संशय येण्यासारखी स्थिती उत्पन्न झाली आहे. म्हणून क्रांतिकारक व्यक्तींनी राजकारणाबरोबरच सामाजिक चळवळींमध्ये जशी धडाडी दाखविली पाहिजे, तशीच समाजाची सर्व श्रद्धास्थाने नष्ट होऊ नयेत याचीही काळजी घेतली पाहिजे. बुद्धिवाद्यांनी उपहासाचे शस्त्र टाकून, जीवनाच्या शाश्वत मूल्यांवर समाजाची श्रद्धा कायम राहील असा प्रयत्न सतत केला पाहिजे.

२३ जुलै रोजी अखिल राष्ट्र टिळकांचे पुण्यस्मरण करणार आहे. ज्या राजकीय स्वातंत्र्याकरिता टिळक जन्मभर झगडले आणि कष्टिले ते राजकीय स्वातंत्र्य आता मिळाले असल्यामुळे टिळकांचे पुण्यस्मरण करताना सर्व जनतेच्या मनात कृतज्ञतेची आणि कृतकृत्यतेची भावना उसळल्याशिवाय राहाणार नाही; पण आगरकरांचे कार्य अद्यापि अपुरे असल्यामुळे त्यांचे पुण्यस्मरण करताना कृतज्ञते-बरोबरच कर्तव्याची भावना अखिल महाराष्ट्रीय जनतेच्या मनात जागृत झाल्याशिवाय राहाणार नाही असा मला विश्वास वाटतो.

Lives of great men all remind us.
We can make our lives sublime.

हे वचन लक्षात घेऊन आगरकरांच्या जीवनाचा आणि संदेशाचा अभ्यास केल्याने सामाजिक आणि आर्थिक समतेचा अविरत प्रचार करण्याची निष्ठा आपणा सर्वांच्या मनात निर्माण होईल यात मुळीच संदेह नाही. म्हणूनच श्रद्धेने, आदराने आणि कर्तव्यबुद्धीच्या जागृतीने आपण आगरकरांच्या पुण्यस्मृतीला अभिवादन करू या.

महर्षी धोंडो केशव कर्वे

"मी जिवंत असेतो माझ्या आवडीनुसार आपले संपूर्ण जीवन राष्ट्रीय पुनरुज्जीवनाच्या कार्यास वाहून घेण्यासाठी परमेश्वराने मला इच्छाशक्ती व सामर्थ्य द्यावे. माझी सर्व स्वप्ने साकार झालेली आहेत हे पाहाण्याइतका मी दीर्घकाल जगेन, असे वाटत नाही. पण पुनर्जन्माचा सिद्धान्त काही खरा असेल, तर पुन्हा या देशातच जन्माला यावे आणि स्त्रियांच्या पुनरुद्धाराचे कार्य पूर्ण करण्यासाठी पुन्हा आपले संपूर्ण जीवन वाहून टाकावे, अशीच माझी इच्छा राहील. माझ्या कार्याला पूर्ण यश मिळाले आहे असे दिसल्यानंतरच मी आनंदाने पृथ्वीवरील माझे अस्तित्व सोडून अनंतात विलीन होईन!"—अशी प्रार्थना धोंडो केशव कर्वे यांनी आपल्या आत्मचरित्राच्या शेवटी दि. ४ सप्टेंबर १९१५ रोजी केली आहे. ही उत्कट आणि स्फूर्तिप्रद प्रार्थना, स्त्रियांच्या पुनरुद्धारासाठी आपले संपूर्ण जीवन वाहाण्याच्या डॉ. कर्वे यांच्या इतर कोणत्याही शब्दांपेक्षा अधिक बोलकी आहे.

"दीर्घकाळ आणि कंटाळवाणे जगण्यात कोणाला मौज वाटेल?" (अतिदीर्घं जीविते को रमेत) असा एक प्रश्न प्राचीन उपनिषद्काळात एका उपहासकाराने विचारला आहे. या उपहासगर्भ प्रश्नाला 'ईशावास्योपनिषदा'ने विश्वासपूर्वक उद्बोधक उत्तर दिले आहे की, "आपली स्वतःची कर्तव्ये पार पाडीत शंभर वर्षे जगण्याची प्रत्येकाने आनंदाने अपेक्षा बाळगिली पाहिजे." (कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतं समाः।) शताब्दीच्या वेळीही नेहमीप्रमाणेच तरुण दिसणारे कर्वे यांचे समर्पित जीवन म्हणजे या उपनिषदातील उक्तीचे तेजस्वी उदाहरणच होय.

कर्वे यांचे जीवन म्हणजे सर्वसामान्यपणे सामाजिक सुधारणेसाठी आणि विशेषतः स्त्री शिक्षणासाठी अक्षरशः वाहिलेले आधुनिक ऋषीचे जीवन होय. कर्वे

यांच्या जीवनाची गाथा वाचणे हे अत्यंत आकर्षक आणि प्रेरणा देणारे आहे. या चरित्राच्या प्रत्येक पानातून त्यांच्या आयुष्याला प्रवृत्त करणारा, ओढून नेणारा एकच एक ध्यास आणि त्यांना अत्यंत प्रिय वाटणाऱ्या कार्याची त्यांनी अत्यंत तळमळीने चालविलेली साधना यांचे खरोखरी दर्शन होते! शंभर वर्षे म्हणजे जीवनाचा सामान्यपणे बराच मोठा पल्ला वाटतो. पण कर्वे यांच्या या जीवनकथेवरून हे स्पष्ट दिसते की, शंभर वर्षांच्या ह्या दीर्घ कालावधीतसुद्धा समाजसुधारणा आणि राष्ट्रसेवा यांच्या कित्येक कार्यांनी अक्षरशः गर्दी केलेली आहे.

त्यांच्या कार्यासंबंधी साधे, अनलंकृत निवेदन केले तरी मी काय म्हणतो त्यातील सत्यता प्रत्ययास येईल.

कर्वे यांचा जन्म दि. १८ एप्रिल १८५८ साली शिरवली येथे झाला. मुरबाडीस, शिक्षण घेण्याच्या काळात त्यांना प्रतिकूल परिस्थितीशी झगडावे लागले. इ. स. १८६९ साली मराठी सहावी इयत्ता ही पहिली सरकारी परीक्षा म्हणून मान्य करण्यात आली व ती परीक्षा मुंबई किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी घेण्यात येत असे. मुरुड येथून कर्वे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या परीक्षेस बसण्यासाठी मुंबईस जाण्याचा धाडशी पण अपयशी प्रयत्न करून पाहिला. हा मुंबईचा प्रवास आंजर्लेल्या खाडीतून करावा लागला आणि प्रवास सुरू झाला नाही तोच मुसळधार पाऊस आणि वादळ यांनी दुर्लंघ्य अडथळा निर्माण केला. या निराशाजनक अनुभवाने घाबरून न जाता या महत्त्वाकांक्षी आणि उत्साही विद्यार्थ्यांनी साताऱ्याचा त्या काळी असुरक्षित आणि तापदायक असलेला रस्ता धरला आणि चार दिवसांत पायी ११० मैलांचे दूरचे अंतर तोडले. ही विद्यार्थी मित्रमंडळी परीक्षा ज्या दिवशी सुरू होते, त्याच दिवशी साताऱ्यास पोचली. पण कर्वे जेव्हा परीक्षामंडळाच्या प्रमुखासमोर गेले, तेव्हा त्यांनी कर्वे यांचा परीक्षेस बसण्याची परवानगी मागणारा अर्ज नामंजूर केला. कारण त्यांच्या दिसणाऱ्या ठेंगण्या मूर्तीवरून त्यांना परीक्षेस बसण्यासाठी आवश्यक असलेली सोळा वर्षे पूर्ण झाली नसावीत असे परीक्षाप्रमुखांना वाटले. कर्वे यांच्या जीवनातील या घटनेने त्यांच्या स्वभावाची दोन उल्लेखनीय वैशिष्ट्ये स्पष्ट होतात : एकदा कर्वे यांनी विशिष्ट ध्येय साध्य करण्याचा निर्णय घेतला की त्यासाठी मार्गात येणाऱ्या अडचणी आणि ध्यावे लागणारे कठीण परिश्रम यांच्यामुळे ते कधी नाउमेद झाले नाहीत आणि अंतिम यशाने त्यांच्यावर कृपा केली नाही, तरी त्यांचा उत्साह कधी मावळला नाही. आनंदाने भविष्याकडे पाहून, न भिता, न घाबरता पूर्ण निर्धाराने आपल्या ध्येयाच्या दिशेने त्यांचे मार्गक्रमण चालू राहिले. सातारा येथे सहाव्या इयत्तेच्या परीक्षेस त्यांना बसण्याची परवानगी देण्यात आली नाही, त्यामुळे विफलतेच्या भावनेने त्यांना ग्रासले. तथापि त्यांनी न डगमगता आपले आगेकूच चालू ठेवले.

पुढे कालांतराने तरुण कर्वे काही वर्षांनंतर अपरिहार्यतःच मुंबईस आले.

मॅट्रिकच्या परीक्षेपर्यंत, त्यांनी मिळविलेल्या अनेक शिष्यवृत्त्या आणि केलेल्या अनेक शिकवण्या यांची त्यांना बरीच मदत झाली. त्याच दिवसात कर्वे यांचा नरहर बाळकृष्ण जोशी यांच्याशी निकट संबंध आला आणि या दोन तरुणांनी अनेक अडचणींना तोंड दिले, सतत परिश्रम आणि चिकाटी कायम ठेवून काटकसरीने ते दिवस काढले आणि केवळ स्वतःच्या प्रयत्नांनी स्वतःचे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. गणित हा खास विषय घेऊन १८८४ साली कर्वे पदवीधर बनले. मुरूडसारख्या मागासलेल्या आणि आडमार्गी असलेल्या खेड्यातून शिक्षणासाठी मुंबईस येणाऱ्या एका तरुणाने आपल्या विद्यार्थीदशेच्या अखेरीस एवढे यश मिळवावे, हे खरोखरच अत्यंत प्रशंसनीय होते.

कर्वे नंतर शिक्षक बनले. कारण शिकविणे आणि निरामय तरुण मनांना शिक्षण देणे त्यांना आवडत असे. कॅथेड्रल गर्ल्स हायस्कूल आणि अलेक्झांड्रा गर्ल्स हायस्कूल येथील पार्टटाइम नोकरी आणि इतर कित्येक खासगी शिकवण्या यांच्यामुळे कर्वे सकाळी साडेचारपासून रात्री उशिरापर्यंत दर दिवशी कार्यमग्न असत. ते दररोज निरंतर कामात गुंतलेले असले तरी कर्वे यांच्या डोळ्यासमोर सतत समाजसेवेचे स्वप्न तरळत असावयाचे. म्हणूनच शिक्षक या नात्याने ते राजारामशास्त्री भागवत यांना त्यांच्या मराठा हायस्कूलमध्ये जाऊन मिळाले. आपण आपले सर्व आयुष्य शिक्षणास वाहू आणि आपल्या सर्व कार्याचे आणि चळवळीचे केंद्र मुंबई हेच करावे लागेल, असे त्यावेळी कर्वे यांना वाटत होते. पण दैवाची इच्छा निराळीच होती.

कर्वे यांना १८९१ साली, फर्ग्युसन कॉलेजचे गोपाळ कृष्ण गोखले यांचे आपुलकीचे, अनपेक्षित पत्र आले की, डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना करणाऱ्या पुण्याच्या थोर लोकांत त्यांनी येऊन सामील व्हावे. मध्यंतरीच्या काळात त्यांची पत्नी राधाबाई यांच्या शोचनीय मृत्यूमुळे वियोगाची छाया त्यांच्या जीवनावर पडली होती आणि म्हणून राजारामशास्त्री भागवत यांच्या आशीर्वादाने कर्वे यांनी त्या वेळी जीवनात बदल करण्याचा निर्णय घेतला व निस्संशयपणे काहीशा संकोचाने आणि डळमळीत वृत्तीने ते फर्ग्युसन कॉलेजच्या एकनिष्ठ आजीव सेवकांच्या पथकात येऊन सामील झाले. कर्वे यांनी फर्ग्युसन कॉलेजात १८९१ पासून १९१४ पर्यंत तेवीस वर्षे कार्य केले. याच कालावधीत कर्वे यांना आपले जीवितकार्य गवसले आणि हळूहळू त्यांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी प्रयत्नास प्रारंभ केला.

दिनांक ११ मार्च १८९३ रोजी विधुरावस्थेत असलेल्या कर्वे यांनी, एक हिंदू विधवा म्हणून दीर्घकाल अनंत यातना सहन केलेल्या गोदुबाईशी विवाह करून विधवांच्या पुनर्विवाहाचा हिरीरीने पुरस्कार करण्याचा आपला दृढ निर्धार व्यक्त केला. गोदुबाईंना नंतरच्या काळात प्रेमाने सर्वजण 'बाया' म्हणत असत आणि बाया दि. २९ नोव्हेंबर १९५० रोजी मरण पावेपर्यंत कर्वे यांच्या सर्व सामाजिक

कार्यात, सामर्थ्य आणि प्रेरणा प्रदान करणारी स्रोत ठरली! ह्या पुनर्विवाहाचा परिणाम स्वाभाविकच दोघांनाही सामाजिक विरोध, उपहास आणि जवळजवळ वाळीत टाकण्यात झाला. दि. ३१ डिसेंबर १८९३ रोजी कर्वे यांनी वर्धा येथे इतर सहा संस्थापक सदस्यांसह एक विधवा पुनर्विवाह संघटना स्थापन करण्यात भाग घेतला. आपल्या फुरसतीच्या आणि सुटीच्या वेळेचा या संघटनेचे ध्येय लोकप्रिय करण्यासाठी ते उपयोग करीत. १४ जून १८९६ रोजी कर्वे यांनी आपल्या इतर १५ सहकाऱ्यांसह अनाथ बालिकाश्रम ही संस्था स्थापन केली. ही संस्था, १८८७ साली बंगालमध्ये बाबू शशीपद बॅनर्जी यांनी सुरू केलेल्या विधवा आश्रमाच्या किंवा मद्रासमध्ये विरेसलिंगम् पंतुलु यांनी स्थापन केलेल्या त्यासारख्याच संस्थांच्या धर्तीवर निर्माण करण्यात आली. त्यानंतर अनाथ बालिकाश्रमाच्या कार्यास इ. स. १९०० मध्ये पुण्याच्या परिसरात असलेल्या हिंगणे या खेड्यातील एका लहानशा झोपडीत सुरवात झाली. आठ तरुण विधवा आणि तीन अविवाहित मुली याच पहिल्या आश्रमवासिनी होत्या. हिंगणे येथे त्या काळात अशा प्रकारची संस्था सुरू करून चालू ठेवणे म्हणजे केवढ्या यातना सहन कराव्या लागत आणि कष्ट घ्यावे लागत, याची आज कोणालाच यथार्थ कल्पना येणे शक्य नाही. विधवांना शिक्षण देण्याचे कार्य लोकांना अजिबात न आवडणारे असे होते व अज्ञान आणि रूढी यांच्यामुळे सामाजिक सुधारणेबाबत उदासीनता, हा त्या काळचा राजरोस व्यवहार होता. पण समाजसेवा हेच आपले जीवितकार्य असे ठरवून निघालेल्या या दुबळ्या दिसणाऱ्या माणसाचा निर्धार अविचल होता आणि जितक्या अधिक अडचणी येत, तितक्या अधिक प्रमाणात दुर्दम्य आकांक्षेने आणि कडव्या निर्धाराने त्यांनी यशस्वी रीतीने सर्व आव्हाने स्वीकारली, हे आपण आज पाहातोच आहोत. कर्वे यांनी ज्या ठिकाणी ती अगदी लहानशी आणि इतिहासप्रसिद्ध झोपडी बनविली होती, ती जागा आज या देशातील स्त्रीशिक्षणाच्या सर्व पुरस्कर्त्यांसाठी आणि चाहत्यांसाठी यात्रेचे ठिकाण बनली आहे. या झोपडीभोवती आता स्त्रीशिक्षणासाठी स्वतःला वाहून घेतलेल्या प्रेरक व भव्य इमारती असलेल्या कित्येक संस्थांचे जाळेच निर्माण झाले आहे. अनाथ बालिकाश्रमाची स्थापना केल्यानंतर सात वर्षांनी कर्वे यांनी दि. ४ मार्च १९०७ रोजी महिला विद्यालय सुरू करून आपल्या जीवनातील दुसऱ्या नव्या प्रकरणास प्रारंभ केला. पटावर सहा विद्यार्थी असताना हे विद्यालय सुरू झाले व त्याने पुण्यातील आणि महाराष्ट्रातील आधुनिक स्त्रीशिक्षणाच्या युगास सुरवात केली. या संस्थेच्या कार्याची प्रशंसा करणारा आणि भविष्यवाणी केल्याप्रमाणे भासणाऱ्या शब्दांत मेजर हंटर स्टीन यांनी दि. १४ मार्च १९०८ रोजी 'टाइम्स ऑफ इंडिया'त एक लेख लिहिला. मेजर हंटर स्टीन यांनी लिहिले की,—"पुणे शहरातील नारायण पेठेमधील—म्हणजे लकडीपुलापासून फार दूर नव्हे—एका लहानशा घरात, किमान भारताच्या या भागात तरी अशा एका

चिमुकल्या कार्यास प्रारंभ झालेला आहे, जे एके दिवशी देशाचे सामाजिक पुनरुज्जीवन घडवून आणील!" कर्वे यांचे केवळ एवढ्या कार्यानीच समाधान होणारे नव्हते. सामाजिक कार्य प्रभावीपणे चालावयाचे असेल, तर समाजकार्याची दीक्षा घेण्यास तयार असलेले लोक पाहिजेत, असे त्यांना वाटत असे आणि म्हणून दि. ४ नोव्हेंबर १९०८ रोजी 'निष्काम कर्ममठ' स्थापन झाला. या मठात सामील होणाऱ्या प्रत्येक माणसाला प्रतिज्ञा द्यावी लागे की, माझे स्वतःचे जे काही आहे, त्यावरील सर्व हक्क आणि अधिकार मी सोडून देत आहे; मी आजपासून या मठाचा सेवक झालो आहे आणि माझ्यासाठी व माझ्या कुटुंबासाठी मठ जी तरतूद करील, ती मी स्वच्छेने मान्य करीन. या मठात दोन आणखी सहकारी त्यांना येऊन मिळाले.

इ. स. १९१४ मध्ये कर्वे फर्ग्युसन कॉलेजमधून निवृत्त झाले आणि सर्व वेळ समाजसेवेसाठी वाहून घेण्याचा त्यांनी निर्णय घेतला. प्राचीन हिंदू तत्त्वानुसार प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात वानप्रस्थ ही एक महत्त्वाची अवस्था असते, तिला कर्वे यांच्या जीवनात पूर्ण अर्थ आणि महत्त्व प्राप्त झाले. कारण यापुढील काळात कर्वे यांचे जीवन हे समाजासाठी पूर्णपणे समर्पित करण्यात आले. नंतर लवकरच इ. स. १९१५ मध्ये मुंबई येथे भरलेल्या सामाजिक सुधारणा परिषदेच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद स्वीकारण्यासाठी कर्वे यांना पाचारण करण्यात आले. ऑगस्ट १९१५ मध्ये, कर्वे यांना जपानी महिला विद्यापीठासंबंधीचे माहितीपत्रक मिळाले. ते जपानमध्ये १९०९ साली सुरू करण्यात आले होते. या माहितीपत्रकाने कर्वे यांचे मन आकर्षून घेतले आणि त्यांनी आपल्या स्वप्नानुसार, महाराष्ट्रात महिलांचे विद्यापीठ सुरू करण्याच्या भव्य आणि उदात्त कल्पनेस ताबडतोब जन्म दिला. त्यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण जोमाने आणि उत्साहाने योजना तयार केली. हिंदू विधवा आश्रम संघटना, महिलांचे विद्यापीठ स्थापन करण्याचे कार्य आपल्या शिरावर घेऊ शकते, असे त्यांना वाटले. तथापि, त्यांचे सहकारी फारसे अनुकूल नव्हते आणि त्यांच्या आवाहनाला साद देण्यास फार नाखुश होते. पण कर्वे यांना प्रथमपासूनच, हाती घेतलेल्या सर्व कार्यांत मित्र आणि सहकारी यांचे साहाय्य किंवा सहकार्य मिळण्यापूर्वीच, आपल्या ध्येयाच्या दिशेने एकटे मार्गक्रमण करण्याची सवय लागलेली होती. महिलांसाठी विद्यापीठ सुरू करण्याच्या आपल्या कल्पनेचा त्यांनी धडाडीने पुरस्कार केला. डिसेंबर १९१५ मध्ये मुंबईत भरलेल्या सामाजिक सुधारणा परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना त्यांनी आपल्या या योजनेचे विस्तृत स्पष्टीकरण केले आणि नेहमीप्रमाणे त्यांच्या प्रयत्नांना यश आले व परिणामस्वरूप दि. ३ आणि ४ जून १९१६ रोजी महिला विद्यापीठाच्या सीनेटची पहिली बैठक भरली आणि दि. ६ जुलै १९१६ रोजी नव्या महाविद्यालयाच्या कार्यास प्रत्यक्ष सुरवात झाली. त्यावेळी साठीच्या जवळ पोचलेले कर्वे हे आपल्या सर्व सहकाऱ्यांच्या

आणि कार्यकर्त्यांच्या विनंतीनुसार नव्या महाविद्यालयाचे पहिले प्रिन्सिपॉल बनले. पहिल्या सत्रात सहा विद्यार्थिनी कॉलेजात दाखल झाल्या. नंतर सुदैवाने सर विठ्ठलदास ठाकरसी यांच्याकडून कर्वे यांना उदार देणगी मिळाली आणि तेव्हा-पासून कॉलेजचा अधिकारीवर्ग आर्थिक अडचणींच्या काळजातून बऱ्याच प्रमाणात मुक्त झाला. अशा प्रकारे हे महिलांचे विद्यापीठ 'नार्थीबाई दामोदर ठाकरसी महिलांचे विद्यापीठ' या नावाने ओळखले जाऊ लागले. स्त्रियांच्या शिक्षणपद्धतीला नवे वळण देण्यात कर्वे यांना यश आले आणि संपूर्ण देशातील भगिनी आणि मुली यांच्या निरामय पुनरुज्जीवनाचे ध्येय प्रत्यक्षात आणण्यात त्यांचे मोठ्या प्रमाणात सहाय्य झाले, या गोष्टीला आता सार्वत्रिक मान्यता मिळालेली आहे. विद्यापीठ सुरू झाल्यानंतर निधी गोळा करण्यासाठी, विद्यापीठाची कल्पना लोकप्रिय करण्यासाठी आणि विद्यापीठाशी संलग्न असलेल्या शाळा सुरू करण्याकरिता कर्वे यांनी संपूर्ण देशभर पायपिटी केली.

तेव्हा मात्र कर्वे यांच्या कार्याविषयीची समाजाची उदासीनता हळूहळू नाहीशी होऊ लागली आणि त्याऐवजी आपल्या ध्येयसाधनेसाठी त्यांनी दाखविलेला निर्धार आणि श्रद्धा यांसंबंधी लोक प्रांजळपणे गुणग्राहकता आणि कौतुक प्रकट करू लागले. पुणे नगरपालिकेने एरंडवण्याकडे जाणाऱ्या राजमार्गाला त्यांचे नाव देऊन त्यांचा सन्मान केला. त्यांनी सत्तरी ओलांडली, तेव्हा परदेशात प्रवास करण्याचाही धोका पत्करला. १५ महिने त्यांनी अनेक पाश्चात्य राष्ट्रांचा दौरा केला आणि महिलांच्या विद्यापीठासाठी निधी जमविला. १९४२ साली बनारस हिंदू विश्वविद्यालयाने त्यांना डॉक्टरेट पदवी देऊन बहुमान केला. तथापि, स्त्रीशिक्षणा-साठी आपण केलेल्या कार्याबद्दल कर्वे समाधानी नव्हते. त्यांनी खेडुतांना सामान्य शिक्षण देण्याच्या प्रश्नाकडे आपले लक्ष वळविले आणि १९३६ साली 'महाराष्ट्र व्हिलेज प्रायमरी एज्युकेशन सोसायटी'ची त्यांनी स्थापना केली. त्यांच्या स्फूर्तिदायक मार्गदर्शनाखाली या सोसायटीने सुमारे बारा वर्षे कार्य केले आणि खेड्यांत अनेक शाळा सुरू केल्या. सामान्य शिक्षणाच्या कार्यामुळे ते आणखी उच्च अशा सामाजिक समतेच्या प्रश्नाकडे आकर्षित झाले आणि दि. १ जानेवारी १९४४ रोजी कर्वे यांनी 'समता संघ' सुरू केला. नंतर त्यांनी सामाजिक समतेचा पुरस्कार करणारी एक मासिक पत्रिका प्रकाशित करण्यास प्रारंभ केला. जातिव्यवस्थेवर प्रखर हल्ला चढविल्याशिवाय सामाजिक समता मजबूत, पक्क्या पायावर स्थापन होऊ शकत नाही, याची कर्वे यांना जाणीव झाली; व त्याचा परिणाम १९४८ साली जातिनिर्मूलन संस्था स्थापन करण्यात झाला. १९५३ मध्ये कर्वे यांनी पुणे येथे पुनरुज्जीवित सामाजिक सुधारणा परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचे उद्घाटन केले. परिषदेच्या त्या अधिवेशनाचे अध्यक्षपद मजकडे होते, हे मी माझे सुदैव समजतो. मी ही जबाबदारी प्रामुख्याने स्वीकारण्यास कबूल झालो याचे कारण स्वरोग्वरी कर्वे यांनी मला तसे

करण्यास सांगितले हे होय !—आणि कर्वे यांची विनंती म्हणजे मला ती आज्ञेसारखीच वाटली. सामाजिक सुधारणा परिषदेच्या व्यासपीठावरून त्यावेळी कर्वे यांनी जे उद्गार काढले, ते देशातील सर्व प्रगतिवादी लोकांसाठी अप्रतिहत आवाहन होते. सुरवातीच्या काळात ज्या थोर लोकांनी सामाजिक सुधारणा चळवळीचे नेतृत्व केले त्यांचा उल्लेख कर्वे यांनी केला आणि भावनावेगात ते म्हणाले, "मागील पिढीचा जिवंत राहिलेला एकमेव प्रतिनिधी म्हणून मी मागे उरलो आहे. त्यांच्या हातातील सामाजिक सुधारणेची ज्योत मी आपल्या एकट्या हाताने धरून ठेवलेली आहे. आता मी फार म्हातारा झालो असल्यामुळे ती ज्योत आता मी अधिक काळ धरू शकत नाही. ती ज्योत तुमच्या स्वाधीन करण्यासाठी मी येथे आलो आहे." कर्वे यांचे वय त्यावेळी ९३ वर्षांचे होते, तरी त्यांनी जो उल्लेखनीय शारीरिक जोम, बौद्धिक जागरूकता आणि भावनात्मक सावधगिरी दाखविली, त्याबद्दल त्या मानाने तरुण असलेल्या लोकांना खरोखरच हेवा वाटेल! तेव्हापासून संपूर्ण देशातील सर्व थरातील लोक त्यांच्याकडे एक पूज्य संस्था म्हणूनच पाहू लागले. आदरणीय ऋषीचे पद त्यांनी प्राप्त केले व लोक त्यांच्याकडे प्रेरणा मिळावी व मार्गदर्शन लाभावे या दृष्टीने पाहू लागले. १९५३ मध्ये पुणे विद्यापीठाने आणि १९५५ मध्ये त्यांच्या स्वतःच्या विद्यापीठाने त्यांना डॉक्टरेट देऊन बहुमान केला. १९५५ मध्ये 'पद्मविभूषण'चा मान त्यांना मिळाला. १९५७ मध्ये मुंबई विद्यापीठाकडून त्यांना डॉक्टरेट मिळाली आणि शेवटी, अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे २८ जानेवारी १९५८ रोजी कर्वे हे 'भारतरत्न' झाले!

त्यांनी ज्या कित्येक संस्था स्थापन केल्या, ज्या संस्थांचे त्यांनी पालनपोषण केले, त्यांचा केवळ नामोल्लेख केला तरी कर्वे यांच्या जीवनात समाजसेवेच्या आणि लोककल्याणाच्या अनेक कार्यांनी अक्षरशः कशी गर्दी केली, हे दिसून येते. अशा स्थितीत संपूर्ण देश त्यांच्याकडे कृतज्ञतेने आधुनिक ऋषी म्हणून पाहातो आणि आदरयुक्त प्रेमाने 'महर्षी कर्वे' म्हणून त्यांना संबोधतो, यात काय आश्चर्य !

आज जेव्हा आम्ही जन्मशताब्दीनिमित्त कर्वे यांना आदरांजली अर्पण करीत आहोत, तेव्हा आम्ही त्यांच्या जीवनाच्या प्रतीकमय असलेल्या ध्येयाचे आणि ते प्रतिनिधित्व करीत असलेल्या विचारांचे मोल ओळखले पाहिजे. शिक्षण हे मानवी संस्कृतीच्या संवर्धनाचे अत्यंत प्रभावी साधन आहे आणि सामाजिक मूल्यांबाबतचा विवेक निर्माण करण्यासाठी आणि सर्वत्र पसरविण्यासाठी लोकशाहीच्या शस्त्रागारातील शिक्षण हे खरोखर पाहाता एक मुख्य शस्त्र आहे, हे कर्वे यांनी आपल्या जीवनात फार लवकर ओळखले. मिलने जिचे वर्णन केले ती 'ठराविक मतांची गाढ झोप'[1] शिक्षणप्रसारानेच प्रभावीपणे दूर करता येते. सामाजिक सुधारणांबाबतचा

---

1. "Deep Slumber of settled opinions"

तीव्र विरोध किंवा शत्रुत्व हे रूढी आणि अज्ञान यांतून उगम पावते आणि ते शत्रुत्व जोपर्यंत आपली जनता अज्ञानी राहील, तोपर्यंत नष्ट करता येणार नाही. स्त्रियांची समाजात कोणती स्थिती आहे, त्यांची किती प्रमाणात प्रतिष्ठा आहे, यावरून सामाजिक प्रगती निश्चितपणे किंवा काटेकोरपणे मोजता येते, या महान सत्याची कर्वे यांना पूर्ण जाणीव होती. स्त्रियांचे कौटुंबिक जीवन म्हणजे हजारो क्षुद्र आणि चिल्लर गोष्टींसाठी स्त्रियांना दररोज करावा लागणारा त्याग होय, हे ते आपल्या भोवताली पाहात. त्यांपैकी बहुतेक स्त्रिया पूर्णपणे निरक्षर होत्या आणि त्यांपैकी सर्वजणी हीन सामाजिक अवस्थेत आयुष्यभर जगण्यात समाधान मानीत होत्या. हिंदू समाजातील स्त्रियांच्या या दुर्दैवी अवस्थेमुळे सुशिक्षित पुरुष आणि अज्ञानी, अशिक्षित स्त्री असे द्वैत निर्माण झाले आणि या द्वैताने उलट पुन्हा अपरिहार्यपणे कौटुंबिक जीवनाची पातळी खाली नेली आणि त्याचे व्यक्ती व सामाजिक चारित्र्य यांवर वाईट परिणाम झाले. अर्थातच त्या काळच्या स्त्रियांतही विधवांची परिस्थिती वर्णनातीत खेदजनक, दुर्दैवी होती. यासाठी कर्वे यांनी प्रथम विधवांच्या परिस्थितीत सुधारणा करण्याच्या कार्यात, त्यांच्या शिक्षणात आणि त्यांच्या सार्वत्रिक उद्धाराच्या कार्यात सर्व लक्ष घातले. असहाय विधवा आणि दुर्दैवी अनाथ मुले यांचे अश्रू पुसणे, हे धर्माचे मुख्य तत्त्व असले पाहिजे, असे विवेकानंद म्हणत असत. या कसोटीवरून पाहिले असता असे म्हणावे लागते की, कर्वे यांचे जीवन खरोखरी धार्मिकच होते. कारण त्यांनी हिंदू विधवांच्या उद्धारासाठी लोकोत्तर स्वरूपाचे कार्य केले! जे लोक सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करतात, ते लोक जोपर्यंत प्रत्यक्षात आपल्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात त्या तत्त्वांनुसार वागत नाहीत, तोपर्यंत सामाजिक सुधारणा यशस्वी होऊ शकत नाहीत, अशी कर्वे यांची श्रद्धा होती. एका विधवेशी विवाह करून आणि समाजाचा रोष ओढवून कर्वे यांनी लोकांसमोर स्वतःचे उदाहरण मांडले. समाजसेवेच्या आपल्या योजनेत आता आणखी एक पाऊल पुढे टाकण्याची वेळ आली आहे, असे जेव्हा त्यांना वाटले, तेव्हा त्यांनी महिलांच्या सार्वत्रिक शिक्षणाकडे आपले लक्ष वळविले. सुमारे पन्नास वर्षे गेल्यानंतर आता, त्या काळात स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत कर्वे यांनी जे यश मिळविले त्यामागे किती खडतर प्रयास असतील याची कल्पना येणे कठीण आहे. स्त्रियांचे शिक्षण आणि विधवाविवाह हे दोन विषय असे होते की त्या काळात सनातनी समाजाची त्याबाबत कट्टर मते होती आणि त्या समाजाने या बाबतीत नेहमीच आक्रमक लढाऊ पवित्रा घेतलेला असे. तत्कालीन समाजसुधारकांच्या धोरणानुसार, सर्वसाधारण लोकांना किंवा समाजाला उद्देशून बोलताना चढ्या आवाजाचा, उच्च भूमिकेचा किंवा चढाईचा अवलंब करावा, यावर कर्वे यांचा विश्वास नव्हता. सर्वसाधारण जनतेचा तीव्र विरोध हा तिच्या अज्ञानामुळे होतो, आणि केवळ शिक्षणप्रसार व

सामाजिक मूल्यांबाबत विवेकभावना विकसित केल्यानेच समाजसुधारक समाजाला आपल्याबरोबर नेऊ शकतात, याची त्यांना जाणीव होती. इ. स. १८९३ मध्ये जेव्हा स्त्रीशिक्षणाच्या प्रसारार्थ कर्वे यांच्या प्रयत्नांवर काही सनातनी वृत्तपत्रांनी सडकून अनुदारपणे टीका केली, तेव्हा कर्वे शांत आणि अविचल राहिले; त्यांनी ज्या शब्दांत आपल्या सामाजिक तत्त्वज्ञानाचे विवरण केले, त्या शब्दांतून त्यांची ऋषितुल्य भावनाच अधिक बोलकी ठरली आहे. ते म्हणाले की, "मी सहेतुकपणे पुनर्विवाह केला आहे आणि विधवापुनर्विवाह रूढ व्हावा, यासाठीच माझे सारे प्रयत्न आहेत. तथापि, ज्या समाजाचा मी आहे, त्या संपूर्ण समाजाशी जास्तीत जास्त संबंध ठेवण्याची काळजी मी घेतली पाहिजे. आणि ज्यामुळे विनाकारण समाजाच्या नाजूक भावना दुखविल्या जातील, असे शब्द मी वापरता कामा नये. माझ्या समाजाने मला जर घोर शिक्षा देण्याचे ठरविले, तर काही काळ निघून गेल्यानंतर मला ज्या पद्धतीची वागणूक दिली त्याबद्दल समाजाला पश्चात्ताप होईल आणि त्या समाजाला माझ्या तत्त्वांचे मोल समजू लागेल व शेवटी तो समाज ती तत्त्वे मान्य करील, या आशेने आणि प्रार्थनेने मी जाणीवपूर्वक ती शिक्षा व वागणूक मान्य केली पाहिजे." त्यांच्या या उद्‌गारांवरून कोणालाही, आता आमच्या राष्ट्रीय ठेव्यातील अभिमानाचा विषय बनलेल्या गांधीवादी जीवन-दृष्टीच्या वैशिष्ट्यांची आठवण येईल. कर्वे यांचीही अशी दृढ श्रद्धा होती की, जर सामाजिक सुधारणांचा योग्य रीतीने प्रचार, पुरस्कार आणि अंमलबजावणी केली, तर सर्व बळ एकवटून उपहास आणि निंदा करण्यासाठी धावणारे विरोधकच शेवटी करुणा भाकतील व अनुयायी बनतील! स्त्रीशिक्षणासाठी अनेक योजना आखून त्या अमलात आणण्यात विलक्षण यश मिळविल्यानंतर कर्वे यांनी आपल्या शिरावर खेडयांत शैक्षणिक संस्था सुरू करण्याची जबाबदारी घेतली आणि अशा प्रकारे सामान्य शिक्षणाचा प्रश्न हाती घेतला. हे साधण्याच्या प्रयत्नात असताना त्यांनी सतत सामाजिक समतेचे ध्येय आपल्या डोळ्यासमोर ठेवले. कर्वे यांच्या स्वच्छ आणि तर्कशुद्ध मनाने हे ओळखले की जातिविषयक भावनेचे संपूर्ण उच्चाटन केल्याशिवाय देशात सामाजिक समता स्थापन होणे अशक्य आहे. म्हणून, वृद्धत्व येत असता आणि शारीरिक दुर्बलतेची चिन्हे दिसू लागलेली असताना जातिनिर्मूलन संस्था स्थापन करण्यात व मासिकपत्रिकेद्वारा सामाजिक समतेच्या तत्त्वाचा पुरस्कार करण्यात त्यांनी सक्रिय भाग घेतला. रूढी आणि अज्ञान यांवर आधारलेल्या सामाजिक पूर्वग्रहांवर कायद्याने हल्ला चढविणे शक्य आहे; पण त्यांचे संपूर्ण उच्चाटन केवळ कायद्याच्या जोरावरच साध्य होऊ शकत नाही. अज्ञान आणि रूढी यांच्या-विरुद्धच्या मोहिमेत सत्प्रवृत्त आणि जागरूक लोकमताने आपली न्याय्य भूमिका पार पाडलीच पाहिजे आणि येथेच समाजसुधारकांनी लोकमताचे नेतृत्व केले पाहिजे आणि लोकशाही कायद्यांच्या विजिगीषू प्रक्रियेस मदत केली पाहिजे. पुनरुज्जीवित

करण्यात आलेल्या सामाजिक सुधारणा परिषदेच्या पुणे येथील अधिवेशनाचे उद्घाटन करताना कर्वे हे सामाजिक आणि आर्थिक विषमतेच्या धोक्यासंबंधी अगदी कठोरपणे बोलले. ते म्हणाले की, "आपणांस पूर्ण अर्थाने राजकीय स्वातंत्र्य आहे. तरी आपण दुर्बल, गरीब आहोत. नैतिक सामर्थ्याचा अभाव आहे. आम्ही असे का? याचे एकमेव उत्तर जे मला वाटते ते असे की, आम्ही आपले विचार, आकांक्षा आणि प्रयत्न यांच्यापासून सामाजिक समता, ऐक्य आणि बंधुभाव यांची पार हकालपट्टी केली आहे." गांधीजी आणि त्यांचे अनुयायी यांनी शूरपणे स्वातंत्र्यार्थ जो लढा दिला, त्या स्वातंत्र्यलढ्याबद्दल ते आदराने बोलले; आणि स्वातंत्र्याच्या आगमनाचा त्यांनी भावनावेशाने उल्लेख केला. पण त्यांनी धाडस दाखवून आपले मत व्यक्त केले की, 'मला कधी कधी असे वाटते की आपल्या स्वतःच्या प्रयत्नांच्या सिद्धीचा समय येण्यापूर्वीच आपणांस स्वातंत्र्य मिळाले.' नंतर त्यांनी देशातील तरुण पिढीला उद्देशून विचार व्यक्त केले. ते म्हणाले की, "सर्व जातिभेद नष्ट करण्यासाठी प्रयत्न करा. 'हरिजन' यासारखी संज्ञा भूतकाळात जमा होऊ द्या. पुरुष आणि स्त्रिया यांच्यातील विषमता काढून टाकू या आणि आपल्या प्राचीन धर्मग्रंथांनी म्हटल्याप्रमाणे सर्व प्राणिमात्रांचे कल्याण—**सर्वभूतहितवाद**—हे आमचे ध्येय आणि आजची हाक बनू द्या." देशाने आज कोणत्या आवाहनाला साद द्यावयाची असेल, तर महाराष्ट्राच्या आधुनिक ऋषीने केलेल्या या आवाहनाला देशाने आज साद दिली पाहिजे. आपल्या देशातून सामाजिक विषमता दूर करण्यासाठी आणि सर्व नागरिकांना सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळवून देण्याचे आपल्या लोकशाहीचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या बाबतीत सहायभूत होण्यासाठी आपण किती प्रयत्न करतो, त्या प्रकाशातच इतिहास महर्षी कर्वे यांच्याबद्दल आपल्या मनात असलेल्या पूज्य भावना, आदर, मान, कौतुक यांच्या प्रांजळपणाचा, खरेपणाचा, तळमळीचा निवाडा देईल.

डॉ. पांडुरंग वामन काणे

महामहोपाध्याय डॉ. पांडुरंग वामन काणे यांच्या प्राचार्य टोपे यांनी लिहिलेल्या चरित्राला ही लहानशी प्रस्तावना लिहिण्यास मला फार आनंद वाटतो. डॉ. काणे यांच्या विद्वत्तापूर्ण ग्रंथांचे परीक्षण आणि मूल्यमापन करण्यास मी समर्थ नाही याची मला पूर्ण जाणीव आहे. कारण, हे उघड आहे की एखाद्या विद्वानाच्या कार्याचे मूल्यमापन तेवढाच थोर असलेला आणि उच्च पदाला पोचलेला विद्वानच समर्थपणे करू शकतो. एका संस्कृत कवीने म्हटलेलेच आहे की, विद्वानच दुसऱ्या विद्वानाचे मोल, कार्य आणि परिश्रम ओळखू शकतो. (विद्वानेव विजानाति विद्वज्जनपरिश्रमम्।) आपली विद्वत्ता आणि पांडित्य यांच्यामुळे डॉ. काणे हे तेलंग, रानडे, भांडारकर, टिळक आणि आंबेडकर यांच्यासारख्या महाराष्ट्रीय विद्वानांच्या थोर मालिकेत हक्काने समाविष्ट होऊ शकतात. माझ्या मर्यादांची मला जाणीव असूनही, या महाविद्वानाला माझी आदरांजली अर्पण करण्याचा मोह मी आवरू शकत नाही. ही प्रस्तावना मोठ्या आनंदाने लिहिण्यास मी तयार झालो, त्याचे एकमेव कारण हेच आहे.

डॉ. काणे यांचा जन्म दि. ७ मे १८८० रोजी झाला आणि त्यांच्या दीर्घ आणि लोकोत्तर जीवनाचे यथार्थ वर्णन, भारतीय संस्कृतीच्या अभ्यासासाठी समर्पित जीवनाचे महाकाव्य, असेच करावे लागेल. डॉ. काणे यांच्या जीवनातील महान कार्याचा व स्पृहणीय यशाचा आलेख जाणून घेण्यासाठी त्यांच्या जीवनाच्या कित्येक पैलूंची केवळ आठवण करणे बस होईल: आपल्या विद्यालयीन जीवनात उत्कृष्ट यश मिळविणारे विद्यार्थी, मंडलिक पदकाचे विख्यात विजेते, प्रथम संस्कृत व नंतर कायद्याचे लोकप्रिय व कर्तबगार शिक्षक, एक सन्माननीय वकील, प्राच्यविद्या आणि भारतीय संस्कृती यांच्यासंबंधी कित्येक विषयांवर, उच्च दर्जाच्या निरनिराळ्या

नियतकालिकांत नियमितपणे लिहिणारे लेखक; महामहोपाध्याय (१९४२); अ. भा. प्राच्य विद्यापरिषदेचे अध्यक्ष (१९४६); राज्यसभेचे सदस्य (१९५३); भारतीय इतिहास परिषदेचे अध्यक्ष (१९५३); प्राच्यविद्येचे राष्ट्रीय संशोधन प्राध्यापक (१९५९); सर्व सामाजिक आणि आर्थिक बाबतीत एक प्रागतिक बुद्धिप्रामाण्यवादी आणि सार्वजनिक प्रश्नांचे सूक्ष्म अभ्यासक; मुंबई विद्यापीठ, रॉयल एशियाटिक सोसायटी, ग्रंथसंग्रहालय, ब्राह्मणसभा, धर्मनिर्णय मंडळ आणि भांडारकर रिसर्च इन्स्टिट्यूट यांच्यासारख्या कित्येक शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक संस्थांचे गेल्या कित्येक वर्षांपासून असलेले सक्रिय सभासद—या सर्वांहून अधिक महत्त्वाचे म्हणजे भारतीय संस्कृतीच्या सर्व अंगोपांगांचे संशोधन आणि विवरण करण्याच्या महान कार्यास वाहून घेतलेले, जागतिक ख्याती मिळविलेले एक थोर विद्वान, हे थोडक्यात डॉ. काणे यांच्या अलौकिक आणि प्रेरणादायी आयुष्यक्रमाचे ढोबळ आणि आकर्षक पैलू आहेत.

"दूरवर अंधुक काय दिसते हे पाहाण्यापेक्षा, हाताशी स्पष्टपणे जे कार्य आहे ते करणे, हे आपले कर्तव्य आहे," या कार्लाईलच्या उद्गारातील सत्यच डॉ. काणे यांच्या जीवनाने सिद्ध होते. कोणत्याही क्षेत्रात त्यांनी एक पाऊल टाकणे पुरेसे आहे; आणि एकानंतर एक पाऊल टाकण्याच्या त्यांच्या अविरत प्रयत्नांमुळेच विद्वत्तेच्या कित्येक शाखांत त्यांना लोकोत्तर यश मिळू शकले व त्यामुळे आधुनिक विद्वानांत त्यांनी श्रेष्ठ स्थान संपादन केले आहे. सतत चिकाटीने, समर्पित भावनेने ज्ञानसंपादन हाच त्यांच्या जीवनाचा तेजस्वी स्थायीभाव असल्यामुळे स्वाभाविकच तो आम्हा सर्वांच्या अभिमानाचा आणि विस्मयाचा विषय बनलेला आहे. विल्यम ऑस्लरने म्हटले आहे की, "कार्य, सतत कार्य हा अत्यंत प्रभावी असा शब्द आहे. शब्द लहानसा असेल, पण तुम्ही तो आपल्या हृदयावर कोरून ठेवला आणि ललाटावर रेखला, तर त्याचे फार महत्त्वाचे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे." विद्वान म्हणून डॉ. काणे यांनी आपला जीवनक्रम सुरू केला तेव्हा त्यांनी 'कार्य' हा शब्द लाल रंगात आणि ठळक अक्षरात आपल्या हृदयावर कोरून ठेवला आणि त्या शब्दावरील आपली श्रद्धा ते कधी विसरले नाहीत. डॉ. काणे यांच्या जीवनाचा हा पैलू अत्यंत प्रेरणादायक आहे.

डॉ. काणे यांची इतर विविध कामे आणि आयुष्यभर साथीला असलेला कठीण आजार हे सांभाळूनही, त्यांनी किती पुरुषार्थी प्रयत्नांनी संशोधनाचे काम चालू ठेवले याची कल्पना, त्यांचे महान कार्य असलेल्या 'हिंदू धर्मशास्त्राचा इतिहास' या ग्रंथाच्या कित्येक खंडांना त्यांनी ज्या प्रस्तावना लिहिलेल्या आहेत, त्यावरून येते. या कार्याचा आरंभ १९३० साली झाला व आता क्रमाक्रमाने ते कार्य आटोपत आहे. वस्तुतः हा ग्रंथराज म्हणजे त्यांच्या सर्व कार्यांत मेरुमणी ठरेल! "हिंदू संस्कृतिसंबंधी या ग्रंथात जे आहे, ते इतरत्र सापडू शकेल. पण या

ग्रंथात ज्यासंबंधी चर्चा करण्यात आली नाही, ते दुसरीकडे कोठेही सापडू शकणार नाही" (यदिहास्ति तदन्यत्र, यन्नेहास्ति न तत् क्वचित्।) असे या ग्रंथासंबंधी अगदी विश्वासपूर्वक म्हणता येते. जोपर्यंत हिंदू संस्कृती कायम राहील—आणि ती अनंतकाळ कायम राहील व तिचा सतत विकास होत राहील—तोपर्यंत विद्वानांच्या पिढ्यान् पिढ्या डॉ. काणे यांच्या 'हिंदू धर्मशास्त्रा'चा अभ्यास करतील आणि कृतज्ञतापूर्वक त्यांच्या नावाचे स्मरण करीत राहातील. जेव्हा त्यांनी या महान ग्रंथराजाचा पहिला खंड प्रकाशित केला, तेव्हा ते म्हणाले की, "मी या विषयाचा अभ्यास करीत होतो त्या कालावधीत अत्यंत वेदनाकारक दुखण्याने आजारी पडलो आणि एक वेळ तर अशी आली की हे काम बाजूला ठेवण्याचे जवळ जवळ मला ठरवावे लागले." त्यांनी अत्यंत निःस्पृहतेने, समबुद्धीने वेदना सहन केल्या आणि वेळ व शरीरस्वास्थ्य यांनी सवड दिल्यास आणखी काही वर्षांनी आपण दुसरा खंड काढू शकू या आशेने त्यांनी आपले कार्य चालू ठेवले. अशा अवस्थेतही डॉ. काणे आपल्या वैशिष्ट्यपूर्ण दुर्दम्य भावनेने म्हणाले की, "या ग्रंथाच्या अवलोकनाने माझ्या देशवासियांच्या दृष्टिकोनात स्वागतार्ह परिवर्तन होईल, या आशेने नजीकच्या भविष्यकाळात या ग्रंथाचा संस्कृत आणि माझी मातृभाषा असलेल्या मराठी या भाषांत अनुवाद करण्याचा माझा विचार आहे." डॉ. काणे यांनी चिकाटीने सातत्यपूर्वक आपला अभ्यास चालू ठेवला आणि ग्रंथाची तयारी होत होती. पण १९४१ साली दुसऱ्या खंडाच्या प्रस्तावनेत त्यांनी म्हटले आहे की, "माझ्या अडचणीत भर टाकण्यासाठी की काय माझ्या जुन्या वेदनाकारक दुखण्याने (आतड्यातील अल्सर) पूर्वीपेक्षा अधिक जोराने उठाव केला, तो इतका की अंशतः वैद्यकीय सल्ल्यानुसार आणि अंशतः निराश होऊन १९३८च्या ऑक्टोबरमध्ये मी हे कार्य पूर्णपणे सोडून दिले." शरीरस्वास्थ्य नसतानाही डॉ. काणे काम करीत राहिले आणि १९४६ मध्ये तिसरा खंड प्रकाशित झाला. त्यानंतर १९५३ मध्ये चौथा खंड प्रकाशात आला. मध्यंतरीच्या काळात डॉ. काणे जमा करीत असलेले साहित्य बरेच वाढले. पण आपल्या कार्याचे क्षेत्र अधिक व्यापक करण्याचा मोह त्यांनी टाळला. कारण, त्यांनी म्हटल्याप्रमाणे या कार्याने आधीच प्रचंड स्वरूप धारण केले. त्यामुळे त्यांनी आपल्या पाचव्या खंडाची तयारी काहीशा परिमित पायावर सुरू केली. डॉ. काणे म्हणतात की, "आता माझे वय ७३ वर्षांच्या वर आहे आणि अनेक दुखणी चालू आहेत. तेव्हा माझी बौद्धिक आणि शारीरिक कुवत शाबूत राहून मी हा शेवटचा खंड लिहू शकेन आणि प्रकाशित करू शकेन की काय याची शंका वाटते. हा शेवटचा खंड शक्य तितक्या लवकर लिहिण्यास आणि आर्थिक हानी व शारीरिक व्याधी सहन करूनही गेल्या तीस वर्षांतील माझा सर्व फावला वेळ ज्या कार्यासाठी मी वाहिला, ते कार्य शेवटाप्रत आणण्यास मी स्वतःच अत्यंत उत्सुक आहे." पाचव्या

खंडाचा पहिला भाग १९५८ मध्ये प्रकाशित झालेला आहे आणि या स्मारकरूप किंवा कीर्तिस्तंभासारख्या भव्य ग्रंथाचा शेवटचा भाग छापला जात आहे. डॉ. काणे यांची आपल्या कार्यावरील अविचल निष्ठा, खंबीर मन, नियमित, योजनाबद्ध जीवन यांमुळे त्यांनी ही दीर्घकालीन तपस्या केली आणि वर्तमान जगाला तसेच भावी पिढ्यांना त्यांनी आपला सर्वश्रेष्ठ ग्रंथराज सादर केला, हे स्पष्टच आहे. शारीरिक स्वास्थ्य नसतानाही आपल्या संपूर्ण आयुष्यात संशोधनकार्य चालू ठेवण्याच्या डॉ. काणे यांच्या साहसी प्रयत्नांकडे पाहिले असता, खऱ्या मानवी आनंदाचे जे रहस्योद्घाटन एके ठिकाणी विख्यात तत्त्वज्ञ जोड यांनी केले आहे, ते रास्त आहे असे मला वारंवार वाटत आले आहे. जोड यांनी म्हटले आहे की, "तुमच्या कार्यात शरीर आणि आत्मा यांना पूर्णपणे झोकून द्या, स्वतःच्या हिताचा विसर पडू द्या, कार्यास वाहून घ्या, पोकळ डौल आणि निराशा यांच्या लहानशा स्वार्थी गर्तेतून स्वतःला वर काढून स्वार्थापेक्षा उच्चतर भावनेने काम करा आणि मग मागे वळून पाहिल्यास आपण आनंदसागरात पोहत होतो असे तुम्हाला आढळून येईल." डॉ. काणे हे किती पराकाष्ठेचे आनंदी आहेत आणि त्यांनी कशी मानसिक शांतता प्राप्त केली आहे, हे कळावयाचे असेल, तर त्यांची भेट घेणे पुरेसे आहे.

डॉ. काणे यांनी १९०६ साली संस्कृत काव्यशास्त्राच्या संशोधनाचे विद्यार्थी या नात्याने आपल्या आयुष्यक्रमास सुरवात केली. १९५१ साली ते पुन्हा त्याच विषयाकडे वळले आणि त्यांनी 'अलंकारशास्त्रा'चे पुन्हा संपादन केले. त्यावेळी त्यांची काय भावना होती? डॉ. काणे म्हणतात, "आता माझे वय ७१ वर्षांचे आहे आणि मला धर्मशास्त्राचा इतिहास पूर्ण करावयाचा आहे, त्यामुळे या विषयाकडे वळण्यासाठी मला वेळ किंवा बळ मिळणे कठीण आहे, या धास्तीने तरुण वयातील माझ्या त्या अभ्यासाचा मी निरोप घेतो!" हे एक साधे लहानसेच वाक्य वाचायला अगदीच गद्य, पण किती काव्यमय आणि प्रेरणादायक!

डॉ. काणे यांच्या जीवनाचा आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण पैलू असा की, ते आपल्या विद्वत्तेच्या उच्च सृष्टीत विहार करीत असताना, सामाजिक जीवनाच्या वर्तमान प्रवाहापासून अलिप्त राहिलेले नाहीत. ते आपल्या संपूर्ण जीवनात सक्रिय प्रागतिक मानवतावादी राहिलेले आहेत. बुद्धिप्रामाण्यवादी या नात्याने हिंदू सामाजिक रूढी, परंपरा आणि पद्धती यांच्यांत परिवर्तनाची निकड आणि महत्त्व यांचा त्यांनी एकसारखा पुरस्कार केलेला आहे आणि सनातनी लोकांनी कडवा विरोध केलेला असतानाही नव्या पंचांगाचा पुरस्कार करण्यास त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. त्यांनी कित्येक सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक कार्यांत भाग घेतला असून शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांतील चर्चा, विचारविनिमय यांवर आपला मानवतावाद, सखोल विद्वत्ता आणि प्रागतिक दृष्टिकोन यांचा ठसा

उमटविला आहे, असे म्हटल्यास यत्किंचितही अतिशयोक्ती ठरणार नाही; पण भारतीय संस्कृतीच्या प्रचंड विस्ताराची आणि विकासाची महान कथा ग्रथित करणे हेच त्यांच्या आयुष्यातील प्रमुख जीवनकार्य राहिलेले आहे. प्राचीन भारतीय संस्कृती आणि ज्ञान यांच्या कोणत्या ना कोणत्या पैलूवर काही पाश्चात्त्य प्राच्यविद्याविशारदांनी छिद्रान्वेषी आणि अज्ञानावर आधारित अशी टीका केली आणि आश्रयदात्याची, उपकारकर्त्याची वृत्ती अवलंबिली, त्याविरुद्ध डॉ. काणे यांना सुरवातीच्या काळापासून तीव्र सात्त्विक संताप येत असे. त्यांच्या अष्टपैलू विद्वत्तेने ज्ञानाच्या कित्येक शाखांत डौलाने आणि ऐश्वर्याने अप्रतिहत संचार केल्याचा बोलका पुरावा 'धर्मशास्त्राचा इतिहास' या ग्रंथाच्या पानोपानी सापडतो. या ग्रंथाच्या पृष्ठांवर सहज नजर फिरविली तरी ज्ञानाच्या कित्येक शाखांत डॉ. काणे यांची किती सखोल गती आहे, हे दिसून येते. ही चर्चा तरी त्यांनी किती सुंदर विश्लेषणात्मक पद्धतीने केली आहे आणि आपले मुद्दे किती तर्कशुद्ध आणि सुबोध शैलीत मांडले आहेत! 'नामूलं लिख्यते किंचित्' हा त्यांचा सतत बाणा राहिलेला दिसतो. ज्ञानाच्या कित्येक शाखांत प्राचीन हिंदू विद्वानांनी उसनवारीचा अवलंब केलेला आहे, हे पाश्चात्त्य विद्वानांचे तर्कदुष्ट निष्कर्ष डॉ. काणे सहन करू शकले नाहीत, हे त्यांनी चर्चिलेल्या कित्येक विषयांवरून स्पष्ट होते. उदाहरणार्थ, वेबर, व्हिटने आणि थिबो यांनी हिंदू खगोलशास्त्र आणि फलज्योतिष यांच्यासंबंधी पुरस्कारिलेला सिद्धान्त घ्या. या मंडळींनी मांडलेल्या हिंदूंच्या उसनवारीच्या सिद्धान्तावर डॉ. काणे यांनी कडक टीका केली असून त्यांनी आपली मते या शब्दांत मांडली आहेत: "संस्कृतमधील प्रचंड साहित्य पार उध्वस्त झाले आहे व ते पुन्हा सापडण्याची शक्यता नाही (टॉलेमी याने तयार केलेल्या ग्रीक ज्योतिषशास्त्रावरील ग्रंथाची पुढे जशी स्थिती झाली त्याप्रमाणे); आणि आता जे काही उरले आहे, ते पूर्वी अस्तित्वात असलेल्या साहित्याचा अंशमात्र आहे, या वस्तुस्थितीला योग्य ते महत्त्व देण्यासच प्रथम ते तयार नाहीत. दुसरे असे की, ते हे विसरतात किंवा दुर्लक्षित करतात की, जे काही साहित्य उरलेले आहे ते धार्मिक स्वरूपाचे आहे, इतिहासासारखे किंवा ज्यात कोणत्याही विषयावर पूर्णपणे ऊहापोह केलेला आहे अशा स्वरूपाचे उरलेले नाही. काही बाबींचा अनुल्लेख असणे हेच केवळ त्या अस्तित्वातही नसाव्या असा निष्कर्ष काढण्यासाठी सबळ कारण असू शकत नाही. अर्थात वर्ण्य विषय जर असा असेल की त्याच्याशी निगडित काही बाबी अस्तित्वात असत्या तर त्यांचा उल्लेख वर्णनात सामान्यतः झाला असता, पण तरीही तो झालेला नाही; अशी जेव्हा स्थिती असेल तेव्हा गोष्ट वेगळी."

ज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांत हिंदूंनी जे प्रचंड पराक्रम गाजविले त्यांचे सरळ आणि सोप्या शैलीत डॉ. काणे यांनी उत्कृष्ट वर्णन केले आहे. भाषाशास्त्र, संस्कृत भाषेची मूलतत्त्वे, योगविद्या, बीजगणित आणि अंकगणित इत्यादी क्षेत्रांतील

प्राचीन भारतीयांच्या श्रेष्ठ कामगिरीचे अधिकारवाणीने वर्णन करून डॉ. काणे यांनी युरोपीय पंडितांच्या आक्षेपांना बिनतोड उत्तरे दिली आहेत. त्यावरून हिंदू संस्कृतीचा यापेक्षा अधिक तळमळीचा अभ्यासक आणि त्या संस्कृतीच्या उज्ज्वल विकासाचा आणि इतिहासाचा अधिक सर्वगामी, प्रभावी, तेजस्वी आणि नामांकित असा अधिकृत प्रवक्ता अद्याप झालेला नाही अशी जर प्रेमाची भावना डॉ. काणे यांचे मित्र आणि चहाते मंडळी यांच्या मनात वास करीत असेल, तर ते वाजवीच ठरेल!

प्राचार्य टोपे यांनी डॉ. काणे यांच्या जीवनाचे स्वयंप्रकाशी वर्णन दिलेले आहे व त्यांच्या विद्वत्तेचे गुणग्राहक आणि टीकात्मक समीक्षण केलेले आहे, असे या चरित्राच्या वाचकांना आढळून येईल. १९४१ साली डॉ. काणे यांच्या सन्मानार्थ 'स्टडीज् इन इन्डॉलॉजी'च्या खंडांत लेख लिहिणाऱ्या लेखकाच्या शब्दांत— "तुम्ही संपादन केलेले महान कार्य, तुमचा दीर्घोद्योग आणि अमर्याद सहनशीलता, तुमची समीक्षणात्मक विद्वत्ता आणि संस्कृत ज्ञानाबद्दल अविचल निष्ठा यांबद्दल आम्हांला फार आदर वाटतो" असे म्हणण्यात आपणा सर्वांना अभिमान आणि आनंदच वाटेल; आणि यात आपण आणखी अशीही भर टाकू की आमच्यापैकी अनेकांनी "आपल्या उत्कृष्ट उदाहरणावरून व परम भाग्याने आम्हांला लाभलेल्या आपल्या आदरणीय मैत्रीपासून प्रेरणा आणि उत्तेजन प्राप्त करून घेतले आहे."

डॉ. काणे यांचे वय आता ८० आहे. पण आपल्या कार्याबद्दलचा त्यांचा उत्साह पूर्वीइतकाच तरुणासारखा कायम आहे. 'हिंदू धर्मशास्त्राचा इतिहास' या ग्रंथाच्या पाचव्या खंडाचा दुसरा भाग छापला जात आहे. पण त्याचे मराठी आणि संस्कृतमध्ये अनुवाद करण्याची त्यांची योजना अद्याप अमलात यावयाची आहे. न्यायमूर्ती होम्स यांनी म्हटले आहे की, "शर्यतीमधील घोडेस्वार आपल्या उद्दिष्टापर्यंत पोचले तरी थांबत नाहीत. पूर्ण थांबण्यापूर्वी शेवटची चौकचाल असते. ती शर्यत संपते, पण काम करण्याची शक्ती असते तोपर्यंत काम कधीच संपत नाही." डॉ. काणे यांच्या कार्याबाबत हे अक्षरशः खरे आहे. यासाठी डॉ. काणे यांना दीर्घायुरारोग्य प्राप्त व्हावे आणि मराठी आणि संस्कृत या दोन्ही भाषांत 'हिंदू धर्मशास्त्राचा इतिहास' प्रकाशित करण्याची त्यांची आकांक्षा पूर्ण व्हावी अशी मी प्रार्थनापूर्वक अशा व्यक्त करतो व ही प्रार्थना करण्यात डॉ. काणे यांचे सर्व विद्यार्थी, चहाते आणि मित्रमंडळी यांनी सामील व्हावे, अशी मी त्यांना विनंती करतो.

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

आज या सायंकाळी माझे मित्र डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्याकरिता मला बोलावण्यात यावे हा मी माझा बहुमान समजतो. तीन वर्षांपूर्वी मुंबई सोडून नव्या दिल्लीला मी गेलो तेव्हापासून महाराष्ट्रातल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक चळवळींशी असलेला माझा सक्रिय संबंध जवळ जवळ संपुष्टात आला याची माझ्या चित्तात वेदनापूर्ण जाणीव आहे, आणि त्यामुळे स्वाभाविकच माझ्या मनात एकप्रकारची निराशेची आणि असमाधानाची भावना निर्माण होते. म्हणूनच आपण जेव्हा मला आज पुण्याला येऊन डॉ. आंबेडकरांच्या स्मृतिप्रीत्यर्थ होणाऱ्या समारंभात भाग घेण्याची विनंती केलीत तेव्हा मुळींच कां कूं न करता सहर्ष मी आपले ते निमंत्रण स्वीकारले. पुनः एकदा आपल्याला या निमित्ताने आपल्या मित्रमंडळींना भेटता येईल आणि आधुनिक काळातील एका अत्यंत प्रख्यात भारतीय पुरुषाच्या स्मृतीला अभिवादन करण्यात आपल्याबरोबर मला भाग घेता येईल असे माझ्या मनात आले.

बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १८९१ साली ता. १४ एप्रिल रोजी एका प्रतिष्ठित पण निर्धन कुटुंबात होऊनही आपल्या दुर्दम्य संकल्पबळाने, उत्कट दीर्घोद्योगाने आणि आपल्या जीवितकार्याला प्राणपणाने वाहून घेतल्यामुळे बौद्धिक प्रवृत्तींच्या विविध क्षेत्रांत ते एवढ्या उच्च पदाला चढले. एक नाव काढणारे विद्यार्थी, प्रथितयश अर्थशास्त्रज्ञ, कर्तृत्ववान आणि अत्यंत बुद्धिमान वकील, श्रेष्ठ योग्यतेचे कायदेशास्त्रज्ञ, घटनाविषयक आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे प्रख्यात जाणकार, आपल्या देशाच्या स्वातंत्र्याकरिता तळमळणारा देशभक्त, भारतीय संविधान या ऐतिहासिक प्रलेखाचा प्रमुख शिल्पकार, आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या देशातील दलितांचा आणि रंजल्यागांजलेल्यांचा सर्वस्वी समर्पित सेवक,

त्यांचा खरा मित्र, गुरु आणि नेता,—ठळकपणे ही आहेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ६५ वर्षांच्या धामधुमीच्या आयुष्यक्रमातली तेजस्वी आणि स्फूर्तिप्रद विरुदे.

१५ ऑगस्ट १९४७ या दिवशी भारताचे राजकीय स्वातंत्र्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरले हे खरे, परंतु २६ जानेवारी १९५० या दिवशी भारताच्या लोकांनी स्वतःची फार दिवस हृदयात बाळगलेली राज्यघटना अमलात आणली आणि स्वतःपुढे लोकतंत्रात्मक कल्याणकारी राज्यांचे ध्येय ठेवले. राजकीय स्वातंत्र्याला पूर्ण अर्थ आणि महत्त्व लाभले ते याच दिवशी आणि त्याचा आर्थिक आणि सामाजिक आशय राष्ट्रापुढचा आदर्श म्हणून याच दिवशी स्पष्ट शब्दांत मांडण्यात आला. या राज्यघटनेचा–संविधानाचा–मसुदा तयार करण्यात डॉ. आंबेडकरांचा इतका निकटचा संबंध होता की आजच्या दिवशी त्यांच्या पुतळ्याचे अनावरण करणे हे नितांत औचित्यपूर्ण आहे; डॉ. आंबेडकरांच्या स्मृतीला अभिवादन करण्याकरिता आणि त्यांचा जीवनसंदेश सर्व जनतेला समजावून सांगण्याकरिता याहून दुसरा चांगला दिवस निवडताच आला नसता. डॉ. आंबेडकरांनी विविध क्षेत्रांत जी सिद्धी मिळविली तिची तपशीलवार तपासणी करण्याचा किंवा त्यांच्या सामाजिक-आर्थिक आणि राजकीय विचारांच्या गुणावगुणांचे चिकित्सक परिशीलन करण्याचा हा प्रसंग नव्हे. आज यावेळी त्यांच्या आयुष्यातील काही ठळक गोष्टी तुमच्यापुढे ठेवाव्यात आणि आज ते जिवंत असते तर त्यांनी आम्हांला कोणता संदेश दिला असता ते पाहाण्याचा प्रयत्न करावा हे मला उचित वाटते.

डॉ. आंबेडकरांना जे हाल काढावे लागले आणि त्यांच्या जमातीच्या लोकांबरोबरच त्यांच्यावर मानहानीचे आणि तिरस्काराचे जे प्रसंग वेळोवेळी लादले गेले ती एक अंगावर शहारे आणणारी कहाणी आहे. श्री. धनंजय कीर यांनी डॉ. आंबेडकरांच्या चरित्राची आणि कर्तृत्वसरणीची तपशीलवार माहिती आपल्याला देऊन फार मोठी कामगिरी बजावली आहे. डॉ. आंबेडकरांचे वडील रामजी सकपाळ यांना दारिद्र्याची पुरती कल्पना होती, परंतु आपला मुलगा भीमराव याला उत्कृष्ट शिक्षण देण्याचा त्यांचा निश्चय होता. ते द्यायचे म्हणजे त्यांना फार मोठा त्याग करावा लागणार होता. आणि त्यांना व त्यांच्या मुलाला मोठ्या विपत्तींना तोंड द्यावे लागणार होते. वडील आणि मुलगा मुंबईला आले आणि भीमराव एल्फिन्स्टन हायस्कुलात जाऊ लागला तेव्हा ते एका लहानशा खोलीत राहात होते. "ती खोली धुरकटलेली, माणसांनी कोंदलेली; डोक्याच्या वरच्या बाजूला आणि एका कोपऱ्यात लाकूडफाटा साठविलेला, आणि दुसऱ्या कोपऱ्यात चूल. स्वैपाकघर, दिवाणखाना, बसण्याउठण्याची खोली, अभ्यासाची खोली, सर्व काही तीच!" अशा प्रतिकूल परिस्थितीत या मुलाच्या अभ्यासाचा प्रश्न प्रेमळ पित्याने आणि त्याच्या शूर मुलाने कसा सोडविला असेल?

"मुलगा अवशीचा एका कांबळ्यावर झोपी जाई. त्याच्या डोक्याशेजारीच भिंतीला खेटून जाते लावलेले असे आणि त्याच्या पायथ्याशी शेळी फुरफुर करीत पडलेली असे. वडील पहाटेचे २ वाजेपर्यंत जागत बसत. मग आपल्या मुलाला अभ्यासासाठी उठवीत आणि त्याच घोंगडीवर आपले अंग टाकीत. अभ्यास संपला की मुलगा आंघोळ करी आणि शाळेला जाई."

पण संपत्तीच्या अभावातून निर्माण झालेली प्रतिकूल परिस्थितीच फक्त डॉ. आंबेडकरांच्या युयुत्सू वृत्तीला आव्हान देणारी होती असे नाही. ते हरिजन म्हणून जन्माला आल्यामुळे जुन्या मताच्या हिंदू समाजाने आणलेले मानभंगाचे प्रसंग त्यांना अगदी लहानपणापासूनच सोसावे लागले. पंधरासोळा वर्षांचा असताना या मुलाला आपल्या वडिलांना भेटायला जायचे होते. ते कोरेगाव येथे रोकड अधिकारी म्हणून काम करीत होते. हा मुलगा आणि त्याचा थोरला भाऊ असे दोघेजण एका भाड्याच्या बैलगाडीत बसून कोरेगावला निघाले. थोड्याच वेळात, त्या हिंदू गाडी-वाल्याला आपल्या गाडीतून चाललेली ही मुले अस्पृश्य आहेत हे कळून आले आणि त्याचा थरकाप झाला. संतापाच्या भरात त्याने कचऱ्याची गाडी जशी उलटी करावी तशी गाडी उलटवून त्यांना रस्त्यावर फेकून दिले. बिचारा अडाणी तो, त्याला वाटले, 'या पोरांनी आपल्या लाकडी गाडीला विटाळले आणि आपल्या बैलांची पवित्रता नाहीशी केली.'

हा शाप डॉ. आंबेडकरांच्या मागे पुढे पुष्कळ वर्षे लागला होता. ते बडोद्याला गेले, कारण सयाजीरावमहाराजांकडून त्यांना सढळ हाताने मदत मिळत होती आणि तरुण आंबेडकरांना वाटले की कदाचित बडोदे आपल्याला आश्रय आणि निवास देईल. पण एकही वसतिगृह किंवा एकही खाणावळ त्यांना घ्यायला तयार होईना याचा त्यांना चमत्कार वाटला. शेवटी नाइलाजाने त्यांना एका पारशी खाणावळीत आसरा घ्यावा लागला; पण हा आसरासुद्धा त्यांना फार दिवस लाभला नाही आणि त्यांना बडोदे सोडावे लागले. या मानहानिकारक अनुभवाचा डॉ. आंबेडकरांच्या संवेदनाशील मनावर भयंकर परिणाम झाला. कीर यांनी या अनुभवाचे अतिशय मार्मिक शब्दांत वर्णन केले आहे. ते म्हणतात, "डॉ. आंबेडकरांनी आपल्याला मिळत असलेल्या वागणुकीबद्दल कटू शब्दांत महाराजांकडे तक्रार केली. महाराजांनी त्यांना दिवाणांच्याकडे जायला सांगितले आणि दिवाणसाहेबांनी आपण या बाबतीत काही करू शकत नाही असे कानावर हात ठेवले. थकून भागून, भुकेने व्याकूळ झालेला हा तरुण एका झाडाखाली बसला आणि त्याच्या डोळ्यांतून आसवांची धार लागली. डोक्यावरचे आभाळ हेच त्याचे छप्पर आणि पायातळची जमीन हेच डोके टेकण्याचे स्थान त्याला राहिले होते."

या आणि अशासारख्या अनेक कटू अनुभवांनी डॉ. आंबेडकरांच्या स्वभावाला धार चढली असल्यास नवल नाही. असे ते अत्यंत बिकट परिस्थितीशी

झुंज देत असतानाच त्यांच्या दुर्दम्य इच्छाशक्तीने आणि आपले शिक्षण शेवटपर्यंत नेण्याच्या त्यांच्यातील अढळ निर्धारानेच केवळ त्यांना ज्ञानसंपादनाचा मार्ग आक्रमण करण्यास प्रवृत्त केले, आणि स्वतःच्या दीर्घोद्योगाच्या आणि संकल्पबळाच्या जोरावर त्यांनी शेवटी आपले साध्य प्राप्त करून घेतले. ते एक प्रख्यात विद्वान झाले. त्यांना सोसाव्या लागलेल्या या त्रासांची नुसती हकीकत आपण वाचली तरी त्यावरून डॉ. आंबेडकरांच्या स्वभावाचा विलक्षण कणखरपणा आपल्या मनावर ठसतो.

डॉ. आंबेडकरांची विद्वत्ता होती तरी कोणत्या प्रकारची? प्रथम ते अमेरिकेला गेले, तेथे कोलंबिया युनिव्हर्सिटीने त्यांना तत्त्वज्ञानाची डॉक्टरेट पदवी दिली. या डॉक्टरेटकरिता त्यांनी 'दि इव्होल्यूशन ऑफ प्रॉव्हिन्शिअल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया' (ब्रिटिश अंमलाखालच्या हिंदुस्थानातील प्रांतिक वित्तीय कारभाराची उत्क्रांती) या नावाचा प्रबंध लिहिला होता. हा प्रबंध लिहिण्यापूर्वी सुद्धा त्यांनी आपली एम्. ए. ची पदवी १९१५ साली 'एन्शंट इंडियन कॉमर्स' (प्राचीन भारतातील व्यापार) या नावाचा प्रबंध लिहून मिळविली होती. मानववंशशास्त्रविषयक चर्चासत्रापुढे त्यांनी 'हिंदुस्थानातील जाती, त्यांचा गतिविधी, त्यांचा उगम आणि विकास' या विषयावर जो निबंध वाचला त्यावरून त्या पूर्वीच्या काळात सुद्धा त्यांच्या व्यासंगाची खोली आणि विशालता दिसून येते. अमेरिकेतील आपले शिक्षण पूर्ण केल्यानंतर डॉ. आंबेडकर लंडनला जाऊन बॅरिस्टर झाले आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पोलिटिकल सायन्स या संस्थेची एम्. एससी.ची पदवी त्यांनी मिळविली. 'धी प्रॉब्लेम ऑफ धी रुपी' (रुपयाची समस्या) या त्यांच्या सुप्रसिद्ध प्रबंधावर ही पदवी त्यांना मिळाली. दरम्यानच्या काळात अर्थशास्त्राचे आणि राज्यशास्त्राचे अभ्यासू या स्वरूपात त्यांचे नाव सुप्रतिष्ठित झाले होते आणि हिंदी चलनावरील रॉयल कमिशनपुढे साक्ष देण्याकरिता त्यांना पाचारण करण्यात आले होते. डॉ. आंबेडकर अमेरिकेत आणि इंग्लंडात आपला अभ्यास करीत होते त्यावेळी ग्रंथ वाचण्याच्या बाबतीत त्यांची विलक्षण उत्कटता दिसून येई आणि ते वाचताना आणि पचविताना त्यांना होणारा आनंद एखादा ग्रंथप्रेमीच जाणे. त्यांच्याविषयीची मला स्वतःला जी माहिती आहे त्यावरून, बादळी जीवनाच्या अनेक अवस्थांतून जात असताना सुद्धा डॉ. आंबेडकर शेवटपर्यंत उत्कट वृत्तीचे अभ्यासू कसे राहिले ते मी जाणतो. नाना प्रकारच्या विषयांवर त्यांनी जे अनेक निबंध लिहिले आणि ज्या अनेक समित्यांवर त्यांना नियुक्त करण्यात आले त्यांच्या कामासंबंधात त्यांनी जी विवेचक निवेदने तयार केली त्यांवरून त्यांची विद्वत्ता आणि विषयाच्या बारकाव्यांवर असणारे प्रभुत्व तत्काळ दिसून येते. सार्वजनिक महत्त्वाच्या सर्व सामाजिक, आर्थिक व राजकीय वादस्थलांमध्ये डॉ. आंबेडकर नेहमीच विचारप्रक्षोभक भर टाकीत असत, त्यावरून त्यांचे विद्वत्त्व आणि विषयाकडे

पाहण्याचा त्यांचा बुद्धिवादी आणि शास्त्रीय दृष्टिकोन दिसून येई. 'राज्ये आणि अल्पसंख्य जमाती' या विषयावरील त्यांचा प्रबंध, तसेच 'भाषावार राज्ये' यावरील त्यांचे पुस्तक ही त्यासंबंधीची उदाहरणे म्हणून दाखविता येतील.

पण ज्या एका प्रश्नाच्या बाबतीत त्यांनी धर्मयुद्ध म्हणून लक्ष घातले तो म्हणजे शूद्रजातीच्या अस्तित्वाचा प्रश्न आणि तिला छळणारा अस्पृश्यतेचा शाप. या ज्वलन्त विषयावरील त्यांचा अभ्यास जवळ जवळ त्यांच्या आयुष्यभर चालला आणि या अभ्यासाची निष्पत्ती म्हणजे त्यांचे 'हू वेअर धी शूद्राज' (शूद्र म्हणजे कोण?), 'धी अन्टचेबल्स' (अस्पृश्य) हे दोन ग्रंथ होत. आपली विषयमांडणी करताना डॉ. आंबेडकरांनी कठोर तर्कशास्त्र वापरले आहे आणि सनातनी मतावर कडकडून टीकास्त्र चालविण्याची वृत्ती स्वीकारून स्वमताचे जोरदार समर्थन केले आहे यात काहीच नवल नाही.

या ग्रंथात त्यांनी हिंदू समाजसुधारकांना जागे करणारी सूचना देताना जे शब्द वापरले आहेत ते अगदी भविष्यसूचक असल्यासारखे वाटतात. ते म्हणतात, "अगदी जळजळीत हिंदू राजकीय पुढारीदेखील, जर तो प्रांजळ असेल तर, कबूल करील की हिंदू समाजरचनेत अतिदुष्ट आणि दुःसाध्य स्वरूपाची जी स्वयंसिद्ध जातीयता आहे आणि जी राजकारणी प्रवृत्तीच्या हिंदूंच्याकडून बुद्धया दुर्लक्षिली जाते किंवा लांबणीवर टाकली जाते तिच्यातून निघणारे प्रश्न दर खेपेस त्याच राजकारणी लोकांना फिरून फिरून येऊन सतावत असतात. हे प्रश्न म्हणजे काही तेवढ्या क्षणापुरत्या अडचणी नव्हेत, त्या आमच्या कायमच्या, म्हणजेच सारख्या क्षणोक्षणी उद्भवणाऱ्या, अडचणी आहेत."

डॉ. आंबेडकरांच्या विद्वत्तेबद्दल बोलताना विद्वत्तेच्या आणि विद्येच्या क्षेत्रांत त्यांनी कोठपर्यंत मजल मारली याचे मी फक्त स्थूल दिग्दर्शन केले आहे. भारताच्या आधुनिक विद्याव्यासंगाच्या इतिहासात डॉ. आंबेडकरांना आमच्या विद्वानांत आणि पंडितांत फार मोठे मानाचे स्थान मिळेल यात मला शंका नाही.

आता आपण डॉ. आंबेडकरांच्या चरित्राच्या दुसऱ्या एका स्फूर्तिप्रद पैलूकडे वळू. ते सर्वप्रथम एक समाजसुधारक होते आणि हिंदू समाजातील दलितांची आणि गांजलेल्यांची दुःस्थिती सुधारावी याकरिता त्यांनी आपले आयुष्य वाहिले होते. हिंदू समाजरचना ज्या वर्गवारीच्या विषमतेवर उभी राहिली आहे त्यावर डॉ. आंबेडकर हे कडाडून टीका करणारे होते. ते म्हणत असत की हिंदू समाज हा अनेक मजले असलेल्या पण ज्याला जिनाच नाही किंवा दारच नाही अशा एखाद्या मनोऱ्यासारखा आहे. ज्या मजल्यात जो जन्माला आला त्याला तिथेच मेले पाहिजे. या सामाजिक विषमतेवर त्यांनी जो तोडगा सांगितला तो अगदी रेखीव आणि तर्कशुद्ध असा होता. ते म्हणाले, "हिंदू समाज जेव्हा जातिविरहित समाज होईल तेव्हाच त्याला आत्मरक्षण करण्याइतके सामर्थ्य लाभण्याची आशा आहे.

अशा अंतःसामर्थ्यावाचून हिंदूंचे स्वराज्य म्हणजे कदाचित गुलामगिरीकडेच पडणारे पाऊल ठरेल असा संभव आहे." त्यांनी ताबडतोबीचे आणि त्यांना आयुष्यभर अत्यंत प्रिय वाटणारे असे हाती घेतलेले काम म्हणजे स्वजनांची सेवा हे होते. आपल्या भाषणांतून आणि लिखाणांतून ते त्यांना उपदेश करीत, त्यांना प्रोत्साहन देत, त्यांना उत्साहाचे आणि स्फूर्तीचे शब्द बोलत, केव्हा त्यांचा उपहास किंवा त्यांची कानउघाडणी करीत, पण त्यांचे प्रत्येक लिखाण आणि भाषण आणि त्यांची प्रत्येक अर्थपूर्ण सार्वजनिक कृती स्वजनांची सेवा करण्याच्या आणि मनुष्य म्हणून त्यांना असलेल्या प्रतिष्ठेची आणि व्यक्तिमत्त्वाची त्यांना संपूर्ण जाणीव करवून देण्याच्याच एकमेव इच्छेने प्रेरित झालेली असे. एकदा ते संतापलेले असताना ओरडले, "तुमच्या केविलवाण्या मुद्रा पाहून आणि तुमचे आर्त आवाज ऐकून माझे अंतःकरण दुभंगून जाते. अनंत काळापासून तुम्ही पिचत आला आहात आणि तरी आपली लाचारी आपल्या पाचवीलाच पुजलेली आहे असे म्हणून ती कवटाळून धरण्याची तुम्हांला लाज नाही वाटत? त्यापेक्षा आईच्या पोटातच असताना तुम्ही मेला का नाहीत? नवीन आयुष्य घडविण्याकरिता उंच उठण्याची जर तुमची तयारी नसेल, आपल्यात नवा जोम जर तुम्हांला आणता येत नसेल तर तुम्ही मेलेलेच बरे. या देशात उच्च नीच कोणाही व्यक्तीच्या बरोबरीने अन्न, वस्त्र आणि निवारा मिळण्याचा तुमचा जन्मसिद्ध हक्क आहे. सन्मानाचे जीवन लाभावे असे जर तुम्हांला मनापासून वाटत असेल तर तुम्ही स्वावलंबनाची कास धरा, तोच तुमचा त्राता आहे." दुसऱ्या एका प्रसंगी ते म्हणाले, "टिळक जर अस्पृश्यांत जन्माला आले असते तर त्यांनी 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' ही घोषणा न करता 'अस्पृश्यतानिवारण हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' ही घोषणा दिली असती." त्यांचे आपल्या लोकांना सतत आश्वासन असे की मी तुमच्याकरिता कोणत्याही दिव्यातून जायला तयार आहे. एकदा ते उद्‌गारले, "तुम्हांला तुमच्या दैन्यावस्थेची आणि लज्जास्पद जीवनाची कारणे सांगून जागे करण्याकरिता येथे येण्यामध्ये माझ्या जीवाला धोका होता. मनुष्य मरणाधीन आहे. प्रत्येकाला केव्हा ना केव्हा मरायचेच आहे. पण स्वाभिमानाचा थोर आदर्श संपन्न करण्यात आणि मानवी जीवन अधिक चांगले करण्यात आपला देह ठेवण्याचा प्रत्येकाने निश्चय केला पाहिजे. आपण गुलाम नाही. आपण एक लढाऊ जमात आहोत. शूराला स्वाभिमानशून्य आणि देशभक्तिविरहित जीवन घालविणे याहून अधिक गर्हणीय दुसरे काही नाही." आपल्या अनुयायांना त्यांनी सांगितले, "गमावलेले हक्क भीक मागून आणि लुबाडणाऱ्यांच्या मनोदेवतेपुढे अजीजी करून कधी परत मिळत नसतात तर अविश्रांत लढा देऊन ते मिळवावे लागतात." अर्थपूर्ण शब्दांत ते पुढे म्हणाले, "यज्ञात बळी द्यायला बोकड आणतात, सिंह नाही."

डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांनी जेव्हा महाडच्या तलावाकरिता सत्याग्रहाचा लढा सुरू करण्याचे ठरविले तेव्हा त्यांना अतिशय हर्ष आणि अभिमान वाटला. ते म्हणाले, "आपले हक्क आणि आपली इज्जत प्रस्थापित करण्याकरिता हा हल्ला करण्याला तुम्ही पुढे सरसावलात हे पाहून माझे हृदय हर्षाने उसळ्या मारीत आहे." "मला तुमच्या यशाविषयी शंका नाही. पण तरीसुद्धा असे करण्यातून पुढे तुम्हांला जे हाल आणि क्लेश सोसावे लागणार आहेत त्या बाबतीत खोलवर विचार केल्यानंतरच या लढ्याला तुम्ही संमती दिलीत तर ते योग्य होईल. या जगात फार मोठे प्रयत्न केल्याशिवाय कोणतीही मोलाची गोष्ट साध्य होत नाही हे लक्षात ठेवा." आपल्या लोकांना पित्याप्रमाणे विधायक स्वरूपाची शिकवण देऊन त्यांना सज्ञान करण्याची संधी ते कधी चुकवीत नसत. ते आपल्या स्त्रियांना सांगत, "तुम्ही स्वतःला कधीही अस्पृश्य समजू नका. स्वच्छतेने राहा. स्पृश्य स्त्रिया जशी वस्त्रे नेसतात तशी तुम्ही नेसा. तुमच्या साडीला पन्नास ठिगळे असली तरी चालतील, पण ती स्वच्छ असली पाहिजे याची काळजी घ्या. तुम्ही काय नेसावे आणि कसल्या धातूचे दागिने घालावेत हे ठरविण्याच्या तुमच्या स्वातंत्र्याला कोणी बंधन घालू शकत नाही. मन सुसंस्कारी आणि वृत्ती स्वावलंबी करण्याकडे तुम्ही अधिक लक्ष पुरवा." आणि थोड्याशा कंपयुक्त आवाजात ते म्हणाले, "पण तुमचा नवरा आणि मुलगे जर दारुडे असले तर त्यांना काही झाले तरी खायला घालू नका. आपल्या मुलांना शाळेत पाठवा. पुरुषांना शिक्षण जितके जरुरीचे तितकेच ते बायकांनाही जरुरीचे आहे. वाचायला लिहायला जर तुम्ही शिकलात तर पुष्कळ प्रगती साधेल. जशा तुम्ही तशी तुमची मुले होतील. सद्गुणाच्या मार्गाने त्यांच्या जीवनाला वळण लावा, कारण तुमचे मुलगे असे झाले पाहिजेत की त्यांचा तिन्ही लोकी झेंडा लागला पाहिजे." लक्षावधी दलित आणि गांजलेले हरिजन डॉ. आंबेडकरांकडे आपला उद्धारकर्ता म्हणून पाहातात, आणि आपला अनभिषिक्त राजा म्हणून त्यांनी त्यांचा सन्मान केला यात नवल नाही!

एक समाजसुधारक म्हणून डॉ. आंबेडकर यांनी महाडच्या तळ्यातून पाणी घेण्याचा हरिजनांचा हक्क तसेच नाशिक येथील राममंदिरात प्रवेश करण्याचा हरिजनांचा हक्क प्रस्थापित करण्याकरिता झालेल्या सत्याग्रह आंदोलनांचे नेतृत्व केले. आपल्या अनुयायांत बरीच जागृती झाली आहे आणि आपल्या आवाहनाला हिंदू लोकांतील जाणत्या वर्गांचा मनापासून बंधुभावाचा प्रतिसाद मिळू लागला आहे याचे त्यांना समाधान वाटले; पण सनातनीपणाचा बालेकिल्ला जिंकून घेणे कठीण आहे आणि आपल्या ध्येयाला होणारा विरोध जरी अज्ञानावर आणि तर्कशून्य पूर्वग्रहांवर आधारलेला असला तरी तो दुर्लंघ्य आहे हे त्यांना जाणवले. म्हणून हिंदू समाजरचनेत असलेल्या असमानतेच्या धर्माज्ञेविषयी आपला निषेध जाहीर करण्याकरिता २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे एक पुस्तक

जाहीर रीत्या जाळण्याचे त्यांनी ठरविले. त्यावरून सनातनी हिंदू समाजात एकच कल्लोळ उठला आणि या अनादराच्या कृत्याचे जिकडे तिकडे मोठमोठ्याने निषेध झाले. आज अर्थात आम्हांला या कृत्याच्या बाबतीत गैरसमज करून घेण्याचा किंवा त्यावर अंधपणे टीकास्त्र सोडण्याचा काही अधिकार नाही. रौलॅट रिपोर्ट जाळला तेव्हा साऱ्या देशभर त्या कृत्याला लोकांनी उचलून धरले नाही काय? त्या रिपोर्टात ज्या आक्षेपार्ह गोष्टी होत्या त्यांच्याविरुद्ध साऱ्या देशाचा निषेध व्यक्त करणे हा उद्देश तो रिपोर्ट जाळण्यामागे होता आणि तो निषेध परिणामकारकपणे व्यक्त होत असल्याचे सर्वांनी मान्य केले होते. मनुस्मृती जाळण्यामागे तशाच प्रकारची वृत्ती होती. "मनुस्मृतीची होळी ही अगदी हेतुपुरस्सर होती. ती अतिशय सावधगिरीची पण जबर उपाययोजना होती; सर्व सवर्ण हिंदूंचे लक्ष जबरदस्तीने वेधण्याकरिता म्हणूनच ती अंमलात आणली होती. मधूनमधून अशा जबर उपाययोजना आवश्यक असतात. दारावर जर तुम्ही ठोठावले नाहीत तर ते कुणी उघडणारच नाही," असे डॉ. आंबेडकर बोलले. सगळी मनुस्मृती काही धिक्कारणीय नाही, त्यातील काही काही भागांत हिंदू समाजव्यवस्थेचा उत्तम भागही प्रकट झालेला आहे याची डॉ. आंबेडकरांना जाणीव होती, आणि म्हणून ते पुढे म्हणाले की, "मनुस्मृतीची सर्व प्रकरणे निषेधार्ह आहेत, तिच्यात काहीच चांगली तत्त्वे नाहीत, आणि खुद्द मनू हा समाजशास्त्रज्ञ नव्हता असे मुळीच नाही." ते कारणे देताना म्हणाले, "आम्ही तिची होळी केली ती अशाकरिता की शतकानुशतके ज्या अन्यायाखाली आम्ही चिरडले गेलो आहोत त्याचे एक प्रतीक म्हणून आम्ही तिच्याकडे पाहतो. तिच्या शिकवणुकीमुळे आम्ही गर्हणीय दारिद्र्याखाली भरडले गेलो आहो आणि म्हणून आम्ही ती उडी घेतली, सर्वस्व पणाला लावले, तळहातावर शिर घेतले आणि ते कृत्य केले."

खुद्द डॉ. आंबेडकरांना मानहानीचे जे प्रकार सहन करावे लागले आणि त्यांच्या अनुयायांना सगळीकडे ज्या अपमानास्पद जिण्यातून जावे लागले ते जर आपण लक्षात घेतले तर त्यांनी ज्या तीव्र रीतीने आपल्या भावना प्रकट केल्या आहेत ती सर्वस्वी अयोग्य असे म्हणून तिचा धिक्कार करणे आपल्याला अवघड जाईल. काही म्हटले तरी जेव्हा भावना उत्तेजित होतात आणि धर्मयुद्ध म्हणून जेव्हा लढा सुरू असतो तेव्हा अशाचसारख्या प्रतीकात्मक कृत्यांमधून भावनात्मक निषेध पुष्कळ वेळा प्रकट होत असतात. डॉ. आंबेडकर या ज्वलंत दिव्यातून पसार होत असतानाच स्वतःचा धर्म बदलण्याचे विचार त्यांच्या मनात येऊ लागले होते. एका प्रसंगी ते आपल्या अनुयायांना म्हणाले, "धर्म हा माणसाकरिता आहे, माणूस धर्माकरिता नाही. जर तुम्हांला संघटन करायचे, एक व्हायचे आणि या जगात यश मिळवायचे असेल, तर हा धर्म बदला. जो धर्म तुम्हांला मनुष्य म्हणून मानायला किंवा तुम्हांला प्यायला पाणी द्यायला किंवा तुम्हांला देवळात शिरू

द्यायला तयार नाही तो धर्म म्हणवून घ्यायलाच लायक नाही. जो धर्म अज्ञान्याला अज्ञानी आणि गरिबाला गरीबच राहायला भाग पाडतो तो धर्म नाही, ते धर्माचे पिशाच्च आहे.” धीमे धीमे आणि नकळत पण अनिवार्यपणे डॉ. आंबेडकरांच्या मनात आपला धर्म बदलण्याच्या दिशेने उलथापालथ सुरू होती. शेवटी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी बौद्ध भिक्खूने सांगितल्याप्रमाणे तीन बौद्ध ‘शरणे’ आणि पंचशील म्हटले आणि बौद्धधर्मात प्रवेश केला. त्या गंभीर प्रसंगी त्यांनी जाहीरपणे सांगितले की, “माझा परंपरागत चालत आलेला धर्म, जो विषमता आणि गांजणूक यांचे प्रतीक होता, तो आज टाकून देऊन मी नव्याने जन्माला आलो आहे.” अशा रीतीने, पूर्वीच्या अनेक प्रख्यात धर्मविरोधकांप्रमाणे हिंदू सनातनी मताविरुद्ध हा आणखी एक महान बंडखोर उभा राहिला आणि त्याने आपला रूढीने चालत आलेला धर्म सोडून देऊन बौद्ध धर्म स्वीकारला. यानंतर लवकरच, म्हणजे ७ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. आंबेडकर यांनी इहलोक सोडला.

इ. स. १९४६ च्या ऑगस्टच्या २९ तारखेस डॉ. आंबेडकर यांची घटना-परिषदेने नेमलेल्या घटना-मसुदा-समितीचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. डॉ. आंबेडकरांच्या जीवनात हा युगप्रवर्तक दिवस होता. संविधानाचा मसुदा तयार करण्याच्या कामी महिनोमहिने सर्वात जास्त कष्ट कोणी घेतले असतील तर ते मसुदा समितीच्या अध्यक्षांनी ही गोष्ट आता जगन्मान्य झाली आहे. मसुदा समितीचे काम जेव्हा आटोपले आणि घटनापरिषदेने संविधान मंजूर केले, तेव्हा डॉ. आंबेडकरांना आपल्या कार्यसिद्धीबद्दल केवढी कृतकृत्यता वाटली असेल! डॉ. आंबेडकरांविषयी आभारप्रदर्शनाचा ठराव मांडताना श्री. टी. टी. कृष्णम्माचारी म्हणाले की, “मसुदा समितीच्या इतर सभासदांना तिच्या या कामाकडे फारसे लक्ष पुरविता आले नाही, आणि घडले असे की शेवटी मसुदा तयार करण्याची जबाबदारी डॉ. आंबेडकरांच्यावरच पडली; त्यांनी ज्या रीतीने हे काम पुरे केले ती रीत निःसंशय प्रशंसनीय आहे आणि त्याबद्दल आम्ही त्यांचे कृतज्ञ आहोत यात मुळीच संशय नाही.” घटनापरिषदेच्या सभांचे अध्यक्षपद डॉ. राजेंद्रप्रसादांनी भूषविले होते, त्यांनी अत्यंत मार्मिक शब्दांत डॉ. आंबेडकरांनी केलेल्या कामाचे गुणग्रहण केले. ते म्हणाले, “खुर्चीवर बसून दररोज चालणारे कामकाज निरीक्षण करीत असताना, मसुदा समितीच्या सभासदांनी, विशेषतः तिचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांनी आपली प्रकृती नीट नसतानाही, किती उत्साहाने आणि कळकळीने काम केले आहे याची प्रतीती दुसऱ्या कोणाहीपेक्षा मला जास्त आहे. मसुदासमितीत त्यांना घालून तिचे त्यांना अध्यक्ष करण्याचा निर्णय आपण घेतला त्याच्याइतका यथायोग्य निर्णय आपल्याकडून दुसरा कोणताही कधी झाला नसेल. आपली निवड त्यांनी यथार्थ ठरविली इतकेच नव्हे तर त्यांनी जे काम केले आहे त्याची शान वाढविली आहे.” खरोखर हिंदू कोडाचे नेतृत्व करून ते कायदा म्हणून दाखल करण्याचे

कार्य डॉ. आंबेडकरांच्या नशिबी लिहिले नव्हते ही दुर्दैवाची गोष्ट होय. डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र भारताला त्याचे हिंदू कोड जर दिले असते तर ते काव्यगत न्यायाचे, म्हणजे अपकाराचा बदला अतर्क्य रीतीने देणाऱ्या नियतीचे अद्भुत कृत्य झाले असते, असे मानणाऱ्यांपैकी मी एक होतो; पण ते व्हायचे नव्हते. तथापि हिंदू कोडाचा मसुदा तयार करण्याच्या कामी त्यांनी केलेली कामगिरी अविस्मरणीय अशीच आहे. स्वतंत्र भारताच्या लोकशाहीच्या जीवनात संविधान हा जोवर अत्यंत मूलभूत आणि सन्मानिलेला दस्तऐवज म्हणून राहील, आणि हिंदू कोडाची त्याच्या दृष्टिकक्षेत येणाऱ्या बाबींवर जोवर सत्ता चालत राहील तोवर आपण आजचे सर्व आणि पुढे जन्माला येणारे सर्व नागरिक डॉ. आंबेडकरांचे नाव कृतज्ञतायुक्त आणि गुणग्राहक अंतःकरणाने स्मरत राहू.

आज आपल्याला डॉ. आंबेडकरांचा काय संदेश असेल ? या प्रश्नाचे उत्तर शक्य तो खुद्द डॉ. आंबेडकरांच्याच शब्दांत देणे बरे. जेव्हा संविधान मंजूर झाले त्यावेळी डॉ. आंबेडकर म्हणाले, "२६ जानेवारी १९५० या दिवशी राजकारणात आपण समता आणू पण सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता तशीच राहील. ही विसंगती आपण शक्य तितक्या लवकर दूर केली पाहिजे, नाही तर ज्यांना या विषमतेची झळ पोचत आहे ते, या परिषदेने इतक्या परिश्रमपूर्वक जी ही राजकीय लोकशाहीची रचना केली आहे तिच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवितील." या देशात विभूतिपूजनाची जी प्रवृत्ती अतिशय प्रभावी आहे तिच्यावर डॉ. आंबेडकर नेहमी टीका करीत. अशा तर्कशून्य अंध वीरपूजेपासून सावध राहा असे त्यांनी बजावले आहे. ते म्हणाले, "ज्या थोर पुरुषांनी देशाची आमरण सेवा बजावली अशांच्या-विषयी कृतज्ञताभाव बाळगणे यात काहीच चूक नाही, पण कृतज्ञतेला सुद्धा काही मर्यादा आहे. डॅनियल ओ'कोनेल या आयरिश देशभक्ताने म्हटले त्याप्रमाणे, 'आपल्या स्वाभिमानाचा बळी देऊन कोणाही पुरुषाला, आपल्या पावित्र्याचा बळी देऊन कोणाही स्त्रीला आणि आपल्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कोणाही राष्ट्राला कृतज्ञ होता येणार नाही.' दुसऱ्या कोणत्याही देशापेक्षा हिंदुस्थानच्या बाबतीत ही सावधगिरी ठेवण्याची फार मोठी आवश्यकता आहे; कारण हिंदुस्थानात राजकारणात भक्तिभावाचा जितका भाग असतो तितक्या मोठ्या प्रमाणात जगातल्या दुसऱ्या कोणत्याही देशाच्या राजकारणात आढळत नाही. धर्मकारणात भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल, पण राजकारणात भक्ती किंवा वीरपूजा हा खात्रीपूर्वक अधोगतीचा आणि परिणामी हुकूमशाही आणण्याचा मार्ग आहे." अगदी खरे ! असे म्हणण्याचा आपल्यापैकी पुष्कळांना मोह होईल.

नागरिकांच्या जीवनात ऐक्यावर आधारलेली सामाजिक-आर्थिक समता आणण्याबद्दल डॉ. आंबेडकरांच्या संदेशाला आजच्या संदर्भात एक आगळेच महत्त्व आणि निकड प्राप्त झाली आहे. सामाजिक आणि आर्थिक समतेसंबंधीची

भूक महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणात अनेक प्रातःस्मरणीय निःस्वार्थी नेत्यांनी जागृत केली आहे हे आपल्याला विसरून चालणार नाही. रानडे, आगरकर आणि टिळक, ज्योतिबा फुले, शिंदे, भाऊराव पाटील आणि जेधे या आणि इतर अनेक समाजसुधारकांनी वर्षानुवर्षे महाराष्ट्रात सामाजिक–आर्थिक समतेच्या तत्त्वाचा प्रचार केला आहे, आणि या राज्यात शेकडो खेड्यांतून पसरलेली जनता त्याकरिता उतावीळ होणे स्वाभाविक आहे. राजकीय स्वातंत्र्याने जर त्यांना सामाजिक समता आणि आर्थिक दारिद्र्यातून मुक्तता दिली नाही तर त्या राजकीय स्वातंत्र्याची त्यांना मातब्बरी वाटणार नाही, म्हणून या कामी पूर्णता मिळविण्याकरिता उद्याच्या महाराष्ट्राने आपली कंबर कसली पाहिजे. सामाजिक समतेच्या या व्यापक व्यास-पीठावर सर्व पक्षांनी एकत्र आले पाहिजे आणि या राज्यात सामाजिक समतेचे राज्य प्रस्थापित करण्याचा सर्वांनी मिळून प्रयत्न केला पाहिजे. डॉ. आंबेडकरांचे स्मरण आज आम्हांला आमच्या मार्गदर्शनाकरिता जो संदेश देत आहे तो हा आहे.

महाराष्ट्रातील सर्व लोकांना डॉ. आंबेडकरांच्या संदेशाकडे लक्ष द्या अशी या प्रसंगी मी प्रार्थना करितो आणि त्यांच्या स्मृतीला माझ्याबरोबर आदरयुक्त अभिवादन करण्याकरिता सर्वांना मनःपूर्वक पाचारण करितो.

कर्मवीर भाऊराव पाटील

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण करण्यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या चालकांनी मला येथे बोलावले याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. भाऊरावांच्या श्रेष्ठ जीवनकार्याचे स्मरण करून त्यांना आदरांजली वाहाण्याची ही संधी मिळाली हे मी माझे परम भाग्य समजतो.

भाऊराव पाटील उर्फ अण्णा यांच्या जीवनकार्याचे अर्वाचीन महाराष्ट्राच्या इतिहासात काय महत्त्व आहे हे जाणून घ्यावयाचे असेल तर महाराष्ट्रातील शैक्षणिक व सामाजिक चळवळींची पूर्वपीठिका पाहिली पाहिजे. इंग्रजांचे राज्य येथे सुरू झाल्यानंतर त्या वेळचे बुद्धिमान लोक भांबावून गेले व सामान्य जनता तर चकित होऊन गेली. राज्यकारभार, तंत्रज्ञान, इतर विद्या व कला यांतील साहेबांचे श्रेष्ठत्व, त्यांची कर्तबगारी पाहून चांगली चांगली विद्वान मंडळी मनापासून इंग्रजांची थोरवी मान्य करू लागली व राष्ट्राने जणू काही स्वखुशीने राजकीय पारतंत्र्य स्वीकारले आहे असा देखावा दिसू लागला. याप्रमाणे लोकांचा स्वाभिमानच नष्ट होऊ लागला होता. महाभारतात दास्याचे जे वर्णन केले आहे तशी समाजाची स्थिती झाली. परंतु पुढे लोकहितवादी, रानडे, आगरकर ही मंडळी निघाली व त्यांनी समाजाचे निरीक्षण आणि कठोर आत्मपरीक्षण सुरू केले. 'आपल्या समाजाची अशी स्थिती का?' या विचारमंथनातूनच या व्यक्तींना समाजात राजकीय, सामाजिक, आर्थिक परिवर्तन केले पाहिजे याची जाणीव झाली आणि त्यांनी आपले विचार महाराष्ट्रापुढे मांडले, त्यांचा उद्घोष, प्रचार केला.

रानडे–आगरकरांनी जरी याप्रमाणे सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचा विचार महाराष्ट्रीय समाजापुढे ठेवला तरी त्यांच्या काळच्या विवक्षित मर्यादांमुळे त्यांची दृष्टी प्रत्यक्ष कार्याकडे आणि त्यातही ग्रामीण समाजापर्यंत पोचली नाही.

त्यांनी समाजाचे मूल्यवान वैचारिक मार्गदर्शन केले, तथापि सामाजिक परिवर्तनाच्या बाबतीत प्रत्यक्ष आचारधर्म पाळला तो महात्मा जोतिबा फुले व त्यांचे अनुयायी आणि महर्षी कर्वे यांनी. त्यातही ग्रामीण समाजात देखील सामाजिक आर्थिक क्रांतीचा प्रयत्न होणे अवश्य आहे, अशी दृष्टी जोतिबांजवळ होती. नागर संस्कृतीची कवचे फोडून सामाजिक व आर्थिक क्रांतीचा ओघ ग्रामीण जनतेकडे वळविला पाहिजे याचा प्रखर पुरस्कार प्रथम जोतिबांनी केला. कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांना जोतिबांच्या याच विचारसरणीचे अनुयायी, प्रभावी प्रचारक आणि समर्पित कार्यकर्ते असे म्हणता येईल.

महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीच्या स्वरूपाला अण्णांनी आपल्या कार्याने कोणते वेगळे वळण लावले ? अण्णांच्या जीवनकार्याचे खरे रहस्य यातच आहे. सर्व देशांतील क्रांतीचा इतिहास पाहिला तर क्रोधातून, संघर्षातून क्रांतीच्या चळवळी जन्माला आलेल्या दिसतात. महाराष्ट्रातही हाच इतिहास घडला. परंतु या चळवळींना पुढे जर विधायक आणि रचनात्मक वळण मिळाले नाही तर संपूर्ण देशाचे नुकसान होते. जोतिबांना सर्वांगीण सामाजिक क्रांती करण्याची आवश्यकता पूर्ण पटली होती व त्यांचा स्वतःचा भर समाजशिक्षणावरच होता. पण पुढे सत्यशोधक चळवळीला समाजाचे शिक्षण करण्याच्या चळवळीचे स्वरूप न येता विशिष्ट वर्गांच्या निषेधाच्या चळवळीचे स्वरूप आले. चळवळीवर फक्त क्रोधाचा पगडा बसला, तिचे वैचारिक, शिक्षणात्मक स्वरूप नष्ट होऊन गेले. सामाजिक समतेला प्रतिष्ठित उच्चवर्णीय विरोध करतात म्हणून त्यांचा कडक निषेध करणे हेच चळवळीचे कार्य उरले. कर्मवीर अण्णांनी आपल्या कार्यामुळे या चळवळीला लोकशिक्षणाची जोड दिली आणि तिला बौद्धिक व सांस्कृतिक स्वरूप प्राप्त करून दिले. शिक्षणाचा प्रसार ग्रामीण भागात व्हावा, रयतेच्या जीवनातील अज्ञानांधकार पूर्ण नष्ट व्हावा यासाठी अण्णांनी जिवाचे रान केले. कर्मवीर भाऊराव पाटील म्हणजे उपनिषत्काळातील कोणी तपोवृद्ध ऋषीच होते असे त्यांची विशाल मूर्ती पाहिल्यावर वाटत असे. पायात पादत्राणे नाहीत, डोक्यावर शिरस्त्राण नाही, फक्त नेत्रामध्ये स्फूर्तिदान करण्याचे सामर्थ्य आहे असा हा तळमळीचा कार्यकर्ता अवघ्या महाराष्ट्रात बहुजनसमाजाच्या हितार्थ हिंडत होता, पळत होता. त्यांच्या या वणवणीमागे 'शहाणे करून सोडावे सकळ जन' हीच एक तळमळ होती. सामाजिक क्रांतीमधील अकरणात्मक भाग अण्णांनी जाणला व त्या आंदोलनाला रचनात्मक आकार दिला. ग्रामीण जनतेच्या शिक्षणासाठीही, प्रचलित शिक्षणपद्धतीहून निराळी दृष्टी पाहिजे हे त्यांनी ओळखले. त्यासाठी त्यांनी शिक्षणाला स्वावलंबनाची जोड देऊन अभ्यासक्रम तयार केले आणि शिक्षणक्षेत्रात एक नवीन जीवनशिक्षणाचा प्रयोग सुरू केला. स्वावलंबनाचे तत्त्व आजच्या सर्वच विद्यार्थ्यांच्या गळी उतरणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शिक्षणामुळे मातापित्यांपासून

व ग्रामीण जनतेपासून मुले दुरावणार नाहीत यावरही अण्णांनी कटाक्ष ठेवला आणि खेड्यापाड्यांत, लहान गावांत महाविद्यालये व वसतिगृहे स्थापन केली. ते कधीही राजकारणात पडले नाहीत. सर्वांनीच राजकारण करण्याची जरुरी नाही, तर केवळ सामाजिक-आर्थिक क्रांतीच्या कार्याला वाहून घेतलेला असाही कार्यकर्त्यांचा वर्ग पाहिजे याची शिकवणच अण्णांनी समाजाला आपल्या उदाहरणामुळे दिली. ईश्वराची सर्वमान्य भक्ती म्हणजे समाजकार्य हे अण्णांनी बहुजनसमाजाला शिकविले. अण्णा म्हणत असत की घामाने डबडबलेल्या व्यक्तीला खरा देव पावतो. श्रमाची प्रतिष्ठा व तत्त्वनिष्ठा यांचे धडे अहोरात्र अण्णांनी समाजाला स्वतःच्या आचरणातून दिले.

महाराष्ट्रामध्ये ज्यांच्या जीवनाला यथार्थतेने समाजसमर्पित जीवन असे म्हणता येईल अशा व्यक्तींमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील अग्रगण्य होते. स्वामी केवलानंदांची पारंपरिक विद्वत्ता, डॉ. आंबेडकरांचे संघटनाकौशल्य आणि कर्मवीर अण्णांचे शिक्षणकार्य या त्रिवेणीसंगमावरच महाराष्ट्राच्या अभ्युदयाचा पाया घातला गेला आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या अध्यापकवर्गाला माझे एवढेच सांगणे आहे की अण्णांची निवळ मूर्तिपूजा करू नका. कारण ते आयुष्यभर अज्ञान, अंधश्रद्धा व मूर्तिपूजा यांविरुद्ध लढले. आर्थिक व सामाजिक क्रांतीबद्दल विशाल दृष्टी ठेवून महाराष्ट्राच्या प्रत्येक खेड्यात, लहानलहान झोपडीत छोटे छोटे अण्णा निर्माण होतील या ईर्ष्येने आपण कार्य करणे जरूर आहे. अस्पृश्यता व जातीयता यांचा निवळ भाषणांत निषेध करून भागणार नाही, तर प्रत्येकाच्या स्वतःच्या सर्व व्यवहारातून, जीवनातून हे भेद पूर्णपणे नष्ट केले पाहिजेत तेव्हाच समाजातून हे दुर्गुण जातील. हे कार्य आपण करू तेव्हाच उद्याचा महाराष्ट्र म्हणेल की, आजच्या तरुण शिक्षकांनी महान कामगिरी केली. महाराष्ट्रात अनेक तीर्थक्षेत्रे आहेत. पण धनिणीच्या बागेत जेथे अण्णांनी पहिली शाळा सुरू केली ते महाराष्ट्रातील सर्वांत महत्त्वाचे पावनक्षेत्र आहे. त्या ठिकाणी गेल्यावर स्वाभिमानाने ज्याची मान ताठ होणार नाही व ज्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रू येणार नाहीत तो जिवंत माणूसच नव्हे. महाराष्ट्राचे सामाजिक समतेचे स्वप्न साकार करण्यासाठी, सामाजिक क्रांतीसाठी यात्रिक निर्माण करा हा अण्णांचा दिव्य संदेश आहे.

जवाहरलाल नेहरू

श्री. महाधिवक्ते आणि वकीलमंडळाच्या सदस्यांनो,

आज आपल्या या सर्वोच्च न्यायालयाच्या नवीन सत्राचे कामकाज सुरू करण्यापूर्वी एक अत्यंत दुःखद कर्तव्य आपल्याला पार पाडावयाचे आहे; आणि ते कर्तव्य म्हणजे भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या निधनामुळे आपल्याला होत असलेला शोक प्रकट करणे हे होय. भारतीय क्षितिजावरून नेहरूंचा अस्त झाल्यामुळे आधुनिक भारताच्या इतिहासातील एक उज्ज्वल कालखंड आता संपुष्टात आला आहे.

नेहरूंचा जन्म अत्यंत वैभवशाली परिस्थितीत झाला. त्या काळच्या श्रीमंत घराण्यातील सर्वोत्कृष्ट परंपरांना अनुरूप असे त्यांचे लालनपालन झाले व त्यांना शिक्षण देण्यात आले. असे शिक्षण घेतलेल्या नेहरूंनी जेव्हा अलाहाबाद येथे वकिलीला सुरवात केली तेव्हा कोणालाही असे वाटणे साहजिक होते की त्यांच्या दर्जाच्या बुद्धिमान तरुणांची जीवनपद्धती कशी असावी याविषयी जे संकेत रूढ झाले होते, त्यांच्यानुसारच त्यांची जीवनयात्रा चालेल. परंतु नियतीची इच्छा काही वेगळीच होती; आणि तदनुसार तरुण, संस्कारक्षम आणि भावनाविवश असे नेहरू त्या वेळेला भारताच्या राजकीय क्षितिजावर उदयास आलेल्या त्या साबरमतीच्या संताच्या—गांधीजींच्या—निकट संपर्कात आले. गांधीजींनी त्या सुमारास सत्य, अहिंसा, अपरिग्रह आणि असहकार या आपल्या क्रांतिकारक चतुःसूत्रीचा प्रचार करण्यास सुरवात केली होती. या वेळेपासूनच गांधीजी आणि नेहरू यांच्यामध्ये गुरुशिष्याचे नाते जडले आणि या नात्याचा भारताच्या इतिहासावर अत्यंत महत्त्वाचा व दूरगामी परिणाम व्हावा असे विधिलिखित होते.

गांधीजी आणि नेहरू हे कितीतरी बाबतीत एकमेकांपासून वेगळे होते;

अनेक प्रश्नांबाबत त्यांचे विचार भिन्न होते, त्यांच्या कार्यपद्धतीतही सारखेपणा नव्हता आणि त्यामुळे प्रसंगाविशेषी पत्रव्यवहाराच्या रूपाने त्यांच्यामध्ये मोठा प्रेरक वादसंवाद निर्माण होई व त्यामुळे लोकमताला वळणही लागत असे; परंतु असे असले तरी, दोन मूलभूत कल्पनांवर दोघांचाही अत्यंत ठाम, जागृत आणि सारखाच विश्वास होता. भारताची प्रगती आणि विकास मारून टाकणाऱ्या परकीय राजवटीचा शेवट करून अत्यंत शीघ्र गतीने स्वराज्य मिळविले पाहिजे या बाबतीत गांधीजींप्रमाणेच नेहरूंचाही कठोर वज्रनिश्चय झालेला होता आणि दुसरे म्हणजे ज्यांना गांधीजी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीनुसार 'दरिद्रीनारायण' असे म्हणणे पसंत करीत, त्या भारतातील लक्षावधी गरीब व उपाशी जनतेच्या सेवेसाठी नेहरूंनीही, गांधीजींप्रमाणेच, सर्वस्वार्पण केले होते. दोघांच्या जीवनविषयक धारणेमध्ये हे मूलभूत साधर्म्य असल्यामुळेच त्यांचा गुरुशिष्य-संबंध टिकून राहू शकला; गुरूने आपल्या शिष्यावर अमर्याद प्रेमाचा वर्षाव केला व शिष्यानेही गुरूच्या प्रेमाची असीमित औदार्याने परतफेड केली. खरोखरच मनुष्यजातीच्या इतिहासात गांधीजी आणि नेहरू यांच्यातील हा आंतरिक आध्यात्मिक संबंध अनेक दृष्टींनी अद्वितीय आहे.

गांधीजींच्या स्फूर्तिदायक नेतृत्वाखाली सारे राष्ट्र ब्रिटिश नोकरशाहीशी दीर्घ असा अहिंसात्मक लढा देण्यास सिद्ध झाले. या लढ्यात नेहरू, त्यांच्या स्वयंसिद्ध सवयीप्रमाणे, सतत अग्रभागी तळपत राहिले. स्वातंत्र्यासाठी चाललेल्या या राष्ट्रीय संघर्षाच्या पुरुषार्थमय कालखंडात नेहरूंच्या व्यक्तिगत आयुष्याचे स्वरूप पार बदलून गेले आणि त्यांच्या विचारसरणीतही एक क्रांतिकारक परिवर्तन झाले. रोजच्या जीवनातील सर्व सुखसोयी त्यांनी सोडल्या, वकिलीचा व्यवसाय करण्याच्या आपल्या संकल्पित योजनेवर पाणी सोडले आणि जनतेची सेवा करण्याच्या कार्याला त्यांनी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले. त्याग व सेवा या गुणांचे आवाहन त्यांच्या बाबतीत फार जबरदस्त ठरले. शेवटी १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले; आणि स्वातंत्र्याच्या उदयाबरोबर राष्ट्रपिता महात्मा गांधींचा कालखंड एक प्रकारच्या सफलतेच्या भावनेने संपला. त्यानंतर आधुनिक भारताचे शिल्पकार जे नेहरू त्यांचे युग सुरू झाले.

स्वतंत्र भारतातील लोकशाहीची धीमेपणाने पण अप्रतिहत प्रगती व्हावी यासाठी नेहरू व त्यांचे थोर साथीदार यांनी जर कोणते अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले असेल तर ते भारताचे संविधान तयार करवून घेणे हे होय. हे कार्य फार दूरवर परिणाम करणारे होते. २६ जानेवारी १९५० रोजी भारताचे संविधान स्वीकृत झाले. या संविधानाने असे न्याय्य अभिमानाने घोषित केले की सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळेल अशी खात्री देणे हे स्वतंत्र भारताने आपल्या उराशी जोपासलेले ध्येय आहे. या ध्येयपूर्तीसाठी राष्ट्राचा मार्ग हा

लोकशाही पद्धतीचाच असेल असा आदेशही संविधानाने दिला. परिणामतः साहजिकच संविधानाच्या कलमांत ज्यांचा पवित्रोच्चार करण्यात आलेला आहे अशा नागरिकांच्या मूलभूत हक्कांना या संविधानामुळे फार मानाचे स्थान मिळाले आणि त्याबरोबरच्च या मौलिक हक्कांचे सामाजिक–आर्थिक न्यायाच्या प्रबळ मागण्यांशी एक समंजस समायोजन घडून यावे म्हणून योग्य, विवेकपूर्ण आणि सुसंवादी अशा तरतुदीही या संविधानाने केल्या. नेहरू युगाचे व्यवच्छेदक लक्षण जर कोणते असेल तर ते हेच की समतेवर आधारलेले लोककल्याणकारी राज्य अस्तित्वात आणण्यासाठी लोकशाही कार्यतंत्राचा साधन म्हणून स्वीकार करणे.

विधिनियमांच्या अधिसत्तेला सर्वतोपरी महत्त्व असणे हे लोकशाही कार्य-पद्धतीला अभिप्रेतच आहे; आणि म्हणूनच भारतीय संविधानानुसार, नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षक व संगोपक म्हणून उच्च न्यायालये व सर्वोच्च न्यायालय अस्तित्वात आले. नागरिकांचे मूलभूत हक्क अबाधित राखणे आणि विधिमंडळांनी पास केलेले सर्व कायदेकानू व तदनुसार कार्यपालिकेने उचललेली पावले ही संविधानाच्या संबंधित तरतुदींशी तंतोतंत जुळणारीच असावीत यासाठी विधि-मंडळाच्या व कार्यपालिकेच्या सर्व कृत्यांवर डोळ्यात तेल घालून निगराणी ठेवणे हे या सर्व न्यायालयांचे पवित्र कर्तव्य झालेले आहे. संविधानाने आपल्याकडे सोपविलेले हे पवित्र महत्कार्य, भारतातील न्यायदानमंडळ तेव्हापासून निष्ठेने व निर्भयतेने पार पाडीत आहे.

न्यायविषयक कार्यपद्धती ही पुष्कळदा धीमी, संथ व विलंबयुक्त असणे हे सहज शक्य आहे. आणि म्हणूनच सामाजिक–आर्थिक ध्येयांची पूर्ती शीघ्रतेने करून घेण्याविषयी उत्सुक असलेल्या मनांमध्ये या मार्गामुळे अधीरता निर्माण होण्याचा संभव आहे. असे जरी असले, तरी विधिनियमांची अधिसत्ता हाच लोकशाही जीवनपद्धतीचा ठाम आणि बळकट आधार आहे अशी जी पक्की खूणगाठ नेहरूंनी आपल्या मनात बांधून ठेवली होती तिच्यापासून ते कधीही विचलित झाले नाहीत. आणि म्हणूनच लोकशाही जीवनपद्धतीच्या संदर्भात न्यायदानक्षेत्राला जे कार्य करावयाचे आहे त्याचे वैशिष्ट्य व महत्त्व ते नेहमी जाणून असत.

नेहरूंच्या जीवनात त्यांच्या वृत्तीची कोणकोणती वैशिष्ट्ये दिसली ? — सर्व भौतिक स्वरूपाच्या सामाजिक-आर्थिक प्रश्नांची चर्चा किंवा सोडवणूक करताना एक विवेकपूर्ण शास्त्रपूत पद्धती स्वीकारण्याची परम आवश्यकता आहे असा त्यांचा दृढ विश्वास होता. सार्वजनिक महत्त्वाच्या सामाजिक-आर्थिक बाबींच्या क्षेत्राशी नागरिकांच्या धर्माचा काही संबंध आहे किंवा धर्माला त्यात काही महत्त्व आहे ही कल्पना सर्वथैव फेटाळून लावणाऱ्या धर्मनिरपेक्षतावादाच्या सिद्धान्तावर ज्वलज्जहाल श्रद्धा; भारताचे यच्चयावत् सर्व नागरिक — मग ते कोणतीही भाषा बोलणारे असोत,

कोणत्याही धर्माचे अनुयायी असोत, कोणतीही जात, संप्रदाय किंवा प्रदेश यांतील असोत—त्यांच्यातील संपूर्ण समानतेवर आणि भारताचे ऐक्य व एकात्मता यांवर चिरंतन विश्वास; लोकशाही जीवनपद्धतीचाच मार्ग चोखाळण्याचा अविचलित, अभंग व अखंड असा वज्रनिश्चय—ही काही मूलभूत प्रमेये म्हणजेच नेहरूंनी आपल्या जीवनभर ज्या पुरोगामी सामाजिक-वैधानिक तत्त्वज्ञानाचा उपदेश व अवलंब केला, त्याची पृथगात्म वैशिष्ट्ये म्हणता येतील. ही तत्त्वे अत्यंत निष्ठेने कृतीत उतरविण्यानेच हे राष्ट्र नेहरूंची स्मृती चिरंतन करू शकेल, यात मुळीच शंका नाही.

या गंभीर प्रसंगी, हे न्यायालय विनम्र भावनेने असा अंतःकरणपूर्वक संकल्प करते की वैधानिक विश्वातील आम्ही सर्व बांधव, न्यायाधीश आणि वकील, हे नेहरूंच्या स्मृतीला एकाच योग्य व विवेकपूत मार्गाने श्रद्धांजली वाहू शकतो; आणि तो मार्ग म्हणजे विधिनियमांच्या अधिसत्तेचे सर्वतोपरी श्रेष्ठत्व कायम टिकविण्याच्या कार्याला आम्ही स्वतःला पुनः वाहून घेणे, हा होय. आपण सर्वांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की विधिनियमांची अधिसत्ता जर यशस्वी रीतीने प्रत्यक्षात चालू राहायची असेल तर न्यायाधीशांनी न्यायपूर्ण रीतीने, निःपक्षपातीपणे व वस्तुनिष्ठतेने, भय व प्रलोभने यांच्या संपर्कातही न येता आपले कार्य केले पाहिजे. त्याचप्रमाणे वकीलमंडळींनीही न्यायाच्या प्रशासनाच्या कार्यात न्यायाधीशांना पूर्ण हार्दिक सहकार्य दिले पाहिजे. आपले काम करीत असताना प्रामाणिकपणा, नेकी, सचोटी यांचा काटेकोर मार्ग कधीही न सोडणे आणि स्वतंत्र, निर्भय व कार्यक्षम राहाणे या ज्या प्रस्तुत व्यवसायाच्या अत्यंत श्रेष्ठ व उदात्त अशा परंपरा आहेत, त्यांना शोभेल अशीच वकिलांची वर्तणूक नेहमी असली पाहिजे.

या तर मग, आपण सर्वजण पूर्ण परस्परसहकार्याच्या भावनेने, आपआपली कर्तव्ये व नियत कार्ये पार पाडण्यासाठी स्वतःला वाहून घेऊ या—कारण जवाहरलाल नेहरू यांच्या स्मृतीला आदरांजली वाहण्याचा तोच एक सर्वोत्तम मार्ग आहे.

नेहरूंच्या आत्म्याला शांती मिळो !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ..... दिः .....
आवृत्ति ..... वेळ दिः .....

श्री. लालबहादुर शास्त्री

श्री. महाधिवक्ते आणि वकीलमंडळाच्या सदस्यांनो,

आपले आजचे कामकाज सुरू करण्यापूर्वी आपले पंतप्रधान श्री. लालबहादुर शास्त्री यांच्या मृत्यूबद्दल दुखवटा व्यक्त करणे हे आपले पवित्र आणि शोककारक कर्तव्य आहे. ताश्कंद परिषदेची यशस्वी परिसमाप्ती झाल्याचे जेव्हा देशाने ऐकले तेव्हा लालबहादुर शास्त्रींचे सर्व देशबांधव, ते दिल्लीला आल्यावर त्यांचे विजेत्या-प्रमाणे स्वागत करण्याची उत्सुकतेने वाट पाहात होते. परंतु मृत्यूच्या कठोर व निर्दय हातांनी त्यांना आमच्यातून ओढून नेले व प्राणज्योत मालविलेले त्यांचे निष्प्राण शरीर ताब्यात घेण्याचा प्रसंग क्रूर काळाने आपल्यापुढे उभा केला. यापूर्वी भारताच्या कोणत्याही श्रेष्ठ नेत्याचे निधन, इतक्या नाट्यपूर्ण उपरोधाने युक्त अशा वेदनाकारक व तीव्र दुःखद परिस्थितीत झाले नसेल! खरोखरच असे म्हणता येईल की लालबहादुरांनी युद्धात देशाला विजय मिळवून दिला आणि शांततेच्या कार्यात आपला देह ठेवला!

एका घरंदाज परंतु गरीब कुटुंबात लालबहादुरांचा जन्म झाला. 'चांदीचा चमचा तोंडात घेऊन जन्म घेतला' असे म्हणण्यासारखी त्यांच्या घरातील परिस्थिती मुळीच नव्हती. आपल्या लहानपणी आणि पुढे शिक्षणक्रमाच्या संपूर्ण काळात, दारिद्र्यामुळे अपरिहार्यतेने उद्भवणाऱ्या सर्व प्रश्नांना धैर्याने व सहनशीलतेने त्यांना तोंड द्यावे लागले आणि स्वतःचा मार्ग स्वतःच काढावा लागला. ते शिकत असतानाच मिळवू लागले व अक्षरशः निढळाच्या घामाने त्यांनी शिक्षणात आपली प्रगती करून घेतली.

लालबहादुरांचे आयुष्य म्हणजे निष्ठावंत व समर्पित अशा सामाजिक सेवेचे एक महाकाव्यच होय. 'स्व' आणि कुटुंब हे त्यांचे लक्ष कधीही आकर्षू शकले

नाहीत. राजकीय स्वातंत्र्यासाठी चाललेल्या संघर्षात त्यांनी स्वतःला पूर्णपणे व सर्वस्वी झोकून दिले व अनेक वर्षे ते उत्तर प्रदेशातील राजकीय जीवनाच्या अग्रभागी चमकत होते. त्यांनी अनेक वेळा तुरुंगवास भोगला व लवकरच भारतातील अग्रगण्य राजकीय नेत्यांत त्यांची गणना होऊ लागली.

शरीराकृतीने अगदीच किरकोळ, पोशाखात साधे, बोलण्यात मृदू, जीवन-पद्धती व जीवनविषयक दृष्टिकोण यांत मूलतःच विनयशील आणि नम्र—अशा या लालबहादुरांजवळ एक अत्यंत विशाल अंतःकरण आणि एक सखोल आंतरिक आध्यात्मिक शक्ती होती. दुर्दम्य इच्छाशक्ती, अजिंक्य धैर्य व धाडस आणि अभंग वज्रनिश्चय यांचे वरदान त्यांना लाभले होते. यांच्या बळावरच कोणत्याही प्रश्नाला ते तत्त्वज्ञाची शांतता व मानसिक संतुलन कायम ठेवून तोंड देऊ शकत होते. भारताच्या 'स्वदेशी' संस्कृतीत जो काही सर्वोत्कृष्ट भाग आहे तो लालबहादुरांच्या रूपाने साकार झाला होता असे त्यांच्याबद्दल यथार्थतेने म्हणता येईल. त्यांच्या-सारखा जनसामान्यातील एक गृहस्थ भारताच्या पंतप्रधानपदावर आरूढ व्हावा यात भारतीय लोकशाहीची वैशिष्ट्यपूर्ण श्रेष्ठता सिद्ध होते. लालबहादुरांच्या संपूर्ण सार्व-जनिक जीवनात, त्यांच्या निष्कलंक चारित्र्याबद्दल संशयाची यत्किंचित् गुणगुणही कुठे ऐकू येऊ शकली नाही—भारताचा असा हा उदात्त पुत्र अस्तंगत झाल्याबद्दल आज आपण शोक करीत आहोत!

अलीकडच्या आणीबाणीच्या काळात लालबहादुर हे संपूर्ण देशाचे एकमेव असे नेते बनले. त्यांच्या स्फूर्तिप्रद नेतृत्वाखाली सर्व नागरिक एक होऊन, जणू काही एक व्यक्ती बनून, आक्रमणाशी सामना देण्यास सज्ज झाले! त्यांचा आवाज हा साऱ्या देशाचा आवाज बनला आणि गंभीर आणीबाणीला तोंड देण्यात जो कठोर निर्धार व कडवा निश्चय त्यांनी प्रकट केला तो त्यांच्या सर्व देशबांधवांसाठी एक दीपस्तंभ बनला! असे नेहमी म्हटले जाते की अत्यंत कठीण परिस्थितीतच माणसाच्या अंगच्या खऱ्या गुणांची परीक्षा होते व ते कसोटीस उतरतात. या देशाने नुकतेच एका भीषण संकटाला जे तोंड दिले, त्यावरून, भारताने ज्यांचा यथार्थ अभिमान बाळगावा अशा धीरोदात्त व निर्भय नेत्यांमध्ये लालबहादुर शास्त्रींचे स्थान आहे, हे स्पष्ट झाले आहे.

न्यायखात्याच्या संदर्भात बोलावयाचे म्हणजे, लालबहादुर हे न्यायासनाचे स्वातंत्र्य, प्रतिष्ठा व दर्जा यांच्याविषयी सदैव कटाक्षाने आदर बाळगत असत. या देशातील न्यायाच्या प्रशासनासंबंधीच्या काही प्रश्नांवर त्यांच्याशी चर्चा करण्याची संधी मला पुष्कळ वेळा मिळाली; तसेच काही काही वेळा न्यायालयांच्या स्वातंत्र्याला धोका असल्याचे भासू लागले तेव्हा या बाबी त्यांच्या कानावर घालणे मला आवश्यक वाटले; परंतु प्रत्येक वेळी मला असेच आढळून आले की या देशातील न्यायालयांचे स्वातंत्र्य, प्रतिष्ठा व दर्जा यांची जपणूक करण्याचा त्यांनी

अगदी मनापासून व सतत निर्धार केला होता. विधिनियमांच्या अधिसत्तेचा एक प्रामाणिक व प्रबळ पाठीराखा त्यांच्या निधनामुळे आम्ही गमावला आहे !

पंतप्रधान म्हणून लालबहादुरांची कारकीर्द ही तुलनेने अल्प काळापुरती झाली. या देशाची नियती घडविण्याचे कार्य त्यांनी जेमतेम फक्त अठरा महिने केले. परंतु मानवी कर्तृत्वाचे यश आणि उज्ज्वलता ही, एखादी व्यक्ती किती दीर्घकाळ अधिकारपदावर होती यावरून ठरत नसते; तर आपल्या काळात त्या व्यक्तीने कोणती श्रेष्ठ कामगिरी करून दाखविली यावरून ठरत असते. जुन्या संस्कृत कवीने जे म्हटले आहे की 'मुहूर्तं ज्वलितं श्रेयो न च धूमायितं चिरम्!' त्याची यथार्थता अशा उदाहरणांवरून पटते. नुकत्याच उद्भवलेल्या आणीबाणीच्या परिस्थितीत, राष्ट्राला विजयाप्रत नेण्याची जी उज्ज्वल कामगिरी लालबहादुरजींनी इतक्या निर्णयात्मक रीतीने केली, तिच्यामुळे इतिहास त्यांना निःसंकोचपणे मानाचे पान देईल याविषयी मला मुळीच शंका नाही. राष्ट्राच्या अत्यंत संकटाचा काळ हाच त्याच्या परमोज्ज्वल गौरवाचा काळ ज्यांनी बनविला अशा एका असामान्य जनसामान्याची कारकीर्द, म्हणूनच शास्त्री यांची पंतप्रधानपदाची कारकीर्द इतिहासात ओळखली जाईल.

दुःखाने दिङ्मूढ झालेल्या लालबहादुरांच्या कुटुंबीयांकडे, सहानुभूतीने भरलेली आमची हृदये ओढ घेत आहेत. आम्ही त्यांना असा विश्वास देऊ इच्छितो की त्यांच्यावरील या अत्यंत दुःखद वियोगाच्या गंभीर वेळी, भारतातील सर्व न्यायालये व वकील हे आपल्या इतर देशबांधवांबरोबरच, त्यांचे दुःख व वेदना यांत सहभागी आहेत.

आपल्या दिवंगत पंतप्रधानांनी जो समृद्ध वारसा आपल्यासाठी ठेवला आहे त्याबद्दल आपला कृतज्ञ आदरभाव प्रकट करण्याचा मार्ग एकच—तो म्हणजे भारताच्या संविधानाने विधिनियमांची अधिसत्ता कायम टिकविण्याचे जे कार्य आपल्याकडे सोपविले आहे, त्या कार्याला आपण सर्वांनी स्वतःला पुनः वाहून घेणे हा होय.

अतो न रोदितव्यं हि क्रियाः कार्याः स्वशक्तिशः।

असा हितोपदेश आपल्या जुन्या संस्कृत ग्रंथांतून केलेला आहे. अशा दुःखाच्या व गंभीर प्रसंगी आपण अश्रू ढाळून उपयोग नाही; तर विशिष्ट ध्येयसिद्धीच्या, ऐक्याच्या आणि समर्पणाच्या भावनेने राष्ट्राप्रत आपले जे जे कर्तव्य आहे ते ते करण्याची आपणापैकी प्रत्येकाने प्रतिज्ञा केली पाहिजे. आपले दिवंगत नेते लालबहादुर शास्त्री यांच्या स्मृतीला आदरांजली वाहण्याचा हाच एक मार्ग आहे.

लालबहादुरजींच्या आत्म्याला चिरशांती लाभो !

() ()

खंड सहावा

संकीर्ण

अनुक्रम

१ विद्यार्थिदशेतील संपादकीय लेखन

[दक्षिण विद्यालय त्रैमासिकाच्या मराठी विभागाचे संपादक असताना लिहिलेल्या संपादकीय लेखांमधील काही निवडक अंश. पुणे, १९२१–१९२२.]

२ शिक्षणाचे माध्यम

[पारले येथील टिळक विद्यालयात केलेल्या भाषणाचा सारांश. मुंबई, २८ फेब्रुवारी १९५४.]

३ न्यायाधीशाची भूमिका

[भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नेमणूक झाल्यानंतर मुंबई उच्च न्यायालय वकीलसंघाने दिलेल्या निरोप-प्रसंगी केलेले भाषण (मूळ इंग्रजी), मुंबई, ११ जानेवारी १९५७; आणि मुंबईतील सुमारे तीस सांस्कृतिक व शैक्षणिक संस्थांनी मिळून केलेल्या सत्कारप्रसंगी उत्तरादाखल दिलेले भाषण, मुंबई, १२ जानेवारी १९५७—या दोन्हींचा एकत्रित सारांश.]

विद्यार्थिदशेतील संपादकीय लेखन

न्या० गजेंद्रगडकर हे पुण्याच्या डेक्कन कॉलेजात विद्यार्थी असताना त्या विद्यालयाच्या त्रैमासिकाच्या मराठी विभागाचे इ. स. १९२१-२२ या वर्षात संपादक होते. या त्रैमासिकाच्या मराठी व कानडी विभागांचे संपादक त्या काळी सर्व विद्यार्थ्यांतून निवडले जात. श्री. गजेंद्रगडकर त्या वेळी सीनियर बी. ए.च्या वर्गात होते. या त्रैमासिकाच्या अंकांतून त्यांनी जे संपादकीय लेखन केले त्यातील तीन उतारे निवडून येथे दिले आहेत. चव्वेचाळीस वर्षांपूर्वी, विद्यार्थिदशेत असताना त्यांची मराठी लेखनाची शैली कशी होती याचा मोठा मनोरंजक प्रत्यय वाचकांना या उताऱ्यावरून येईल असे वाटते. त्याचप्रमाणे त्यांच्या तत्कालीन भावना व मते आणि त्यांच्या व्यक्तित्वविकासाची पूर्वावस्था यांवरही या मजकुरामुळे प्रकाश पडेल.

—संपादक

अ. पहिले चार शब्द

खरोखर फार भीतभीतच मी ही संपादकीय लेखणी हातात घेत आहे. शक्य तितका प्रयत्न करावा अशा उत्साहाने प्रेरित होऊन जरी मी हे कार्य करण्यास प्रवृत्त झालो आहे, तरी कसे काय होते, असा प्रश्न मला आरंभीच सकंप करीत आहे.

पहिला विचार असा मनात येतो की ही लेखणी पेलण्यास आपण किती असमर्थ! सहज पाहा, की, ज्या आसनावर १८९२ सालापासून प्रतिवर्षी एकाहून एक सरस योग्यतेचे लोक अधिष्ठित झाले, त्याच आसनावर आता मी बसणार! नुसती एकवार आपल्या संपादकीय परंपरेतील नावे चाळा, म्हणजे मी म्हणतो याचा प्रत्यय येईल. आधीच मी प्रस्तुतसारख्या कार्याला पूर्ण अनभ्यस्त; त्यात संपादन

करायचे ते विद्यालयीन त्रैमासिकाचे; आणि वाचक कोण तर आपल्या कॉलेजातले विचक्षण, चिकित्सक व विचारी बंधुजन ! पण इतके असून सुद्धा, केवळ 'चापलात्' म्हणा किंवा आपले बांधव गुणैकग्राहक दृष्टीनेच आपल्या कृतीचे परीक्षण करतील अशा विश्वासाने म्हणा, अथवा 'गंगेचेच पाणी गंगेलाच अर्घ्यरूपाने पोचवावयाचे, तसे प्रिय बंधूंचेच लेख व विचार त्यांना मुद्रित करून अर्पायचे, आपले काम फक्त वाहकाचे; तेव्हा गुण काय दोष काय दोन्हीत लेखक व वाचक समभागी असा विचार करून म्हणा, मी या कार्याला उद्युक्त झालो आहे. भूत व भविष्यत् यांचा सांधा जुळवण्याचे काम आपल्याला करावयाचे आहे. मागे पुष्कळ दुवे आहेत, पुढेही असंख्य येतील; आपण आपला दुवा शक्य तितक्या कुशलतेने जोडू, निदान तसा प्रयत्न तरी निःसंशय करू; प्रयत्न करणे आपले कर्तव्य; प्रयत्नांच्या फलाची अपेक्षा करण्याचा हक्क मानवी प्राण्याला काय पोचतो ?

(दक्षिण विद्यालय त्रैमासिक, वर्ष २९ वे, अंक पहिला,
ऑगस्ट १९२१—मराठी विभागाच्या संपादकीयातून)

आ. लेखणीचे कटाक्ष

१. मातृभाषांची अवहेलना

मुंबई विश्वविद्यालयाची घटना फार चमत्कारिक असल्यामुळे, विश्वविद्यालयीन अभ्यासक्रमात मातृभाषांचा दुय्यम दर्जाचा सुद्धा प्रवेश करून घेण्यास, मातृभाषाभिमान्यांस किती आयास पडले, हे आता कोणास नव्याने सांगावयास नको. बाकी, आपल्या विलक्षण परिस्थितीचा प्रभावच असा आहे, की, इतर देशांतून अत्यंत अस्वाभाविक म्हणून शिक्कामोर्तब मिळालेल्या गोष्टी सुद्धा येथे राजरोसपणे चालतात; इतकेच काय, पण त्या तशा अस्वाभाविक आहेत म्हणून सिद्ध करू लागणाराच हास्यास्पद ठरतो. नुसती शिक्षणाच्या माध्यमाची गोष्ट घेतली तरी पुरे आहे. ज्याने त्याने आपल्या मातृभाषेच्या द्वाराने विद्यार्जन करावे, हा सिद्धान्त इतका स्वतःसिद्ध व उघड आहेना; पण 'टाइम्स' सारख्या वर्तमानपत्राने एकदा उपक्रम केला की, इंग्रजी भाषेच्याच साहाय्याने आम्हांला विद्यार्जन केले पाहिजे, की तसे आग्रहाने प्रतिपादणारी पत्रावर पत्रे प्रसिद्ध होऊ लागतील.

तरीपण एकदा मातृभाषांचा प्रवेश होऊ दिल्यावर, त्यांच्यासंबंधाने जे अनुदारपणाचे व फाजील चिकित्सेखोरपणाचे धोरण मुंबई विश्वविद्यालयाने स्वीकारले आहे, त्याचा तीव्र निषेध केल्यावाचून आमच्याने राहावत नाही. मातृभाषांना ऐच्छिक विषय म्हणून स्थान दिल्यानंतर, पुनः त्यांतील प्रश्नांची उत्तरे इंग्रजीत द्यावीत असे म्हणणारा एक प्रबल पक्ष निघावा, यापेक्षा जास्त शोचनीय ते काय असणार ? प्रश्न इतका सरळ व साधा असताना, त्यावर मोठा कडाक्याचा वाद

झाला, व शेवटी मोठ्या मुष्किलीने इंग्रजीत किंवा त्याच भाषेत उत्तरे देण्याची सवलत फार उदारपणे देण्यात आली! अशा रीतीने मुं. वि. विद्यालयाने तर स्वतःला उपहासास्पद करून घेतलेच आहे. आमची मात्र मातृभाषा ऐच्छिक विषय घेतलेल्या स्वाभिमानी विद्यार्थ्यांना कळकळीची व आग्रहाची अशी विनंती आहे की, त्यांनी इंग्रजीतून उत्तरे देण्याच्या प्रलोभनाला मुळीच बळी पडू नये; कारण स्वतःच्या अव्यभिचारी वाङ्मयभक्तीला त्यामुळे बाध येतो. शिवाय कोणीच इंग्रजीतून उत्तरे न लिहिल्यास, त्यामुळे तरी निदान मुंबई विश्वविद्यालयाला आपल्या चुकीची योग्य जाणीव होईल.

२. टिळक-स्मारक कधी करणार?

एक वर्ष होऊन गेले; अद्यापि टिळक स्मारकाला मूर्त स्वरूप प्राप्त झालेले नाही. ज्या वेळेस स्मारक करण्याचा ठराव पास झाला त्या वेळेस साधारण अशी कल्पना होती, की, दोन तीन महिन्यांच्या मे च्या सुट्टीकरिता घरोघर परत जाण्याच्यापूर्वीच, महाराष्ट्राच्या अनभिषिक्त सम्राटाच्या पूज्य स्मृतीचे उचित स्मारक आपल्या कॉलेजने तरी पार पाडावे. सहजच आहे, ज्या विभूतीच्या नुसत्या नामोच्चाराने प्रत्येक राष्ट्राभिमानी तरुणाच्या अंतःकरणात निःसीम आदराच्या व अलोट भक्तीच्या भावना उचंबळून येतात, त्या लोकमान्यांचे स्मारक; व करणार कोण? तर 'आपल्याच ह्या कॉलेजात टिळक शिकले' म्हणून नेहमीस्वाभिमानपूर्वक आठवण काढणारे डे. कॉ. तले उत्साही तरुण टिळक भक्त. मग टिळक स्मारकाची कल्पना हां हां म्हणता यशस्वी होईल असे वाटल्यास नवल काय? खरे नवल हे, की, दिवसांमागून दिवस गेले, महिने गेले, एक वर्षाचा मोठा अवधी सुद्धा कालोदरात गडप झाला; पण कोणीही अशी पृच्छा करीना, की, टिळक स्मारक कमिटी करते आहे काय, फंड जमला किती, पाहिजे किती? नेहमी कोणतेही पवित्र राष्ट्रीय कार्य न करण्याची सबब अशी सांगण्यात येत असे की कॉलेजमधले अधिकारी प्रतिकूल आहेत. प्रस्तुतच्या बाबतीत तरी निदान ती सबब पुढे करणे शक्य नाही. असे असताना सुद्धा स्मारकाचे घोंगडे अद्यापि भिजतच पडले आहे, यापेक्षा आमच्या पोकळ बडबडीचा फोलपणा तो काय सिद्ध व्हावयाचा राहिला? आपले आरंभशूरत्व प्रसिद्ध आहे; पण टिळकांच्या स्मारकासारख्या सर्वप्रिय, सर्वमान्य व पवित्र कार्याला देखील त्यामुळे विनाशवजा विलंब होऊ शकतो, हा आमच्या दैवदुर्गतीचा एक विलासच म्हटला पाहिजे!...

आमच्या प्रिय वाचकांजवळही आमचे एक हक्काचे व जिव्हाळ्याचे मागणे आहे. तुम्ही जे टिळकांचे स्मारक कराल ते तुमच्या टिळकप्रेमाची व राष्ट्रभक्तीची उत्तम साक्ष देईल असे असावे असे तुम्हांला वाटत नाही काय? त्या महान् राष्ट्रपुरुषाचे स्मारक करण्याचे भाग्य लाभल्याबद्दल तुम्ही धन्यता मानत नाही का?

टिळक आपल्या भौतिक देहाने आपल्यामध्ये असताना त्यांचे परम पवित्र दर्शन घेण्यास तुमचेच नेत्र उत्कंठ असत ना? त्यांची गंभीर गर्जना ऐकण्यास तुमचेच श्रवण अधीर होत ना? टिळकांच्या चरणकमलांवर लोटांगण घेण्याची तीव्र लालसा तुम्हांलाच होई ना? टिळक कोणाचे—व टिळकांचे कोण? मग विचार कसला करता? या, भर भर पुढे या व इतका वेळ केलेल्या हयगयीच्या पातकाबद्दल प्रायश्चित्त घेऊन पुनीत व्हा. टिळकांची सुंदर तसबीर कॉलेजच्या भव्य लायब्ररीत ठेवा; त्याकरिता एक उत्सव करा; टिळकांचा मनःपूर्वक व मुक्तकंठाने जयजयकार बोला व मग राष्ट्रप्रेमाच्या गोष्टी सांगा. इतकेही होत नसल्यास—पण छेः; तो विचारच नको.

(दक्षिण विद्यालय त्रैमासिक, वर्ष २९ वे, अंक ३ रा, जानेवारी १९२२— 'लेखणीचे कटाक्ष' या सदरातून.)

इ. शेवटी

पहिले चार शब्द सांगून, भीतभीतच संपादकीय लेखणी हातात घेतल्यानंतर वाचकांसमोर येण्याचा माझा हा दुसरा व शेवटचा प्रसंग होय. त्या वेळेस माझ्या अपात्रतेची जरी मला पूर्ण जाणीव होती, तरी 'आशा बलवती' या न्यायाने आपण आपली पराकाष्ठा करू व कार्य अगदीच अयशस्वी न होऊ देण्याची खबरदारी घेऊ, अशा विचाराने मला एक प्रकारचे धैर्य वाटत होते. पण आज हा चवथा अंक वाचकांना देताना, खरोखरीच आपण करावयास पाहिजे होते त्या मानाने काहीच केले नाही, अशा निराशेने मला ससाध्वस केले असल्यास नवल काय?

शेवटी ही लेखणी खाली ठेवताना वाचकांना जास्त काय सांगावयाचे? आपल्या परंपरेतील हा दुवा येथे संपला; यंदाचा संपादक व यंदाचे वाचक आज येथे आहेत; तर उद्या येथे दुसरेच चेहरे दिसतील. कदाचित पुन्हा एकमेकांची गाठ पडण्याचीही सुसंधी येणार नाही. पण गाठ पडली नाही म्हणून आपण एकमेकांबद्दल संपादिलेले प्रेम तर अविनाशी आहे ना? शिवाय प्रत्येकाचे वसतिस्थान किंवा कार्यक्षेत्र कितीही भिन्न झाले, तरी सर्वजण हिंदमातेच्याच हितार्थ यथाशक्ती झटणार ना? म्हणूनच वाचकांना 'आमुचा रामराम घ्यावा' म्हणून विनविताना मी परमेश्वराची एवढीच प्रार्थना करतो की, आम्ही सर्वजण कोठेही असलो तरी आमच्या कर्तव्याची जाणीव कधीही मलिन न होवो, व 'सहवीर्यं करवावहै' या मंत्राचा आम्हांला कधीही विसर न पडो.

(दक्षिण विद्यालय त्रैमासिक, वर्ष २९, अंक ४ था, मार्च १९२२—मराठी विभागाच्या संपादकीयातून)

२

शिक्षणाचे माध्यम

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतापुढे जे अनेक प्रश्न उभे राहिले त्यात स्वतंत्र भारतात विद्यालयीन, महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाचे माध्यम काय असावे हा एक प्रमुख प्रश्न आहे. इंग्रजांच्या राजवटीत प्राथमिक वगळता इतर पातळींवर शिक्षणाचे माध्यम बहुतेक ठिकाणी इंग्रजीच होते. त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमाचा विचार करताना, शैक्षणिक क्षेत्रात यापुढे इंग्रजी भाषेचे स्थान काय राहाणार हाही एक उपप्रश्न निर्माण होतो. या दोन्ही प्रश्नांची चर्चा करताना भाषाभिमानाने दृष्टी कलुषित होऊ देता कामा नये; विकारवश न होता तात्त्विक दृष्ट्या या प्रश्नाची चर्चा व निर्णय झाला पाहिजे, हे अगदी खरे आहे. पण त्याबरोबरच आपण हेही लक्षात ठेवले पाहिजे की एका स्वतंत्र राष्ट्राचे नागरिक म्हणून आपण हा विचार करीत आहोत. राष्ट्राचे जीवन—विशेषतः दीर्घकाळच्या पारतंत्र्यानंतर स्वतंत्र होऊन प्रगती करू पाहाणाऱ्या राष्ट्राचे जीवन—हे व्यक्तीच्या जीवनाप्रमाणे शंभर टक्के तर्काधिष्ठित असू शकत नाही. त्यात भाव व भावना यांनाही भरपूर वाव असतो. त्यामुळे शैक्षणिक प्रश्नांची चर्चा करतानाही आपल्या 'राष्ट्रीय अहंकारा'च्या भावनेची दखल आपणास घेतलीच पाहिजे.

प्राथमिक व माध्यमिक कक्षेतील सर्व विषयांचे शिक्षण मुलांच्या मातृभाषेतूनच झाले पाहिजे हे तत्त्व आता सर्वमान्य झाले आहे. त्याबद्दल कोणी वाद करील असे वाटत नाही. कारण परक्या भाषेतून मुलांचे या पातळीवरचे शिक्षण होऊ शकत नाही. कोणत्याही राष्ट्रात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हे मुलांच्या मातृभाषेव्यतिरिक्त इतर भाषेतून दिले जात नाही. भारताच्या संदर्भात मातृभाषा म्हणजे निरनिराळ्या प्रादेशिक भाषा होत.

प्रश्न उपस्थित होतो तो कॉलेजांतील–महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय–शिक्षणाचे माध्यम कोणते असावे या बाबतीत. या प्रश्नाला तीन उत्तरे सध्या संभवतात व आपल्या देशात या तीन्ही मतांचे आग्रही पुरस्कर्ते आहेत. विद्यापीठ-स्तरातील शिक्षण हे मातृभाषेतून (म्हणजे त्या त्या प्रादेशिक भाषेतून) द्यावे; ते सर्वत्र इंग्रजी भाषेतून द्यावे किंवा ते सर्वत्र राष्ट्रभाषा हिन्दीतून द्यावे अशी ही तीन मते आहेत.

राष्ट्रीय ऐक्याची भावना व आधुनिक शास्त्रीय दृष्टी या दोन गोष्टी मुख्यत्वे-करून इंग्रजी भाषा व वाङ्मय यांमुळे आपल्याला प्राप्त झाल्या. जिच्यामुळे या दोन्हींच्या बाबतीत पीछेहाट होणार नाही अशी, इंग्रजी भाषेचे स्थान घेऊ शकणारी, समर्थ भाषा आपल्याला लवकरात लवकर निर्माण करावयास पाहिजे. इंग्रजी भाषेचे जागतिक महत्त्व मी जाणतो. पण ती कितीही समृद्ध असली तरी ज्याप्रमाणे प्राथमिक–माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रात मातृभाषेचे स्थान घेऊ शकत नाही, त्याचप्रमाणे ती आमची राष्ट्रभाषा होऊ शकत नाही आणि उच्च शिक्षणाचे माध्यमही नेहमीकरता होऊ शकत नाही; कारण माध्यमिक शिक्षण-क्षेत्रात आज तिचा जो सर्रास अभ्यास चालला आहे तो पुढे हळूहळू कमी कमी होत जाणार व तिच्याशी अपरिचित असा विद्यार्थिवर्ग उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात प्रवेश करणार हे उघड आहे. शिवाय आपले राष्ट्र आता स्वतंत्र झाले असल्यामुळे इंग्रजी ही एक परकी भाषा शिक्षणाचे माध्यम म्हणून स्वीकारणे राष्ट्रीय स्वाभिमानाच्या दृष्टीने इष्ट नाही. इंग्रजी ही श्रेष्ठ भाषा असल्यामुळे तिचा अभ्यास मात्र भारतात जास्त मोठ्या प्रमाणावर व्हावा. सर्व जगातील ज्ञानासाठी इंग्रजी ही प्रवेशद्वार आहे, तेव्हा आमच्यातील सुशिक्षित वर्गाने इंग्रजीचा जास्तीत जास्त व्यासंग करणे अत्यंत आवश्यक आहे. पण शिक्षणाचे माध्यम म्हणून तिला नेहमीचे स्थान देता येणार नाही.

उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून इंग्रजीची जागा कालांतराने राष्ट्रभाषा हिंदी हिलाच देणे युक्त होईल असे मला वाटते. डॉ. राधाकृष्णन् समितीच्या अहवालात विद्यापीठीय शिक्षण मातृभाषेतून द्यावे असे मत मांडण्यात आले आहे. अनेक विद्वान याच मताचे असून निव्वळ शैक्षणिक दृष्ट्या हे मत योग्य वाटते. पण निव्वळ शिक्षणाखेरीज दुसरी एक कामगिरी इंग्रजीने जी आजवर केली, ती यापुढे राष्ट्रभाषेला करावयाची आहे. ही कामगिरी म्हणजे या देशातील सांस्कृतिक विविधतेत एकता निर्माण करणे ही होय. या देशातील सांस्कृतिक विविधता ही देशाची मोठी शक्ती होय असे मानले जाते व ते खरेच आहे. पण या विविधते-तील ऐक्य लोकांच्या लक्षात येणे जरूर असून विद्यापीठशिक्षणाच्या क्षेत्रातले शिक्षण राष्ट्रभाषेतून देणे हा त्याचा मुख्य उपाय आहे. शिवाय उच्च शिक्षण त्या त्या प्रादेशिक भाषेतून दिले जाईल तर विद्वत्तेचा दर्जा खालावत जाईल.

प्रादेशिक भाषांचे बंधारे काढून टाकून प्रदेशाप्रदेशातील बौद्धिक व्यापार खुला करणे हे फार महत्त्वाचे आहे. उच्च संशोधन व त्यावरील पुस्तके जर प्रादेशिक भाषेतूनच होतील, तर तेच तेच प्रयत्न सर्व भाषांतून होत राहूनही एकमेकांच्या प्रयत्नांकडे एकमेकांचे लक्ष राहणार नाही. उच्च शिक्षण राष्ट्रभाषेतून झाल्यास मातृभाषांच्या विकासास अडथळा येईल, अशी जी भीती व्यक्त करण्यात येते ती अतिरेकी आहे. प्रादेशिक भाषांच्या आकुंचित क्षेत्रात त्या त्या भाषेतली विद्या कोंडून राहिली तर कल्पनांची व विद्येची देवघेव सर्व राष्ट्रात होणे हे अशक्यच होईल. उलट उच्च शिक्षणात राष्ट्रभाषा माध्यम झाली तर राष्ट्रीय ऐक्य व बंधुभाव साऱ्या देशभर वाढण्यास फार मदत होईल. हा मुद्दा राजकीय दृष्टिकोनाचा आहे म्हणून त्याची हेटाळणी करणे योग्य नव्हे. आज देशाला या ऐक्यभावनेची व बंधुभावनेची जरुरी आहे. आपल्या प्रादेशिक भाषेबाबत लोकांची निष्ठा राहावीच पण अशा सर्व निष्ठांचेस हकार्य व संयोजन अवश्य असून उच्च शिक्षणात राष्ट्र-भाषा माध्यम झाल्यानेच ते शक्य होईल.

भारतातील शिक्षणतज्ज्ञांपुढे आज जर कोणता महत्त्वाचा प्रश्न असेल तर तो लोकांच्या विविध निष्ठांचे ऐक्य साधण्याचा आहे. प्रांत, भाषा, संस्कृती अशा या विविध निष्ठा आहेत. त्यांची जोपासना करणे जरुरीचे आहे हे कोणीही मान्य करील. पण हे कार्य करीत असता राष्ट्रीय संस्कृतीचा आपल्याला विसर पडता कामा नये. लोकांच्या विविध निष्ठांचे ऐक्य आपल्याला साधावयाचे असेल तर ते निरनिराळ्या राज्यांतील विविध संस्कृतींचे कार्य भारतातील एकाच भाषेतून चालू राहाण्याने साधता येईल. या प्रश्नाचा सर्व बाजूंनी विचार करावा व कोणता मार्ग पत्करावयाचा ते ठरवावे.

पण उच्च शिक्षणात हिंदी माध्यम आणण्याचा हा प्रयोग मुंबई सरकार १९५५ पासून करणार असे ऐकतो. ते खरे असेल तर सरकारने अशी घाई करणे अनिष्ट वाटते. सरकारने या बाबतीतील विद्यापीठांची स्वायत्तता हिरावून घेऊन आपला निर्णय कायदेमंडळाच्या कायद्याच्या बळावर विद्यापीठांवर लादू नये. यासंबंधाने एखादी पंडितसमिती नेमून सरकारने तिचा सल्ला घेतला पाहिजे. विद्यापीठांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली पाहिजे. विद्यापीठे व सरकार यांच्यात या बाबतीत आज दुही निर्माण होऊ नये. आजच्या काळाची गरज विद्यापीठे लक्षात घेणार नाहीत असे वाटत नाही. लोकशाही राज्यात विद्यापीठांना उच्च शिक्षणाबाबत स्वायत्तता असणे इष्ट आहे. शहाणपणाची धोरणे गैरशहाणपणाने अमलात आणली तर त्यातला शहाणपणा लुप्त होऊन चांगल्या हेतूची नासाडी होते हे सरकारने ध्यानात घ्यावे अशी मी सरकारला विनंती करतो.

३

न्यायाधीशाची भूमिका

'जेव्हा अंतःकरण भावनेने भरलेले असते तेव्हा वाणी मूक होते' असे म्हणतात. मी अनेक वेळा हे ऐकलेले आहे, पण ही गोष्ट किती निखालसपणे सत्य आहे याची प्रचीती मला आजपर्यंत आली नव्हती. जेव्हा या न्यायालयात अपिलेट बाजूला मी ऑगस्ट १९२६ मध्ये वकिली करण्यास सुरवात केली तेव्हा न्यायालयाच्या चार भिंतींच्या आड आपल्याला फारसे स्नेही मिळतील असे मला वाटण्याजोगी स्थिति नव्हती. ज्या महाविद्यालयात माझे शिक्षण झाले तेथील सांस्कृतिक वातावरण आणि घरचे विद्याव्यासंगयुक्त वातावरण, यामुळे वकिलीच्या आयुष्याला मी परका ठरावे अशीच माझी घडण झाली होती. परंतु आज जेव्हा या उच्च न्यायालयाचा अखेरचा निरोप घेण्याची वेळ मजवर आली आहे, तेव्हा मी असा न्यायपूर्ण दावा करू शकतो की या उच्च न्यायालयातील गेल्या तीस वर्षांच्या माझ्या कार्यकालात माझ्याशी सातत्याने अतिशय उदार व दाक्षिण्ययुक्त असलेले किती तरी स्नेही मिळण्याचे सौभाग्य मला लाभले. एका प्राचीन संस्कृत कवीने मानवांच्या परस्परसंबंधाची तुलना, विशाल महासागरात लाकडाचे ओंडके एकमेकांना भेटतात त्याच्याशी केली आहे.

यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ ।
समेत्य च व्यपेयातां तद्वद् भूतसमागमः ॥

तात्त्विक दृष्ट्या ही तुलना अर्थातच बरोबर असेल; पण भावनात्मक दृष्ट्या पाहता मानवांचे एकमेकांशी संबंध दुरावणे ही गोष्ट मूलतः मोठी उदासवाणी आहे. आज आपल्यापासून दूर जाण्याची ही जी घटका आहे, त्याबद्दलची माझ्या अंतःकरणातील दुःखाची व वेदनेची भावना मी शब्दांत साकार करू शकत नाही.

म्हणूनच मी म्हटले की 'जेव्हा अंतःकरण भावनेने भरलेले असते तेव्हा वाणी मूक होते' याची प्रचीती पूर्वी कधीही नव्हती, तितकी मला आज आली.

माझा जन्म विद्या-शीलसंपन्न घराण्यात झाला याबद्दल मी परमेश्वराचा ऋणी आहे. कौटुंबिक दृष्ट्या मला आदर्श मंडळींचा सहवास लाभला; ज्येष्ठ बंधूंकडून मला नेहमी प्रोत्साहन मिळाले; अनेक मित्रांनी वेळोवेळी मदतीचा हात दिला आणि दैवाचीही अनुकूलता मला लाभली, हे माझे एक प्रकारे भाग्यच आहे. माझे जीवन जे यशस्वी झाल्यासारखे आज दिसते त्याचे श्रेय, माझ्या कर्तृत्वापेक्षाही या आनुषंगिक गोष्टींना जास्त आहे असे मी मानतो. सामान्य कर्तृत्वालाही परिस्थितीची अनुकूलता मिळाली तर ते कर्तृत्व पुढे जाते असा माझा अनुभव आहे.

आमच्या घराण्याची परंपरा विद्यादानाची आहे व माझ्या अंतःकरणाची ओढ त्या परंपरेकडे होती. पण मुंबईच्या न्यायक्षेत्रावर मी एक प्रकारे अतिक्रमण केले, त्यात इच्छेविरुद्ध राहिलो आणि आज या पदापर्यंत आलो. असे असले तरी मानवी मनाची जडणघडण करणाऱ्या आणि भावी पिढी निर्माण करणाऱ्या शिक्षणक्षेत्राबद्दल एक प्रकारचा आंतरिक जिव्हाळा मला आहे. आपण साऱ्यांनी केलेल्या प्रशंसेचे मूल्यमापन मी करीत नाही. आपण दिलेले आशीर्वाद हे 'वर' आहेत, असे समजून मी त्यांचा स्वीकार करतो. स्वतःशी प्रामाणिक राहून एक न्यायाधीश व एक नागरिक या नात्यांनी मी आपले कर्तव्य करण्याचा प्रयत्न करीत राहिलो आहे. न्यायाधीश म्हणून माझ्यावर काही बंधने अवश्य पडतात आणि लोकशाहीत न्यायाधीशांनी हे संकेत निश्चित पाळले पाहिजेत अशा मताचा मी आहे. न्यायाधीशाने राजकारणात भाग घेऊ नये, पक्षोपपक्षांच्या चर्चेत भाग घेऊ नये आणि न्यायदानाच्या कामी आपल्या कोणत्याही व्यक्तिगत मतांचा संपर्कही लागू देऊ नये हीच माझी ठाम भूमिका आहे. तरीपण एक नागरिक या भूमिकेवरून न्यायाधीशानी सामाजिक, शैक्षणिक किंवा सांस्कृतिक क्षेत्रात लोकसेवाबुद्धीने कार्य करण्यास हरकत नाही असे मला वाटते. माझ्या अल्प शक्तीनुसार असे थोडेसे कार्य करण्याचा मी प्रयत्न केला. न्या. रानडे, न्या. तेलंग, न्या. चंदावरकर यांच्या बरोबरीने उभे राहाण्याचीही माझी योग्यता नाही हे मी पूर्णपणे जाणतो; पण त्यांनी जी परंपरा निर्माण केली तिचा मी एक नम्र उपासक आहे. ती परंपरा कायम टिकवावी अशी मला तळमळ आहे.

१९४५ साली जेव्हा मी या न्यायासनावर बसलो, तेव्हा मी माझ्या मित्रांना असे सांगितल्याचे आठवते की न्यायाधीश म्हणून माझी कर्तव्ये पार पाडीत असताना मी एका गोष्टीचे नेहमी स्मरण ठेवीन—ती ही की माझ्या न्यायाधीशपदाच्या कारकीर्दीसंबंधीचा अखेरचा अभिप्राय हा येथील वकील वर्ग आणि वादी प्रतिवादी यांच्याकडून घोषित व्हावयाचा आहे. आज मला निरोप देताना हा जो अभिप्राय प्रकट झाला आहे तो माझ्या अपेक्षेपेक्षाही जास्त औदार्यपूर्ण आहे. या अभिप्रायात

प्रेमाच्या पोटी येणाऱ्या पक्षपातीपणाच्या व जिव्हाळ्याच्या साहजिक छटा आहेत; आणि मला असेही वाटते की अशा निरोपाच्या प्रसंगी जे रूढ संकेत पाळावयाचे असतात, त्यांना अनुसरून हा अभिप्राय देण्यात आला असावा. वकील वर्ग आणि न्यायालयात येणारी जनता यांच्याकडून आपल्या न्यायविषयक कामगिरीबद्दल होणारे कौतुक व मिळणारी मान्यता, हेच कोणत्याही न्यायाधीशासाठी, आपल्या स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीच्या निर्णयाच्या खालोखाल, सर्वश्रेष्ठ पारितोषिक असते. आज मला असे दिसते की उदार व प्रेमळ अशा वकीलमित्रांकडून हे श्रेष्ठ पारितोषिक मिळण्याचे सुदैव मला लाधले आहे. त्यामुळेच आपणा सर्वांबद्दल पुरेशी व योग्य शब्दांत कृतज्ञता व्यक्त करणे हे मला मोठे अवघड झाले आहे.

आपल्या या उच्च न्यायालयाला आज सर्व भारतात जो अत्यंत श्रेष्ठ दर्जा प्राप्त झाला आहे, त्याविषयी आपण नेहमी बोलतो. मुंबई उच्च न्यायालयाने मिळविलेल्या प्रतिष्ठेची उंची व त्याचे सामर्थ्य यांचे मोजमाप करताना एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे, आणि ती ही की आपण सर्व भूतकाळातील एका उज्ज्वल परंपरेचे अभिमानी वारसदार आहोत. कोणतीही संस्था अगर व्यक्ती यांची कामगिरी किंवा त्यांचे यश याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करताना, भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ यात कारण आणि परिणाम यांचा जो एक धागा सातत्याने अनुस्यूत असतो, त्याच्या अस्तित्वाची दखल आपण घेतली पाहिजे. जर मुंबई उच्च न्यायालयाचे स्थान आज देशात अतिशय श्रेष्ठ व सन्मान्य गणले जात असेल, तर आपण सर्व वकील व न्यायाधीश यांनी, ज्या आपल्या पूर्वसूरींनी सुयोग्य परंपरांचा उज्ज्वल वारसा आपणास दिला त्यांना मोठ्या उल्हासाने आपली आदरांजली वाहिली पाहिजे; आणि आपल्या कालामध्ये, या वारशात त्याला शोभेशी भर घालून मग कालानुक्रमे आपल्यामागून येणाऱ्यांकडे तो सोपविण्याची तळमळ आपणा सर्वांना लागली पाहिजे. वकील व न्यायाधीश या दोन्ही क्षेत्रांतील माझ्या कार्यकालात, या उच्च न्यायालयाच्या उदात्त परंपरांशी विसंगत असे काहीही माझ्याकडून घडले नाही हे जर खरे असेल, तरच या उच्च न्यायालयाचा व आपणा सर्वांचा निरोप मला खरोखरीच्या अभिमानाने घेता येईल.

कसेही असले तरी आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की वादी प्रतिवादी जनता आणि तिचे प्रतिनिधी—अर्थात् वकीलवर्ग—यांचा न्यायालयावर असलेला विश्वास हेच उच्च न्यायालयाचे खरे सामर्थ्य असते. आमची दैनंदिन कर्तव्ये जेव्हा आम्ही पार पाडतो, तेव्हा खरोखर आम्ही सत्याचा शोध घेण्याच्या महाकार्यात गुंतलेले असतो. कोणताही विवाद, मग तो नागरिक-नागरिकांमधील असो किंवा नागरिक व शासनसंस्था यांच्यातील असो, जेव्हा न्यायालयासमोर येतो, तेव्हा त्या विवादाच्या योग्यायोग्य बाजूंची तपासणी करणे आणि सत्य कुठे आहे याचा शोध करणे हेच कर्तव्य न्यायालये नेहमी करीत असतात. हे खरे आहे की अशा

रीतीने सत्याचा शोध घेण्याचे कार्य सुकर व्हावे म्हणून लोकशाहीप्रधान विधानमंडळे कार्यपद्धतीचे नियम तयार करतात. खटल्यातून पुरावा दाखल करून घेणे, विविध पक्षांनी आपल्या कैफियती मांडणे या बाबी या नियमांमुळे शिस्तीत चालतात. त्याचबरोबर हेही खरे की प्रमाद होण्याची शक्यता टळावी म्हणून विधानमंडळे अपील आणि पुनर्विचार (revisions) यांसारखी बंधने व प्रतिबंध न्यायालयीन कामकाजावर घालीत असतात. आपल्या देशात कोणत्याही विवादाला जे उगीचच दीर्घकालीन स्वरूप प्राप्त होते आणि वेगवेगळी न्यायालये एकाच विवादासंबंधी जो विसंगत व परस्परविरोधी दृष्टिकोण व्यक्त करतात त्यामुळे सामान्य नवशिका दावेकरी कित्येक वेळा मोठा गोंधळून जातो. म्हणून न्यायालय, त्याच्या-समोर आलेल्या एखाद्या दाव्याचा निर्णय लावण्याबाबत घाई करीत आहे असे जर कधीकधी दिसत असेल, तर त्याचे कारण हेच की असे जर केले नाही तर दाव्याचा निकाल लागण्यास गैरवाजवी उशीर लागतो व न्यायालयाच्या विवेकबुद्धीला ते पटत नाही. सत्याचा शोध करणे सुकर व्हावे म्हणून जे कार्यपद्धतीचे नियम केलेले असतात त्यांचे कार्य उभय पक्षांमधील तंट्याचे क्षेत्र कमी करणे हेच असते. परंतु कित्येकदा हे नियम तंट्याचा इनसाफ करण्याच्या बाबतीत असा एक ताठरपणा किंवा गत्यभाव उत्पन्न करतात की जो सत्याचा शोध घेण्याच्या कामी बव्हंशी साहाय्यक नसतो. फौजदारी कायद्याच्या अंमलबजावणीच्या बाबतीत आपण अनेक वेळा अशी एक तुच्छतायुक्त वदंता ऐकतो की पुष्कळदा गुन्हेगार माणसे शिक्षेपासून आपली सुटका करून घेतात, आणि काही उत्साही सार्वजनिक कार्यकर्ते तर बऱ्याच प्रसंगी असेही बोलतात की 'संशयाचा फायदा देण्याचे प्रमेय' जर उदारतेने व व्यापक प्रमाणावर लागू केले तर जीवित आणि वित्त यांची सुरक्षितता धोक्यात येईल. सुदैवाने आपल्या कार्यपद्धतीच्या नियमांची पुनर्रचना करणे व आजच्या गरजांशी आपल्या विधिनियमांचा सुसंवाद साधणे हा जो प्रश्न आहे त्याच्यासंबंधी आपल्या देशातील नामांकित विधिज्ञ व न्यायाधिकारी यांचा समावेश असलेले एक श्रेष्ठ दर्जाचे कमिशन विचार करीत आहे. हे कमिशन आपल्या परिश्रमांचे फलित म्हणून वरील बाबींसंबंधी आवश्यक व न्याय्य अशा शिफारशी करील आणि विधानमंडळे यत्किंचितही आढेवेढे न घेता, योग्य वैधानिक कार्यवाही करून त्या शिफारशी अंमलात आणतील अशी मला आशा आहे. दरम्यान, सर्व विधिज्ञ आणि न्यायाधीश यांचे हे कर्तव्य आहे की त्यांनी जनतेचा विश्वास कायम टिकविला पाहिजे; कारण जनतेचा विश्वास हाच उच्च न्यायालयाची प्रतिष्ठा आणि सामर्थ्य यांचा एकमेव आधार आहे.

हा विश्वास टिकविण्यासाठी न्यायालयाच्या उच्च परंपरांची जोपासना करण्याच्या कामी न्यायालयांना मदत करणे हे वकीलवर्गाचे कर्तव्य आहे. वकील आणि न्यायासन हे एकमेकांवर क्रिया आणि प्रतिक्रिया करीत असतात ही गोष्ट

आपण कधीकधी विसरणे सहज शक्य आहे. परंतु या उच्च न्यायालयाचा दीर्घ व उज्ज्वल इतिहास हे दाखवून देतो की या न्यायालयाला आज भारतात जे महान स्थान प्राप्त झाले आहे ते, अनेक थोर न्यायाधीश आणि मुंबईच्या वकील वर्गातील अनेक नामांकित, विद्वान् व निष्णात विधिज्ञ या उभयतांनी केलेल्या संमिश्र प्रयासाचे फळ आहे. जेव्हा वकील न्यायालयात दाव्यातील आपला युक्तिवाद मांडतात व न्यायाधीश त्याचा निर्णय करतात, तेव्हा विधानमंडळांनी एखादा कायदा पास करण्यात स्वीकारलेल्या धोरणाची युक्तायुक्तता पाहणे हे त्यांचे काम नसते. मला नेहमीच असे वाटत आले आहे की आपला स्वतःचा आर्थिक, राजकीय किंवा सामाजिक दृष्टिकोण आपल्या न्यायालयीन निर्णयावर यत्किंचितही कुरघोडी करणार नाही याविषयी प्रत्येक न्यायाधीशाने नेहमी अत्यंत खबरदार राहिले पाहिजे. आधुनिक लोकशाही राज्यात न्यायाधीशांनी नेहमी सर्वथैव निर्भय आणि पराकाष्ठेचे निःस्पृह असले पाहिजे. तशीच त्यांची परंपरा आहे; आणि या परंपरेच्या संदर्भातच कोणत्याही न्यायाधीशाच्या कार्याचे मूल्यमापन झाले पाहिजे. अशा रीतीने माझे कर्तव्य करण्यामध्ये येथील वकीलवर्गाकडून मला सतत जे हार्दिक सहकार्य मिळत आले त्याचा कृतज्ञभावनेने उल्लेख करणे हे आपला निरोप घेण्यापूर्वी मी माझे कर्तव्य समजतो.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम..... दिः .....
आंक ..... को दि .....

सूची

मूळ ग्रंथाची

सूची

(फक्त मूळ ग्रंथाची)

अग्रक्रमाचे अधिपत्र १५५
अंकगणित ३२८
अणुबाँब २७९
अथर्ववेद १०५
अद्वैत, अद्वैतवाद १८, ६४, ३०३
अध्यात्मवाद १५
अंधश्रद्धा १७१, २४३
अनाथबालिकाश्रम ३१७
'अनुभव मंडप' ३०५
अपेलेट बाजू १९३, १९६–२००, ३६०.
अभ्यंकर, एस्. वाय्. १९४
अभ्यासमंडळे १७२
अभियांत्रिकी, सामाजिक २०२
अयंगार, एस्. श्रीनिवास ९२
अयंगार, रंगास्वामी ११७
अर्थव्यवस्था, निर्बंधयुक्त ९६, ९७
अर्थशास्त्र ११७, ११८, ११९, १२०, १२१
अर्धमागधी ६५
अलंकारशास्त्र ३२७
अल्पजन सत्तागट ९८, ९९
अस्पृश्य ३४, ३५, ६८, ८२, ३०४, ३३२
अस्पृश्यता १०, ११, २०, २१, २८, १०७, १२६, १२७, १३६, १३८, १८५, १८७, २४७, ३४३
अस्पृश्यतानिवारण ६, ८, १०, ५१, ८१, ८२, ३३५
अस्पृश्योद्धार ७३, ७४, ७७, ८३
अहस्तक्षेप व (मुक्त) बाजाराचा नियम १५३, १५४, २१६
अहिंसा २८२, २८३, २८४, २८५, ३४४
अहिंसात्मक कायदेभंग (लढा) २४१, ३४५
अज्ञेयवाद ५४
ॲक्टन, लॉर्ड १५४
ॲझटी ५७
ॲटकिन, लॉर्ड २०८
ॲडव्हायजरी कमिटी फॉर लायब्ररीज २६३
ॲड्व्होकेट्स ॲक्ट २०८

ॲडव्होकेट्स असोशिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया १९३, १९५, १९६

आगरकर, गोपाळ गणेश ५, ७, ३५, ६८, ७२, ७३, ७८, १२६, १३६, ३०५ ते ३१३, ३४०, ३४१
आचारधर्म १६, २४, ३८
आचारस्वरूपाचे संरक्षण ३४
आचारसंहिता, वकील व न्यायाधीश यांसाठी २०८
आणीबाणी १६३, १६५, १६६, १७५, १७९, २१३, ३४९, ३५०
आत्मानात्मविचार ५६
आंतरजातीय विवाह ३१, ८०
आंतरराष्ट्रीय कायदा २४३
आदिवासी ३४
आधुनिक (कलाविषयक) २५६
आध्यात्मिक निष्ठा २८९, २९०
आपस्तंब १०३, ११२, ११४, ११७
आंबुडस्मन १५१, १५२
आंबेडकर, डॉ. भीमराव रामजी १३, २३, ३३, १०७, १३६, १३७, ३२४, ३३० ते ३४०
आरण्यके १२३
आर्थिक क्रांती २७३, २७७, २८५, २८६, २९०, ३४२, ३४३
आर्थिक न्याय ९६, १३८, १८२, १८३, १८४, १८६, १८९, २४५, २४६, २८८, ३२३, ३४५, ३४६
आर्थिक रचना १२९
आर्थिक विषमता ९, ८६, २३९, २४८, ३४९
आर्थिक व्यक्तिवाद ९६
आर्थिक समता, सुधारणा ७, ८, ५०, ५१, ७५, ७७, १२९, १३१, १४५, १४७, २६५, २७४, २७९, २८९, २९१, ३१०–३१३, ३३९, ३४०
आर्थिक समस्या १३२
आर्य, आर्यलोक ६०, १०६, १०७, ११४, १२२, १२३
आर्यसंस्कृती, आर्यधर्म ६०, ६२
आर्यसमाज ६९, १२५
आशौच—चालीरीती ४०
आश्रम, आश्रमधर्म ३८, १११
आश्वलायन १०३
ऑगस्टस्, रोमन नेता २१०
ऑस्टिन १०२
ऑस्लर, विल्यम ३२५

इंग्रजी, इंग्लिश भाषा ११३, २२५, ३५४, ३५५, ३५७, ३५८
इंग्रजांचे राज्य, सत्ता १२८, ३४१, ३५७
इंग्रजी शिक्षण १२८
इंडियन नॅशनल कॉंग्रेस २९५
इंडियन पीनल कोड २२०, २८३
इंडियन बार कौन्सिल्स ॲक्ट १९६
इंडियन लायब्ररी असोसिएशन २७३
इंडो-आर्यन वंश २१, २४
इंडो-युरोपीय राष्ट्रकुटुंब ९९
इमर्सन १६२, २५४

ईशावास्योपनिषद ३१४

उच्च न्यायालय,–लये १४५, २३९, २४०, २४१, २४६, ३६२, ३६३

उच्चतम न्यायालय २३९, २४०, २४१, २४६ ('सर्वोच्च न्यायालय' पाहा).
उच्चारस्वातंत्र्य १४४
उत्तर भारत २२९, २३०
उद्धारक १२, १३
उपनयन २२, ३२, ३३, ४०
उपनिषदे ६०, ६१, १०३, १२३, १२५, ३०२
उपनिषदकार २४७
उपनिषदकाळ ३८, ३४२
उमरावी काळ (कलेबाबत) २५७
उल्पीयन २०१

ऋग्वेद १९, २०, ३८, ६०, ६२, ६३, १०५, १०९, १२३
ऋग्वेदी २७
ऋचा ६०
'ऋत'-ऋग्वेदातील संज्ञा ५५, १०९,

'एकच प्याला' ३१२
एकनाथ ५५
एकलव्य २०
एरलिश, कायदेशास्त्रज्ञ २१८

ऐतरेय ब्राह्मण १०४, १०९
ऐहिकता, ऐहिकतावाद ९, १७२, १७३, १७६, १७८, १८८, १८९

ओ'कोनेल, डॅनियल ३३९
ओरायन ३२
ओरिजिनल बाज्, न्यायालयातील १९७ ते २००
औद्योगिक कलह १९९

कनिया, न्या. ४२
कमलाकर भट्ट १०३
'कमिशन्स ऑफ इन्क्वायरी ॲक्ट, १९५२' २०९
कम्युनिटी प्रोजेक्ट २७२
कम्युनिझम् २७९, २८९
करआकारणीचे प्रश्न १९९
करार-स्वातंत्र्य १५४, २१६, २१८, २१९, २८०, २८१
कर्णपर्व २४
कर्नाटक ९५, ३०३
कर्नाटक कॉलेज १५९
कर्नाटक विद्यापीठ ८२, ९५, १५९, १६१, १६५
कर्म ६२, ६४
कर्मकांड (कर्मठ आचारकांड) १८, २४, २८, ३८, ६२—६६, १०७, १२३, १२४, १६७, १७१, ३०२, ३०३, ३०४
कर्मठपणा, हिन्दू संस्कृतीतील ६१
कर्वे, गोदूबाई उर्फ बाया ३१६
कर्वे, महर्षी धों. के. ३, ७३, १२६, ३१४ ते ३२३
कऱ्हाडे २७
कलकत्ता हायकोर्ट १९९
कला २५२, २५३, २५५, २५६, २८६;—चा अभ्यास २५७;—प्राचीन भारतीय २५५;—चे पुनरुज्जीवन २५७;—विषयक प्रयोग २५३
कलाप्रदर्शन २५४, २५८
कलामीमांसक २५३
कलावंत २५१, २५३, २५४, २५६, २५८

कलाविद्यालय, पॅरिसचे २५२
कल्याणकारी राज्य, राज्यव्यवस्था ९६, ९७, १३९, १४५, १५०, १५२, १५४, १५७, १६५, १८२, २०३, २०५, २०७, २१८, २३५, २३८, ३४६
कल्याणकारी समाज १८६
कवितेचे आवाहन २५५
काणे, डॉ. पांडुरंग वामन ३८, ३६, १०३, १०९, ११२, ११७, १९८, २८६, ३२४ ते ३२९
कांट १०१
कात्यायन १०३, ११०, ११२
कात्यायनस्मृति १०३
कानडी भाषा ६५, ३०३
कायदा ९९, १००, १०१, ११३, ११७, १२९, १७१, १७५, १७६, २०६, २२०, २२१, २२५, २२६, २३३, २३४, २३७, २३८, २३९, २४०, २४१, २४२, २४६, २४८, २६५, २७८, २८०, २८८, ३२२, ३६४; —ची अंमलबजावणी २११–२१२; —ची उत्पत्ती (निर्मिती) ९९, १०१, ११९; उद्योगविषयक २८१; कार्डोझोकृत वर्णन २१०; —ची गतिशीलता, गतिविज्ञान इ. १३८, १४५, २०३, २०४, २०५, २८९; —चे टीकाकार २००; —ची तत्त्वमीमांसा, तत्त्वज्ञान इ. २०१, २०२, २१७; —चे धर्मनिरपेक्ष स्वरूप ११६, १७२, १८४; प्राचीन ९८, ९९, १०२; बृ० उ० तील व्याख्या (धर्म) २१७; भूमिका व महिमा ९७; —चा विकासक्रम इ० ९८–१०२, ११०, ११९; व्यक्तिगत ९२; —चे व्यावसायिक २००; —ने समाजसुधारणा १०, ११; सामाजिक अवस्था, संस्था १०१, २१८, २२३, २२४, व लोकशिक्षण ५१
कायदेविषयक संप्रदाय, दर्शन—२१८, विश्लेषणात्मक २१७ कायदेपंडित २००
त्यांचे स्थान, भ्रातृमंडळ २०४, २०५ ('वकील' पाहा).
कायदेमंडळ १४४, २१७, २२२, २२४, २२६, २३९ ('विधिमंडळ' पाहा).
कायदेशास्त्र २०१
कायदेशास्त्रज्ञ २३९
कायद्याचे राज्य, अधिराज्य ९७, १४३, १४७, १६५, २०४, २०७, २०८, २१०, २११, २१२, २३०, २३४, ('न्यायतत्त्वाचे अधिराज्य' पाहा).
कारभारयंत्रणा ८७, ८८, २१०, २१४
कार्डोझो, न्या. बेंजामिन नाथन २०४, २०६, २१०
कार्यकारी मंडळ,—यंत्रणा १४४, २१३, २३७, २४६
कार्लाईल, थॉमस ७४, ३००, ३२५
कालनिर्णय, प्राचीन ग्रंथांचा ३६
कालिदास २५८, २७७
काव्यगत न्याय ३३९
काशीनाथ १०३

काश्मीर १६४, १७५
कुटुंबनियोजन ४४, ८४
कुमारिल ६१, १११
कृष्णम्माचारी, टी. टी. ३३८
केवलानंद, स्वामी ३४३
केसरी ३०८
केशवसुत २८७
कोकणस्थ २७
कोकजे, तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री ३०
कोयाजी, एच्. सी. १९७
कोशपद्धती, कायदेविषयक २२३
कौटिलीय अर्थशास्त्र ३६, १०३, ११५, ११६, १२०
कौटिल्य ११२, ११५, ११७, ११८
क्रॉमवेल, ऑलिव्हर २०६
'क्रियाशील विधिशास्त्र' १७६
क्रोसियर २९७

खंडाळावाला, श्री. २५३
खाजगी मालमत्ता १४४
ख्रिस्त २०६
ख्रिस्ती धर्म, धर्मपीठ २५, १००

गजेन्द्रगडकर प्र. बा. १९४
गांधी, फिरोज २१४
गांधी, गांधीजी, महात्मा मो. क. ६, २९, ३०, ३४, ८१, ८३, १२२, १२६, १३६, १८०, ३२३, ३४४, ३४५
गांधीयुग ६
गांधीवाद,–वादी २४२, ३२२
गांधी विद्यामंदिर ७७
गार्नेथ, रिचर्ड २६८
गावडे ७६
गॉर्किन २३६
गीतारहस्य ६२
गुणधर्म ३८, १११
गुन्हातपासणी, पद्धत, कला २३३, २३४
गुरु नानक १६७
गुलामगिरी (अमेरिकेतील) २१९
गूढवाद ५४
गृह्यसूत्र ६०, १०३
गोखले, गोपाळ कृष्ण ३१६
गोडबोले, (के. वि.) ३
गोमांसभक्षण १०७
गौतम १०३, ११२, ११७
ग्रंथपाल २६२, २६५, २६७;—चे गुण २६८, २७०, २७२, २७३, २७४, २७५
ग्रंथपालन २६७
ग्रंथप्रामाण्य १७३
ग्रंथालय २६०, २६४, २६८, २७१, २७३, २७५;—ग्रामीण २६९, २७२;—जुनी कल्पना २६१–२६३; जिल्हा—२६९; आधुनिक संकेत २६३–२६४; द्विविध कार्य २६४, कार्यक्षेत्र २७२;—चे महत्त्व २६६, २७७
ग्रंथालय चळवळ २६४, २६९, २७०, २७१; प्रादेशिक–२६९, २७२; महाराष्ट्रातील—२६५, २७२, २७४, २७५
ग्रंथालयसंघांचे संघीकरण २७२
ग्रंथालय सेवा २६५, २६७, २६९
ग्रंथालयशास्त्र २६६
ग्रामसंस्था १०८, ११४
ग्रामसुधारणा, ग्रामीण समाज ७७, ३४१, ३४२

ग्रामीण विकास १५७
ग्रीक लोक १०१
ग्रोट ९८

घटना ३५, ४३, १४४, १४५, १६४, २४०, २८८
'घटनात्मक प्रयत्नवाद' ७४
घटना परिषद,—सभा ९०, २२९, २३७, ३३८
घुर्ये, डॉ. २१, १०७
घोष, डॉ. रासबिहारी १२०, १२१

चंदावरकर, सर नारायण २९५–३००, ३६१
चंदीगढ २२८
चंद्रशेखर, डॉ. ८४
चर्चिलसाहेब ८५
चातुर्वर्ण्य १९, २०, २१, २३, २४, २६, ३८, ६०, ६७, ३०२
चातुर्वर्णिक वर्गीकरण १२५
चारित्र्याचा प्रश्न २१२
चित्रकला २५५
—प्रदर्शन २५२
चिनी आक्रमण २७७, २७८, २८३, २८५
चिपळूणकर, विष्णुशास्त्री ७, ३१२
चीन २१
चीफ सेक्रेटरी, पंजाब सरकारचे २३१

छत्रे, केरूनाना ३०७

जगजीवनराम ८०
जगताप, बाबूराव ३, २९
जडवादी १८७
जनतेची बोलीभाषा १२४
जयकर, डॉ. मुकुंद रामराव ९२, १९७
जयस्वाल, डॉक्टर १०४, ११४, ११६, ११७
जहाल ५, ७२, ८५, ३०९
जागृतीचे पर्व २७७, २७८
जातिनिर्मूलन ७८, ८०, ३०६
जातिभेद, जातिभावना, जातीयता इ. १९, २३, २४, २५, २६, २८, ३१, ६७, ६८, ७९, ८१, १०७, १२४, १२५, १२७, १३५, ३४३
जाती ४७, १३०, १६६, १७४, १८७, १८८, २९७
जातींची संरचना,—व्यवस्था,—संस्था ७८, १३५, १७४, ३०३, ३०४, ३०६, ३१९
जिल्हा न्यायाधीश २४०
जीमूतवाहन ३६, १०३
जीवननिष्ठांचा संग्राम २७८, २८६
जे. जे. स्कूल ऑफ आर्ट २५१
जेधे, (केशवराव) ३४०
जेफरसन, अमेरिकन अध्यक्ष २१५
जेम्स, डॉ. १६३
जेरार्ड, मि. २५१
जैन धर्म, मार्ग ६५, ६६, ३०२
जोगा परमानंद ६७
जोड, तत्त्वज्ञ ग्रंथकार २२२, ३२७
जोशी, नरहर बाळकृष्ण ३१६
जॅक्सन, न्या. २०५
ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट २३१
ज्यू लोक ७७

'टाइम्स ऑफ इंडिया' ३१७
टागोर, देवेंद्रनाथ १२४

टागोर, रवीन्द्रनाथ २२७
टॉयनबी, प्रा. २०३, २२६
टॉलेमी ३२८
टिळक, लो. वाळ गंगाधर ७, १६, १८, ३२, ३३, ३५, ६२, ७१, १०७, १३६, ३००, ३०८, ३१०, ३१२, ३१३, ३२४, ३४०
टिळक युग ६
टिळक-स्मारक ३५५
टीका ११९, १२०
टीकाकार ११३, ११७
टेलर, प्रो. ६६
टोपे, प्राचार्य त्र्यं. कृ. ३२४, ३२९
ठाकरसी, सर विठ्ठलदास ३१९
ठाकोर, जी. एन्. १९४, १९७

डायसी १४९
डॉब्सन, ऑस्टिन २६८
डेक्कन एज्युकेशन सोसायटी ३१६
डेक्कन कॉलेज ३०८, ३५५
डेनिंग, लॉर्ड १५०
डेमॉक्रसी व तीन 'डी' २२४
डेमॉस्थेनिस १००

तर्क १६, ५४, ५६, ५७, ७१, २८०,
तर्कनिष्ठा,–पद्धती १७, ७२, १३७, ३०९
'तत्त्वमसि' ७५
'तन्त्रवार्त्तिक' १११
तंत्रविद्या २४३
तय्यबजी, न्या. बद्रुद्दिन २९९
ताजमहाल २४७
ताष्कंद परिषद ३४८
तुकाराम, संत ७०, १२४, १६७,
तेलंग, न्या. काशीनाथ त्रिंबक ४, २९७, २९९, ३२४, ३६१
त्रैवर्णिक ३२

थिबो, प्राच्यविद्याविशारद ३२८

'दत्तकमीमांसा' १०३
दत्तक–प्रकरण,–कायदा ४१, ९२
दयानंद सरस्वती ७, ६९, १२५, १६७
दलितसमाज ३०, ३३, ४५, ६७, ३३६ ('अस्पृश्य' व 'हरिजन' पाहा).
दायभाग ३७, १०३
'दायतत्त्व' १०३
दास, ए. सी. १०४, १०५, १०७
'दास', दस्यू १०७, १२३
दासगुप्त, प्रो. ६५
'दि लॉ ऑफ् दि कॉंस्टिटयूशन' १४९
दिवाणी कज्जा २४०
द्विज ३२, ३९, ९१
द्विभार्याप्रतिबंध १०, ५१
द्विराष्ट्रवाद १७९
देवालयात प्रवेश ८१
दुसरे महायुद्ध १४७, २४५
देशमुख, डॉ. १३
देशस्थ २७
देशाची निष्ठा १३५
देसाई, ए. जी. १९७
द्वैतवाद १८

धनगर बांधव ७७
धर्म १६, २४, ६६, ९९, १०९,

१११, १६५, १६६, १७१, १७२, १७५, १८०, १८२, २१६, २८२, ३३७, ३३८, ३४६, ३४७;—चे आचारस्वरूप २५; ऋग्वेदातील संज्ञा १०९;—चा जन्म ५९; न्याय्य मर्यादा १८४; पार्सन्सची व्याख्या १८१; वेदातील उल्लेख ६०; व्यापक अर्थ ९८; सनातन स्वरूप ५०; समाजव्यवहार-नियंत्रण १८५; सर्वस्पर्शी व्याख्या १७१; संविधानसंरक्षण १८३
धर्मकारण ३३९
धर्मग्रंथ ५८
धर्मनियम १३०
'धर्मनिर्णय मंडळ' १४, ३२५
धर्मनिरपेक्ष,—ता,—वाद ९९, १००, ११५, १३०, १७०, १७१, १७२, १७३, १७५, १७६, १८२, १८९, ३४६;—चे कार्य व स्वरूप १८८;—चे तत्त्व, तत्त्व-ज्ञान इ. १६४, १६५, १६९, १७४;—ची नीती १७३; भारतीय —१७२, १८०, १८१, १८६-१८७;—ची राजकीय संकल्पना १७८, १७९;—लोकशाही १६४
धर्मभावना ५६, ५७, ५८
धर्मव्यवहारनियम ११२
धर्मशास्त्र,-वाङ्मय १०३, १११, ११२ ते १२०;
धर्मसमय ११४
धर्मसंस्था ३३
'धर्मसिंधू' ३६, १०३
धर्मसुधारक,—सुधारणा १२३, १२४
धर्मसूत्रे ३६, ६०, ६१, १०३, ११३, ११४, ११७
धर्मस्थीयम् ११५
धर्मातीत राज्य १६६
धर्माधिष्ठित राज्य १६४, १६५
धारप १९७
धार्मिक अभिजनसत्ता ९९
धार्मिक क्रांती ६७, ६८
धार्मिक न्यायालय १००
धार्मिक तत्त्व १६४
धार्मिक रूढाचार १७३
धार्मिक स्वातंत्र्य १८३, १८४, २८२
धीरजलाल मथुरादास १९६

नंदपंडित ३६, १०३,
नवबौद्ध १३७
नवसमाजनिर्मिती ५२, ५४, ५५, ५७, ७१, ७६, ७७, ७८
नॅशनल सेंट्रल लायब्ररी, दिल्ली २७०
ना. दा. ठा. महिला विद्यापीठ ३१९
नानाभाई हरिदास १९६, २९९
नारद ११३
नाशिक राममंदिर-प्रवेश ३३६
नासदीयसूक्त ६३
नास्तिकवाद ५४
नाहूस राजा २२
निम्मी राजा २२
नियोजन ९७
निरुक्त २२
'निर्णयसिंधू' ३६, १०३
निवृत्तिनाथ ६७
'निष्काम कर्ममठ' ३१८
निष्ठा ५४, ५५, २७९
नीति, नीतितत्त्व १७३, २२६
नीतिशास्त्र ११०, १८०

नीलकंठभट्ट १०३
नेपोलियन १६८, २८५
नेहरू, पं. जवाहरलाल ८३, ८५, १३८, १८१, २२६, ३४४ ते ३४७
नैतिकता,–ची जाणीव, निष्ठा १७३, २८९, २९०
नैमित्तिक धर्म ३८, १११
नॉर्मन काळ २०५
न्यायतत्त्व,–चे अधिराज्य १४९, १५०, २४३, २४४ ते २४८
न्यायतत्त्वमीमांसा, न्यायमीमांसा ११३, ११९, १२१, २०१, २०२, २१८, २३७
न्यायदान, न्यायवितरण २१२, २१३, २३३, २९८
—दोन प्रकार २२१–२२२
न्यायदानमंडळ, न्यायमंडळ, न्यायासन इ. १४३, १४४, १४५, १५१, २१०, २१३, २१५, २१६, २२५, २३७, २४०, ३४६, ३४९, ३६३
न्याययंत्रणा शाखा, ८७, ८८, १३५, २४६
न्यायविद्या ११५
न्यायव्यवस्था २३१, २३२, २४०
—शासनव्यवस्थेशी विलगीकरण २१३, २२८, २२९, २३१, २३३, २३४
न्यायशास्त्र ९४; सोविएत—,२४३
न्यायशास्त्रज्ञ २४३
न्यायाचे मंदिर २२६, २२७
न्यायाधिकरण १५१
न्यायाधीश ४, ३९, ८७, ८८, २२१, २२२, २२५, २२६, २२७, २३२–२३४, २४०, २९९, ३४७, ३६१–३६४; —ची अलिप्तता २११;—कडून होणाऱ्या चौकशा २०९;—चे जीवन १९५; भूमिका २०५–२०६, भारतातील २४७; —वरील निर्बंध २१५; सहकार्य वकिलांशी २०६–२०७; संकेत वर्तणुकीबाबत २०८; सर्जनात्मक दृष्टिकोन २२३.
न्यायालयीन शिष्टाचार १९४
न्यायिक कार्यवाही २२५
न्यायिक प्रक्रिया २१९, २२१
न्यू इंग्लिश स्कूल ३०८
'न्यू यॉर्क कौंटी लॉयर्स असोसिएशन' २१०

पतंजली ११४
पंचवार्षिक योजना ४५, १३८, २७०, २७१, २७८
पंचशील २७८
पंजाब, पंजाब राज्य २२८, २३०, २३१, २३२
पंजाबचे मुख्य मंत्री २२८, २२९, २३०
पंढरीचा विठ्ठल ६७
पंतुलु, विरेसलिंगम् ३१७
परंपरावाद, कलाविषयक २५६
परंपरावादी १७१
परांजपे, डॉ. (र. पु.) ३
परांजपे, श्री. शकुंतलाबाई ८४
पवार, धैर्यशीलराव ७७
पशुबळी ३०३
पश्चिम युरोप १७२, १७९

पहिले महायुद्ध २१७, २४५
पाउंड, डीन रास्को १००, १०१, १७६, २०२
पाकिस्तान १६४, १७५
पाकिस्तानी आक्रमण १६६, १७५, १७९
पाटकर, न्या. ४०
पाटील, श्री. ३०४
पाटील, कर्मवीर भाऊराव २९, ७६, ३४०, ३४१ ते ३४३
पांडुरंग बळिभद्र १९६
पाध्ये, (स. कृ.) २७६
पारस्करादी १०३
पार्सन्स, धर्माची व्याख्या १८१
पाली ६५
पुणे नगरपालिका ३१९
पुणे विद्यापीठ ३२०
पुनरुज्जीवनवाद १२९
पुराणे १२३
पुराणमतवादी १७१, १७४
पुरुषसूक्त १९, २०
पुरूरवस् राजा २२
पुरोगामी बुद्धिमंत ३५, १३२, १३७, १३९
पुरोगामी बुद्धिवाद १२, १४, १५, ४६, ४८, ५२, ६७, ८३, ८५, २७९, २८०, ३१०, ३११, ३१३
पुरोगामी व्यासपीठ ४७
पुरोहित वर्ग,–शाही,–वर्चस्व ३३, ४०, ६४, १०६, १०७, १२३, १२४, १६७, ३०२, ३०३
पूर्वमीमांसा १८, ६१, ६९
पैजवान राजा २२
पोटजातींचे एकीकरण ७९, ८०
पौलिथीइझम ६३
पौसिन (Poussin) २५६
प्रगतिशील, प्रबुद्ध बुद्धिमंत १७४, १७५, १७६, २१६
प्रतिलोम विवाह १२
प्रतीकवाद (कलाविषयक) २५६
प्रशासन, प्रशासक १४९, १५२; —विषयक कायदे १४९,—न्यायाधिकरणे १४९, १५०;–भ्रष्टता १५१
प्राच्यविद्यापंडित १०२, १०३, १०७, १२०, पाश्चात्य ३२८
प्रादेशिक निष्ठा १३५
प्रादेशिक भाषा २२५, ३५८, ३५९
प्रार्थनासमाज ६८, ७३, १२६, २९५
प्राज्ञपाठशाळा ३०
प्रिव्ही कौन्सिल १२०, १९७
प्रोस्टेस्टंट पंथ १००
'प्लीडर्स असोशिएशन ऑफ् वेस्टर्न इंडिया' १९६
प्लेटो ५४, १०१

फॅमिली प्लॅनिंग—पहिली परिषद ८४
फर्ग्युसन कॉलेज ३१६, ३१८
फॅसिझम १४७, २८९
फॉलशॉ २३१
फुले, महात्मा जोतिराव ७, ४७, ६८, ६९, ७०, १२६, १३६, ३४०, ३४२
फेबियन २१७
फौजदारी कायदा–अंमलबजावणी २३२, २३४, ३६३
फौजदारी गुन्हे, खटले २१३, २३३, २४०
फ्रीडमन, विल्यम ९६, २०५

फ्रेंच राज्यक्रांती २३४

बनारस हिंदू युनिवर्सिटी ३१९
बँक अवॉर्ड कमिशन २०९
बॅनर्जी, बाबू शशीपद ३१७
बराकीकरण २८९
बर्डवुड, सर जॉर्ज १०८, २५६
बर्वे, काकासाहेब ८३
बर्वेप्रकरण ३०८
बसवेश्वर, बसव ६०, ६२, ६५, ६६, १२४, १६७, ३०१ ते ३०६
बहिणाबाई ६७, ६८, २७४
बहुजनसमाज २८, २९, ३०, ३१, ३३, ४५, ४९, ५६, ६७, ७६, ८०, ८१, १३७, १६४, १६७, १६८, ३०३
बहुजनात्मक, बहुविधसमाजात्मक (शहर) १३३, १३४
बालविवाह ५१, १२७,
बाळंभट्ट १०३
बीजगणित ३२८
बुद्ध, भगवान ६०, ६१, ६२, ६५, १२३, १३१, १६७, २५६, ३०२, ३०३
बुद्ध (बौद्ध) धर्म ६५, ६६, ११७, ३०३, ३३८
बुद्धिप्रामाण्य(वादी) ९०, ९४, १००
बुद्धिमंत १६५, १६६, १६८, १७३; —चे कर्तव्य १६७ ('प्रगतिशील बुद्धिमंत' पाहा.)
बुद्धिवाद (–वादी दृष्टिकोन, भूमिका) ६, १५, १६, २५, ३५, ४६, ४७, ५०, ५१, ५३–५८, ६८, ७१, ७५, ८५, १२७, १२९, १३०, १३६, १३७, १५८, १६२, १७१, १७३, १७४, १८०, १८६, २८२, २८४, ३०१
बुद्धिस्वातंत्र्य ६३, ६४
बृहदारण्यकोपनिषद ९७, २४७
बृहस्पती ११३
बेडीव, प्रयोगशील खेडे ७७
बेन्थॅम १०१, ११३, ११४
बेव्हरिज् कमिटी रिपोर्ट ११, ९६, २१७
बेव्हरिज्, लॉर्ड १४७
बोर्नियो ५७
बोस, श्री. (व्हिव्हीयन) २४४
बौधायन १०३, ११७
बौद्धांचे धर्मग्रंथ ११०
बौद्धिक पुनरुत्थान १४
बौद्धिक दृष्टिकोन १६५
ब्रह्मतत्त्व २६
ब्रह्मोत्तर, ग्रंथालयविषयक कर २७०
ब्राइट, जॉन २८१
ब्राह्म, ब्राह्मो समाज ६८, ७३, १२४, १२५
ब्राह्मण, ब्राह्मणवर्ग,–वर्चस्व,–श्रेष्ठता ३५, ५८, ६५ ६६, ६९, १०८, ११७, ११८, १२३, ३०२
ब्राह्मणी संस्कृती १०७
ब्राह्मणी साम्राज्य ११६
ब्राह्मणे ६०, १०३, १०७, १२३;–चा काळ २८
ब्राह्मण्य ६९, ११६
ब्राह्मणसभा, मुंबईची ३२५
ब्रिटिशांची अमदानी, राजवट, कारकीर्द, शाही इ. ४, १०, १३, २६, ३७,

३८, ३९, ४१, ८९, १०४, ११४,
१२०, १७१, २३७, २५५, ३४५
ब्रौहॅम, लॉर्ड २१०

भक्ती ५५, ५६, ६२, ६४, ३३९
भक्तिरस १८
भगवद्गीता २०, ६१, ६२, १६९, १८०, २५९
भंगी काम ३५
भंगी-विमोचन ८३
भागवत धर्म ३०३
भागवत, राजारामशास्त्री ३१६
भांडारकर, (डॉ. रा. गो.) ३२४
भांडारकर रीसर्च इन्स्टिट्यूट ३२५
भारकर, गणपतराव १९६
भारताची एकता १६६, १६८ ('राष्ट्रीय एकता' पाहा).
भारतीय कलांचे पुनरुज्जीवन २५६
भारतीय तत्त्वज्ञ, तत्त्वज्ञान २३७, २३८
भारतीय नागरिकत्व १८२, १८६
भारतीय न्यायपंडित, न्यायशास्त्र २३७, २४३
भारतीय लोकशाही २४२, २४५, २४६ ('लोकशाही' पाहा).
'भारतीय सार्वजनिक प्रशासन विद्यालय' १४६
भारतीय संविधान, (संविधान) ९०, ९१, ९२, ९६, १२७, १३१, १४६, १६५, १७२, १७३, १७८, १७९, १८२, १८३, १८५, १८६, १९९, २१५, २१६, २१९, २२२, २२३, २२५, २२६ २२९, २३४, २३६-२४१, २४४-२४८, ३३०, ३३१, ३३८, ३३९, ३४५, ३४६
भारतीय संस्कृती ७३, १६३, ३२८
भावनात्मक एकता १३३, १३४
भावे, (विनोबाजी) ८१
भाषणस्वातंत्र्य १४४, २२०, २३८, २४१, २८२
भाषाशास्त्र ३२८
भ्रष्टाचार २१२

मॅक्किमलन, लॉर्ड १५८, २००, २०३
मॅक्समुल्लर १५, १७०
मॅक्स लर्नर ७६
मॅग्नाचार्टा २४७
मॅजिस्ट्रेट कोर्ट, मंडळी २१२, २१३, २३२
'मटिरिॲलिझम्' ५९
मंडलिक, रा. सा. विश्वनाथ नारायण १९६
मध्ययुगीन भारत २७०
मध्ययुगीन युरोप १००
मध्वाचार्य ६४
मनुवचन २६३
मनुस्मृती ३६, १०३, १११, ११५, ११६, ११७, ११९, ३३६, ३३७
मनू ७१, १११, ११२, ११४, ११७, ११८, १७३, २००, २८३, ३३७
मद्रास ॲक्ट (ग्रंथालयांसंबंधी) २६९, २७०
मराठवाडा ग्रंथालय संघ २७२
मराठा, मराठा समाज ८९, ९०, ३०८; -वेदोक्त हक्क ३९; क्षत्रियत्व ४०
मराठी, मराठी भाषिक २६०, ३०३

मराठी ग्रंथालय परिषद २६०, २६४, २६५, २६७, २६९, २७१, २७४
मराठेशाही ६९
मवाळ ५, ७२, ३०९
महाड-सत्याग्रह ३३६
महाजनी, (वि. मो.) ३०७
महाभारत ६०, १०५, ११०—चा काल २०;—शांतिपर्व २२, २३
महाराष्ट्र, (नव महाराष्ट्र) ४, ७, ८, १२, १५, २८, ४९, ५१, ६८, ६९, ७२, ७३, १३३, १३४, १३८, १३९, २६१, २६५, २६९, २७०, २७१, २७२, २७३, २७४, २७६, २८७, ३०३, ३०८, ३०९;-ची एकात्मता १३५, २६५;-चे सामाजिक जीवन ७६, २६५, २७६
महाराष्ट्र-निर्मिती २७३
महाराष्ट्र राज्य (सरकार) १३२, १३७, २३३, २६०, २६९, २७१
महाराष्ट्रीय (जनता) ७१, ७३, ३०७, ३०८, ३४०, ३४१, ३४२, ३४३
महाराष्ट्रीय संत ६६
महाराष्ट्रीय संस्कृती १३३, २७४
'महाराष्ट्रीयांस अनावृत पत्र' ३११
महावीर स्वामी ६०, ६१, ६२, ६५, १२३, १२४, १६७, ३०२, ३०३
महालिंगम्, डॉक्टर ११५
माडगावकर, न्या. ४०
मांडव्य ११३
माधव ज्यूलियन २६०, २७४, २७५
माधवराव वि. राघवेंद्रराव-सगोत्रविवाह ४२
माध्व ६१
मातृभाषा ३५७, ३५८, ३५९
मानवतेचे अधिराज्य २४८
मानवी हक्कांची घोषणा २४४
मार्क्स, मार्क्सवाद १७३, २४२
मिताक्षरा ३६, ३७, ४१, ४२, १०३
मिताक्षरापद्धती ९२, ९३
'मिनिमम वेजेस् ॲक्ट' २८१
मिल्ल १५४
मीमांसक ३८, ६०
मुकर्जी, डॉ. राधाकुमुद १०८
मुद्रणस्वातंत्र्य २८२
मुंबई १३३, १३४, २३३;—ची महाराष्ट्राशी एकात्मता १३२
मुंबई उच्च न्यायालय (हायकोर्ट) १९३, १९५—१९८, २९८, २९९, ३६०, ३६१, ३६२, ३६४
मुंबई ग्रंथालय संघ २७२
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय ३२५
मुंबई राज्य-हिंदूंची परिस्थिती ९३
मुंबई विद्यापीठ १३३, २९५, २९७, २९८, ३२५, ३५४
मुलींचा हक्क व हिस्सा ८९
मुसलमान १००, १८६
मुसोलिनी १४५
मूर्तिपूजा ३४३
मूलभूत कर्तव्ये १४४, १४५, १७२, १८२
मूलभूत तत्त्वे १६५
मूलभूत स्वातंत्र्य २४५
मूलभूत हक्क (अधिकार) ९१, १४३, १४४, १४५, १७२, १८२, १८३, २१९, २२०, २२२, २३८, २३९, २४१, २४५, २४६, २८८, ३४६

मेकॉले २५५
मेटलंड ९७
मेधातिथी ३६, ३८, १०३, १११
मेन, सर हेन्री ९७, ९८, ९९, १०८, ११९, १२०
मेहताव, डॉ. हरेकृष्ण ३०१
मोझेस १००
मोक्ष, मोक्षधर्म १६, ५६, ६४
मोक्षशास्त्र १७
मौनी विद्यापीठ ७६, ७७
मौर्यांचे साम्राज्य ११६
म्हैसूर संस्कृत सीरीज ११५

यजुर्वेदी २७
यज्ञ, यज्ञयाग ६५, १०७, १२३, ३०२, ३०३
यज्ञोपवीत ३२, ३३, १२५
याज्ञवल्क्य ३७, ४१, ७१, १११, ११४, ११७
याज्ञवल्क्य स्मृती ३६, १०३, ११२, ११६
युद्धे, आधुनिक १६८
युनायटेड नेशन्स १६४
योग ६१
योगविद्या ३२८

रघुनंदन १०३
रंगनाथन्, डॉ. २६६, २६७
रयत शिक्षण संस्था ३४३
रशिया १४६
रसेल, बर्ट्रांड ५४, ५७, ७०, २८०
रस्किन २५५
रहीम, सर अब्दुर १००
राईट २५५
राईस ६६
राखीव जागा, शैक्षणिक संस्थात २२०
राजधर्म ६०
राजकारणी व्यक्तींचे स्तोम २८५, २८७
राजकीय अभिजनसत्ता ९९
राजकीय जीवन, प्राचीन भारतातील ११४
राजकीय क्रांती, रशिया-चीनमधील २५७
राजकीय न्याय २४५, २८८
राजकीय समता ७५, ८६
राजस्थान विद्यापीठ १७७, १७८, १८९
राजा, राजपद १०४, १०५, १०६, ११२;—चे अधिकार ९९
राजाध्यक्ष, न्या. २०९
राजेन्द्रप्रसाद, डॉ. ३३८
राज्यतंत्र, प्राचीन भारतीय १०४, १०६
राधाकृष्णन्, डॉ. सर्वपल्ली १७, १८, ६१, ६६, १८०, २८६, ३५८
रानडे, न्या. महादेव गोविन्द ४, ६८, ६९, ७१, १२२, १२४, १२६, १२९, १३०, १३८, १६३, २३४, २९९, ३२४, ३४०, ३४१, ३६१
रामकृष्ण परमहंस ६८, १२५, १२९
रामकृष्ण मिशन १२५
रामचंद्रराव, श्री. २५३
रामानुज ६१
रामायण ६०,–काळ २०
राव कमिटी १३, ४२, ९३
राव, गणपत सदाशिव १९७
राव, न्यायमूर्ती १३
राष्ट्रभाषा ३५८, ३५९

राष्ट्रसंरक्षण २८३
राष्ट्रीय अहंकार, अभिमान ३५७, ३५८
राष्ट्रीय ऐक्य, एकात्मता २१३, ३५८, ३५९
राष्ट्रीय ग्रंथालय २६९
राष्ट्रीय सभा २२९
रॉबर्टस्, सर सिडने २६२
रॉय, एम्. एन्. ५९, १८०
रॉयल एशियाटिक सोसायटी ३२५
रॉय, राजा राममोहन ६८, १२२, १२४
रिकार्डो १५३
रीड, हर्बर्ट २५७
रूढिभंजन, बसवेश्वराचे ३०३
रूढी १५, २९, ५६, ५८, ९०, ९८, ११२, ११३, ११४, १२६, २२०, ३०४, ३२१, ३२२, ३२७
रूसो २७९
'रेस्पोन्सा प्रुडेंटिअम्' ११३
रोझेटी २९८
रोम, रोमन पद्धती ११३
रोमन कायदा, बारा कोष्टके ९९, ११९ १२०
रोमन लोक १००, ११९, १२०
रौलॅट रिपोर्ट ३३७

लर्नेड हँड, न्या. २०६, २२१, २२३
लँडीस १५०
ललितकला २५५
लाचलुचपत, न्यायालयातील २१२
लायब्ररी सेस २६९
लॉ कमिशन २३१, ३६३
लिंकन २१९
लिंगायत ४०, ६५, ६६, ८९, ९०
लिंगायत ग्रंथ ६६
लूथर १३९
लोककल्याण,—कारी राजवट ४५, ४६, २६५, २७३, २७९, २८५, २८९, २९०, २९१, ३११
लोकभाषा ६५
लोकभ्रम ५१
लोकरूढी ३७, १७१
लोकशाही ३, ४, १०, ११, ३९, ३९, ४५, ४६, ५०, ५१, ८३, १२९, १३६, १३८, १४३, १४४, १४७, १४९, १५२, १६२, १८९, २०४, २०५, २१९, २२५, २३४, २३५, २४१, २४६, २६५, २६६, २६९, २७२, २७३, २७८, २८०, २८१, २८२, २८४, २८५, २८६, २८८, २९१, ३०५, ३०६, ३११, ३२०, ३३९, ३५९, ३६१, ३६४; आर्थिक-स्वरूपी-, २४६;--चे कार्य २१७; —तील कायदे २५, २२४; सांसदीय—२१४
लोकशाही राष्ट्रे २१५
लोकशाही राज्य-शासन-पद्धती ३१, ८७, १५३
लोकशाही समाज, समाजरचना २००, २०२, २०३, २१४
लोकशाही जीवनपद्धती,—मार्ग ८८, १४५, १४८, १५४, १५५, १५८ १६४, २०७, २०८, २१३, २१५, २१६, २३४, २४५, ३४५, ३४६, ३४७
लोकशाही, भारतीय १६५—१६८, १६९, १७५, १८८, २१६, २३७.

लोकशाही समाजवाद २३८, २३९, २४२.
लोकशिक्षण १४, ५२, ७६–७८, २६५, २६६–२६८, २७२, २७४, २८०, २८४, २८६, २८७, ३१२
लोकसभा १३, ३८, ४१, ४३, ८७, १७१, १७४, १८६
लोकसेवा आयोग २४०
लोकहितवादी (रा. ब. गोपाळ हरी देशमुख) ६८, ७०, ७१

वकील, वकीलमंडळ १९५, १९८, १९९, २००, २०१, २०६, २०८, २२१, २२५, २३३, २४०, २९८, ३४७, ३६१, ३६२, ३६४
'वकिलीचें नीतिशास्त्र' २००
'वकील्स असोशिएशन ऑफ् वेस्टर्न इंडिया' १९६
वरदाचारिअर, एस्, १००, ११७
वर्डस्वर्थ २३४
वर्ण, वर्णभेद, वर्णव्यवस्था २४, ३१, ९०, १०६, ११०, १११
वर्णधर्म, वर्धाश्रमधर्म ३८, १११, १२६
वल्लभाचार्य ६४
वसाहतशाही शासन २३८
वसिष्ठ १०३
वाटपासंबंधीचा कायदा ८९
वारकरी, वारकरी संप्रदाय ६७, ६८ ३०३
वारली ३४
वारसाहक्क ८९
वाल्मीकी २२
विठ्ठलभक्ती ६७
विदर्भ १३४
विदर्भ ग्रंथालय संघ २७२
विद्यापीठ ८८, १६२, १६३, १६५, २५८, २६३;—चे कार्य १६६; भारतीय—, १८८–१८९; प्राचीन भारतातील—, १७७, १७८;— ची स्वायत्तता ३५९, ३६०.
विधवांची स्थिती १२७
विधवाविवाह ११, ३२१, ३२२
विधी,—ची तत्त्वमीमांसा ९९, धर्म-निरपेक्ष ११८–११९; मूलभूत–९९; रूढिगत–९९;–चा समुच्चय १४३
विधिनियमांची अधिसत्ता १४३, ३४६, ३४७, ३५०
विधिमंडळ, विधानमंडळ ९२, ९८, ९५, १४३, १४४, १४५, १४९, २३७, ३४६, ३६३, ३६४.
पंजाबचे—२३०
विधियंत्रणा ८७, २४६
विभूतिवाद ७४
विरोधी पक्ष, भारतातील २३७
विल्सन १०५
विवाह ५८, ८१
विवाहविषयक कायदा ८९
विवाहविच्छेदन १०, ८९
विवेकवाद २७३, २७९–२८६, २९०
विवेकानंद, स्वामी ६८, १२५, १२६
विषमता ६५, ६६ ('आर्थिक विषमता', 'सामाजिक विषमता' पाहा).
विशिष्टाद्वैत १८, ६४
विश्वकुटुंबी स्वरूप, मुंबईचे १३२
विश्वरूप, ग्रंथकार १०३
विज्ञानेश्वर ३६, ४१, ४२, १०३, ११२, ११३

'वीरमित्रोदय' १०३
वेंकटाचलम्, श्री. २५३
वेद, वेदवाङ्मय १७, १८, १९, २१, ३६, ३७, ३८, ४७, ६०, ६१, ६२, १०३, १०६, १०७, १०९, १११, ११४, १२४, १२५, ३०२
वेदकाल २१, २२, ३६, ५९, ६०
वेदवचन ११०
वेदविद्या ३३
वेदवेत्त्यांची स्मृती १११
वेदान्त १८, ६२, ६४, १२५
वेदोक्त प्रकरण ३९
वेबर ३२८
वेस्ट, सर रेमंड २९९
वेस्ट्रॉप, सर मायकेल २९९
वैदिक धर्म ६२, ६८
वैदिक मन ३०२
वैदिक समाजपद्धती १९
वैदिक संस्कृती ६३
वैदिक संहिता १०३
वैदिक ज्ञान ६५
वैष्णव संप्रदाय ६७
वैशेषिक, वैशेषिकवाद १८, ३८, ६०, ६१
वैशेषिक सूत्र ११०
वैश्य १२६
वैज्ञानिक अनुभूतिवाद १८६
वैज्ञानिक दृष्टिकोन १२७
व्यक्तिस्वातंत्र्य,—वाद ९६, ९७, १४४, १४८, १५३, १५४, २०५, २१६, २१८–१९, २२२, २३८, २४५, २५४, २७९, २८०, २८१, २८४, २८८, २८९
'व्यवहार' ११०, १११, ११६
व्यवहारधर्म ३८, ६०
व्यवहारनियम ११८
व्यवहार न्यायालये २१२
व्यवहारमयूख ३६, १०३
व्यवहारवाद २०२, २४२
व्यवहार-विधि-संहिता १८५, १८६
व्हिक्टोरियन काल १५३
व्हिक्टोरिया जनरल लायब्ररी, सातारा २६१
व्हिटने ३२८
व्हीनस प्रकाशन २७६, २७७

शहा, उत्सवलाल १९८
शहा, सर लल्लूभाई १९४, २९९
शब्दप्रामाण्य ५३, ६५, ६८
'शरणा'–बसवेश्वरांच्या ३०४
शंबूक २०
शंकराचार्य ६१, ६२, ६४, ३०३
शातवाहन ११६
शांताराम नारायण १९६
शामशास्त्री, डॉ. ११५
शासन, शासनसंस्था १४४, १४७, १७३, १८०, १८१, १८२, १८३, १८४, २०१, २०३, २६५, २७०, २७१, २७८, २८५, २८६, २८९, २९०
शास्त्री, लालबहादूर ३४८–३५०
शास्त्री, श्री. शंकरराम ११३
शास्त्रीय दृष्टिकोन १६५, १७३, १८६
शाहूमहाराज, छत्रपती ३४२
शिंगणे, सरकारी वकील १९७
शिंदे, विठ्ठल रामजी ६८, ७०, ७३, ७४, ३४०
शिवाजीमहाराज १३३

'शिवानुभव मंडप' ३०५
शिवेश्वरकर, नीलकंठ आत्माराम १९६, १९७
शिक्षण १३७, १६०, १६१, १६२, २५७, २६४, २६८, ३२०,—ची पुनर्रचना २५८; पुरातन भारतातील —१६१, १७८, —चे माध्यम ३५४, ३५७, ३५८, ३५९; माध्यमिक ३५७; विद्यापीठीय ३५८
शिक्षणशास्त्र ३५७
शुक्ल यजुर्वेद १०४
शुंग, शुंगकाळ ११६, ११७
शुद्धाद्वैत ६४
शूदास राजा २२
शूद्र २१, २२, ३२, ३३, ६५, ६६, ९१, १२३, १२४, १२६, १७७, ३०३;—मराठा कुटुंब ४०; —संबंधी हिंदू कायद्यातील भेद ३९
शेक्सपीयर ८४
श्रद्धा ५४, ५६
श्रमाचे पावित्र्य १६१
श्राद्धपक्ष ४०
श्रीधर ६१
श्रुती १११, ११२, ११३, १७१
श्रौतसूत्रे ३६, १०३

सगोत्रविवाह ४०, ४१, ४२
सत्तावनचे क्रांतियुद्ध १२२
सतीचा निबंध १२२
सत्य, वाचिक सत्य २८४, २८५
सत्यासत्यविवेक २८१, २८२
सत्यकाम जाबाल २०
सत्यनारायण समारंभाचा उपयोग ३१
सत्यशोधक चळवळ ३४२,
सदाचार—धर्ममूल ३७, १७१
सदाचारमूर्ती १५१
सनातनी २९, ३२, ३५, ४०
समता १८३, ३०५, ('आर्थिक समता' व 'सामाजिक समता' पाहा).
समता संघ ३१९
संमतिवय १२७
'समन्वय' १७५
'समय'—कायद्याचे मूळ १००, ११४, ११५
समाजधर्म १६
समाजधारणा २४, ५८
समाजपुरुष—साने गुरुजीकृत वर्णन ४६
समाजरचना (समाजसंरचना, सामाजिक रचना) ५७, १०६, १२९, १३०, १३१, १६७, ३०३, ३१३; आदिम —१२३; नवी—१२२; प्राचीन १०६
समाजवाद १३८, १३९, २१७, २३८
समाजव्यवस्था ९९, २०२
समाजशिक्षण ३५, ७८,
समाजसुधारक (सुधारक, सामाजिक सुधारक) १४, १९, २९, ३४, ३५, ४३, ४७, ५०, ५५, ५६, ५७, ५८, ६८, ७६, ८०, ८६, ८९, ९४, १२६, १२९, १३०, १३१, १७४, २९७, ३०१
समाजसुधारणा (सामाजिक सुधारणा) ४, ५, ६, ९, ११, १२, १४, १५, १६, १७, २५, २८, २९, ३०, ३१, ३५, ४४, ४६–५२, ५६, ६७, ७१, ७४, ७६, ७७, ८१, १२२, १२४, १२६, १२७, १३१, १३६, २९६, ३१४, ३२०–३२२.

समान सिव्हिल कोड ९२
समुद्रपर्यटन ११, १२६
सरंजामशाही २५७
सर्वभूतहितवाद ३२३
सर्वाधिकारशाही १४८
सर्वोच्च न्यायालय १४५, २१५, ३४४
('उच्चतम न्यायालय' पाहा.)
साधनांची शुचिता ३१०
साने, पांडुरंग सदाशिव ४६
सामाजिक आरोग्यव्यवस्था १५४
सामाजिक-आर्थिक अन्याय ३०९
सामाजिक-आर्थिक आशय १४६, ३०६
सामाजिक-आर्थिक क्रांती २०४;
—वसवेश्वरकृत ३०१. ('आर्थिक क्रांती', 'सामाजिक क्रांती' पाहा.)
सामाजिक-आर्थिक न्याय १६६, १६७, १६८, १६९, १७६, २२५, २२६, २३८, २३९.
सामाजिक-आर्थिक विषमता १३८, ३११
सामाजिक-आर्थिक समता १४८, १४९, १६८, २०३, २०७.
सामाजिक क्रांती ४०, ४६, ५४, ६०, ६६, ६८, ६९, ७५, २७३, २७७, २८५, २८६, २९०, ३४२, ३४३,–रशिया व चीनमधील २५७
सामाजिक क्रांतिकारक १६७
सामाजिक जीवन ६५,—दिल्लीचे २११
सामाजिक तत्त्वज्ञान ९६
सामाजिक न्याय ५०, ९६, १२९, १३१, १३६, १३८, १८२, १८३, १८४, १८६, १८९, २०२, २०३, २०७, २४५, २४६, २८१, २८२, २८८, २८९, ३०५, ३२३, ३४६
सामाजिक परिषद (परिषद) ३, १०, १२, ४८, ४९, ५०, ५२, ७१, ७३, ३१८, ३१९, ३२०
सामाजिक प्रशासक, प्रशासन १५३–१५७
सामाजिक विवेकतत्त्व ९४
सामाजिक विषमता २७, २८, ३०, ३१, ५१, १३६, १३७, १८७, २८८, ३०२, ३२३, ३३९
सामाजिक सत्य १७५, १७८
सामाजिक सदसद्विवेकबुद्धी १७२
सामाजिक समता ८, १५, १९, २४, २९, ३३, ३५, ३९, ४७, ४९, ५०, ५५, ५७, ६५, ७५, ७६, ७८, ८४–८६, १२२, १३०, १३१, १३६, १३८, १४५, १८७, २६५, २७१, २७९, २८९, २९१, ३०४, ३०६, ३०९–३१३, ३१९, ३२२, ३३९, ३४०, ३४२, ३४३
—चे तत्त्व ४५, ७७, ७९;—चा प्रचार ६८, ७५, ८०;—ची प्रतिज्ञा २८;—चा व्यवहार ३०.
सामाजिक समस्या १३२, १८२
सामाजिक संस्था (समाजसंस्था) १४, १७, १९, २४, २५, २६, ३६, ५६, ५८, ६०, ६२, ६७, ६८, १२७, १८६
सामुदायिक प्रकल्प ४५
साम्यवाद १४६, १४७, १५४, १८०, २१७, २४५
सार्वजनिक प्रशासन १५३, १५४
सावरकर, विनायक दामोदर १८
सांख्य ६१
सांसदीय स्वरूपाचे शासन २३७

साहित्य २८६, २८७
साहित्यिक २८७
सिसरो १००
सिंह समिती २७१
'सुधारक' पत्र ७३, ३०८, ३११
'सुब्राव वि० राधा' ३९
सूत्र-कालखंड ६१
सेक्युलॅरिझम ४३ ('धर्मनिरपेक्षता' पाहा.)
सेझाँ २५६
सेंट पॉल १०१
सेन, केशवचंद्र ६८, १२४
सेवास्वातंत्र्य १४४
सेशन्स कोर्ट २३३
सोविएट उच्चतम न्यायालय २३६
सोविएट देश २४२
सोविएट संघ–भारत मैत्री २३६, २३७
संगीत २५५
संघस्वातंत्र्य १४४
संचारस्वातंत्र्य १४४
संस्कृत वाङ्मयग्रंथ ९०, ९४, १०२, १०७, १२०,–प्राचीन १०६, २५५
संस्कृत भाषा ६७, १२१, १२४, १६७, ३०३, ३२८
संस्कृती २७, ११९, २८७, २९८, ३०२, ३२०; नागर–३४२; स्वदेशी ३४९
सांस्कृतिक जीवन, राष्ट्राचे २५४
सांस्कृतिक पुनरुत्थान, भारताचे २५८
स्कॉट, सर वॉल्टर २०१
स्मार्त ३८
स्त्री;–चे अधिकार ४१;–कौटुंबिक जीवन ३२१; –ची मिळकत ८९, ९४; –चे हक्क ९०, ९३; –ला ज्ञानाचा अधिकार ६५
स्त्रीशिक्षण ११, ६९, ७३, १२६, १२७, ३१४, ३१७, ३२१, ३२२
स्मृती ११३, ११९, १७१
स्मृतिकार ४१
स्मृतिग्रंथ ३७, ३८, ५६, ५८, ६०, १०३, ११२
स्मृतिवचन ११३
स्मृतिवाङ्मय ११०, १११, ११६
स्मिथ, ॲडम १५३
स्विफ्ट २०१
स्टीन, मेजर हंटर ३१७
स्वीडन १५१
स्पेन्सर, हर्बर्ट ७४, १५४
स्वेच्छाप्रेरित संघटना १५६, १५७

हम्मूरवी ५७, १००
हरिजन ८, ३३, ३४, ४९, ७४, ८०, ८२, १३७, ३२३, ३३६
हरिजन समाज ३५, ७६, ८१
हळदीकुंकू समारंभ–उपयोग ३१
हॅल्सबरी, लॉर्ड २०३
हार्वर्ड युनिवर्सिटी २६२
हिटलर १४७
'हिस्टरी ऑफ् दि धर्मशास्त्र' १०३
हिंदुस्थान-उत्तर दिशेचे संरक्षण २७७
हिंदू ६३, ९१, ११३, ११९, १८४, ३२८, ३३६;–ची एक संस्कृती २७;–ची सामाजिक संरचना ११८
हिंदू कायदा ११, १३, १७, ३७, ८९, ९०, ९१, ९४, ९७, १०२, १०३, ११६, ११७, १२९, १६०;–अतार्किक प्रकार ४२;—चा अभ्यास १२०; आद्य उगमस्थान १०९;–चा इतिहास ३६;–ची

उगमस्थाने १११, ११२; –ची उत्क्रांती ११४; –ची उत्पत्ती ११४; –ची ऐतिहासिक पृष्ठभूमी ९७; –चे तात्त्विक अधिष्ठान ९७; –ची प्रगती ३९; –चे प्रतिगामी स्वरूप ४१; –चे प्रशासन २९९; –प्राचीन ११९; –मराठा कुटुंब ४०; –चा विकास १०७, १०८, १७१; –चा विकासक्रम १०४; वेदकालातील ३६; –संशोधन ११५; –ची सुधारणा ३९, ४१
हिंदू कायदा विधेयक ८७, ८८
हिंदू कुटुंबदाऱ्या ९२
हिंदू कोड ८२, ८३, १२९, १७१, १७२, १८५, १८६, ३३८, ३३९; —धर्मनिरपेक्षतेचा विजय १८७; —सामाजिक सुधारणा ५२
हिंदू कोड बिल १२, १३, १४, ३५, ३९, १६०, १७४; –अयशस्विता ४०; –आक्षेप ४३; इतिहास ५२; लोकसभेची मान्यता ४२
हिंदू खगोलशास्त्र ३२८
'(दि) हिंदूज गेन्स ऑफ् लर्निंग' ९२
हिंदू जगत् ६२
हिंदू जीवनमार्ग १८१
हिंदू तत्त्वज्ञान १६, १७, २६, ६४, १७१, १७५, १८०, १८१, १८७, २२६, ३०३, ३०५
हिंदू धर्म १८, २५, ३४, ३६, ३७, ५६, ६१, ६३, ६८, ८२, १२५, १३१, १७१, १८५, १८७; —विषयक कल्पना ६२
हिंदू धर्मशास्त्र ३२
'हिंदू धर्मशास्त्राचा इतिहास' ३६, ३२५, ३२६, ३२९
हिंदू धार्मिक संस्था १८४
हिंदू मत, सनातनी १८५
हिंदू मन ५६, ५८, ७९
हिंदू–मुसलमान २७, १७९
हिंदू मोक्षधर्म १६
हिंदू वंश १७०
हिंदू विचारपद्धती १८
हिंदू विधी, प्राचीन १२०
हिंदू विधेयक ८९, ९२
हिंदू समाज ८, ९, २९, ६०, ७५, ७८, ८१, ९४, १२३, १३०, १७१, १७२, १७४, १८६, १८७ १८८, २९०, ३२१; आचार ७९; आहार ५८; उपनयनसंस्था ३३; जातिभेद २४, ३१; जिवंत असण्याचे रहस्य ३६;— पद्धती १२४;—रचना १२७, १२८, १७४, ३३६, ३३७;—व्यवस्था १०७, १३६; श्रेष्ठकनिष्ठ २६, समाजसुधारणा २५, ४३, ५२; हिंदू कायदा ३७; हीन दर्जाचे जीवन ३४
हिंदू समाजचिंतक १७१
हिंदू समाजसंस्था ५३
हिंदू, सवर्ण ३३७
हिंदू संस्कृती ५६, ५९, ६३, ६६, १०२, १२२, १६७, १७०, १८५, २२६, ३०१, ३०२, ३०३, ३२५, ३२९;—चा इतिहास ५३, ६०; उदात्त तत्त्व ७५; कर्मठपणा ६१; परस्परविरोधी विचार ६२, ६४; परिवर्तनशीलता ५९; मूळ स्वरूप ६७; समाजसंस्थांचे उगमस्थान ६०; स्फूर्तिदायक स्वरूप ६८

हिंदू सामाजिक संस्था १२२, १२४, १८७
हिंसा २८३
हुकूमशाही १४७, १५४, २८९
हेगल १०१
हेब्बर के. के. २५१ ते २५४, २५८
हेबर्ट, न्या. लॉर्ड १४९
हेरिडिटीचा नियम २६
हैद्राबाद ॲक्ट २६९
होम्स, न्या. ऑलिव्हर वेण्डेल २०१, २०२, ३२९
होल्डस्वर्थ १००
होल्योक, धर्मनिरपेक्षतेचा जनक १७२
ह्यूम, डेव्हिड ५५

क्षत्रिय, ६५, ६६,—मराठा कुटुंबाचा दर्जा ४०
क्षत्रियवर्ग ६६;—शूद्रात गणना २२
क्षात्रधर्म २८४
क्षात्रैक्य समाज ७९

ज्ञान ६२, ६४
ज्ञानदेव, ज्ञानेश्वर ६७, १२४, १६७, २९१
ज्ञानसंपादन,—प्राचीन कल्पना १६०, १६१

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रम..... दि: .....
आले ..... केले दि: .....

ठाणे संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५१९४८

REFBK-0015148